[ भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-ग्रंथमाला पुस्तक ७ वें ]

57

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

# वार्षिक इतिवृत्त

शके १८३५

संपादक व प्रकाशक

खंडेराव चिंतामण मेहेंदळे

चिटणीस

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत ]

पौष शु० १५।१८३६

किंमत १ रुपये 12/-

# भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें
## वार्षिक इतिवृत्त शके १८३५ सालचें

श्री

सन्मान्य अध्यक्ष व विद्वान् सभासद हो,

भारत- इतिहास- संशोधक- मंडळ शके १८३२ साली स्थापन झाल्यापासून पहिल्या तीन वर्षांचें इतिवृत्त सालोसाल आपणांस सादर केलें आहे च. आज चवथ्या वर्षाचें—शके १८३५ सालचें—इतिवृत्त सादर करीत आहे.

प्रथम संमेलनाची तीन दिवसाची सभा सोडून गतसालीं मंडळाच्या चोवीस पाक्षिक सभा झाल्या. त्या वेळीं हजर असणाऱ्या सभासदांचें सरासरी प्रमाण नऊ होतें. धुळें येथील सभासदांच्या इच्छेवरून धुळें येथें मिति आश्विन शुा ६ रविवार रोजीं रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर यांचे अध्यक्षतेखालीं एक विशेष सभा भरविली होती. तेव्हां सर्व धुळेकर सभासद हजर होते व इतिहास- संशोधक रा. राजवाडे यांनीं ' मुकुंदमुनींचें महाभाष्य ' हा निबंध वाचला. मूळ संस्कृत ग्रंथ म. सारस्वतांत प्रसिद्ध झाला आहे. पाक्षिक सभांत वेळोवेळीं वाचलेले बहुतेक सर्व निबंध वार्षिक वृत्तांत छापले गेले आहेत; न छापलेल्या निबंधांचें टांचण ग्रंथाचे शेवटीं जोडूं. सदरहु छापील निबंधांत लेख विषयवारीनें लावलेले सापडणार नाहींत. कारण निबंधकारांकडून निबंध जसजसे तयार होऊन आले तसतसे छापले गेले आहेत.

प्रथम-संमेलनांत जे ठराव पसार करण्यांत आले त्यांपैकीं (१) श्रीशिवाजीस्मारक कमेटीच्या अध्यक्षांनीं लिहिल्या बरहुकुम स्मारक कमेटीचा निर्णय अद्याप झाली नाहीं. वर्ष सहामहिन्यांत निकाल होईलशी आशा आहे. आपल्या विनंतिप्रमाणें कमेटीचा निर्णय अनुकूल झाल्यास संशोधनास अगर इमारतीस अगर दोहोंस हि चांगली मदत होईल. (२) महाराष्ट्र–कवि चालविण्याचें मंडळानें अंगावर घेतलें (प्रथम संमेलनवृत्त पृष्ठ ८०), व त्याप्रमाणें शके १८३५ सालीं मासिकाचे चार अंक अगदीं वक्तशीर बाहेर पडले. महाराष्ट्रांतील कवींनीं विचार-व-विकार-प्रदर्शन गेल्या हजारवर्षांत मुख्यतः संस्कृत प्राकृत अशा दोन द्वारांनीं केलेलें आहे, गद्य व पद्य अशा हि दोन्ही तऱ्हांनीं झालेलें आहे. तसेंच अशा सर्व प्रकारच्या सार-

स्वताचा अन्तर्भाव मासिकांत करतां यावा म्हणून महाराष्ट्रीय-सारस्वत व महाराष्ट्र-कवि अशा दुहेरी नांवानें मासिक सुरू केलें. मासिकांत ग्रंथ संपादण्याचें काम वे. शा. सं. रा. पाठक शास्त्री, रा. रसाळ, रा. देव, रा. चांदोरकर व श्री. मुजूमदार यांनीं केलें आहे याबद्दल मंडळ त्यांचें ऋणी आहे. मासिक बक्कशीर निघालें हें आत्माराम छापखान्याच्या मालकांच्या लोभाचें फळ होय. मासिकास वर्गणीदार अति अल्प मिळाले आहेत. मंडळास पदर खर्चून मासिक चालू ठेवावयाचें आहे. रा. वि. ल. भावे यांस पुरवावयाचा १५०० पृष्ठांचा मजकूर रा. देव यांनीं तयार केला आहे. तो ताब्यांत घेऊन सत्वर प्रसिद्ध करण्याबद्दल रा. भावे यांस विनंति केली आहे. (३) मंडळातर्फे संशोधन करण्याचे कामीं रा. आचार्य-कालगांवकर, रा. पोतदार व रा. पटवर्धन या त्रिवर्गास विनंति करावयाची. परंतु प्रत्येकास खर्चण्यास एक हजार रुपये संग्रहीं असल्याशिवाय या सद्गृहस्थांस विनंति करणें निरुपयोगी होतें. तेव्हां तो बेत सोडून या त्रिवर्गाकडून सवडीनुरूप जें संशोधन होईल त्या कामीं खर्च करण्यासाठीं वर्गणीनें जमलेल्या पैशाचा विनियोग करण्याचें ठरविलें आहे. (४) भारतीय इतिहास-अर्थशास्त्र-समाजशास्त्र-राजधर्मशास्त्र वगैरे शास्त्रांच्या अध्ययन-अध्यापनाची व्यवस्था करण्याबद्दलचीं विनंतिपत्रें येथील विश्वविद्यालयादि संस्थांस पाठविण्याचें ठरलें होतें. या च गोष्टींबद्दल विचार सध्यां विश्वविद्यालयादि-संस्थांत चालू आहे. त्यांच्या विचारें काय निर्णय ठरतो तो पाहून मग आपल्यास ज्या सूचना करावयाच्या त्या करणें रास्त होईल.

मंडळाच्या कामाबद्दलचे अनुकूल अभिप्राय, विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, मासिक-मनोरंजन, केसरी, ज्ञानप्रकाश, मराठा, बांबे क्रॉनिकल, टाइम्स वगैरे वर्तमानपत्रांनीं व मासिकांनीं प्रकट केले आहेत त्यांबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे. क्वचित् मतभेद आहेत परंतु ती बाब गौण आहे. केसरी व ज्ञानप्रकाश पाक्षिक सभांचें वृत्त सवडीप्रमाणें प्रसिद्ध करून मंडळाच्या कामाबद्दल देशांत माहिती प्रसिद्ध करून लोकांत या कामाची आवड उत्पन्न करून मंडळास आपले ऋणी करीत आहेत.

मंडळास खालील गृहस्थांकडून पुस्तकें नजर मिळालीं आहेत. त्यांचा साभार स्वीकार केला आहे:—

रा. ब. का. ना. साने, रा. रा. द. वा. पोतदार, भाईसाहेब गुप्ते, बा. प्र. मोडक यांचे चिरंजीव, रा. गो. का. चांदोरकर, रा. अ. बा. बर्वे, रा. बा. दा. मुंडले.

मंडळातर्फे केलेल्या विनंतीस मान देऊन खालील संस्थांनीं व सद्गृहस्थांनीं पुस्तकें मंडळास मोबदल्यादाखल पाठविलीं आहेत. व पुढें प्रसिद्ध होणारीं पुस्तकें पाठविण्याचें कबूल केलें आहे. त्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

ना. आर. इ. एन्थॉवेन,

भावनगरचे दिवाण,

रॉयल एशिॲटिक सोसायटी ( शाखा-मुंबई )

नागरी-प्रचारिणी सभा

त-गणपति शास्त्री ( त्रावणकोर दरबार )

शके १८३५ सालीं खालील गृहस्थ मंडळाचे सभासद होते. मंडळाच्या कामाची माहिती देऊन नवीन सभासद मिळविण्याचे कामीं रा. अनंत विनायक पटवर्धन, रा. देव, रा. लक्ष्मण जनार्दन खरे, श्री मुजूमदार, रा. पटवर्धन वगैरे सभासदांनीं विशेष साहाय्य केलें. ज्या नांवापुढें *अशी खूण केली आहे ते गृहस्थ या सालांतील नवीन सभासद होत.

( अ ) आश्रयदाते सभासद

*श्रीमंत सर परशुरामराव भाऊसाहेब पटवर्धन के. सी. आय्. ई. संस्थान जमखंडी, — जमखंडी

( आ ) हितकर्ते सभासद

श्रीमंत नारायणराव गोविंद ऊर्फ बाबासाहेब घोरपडे संस्थान इचलकरंजी — इचलकरंजी

( इ ) सभासद†

| | |
|---|---|
| रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्, एल्, बी. | पुणें |
| *रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर बी. ए. | पुणें |
| *रा. रा. मार्तंड त्रिंबक गद्रे इनामदार | पुणें |
| *श्री. व्यंकटराव तात्यासाहेब गुजर जहागीरदार | नागपूर |
| ना. गोपाळ कृष्ण गोखले बी ए. सी. आय्. ई. | पुणें |
| *रा. रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे बी. ए. एल्, एल्, बी. हायकोर्ट वकील | मुंबई |
| रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर बी. ए. एल्, एल्, बी वकील | धुळें |
| *रा. रा. मुकुंद रामराव जयकर एम्, ए, बार. ॲट्. लॉ. | मुंबई |
| *प्रोफेसर बळवंतराय कल्याणराय ठाकोर एम्. ए. | पुणें |
| *श्रीमंत रामराव अमृतराव ऊर्फ अबासाहेब डफळे सं. जत | जत |
| रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव बी. ए, एल्, एल् बी, वकील | धुळें |

† यादी अकारविल्हे

श्री. रा. विनायक नीलकंठ नातू इनामदार | पुणें
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन बी. ए. | पुणें
*श्री. सरदार. गोविंद बळवंत पटवर्धन शास्त्री, | सावली
*रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. | पुणें
*रा. रा अनंत सखाराम फडके | भुसावळ
*रा. रा. सदाशिव रामचंद्र बसले बी. ए. एल्, एल्, बी. हायकोर्ट वकील. मुंबई
*रा. रा. नारायण मल्हार बेद्रकर बी. ए. एल्.एल्. बी. वकील उमरावती
रा. रा. भास्कर वामन भट वकील | धुळें
रा. रा. विनायक लक्ष्मण भावे बी. एस्. सी. | ठाणें
*रा. ब. विष्णु मोरेश्वर माहाजनि एम्.ए. | अकोलें
श्री. सरदार गंगाधरराव नारायण मुजूमदार, | पुणें
रा. रा. खंडेराव चिंतामण मेहेंदळे बी. ए. सरदार (चिटणीस) | पुणें
रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी, ए, इतिहास-संशोधक | पुणें
*गं भा. श्री० रमाबाई रानडे | पुणें
रा. ब. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल्.एल्. बी. | कल्याण
*ना. रा. ब. गणेश कृष्ण साठे वकील | सोलापूर
रा. ब. काशीनाथ नारायण साने बी. ए, (अध्यक्ष) | पुणें

(ई) साधारण सभासद†

*रा. रा. बळवंत रामचंद्र अनगळ ॲडव्होकेट | उमरावती
*रा. रा. जयराम केशव असनारे बी. ए. बी. एल् | उमरावती
*रा. रा. गोपाळराव नारायण उकिडवे | सांगली
श्री मोरेश्वर चिंतामण ओंकार, सरदार | पुणें
*रा. ब. रावजी बाळाजी करंदीकर बी. ए. १ | धारवाड
रा. रा. गणेश सखाराम खरे एंजिनियर | पुणें
*रा. रा. लक्ष्मण जनार्दन खरे एम्, ए. एल्, एल्, बी. | उमरावती
रा. रा. हरि गणेश गोडबोले बी. ए. | पुणें
*रा. रा. नरहर रामचंद्र घुडे | कारंजा
*रा. रा. नारायण गोविंद चाफेकर बी. ए, एल् एल्, बी. | खेड
*रा. रा. रामकृष्ण रावजी जयवंत बी. ए, एल् एल्, बी. | उमरावती
*रा. रा. विश्वनाथ गणेश जावडेकर बी. ए, एल् एल्, बी. | धुळें
*रा. रा. अनंत विश्वनाथ टिळक, बी, ए, एल् एल्, बी. | धुळें
*रा. रा. रामचंद्र उमाकांत ढमढेरे | बडोदें

---

१ मयत † यादी अकारविल्हे.

| | |
|---|---|
| *रा. रा. यशवंत स्वामीराव तिळगुळकर बी. ए, एल्, एल्, बी. | विजापूर |
| *रा. रा. हरि विठ्ठल तुळपुळे बी. ए, एल् एल्, बी. | पुणें |
| *रा. रा. सदाशिव महादेव दिवेकर | मुंबई |
| *रा. रा. यशवंत गोविंद देशपांडे बी. ए, एल् एल्, बी. | उमरावती |
| *रा. रा.पी. व्ही. कृष्णस्वामी नाईक | तंजावर |
| *रा. रा. गजानन घनःश्याम नाडकर्णी ॲडव्होकेट् | मुंबई |
| *श्री. रा. विनायकराव मोरेश्वर नातू इनामदार | पुणें |
| रा. रा. शिवराम महादेव परांजपे एम्, ए. | पुणें |
| *रा. रा. केशव आप्पा पाध्ये बी, ए एल् एल्, बी. | ठाणें |
| रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. | पुणें |
| *रा. रा. विनायक चिंतामण पांडे बी. ए, एल् एल्, बी. | उमरावती |
| *रा. रा. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर बी. ए, बार ॲट, लॉ. | पुणें |
| *रा, रा, दत्तात्रय शिवराम पुसाळकर वकील | एरंडोल |
| *रा. रा. केशव वामन ब्रम्ह बी. ए. एल् ,एल् बी. | उमरावती |
| *रा. रा. विष्णु काशीनाथ भागवत बी. ए, एल् एल्, बी. | अमळनेर |
| *रा. रा, राजाराम रंगनाथ भालेराव | पुणें |
| *रा. रा. नारायण बळवंत भिडे बी. ए, एल् एल्, बी. | पुणें |
| *रा. रा, बळवंत सखाराम भुसारी | पुणें |
| *रा. रा. वासुदेव दामोदर मुंडले | इसलामपूर |
| *रा. रा. कृष्णाजी बळवंत मोघे, कारभारी | जमखंडी |
| *रा. रा. महादेव विष्णु मोडक बी, ए, एल् एल्, बी | नंदुरबार |
| रा. रा. शंकर रामचंद्र राजे | पुणें |
| *रा. रा. वासुदेव विष्णु शिदोरे बी. ए, एल्, एल् बी. | धुळें |
| रा. रा. अच्युत सीताराम साठे एम्, ए, बी. एल् | उमरावती |

( उ ) सहानुभविक सभासद†

| | |
|---|---|
| *रा. रा. द. वि. आपटे बी. ए. पोंडा | गोवा |
| रा. रा. नारायण बापूजी उडगीकर एम्, ए. | पुणें |
| *रा. रा. पांडुरंग वामन काणे एम्, ए, एल्, एल्, एम्. | मुंबई |
| *रा. रा. केशव बाजीराव कुळकर्णी | इंदापूर |
| *रा. रा वासुदेव वामन खरे | मिरज |
| रा. रा गोपाळ रावजी गोगटे बी, ए. एल्, एल्, बी. | भुसावळ |

† यादी अकारविल्हे

| | |
|---|---|
| रा. रा. दत्तात्रेय श्रीराम जोशी इनामदार | तळेगांवदाभाडे |
| *रा. रा. वामन दामोदर तळवलकर वकील | पुणें |
| *रा रा. महादेव गंगाधर दामले बी. ए, एल् एल्, बी | उमरावती |
| *रा. रा. रामचंद्र विनायक पटवर्धन बी. ए, एल् एल्, बी. | पुणें |
| *रा. ब. विठ्ठलराव नारायण पाठक बी. ए. | सातारा |
| रा. रा महादेव मोरेश्वर फडणीस इनामदार | पुणें |
| रा. रा. हरि रघुनाथ भागवत, बी. ए. | पुणें |
| रा. रा. चिंतामण गंगाधर भानु बी. ए. | पुणें |
| रा. रा. हरि गोविंद लिमये एम्, ए. | पुणें |
| *रा. रा. विष्णु नारायण वर्तक एम्, ए, एल्, सी. ई. | माळशिरस |
| *रा. रा. विनायक रामचंद्र सरज्योतिषी | पोंडा—गोवा |

( ऊ ) वर्गणी देणारे / चहाते सभासद †

| | |
|---|---|
| *रा. रा. कृष्णाजी विष्णु आचार्य कालगांवकर | पुणें |
| रा. रा. हरि नारायण आपटे | पुणें |
| रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर, वकील | सातारा |
| *रा. रा. त्र्यंबक गुरुनाथ काळे | पुणें |
| *रा. रा. माधव विष्णु खरे, वकील | एरंडोल |
| *रा. रा. विष्णु दत्तात्रेय गोखले, एम्. ए. | पुणें |
| *रा. रा. मल्हारराव राघोबा जाधव | नेवासे |
| रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन | पुणें |
| *नामदार रघुनाथ पुरुषोत्तम परांजप्ये एम्. ए. बी. एस्. सी. | पुणें |
| रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर | पुणें |
| रा. रा. दत्तो वामन पोतदार बी. ए. | पुणें |
| *रा. रा. अनंत वासुदेव फडणीस | पुणें |
| *रा. रा. नारायण विठ्ठल मावळणकर | पुणें |
| *रा. रा. विष्णु गोविंद विजापुरकर एम्. ए | तळेगांव-दाभाडे |
| *रा. रा. कृष्णाजी त्र्यंबक हसबनीस | पुणें |

रा. ब. दत्तात्रेय बळवंत पारसनीस मंडळाचे सभासद आहेत परंतु कोणत्या वर्गांत नांव घालावयाचें ते त्यांनीं अद्याप कळविलें नाहीं.

एकूण साल अखेरीस सभासद १०१ पैकीं एक मयत.

---

† यादी अकारविल्हे

शके १८३५ सालीं मंडळाचा जमाखर्च पुढें दिल्याप्रमाणें झाला आहे:—

| जमा | खर्च |
| --- | --- |
| १५०६–१२–० वर्गणी | ३५६–०–० शके १८३४ चे दुसऱ्या सहामाहीचे वृत्ताची छपाई, बांधणी. |
| ३९५–०–० देणगी | १४८–१४–० प्रथम संमेलनवृत्त छपाई, बांधणी |
| १०१–६–० पुस्तकविक्री | २९–६–० किरकोळ छपाई |
| ६२–८–० मासिकाची वर्गणी | २०८–९–९ मासिकास खर्च चार अंकांचा |
| २०६५–१०–० | ४६–७–३ टपाल खर्च |
| १९०१–८–६ | २५–०–० संशोधन खर्च |
| | २५–०–० बँकेंत बूड |
| | ११–०–० किरकोळ खर्च |
| | ३९–३–० दप्तर खर्च |
| | ७४–९–६ कर्जाची फेड |
| | ९६४–१–६ |

देणगीदाखल रा० भा. के. वेलणकर यांनी रक्कम रु० १०० व रा० बा. द्वा. हसबनीस यांनीं रु. ५० स्वयंस्फूर्तीनें दिले आहेत हें त्यांस विशेष भूषणावह आहे.

शके १८३५ सालांतली सभासदांची संख्या, व जमेच्या व खर्चाच्या रकमांची मागील तीन सालांच्या संख्यांशीं तुलना करून पाहिली असतां मंडळाची हरएकप्रकारें प्रगति झाल्याचें दिसून येईल. म्हणून आपलें आपण च अभिनंदन करावेसें वाटणें अगदीं साहाजिक आहे. परंतु इतक्या सभासदांनीं अटोकाट प्रयत्न चालविले असतांनां हि आपली प्रगति इतक्या मंदगतीनें व्हावी याचें मला सखेदाश्चर्य वाटत आहे. आज सरासरीनें वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांचे धरण्यास हरकत नाहीं. खर्चाच्या रकमा ठोकळपणें (१) वार्षिकवृत्त छपाई खर्च रु. ६०० (२) सारस्वताच्या मासिकाचा छपाईखर्च रु. ६०० आहे. इतिहासाच्या मासिकास सुरवात करण्याबद्दल फार निकडीचीं पत्रें सभासदांकडून येत आहेत. व तें मासिक लवकर सुरू केलें पाहिजे. त्यास सुमार २५००-३००० रु. खर्च यावा. शिवाय किरकोळ छपाई व टपाल खर्च आहेत च. हे व इतर वाढते खर्च भागवावे कसे याची कार्यकारी सभासदांस सारखी विवंचना लागून राहिली आहे. तसें च या कामीं अवश्य लागणारा (१) प्राच्य-पाश्चात्य संदर्भग्रंथसंग्रह केला पाहिजे च. कारण पुरेशी माहिती न मिळून, आधार तपासा-

बयास न मिळाल्यामुळें केलेलें मतप्रकाशन भोंतभोंत च करावें लागेल. निरनिराळ्या सभासदांच्या जवळ झालेला संग्रह सुरक्षित रहावा म्हणून ( २ ) अग्निबाधाविरहित असें संग्रहालय उभारण्याचा व तें चालविण्याचा विचार व्हावा व ( ३ ) प्रांतोप्रांतीं पांगलेलीं साधनसामुग्री गोळा करून आणण्यासाठीं मंडळास ठिकठिकाणीं प्रतिनिधि पाठवितां येतील इतकें मनुष्यबळ आपण जमविण्याचा निश्चय केला पाहिजे.

या व असल्या इतर प्रश्नांचा समाधानपूर्वक निकाल लावून मंडळाची कार्यपरंपरा अखंड कायम ठेवून मंडळ जास्त जास्त कार्यक्षम होत जाईल अशी उपाययोजना करण्याबद्दल व आहे असा च लोभ कायम ठेवून वृद्धिंगत करण्याबद्दल सर्वांस विनंति करून मी आपली रजा घेतों.

| | |
|---|---|
| वैशाख व. ११। शके १८३६<br>भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचें<br>कार्यालय | खंडेराव चिंतामण मेहेंदळे<br>( चिटणीस ) |

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीसरस्वतीमहाल–तंजावर | रा. शं. श्री. देव | १ |
| २ | श्रीसमर्थांच्या नांवावर मोडणारें एक लघु काव्य | ” ” ” | ३९ |
| ३ | वडवाळ सिद्ध नागनाथ | ” ” ” | ४० |
| ४ | श्रीशिवकालीन दोन पत्रें | ” ” ” | ४१ |
| ५ | पेशवाईतील एका भटजींची स्मरणवही | ” ” | ४३ |
| ६ | ज्योतिपंत महाभागवत | रा. गो. का. चांदोरकर | ४६ |
| ७ | विसोबा खेचरांचा गुरु कोण ! | ” ” ” | ५१ |
| ८ | श्रीक्षेत्र आळंदी येथील एक शिलालेख | ” ” ” | ५३ |
| ९ | शक १५९३ मधील शिवरायाची एक सनद | ” ” ” | ५४ |
| १० | भाक्ति–( क )–राज ग्रंथ कोणाचा ! | ” ” | ५५ |
| ११ | मानभावी लिपि अशुद्ध | रा. वि. का. राजवाडे | ५८ |
| १२ | लीळासंवाद | ” ” ” | ५९ |
| १३ | अकरा | ” ” ” | ६७ |
| १४ | चौधरी | ” ” ” | ७२ |
| १५ | जुनें वैद्यक–मराठी पोथी | ” ” ” | ७२ |
| १६ | हातगा ऊर्फ भोंडले | ” ” ” | ८१ |
| १७ | मध्व | ” ” ” | ९३ |
| १८ | अनुभवामृतांतील कांहीं अप्रसिद्ध ओंवी | रा. गो. का. चांदोरकर | ९३ |
| १९ | श्रीतुकाराममहाराज यांचें सदेहप्रयाण | ” ” ” | ९७ |
| २० | चोंभाकवि व संत | रा. शं. श्री. देव | १०० |
| २१ | गोपीनाथ दीक्षित ओक यांचें एक पत्र | ” ” ” | १०२ |
| २२ | पेशव्यांच्या ग्रामदेवता व कुलदेवता | रा. गं. मा. मुजूमदार | १०४ |
| २३ | देवानांपिय | रा. वि. का. राजवाडे | १०६ |
| २४ | व्याडि– संग्रह | ” ” ” | १११ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| २५ | मुकुंदराजाचा एक संस्कृत ग्रंथ | ” ” ” | १११ |
| २६ | ( प्राकृत ) प्रास्ताविक पद्यानि | ” ” ” | ११५ |
| २७ | पूर्णानंद | रा. गो. का. चांदोरकर | १२८ |
| २८ | सदानंद | ” ” ” | १३२ |
| २९ | सहजानंद | ” ” | १३६ |
| ३० | महालिंगदासाची सिंहासन ३२ शी | ” ” ” | १४२ |
| ३१ | श्रीसुषेणकृत आयुर्वेदमहोदधि | ” ” ” | १४७ |
| ३२ | मानभवोत्पत्तिकथा | ” ” ” | १५० |
| ३३ | श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें मूळ नांव कोणतें ? | ” ” ” | १५७ |
| ३४ | खरपुडी येथील रामेश्वराचे देवालयावरील शिलालेख | रा. गं. ना. मुजूमदार | १६० |
| ३५ | अनंतसुत संतपुरोहित तुकदेव | रा. पां. न. पटवर्धन | १६१ |
| ३६ | आंग्र्यांच्यासंबंधीं कांहीं टांचणें | रा. शं. श्री. देव | १६४ |
| ३ | अच्युताश्रमांचा वैरागर ग्रंथ | ” ” ” | १६५ |
| ३ | श्रीरामदासतुकारामसंवाद | ” ” ” | १६८ |
| ३९ | शक १३३५ तील बांदीवडे येथील एक मराठी शिलालेख | रा. वि. का. राजवाडे<br>रा. द. वि. आपटे | १६९ |
| ४० | कोडीत येथील एक सनद | रा. गो. का. चांदोरकर | १७५ |
| ४१ | छत्रपति संभाजीच्या कारकीर्दींतील अव्यवस्था | रा. वि. का. राजवाडे | १७७ |
| ४२ | तळेगांव ढमढेरे येथील श्रीसंभूनाथबावा | रा. पां. न. पटवर्धन | १७८ |
| ४३ | हरिदासांचा सोळा हाजारांचा योग-वासिष्ठ ग्रंथ | रा. शं. श्री. देव | १८० |
| ४४ | ब्रह्मीभूत देवराव हिंगणे | रा. पां. न. पटवर्धन | १८६ |
| ४५ | आनंदीबाई पेशवीण इचा पुराणिक | रा. वि. का. राजवाडे | १९० |
| ४६ | श्रीशक १०३ मधील मराठी ताम्रपट | रा. गो. का. चांदोरकर | १९२ |
| ४७ | बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा उल्लेख करणारीं दोन पत्रें | रा. वि. का. राजवाडे | २०० |
| ४८ | देवरूख येथील शके १५७५ मधील शिलालेख | रा. राजवाडे<br>रा. द. वि. आपटे | २०९ |
| ४९ | कर्णेश्वराचे देवळांतील शिलालेख | रा. वि. का. राजवाडे<br>रा. द. वि. आपटे | २१० |
| ५० | हडकोळण येथील शंभु छत्रपतीचा शक १६१० तील मराठी शिलालेख | रा. द. वि. आपटे | २११ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ५१ | शिंद्यांचा गृहकलह | रा. गो. का. चांदोरकर | २१३ |
| ५२ | कशेळी येथील शक १११३ तील शिलाहारांचा ताम्रपट | रा. वि. का. राजवाडे | २२० |
| ५३ | तुकारामसमकालीन व्यक्ती | रा. गं. ना. मुजुमदार | २२७ |
| ५४ | गाणपत्यांची एक यादी | ,, ,, ,, | २२९ |
| ५५ | शिवाजीमहाराजांचा वाडा | रा. पां. न. पटवर्धन | २३० |
| ५६ | क्षेत्र माहुलीसंबंधानें दोन सनदा | ,, ,, ,, | २३२ |
| ५७ | गुजराथ | रा. वि. का. राजवाडे | २३५ |
| ५८ | मयु | ,, ,, ,, | २३७ |
| ५९ | तुषार | ,, ,, ,, | २३९ |
| ६० | भांडारी | ,, ,, ,, | २३९ |
| ६१ | मौजे चिंचोली येथील गहिनीनाथाचे देवालयावरील शिलालेख | रा. गं. ना. मुजुमदार | २४० |
| ६२ | कचेश्वरकृत आत्मचरित्र | रा. पां. न. पटवर्धन | २४७ |
| ६३ | कचेश्वरानें पाडलेला पाऊस | ,, ,, ,, | २४७ |
| ६४ | कचेश्वराच्या तुकारामावर आरत्या | ,, ,, ,, | २५५ |
| ६५ | रावबाजी व फुलशहर | ,, ,, ,, | २५६ |
| ६६ | जेजुरी येथील शिलालेख | रा. द. वा. पोतदार | २६५ |
| ६७ | जयाद्रि महात्म्य | ,, ,, ,, | २७१ |
| ६८ | तीन देवदास | ,, ,, ,, | २७२ |
| ६९ | अठरा टोपकर | ,, ,, ,, | २७२ |
| ७० | 'ड'कार व 'छ'कार | रा. गो. का. चांदोरकर | २७३ |
| ७१ | शक १५५२ तील एका कुणब्याचें हस्ताक्षर | रा. वि. का. राजवाडे | २७४ |
| ७२ | हरिराज शेंडेकृत मुद्गलार्यांचें श्लोकबद्ध भाषान्तरद्वय | ,, ,, ,, | २७६ |
| ७३ | गोत्र ऊर्फ कुलनाम ऊर्फ आडनांव | ,, ,, ,, | २७८ |
| ७४ | दासींचीं नांवें संस्कृतांतून मराठी | ,, ,, ,, | २७९ |
| ७५ | विमानें व त्यांचा प्राचीन संस्कृत ग्रंथांत उल्लेख | ,, ,, ,, | २७९ |
| ७६ | अजे, अजी | ,, ,, ,, | २८१ |
| ७७ | विवेकसिंधु व गुरुचरित्र | रा. गं. ना. मुजुमदार | २८२ |
| ७८ | कपिलानिर्णय | ,, ,, ,, | २८५ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ७९ | कापिलानिर्णयकार सिद्ध गुणाकर पंडित कोण ? | पां न. पटवर्धन | २८६ |
| ८० | आमच्या प्राचीन ग्रंथांची लिपी कशी ? | रा. गो. का. चांदोरकर | २८७ |
| ८१ | शिवकालीन शास्त्री व पंडित | रा. पां. न. पटवर्धन | २९३ |
| ८२ | वाकेनीस ( ठोसर ) | रा. गं. ना. मुजूमदार | ३०५ |
| ८३ | पेशव्यांचा गोखाना | ,, ,, ,, | ३१५ |
| ८४ | नासिक येथील श्रीसुंदरनारायणाचें देवालय | ,, ,, ,, | ३१६ |
| ८५ | अंजनवेल तालुक्याची वहिवाट | रा. द. वा. पोतदार | ३१९ |
| ८६ | आंगरे यांचे महजर व इतर कागदपत्र | रा. पां. न. पटवर्धन | ३४२ |
| ८७ | धडफळे यादी | ,, ,, ,, | ३७५ |
| ८८ | श्री. दादासाहेब पेशवे यांचें एक पद | रा. गं. ना मुजुमदार | ३९९ |
| ८९ | तुकारामाचें आडनांव | रा. पां. न. पटवर्धन | ४०० |
| ९० | एक ऐतिहासिक ध्रुपद. | ,, ,, ,, | ४०२ |
| ९१ | शनवार वाड्यावरील शिलालेख | ,, ,, ,, | ४०२ |
| ९२ | मोंगलाची तळेगांवाकडील धामधूम | ,, ,, ,, | ४०४ |
| ९३ | महाराष्ट्रांतील जुनीं गीतें | रा. वा. दा. मुंडले | ४०९ |
| ९४ | बाजीरावसाहेब पेशवे यांच्या कुटुंबाची शेवटची हकीगत | रा. वि. का. राजवाडे<br>रा. पां. न. पटवर्धन | ४१९ |
| ९५ | कूपखनन लक्षण मराठी गद्य | रा. द. वा. पोतदार | ४२६ |
| ९६ | मल्हारीसुत | ,, ,, ,, | ४२९ |
| ९७ | चिकोडी येथील शक ९१० तील एक ताम्रपट | रा. वि. का. राजवाडे<br>रा. गो. का. चांदोरकर | ४३० |
| ९८ | कल्यारंभ व भारतीय युद्ध | रा. वि. का. राजवाडे | ४३५ |
| ९९ | निंबगांव येथील श्रीखंडोबा | रा. गं. ना. मुजुमदार | ४४८ |
| १०० | शिर्के यांस सनद | रा. म. मो. फडणीस | ४६५ |
| १०१ | कांहीं शब्दांची व्युत्पत्ति | रा. वि. का. राजवाडे | ४६८ |
| | सूचीः— | | |

॥ श्रीराम समर्थ ॥

# १ श्रीसरस्वतीमहाल–तंजावर

श्रीसमर्थांचे तिघे शिष्य भीमस्वामी, अनंतमौनी व राघवस्वामी यांचे व यांच्या शिष्यप्रशिष्यांचे मठ तंजावर प्रांतीं आहेत. त्यांच्या दर्शनासाठीं व श्रीसांप्रदायाचे ग्रन्थ पाहण्यासाठीं गेल्या वैशाखांत तिकडे गेलों असतां, कोणत्या हि एका मठांत आजपर्यंत मिळाली नाहीं इतकी ग्रन्थांची भिक्षा तंजावरास मिळाली ! ती विपुल आणि बहुमोल ग्रन्थसंपत्ति महाराष्ट्रबांधवांच्या घरोघरीं देऊन टाकण्याचा योग यावयाचा असेल तेव्हां येवो ! पण या निमित्तानें तिकडे गेलों असतां, तंजावरच्या राजवाड्यांत "सरस्वतीमहाल" म्हणून जें जगप्रसिद्ध ग्रन्थसंग्रहालय आहे त्याचें दर्शन होऊन जी कांहीं माहिती मिळाली, ती आज मंडळास सादर करावयाचा हेतु आहे.

या ग्रन्थसंग्रहाविषयीं थोड्या दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांत अशी बातमी होती कीं या संग्रहास आतां कोणी मालक न उरल्यामुळें तो संग्रह दुसरीकडे कोठें जाण्या-पूर्वी आपल्याकडील एखाद्या संस्थानिकानें तो दहा अकरा लाख रुपयांस विकत घ्यावा. याविषयीं तेथें तपास करतां असें समजलें कीं, हा सारा संग्रह तंजावरच्या राजांच्या खाजगी मालकीचा असून राजांच्या ह्या व इतर खाजगी मिळकतीचा वारस कोण याविषयीं सरकार दरबारीं वाद चालू आहे. या वादांत सातारचे महाराज, कोल्हापुरचे महाराज वगैरे लहान मोठे महाराज पक्षकार असून वादांत जो योग्य वारस ठरेल तो या ग्रन्थसंग्रहालयाचा मालक होईल. यावरून असें वाटतें, हा संग्रह दुसरीकडे कोठें न जातां, आपण च त्याचे मालक होऊं.

या महालाचें तोंड पश्चिमेस असून त्याला पांच मोठाल्या कमानी आहेत. मधल्या कमानींत आंत जाण्याचा दरवाजा आहे. या महालाची लांबी पावलाला पाऊल लावून ७६ पावलें व रुंदी ४५ पावलें आहे. आंत प्रवेश करतांच समोर श्रीसमर्थांची भव्य तसबीर आहे, तिचें दर्शन घडतें. शिवाय तंजावरराजघराण्यां-तील पुरुषांच्या तसबिरी आहेत. भिंतींतील व बाहेरचीं मिळून तेवीस मोठालीं कपाटें आहेत.

या संग्रहालयाचें महत्व त्यांत असलेल्या संस्कृत हस्तलिखित व ताडपत्रांवरील ग्रन्थांमुळें विशेष आहे. असे संस्कृत ग्रन्थ एकंदर १२,३७६ आहेत, व त्यांचे निरनिराळे ग्रन्थकार ८२५ आहेत. वेद, उपनिषदें, न्याय, व्याकरण, कोश, अलंकार, शिल्प, वैद्यक, ज्योतिष, मीमांसा, सांख्य, योग, धर्म, काव्य, पुराण, तंत्र, तर्क, नाटक, मंत्र, संगीत इत्यादि अनेक शास्त्रांवर हे ग्रन्थ आहेत. याशिवाय इतर हस्तलिखित ग्रन्थ सुमारें ६,००० आहेत. इंग्रजी सन १७६५ पासून तों सन १८५० पर्यंत प्रकाशित झालेल्या सुमारें २,००० इंग्रजी ग्रन्थांचा हि संग्रह या संग्रहालयांत आहे.

असा हा संग्रह करण्याची सुरवात मराठ्यांच्या पूर्वीं जे नाईक राजे होते त्यांनीं च केलेली होती व पुढें मराठी राजांनीं हि हें स्तुत्य कृत्य तसें च पुढें चालविलें. मराठी राजांपैकीं सरफोजी राजे यांचें लक्ष या संग्रहाकडे विशेष होतें असें दिसतें. मला वाटतें, प्राकृत ग्रन्थांचा बहुतेक सर्व संग्रह मराठी राजांनीं च व त्यांत विशेषतः सरफोजी राजांनीं केला असावा. रामायण, भारत, भागवत, पुराण, कथा, नाटक व वेदांत या सात सदरांखालीं प्राकृत ग्रन्थांचा संग्रह आहे. ज्ञानेश्वरी व दासबोध अशीं आणखी दोन स्वतंत्र सदरें च आहेत.

ह्या सर्व सदरांखालील प्राकृत ग्रन्थ पाहिले व त्यांपैकीं फक्त वेदांत ग्रन्थांचें संपूर्ण टांचण केलें. वेदांत ग्रन्थांचीं एकंदर ३७ दप्तरें आहेत. त्यांत असलेल्या ग्रन्थांचें टांचण येणेंप्रमाणें :—

**दप्तर १ लें** ( १ ) योगवाशिष्ठ [ माधवकृत ], वोव्या १२३३९, सर्ग १२६, पानें ४९०, राघवस्वामींचे शिष्य माधव.

**दप्तर २ रें** ( १ ) भीमोपदेश [ मेरुकृत ], या ग्रन्थाचे बारा सूर्य असून ग्रन्थसंख्या ६९०४ आहे.

मन्यारगुढीसी मेरुशिष्यतरणि। अनंत बोधकीर्णीं फांकला॥ १०/१६

असें श्रीसमर्थप्रतापांत म्हटलें आहे, ह्याचा अर्थ आतां बरोबर लागतो. मेरुस्वामी हे अनंतमौनींचे शिष्य होत.

**दप्तर ३ रें** ( १ ) देवभक्तानुवाद [ मुकुंदकृत ], पानें १६७, वोवी २०६२, भीमस्वामींचे शिष्य गोविंदबाळ, त्या गोविंदबाळांचे हे मुकुंद पुतणे होत.

**दप्तर ४ थें** ( १ ) आत्मसाक्षात्कार [ मेरुकृत ], ओवी २२७, समास ६, पानें १५, ( १ ) गुरुबोध [ गुरुदासकृत ] फार गोड ग्रन्थ आहे. पांच पांच समासांचें एक एक पंचक, अशीं पांच पंचकें आहेत. ओवी सुमारें ११०० ( १ ) भीमोपदेश दुसरी प्रत.

**दप्तर ५ वें** ( १ ) विवेकसिंधू शके १७४४ तील प्रत. ( १ ) पंचीकरण [ मुकुंदराजकृत ] गुरुपरंपराः— श्रीआदिनाथ–श्रीहरिनाथ–श्रीरघुनाथ-श्रीमुकुंद-राज.

शेवटः—

माझी आतां मंद वाणी । पवित्र केली इहीं वचनीं ।
प्रीति पावो पिनाकपाणी । म्हणे मुकुंदराजु ॥

( १ ) परमामृत, शके १७४१ तील प्रत.

**दप्तर ६ वें** ( १ ) हस्तामलक [ एकनाथकृत, प्रत आलिकडील ] ( १ ) शुकाष्टक [ एकनाथकृत, प्रत आलिकडील ] ( १ ) चिरंजीव पद [ एकनाथकृत, प्रत आलिकडील ] ( १ ) वेदांतसूर्य, [ श्रीधरकृत ] वोवी २४४२, पानें [ १० २१० प्रकरणें १२.

**दप्तर ७ वें** या दप्तरांत सुमारें शंभर वर्षांमागें केलेल्या खालील ग्रन्थांच्या प्रती आहेतः— (१) अनुभवामृत (१) स्वात्मानुभव [ ज्ञानेश्वरकृत] (१) परमप्रकाश ( १ ) लिखित पासष्टी ( १ ) ग्रन्थलेखणी ( १ ) पंचीकरण, [ ज्ञानेश्वरकृत ] ( १ ) रामामृततरंग, [ माधवकुमारकृत ] तरंग १५, वोवी १६६४ (१) आत्माराम, [श्रीसमर्थकृत] ( १ ) अंतर्भाव, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) सगुणध्यान [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) निर्गुणध्यान [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) पंचसमासी [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) पूर्वारंभ [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) आपरोक्षानुभव

**दप्तर ८ वें** ( १ ) सिद्धसंकेत, [ मृत्युंजयकृत ] ( १ ) प्रकाशदीप, [ ब्रह्मणिमुतोजी कृत ] [ २०

**दप्तर ९ वें** ( १ ) श्रीमत् भगवद्गीतेवर टीका ( चिदानंदानु कृत ), ओवी ५४४४.

आदि :—

प्रणम्य रामं पुरुषं पुराणं । तथा चिदानंदगुरुं यतिं च ।
कुर्वे महाराष्ट्रपदैस्तु गीता-। व्याख्यायनं व्याकरणाय पुंसे ॥१॥
नमस्कार करूनियां श्रीरामा । आणि गुरु चिदानंदाश्रमा ।
महाराष्ट्रपदीं परमात्मा । वर्णीन गीतार्थें ॥ १ ॥

अंत :—

प्रीति पावल्या श्रीराम । मोक्ष पैं होय सुगम ।
हरे संसारींचा श्रम । तत्प्रसादें ॥ ३५ ॥
सर्वेंद्रियप्रवर्तकें । येणें श्रीरघुनायकें ।
वाचा बोलिलें निकें । गीतार्थातें ॥ ३६ ॥
बुद्धि प्रवर्तली तेणें । संकल्प करविला मनें ।
म्हणौनि गीताटीका करणें । घडलें मज ॥ ३७ ॥
म्हणौनि सर्वेंद्रियप्रवर्तकु । स्वामी तो कृष्णनायकु ।
येऱ्हवीं हा सर्व लोकु । अचेतन ॥ ३८ ॥
यास्तव तेणें प्रवर्तविलें । म्हणौनि ग्रंथ निर्माण जालें ।
आतां श्रीगुरुतें स्तविलें । पाहिजे ॥ ४३ ॥
येणें श्रीगुरु चिदानंदें । स्वचरणाचेनि प्रसादें ।
कविशक्ति दिधली विनोदें । अच्युतासी ॥ ४४ ॥
चिदानंदु म्हणे अच्युता । तुज संसार नाहीं तत्वता ।
मनीं धरिली भगवद्गीता । तेणें तूं मुक्त ॥ ४८ ॥

इत्यादि. " शाके १६१४ श्रीमुख नाम संवत्सरे आषाढ शुक्ल चतुर्दश्यां गुरौ समाप्तः" ॥ ( १ ) श्रीमत् भगवद्गीतेवर टीका [ मेरुकृत ] फक्त पहिले तीन अध्याय. ( २ ) किंवा फक्त पहिला अध्याय. ( १ ) अवधूत गीता [ मेरुकृत ], ( १ ) राजयोग [ वामनकृत ], ( १ ) अपरोक्षानुभूति, [ वामनकृत ] ( १ ) निगमसार, ( वामनकृत ) शेवटच्या ओवींत शक १५९५ चा उल्लेख आहे.

**दप्तर १० वें** ( १ ) स्वानंदलहरी [ मेरुकृत ], ओंवी २०८ पानें २४.

आदि :—

श्रीराम परात्पर गुरुमूर्ती । आराधिली श्रीसमर्थें निजप्रचिती ।
ते समर्थस्वामी आम्हांप्रती । पूर्ण पावनकर्ते ॥ १ ॥

अंतः—

परात्पर सद्गुरु श्रीराम । परम गुरु समर्थ भीम ।
सद्गुरु अनंत अभिराम । प्रचीतीसी आला ॥ ४६ ॥

इति श्री स्वानंदलहरी । अनुभवमेरुची उजरी ।
निष्ठा अनंत साक्षात्कारीं । संभवली मोक्षरमा ॥ ४६ ॥

( १ ) रामामृतरंग [ माधवसुतकृत ], फक्त पांचवा तरंग ( १ ) विवेकसिंधु ( १ ) प्रकाशदीप

अहिर्निशीं ध्याता । ज्ञान होय त्वरिता ।
ब्राह्मणमोतोजि विनवी आतां । प्रकाशदीप ॥ ३९९ ॥

( १ ) प्रवृत्तिनिवृत्तीचा संवाद अथवा मनचरित्र

शके १८०८ त हा ग्रन्थ फार अशुद्ध रीतीनें छापलेला आहे. महालांतील प्रत शुद्ध आहे. ग्रन्थ महत्त्वाचा आहे. शुद्ध छापविला पाहिजे. (१) चित्रदीप, ( राघवकृत), ओवी ४११ श्रीसमर्थशिष्य राघव ते हे नव्हत. सद्गुरुस्तवन करीत असतां राघव म्हणतातः--

ऐसें स्तवितां सद्गुरु । प्रसन्न जाला अकल्पकरु ।
अनाथनाथ श्रीशंकरु । माझा दातारु जो ॥ १५ ॥

( १ ) परमामृत. ( १ ) वरदनागेश ग्रन्थ ओवी सुमारें १०००

मी तव ठाईचें अज्ञान । तूं नागनाथु सदा सर्वज्ञ ।
म्हणउनी केलें निरोपण । गुरुदेवें ॥ १/३४० ॥
सकळ शिष्यामाजी रंक हीन । सर्व सेवकामाजी दीन ।
तें निनवीतसे अज्ञान । नागेंद्र सुभान देखोनियां ॥ ११/३४ ॥
ऐसें गुरु नागेशाचें वचन । फिटे अज्ञान शिष्याचें ज्ञानें ।
करी स्थिति विज्ञान ॥ अखंडित ॥ ११/१४६ ॥

**दप्तर ११ वें** ( १ ) अनुभवामृताची टीका [ वीरेश्वरकृत ].

**दप्तर १२ वें** ( १ ) मानसपूजा [ मेरुकृत ] ओवी ३५.

मानसपूजेच्या ओव्या पंचतीस । पाठ करी त्यास राम भेटे ॥ १ ॥

इतवर्या महत्त्वाच्या ओव्या आहेत. ( १ ) मुद्राविलास [ एकनाथकृत ], ( १ ) श्रीनारायणलक्ष्मीहृदय ओवी १२८.

आदिः—

श्रीमन्नारायण चि परंज्योती । नारायण चि परमात्मा जगतीं ।
नारायण चि परब्रह्म मूर्ति । नमन तुजप्रती नारायणा ॥ १ ॥

अंतः—

यापरी लक्ष्मीहृदय । ध्यानपूर्वक पढे जो स्वयें ।
तो लाभे ऐश्वर्य अक्षय । विधीनें निश्चय हा केला ॥ १२८ ॥

( १ ) मनीषापंचक [ शिवरामकृत ] श्लोक १०.

आदिः—

भिक्षेस जातां शंकरें नीट पंथें । तेथें येक्या देखिलें अंत्यजातें ॥ वगैरे.

अंतः—

भेटे तयाला शिवराम सांप्रती ॥ १० ॥

( १ ) मानसपूजा [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) फुटयोग [ श्रीसमर्थकृत ].

अंतः—

राम तो कोण तो जाणे । दास तो कोण तो कसा ॥ वगैरे.

( १ ) तारक बोध [ गुरुदासकृत ] ग्रन्थसंख्या २४० ( १ ) नमन, शेवटीं "ज्ञानदेवविरचित " म्हटलें आहे. ( १ ) उत्तरपंचविशी किंवा उत्तरपत्रिका.
( १ ) अनुभवसार [ बहुधा मेरुकृत ] समास ५ ओवी १६.

अंतः—

शब्द अनंतीं उडाला । परंतु माझा अंत आला ।
विश्वासतां बोला । ठाव पुसे ॥ ५/१९ ॥

विश्वासें मानलें सद्गुरुवचन । तेणें निरसैल जन्ममरण ।
अनंतकृपेचें महिमान । कोण जाणे ॥ ५/२० ॥

( १ ) तारकब्रह्म ग्रन्थसंख्या ३१२.

आदिः—

ॐ नमो सिद्ध शून्य मंडला । यो दृष्टा शुद्ध स्फटिक निर्मला ।
सदानंदा सदोदिता । आत्मज्ञानप्रकाशिता ॥ १ ॥

आतां नमूं श्रीगुरुनाथु । जो तुकेशाचा शिष्यसुतु ।
आनंदचैतन्य अवधूतु । परमहंस ॥४॥
आत्मा अनुभवा प्रचिती । जे बोलिले गोरक्ष जती ।
ते सांग पां स्थिती । आत्मयाची ॥५॥
ऐसी आज्ञा श्रीगुरुची जाहली । वगैरे

अंतः—

तो हा तुकेशाचा नातु । आनंदचैतन्याचा शिष्यसुतु ।
परमानंद अवधूतु । आत्मा अनुभवा ॥३००॥
हें तारकब्रह्म संपूर्ण । आत्मा अनुभव परात्पर जाण ।
देहशुद्धी संपूर्ण । म्हणें परमानंदचैतन्य अवधूतु ॥ ३१२ ॥

**दप्तर १३ वें** ( १ ) चतुःसमासी, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) राजधर्म क्षेत्रधर्म बुद्धिवाद [ श्रीसमर्थकृत ]

आरंभः—

अखंड सावधान असावें । वगैरे

(१) मेरुबोध ( मेरुस्वामीकृत ) श्लोक ६.

॥ श्रीरामकर्ता ॥

प्रेमें पाझर लोचनीं हरिकथे देऊनि काना मना ।
ऐके सादर लोचनीं पाहतसे श्रीरामरूपें जना ।
सर्वस्वें विनटे स्वरूपमननें स्वानंदसिंधु भरे ।
हेलावे सहजें रघोत्तमकथा कल्लोळ तो नावरे ॥ १ ॥

स्मरे नाम वाचे भरे प्रेम आंगीं । सुखें नाचतो कीर्तनाचे प्रसंगीं ।
स्मरेना तया देह ना गेह कांहीं । विदेही सदा उन्मनीमाजि पाहीं ॥ २ ॥
नसे त्यासि लौकीक सभ्रांत पीसें । पिसा उन्मनानंद छंदें चि हासे ।
विदेही महा सौख्य उन्माद आंगीं । लिला योग ऐश्वर्य त्या अंतरंगीं ॥ ३ ॥
महामस्तिचा हस्ति तैसा चि योगी । विभांडूनियां दृश्य प्रौढी विरागी ।
भरे उन्मदें ब्रह्मआरण्य जेथें । नसे प्रांत उच्छृंखलु जाय तेथें ॥ ४ ॥

तयाचा निजध्यास त्या भाविकासी । हरीकीर्तनीं प्रेम अद्भूत त्यासी ।
सुखें गर्जती नाम वाचे सुछंदें । पदें गाति ते नाचती पैं विनोदें ॥ ५ ॥
पिसा ब्रह्मसायोज्य सिंधु सुखाचा । गुरुदास्य कर्तव्य प्रेमें चि साचा ।
जिवें वीकला जाय दैवेंसि बोले । सुखें बोधला मेरु कांहीं न बोले ॥ ६ ॥

( १ ) परमप्रकाश, [ निवृत्तिअवधूतकृत ] ( १ ) पंचयोग, [ श्रीसमर्थकृत ]

शेवटः—

पिपीलिकामार्ग ठाकेना । सोपा मार्ग विहंगमु ।
अनन्य भाक्तिच्या योगें । धन्य धन्य चि होइजे ॥

(१) पंचसमासी, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) टोपणसिद्धनिरूपण, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) पंचीकर्ण, [श्रीसमर्थकृत ] ( १ ) आत्माराम [ श्रीसमर्थकृत ] (१) षड्रिपु [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) राजधर्म [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) क्षेत्रधर्म [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) जुनाट पुरुष, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) पूर्वारंभ, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) भीमरूपी स्तोत्र, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) मानपंचक, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) पंचीकरणयोग, [ श्रीसमर्थकृत ]. ( १ ) अंतर्भाव, [ श्रीसमर्थकृत ] ( १ ) मीपणाचा समास, [ श्रीसमर्थकृत ]. ह्या मीपणाच्या समासाच्या ५९ ओव्या आहेत. हा समास आजपर्यंत इतरत्र कोठें पाहण्यांत नव्हता.

दप्तर १४ वें ( १ ) विवेकसिंधु प्रतीवर लेखनशक नाहीं. पण प्रत बरीच जुनी दिसते. ( १ ) अष्टावक्रटीका, [ शिवरामकृत ]

अंतः—

हा ग्रन्थ तीशावरि जाण दोनी । श्लोकाप्रती श्लोक चि देशवाणी ।
श्रीनाथदेवो वदवी सुखाचा । दयाळ राजा शिवरामजीचा ॥ १७ ॥

"इति श्री पूर्णानंदलक्ष्मीनारायणानुचररचिता" वगैरे. ( १ ) पंचीकरण, [ ज्ञानेश्वरकृत ] ( १ ) अष्ट सिद्धी नव निधी, हिंदुस्थानी भाषा, पानें २३ ( १ ) वाक्यसुधा पृष्ठें ९०

अंतः—

म्हणोन तुम्हा संताचा केला । काय मी वाचा बोले ।
परि यश आपुले आपण घेतले । हें चि खरें ॥ वगैरे

( १ ) पंचीकरण ( १ ) स्वात्मानुभव, शक नाहीं पण बरींच जुनी प्रत.

( १ ) मूळस्तंभ

अंतः—

संपूर्ण मूळस्तंभ जाला । शिवें गौरीस उपदेश केला ।
त्या प्रमेयाचा सेवितां गळाळा । जीवन्मुक्ती सोहळा पावती ॥

**दप्तर १५ वें** ( १ ) सिद्धनागार्जुन वैद्यशास्त्रावर गद्यात्मक ग्रन्थ ( १ ) दीपरत्नाकर, अध्याय १४, ओव्या ३१८०, पानें २२८ हा ग्रन्थ इतरत्र छापलेला आहे. त्याचे पंधरा अध्याय आहेत. या प्रतीचे फक्त चवदा अध्याय असून चवदाव्या अध्यायाचे अंतीं ग्रन्थाचा शेवट केला आहे. तो शेवट छापील ग्रन्थाशीं जुळत नाहीं. तसें च या ग्रन्थाचे कर्ते रत्नाकर होत, असें आपण मानीत आलों, पण या प्रतीच्या मुखपृष्ठावर च "श्री रामानंदकृत दीपरत्नाकर" असें लिहिलेलें आहे. हा ग्रन्थ म्हणजे गुरु रामानंद व शिष्य रत्नाकर यांचा संवाद दिसतो. उदाहरणार्थ छापील ग्रन्थाच्या हि सातव्या अध्यायाच्या शेवटच्या ओव्या पाहिल्या म्हणजे खात्री पटेल.

**दप्तर १६ वें** ( १ ) आत्मबोधावर टीका, ( जगन्नाथकृत ).

अंतः—

इति विश्वामित्रगोत्रसंभवें । जगन्नाथें जगदंबाकृपावैभवें ।
आत्मबोधाचें विवरण स्वभावें । केलें संपूर्ण ॥ १०५ ॥

( १ ) योगवाशिष्ठ [ माधवकृत ], पहिल्या दप्तरांत एक प्रत असून संपूर्ण ग्रन्थाची ही दुसरी प्रत होय. प्रस्तुत प्रतींत "निर्वाण" प्रकरणाच्या दोन प्रती आहेत; म्हणजे एका च प्रतीच्या दोन प्रती नव्हत, तर माधवांनीं दोन निरनिराळीं "निर्वाण" प्रकरणें लिहिलेलीं आहेत.

**दप्तर १७ वें** ( १ ) उपनिषत्तात्पर्य ग्रन्थसंख्या ८२५. पहिला अध्याय कमी आहे. सहाव्याचा शेवट असाः—

उपाधीविगळा आपण । हें आत्मत्वाचें लक्षण ।
इतुकें निरूपण । या अध्याइं ॥

इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे ।
निगम भूर्लोक भाषावतारे । षष्टोध्यायः ॥

(१) उत्तरपंचविसी ग्रन्थसंख्या २५ ग्रन्थाच्या मुखपृष्ठावर " राजश्री बावास्वामीकडील उत्तरपंचविसी " असें लिहिलेलें आहे.

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

प्रथम नमन गजानना । जो वंद्य अठरा पुराणा ।
तो साह्य कविजना । अठावीस वेळा ॥ १ ॥
चौतिसाचे मिळणी । येकुण पन्नास आले ठाकुनी ।
येकोण साठी बुझावणी । जाली तेथें ॥ २ ॥
चवेताळिसाचा संयोग । येकोण तीसें घेतला विभाग ।
बरवा बोडवला रंग । चौदा जणांचा ॥ ३ ॥
अष्ट भोगाची स्थिती । तेविसीं मांडिली वित्पती ।
चाळिसांसी करूनि विनंती । आणिलें तेथें ॥ ४ ॥
पंचावन्नाचे सेवटीं । येऊनि बैसले येकषष्टी ।
सेताळीस करिती गोष्टी । येकमेकातें ॥ ५ ॥
छपन्नाचा हेरू । बासष्टीस गेला पाचारूं ।
पंचेताळिसीं आदरू । केला त्यांचा ॥ ६ ॥
येकोण चाळीस वर वाळले । चोविसीं त्यासी वारिले ।
सात जणीं अंगिकारिले । मौन्य तेथें ॥ ७ ॥
येक उठावला तेरालागीं । दुसरा धांवे ते प्रसंगीं ।
त्रेताळीस लगबगी । अनिवार बोलिला ॥ ८ ॥
मदनाचे पांच शर । बाविसावरी लक्षुनी निर्धार ।
बेताळीस लक्षणी सुंदर । भेदूनि गेला ॥ ९ ॥
अठाविसाचा मेळा । त्रिपन्नेसीं उठावला ।
त्रिषष्टी थांबविला । येतां मार्गीं ॥ १० ॥
अठेताळिसे जणी । चौपन्नासी घेतले मेळउनी ।
येऊनि चौसष्टी योगिणी । संव्हारिले दैत्य ॥ ११ ॥

सतेताळीस आणि सततीस । दोहींचा जाला सौरस ।
येकतीसीं येकतीस । केलें तेथें ॥ १२ ॥

सोळावरी सा गेले । मार्ग न चले राहिले ।
येकतीसीं बळ दिधले । तियें वेळीं ॥ १३ ॥

छतिसाचें खंडूनि मन । येकावन्ना बोलती आपण ।
कुंठित होऊनि सत्तावन्न । राहिले तेथें ॥ १४ ॥

तेथें उत्धरिले बेताळीस । संतोष पावले पंचेताळीस ।
दशावतार निर्दोष । जगत्रय जालें ॥ १५ ॥

षट् वेदींचें सार । येकोणिसावें साचार ।
नव दुर्गेनें वधिले असुर । शुंभादिक ॥ १६ ॥

त्रिलोचनाचें ध्यान । वीस भूतीं केलें निर्वाण ।
तेविसां वेळीं प्रसन्न । जाला तया ॥ १७ ॥

येकेताळिसाचा अंतरीं । अठावन्ना क्रीडती मंदिरीं ।
बावन इछा करी । भेटावयाची ॥ १८ ॥

बेताळीस आरुढले विमानीं । तेतिस कोटी बंदमोचनीं ।
सत्तावीस मुमुक्ष होऊनी । सकळां मुखीं प्रकाशले ॥ १९ ॥

मेरुवेष्टित फेरा । करिती आदित्य बारा ।
तीस येकतीस धांवतां मछरा । साठिचिया ॥ २० ॥

सतरा म्हणती अठरा । मिळोनि तुम्ही विचार करा ।
अनुभवें पाहा वटेश्वरा । परतोनि घरा सुखी जावें ॥ २१ ॥

अकरा रुद्र जाले । भविष्य वर्तमान ना कळे ।
अनंतवरदें पुरले । मनामाजी ॥ २२ ॥

निवृत्तिप्रसादें । अनंदाचेनि विनोदें ।
अनुभवें आलें बोधें । सहज स्थिति परियेसा ॥ २३ ॥

या गोविया सार वस्तु । याचा संतीं घ्यावा परमार्थ ।
हा चि बोध असे सिद्धांत । विचारावें हृदयामाजी ॥ २४ ॥

विचारूनि सार घ्यावें । आणि मौन्यें राहावें ।
दयावंत असावें । सर्व भूतीं ॥ २५ ॥

॥ इति उत्तरपंचविसी पत्रिका समाप्त ॥

( १ ) कूटस्थदीप, प्रकरण तिसरें [ राघवकृत ].

आदिः—

ऐसा जो कां अनाथनाथ। श्रीशंकर माझा समर्थ।
तयासी साष्टांगयुक्त। अभेद नमित तद्रूपें॥ ८॥

अंतः—

अनाथनाथ दयाघन। श्रीशंकर पतितपावन।
साधक करी संपूर्ण। ज्ञानजीवन वरुषे॥ १५०॥
इति श्री कूटस्थदीप परम। जें आनंदवैभवाचें धाम।
ऐकतां हरे श्रम। राघव म्हणे भवाचा॥ १५१॥

१० ] ( १ ) तत्वविवेक, प्रकरण साहावें [ राघवकृत ] ( १ ) पंचभूतविवेक, प्रकरण सातवें [ राघवकृत ] ( १ ) द्वैतविवेक प्रकरण नवें [ राघवकृत ] यांचें च चित्रदीप प्रकरण मागें दहाव्या दप्तरांत आलें आहे. ( १ ) प्रकाशदीप, [ ब्राह्मण-मोतोर्जीकृत ] या ग्रन्थाच्या या दप्तरांत तीन प्रति आहेत. ( १ ) स्वात्मसुख [ एकनाथकृत ] या प्रकरणाच्या या दप्तरांत सात प्रति आहेत, पैकीं एका प्रतीचा शेवट असा आहे:— "तारण नाम संवत्छरे माघ वद्री ११ गुरुवारे ते दिनी ग्रन्थ समाप्त। चंदाउरीं ग्रंथ लिहिला हस्ताक्षर नारो तानाजी॥"

दप्तर १८ वें ( १ ) स्वात्मानुभव किंवा स्वात्मबोध [ श्रीज्ञानेश्वरकृत ] या प्रकरणाच्या या दप्तरांत नऊ प्रति आहेत; पैकीं एका प्रतीच्या शेवटीं शकाचा उल्लेख आहे, तो असाः—

२० ] शकें बारासें बारा। तैं ग्रन्थाचा केला उभारा।
परिसावया संत चतुरा। म्हणे निवृत्तिदासु॥ २३०॥
इति श्री स्वात्मानुभवकथन। ग्रन्थ पूर्ण अनुभवेंकरून।
याच्या श्रवणें होय ज्ञान। म्हणे निवृत्तिदासु॥ २३१॥

( १ ) आत्मबोधावर टीका [ जगन्नाथकृत ] या प्रकरणाच्या या दप्तरांत तीन प्रति आहेत. मागें १६ व्या दप्तरांत एक प्रत आहे च.

( १ ) आत्मबोधावर टीका गद्यात्मक, कोण कृत न कळे. ( १ ) आत्मानुभव ग्रन्थसंख्या २८१

आदि:—

आतां नमूं श्रीगुरुनाथु । जो सदाशिवाचा शिष्यसुतु ।
अनंतचैतन्य अवधूतु । तो प्रेमहंस ॥ ३ ॥

अंत:—

इति श्रीमद्दत्तात्रया आत्मबोध । अवधूत निरंतर जन शुद्ध बुद्ध ।
कथन केलें अनादिसिद्ध । निर्द्वंद्वत्वें ॥

( १ ) आत्मबोधावर टीका [ पूर्णानंदानुचरशिवरामकृत ] ( १ ) गोरखबोध या लहानशा प्रकरणांत मच्छेंद्र आणि गोरख या गुरुशिष्यांचा संवाद आहे. प्रकरण महत्वाचें आहे. याच्या तीन प्रति या दप्तरांत आहेत, पैकीं एक अत्यन्त जुनी असून बाकीच्या दोन प्रति तिच्या वरून केलेल्या दिसतात. [ १०

( १ ) आत्मबोधावर टीका अपूर्ण, पानें ५२, कोण कृत न कळे. ( १ ) मनीषापंचक, [ शिवरामकृत ] तीन प्रति आहेत. ( १ ) कालज्ञान, [ अज्ञानसिद्धनागेशकृत ] ग्रन्थसंख्या ५१३.

आदि:—

ग्रंथ कालज्ञान तत्त्वता । श्रीगुरुनाथ सांगता ।
तें परिसावें संत महंता । एकाग्र वृत्ती ॥ १ ॥

ॐ नमो गुरु शिवशिवा । परम शिवा महानुभावा ।
नमस्कार अंगिकारावा । बाळकाचा ॥ २ ॥

अंत:—

सर्व सिद्धीचा दाता । तो तूं कृपाळु नागनाथा । [ २०
अज्ञानाचा ज्ञान पिता । सर्वेश्वरु ॥ ४८४ ॥

सर्वदा सिद्ध तूं नागेशा । सर्वदा सिद्ध तूं पूर्णेशा ।
तृप्त केली अज्ञान मनो आशा । निजमहेशा निजगुरु ॥ ४८६ ॥

विजय श्रीगुरु नागनाथा । विजय पूर्ण कथा ।
विजय ज्ञान सिद्ध नागनाथा । श्रोते वक्ते होती विजई ॥ ५१२ ॥ इत्यादि

( १ ) ज्ञानाज्ञानविवरण अपूर्ण, पृष्ठें ३८ ते ५३ ( १ ) सिद्धानुभव, [ दासानुदासकृत ]

आदिः—

जय जय जया विनायका । येकत्वें विना हो येका ।
सिधा स्वसीध दायका । सीध विनायका तुज नमो ॥

अंतः—

हा गुरुभक्तां सुलभ । करतलामल सप्रभ ।
प्रगट कडकडीत सुभ । सिधानुभव ॥ २१९ ॥

याचा दाता सद्गुरु । केसीराज निर्धारु ।
वदवी वाचा साचारु । माझे मुखें ॥ २२० ॥
न्यून्य पूर्ण अर्थ । मी नेणे यथार्थ ।
दासदीनमुखें समर्थ । वदवीतो ॥ २२१ ॥

दास अनाथ जाणोनी । फलप्राप्ती केशीराजचरणीं ।
लाधली सफलपणीं । सर्व काळ ॥ २२६ ॥ वगैरे

॥ इति श्रीसीधानुभव दासानुदासविरचित ग्रन्थ समाप्त ॥

अशी समाप्ति करून पुढें मजकूर आहे तो:—

कावेरीतीरीं निजरंग शाई । त्या पटणापासुनी च्यारी पाही ।
त्या योजनी हा होरपुरग्रामीं । नदीतीरीं या सुखवस्ती नेमीं ॥ १ ॥
आनंतपुत्रें रामयानें । या गौतमुगोत्रकुलोद्भवानें ।
सीधानुभव केशवराजयामी । दीनामुखें हा वदवी नेमीं ॥ २ ॥
सोळा शतें तेवीस या शकासीं । जालें समाप्ती निज पुशमासीं ।
संवछरु हा वीशु जाणतो हा । दीनामुखें हा वदवीत पाहा ॥ ३ ॥

( १ ) ज्ञानसंन्यासटीका, [ दासानुदासकृत ] वोवीया १३१०, श्रीशंकराचार्यकृत ज्ञानसंन्यास ग्रन्थावर ही टीका आहे.

आदिः—

जय जया जी लंबोदरा । अनंत कोटी ब्रह्मांडें उदरा ।
माजी या चराचरा । सांठोवा ॥ १ ॥

अंतः—

ऐसे शंकर अभय । आणि केसीराज पाय ।
फळती हे निश्चय । संदेह नाहीं ॥ १३०९ ॥ वगैरे.

इति श्री दासानुदासविरचित ज्ञानसंन्यास-टीका संपूर्ण ॥

नंतर पुढें मजकूर आहे तोः-

श्रीरंगरंगा निजवास पाहीं । कावेरितीरीं सहवासता ही ।
तेथूनिया योजन पंचकासी । होसपुरनामें सहग्रामवासी ॥ १ ॥

वेणुनदीतीर वसोनि तेथें । या ज्ञानसंन्यासटिकेसि पैं तें ।
हा तारणु वत्सर पुस्य मासीं । वदी त्रिती सोम हि वासरासी ॥ २ ॥
अनंतपुत्रें निजनाम रामें । या गौतमुगोत्रकुलोद्भवामें ।
या केसिराजें निज दास रंका । मुखप्रवाहीं वदवी तदा कां ॥ ३ ॥
शके १६२६ हे सोळा शत सविसासी । केले समाप्ती निज ग्रन्थ यासी ।
दासानुदासी सह केसिराजा । कृपाकटाक्षें अवलोकनें ज्या ॥ ४ ॥

( १ ) मोक्षवर्म [ केशवकृत ] श्लोकबद्ध, अपूर्ण. हें प्रकरण अपूर्ण आहे याचें वाईट वाटतें. एकंदर प्रकरण फार प्रेमळ असावें असें वाटतें.

आदिः-

अति गतीप्रति हे मन त्यागितें । तरि निकें वरितें हरिलागि तें ।
हरिपदीं विरतें हरि सेउनी । मग सुखें असतें हरि होउनी ॥ १ ॥

मध्यः—

गुरु दयानिधिच्या वचनें बरें । वळखिलें अवघें निज हें खरें ।
म्हणउनी अति मी गति पावलों । निजसुखें बरवा बळकावलों ॥ ७३ ॥
अति दयाकर तारक नामा । भवतमांतक देशिक रामा ।
मज सदा स्वपदीं स्थिर ठेवा । निजसुखें करवा निजसेवा ॥ १४७ ॥
संसारचक्रांतक देवराजा । दयाळ हा केवल स्वामि माझा ।
क्षमापति चिन्मय चक्रवर्ती । सेवा सदा अक्षय चक्रमूर्ती ॥ १४८ ॥
संसारपाश हरुनी परिपक्व जालें । संसारभंग करुनी बरवें निवाले ।
स्वानंद पूर्ण फळला भजतां तयांसी। हें मोक्षवर्म कळलें कवि केशवासी॥१४९॥

इति श्री द्वितीय सहस्र प्रथम शतक १५० श्लोक संपूर्ण ॥

पुढें द्वितीय शतकाचे थोडे श्लोक असून हें प्रकरण चटका लावण्यासाठीं अपूर्ण राहिलें आहे.

(१) गुरुशिष्यसंवाद [वरदनागेशकृत] ओवी ५१७ (१) शुकज्ञानबोधटीका [दासानुदासकृत] ओवी ४४९ या ग्रन्थाच्या शेवटीं खालील श्लोक आहेतः—

कावेरितीरीं निजरंग पाहीं । निद्रा करीतो निज शेषशाई ।
तेथूनियां योजन च्यारी ते ही । त्या देव पट्टणा (?) पर सर्वदा हीं ॥ १ ॥

निवासवासी वसतां चि तेथें । या ज्ञानबोधा करिता टिकेतें ।
त्या गौतमु गोत्र ऋग्वेदियातें । अनंतपुत्रें निज राम यातें ॥ २ ॥

बोले ह्मणे तो निज केसिराजा । दीनामुखें तो वदवीत वोजा ।
शके हे सोळा शत येकातिसासी । १६३१ । वदी त्रितीयाश्विनमास ऐसीं ॥ ३ ॥

विरोधिया वछर ज्ञानबोधा । टीका समाप्ती करवीत सीधा ।
दासांसि ज्ञानामृत प्राशऊनि । समुक्त भावें करवी समानीं ॥ ४ ॥

(१) चिदानंदसिंधोदशकस्तोत्रटीका [भगवंतकृत] ओवी ६१०

अंतः—

ऐसा अक्षयत्वें परिपूर्ण । चिदानंदसिंधु जाण ।
भगवंतीं निमग्न । सार्वकाल ॥ ६१० ॥

इति श्रीमत् शंकराचार्यविरचित चिदानंदसिंधोदशक संपूर्ण । शके १६२३ खरनाम संवत्छर आधीक भाद्रपद वदी पंचमी गुरुवार मुक्तांती ग्रामे संपूर्णम् ॥

(१) सच्चिदानंदविलास [भगवंतकृत] ओवी ३३८

आदिः—

जय जया जी लंबोदरा । विश्वात्मया चराचरा ।
अखिलात्मका परात्परा । परेतीता गणराजा ॥ १ ॥

अंतः—

हा ग्रंथ सच्चिदानंदविलास । भगवंतीं फावला सावकाश ।
जाहला निजसुखें विलास । परिपूर्णत्वें ॥ ३३६ ॥

पूर्णा पूर्णपण । सच्चिदानंदविलास आपण ।
या अर्थीं जे मग्न । ते स्वानंदघन पैं होती ॥ ३३७ ॥

इति श्री सच्चिदानंदविलास । ग्रंथ समाप्ती प्रकरणास ।
जाहला असे अखंडतेस । यथान्वयें ॥ ३३८ ॥

श्रीरंगपट्टणीहुनि योजनासी । मुक्ततीती ग्राम हि त्या निवासी ।
वाशिष्ट हा आश्रम पूर्णतेसी । कावेरितीरीं निज वास यासी ॥ १ ॥
रथीत हे गोत्रकुलोद्भवांसी । भगवंत हें नाम असे तयासी ।
सोळा शतें बात्तिस हे शकासी । विकृती तो वछर नाम त्यासी ॥ २ ॥
फाल्गुन हा शुध ते पौर्णिमेसी । सच्चिदानंदविलास यासी ।
गुरुवासरु हा वसता तयासी । समाप्त केलें निजग्रंथ यासी ॥ ३ ॥

**दप्तर १९ वें** ( १ ) हस्तामलक, [ एकनाथकृत ] ( १ ) उपनिषत्सार ग्रन्थ-संख्या ५१७. जुनी प्रत आहे. कोण कृत न कळे. " त्रिंमल्ळ अद्वैई टावं'।" असा एक चरण मध्यंतरीं आला आहे. प्रत " भाद्वाजगोत्रोद्भव उद्धवेन लिखितं " आहे.

आदिः—

न दिसोनियां जगदाकारू । सेखीं नामरुपीं संव्हारु ।
तूं जगद्गुरु । या हेतु ॥ १ ॥

या च ग्रन्थाची आणखी एक प्रत या दप्तरांत आहे. ( १ ) अद्वैतप्रकाश [ म्हाणिमंतोजीकृत ] वोव्या ५८० ( १ ) परमप्रकाश ओवी ८४. ग्रन्थाच्या मुखपृष्ठावर " परमहंस ग्रन्थ " असें नांव दिलें आहे.

आदिः—

देवादिदेव परमहंस ।

अंतः—

मग सद्गुरूनें शिष्य आलिंगिला । शिष्य आनंदें बोलला ।
तें ज्ञान अनुवादला । निवृत्ति अवधूत ॥
श्रीगुरु आनंदचैतन्यप्रसादें । वाचा प्रकाशली स्वानंदें ।
म्हणोनि आत्मसुख आनंदें । परात्पर अनुपम्य जे ॥ ८४ ॥

इति श्री परमप्रकाश

मागल्या दप्तरांत नमूद केलेल्या "तारकब्रह्म" ग्रन्थाचे कर्ते व या ग्रन्थाचे कर्ते एक च दिसतात. ( १ ) तत्त्वबोध ओवी १९२. तीन प्रती. एक जुनी व एक अलिकडची व वाईट अक्षराची.

आदिः—

नमन प्रथम गुरुनाथा । जे नागेशा कृपावंता ।
जेणें मस्तकीं ठेउनी हाता । कृपा केली ॥ १८ ॥

अंतः—

ग्रंथु जाहला समाप्त । वोविया पुष्पें समर्पित ।
तृप्ति जाहली अवधूत । नागेश म्हणे ॥

एका प्रतीच्या शेवटीं " सार्वरी संवत्सर भाद्रपद सुळक पक्ष वदी बीज सोमवार " असा मजकूर आहे.

( १ ) निर्विकल्प [ श्रीसमर्थकृत ]

आदिः—

जळ स्तंभ काष्ठ पाषाण । तेथें घालूनि अंतःकरण ।
प्रमाण देखोनि विवरण । केलें पाहिजे ॥ १ ॥

अंतः—

पाहिलें चि पाहावें । केलें चि करावें ।
शोधिलें चि शोधावें । राजकारण ॥ २२ ॥

( १ ) अद्वैतसार [ श्रीसमर्थकृत ]

आदिः—

जय जया जी गणनाथा । तूं विद्याविभवें समर्था ।
अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ॥

अंतः—

या ब्रह्मविद्येच्या लपणी । वगैरे

( १ ) पंचमुद्रा, [ ज्ञानदेवकृत ] वोवी ६६ पृष्ठें ८, दोन प्रती.

आदिः—

आधीं नमस्कार श्रीगुरु ।

( १ ) स्वानंदलहरी, [ मेरुकृत ] दोन प्रती. मागें दहाव्या दप्तरांत एक प्रत आली च आहे. ( १ ) बहुधा गोसावी [ श्रीसमर्थकृत ] दोन प्रती. ( १ ) विद्यानंद, [ राघवकृत ]

अंतः--

अनाथनाथ श्रीशंकर । वगैरे.

( १ ) विवेकउत्पत्ति [ मृत्युंजयकृत ] ग्रन्थसंख्या ९७. ( १ ) शिवबोध, [ दत्तात्रयअवधूतकृत ] जुनी प्रत. ( १ ) परमप्रकाश किंवा परमहंस ( १ ) अद्वैतमकरंद, ग्रन्थसंख्या ६६० प्रकरणें १३

आदिः—

सद्गुरु प्रज्ञानंद मूर्ति । पादुकासेवनीं निज शांति ।
तत्काळ उपरमे चित्तवृत्ति । नवल शक्तीच्या चरणा ॥ १ ॥

( १ ) हस्तामलक [ एकनाथकृत ] ( १ ) आनंदलहरी, [ एकनाथकृत ]
दप्तर २० वें ( १ ) प्रणवविवरण

अंतः--

ब्रह्मानंद म्हणे जाण । गुरुगम्याची खूण ।
सहजाचे कृपे करोनि । केलें प्रणवाचें विवरण ।
जाणतियानीं गुरुपुत्रीं घ्यावें मेळवून ।
न कळे त्यानी विचारोनि जावें सहजासी शरण ॥

( १ ) मूळस्तंभ, ओवी ५२५, दोन प्रती एक पूर्ण व दुसरी अपूर्ण.

अंतः—

जीवन्मुक्तिसोहळा । पावती वगैरे

( १ ) पवनविजय, [ माळाहरदासकृत ] ओवी २३५, पांच प्रती. पैकीं एका प्रतीच्या मुखपृष्ठावर "पवनविजय योगशास्त्र पुस्तक महाराज तुळजाराजस्य" असा मजकूर आहे, व दुसऱ्या एका प्रतीच्या "तुकोजीमहाराजस्य" असा मजकूर आहे. ( १ ) तत्वपट, [ मेरुकृत ] सात पृष्ठें ( १ ) हस्तामलक, [ एकनाथकृत ] चार प्रती. पैकीं एका प्रतीवर "लिखितं शिवाजी शामराउ मार्गेश्वर शु. १ मंगळवार विभव संवत्सर तंजाउरीं असतां" अशा तऱ्हेचा मजकूर आहे.

( १ ) पंचीकरण, [ श्रीसमर्थकृत ] दोन प्रती आत्मनिवेदनी किया । ( १ ) भक्तिराज ओवी ३०१

अंतः—

गीता ज्ञानदेवादिकां । सौंस्कृताची आई का ।
कृष्णें अर्जुनासी प्रसिद्ध देखा । हें चि निरोपिलें ॥ ३०० ॥
ग्रन्थानाम भक्तराज । मऱ्हाष्ट्र जाहला सहज ।
भक्तिभावें चिंतन तुज । अखंड हृदई असावें ॥ ३०१ ॥

**दप्तर २१ वें** ( १ ) जुनाट पुरुष [ श्रीसमर्थकृत ] तीन प्रती. ( १ ) आत्माराम [ श्रीसमर्थकृत ] पांच प्रती. ( १ ) अंतर्भाव, [ श्रीसमर्थकृत ] सात प्रती. ( १ ) काया जीवाचें लग्न, काळ ऐक्य, तिनीशीं ऐक्यभाव [दासानुदासकृत] ओवी ५५० दोन प्रती. शके १६२२ विक्रम वत्सर वैशाख शु. ८ स १० ] गौतम गोत्र ऋग्वेदी अनंतपुत्र रामया यांनीं कावेरी अंतरंगापासून तीन योजनें कुलुघाणनाम ग्रामीं विराचितम् । ( १ ) अपरोक्षानुभूति, [ वामनकृत ] समश्लोकी ( १ ) अपरोक्षानुभूति अपूर्ण पृष्ठें ४०

आदिः—

ॐ नमो सद्गुरु स्वराज्य पंतीं । शांति सिंहासनीं सूज्ञमूर्ति ।
वंद्य हरिहरां सहजास्थिति । सित्ध संविती स्वानंदा ॥ २ ॥

( १ ) ज्ञानामृत ओवी सुमारें १०००

अंतः—

म्हणौनि सिद्ध असतां ब्रह्म होणें । वगैरे । इति श्रीदत्तात्रयविराचित । वगैरे

( १ ) ज्ञानामृत, [ दासानुदासविरचित ] ओवी ५२६, शक १६२२ विक्रम २० ] नाम संवत्सर ज्येष्ठ वदी द्वादशीसी गातमुगोत्र ऋग्वेदी अनंतपुत्र राम यांनीं कावेरीतीरीं निजपट्टणापासून तीन योजनें कुलघाण ग्रामीं राचितम् ।

( १ ) ज्ञानसार ओवी ३१८

अंतः—

इति श्रीज्ञानसार । केसीराजाचा दास निर्धार ।
केला समाप्त प्रकार । दास म्हणे ॥ ३१८ ॥
श्रीरंगवासी निजपट्टणी हो । समीपता च्यारि हि योजनें हो ।
होसपूर हें ग्राम नदीतिरीं हो । सुवास्तिवासी रचिले कथे हो ॥ १ ॥
त्या गौतमुगोत्र अनंतपुत्रें । सीवराम नामें सुख ग्रन्थ तंत्रें ।
हे बोलवी केशवराज तो कीं । हे ज्ञानसार कथवी तदा कीं ॥ २ ॥

शके हे सोळा शत तेविसांसी । जाले समाप्ती निज श्रावणासी ।
संवछरु हो वीशु जाणता हा । रंकामुखें हा वदवीत पाहा ॥ ३ ॥

( १ ) निजसुख ओवी ८०

अंतः—

इति श्री निजसुख ग्रन्थ । सद्गुरु श्रीरामकृपें भगवंतें ।
निर्जी निजसुख तें । संपूर्णमस्तु ॥

सके १६ विरुतीनाम ज्येष्ठ शु. १ श्रीरंगपटणीं देवरायेपेठेमध्यें दीगांबरपंताचे घरीं.

**दप्तर २२ वें** ( १ ) षड्रिपु [श्रीसमर्थकृत] पांच प्रती ( १ ) पूर्वारंभ, [श्रीसमर्थकृत] पांच प्रती. ( १ ) विवेकसिंधु, आत्मसाक्षात्कार, [ १०
[ मेरुकृत ] तीन प्रती. ( १ ) पूर्णामृतकरषोडशकळा, [ मेरुकृत ] ओवी ३०० पत्रें ४२ ( १ ) ब्रह्मांडाचें विवरण ओवी १७

अंतः—

सहजानंदाचा बाळ । ब्रह्मानंद वेल्हाळ ।
तरी या ब्रह्मांडाचा खेळ । खेळत असे ॥

( १ ) आत्मविद्याविलास ग्रन्थसंख्या १६३ पत्रें ३२

**दप्तर २३ वें** (१) योगवाशिष्ट [ माधवकृत ] दोन्ही निर्वाणप्रकरणांसह, नकल करण्यास ही प्रत सुरेख आहे.

**दप्तर २४ वें** ( १ ) योगवाशिष्ट [ माधवकृत ] दोन्ही निर्वाण प्रकरणांसह मागील दप्तर १६ वें पहा. [ २०

**दप्तर २५ वें** ( १ ) अन्वयव्यतिरेक, स्वात्मसुख व लिखित पासष्टी अशीं तीन प्रकरणें आंत असलेलें एक बाड. ( १ ) योगवाशिष्ट, [ माधवदास नारायणांकितकृत ] अपूर्ण. ( १ ) उपदेशरत्नाकर ओवी ३४२.

अंतः—हे शब्दरत्नाची माला । वगैरे.

( १ ) योगराज, [ अमृतनंदकृत ] अंतः—

गुरुशिष्याचा येकांतु । जो अनुवादला श्रीदत्तु ।
तो अमृतनंद सांगतु । योगराज टिळकु ॥ ३२४ ॥

[ २१

( १ ) बालकांड [ एकनाथकृत ] " आनंदनाम चैत्र शु. १ आदितवार महादेवपटणीं गोविंद पंतोजी मामासाहेबास" वगैरे. ( १ ) चतुष्टयोग, [ श्रीसमर्थकृत ] अपूर्ण. ( १ ) पंचमान, [ श्रीसमर्थकृत ] अपूर्ण. ( १ ) लघुयोगवाशिष्ट, ( नारायणाचा माधवदासकृत ) पानें ३३ टीका २७१

अंतः—

इति श्री योग माधवदास नारायणाचा । जो मुळीचेनि कृष्ण नामें साचा । म्हणे हे सत्य त्रिवाचा । सद्गुरुप्रसादें करूनि ॥ २७१ ॥

( १ ) लघुयोगवाशिष्ट, [ नारायणाचा माधवदासकृत ]

अंतः—

पार्थिव नाम श्रावण वद्य ७ सौम्यवासरीं । रासोजी भिकाजी हवालदार सरकार वहिलीं महाल । यानी तालीक केली । वगैरे.

( १ ) सिद्धसंकेत, [ मृत्युंजयकृत ] दोन प्रती. जुनी, नवी. ( १ ) हरिभजन, [ गोविंदकृत ] श्लोक ५० ( १ ) कामशास्त्राचा एक ग्रन्थ, ग्रन्थसंख्या २००. कोणाची तरी दृष्टि चुकवून या ग्रंथानें वेदांतग्रंथांत आपला प्रवेश करून घेतलेला दिसतो.

**दप्तर २६ वें** ( १ ) रामसोहळा, [ मेरुकृत ] ओवी ९३९०. हा ग्रन्थ फार महत्त्वाचा आहे. या ग्रन्थाचे अकरा रुद्र असून प्रत्येक रुद्राचे अकरा उल्हास आहेत. पहिल्या रुद्रांत श्रीसमर्थचरित्र वर्णिलें आहे. या प्रतीच्या मुखपृष्ठावर श्रीसमर्थ व मेरुस्वामी यांचीं चित्रें काढलेलीं आहेत.

**दप्तर २७ वें** ( १ ) रामसोहळा, [ मेरुकृत ] ही एक आणखी प्रत आहे.

**दप्तर २८ वें** ( १ ) भीमोपदेश, [ मेरुकृत ] दोन प्रती. मागील दप्तर २ रें पहा.

**दप्तर २९ वें** ( १ ) अनुभवामृत

**दप्तर ३० वें** ( १ ) विवेकसिंधु, या दप्तरांत च बऱ्या च प्रती आहेत. पैकीं ४।५ पूर्ण असून, बाकी अपूर्ण आहेत.

**दप्तर ३१ वें** ( १ ) विवेकसिंधु, या दप्तरांत आणखी ३।४ प्रती आहेत.

**दप्तर ३२ वें** ( १ ) अनुभवामृत, दोन प्रती. पैकीं एक " सर्वजित संवत्सरे माघमासे कृष्ण द्वितीया भौमवासरे शुभकर्णे मन्यारगुढिराजगोपालधामे लिखितम् " आहे व दुसरी " शके १६०० कालयुक्त संवत्सरे फाल्गुन शु. २ गुरुवासर

बेंगळूर ग्रामे उधवगोपीनाथेन लिखितम् " आहे. ( १ ) अनुभवामृताची टीका [ शिवकल्याणकृत ] पृष्ठें ६३

अंतः–

पुढें श्रीरघुनंदन । तेही कीजेल निरूपण ।
नित्यानंदकृपा पूर्ण । लाधे जरी ॥
इति श्री अनुभवामृतविवरण । प्रकृतिपुरुषवंदन ।
नाम शिवकल्याण । कृत प्रथम प्रकर्ण॥ वोविया ५९५ ॥ मूळ वोव्या ६४.

**दप्तर ३३ वें ( १ ) दिवटा** [ श्रीसमर्थकृत ]

॥ श्रीरामकर्ता ॥

हुशार भाईनो हुशार । अवघ्यानी असावें खबरदार । [ १०
काळोखें पडताती फार । येकासी येक दिसेना ॥ १ ॥
चोराचे कळप फिरती । अवचिता दगा करिती ।
निजों नका जागवितों राती । मी दिवटा साहिबाचा ॥ २ ॥
हिलालखोर साहेबाचा । नफर आहे इतबाराचा ।
मज राती जागावयाचा । हुदा दिधला जी ॥ ३ ॥
मी सारी राती जागतों । अठरा माहालाची खबर घेतों ।
साही नजरेंत राखितों । मनीं धारितों चहुंचें गुज ॥ ४ ॥
मी सकळिकांचें करितों बरें । परी मज न मानिती अहंकारें ।
घोरों लागती झोंपीच्या घोरें । ते समूळ नागवती जी ॥ ५ ॥
जे मजला मानिती । माझ्या विचारें वर्तती । [ २०
ते हरगिस झोला न पावती । न नाडती जी ॥ ६ ॥
जे जे झोंपेनें पीडले । ते ते अवघे चि नाडले ।
यमयातनेस जुडले । पाहुणेरु घ्यावया ॥ ७॥
तेथें मदभरें जुडले । ते जन्मरणराहटीं जोडिले ।
सुटका नव्हे चि पडिले । बांधोनिया जी ॥ ८ ॥
अरे जागा स्वरूपीं जागा । मुक्तीचा सोहळा भोगा ।
कर्माकर्म आंगा । लागों चि ने दावें ॥ ९ ॥
अरे हुशार हुशार हुशार । झोंपेनें नाडले थोर थोर !
म्यां जे जे केले खबरदार । ते ते कडेस पडिले जी ॥ १० ॥

महादेव निजेनें भ्रमला । विख घेऊनि तळमळूं लागला ।
मग म्यां खबरदार केला । तो वाचला दो अक्षरीं ॥ ११ ॥
स्वामी कार्तिक निजेनें भ्रमला । बळें चि परस्त्रिया भोगूं लागला ।
मात्रागमन घडावें त्याला । तो म्यां केला खबरदार ॥ १२ ॥
महाविष्णु निजेनें भ्रमला । परस्त्री मोहून जोगी जाला ।
तो म्या खबरदार केला । मोह दवडिला शक्तीचा ॥ १३ ॥
ब्रह्मा निजेनें भ्रमला । चोरानी समूळ नागविला ।
सकळ धर्म बुडाला । दुकाळु पडिला मोठा जी ॥ १४ ॥
तो म्या खबरदार केला । मग बापातें स्मरला ।
तेणें येऊनि चोर मारिला । लंकेचें वित्त दिधलें जी ॥ १५ ॥
नारद अभिमानें निजेला । बायको होऊनि साठी लेक व्याला ।
तो म्या खबरदार केला । तो पावला पहिला वेश ॥ १६ ॥
चंद्रें मानिलें नाहीं मजला । अभिमानें चि निजेला ।
तो क्षयरोगी जाला । नाडला आपले करणीनें ॥ १७ ॥
इंद्रें मानिलें नाहीं मजला । हजार भोकें पडलीं त्याला ।
शुक्रें डोळा फोडूनि घेतला । न मानी मजला म्हणउनियां ॥ १८ ॥
दक्ष निजेनें भ्रमला । मानिलें नाहीं मजला ।
पूर्वं शिरासी मुकला । जाला पैं तो बोकडमुखी ॥ १९ ॥
गुरूनें मानिलें नाहीं मजला । बाईल गमाऊनि बैसला ।
यम निद्रेनें व्यापला । जाला केवळ दासीपुत्र ॥ २० ॥
रावण निजेनें भ्रमला । कुळक्षयो करूनि शोकीं पडला ।
मग म्या खबरदार केला । तो जाला रामरूप ॥ २१ ॥
ऐसे ऐकोनि दृष्टांत । सावध होऊनि कराल स्वहित ।
तरी आपुले फळ भोगाल समस्त । मी हुशार करितों जी ॥ २२ ॥
मी सांगोन उतराई । कोणास कांहीं मागत नाहीं ।
परोपकारास्तव पाहीं । मी सांगतों जी ॥ २३ ॥
ऐसे दिवटा बोलोनी । घाडि घाडि हांक देऊनी ।
दास म्हणे दिवट्यास मानी । तो चि तरेल मोहराती ॥ २४ ॥
ऐसा हा दिवटा । समर्थाचा जाणावा सुभटा ।
जे अनुभविती संसारचोहटा । न येता समर्था ॥ २५ ॥
केवढें आपलें भाग्य ! श्रीसमर्थ आपणांस जागे करिताहेत !

( १ ) सगुणध्यान, [ श्रीसमर्थकृत ] दोन प्रती. ( १ ) मुद्राविलास, [ एकनाथकृत ] ( १ ) अष्टावक्रीसूक्तटीका सिद्धांत चिदंबरी, [ वैयनाथकृत ] ग्रन्थसंख्या ३८५०

ऐसा सच्चिदानंद चिदंबर । निर्गुण निरामय निर्विकार ।
जो कृपेचा जळधर । तो ब्रह्मगिरीवरी वोळला ॥ ६२ ॥
महावाक्याची घटना । अर्थाभ्र दाटले गगन ।
गर्जयुक्ती गडगर्जना । लवती विजा प्रमाणी ॥ ६३ ॥
स्वानुभवाचिया धारा । वर्षती ब्रह्मगिरीवरी सैरा ।
तें जीवन जनसाक्षात्कारा । आलें गंगाद्वारा शब्दरूपें ॥ ६४ ॥
मग ते बोधगंगोदक । पावन करावया हे लोक ।
ब्रह्मगिरीपासूनि सम्यक् । येते जालें ॥ ६५ ॥
पुढें जगाचिया हाता । आलें वैयनाथु कुशावर्ता ।
तेथूनि श्रोतयाची कर्णपंथा । आष्टवक्रें चालिलीं ॥ ६६ ॥
ऐसें हें उपदेशत्रिक । तुज निरोपिलें सम्यक् ।
आतां पुढील प्रकरण आईक । वैयनाथ म्हणे ॥ ६७ ॥
श्रीमत् सिद्धांत चिदंबरी । टीका महाराष्ट्रभाषा साजिरी ।
अष्टावक्री असे विश्वेश्वरी । तिचा विशदार्थ हा ॥ ६८ ॥

( १ ) आत्मबोध, [ जगन्नाथकृत ] मार्गाल दुसर १६ व १८ पद्य. ग्रन्थ-संख्या १०५

आदिः—

वंदूनियां आचार्यशंकरचरण । विविधा पूर्वील टीका अवलोकोन ।
आत्मबोधाचें संक्षेपें विवरण । करिजे यथामती ॥ १ ॥

( १ ) रामनामतरंग, [ माधवनंदनकृत ] पंचदश तरंग. ( १ ) वारतिथिमास-नामादि वर्णन, [ रत्नाकरकृत ] ओवी ९७ ( १ ) करुणामृतरस, [ देवदासकृत ]

अंतः—

क्षये संवत्सर आषाढ मासीं । सोमवार त्रितियेचे दिवसीं ।
पूर्णता आली ग्रन्थासी । श्रोतीं सावकाशीं परिसिजे ॥ १४४ ॥

स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १६०८

॥ श्री वेंकटेश दयालु ॥ ग्रन्थ करुणामृतरस ॥

॥ पानें संख्या ॥ ११ ॥ वोव्यासंख्या ॥ १४४ ॥ श्रीरघुनाथ ॥

इतका सर्व मजकूर या पोथीच्या शेवटीं आहे. या कवीविषयीं अनुमानानें जे सिद्धान्त काढण्यांत आलेले आहेत, त्यांना ह्या मजकुरांत प्रत्यक्ष आधार सांपडत आहे. ( १ ) नमन ओवी १०८ मागील दप्तर ११ वें पहा.

आदिः—

नमो काळ कौतुहला । नमो चक्रचाळ गोपाळा ।
नमो विश्वप्रतिपाळा । प्रभंजना ॥ १ ॥

अंतः—

ऐसें ज्ञान उद्बोध बोले । ज्ञानाज्ञान निरविलें ।
विज्ञान हि हरविलें । दृश्यद्रष्टेनसीं ॥ १०७ ॥
१० ] बाप रखुमा देवी वरु । समाधि देऊनिया स्थिरु ।
वरी ठेऊनि अभय करु । वर देऊनि राहिला ॥ १०८ ॥

( १ ) श्रीकृष्णदर्शनविलास, [ गुरुदासकृत ] वोवी १०२, अभंग ११.

आदिः—

मंगळाचरणीय तव चरण । वंदितां होय मंगळाचरण ।
आदिमध्यांत निरूपण । तूं चि नारायण निरंतर ॥ १ ॥

अंतः—

जालें तरी निरूपणानुसंधान । न सरे चि साधकाचें ध्येय ध्यान ।
हा दर्शनविलास अभिधान । गुरुदास निधान ग्रन्थ सेवी ॥ ३५ ॥

( १ ) मानसपूजा, [ श्रीसमर्थकृत ] दोन प्रती.

२० ] **दप्तर २४ वें** (१) ज्ञानामृत ग्रन्थसंख्या ६३१; पानें ७७; दिसण्यांत प्रत जुनी, एकनाथकालीन. मागील दप्तर २१ वें पहा. ग्रन्थाचीं एकंदर पांच प्रकरणें आहेत.

आदिः—

ॐ नमो श्रीगुरुवर्या । सस्वरूपस्वामिया ।
शिष्यत्वभावें करूनियां । अभेद बुद्धि नमितसें ॥ १ ॥

अंत पहिल्या प्रकरणाचाः—

आतां दत्तात्रयाचेनि दातारें । येति अच्युत माहावीरें ।
फेडिलें संसारभांडारें । क्षणमात्रें ॥ ६४ ॥ वगैरे.

२१ ]

अंतः—

म्हणौनि सिद्ध असतां ब्रह्म होणें । परी अच्युतेवींण न ये खूणे ।
आपण आपणातें वोळखणें । स्वरूपामाजीं ॥ १५० ॥

इति श्रीदत्तात्रयविरचिते । वगैरे.

( १ ) संतसिद्ध, ओवी सुमारें ३००, पृष्ठें २०. प्रत जुनी पण अशुद्ध.

आदिः--

आधीं नमस्कार श्रीगुरु । करून आरंभिला विचारु ।
होईल कैसा साक्षात्कारु । जगदीशाचा ॥ १ ॥

अंतः--

तवं सीता म्हणे प्राणनाथा । वगैरे.

( १ ) अनुभवसार, [ केशीराजदास किंवा दासानुदासरुत ] ग्रन्थसंख्या १५६०.

आदिः--

गणाधिपति जो कां श्रेष्ठ । सकला आदि जो पष्ट ।
जो बुद्धिदाता निष्ट । कविकर्त्यांसी ॥ १ ॥

अंतः—

केशिराजाचा दास । ह्मणे मी दीन निशेष ।
वंदुनिया पदास । स्थिर राहे ॥ १३७६ ॥
ऐसें हें अनुभवसार । ग्रन्थ संपला निर्धार ।
प्रीति पावो साचार । केशिराज ॥ १३७७ ॥
इति श्री अनुभवसार । ग्रन्थसमाप्ती प्रकार ।
जाहाला हा साचार । दास ह्मणे ॥ १३७८ ॥
कावेरीतटकीं निवास वसतां श्रीरंग नामें बरा ।
श्रीरंगें आभिधान पटण वरें तत्संनिधीं सत्वरा ।
जे कीं योजन तीं वरी वसत ते नामें कुळघाणसें ।
ते ग्रामीं रचिलें कथे वदविलें श्रीकेशवें ग्रन्थसें ॥ १ ॥

(१) अनुभवसार [ मेरुकृत ] ग्रन्थसंख्या ११२ मागील ११ वें दप्तर पहा तेथें ग्रन्थसंख्या ९६ दिली आहे. (१) अनुभवसार [ मृत्यंज्ययकृत ] ओवी ४२; (१) कथासारामृत [ कृष्णदास पंडितकृत ] पत्रें १० अपूर्ण.

आदिः—

ऐसा जो जागे तो चि धन्य । तेणें संसार जिंकिला जाण ।
त्यासी सांपडे निधान । आनंदघन परमात्मा ॥ १ ॥

अंतः—

हे कथासारामृत । साधकासी होय परमहित ।
कृष्णाचा दास पंडित । असे विनवीत श्रोतया ॥ १२० ॥

( १ ) महाज्ञान, [ बलीराम कायस्थ श्रीबासावघराकृत ] ओवी १०१ ग्रन्थ हिंदुस्थानी भाषेंत आहे. ( १ ) अच्युताश्रमबोधिया किंवा ब्रह्मकथा ग्रन्थ १४६, दोन प्रती.

१० ] आदिः—

श्रीराम सद्गुरु । नमस्कारु माझा । आत्मारामु राजा । वर्णावया ॥ १ ॥
वर्णावया शक्ति । श्रीराम देईल । सिद्धि पाववील । ब्रह्मकथा ॥ २ ॥

अंतः—

नाहीं नाहीं भये । अच्युता आश्रमा ।
सर्वत्र आहे मां । श्रीरामु चि ॥ १४३ ॥

( १ ) प्रवृत्तिनिवृत्तिग्रन्थ अथवा मनचारित्र सहा प्रति. मागील दप्तर १० वें पहा. ( १ ) अद्वैतप्रकाश, [ मृत्युंजयकृत ] ( १ ) लिखित पासष्टी ( १ ) ज्ञानदेवकृत पत्र ( १ ) मानसोल्लास ४ पत्रें, अपूर्ण ( १ ) महावाक्यविवरण श्रीशंकराचार्यकृत ग्रन्थाचा पदपदार्थ. ८ पानें. कोण कृत न कळे. ( १ ) वेद-
२० ] वेदांतसार तत्वमसिविवरण गद्यात्मक ९ पत्रें ( १ ) महावाक्यविवेक [ राघवकृत ] ओवी २२ मागील १० व्या दप्तरांतील चित्रदीप व १७ व्या दप्तरांतील पंचदशीपैकीं कांहीं प्रकरणांचे कर्ते जे राघव ते हे च. ( १ ) पृच्छाविवरण ओवी ११ ह्या अकरा ओव्या योगावर आहेत. ( १ ) श्रीनाथ द्वादशमहावाक्य-विवरण, [ गुरुदासकृत ] ओवी २६०

अंतः—

ऊर्ध्व मठ परंपरेमाझारी । पूर्णानंदाचेनि अभयंकरी ।
महावाक्याची टीका मऱ्हाटी करी । श्रीगुरुदास ॥ २५४ ॥
चतुर्वाचे परापर । दाऊनि मजकरवीं करी उच्चार ।
पूर्णानंदाचा पाझर । ग्रंथावसानें ॥ २५९ ॥

२८ ]

असो युक्तीचा प्रकाश । संतांचा मी पूर्ण दास ।
विनवी श्रीगुरुदास । श्रोते जनासी ॥ २६० ॥
इति श्री शंकराचार्यविरचित महावाक्याविवरण संपूर्ण ।
पुस्तक लिहिलें शामगोपाळें । माघमासीं समाप्त जालें ।
शुद्ध पक्ष अष्टमी वहिलें । ग्रन्थ समाप्त जाहाला ॥ ६१ ॥

**दप्तर ३५ वें** सुमारें दहा वर्षें झालीं हें दप्तर महाळ झालें (!!) असें महालांतील नोकर कळवितो.

**दप्तर ३६ वें** ( १ ) श्रीसमर्थांवर अष्टक, [ मेरुकृत ]

परंधाम चिद्रूप व्यक्तीसि आलें । इत्यादि

हें सहा श्लोकांचें अष्टक प्रसिद्ध आहे. ( १ ) श्रीसमर्थांवर अष्टक, [ शंकरकृत ] ८ श्लोक फार अशुद्ध लिहिलेले आहेत. पैकीं पहिला श्लोक असाः—
विख्यात जो कलयुगीं निज निर्विकारी । जाला सगूण रुप मानववेशधारी ।
नामांबृतें करित गर्जन पुण्यखाणी । श्रीरामदास महाराज वदा स्ववाणीं ॥ १ ॥

( १ ) विश्वरूपनमन [ रत्नाकरविरचित ], ओवी ७०.

आदिः—

सहजीं नमन उद्भवलें । आणि सहजीं च स्थिरावलें ।
सामावोनि सामावलें । सहजीं सहज ॥ ८ ॥
आतां सहजीं सहज नमन । सहजीं सहजालागोन ।
सहजीं सहज सामावोन । सहज असे ॥ ९ ॥
आतां सहज जैसें पूर्ण । तैसें सहज चि नमन ।
सहजीं सहज सामावोन । सहज बोलें ॥
ॐ नमो सहजीं सहजा । नित्यानंदा पूर्णबीजा । वगैरे.

अंतः—

नमनें नमन नमितां । न मनें चि जाली मौन्यता ।
आतां अनुभव कोण चित्ता । अनुभविजे ॥ ६६ ॥
अनुभवितेपण । हारपलें जाण । मनाचें अमन । जालें असे ॥ ६७ ॥
सहजाचें नमन । केलें सहजालागोन ।
प्रीति पावो जनार्दन । सहजीं सहज ॥ ६८ ॥
शब्दरत्नाची माळा । सहज गुंफिली अवलीळा ।
सहज चि घातली गळां । सद्गुरूच्या ॥ ६९ ॥

आतां मौन्यें चि नमन कीजे । सहजीं सहज मौनी असिजे ।
रत्नाकरा सहजीं सहज । नमन घडे ॥ ७० ॥

इति श्रीविश्वरूपनमन रत्नाकरविरचित संपूर्ण ॥

( १ ) भीमरूपी स्तोत्र, [ श्रीसमर्थकृत ] सहा प्रती. भीमरूपी महारुद्रा ।

( १ ) भीष्मस्तवराज, [ माधवकृत ]

आदि:—

धर्मराज्य जाहलें सकळ । अन्याय नाहीं प्रमाण तीळ ।
येके दिवशीं कौंतेय पुण्यसीळ । बोलिला मंजुळ कृष्णजीसी ॥ १ ॥

अंत:—

नैमिषवासी मुनि जन । सूत त्यांसी करी निरूपण ।
कोठें असिल्यां अधिक न्यून । क्षमा करा पूर्ण माधव म्हणे ॥९१॥

( १ ) दक्षिणामूर्तिस्तोत्रटीका, [ माधवतनयकृत ] ग्रन्थसंख्या १६२.

अंत:—

अविद्यानिवृत्ती च मोक्ष । हा वार्तिककारांचा पक्ष ।
यास्तव मुक्त्यर्थ दक्ष । देवाध्यक्ष प्रणमिला ॥ ३६० ॥
प्रतापसिंहेंद्र प्रेरणान्वयें । तातदेशिकेंद्रदयोदयें ।
यथामति रचिली टीका स्वयें । माधव य विनवीतसे ॥ ३६१ ॥

तंजावरच्या गादीवर प्रतापसिंहमहाराज शक १६६३ पासून १६८६ पर्यंत होते. त्यांच्या प्रेरणेनें व वडील आणि सद्गुरु योगवाशिष्ठकार जे माधव त्यांच्या दयेनें माधवतनयांनीं ही टीका केली. तंजावरच्या राजघराण्याचा विद्येला फार मोठा आश्रय असे, असें अनेक प्रमाणांवरून उघड होत आहे. ( १ ) अन्नपूर्णा-स्तोत्र, श्लोकबद्ध, आचार्यकृत स्तोत्राचें भाषांतर. [ कोण कृत न कळे ] ( १ ) सोमसुंदरस्तोत्र, [ कोण कृत न कळे ] ओवी १५. ( १ ) श्रीलक्ष्मीनृसिंह-कल्पलता, [ रामकृत ]

अंत:—

नेमारहित ज्यालागि घडे श्रवणपाठ ही ।
कवि राम म्हणे आहे क्रमें श्रेय तयास ही ॥ २७२ ॥

( १ ) तीर्थावळी, [ बहुधा विष्णुदासनामाकृत ] पानें ४६ अपूर्ण. ( १ ) विज्ञापनाशतक, [ नारोजी पंडित कृत ] ग्रन्थसंख्या ७२, पत्रें १०. ( १ ) नाम-

रत्नमाळा, [पाठकनामाकृत] ग्रन्थ १११, पत्रें १०. "गिरिधर नरसिंह हरकारा वेळांगुडि कोळडात्तिर उत्तर कावेरी" यांनीं ही पोथी लिहिलेली आहे. (१) श्रीभक्तमालिका, [बाळकृत] श्रीसमर्थांचे शिष्य भीमस्वामी यांचा मठ तंजावरास आहे. शोळीरामबावा, गोविंदबाळ व अण्णाजी बावा असे भीमस्वामींचे तीन शिष्य होते व या तिघांचे हि मठ तंजावरास आहेत. गोविंदबाळ म्हणजे बाळाजीपंतांचे चिरंजीव गोविंद. भीमस्वामींचें कुटुंब व बाळाजीपंतांचें कुटुंब या सख्ख्या बहिणी होत्या. त्या बाळाजीपंतांनीं ही भक्तमालिका रचलली दिसते. ही प्रत गोविंदबाळांच्या कोणी शिष्यानें लिहिलेली असावी असें पहिल्या श्लोकावरून वाटतें.

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीरामदासरचिताद्वयदासबोध- । सारज्ञभीमपदकंजरतं वरेण्यं ।
संसारसिंधुगतदेहभृतां शरण्यं । गोविंदबालगुरुवर्यमहं नमामि ॥ १ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

नृसिंहभक्त प्रल्हाद । गर्भीं असतां जाला बोध ।
भगवद्भजनीं अगाध । विख्यात जाला ॥ १ ॥
त्याचा गुरु नारद प्रसिद्ध । ज्याला कीर्तनीं परमानंद ।
जयाचे शिष्य अगाध । भूमंडळीं ॥ २ ॥
वाल्मिकादि ध्रुव जाण । ज्याच्या बोधें पूर्ण समाधान ।
जेणें रामकथा अति गहन । प्रगट केली ॥ ३ ॥
ऋषी पराशर बहु थोर । त्यापासूनि वेदव्यासाचा अवतार ।
ज्यानी भारत सविस्तर । करोनि जगदोद्धार पैं केला ॥ ४ ॥
पुंडलीक परम भक्त । पितृसेवेसी जाला रत ।
महिमा पहावया कृष्णनाथ । धांवोनि आला ॥ ५ ॥
तयास दिधली भेटी । आपण राहिला त्या निकटी ।
वर देऊनि कृपादृष्टी । भक्त कोटी रक्षितसे ॥ ६ ॥
अंबरीष राजा बहु थोर । द्वादशीव्रताचे ठाईं तत्पर ।
तेथें येवोनि दुर्वास रुषेश्वर । तयाप्रती शापिता जाला ॥ ७ ॥
तुला होतील दहा जन्म । ऐसें बोलोन निघे ब्राह्मणोत्तम ।
येरु स्मरोनि राम राम । उदक कृष्णार्पण सोडिलें ॥ ८ ॥
उदक सोडितांचि जाण । देव्हारा होतें सुदर्शन ।
तें निघालें दारुण । जाज्वल्यमान अति वेगें ॥ ९ ॥

सत्य कैलास वैकुंठीं । परी तें न सोडी पाठी ।
ऋषी हिंडतां जाला हिंपुटी । नीलकंठी स्मरतसे ॥ १० ॥
मग तो आला शिवापासी । तेणें गुह्य सांगितलें तयासी ।
वेगीं जाय अंबरुषीपासी । तो सुदर्शनासी निवारील ॥ ११ ॥
ऐकूनि शिवाची मात । दुर्वास जाला हर्षयुक्त ।
परतोनि आला त्वरित । अंबरुषीपासी ॥ १२ ॥
राजा करिताहे स्मरण । हरे कृष्ण विष्णु मधुसूदन ।
प्रसन्न होऊनि रामायण । जन्म आपणें अंगिकारिलें ॥ १३ ॥
चक्रभयापासूनि सोडविलें । दुर्वासें स्वस्थळा गमन केलें ।
अंबरीष राजा हर्षमेळें । स्वानंदयुक्त जाला ॥ १४ ॥
व्यासपुत्र शुक योगींद्र जाण । भगवत्कथनीं परम निपुण ।
भागवत संपूर्ण केलें श्रवण । परिक्षितीसी ॥ १५ ॥
शौनक ऋषी परम पवित्र । भीष्म क्षेत्रीं भगवद्भक्त ।
कृष्णाहातीं निज शस्त्र । जेणें धराविलें ॥ १६ ॥
अर्जुनासी रक्षावया कारणें । भीष्माचें सत्य केलें वचन ।
ऐसा कृपाळु जगजीवन । रक्षिला पण भक्ताचा ॥ १७ ॥
बकदाल्भ्य महा मुनी । पुलस्ती संवाद परम गुणी ।
त्याच्या स्मरणें त्रिविध ताप जाऊनि । प्राणी सुखी होती ॥ १८॥
रुक्मांगद राजा प्रसिद्ध जनीं । सूर्यवंशी विख्यात त्रिभुवनीं ।
येकादशीव्रतें करोनी । नगरी नेली वैकुंठा ॥ १९ ॥
अर्जुन परम सख्य भक्त । त्यालागीं कृष्णें केलें सारथ्य ।
राज्य दिधलें समस्त । हस्तनापुरीचें ॥ २० ॥
वशिष्ठ ऋषि श्रीगुरु । ज्याचे सेवे दाशरथीसम तत्परु ।
योगवाशिष्ठबोध विस्तारु । करूनि धर्मस्थापना पैं केली॥ २१ ॥
बोध अंतरीं असावा । बाहेरी जड भाव दावावा ।
अंतरीं त्याग असावा । संग मिरवावा बाहेरी ॥ २२ ॥
काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध नसावा अंतःकरणीं ।
मोह धरावा संतचरणीं । दया सर्व जनीं असावी ॥ २३ ॥

अंतरीं येणें परी राघवा । दृढ विश्वास धरावा ।
लोक आपुला परावा । रक्षित जावा राजधर्म ॥ २४ ॥
बळी चक्रवर्ती प्रल्हादाचा नातु । तयासी छळावया आला भगवंतु ।
त्रिपाद मिदानाची मातु । सांगता जाला बळीसी ॥ २५ ॥
तयासी देऊनियां दान । तोषविले पितृगण ।
शेखीं केलें आत्मनिवेदन । सर्वस्व बळीराजें ॥ २६ ॥
ऐसा भक्तांचा आंखिला । आपण द्वारपाळ जाला ।
भक्तासी वर दिधला । रक्षिला भक्तराज ॥ २७ ॥
बिभीषण परम भक्त । राघवाचा शरणागत ।
लंकेचें राज्य देऊनि समस्त । रक्षिलें तयासी ॥ २८ ॥ [ १०
श्रीरामदास हनुमंत । भीमरूपी अति विख्यात ।
ज्याच्या स्मरणें समस्त । मनोरथ पूर्ण होती ॥ २९ ॥
ऐसें महिमान भक्तांचें । बाळानें वर्णिलें साचें ।
न्यून ते पूर्ण वचनाचें । क्षमा केली पाहिजे ॥ ३० ॥

॥ इति श्री भक्तरत्नमाळिका ॥

(१) भक्तमालिका [ उद्धवचिद्घनकृत ] ओवी ६७

अंतः—

यालागीं मतिहीन दीन । आठवलें तें केलें स्मरण ।
वाचे वदविता श्रीचिद्घन । जाहला निमग्न उद्धव ॥ ६७ ॥

(१) श्रीवेंकटेशसहस्रनामस्तोत्र [ २०

अंतः—

प्रभवनाम संवछर । वैशाख मास भृगुवासर ।
शुक्ल पक्ष दशमी निर्धार । ग्रन्थ संपूर्ण पैं जाला ॥ १०० ॥

(१) श्रीकृष्णपंचरत्न, [ माधवनंदनकृत ] श्लोक ५ (१) श्रीरामपंचरत्न [ माधवसुतकृत ] श्लोक ५

अंतः—

बोले जनीं वर कवी सुत माधवाचा । मीतूपणादि अरिमित्र हि राम साचा ।
केलें असें गुरु दयार्णव रामदासें । दृष्टी सबाह्य भरलें रघुराजपीसें ॥ ५ ॥

५

( १ ) श्रीरामपंचरत्न [ मेरुकृत ]

॥ श्रीराम कर्ता ॥

कृपासागरा आजि कां आटलासी । भवा वोपिसी काय निष्ठूर होसी ।
जनीं कीर्तिचा घोष ऐकोनि आलों । म्हणोनी तुला राघवा शर्ण आलों ॥ १ ॥
उदासीन ते चातकें अंतराळी । तया अंतरीं आस नाहीं खळाळी ।
तया अंतरीं ध्यास लावोनि ठेलों । म्हणोनी तुला राघवा शर्ण आलों ॥ २ ॥
वळेना कृपेचा नभीं मेघ जेव्हां । पहा पक्षिया मांडला अंत तेव्हां ।
दुजा तारकू पाहतां हीन जालों । म्हणोनि तुला राघवा शर्ण आलों ॥ ३ ॥
मुखीं येक शद्वीं क्रियेसी चळेना । मनें शोधिलें धांविलें आवरेना ।
मिठी बैसतां काय सांगों निवालो । म्हणोनि तुला राघवा शर्ण आलों ४
पहा मांडलें आजि निर्वाण आम्हां । अरे कोंवसा धांव रे धांव रामा ।
म्हणे मेरु मी जन्मलों व्यर्थ जालों । म्हणोनी तुला राघवा शर्ण आलों ॥ ५ ॥

( १ ) हेमकल्प पत्रें २० वैयकांचा ग्रन्थ

( १ ) गजेंद्रमोक्ष [ देवदासकृत ]

॥ श्रीरामसमर्थ ॥

गणेश ईश सर्वदा । नमीतसे तया पदा ।
धणी विलासतो सदां । तया गजानना वदा ॥ १ ॥
शारदे विलासनी । सदा वसे कविमनीं ।
करूनि तोष गायनीं । आनंदवी जनीं वनीं ॥ २ ॥
प्रबंध बांधितों बरा । तुम्ही मला दया करा ।
म्हणोनि प्रार्थितों पुरा । गदाधरा सदां स्मरा ॥ ३ ॥
गजेंद्रमोक्ष हे कथा । श्रवणें मोक्ष सर्वथा ।
दोष सर्व तत्त्वता । नसे चि वेळ नासतां ॥ ४ ॥
हिमंत पर्वतावरी । गजेंद्र तो क्रिडा करी ।
समस्त सुहृदें करीं । क्रिडा करी परोपरीं ॥ ५ ॥
मदानें मस्त झुलती । क्रिडा करूनि बोलती ।
करार शब्द बोलती । विचित्र मांडली गती ॥ ६ ॥
गजेंद्र त्या वनांतरीं । तृषार्त फार अंतरीं ।
सरोवरासि देखिलें । मनें बहु आनंदलें ॥ ७ ॥

गजेंद्र त्या सरोवरीं । विहार निर्भयें करी ।
जळासि टाकितो शिरीं । पुढें चि चालिला त्वरीं ॥ ८ ॥
बलाढ्य नक्र त्या जळीं । सवें चि पातला बळी ।
गजापदीं धरी मिठी । जळांत पुछ आपटी ॥ ९ ॥
गजेंद्र पांपरे हाणे । अतां कसें करूं म्हणे ।
नकर वोढितो बळें । शरीर त्राण या बळें ॥ १० ॥
जळांत त्राण वेचिलें । परंतु येक सूचलें ।
नमीन त्या गदाधरा । निदानीचा च सोयरा ॥ ११ ॥
नसे च बंधु सोयरा । हरीविना न दुसरा ।
म्हणोनि नेत्र लाविले । मनांत त्यासी भाविलें ॥ १२ ॥
दया करा प्रभाकरा । परात्परा तुं श्रीवरा ।
निदान मांडिलें खरें । म्हणोनियां तुला स्मरे ॥ १३ ॥
अनाथ दास पाळिसी । समस्त दुःख जाळिसी ।
नमावयासि कोण मी । बहुत कष्टि जाण मी ॥ १४ ॥
म्हणोनि हांक मारिली । त्वरीत सांग पावली ।
निद्रिस्त शाम सावळा । उठोनि शीघ्र बैसला ॥ १५ ॥
गजेंद्र फार गांजिला । तडाग तेथ चालिला ।
गजेंद्र पाहे तंवरी । समोर देखिला हरी ॥ १६ ॥
मनाहुनी जया गती । गरुड धांवतां क्षिती ।
विशेष धांवतां पडे । हरी तया न सांपडे ॥ १७ ॥
श्रीहरि शीघ्र पावला । गजेंद्र नेत्रीं देखिला ।
हरिपदीं च राहिला । स्वरूप तें चि पावला ॥ १८ ॥
कमळपत्र वोढिलें । अरक्त पुष्प तोडिलें ।
शुंड करुनि उचलिलें । मुरारिला समर्पिलें ॥ १९ ॥
विमानिं घालुनि गजा । त्वरित लाविल्या ध्वजा ।
तेव्हां तो नक्र हांसला । विपरीत भाव भासला ॥ २० ॥
नाम घेतल्या बरें । स्तुती वदा चि गजरें ।
प्रत्यक्ष तूज देखिलें । म्या पापबळें जिंतिलें ॥ २१ ॥

गजेंद्र नक्र भेटले । संमंध वैर तुटले ।
हरिपदीं च राहिले । स्वरूप तें चि पावलें ॥ २२ ॥
असा कृपाळु श्रीहरि । समस्त भक्त उद्धरी ।
निरंतरीं तया भजा । उपाय न करा दुजा ॥ २३ ॥
देवदास विनवी । असेल जो अनुभवी ।
म्हणोनि प्राथितों पुरा । सदा श्रीराम तो स्मरा ॥ २४ ॥

व्यंकटेशस्तोत्र आणि करुणामृतरसस्तोत्र यांचे कर्ते जे चैतन्य.कित देवदास ते हे नसून हे समर्थशिष्य दादेगांव मठपती देवदास होत. ( १ ) गजेंद्रमोक्ष [ एकनाथकृत ] ओवी ५३ ( १ ) गजेंद्रमोक्ष [ वामनकृत ] ओवी १० ( १ ) १० ] अजपागायत्री पत्रें ८ (१) रामस्तोत्र [कोण कृत न कळे] पत्रें ११ पैकीं ३ गहाळ ( १ ) दशावतार श्लोक १० ( १ ) स्फुट [ कोण कृत न कळे] ओवी १४ व श्लोक ७ ( १ ) स्फुट श्लोक ५ ( १ ) वेंकटेशस्तोत्र "प्रभव नाम संवत्सर वैशाख शु. ५ भृगुवासर" ( १ ) नारायणहृदय ओवी २२५. दोन प्रती. एक पूर्ण व दुसरी अपूर्ण ( १ ) गुरुशतक [ नारोजी पंडितकृत ] श्लोक ३२ ( १ ) महाभारते, हरिवंशे बाणासुरयुद्धे सप्तनवतिशततमोध्यायः [ माधवनंदनकृत ] ओवी ४१ ( १ ) महाभारते, हरिवंशे बाणासुरयुद्धे षण्णवतिशततमोध्यायः [ माधवनंदनकृत ] ओवी ४१ ( १ ) प्रातःस्मरामि नामावळी [ त्रिंबक चौंडेकृत ] ओवी ७५

अंतः—

२० ] त्रिंबक चौंडाजी विनवीत । परिसावी माझी मात ।
सकळ जनासी प्राथित । प्रातःस्मरामि स्मरिजे ॥ ७३ ॥

( १ ) स्वानुभव

अंतः—

इति श्री उत्तरपत्रिका । चांगा विनवी ज्ञानदेवा येका ।
ऐकोनि येथील खूण असेखा । स्वानुभवें चि जागती ॥ २६ ॥

( १ ) अष्टावक्रटीका सिद्धांत चिदंबरी ग्रन्थसंख्या ३८५० पानें २४६ प्रत जुनी. प्रकरण २१ चीं २६ पत्रें संपल्यावर पुढें तीन पत्रें आहेत त्यावर शेवटीं खालील मजकूर आहे:—

उपनामें तक्रओदनी । महाप्रख्यात आत्मज्ञानी ।
ब्रह्मगिरी नामाभिधानी । तेणें ग्रन्था द्योतिलें ॥ ३५ ॥
जैसें चंद्राचेनि उदयें । समुद्र उचंबळों लागे स्वयें ।
तैसें त्र्यंबक नामधेयें । प्रेरिलें ग्रन्था ॥ ३६ ॥
ये ग्रन्थीचा परमार्थु । तो चि असे तुमचा स्वार्थु ।
करसंपुटें वैद्यनाथु । विनवी श्रोतां ॥ ३७ ॥

शके १५७३ खरनामसंवत्सरे । फाल्गुण वदि द्वादशी
गुरुवासरीं चंजीनगरे लिखितं संपूर्णम् ॥

( १ ) चिदंबरजयंतीस्तोत्र, [ वैद्यनाथकृत ]

अंतः—

हें चिदंबरजन्मकीर्तन । करितां वैखरी होय पावन ।
चित्तीं समरसे आनंदघन । वैद्यनाथ म्हणे ॥ ५६ ॥

( १ ) आदि [ नामदेवकृत ] पानें १३

**दप्तर ३७ वें** ( १ ) विवेकसिंधु, बरीच जुनी प्रत, पण तीवर शक वगैरे नाहीं. ( १ ) सिद्धसंकेत [ मृत्युंजयकृत ] ओवी सुमारें १८००. दोन प्रती. एक पूर्ण व दुसरी अपूर्ण ( १ ) अर्जुननीति ओवी १७४

आदिः— नमन करूं नरकुंजरा ।

शेवटींः— हस्ताक्षर गंगाधरभट्टस्य

( १ ) प्रबोधसुधाकर, अंतः—

जो बाह्यांतरीं पूर्ण जाला । ब्रह्मानंदीं निमग्न राहिला ।
गंगाडोहीं चुबकलोनि भरिला । कुंभ जैसा ॥ ८ ॥

जजरामविरचिते व्याख्याने वगैरे पंचदशप्रकरणं समाप्तम् ।

( १ ) अद्वैतनिरूपण पानें २२, ज्ञानेश्वरनिवृत्तिसंवाद ( १ ) अनुभवामृत कानडी भाषा ( १ ) अमृतानुभव, [ मृत्युंजयकृत ] ओवी २९० प्रती पांच पैकीं दोन प्रतींचें नांव अमृतानुभवा ऐवजीं परमामृत आहे. ( १ ) मतिरत्नाकर [ दिवाकर कृत ] पत्रें ३८ मुखपृष्ठावर ग्रन्थसंख्या ८८० दिली आहे

आदिः—

वों नमो आदिपुरुषा उत्तमा । अव्यक्ता निर्गुणा निरोपमा ।
श्रीकृष्णनाथा मेघःशामा । जगद्गुरु ॥ १ ॥

अंतः—

नागेंद्रशिष्य मुरारी जवळिका । दैवयोगें परम मार्ग जोडला मज निका ।
तेणें वरें मतीप्रबंदु ग्रंथिका । ह्मणें मुनी दिवाकरु ॥

(१) पुत्रलक्षण—बारा प्रकार पुत्रांचे—पानें ३ (१) भीमोपदेश फुटकळ पानें ८ (१) धर्माधर्मलक्षण, [ कोण कृत न कळे ] ओवी ५३ पानें ८

आदिः—

पुण्य पाप समान जालिया । प्राणी लाभे मनुष्यकाया ।
अथवा कांहीं दोष असलियां । तो भोगूनियां नर होये ॥ १ ॥

महालांत असलेल्या इतर प्राकृत ग्रन्थांचें कामापुरतें टांचण केलें आहे. तें वाटल्यास पुढें केव्हां तरी सादर करीन. महालाचा " फोटो " घेतला तो सोबत जोडला आहे. तसेंच २६ व्या दप्तरांत जो " रामसोहळा " ग्रन्थ आहे त्याच्या मुखपृष्ठाचा " फोटो " घेतला तो हि येथें देत आहे.*

श्रीज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ, श्रीसमर्थ, उद्धवचिद्घन, वामन, शिवराम, शिवकल्याण, विष्णुदासनामा, देवदास, मेरु, मुकुंद, राघव, चिदानंदानुचर, वैद्यनाथ, जगन्नाथ, माधव, माधवनंदन, रत्नाकर, गुरुदास, परमानंदचैतन्य अवधूत, दासानुदास, मृत्युंजय, कृष्णदास पंडित, वीरेश्वर, अनंतमौनी, बाळ, अज्ञान सिद्ध नागेश, वरदनागेश, भगवंत, त्रिंमल्ल, निवृत्ति अवधूत, नागेश, ब्रह्मानंद, जीवन्मुक्त, दत्तात्रय, नारायणांकित माधवदास, अमृतनंद, गोविंद, शंकर, त्रिंबक चौंडे, जयराम, दिवाकर, इत्यादि पूर्णपरिचित, अल्पपरिचित व अपरिचित अशा सत्पुरुषांचा उल्लेख या टांचणांत आहे. अप्रकाशित अशा निदान शंभर ग्रन्थांचा परिचय या टांचणावरून नव्यानें होत आहे. काव्यसंशोधकांना आणि प्रकाशकांना या टांचणाचा थोडासा तरी उपयोग होईल अशा भरंवशानें तें आज मंडळाला सादर करीत आहें.

धुळें ज्येष्ठ व. ११ शके १८३५ शंकर श्रीकृष्ण देव

---

* दोन्हीं फोटो मंडळाच्या संग्रहीं आहेत.

## २ श्रीसमर्थांच्या नांवावर मोडणारें एक लघु काव्य

किष्किंधाकांड श्रीसमर्थांचें नसून त्यांच्या नांवावर आजपर्यंत खुशाल मोडत होतें याचें विवेचन श्रीरामदासी मालेंतील तिसऱ्या भागांत आलें आहे. तसें च श्रीसमर्थकृत मनाचे श्लोक वस्तुतः २०५ असतां आजपर्यंत २१० श्लोक त्यांच्या नांवावर बेलाशक प्रसिद्ध करण्यांत येत होते. ही चुकी मालेंतील पांचव्या भागांत दुरुस्त करण्यांत आली आहे. अशी च आणखी एक चूक आज दाखवून दुरुस्त करावयाची आहे.

ज्यांनीं ज्यांनीं म्हणून श्रीसमर्थांचे समग्र ग्रन्थ आजपर्यंत प्रकाशित केलेले आहेत त्यांनीं त्यांनीं श्रीसमर्थांच्या नांवावर "अन्वयव्यतिरेक" म्हणून एक प्रकरण छापलेलें आहे. प्रकरण फार गोड आहे यांत लवमात्र शंका नाहीं व तें प्रत्यक्ष श्रीसमर्थांचें नसलें तरी त्याच्या कर्त्यावर श्रीसमर्थांची कृपा खचित झालेली आहे असें अंतःप्रमाणावरून कोणास हि कळणार आहे. पण हें प्रकरण श्रीसमर्थांचें नसावें असें वारंवार वाटे; तथापि तसें म्हणण्यास व त्यांचें नाहीं तर कोणाचें आहे हें सांगण्यास आजपर्यंत आधार नव्हता, तो आतां मिळाला आहे.

श्रीदासविश्रामधामकर्ते येकेहाळीमठपति श्रीआत्मारामहाराज यांच्या मठांत या प्रकरणाच्या दोन प्रती मिळाल्या ( अनुक्रमांक २७ ). त्यांच्या मुखपृष्ठावर मजकूर आहे तो असाः—

> अन्वयव्यतिरेक ग्रन्थ ॥ समर्थाचा
> सिष्य सीतारामबावाकृत ॥ वोवीसंख्या ॥ ३५८ ॥

आणि आतां प्रकरणाची शेवटची ओवी हि बरोबर लागते. ती ओवी अशी आहेः—

> स्वामीकृपा समर्थ सार । सीताराम हें अक्षर ।
> वंदोनिया अत्यादरें । नमस्कार घाली ॥

या ठिकाणीं सीताराम म्हणजे प्रभु रामचंद्र नसून काव्याचा कर्ता सीतारामबावा होय. अशा प्रकारें, कल्पना होती ती खरी ठरली व शंकेचें समाधान झालें.

शंकर श्रीकृष्ण देव

# ३ वडवाळ सिद्ध नागनाथ

श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून तों श्रीएकनाथमहाराजांपर्यंतच्या तीनशें वर्षांच्या अवधींत महाराष्ट्रवाङ्मयांत जो खड्डा पडलेला दिसतो तो भरून येण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

वडवाळ सिद्ध नागनाथ यांचे कांहीं अभंग व पदें आतांपर्यंत उपलब्ध होतीं. संकटहरणीशिवग्रन्थ नामक त्यांचा एक लहानसा ओवीबद्ध ग्रन्थ नवीन उपलब्ध झाला आहे. ग्रन्थाचीं सात प्रकरणें असून ओवीसंख्या अवघी १४१ आहे. पण ग्रन्थ फार महत्त्वाचा आहे. या ग्रन्थावरून नागनाथांचा काळ नक्की ठरतो.

मिती मार्गेश्वर वद्य बीज । गुरुवारीं लिहिला सहज ।
१० ] लिहितां स्वात्मकार्य माझें । करी अज्ञाना ज्ञानसिद्धी ॥ ७/२६ ॥
शके तेरासें तेरा १३१३ ।

वगैरे आपचंदमठांत या ग्रन्थाची मला अलीकडे केलेली नक्कल मिळाली. अस्सल किंवा तत्कालीन प्रत मिळविली पाहिजे.

सोलापूर जिल्ह्यांत मानूर, मोहोळगांव व वडवाळ या तीन ठिकाणीं शोध केला पाहिजे. गुलबर्ग्यापासून उत्तरेस आपचंद पांच कोस आहे व आपचंदपासून कोस दीड कोस महागांव आहे. या महागांवीं नागनाथांच्या एका शिष्याचा मठ आहे. मठांत ग्रन्थसंग्रह हि नक्की आहे, पण आमच्या दुर्दैवानें आम्हांस त्याचें दर्शन घडलें नाहीं. संकटहरणीशिवग्रन्थाची प्रत मला आपचंदमठांत मिळाली खरी पण ती हि "महाग्रामे लिखितं" आहे. दुसऱ्या कोणाच्या वांट्याला हें काम जावें म्हणून
२०] संशोधकमंडळाच्या अहवालांत ही नोंद करून ठेवतों.

शंकर श्रीकृष्ण देव

# ४ श्रीशिवकालीन दोन पत्रें

लेखांक १

श्री कार्तिक वद्य १२ शके १६००

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ५ कालयुक्त संवत्सरे कार्तिक बहुल द्वादसी भृगुवासरे क्षत्रीयकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति याणी राजश्री कोनेरी रुद्र

श्रीशिवराजेंद्र-
हर्षनिदान ॥ त्र्यंबक-
सुत मोरेश्वर मुख्य
प्रधान

देशाधिकारी ता मावल यासी आज्ञा केली ऐसी जे मठाची पाटिलकी माहली येस पाटील व भिउजी पाटील व मालोजी पाटील करिताती यासी वाघोजी मराठा यास निसबती नसता खलेलास उभे राहिले आहेती कीं पाटीलकी आपली तरी आजी नवा कथला कोण्ही करूं देत नाहीं पेसजी-पासून पाटिलकी माहाल खात आले असेती दादाजी कोंडदेव याचे वेळेस चालिले असेल तेणें प्रमाणें चालवणें पाटिलकी महालाची महालाचे हाते घेणें मऱ्हाटे नवा कथला घेऊन उठले आहेती त्याला ताकीद करून हालखुद ठेवणें करकर सर्वथा होवो नेदणें लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

सुरु सुद

पौ छ २५ सौवाल मार्गशीर्ष बहुल द्वादसी मंदवासर

लेखांक २

श्री मार्गशीर्ष व. १३ शके १६००

राजमान्य राजश्री बहिराजी बाबाजी परभु हवालदार व कारकून ताा मुठे खोरे यासी कोनेर रुद्र सुभेदार व कारकुन सुभा माहालहाय ताा मावल आसिर्वाद सुाा

तिसा सबैन अलफ राजश्री छत्रपतिस्वामीचें पत्र कार्तिक बहुल द्वादसी भृगुवासरीचें सादर जालें तेथें आज्ञा कीं मुठाची पाटिलकी माहली येस पाटील व भिउजी पाटील व मलोजी पाटील करितातो यांसी वाघोजी मराठा यासी निसबती नसता खलेलास उभे राहिले असती कीं पाटिलकी आपली नरी अजी नवा कथला कोण्ही करूं देत नाहीं पेसजीपासून पाटिलकी माहाल खात आले असेती दादाजी कोडदेव याचे वेलेस चालले असेल तेणें प्रमाणें चालवणें पाटिलकी माहालाची माहालाचे हातें घेणें मन्हाटे नवा च कथला घेऊन उठले असेती त्याला ताकीद करून हालखुद ठेवणें करकर सर्वथा होऊं ने दणें म्हणऊन आज्ञा आज्ञेप्रमाणें माहालांची पाटिलकी माहालांचे दुमाला करुन पाठविले आहेती तरी जैसे जैसे पहिलेपासून याचे हातें मोकदमीचें काम घेता तैसें च घेणें मन्हाटे हरकती करितातो त्यासी बटा देऊन हालखुद ठेवणें माहालासी एकदर हरकती कथला करूं ने दणें त्यासी पाटिलकीसी काही निसबती नाहीं राजश्री स्वामीनें मनास आणून पत्र दिले आहे तेणेंप्रमाणें वर्तणुक करणें सदरहु पत्राची तालिक लिहून घेऊन असल फिराऊन देणें छ २६ सौवाल मोर्तब सुद




अशीं दोन अस्सल पत्रें पुणें जिल्ह्यांतील एका देशपांड्यांच्या जवळ पहावयास मिळालीं तीं उतरून घेतलीं. दोन्हीं पत्रें महत्त्वाचीं आहेत, श्रीशिवछत्रपतींचीं शिस्त, निःपक्षपतीपणा व राज्यकारभारांत दादाजी कोंडदेवांना प्रमाण मानण्याची त्यांची तत्परता हीं या पत्रांवरून व्यक्त होत आहेत.

शंकर श्रीकृष्ण देव

# ५ पेशवाईंतील एका भटजींची स्मरणवही

भिकंभट मनोहर नांवाचे एक भटजी चउलास होऊन गेले. त्यांची एक अकरा पानांची बाळबोध लिपींत लिहिलेली स्मरणवही त्यांच्या पणतवाकडून मिळाली आहे. शके १७११ पासून तों शके १७३२ पर्यंतच्या काळांतील कांहीं नोंदी या वहींत आहेत. होम, व्रतें, वायनें, देवांच्या मूर्तींची स्थापना, अनुष्ठानाला असलेल्या ब्राह्मणांचीं नांवें, दक्षिणा व उपाध्येपणा वगैरे बाबतींत झालेले कज्जे व त्यांचे निवाडे इत्यादि विषयक नोंदी बहुतेक असून कांहीं ऐतिहासिक महत्त्वाचीं हि टिपणें आहेत. माझी समजूत अशी आहे कीं, शोध केल्यास असल्या स्मरणवह्या कोंकणांत बहुतेक ठिकाणीं मिळतील. त्या त्या वेळीं हीं टिपणें केलेलीं असल्यामुळें इतिहासाला त्यांचें महत्त्व फार आहे. टापटीप, शोधकपणा, क्षुद्र कां हक्क असेना पण त्याविषयीं हि पूर्ण जागरूकता, इत्यादि जे कोंकणांतील माणसांचे सहज गुण, ते या लहानशा वहीवरून हि व्यक्त होत आहेत. अशा ह्या वहींतील कांहीं उतारे जसेच्या तसे येथें देत

( १ ) शके १७१४ परिधावी नाम संवत्सरे भाद्रपद वद्य १४ चतुर्दशीस सरकार जंजिरे कुलाबा येथून वृत्ती अनामत सरकारांत ठेविल्या तपे ब्राह्मण तप्याचे सात गांव व उमटें तपा माहाली सनदा लिहिल्या कीं तीन वृत्यांशी याची नकल झाली आहे येविशी मनास आणावयाचे आहे म्हणू अनामत सरकारात ठेउन कुलाबकर धावू जोशी यास जालवावयाकरिता आज्ञा केली असे या अन्वये सनदा पाठउन वृत्ती ठेविल्या त्या काळी कारभारी धोंडभट्ट शैव भास्करपंत फडणीस बाबाजी चिटणी

( २ ) तदनंतर शके १७१५ प्रमादी संवत् चैत्र शुद्ध पौर्णिमेस राघोजी बावा यास देवज्ञा झाली पूर्वी दाहा पाच वेळा जाउ विनंती केली तेव्हा उत्तर होय कीं भट्टजीजवळ जातो भट्टजी मनस्वी बोलत वृत्ती सोडल्या नाहीं नंतर जैशींग बावा कारभार करू लागले तेव्हा सर्व उपाध्ये मिळोन जाउन पूर्वील वृत्त निवेदन केले त्याजवरून रुपाळू होउन वृत्तींची मोकळिकेची माहाली पत्रे दिली मिती शके १७१५ प्रमादी संवत् वैशाख वद्य ६ षष्ठी त्या काळी कारभारी बाळकृष्णपंत पेठ्ये सदाशिव नारायण गोपाळ शेट

( ३ ) शके १७१५ प्रमादि संवत् कार्तिक शुद्ध ६ मंदवारी दोन प्रहरी श्रीमंत रा॥ माधवराव आल्या याही किल्ले रेवदंडा येथे येउन मुकाम केला नंतर परस्पर वकीलातीचे बोलणे करू लागले तो ठरेना ऐसे ध्यानात आणून सरकारचे भात व गुरे वगैरे वस्तभाव लुटुं लागले जमीचा चौक्या बसउन कुलाबे व दुसरे किलेयात काही एक जाउ न देत ऐसें केलें व रैतीस लुटून रैत परागंदा जाली ऐसे वर्तमान

आजपर्यंत झालें मीती शके १७१५ माघ वाा ८ रविवार तदनंतर त्या च वेव्हाटीने होते नंतर पुणेयास तहाचा ठराव होऊन आला मग भेटी परस्पर सोनाराचे बागेखाली झाल्या मिती शके १७१६ आषाढ शुद्ध ५ पंचमीस झाल्या दोन प्रहरीं

( ४ ) शके १७१६ आनंद संवत्सरे श्रावण वद्य दशमीस माधवराव आत्या फडके रेवदंड्याहून समजी सरखेलची होउन गेले

( ५ ) यमाजी शिंपी याणे विठलरखुमाई याच्या मूर्ती आणिल्या होत्या त्यास बहुत दिवस त्याची कोठे स्थापना करावी म्हणून द्रव्याचा प्रयत्न करीत होता परंतु कोठें साध्य झाले नाहि त्यास श्रीमंत राा माधवराव आत्या फडके आगऱ्यांच्या मसलतीस आले होते तेव्हां शिंपी याणे अर्ज केला कीं मी मूर्ती आणिल्या आहेत त्याची स्थापना करावयास आपणास सामर्थ्य नाहीं त्यास आपण रुपा करून स्थापना होय तें करावें त्यावरून त्याहीं लक्ष्मीनारायणाचे पूर्वी देवालय श्रीरामेश्वरसंनिध होते त्यामध्यें स्थापना केली शके १७१६ आनंद नाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य द्वितीयेस केली तेथें यजमान बाबूभट्ट प्रथम अग्निहोत्री याचा ज्येष्ठ पुत्र करून प्रतिष्ठा केली उपाध्ये रंगभट्ट धर्माधिकारी होते

( ६ ) शके १७१७ राक्षस नाम संवत्सर माहे चैत्र वद्य १२ प्रातःकाळी श्रीमंत मानाजी आगरे यांही जैशिंग आगरे यांस अटक केले ते श्रावण वद्य चतुर्दशीचे रात्रीस तोफेला दोर बाधून निघाले ते किर्ले हिरेयांत गेले नंतर अधीक भाद्रपद शुद्ध दशमीस किलेयांतून निघोन दोनशे माणसासहवर्त्तमान रेवदंडेयास दोहो तिहि घटका रात्रीस आले ते काहिक दिवस रेवदंडेयात होते येथे साहित्य सरमजाम करून पुणे यास गेले तेथे ही साहित्य करून खाली आले ते नागोठणेयास काहिक दिवस होते ते शके १७१८ श्रावण शुद्ध ९ नवमी भृगुवारी प्रहरा रात्रीस श्रीएकवीरेचे देवालयी आला ते भाद्रपद शुद्ध ३ अलीबागेस जाउन मुकाम केला.

( ७ ) शके १७२३ ज्येष्ठ व १२ ते दिवशी नागावचे बंदरी सातताडाचे पश्चिमेस मासा वाहवत लागला तो लांबी सुमार तीस एकतीस हात होता व जाडी भुईपासून पुरुषभर उंची ऐसा लागला त्यास पाहाकरिता प्रभु आदिकरून संपूर्ण जन पाहास गेले होते

( ८ ) शके १७२३ अधीक ज्येष्ठ शुद्धांत माहालाचे जप्तीवर राा बाजी मल्हार कारकून माहाल चेउल येथे आला त्याणी काहिका दिवशी सर्व उपाध्येयांस बलाउन सागितलें का तुमचे वतन काय काय ते लिहून द्या असे सागितलें त्यानंतर काहिक दिवस विचारण्याखालीं च गेले तो राा वासुदेव बाजी कुंटे पुनः हवाला करून आले त्याजवरून तो अर्थ तसा च राहिला त्यानंतर ते च मार्शी वद्य

चर्तुर्थीस दोन प्रहरानंतर हुजुरून वरात उपाध्ये व जोशी यांचे नावे सदर बारगिराची एकुण नवद रुपयाची आली त्यात अर्थ नदरेचे ठरावापैकी रुपये एकूण नवद देणे त्याजवरुन उपाध्यांतील एक दोघे जंजीकुलाबचे मुकामी जाउन श्रीमंत रा। बाबूराव आंग्रे बाबासाहेबाजवळ अर्ज करून वरातदारास निवारण आणिले नंतर सर्व उपाध्ये व जोशी साहेबाजवळ गेले नंतर आज्ञा की कारभारी बाळाबा बाबा घाडगे याजवळ जावें त्याजवरून बाबांजवळ गेले नंतर विनंती केली की वरात काय म्हणून केली त्याणी उत्तर केले तुम्ही सरकारात नदर पांचशे रुपये द्यावे त्याजवरून बोलणे परस्पर होता आम्ही नजर देत नाही असे बोलिले त्यानंतर सरकारातून उपाध्यास बोलू लागले की तुम्ही प्राचीन उपाध्ये किती व हाली किती आहा व तुमची वतने काय काय ती लिहून द्यावी व तुम्ही चेवलास अकरा उपाध्ये त्यातील नकला कोणकोणाचा व त्याची वतने काय जांच्या नकला झाल्या असतील त्याचे वतन सरकारांत ठेउ व तुम्ही उपभोग करीत आलेत त्याचे उत्पन्नाचा पैका घेउ याप्रमाणे बोलू लागलें तेव्हां उपाध्ये बोलिले की आम्हास ही माहितगीरी बहुत वर्षाची नाहीं पूर्वी किती होते व ते कोण कोण यामुळे लिहून ही देता न ये व आम्ही येविशी कोणास शिवराई आदिकरून पैका दिल्हा नाहीं जे आहो ते वतनाचा उपभोग करितो याजवर परस्पर बोलणे बहुत झाले त्या काळी रा। बाबुराव श्रीधर याही आज्ञा घेउन उपाध्यास घरी जावयाचा निरोप दिला नंतर पुनः बोलाउन नेउन पूर्ववत् उपसर्ग लाविला ते कितेक दिवस अलीबागेस होते त्यावर पुनः वराता झाल्यावर सर्व निघोन धन्याजवळ जाउन आपले वृत्त निवेदन केले त्याजवरून धनी कृपाळू होउन आज्ञा केली की तुम्हास उपसर्ग येविशि होणार नाही स्वस्छ चित्ते घरी जावे मिती शके १७२३ भाद्रपद शुद्ध ११ मंदवार

(९) शके १७२६ भाद्रपद वा। १० ते दिवशीं रेवदंडा येथील श्रीहनुमंत याचे आंगावरील कवच चुना व शेंदुर याचे होते ते सुटोन पडलें

(१०) शके १७२६ रक्ताक्षा संवत्सरे माहे आश्वीन वद्य ८ ते दिवशी बाबाजी पाटेल वा। वरडे याचा भाउ केशव मृत्यु पावला त्याची बायको काशी नाम्नी सती निघाली ती वरडे येथे च कसनदीवर गेली

(११) शके १७२७ चैत्र माशीं रामाजी पंत लिमये याचा गणेशपंत भाउ म्हणून कोणी येक पुरुष आला तो कोणी म्हणत गणेशपंत च कोणी म्हणतो नव्हे ऐसा संशयामुळे निश्चय होण्यास मध्ये चार पांच मास झाले नंतर आश्वीन वद्यामध्ये रेवदंडे येथे सरकारात सभा केली तेथे सर्वमुखे हा गणेशपंत नव्हे ऐसे ठरलें नंतर कोठे कोणास संसर्ग झाला असेल त्या संशय धरून सर्वांही श्रीहरेश्वरी पंचगव्य घेतलें व चेउलकरांही श्रीरामेश्वरी घेतले कार्तीक वद्य चतुर्दशीस उभय ग्रामस्छा

एक दिनीं घेतलें नंतर रामाजीपंत व वासुदेवपंत थथे यांस कार्तीक वा। १४ एक घटका उपरांत अमावास्या ते दिवशी प्रायश्चित्त झालें भावजईचा घंटस्फोट केला

☞ वरील अकरा नोंदींत राघोजी आंगरे, जयसिंग आंगरे, मानाजी आंगरे, बाबूराव आंगरे, पेशव्यांचे वकील, इत्यादिकांविषयीं जी मित्तीवार माहिती दिली आहे ती इतिहासाला उपयुक्त आहे. त्या प्रचंड माशाच्या वर्णनावरून भटजींचा चवकसपणा व्यक्त होत आहे. सती जाण्याचा प्रघात सर्व वर्णांत व सर्व जातींत सरसकट होता असें दिसतें. त्या काळीं तोतयाचीं बंडें फार होत असावींत असें वाटतें. सन्याप्रमाणें तोतयांशीं व्यवहार कित्येक महिने व्हावा, हें जरा चमत्कारिक दिसतें. असो.

१०] अशीं टिपणें कोंकणपट्टीला बरींच मिळावींत असा माझा अंदाज आहे. तत्रस्थ सभासदांनीं तीं मिळवून मंडळाकडे पाठवावीं, अशी माझी विनंति आहे.

शंकर श्रीकृष्ण देव

## ६ ज्योतिपंत महाभागवत

(१६००-१७१०)

(उपनांव-भाळवणें. गोत्र-उपमन्यु)

सातारा जिल्ह्यांत, साताऱ्यापासून सुमारें ६ मैलांवर श्रीकृष्णेचे दोन्ही कांठांवर चिंचणेर या नांवाचीं दोन खेडीं आहेत. उजवे कांठावरील खेडें पंतअमात्य यांस इनाम असून डावीकडील पंडितराव यांचें आहे. या पंडितरावांच्या चिंचणेरांत ज्योतिपंतबाबाचा मठ आहे. त्यांची थोडीशी माहिती खालीं देतों:—

२०] सातारा जिल्ह्यांतील खटाव गांवीं कोणी गंगाधरपंत म्हणून ब्राह्मण असे. त्यानें मुसलमानाचे पदरीं नौकरी करून कांहीं खेड्यांचें वतनें मिळविलें. त्यास दोन मुलें. पैकीं वडील मुलास मलवाडी तालुका माण येथील देशपांडेपण व धाकट्यास खटाव व चाळीस गांवें दिलीं. हा ज्योतिपंताचा ७ वा पूर्वज. ज्योतिपंताचा काल सुमार १६०० म्हणजे या गंगूपंताचा काल सुमार शके १४५० हा येतो. व विजापूरकराकडे हा नौकर असावा असें दिसतें. याहून जास्त हकीकत उपलब्ध होत नाहीं.

या गंगाधराचा ६ वा वंशज गोपाळ हा होता. हा च ज्योतिपंताचा बाप. गोपाळानें

आपला मुलगा ज्योति हा निर्बुद्ध म्हणून त्यास घरा बाहेर काढून दिलें. ज्योतिपंतांनीं श्रीगजाननाची आराधना करून विद्या संपादन केली व पुण्यास महिपति या नांवाचे आपले मामा होते त्यांचेकडे आले. ज्योतिपंताचें अक्षर अगदीं उत्तम असल्यानें त्यांस पेशव्यांचे पदरीं पुरंदरगडीं नौकरी—फडणीस म्हणून (?)—मिळाली. कांहीं काळ नौकरी केल्यावर त्यांस उपरति झाली व सर्वसंग परित्याग करून ते काशींस गेले. तेथें मणिकर्णिकेचे घाटांवर गायत्रीपुरश्चरण केल्यानें त्यांस श्रीव्यासांचें दर्शन झालें. श्रीव्यासांनीं त्यांस 'श्रीमद्भागवत' स्वतः आणून देऊन त्याचें पठन करण्यास आज्ञा केली.

हें भागवत हल्लीं त्यांच्या वंशजाजवळ आहे व तें मला पाहण्यास मिळालें. आख्यायिका अशी आहे कीं, श्रीव्यासांनीं काशींतून निरनिराळ्या पोथ्यांतून निरनिराळे स्कंद काढून ही एक १२ स्कंदांची पोथी तयार केली व ती ज्योतिपंतास दिली. हल्लींची पोथी त्याप्रमाणें आहे. म्हणजे भिन्न स्कंद भिन्न आकाराचे, भिन्न अक्षरांचे व भिन्न कालाचे असे आहेत.

पहिला, दुसरा, तिसरा, हे एक आकाराचे, एक अक्षराचे व एका संवतांत—शके १६६८—लिहिलेले असे आहेत. नवमस्कंद निराळे अक्षराचा परंतु त्या च शकांत लिहिलेला असा आहे. द्वादश स्कंद शके १६६९ मध्यें लिहिलेला निराळे वळणाचा आहे. इतर स्कंदावर शक नाहीं परंतु वळणें भिन्न आहेत. श्रीव्यासांनीं भागवत देऊन उपदेश केला याबद्दल प्रत्यक्ष आधार—ज्योतिपंतानीं भागवतावर ओवीबद्ध प्राकृत टीका केली तींत किंचित् उल्लेख—सांपडतो.

ऐसे अवसरीं । कोण्या भाग्योदये त्वरी ।
भागवत नौका जगदोद्धारीं । कृष्णद्वैपायन मज देती ॥

२X२X१२

हें पहातां अघटित । मज प्राप्त व्हावें श्रीमद्भागवत ।
परि व्यासकृपें अलभ्य हि लाभत । म्हणोनि वंदित तत्पाया

२X७X१८७९

या संदिग्ध अवतरणांवांचून व परंपरागत आख्यायिकेवांचून श्रीमद्भागवताची पोथी श्रीव्यासांनीं ज्योतिपंतांस दिली या गोष्टीस इतर पुरावा मला मिळाला नाहीं. कदाचित् ह्या आख्यायिकेचा अर्थ हि निराळा असेल, असो.

काशीस च 'महाभागवत' ही पदवी ज्योतिपंतांस मिळाली. तेथून ते श्रीपंढरीस आले व श्री विठ्ठलासमोर त्यांनीं १४०० देवालयें—श्रीपांडुरंगाचीं—बांधण्याचा संकल्प केला. ह्याप्रमाणें त्यांनीं सुमार ७५० देवालयें बांधलीं म्हणतात.

पुण्यास लकडीपुलाजवळील शिवराज्यारोहणोत्सवास्तव प्रख्यात झालेलें विठ्ठल-मंदिर ज्योतिपंतांनीं बांधलेलें आहे. आपल्या रघुनाथ नांवाच्या नातवाचे लग्ना-करितां म्हणून चिंचणेर गांवीं आले असतां तेथें च त्यांनीं देह ठेविला. शके १७१० कीलक संवत्सर मार्गशीर्ष कृष्ण १३, प्रदोषकाल.

( वंशावळ )

गंगाधरपंत
|—५ पिढ्या
गोपाळपंत ( ६ वा पुरुष )
|
ज्योतिपंत

- रामचंद्र
  - पांडुरंग
- ( समाधि चिंचणेरीं ) लक्ष्मण ( ब्रह्मावर्तीं राहत असे )
  - नारायण
    - रघुनाथ
      - सळनाथ (हयात)
    - ( हयात ) गोविंद
      - मुकुंद (हयात)

लक्ष्मणपंतांनीं आपले वयाचे ८० वे वर्षी व रघुनाथांनीं ६९ वे वर्षी आपले देह ठेविले.

गुरुपरंपराः—

[ श्रीनारायण–विधि–नारद–व्यास ( बादरायणि )–ज्योतिपंत ]

वेदव्यास आमुचे गुरु । जे कां भवाब्धीचें तारू ॥ १ ॥
जाणा शुद्ध भागवत । आमुचा सांप्रदाय होत ॥ २ ॥
कृष्ण उपास्य देवता । वासुदेव एक सत्ता ॥ ३ ॥
सर्वरूपीं नारायण । हें चि मनोमई ध्यान ॥ ४ ॥
हरिस्मृतीचें आसन । तदाकार मुद्रा पूर्ण ॥ ५ ॥
एकादशी व्रत । पांडुरंग कुलदैवत ॥ ६ ॥
आत्मा अभेद पहाणें । भूतदया आचरणें ॥ ७ ॥

द्वादश तिलक । कंठीं तुळसी माळा देख ॥ ८ ॥
श्रीमद्भागवत कानीं । मनीं वाणीं सदा ध्यानीं ॥ ९ ॥
नवविध भजन । मुखीं नारायणकीर्तन ॥ १० ॥
कलियुगीं ज्योति म्हणे । या चि मार्गीं सर्वीं येणें ॥ ११ ॥

येथपर्यंत जें वर चरित्र दिलें आहे तें कांहीं परंपरागत आख्यायिका व कांहीं सखाराम नांवाच्या परंपरेंतील गृहस्थानें लिहिलेलें चरित्र यांच्या आधारानें दिलें आहे. आतां खुद्द ज्योतिपंतांच्या ग्रंथांवरून काय निष्पन्न होतें तें पाहूं :—

ज्योतिपंतांनीं श्रीमद्भागवतावर ओंवीबद्ध प्राकृत टीका केली आहे. त्या टीके. पैकीं प्रथम स्कंद संपूर्ण व द्वितीय त्रुटित असा मला उपलब्ध झाला आहे.

त्यांत आपले मातापित्यासंबंधीं ज्योतिपंत म्हणतातः—

पिता गोपाळ नामें ।
माता गोदावरी प्रेमें । ज्योति नाम ठेविलें संभ्रमें । १×२×३१२

यावरून गोपाळगोदावरी यांचे पोटीं ज्योतिपंत जन्मले, हें उघड होत आहे.

'भागवतपठण' यावांचून दुसरें साधन ज्योतिपंतांनीं केलें नाहीं असें त्यांच्या परंपरेच्या अभंगावरून व खालीं दिलेल्या अवतरणांवरून दिसतें.

करी नित्य भागवतगायन । १×४×९३३
कांहीं दुजें साधन नाहीं । एक भागवतगान पाहीं ॥ २×२×११३०

तेव्हां श्रीगणपतीचे अनुग्रहाबद्दल परंपरागतकथेवांचून दुसरा आधार दिसत नाहीं. असो.

त्या आपल्या प्रिय भागवताचा सार्वत्रिक प्रसार व्हावा ही इच्छा ज्योतिपंतास होणें साहजिक होतें; परंतुः—

कलींत प्राणी मंदमति । संस्कृत भाषा स्वप्नीं नेणती । (१×१३×४)
संस्कृतभाषा पेटी । भागवतयशरत्न तिचे पोटीं ॥ (१×१९×२१३)
तेव्हां सकळा नये बोधा ॥ १×१×२१
म्हणून ज्योति ह्मणे हरिकथा केली । प्राकृतभाषे कळावया॥(१×३×४४७)
परंतु हें प्राकृत करतांना
श्रीधराचार्यवाणी । भावार्थदीपिका आश्रयुनि ।
गुरुप्रसाद गुह्य जनीं । प्रगट करी सर्वथा (१×१×२८)

या आपल्या प्राकृत टीकेस ज्योतिपंतांनीं "सुभाषिणी" असें नांव दिलें असावें असें वाटतें

संताज्ञा शिरीं वंदुनी । टीकारंभी सुभाषिणी ॥ (१×१×२७)
हे टीका सुभाषिणी । स्वयंज्योती रूपिणी । ( १×१९×२२२ )

सदरहू टीका विस्तृत असून सुलभ आहे. ओवी शक १६०० तील जरा लांबलचक अशी आहे. हा एकंदर ग्रंथ फार मोठा असला पाहिजे हें उघड आहे. सदरहू ग्रंथास ज्योतिपंत "श्रीकृष्णलीलामृत" म्हणत असत असें दिसतें (१×१८×२३३). असो.

वर जो मीं ज्योतिपंतांचा काल दिलेला आहे ह्या संबंधानें थोडासा खुलासा करणें जरूर आहे.

माझ्या जवळ ज्योतिपंतांनीं केलेले दोन स्कंद, एक वेदस्तुतीवरील टीकेची पोथी व एक अभंगाचें बाड इतके ग्रंथ आहेत; पैकीं प्रथम स्कंदाच्या १९ वे अध्यायाचे शेवटीं असें आहे.

" हे टीका श्री क्षेत्र पंढरपूर येथें श्री व्यासाश्रमीं बसुनी केली. लेखक गंगाधर सदाशिव शके १७०४ प्लवंग फाल्गुन कृष्ण ९ भानुवासर माधान्य काळीं "

येथें प्लवंग शके १७०९ मध्यें येतो १७०४ मध्यें येत नाहीं. तेव्हां नांव अगर शकांक चुकला असावा. फाल्गुन कृष्ण ९ भानुवारीं १७०९ मध्यें येते तेव्हां शकांक चुकला हें उघड होत आहे.

द्वितीय स्कंदाच्या दहावे अध्यायाचे शेवटीं एक ओवी आहे. ती अशीः—

शके सत्रासे नव चालती । प्लवंग नाम संवत्सराची प्रवृत्ति ॥
मार्गशीर्ष एकादशी ... ...
खंडोबा नामे शिष्य असत । तेणें ग्रंथ लेखन केला जैसा उक्त ॥

या वरून १७०९ प्लवंग मार्गशीर्ष ११ (?) रोजीं जसा 'उक्त' तसा ग्रंथ खंडोबानें लिहिला.

तेव्हां शक १७०९ मध्यें ज्योतिपंत हयात होते हें उघड आहे.

तुकाविप्राचे अभंगावरून व परंपरेवरून ज्योतिपंताचा प्रयाणसंवत्सर कीलक हा आहे. शक १७०९ नंतर कीलक संवत्सर शक १७१० मध्यें येतो तेव्हां रा० पटवर्धन यांनीं ज्योतिपंतांचा समाधिशक शके १७१० हा धरिला आहे तो च यथार्थ व निश्चित होय.*

आतां जन्मशकाबद्दल विचार करूं.

ज्योतिपंतांचें अभंगाचें जें एक बाड मजजवळ आहे त्यांत 'प्रबोधचंद्रोदया' चे धर्तीवर एक गद्यात्मक प्रकरण आहे. त्याचे अखेर सुदैवानें रचनाशक दिला आहे. तो असाः—

---

* पहा शके १८३४ अहवाल, पान ७९.

'प्रवृत्ति निवृत्ति ऐक्यता रत्नावली समाप्त शके १६१३ खरनाम संवत्सर वैशाख शुा १३ हे लिखित सवत्सर शके १७४८ चैत्र विवाहनाम संवत्सर वैशाख शुा २ भौमवासरे '

या लेखांत दोन चुका आहेत. खर संवत्सर शके १६३३ ला येतो व शके १६१३ ला प्रजापति येतो. तसें च शके १७४८ ला व्यय संवत्सर येतो. त्याचा अपभ्रंश कदाचित्, विवाह, केला असेल. तें कसें हि असो त्याशीं आपणांस सध्यां कांहीं कर्तव्य नाहीं. लेखनशकाची आपणांस सध्या जरूर नाहीं. रचनाशक १६१३ अगर १६३३ या पैकीं कोणता तरी एक शक असावा हें निश्चित आहे. यांतून माझे मतानें शक १६३३ हाच योग्य आहे व तोच गृहीत धरण्यास हरकत नाहीं; कारण ज्योतिपंत हे कांहीं जन्मसिद्ध अनुतप्त नव्हते. त्यांनीं पूर्ण गृहस्थाश्रम केलेला आहे. पुरंदरास किल्लेदारी करून नंतर अनुताप झाल्यानें ते काशीस गेले होते. तेव्हां त्यांचें काशीस प्रयाण पूर्ववयानंतर झालें असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं त्यांचें वय निदान २५ चे पुढें असलें पाहिजे हें उघड आहे. काशीस गेल्यानंतर त्यांस श्रीव्यासांचा अनुग्रह झाला व नंतर त्यांनीं ग्रंथरचनेस आरंभ केला. किंवा दुसरी हि एक कल्पना शक्य आहे, कदाचित् प्रथम पुरंदरीं जाण्या-पूर्वींच ही रचना झाली असावी, परंतु आंतील प्रगल्भ विचारावरून तसें कल्पणें बरें वाटत नाहीं. कसें हि असलें तरी ही रचना करतानां ज्योतिपंताचें वय २५ वर्षांचें असावें असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्यांचा शक १६०८—१७१० हा येतो व यावरून १०२ वर्षें आयुर्मान त्यांचें होतें असें दिसतें.

येवलें, पुणें, मुंबई, बेळगांव, नागपूर, सातारा, माहुली, कऱ्हाड, उंब्रज, सांवत-वाडी, रत्नागिरी, राजापूर, उरुण वगैरे ठिकाणीं श्रीविठ्ठलाचीं ७५० देवळें यांनीं बांधलीं व आपल्या नातवाचे दुसरे लग्नास चिंचणेर ग्रामीं ते गेले होते या गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे येवढें आयुर्मान असणें संभवनीय दिसतें.

राजाराम प्रसादीकृत 'भक्तमंजिरी' मध्यें यांचें चारित्र आहे; पण तें इतकें विस्तृत नाहीं व तो ग्रंथ उपलब्ध आहे तरी अप्रकाशित आहे.

सातारा वैशाख शुा. ११ गो. का. चांदोरकर

## ७ विसोबा खेचरांचा गुरु कोण ?

संत गोरा कुंभार यांनीं पंढरीस राउळांत आपल्या थापटण्यानें कच्या पक्याची पारख केल्यांत नामदेव हें कच्चें मडकें दिसून आलें. गोराकुंभाराच्या या ठरावावर

नामदेवांनीं श्रीपंढरीनाथाकडे दाद मागितली त्यांत 'तूं अद्याप गुरूवांचून असल्यानें माझें सत्यस्वरूप तुला कळलेलें नाहीं व म्हणून गोरोबाचा ठराव योग्य आहे, असा निकाल देऊन श्रीपांडुरंगांनीं नामदेवाची तक्रार काढून टाकली. सद्गुरू कोण करावा असा देवासच प्रश्न केल्यावर नामदेवास 'विसोबा खेचरास गुरू कर' असें देवानीं आपलें मत दिलें.

अनाथांचा नाथ तुझी ब्रीदावळी । मज कां रे जाळी भवव्यथा ॥
देव ह्मणे नाम्य गुरू वांचूनिया । मुक्ति पावावया आन नाहीं ॥

× × ×

देव ह्मणे नाम्या विसोबा खेचरासी । शरण तयासी जावें वेगीं ॥

हे नामदेवाचे गुरू जे विसोबा खेचर त्यांचे गुरू कोण ? याबद्दल थोडासा संशय आजपावेतों होता. श्रीएकनाथांनीं आपल्या एका अभंगांत असें दिलें आहे:—

ज्ञानदेवें उपदेश करूनिया पाहि । सोपान मुक्ताई बोधियेली ॥
मुक्ताईनें बोध खेचरासी केला । तेणें नामयाला बोधियेलें ॥ २ ॥

या वरून नामदेवांची गुरुपरंपरा अशी दिसते.

श्रीज्ञानेश्वर—मुक्ताबाई—विसोबा खेचर—नामदेव.

परंतु श्रीज्ञानेश्वर चरित्रांत कांहीं ठिकाणीं असा उल्लेख आहे कीं विसोबा चाट्यानें श्रीज्ञानेश्वरापुढील ताट ओढून घेऊन त्यांतील उच्छिष्टाचा एक घास घेतला त्या वेळीं महाराजांनीं " खेचरा ! खेचरा ! सर परता " असा निषेध केला तो च उपदेश जाणून विसोबाची समाधि लागली व त्या दिवसापासून खेचरी मुद्रेचा त्यांचा अभ्यास होऊन त्यांचे ' चाट्याचे ' ' खेचर ' हें नांव झालें. या आख्यायिकेवरून श्रीज्ञानेश्वर हे च विसोबाचे गुरु होते असें दिसतें.

परंतु ' नामयाची जनी ' आपले अंभगांत कांहीं निराळें च सांगते. काय तें पहा :—

नामयाचा गुरु । तो हा सोपान सद्गुरु ॥

या वरून नामदेवाचे ( परम ) गुरु सोपान हे होते म्हणजे विसोबाचे गुरू सोपान होते असें स्पष्ट होतें. तेव्हां विसोबाचे गुरू श्री ज्ञानेश्वर, अथवा मुक्ताबाई अथवा सोपानदेव यां पैकीं कोण होते हा प्रश्न उघड उत्पन्न होतो. नामदेवांनीं आपली गुरुपरंपरा दिलेली माझे वाचण्यांत नाहीं. या मुळें नामदेवांनीं या प्रश्नाचा निकाल दिलेला नाहीं.

या सर्व घोटाळ्याचा निरास करण्याचें साधन मला खुद्द सासवड मुक्कामीं उपलब्ध झालें. सासवडास श्री सोपानदेवाची समाधि आहे, हें सर्वश्रुत च आहे. तेथील मठांतील कागदपत्र चाळीत असतां खुद्द विसोबा खेचरांचा एक अभंग सांपडला. त्या अभंगावरून या प्रश्नाचा अखेर निकाल होतो. असा महत्वाचा तो अभंग असल्यानें तो साग्र येथें देतोः—

श्री

*माझी मुळ पीठिका सोपानसद्गुरु । तेणे माथा करू टेविंयेला ॥ १ ॥
त्याचे कृपे करून मीपणा ठकलो । देहभावा गेलो विसरूनिया ॥ २ ॥
चांगयाचा अंगिकार मुक्ताईनें केला । सोपान वळला मजवरी ॥ ३ ॥
जन्ममरणाचे भय नाहीं आतां । खेचरी तत्वता मुद्रा दिल्ही ॥ ४ ॥
जिकडे पाहे तिकडे आनंद भरला । खेचर सामावला तया माजी ॥ ५ ॥

यावरून खेचरी मुद्रा कोणीं दिली व सद्गुरू कोण या प्रश्नांचा स्पष्ट खुलासा होत आहे. खुद्द मठांत हि जी आख्यायिका आहे ती अशीः—

| श्रीज्ञानेश्वराचे | श्रीसोपानदेवाचे | व | मुक्ताईचे |
| --- | --- | --- | --- |
| \| | \| | | \| |
| सच्चिदानंद | विसोबा | | चांगदेव |

धुळें ता ८।६।१३ गो. का. चांदोरकर

## ८ श्रीक्षेत्र आळंदी येथील एक शिलालेख

श्रीआळंदी येथील श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या महाद्वारासमोर एक दीपमाळ आहे. पूर्वी ही महाद्वाराच्या अगदीं समोर होती. हल्लीं तिच्यांत व महाद्वारांत मध्यें एक इमारत गरुडपार म्हणून बांधलेली आहे. ही दीपमाळ सहाफूट उंचीच्या चबुतऱ्यावर बांधलेली आहे. इच्यांत वर शिखरावर जाण्यास आंतून चक्राकार जिना आहे. इची उंची सुमारें ३५।४० फूट असावी. तळाशीं इचा घेर सुमारें २४ फूट असावा. इचे एकंदर पांच मजले आहेत. वर दिलेली गरुडपाराची इमारत मध्यें आल्यानें सदरची दीपमाळ आतां रस्त्यावरून दिसत नाहीं. तसें च तिला जाण्याचा मार्ग हि या इमारती मुळें परक्याचे आवारांतून काढावा लागतो. ज्या दगडांनीं ही दीपमाळ बांधली आहे तो दगड साधारण असल्यानें त्याचे पोप-

* 'महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर । × × × × विश्व तारावया आलें । खेचर वंदितो पाउलें ॥' असा महाराष्ट्र महोदयाच्या पूर्वरंगांत ( पृष्ठ १० ) विसोबाचा अभंग दिला आहे. तेव्हां या दोन्ही अभंगांचा मेळ कसा घालावयाचा ? चिटणीस.

ह्लीं निघूं लागले आहेत. या दीपमाळेवर एक चार ओळींचा शिलालेख आहे. हवा व पाणी यांचे योगानें तो बरेच ठिकाणीं अगदीं दुर्बोध झालेला आहे. तो जितका लागला तेवढा खालीं देतों:—

ओळ

१ श्रीगणेशायनमः॥ कोन्होजी सरखेल पट्ट ललना लक्ष्मी

२ सती श्रीमती (॥) चक्रे ज्ञानगुरोः तु प्राप्त × ×

प्रद् × × शा

३ के बाणरसर्तुचंद्र रुधिरोद्गारी × × द्वादश्याम्

४ × × × श्रीरस्तु

हा शिलालेख जरी अगदीं थोडा लागला तरी जितका लागला तेवढा च बहुधा महत्वाचा भाग आहे. व त्यावरून असें दिसतें कीं शक १६६५ रुधिरोद्गारीं संवत्सरी—महिन्याच्या द्वादशीस सरखेल कान्होजी आंग्रे यांची पट्टमहिषी जी सती लक्ष्मीबाई तिनें श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांच्या ( प्रसादार्थ ) ही दीपमाळ बांधिली. शक १६६५ ला रुधिरोद्गारी येतो.

गो. का. चांदोरकर

## ९ शक १५९३ तील शिवरायाची एक सनद

श्री क्षेत्र आळंदी येथील श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे समाधीसंबंधीं खालीं दिलेली सनद आहे. सदरहू सनद नक्कल आहे; अस्सल नाहीं; परंतु तेवढ्यावरून शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं, कारण तिचा हवाला पुढें वेळोवेळीं या च बाबतींत ज्या सनदा दिल्या गेल्या आहेत त्या सर्व सनदांत दिलेला आहे. म्हणून ही सनद माझ्या मतें अत्यन्त विश्वसनीय आहे.

अत्यन्त जीर्ण झाल्यानें कांहीं अक्षरें दुर्बोध झालीं आहेत व घाईमुळें मला कांहीं लागलीं नाहींत; तथापि इतरत्र हीं सुबोध असून स्पष्ट अशीं आहेत. लिपी मोडी आहे हें सांगणें नको च.

तालीक

आज रव्वारवाने राजेश्री सीवाजी राजे साहेब दाम दौलत हु × × × कारकून × × × × × देशमुखानी व देसपांडेयानी व मोकदमानी व रयानी प्रांत चाकण सुहुर सन इसने सबैन अलफ श्री—याचे इनाम मौजे आलंदी प्रगणे मारी सालाबाद जि॥ जमीन मुजुरी सेत सवा दीडसे काखे खंडी १ ॥ २॥ येक खंडी अडीच मण देवाचे देवास दिधले असे कुलबाब कुलकानु दुमाले केले असे दुमाला करणे यासी काडीचा तोसीस न लावणे सल करी अगरकोण्ही इस्फील न करणेसदरहू सल बाद × × ( घेणे ? ) देवाचे देवास चालवणे साल दरसाल चालवीत जाणे ताजा सुर्द सतमचा उजूर न करणे हिंदु होऊन इस्कील करील त्यास गाईची आण असे मुसलमान होऊन इस्कील करील त्यास सोराची आण असे लिहिले प्रो चालवणे तालीक घेऊन असल फिरावून राजेश्री रामानंद गोसावी तपस्वी यापाशी देणे

या सदनेसंबंधी व ज्या इतर सनदांत इचा हवाला आलेला आहे त्या संबंधीं लवकरच एक सविस्तर लेख पुढें देण्याची मी इच्छा करतों.

गो. का. चांदोरकर

## १० भक्ति(क्त)राज हा ग्रंथ कोणाचा ?

कोणाचा ? म्हणजे ज्ञानदेवाचा; असें झट्दिशीं उत्तर येईल. परंतु दुसरा प्रश्न तितका च झट्दिनीं येतो कीं हे 'ज्ञानदेव' कोणते ? या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर मात्र जरा कठीण आहे, त्याचा थोडासा प्रयत्न करतों.

( १ ) 'वामनांनीं ' आपल्या यथार्थदीपिकेंत प्रारंभीं सगुण सोडून निर्गुणाकडे वळणारे म्हणजे पर्यायें उपासना टाकून ज्ञानाची कास धरणारे यांच्या संबंधीं अत्यन्त अनुदार असे उद्गार काढले आहेत व ते उद्गार जगद्वंद्य अशा श्रीज्ञानेश्वर महाराजांस अनुलक्षून आहेत अशी समजूत आहे.

( २ ) अलीकडील वारकरी—माझें, म्हणणें फक्त आधुनिक वारकऱ्यांबद्दलचें आहे. या औदासिन्याचे काळांत सर्वच पंथ आपापल्या पूर्व उज्वल रूपापासून भ्रष्ट झाले आहेत तेव्हां वारकरी च तेवढे मी निवडून काढतों

असें समजूं नये, फक्त वस्तुस्थितीचें निदर्शन करणें जरूर असल्यानें तस लिहित आहे—'श्रीज्ञानेश्वर तुकाराम' म्हणतात परंतु श्रीज्ञानदेवींचा पाठ फक्त ९ वे व १२ वे अध्यायापुरताच करतात ते दोन्ही अध्याय 'उपासना व भक्ति' (उपासनाच) यांचें विवरण करणारे आहेत. (वारकऱ्यांच्या संग्रहीं एवढे दोन च अध्याय सांपडतील) यावरून श्रीज्ञानेश्वरी ही ज्ञानप्राधान्य आहे हें उघड आहे.

(३) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा 'हरिपाठ' जो कोणी मननपूर्वक वाचील त्यास 'सर्वभूतीं अभिन्न जें चैतन्य' तो च 'हरि' व त्या हरीचें स्मरण ज्यांत तो 'हरिपाठ' असें स्पष्ट दिसून येईल. ह. भ. प. विष्णुबुवा जोग यांचे नजरेस हें येऊन च कीं काय त्यांनीं 'सगुण हरि अगर विठ्ठल' यांच्या वर्णनात्मक श्रीतुकाराममहाराजांचा एक अभंग शेवटीं या हरिपाठांत उगीच च घुसडून दिला आहे. श्री ज्ञानेश्वरमहाराजांचा 'हरिपाठ' हा निर्गुण हरीचें स्तुत्यात्मक स्तोत्र आहे यांत शंका नाहीं.

(४) एकनाथमहाराज श्रीज्ञानेश्वरांबद्दल म्हणतात

॥ ज्ञानदेव ज्ञानदेव म्हणतां ज्ञान देतो ॥

व सगुणोपासकांत श्रेष्ठ जनाबाई म्हणतात.

ज्ञानियांचा राजा । ज्ञानदेव सखा माझा ॥,

यावरून व अन्य हि आणखी कित्येक अनुक्त उदाहरणांवरून श्रीज्ञानेश्वर हे निर्गुणोपासक होते, असें दिसतें.

अभिन्नदृष्टीनें सर्वभूतीं जें पूजन तीं च खरी भक्ति या अर्थाचें श्रीज्ञानेश्वरींत भक्तीचें लक्षण आहे.

तेव्हां निर्गुणपर भाक्तिराज (भक्तराज ?) हा ग्रंथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा च असावा असें दृढतेनें एक वेळ वाटतें.

हा ग्रंथ वर वर वाचणारास हि असें दिसून येईल कीं नांव जरी 'भाक्तिराज' असें आहे तरि त्या ग्रंथांत सर्वत्र ब्रह्माचें च वर्णन असून खरें खरें 'भज्य' तें च आहे.

येक जळ अनंत घटीं । येक रवि प्रतिबिंब कोटि ।
तैसें एक ब्रह्म सकळ सृष्टी । रचिलीं असे ॥ २०७ ॥
येकी माया अनंत शक्ती । येकी देव अनंत भक्ती ।
येकी बुद्धि अनंत वृत्ती । उठति देहीं ॥ २१० ॥

अविद्या च अन्यथा ज्ञानें । नाथिलें दिसें द्वैतपणें ।
हे येके भक्तिज्ञानें । वांचुनी न कळे ॥ २५३ ॥

अशा या ब्रह्माची उपासना करणेबद्दल भक्तिराजांत उपदेश आहे. अत्यन्त मार्मिक असे दृष्टान्त व त्यांची सर्वत्र रेलचेल ही श्रीज्ञानेश्वरांची पद्धत च भक्तिराजांत आहे. इतकेंच नाहीं तर कांहीं कांहीं दृष्टान्त तर अगदीं ते च--श्रीज्ञानेश्वरींतील अथवा अमृतानुभवांतील--आहेत.

पहाः--

दो नेत्रीं येक देखणें । दों करीं येक करणें ।
दो कानीं ऐकणें । येक नादु ॥ २४२ ॥
दोन पाई येक चालणें । दो होटीं येक बोलणें ।
तैसें द्वैतभावो पाहणें । येकपण न घडे ॥ २४३ ॥

त्याचप्रमाणें नरदेहाचें वर्णन हें हि श्रीज्ञानेश्वरींतील वर्णनाबरहुकुम आहे.

यावरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा च हा ग्रंथ निःसंशय असावा असें प्रथम वाटतें परंतु एका ओवीवरून शंका येते; ती ओवी अशीः--

हा डोळियांचा डोळा । हा चि सुखाचा सोहळा ।
याचिये तुकें तोळा । हा चि येकु ॥ २९९ ॥
गीता ज्ञानदेवांदिका । संकृताची ऐका ।
श्रीकृष्णें अर्जुनीसा देखा । हें चि निरोपिलें ॥ ३०१ ॥

या ३०१ वे ओवीवरून फार मोठी शंका येते कीं हा ग्रंथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा नसावा. येरव्हीं आपैले स्वतःबद्दल असा उल्लेख महाराज करते ना! ओवीचा अर्थ उघड आहे व तो स्पष्ट व्हावा म्हणून मागील एक ओवी मुद्दाम जास्त दिली आहे. तेव्हां ' ज्ञानदेवांदिका ' असा प्रयोग महाराजांनीं स्वताबद्दल करणें हें कधीं हि शक्य नाहीं.

दुसरें एक याहून बलवत्तर कारण शंका येण्यास आहे तें हें कीं, महाराजांनीं आरंभीं अगर शेवटीं कोठें हि आपल्या परमप्रिय व परमपूज्य गुरूंचें- श्रीनिवृत्तिनाथांचें—नामनिदर्शन केलेलें नाहीं. कित्येकांस हें कारण विशेष महत्वाचें वाटणार नाहीं परंतु माझ्या मतें हें अत्यन्त महत्वाचें कारण आहे. श्रीज्ञानेश्वरीच्या १३ वे अध्यायांतील ' आचार्योपासनम् ' या पदावरील व्याख्यान जो सहृदय भक्त वाचील त्यास श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडून श्रीगुरूंचा नामनिर्देश होणार नाहीं ही अशक्यांतील एक अशक्य गोष्ट आहे हें कबूल करावें लागेल. आपल्या गुरूंचा नामनिर्देश नाहीं असा एक हि ग्रंथ महाराजांचा--याव्यतिरिक्त

—नाहीं. तेव्हां या च ग्रंथांत नमन नाहीं केलें किंवा स्मरण नाहीं केलें असें कसें म्हणतां येईल ? मग हा ' भक्तिराज ' ग्रंथ कोणाचा ? दुसरे ज्ञानदेवाचा ?

धुळें आषाढ शुद्ध १८३५ गो. का. चांदोरकर

# ११ मानभावी लिपि अशुद्ध

ही मानभावी पोथी श्रीमंत मुजुमदार यांजकडून आली. शक १८३२ च्या अहवालांत जो मानभावी संकेत दिला आहे, तो च ह्या पोथींत आहे. इतकें च कीं अधूनमधून खऱ्या उच्चाराचीं देवनागरी अक्षरें लेखक वाटेल तेव्हां घालतो. पोथीचा लेखक अगदीं अडाणी असून, लिहिण्याच्या कामांत नवशिका आहे. त्याची भाषा व उच्चार अगदीं गांवढळ आहेत. १८३२ च्या अहवालांत संकेताची सबंद किल्ली
१० ] दिली नव्हती ती येथें देतों. *

| | | |
|---|---|---|
| क=य | च=प | ट=त |
| ख=० | छ=फ | ठ=थ |
| ग=ल | ज=ब | ड=द |
| घ=व | झ=भ | ढ=ध |
| ङ | ञ=म | ण=न |
| त=ट | प=च | य=क |
| थ=ठ | फ=छ | र=ख |
| द=ड | ब=ज | ल=ग |
| ध=ढ | भ=झ | व=घ |
| २० ] न=ण | म=स | श=ष |
| | | ःऋ=र |
| स=अ | सा=आ | ऊ=ऊ |
| ष=शं | इ=इ | ए=ए |
| ह=ह | ई=ई | ऐ=ऐ |
| ळ=ळ | उ=उ | ओ=ओ |
| | | औ=औ |

वि. का. राजवाडे

---

* पहिलें अक्षर सांकेतिक व दुसरें प्रचालित असें समजावें.

# १२ लीळासंवाद

मानभावी सांकेतिक लिपि ( दुसरा प्रकार )

१ शके १८३२ च्या अहवालांत एका मानभावी सांकेतिक लिपीची फोड दिली होती. त्याहून निराळी दुसरी एक सांकेतिक लिपि नुकती च मला उपलब्ध झाली. पुणें येथील आनंदाश्रमांत एक मानभावी ग्रंथ सांकेतिक लिपींत लिहिलेला होता. तो तेथें " अनिर्वचनीय ,' या सदराखालीं पडला होता. ग्रंथाच्या पहिल्या पानाच्या पाठीवर " नं. ४३५१, किंवा ४३, किंवा ५१ " असा ग्रंथाचा अंक पेणशिलेनें लिहिला असून, शाईनें " अनिर्वचनीय पुस्तक " असा ग्रंथाचा नामनिर्देश केला आहे. आश्रमांत आलेल्या ग्रंथांची विल्हे करणाऱ्या कोण्या तरी शास्त्र्याची ही मखलाशी असावी. सांकेतिक लिपींत लिहिला गेल्यामुळें कोणत्या विषयावरील ग्रंथ आहे याचा उलगडा करतां आला नाहीं; सबब, बिचाऱ्या शास्त्र्यानें प्रस्तुत ग्रंथाची गणना महामायेच्या नांवानें केली आहे. जें समजत नाहीं तें अनिर्वचनीय होय; अर्थात् महामाया होय, अशी समजूत आज हजारों वर्षे अनेक लोक या देशांत करीत आले आहेत. त्यांतला च हा शास्त्री दिसतो. असो. शास्त्र्याच्या नांवानें खडे फोडण्यांत वेळ घालविण्यापेक्षां मूळ ग्रंथाकडे वळणें हितकर आहे.

२ ग्रंथाच्या पानाची लांबी मध्यम प्रमाणाच्या विती एवढी आहे. रुंदी सात साडेसात अंगुळें आहे. एकंदर पानसंख्या २४४ आहे. दरपृष्ठास ओळी १६ पासून १८ आहेत, अक्षराच्या व विरामांच्या खुणा सरासरीनें दर ओळींत चाळीस बेचाळीस आहेत. सर्व खुणा देवनागरींत असून अक्षरांना मथळ्याच्या रेघा नाहींत; गुजराथींतल्या-प्रमाणें अक्षरें बिनरेघांचीं आहेत. अक्षरांची ठेवण तीनशें वर्षांपूर्वीची आहे.

३ एकशें सत्ताहत्तराव्या पानाच्या शेवटीं खालील ओळ लिहून खोडिली आहे:—

॥ तर्नें १६११ क्यवोग तंमस्तये अंथाढांसे सीह्र अवामात्रे
तन्य गीत्रे सुसद्धि क्यणये चिथ्रसं तवाद्दं ॥ छ ॥ छ ॥

म्हणजे:—

सर्के १६११ प्रमोद संवत्सरे
अखाडांते तिथ्य अमावास्ये
सुक्र दीने तृतीय प्रहरे
लिखतं समाप्तं ॥ छ ॥ छ ॥

अर्थात् हा ग्रंथ शक १६११ त नकलला आहे. नकलून आज बरोबर २२४ वर्षे झालीं. मूळ रचला कधीं तें सांगण्यास सध्यां गमक मला उपलब्ध नाहीं.

४ ह्या ग्रंथांतील अक्षरसंकेताची फोड एणेप्रमाणें:—

क = प
ख = ०
ग = द
घ = फ
ङ = ब्द
च = ल
छ = थ
ज = ग
झ = च
ञ = न
ट = ठ
ठ = ट
ड = ळ
ढ = ड
ण = ह
त = स
थ = ख
द = श
ध = भ
न = क
प = ज
फ = झ
ब = छ
भ = ध
म = व

य = र
ल = ष
व = म
श = ब
ष = ण
स = त
ह = घ
ळ = ढ
क्ष = ज्ञ, ग्न
ज्ञ = क्ष
ऽ = श
६ = प्त
विसर्ग = अक्षराच्या पुढें टिंब
अ = अं
आ = आं
इ = उ
ई = ऊ
ओं, उ = इ
ऊ = ई
लृ = ऋ
ए = अे
ऐ = अै
ओ = ए
औ = ऐ

बाराखडींतील व्यंजनाखालील उकार खुणेच्या खालीं. असें टिंब देऊन केलेला आहे. ख ह्या बाळबोधी अक्षराला ह्या सारणींत किंमत नाहीं. आंकडे रोजच्या प्रमाणें आहेत.

५ ह्या " अनिर्वचनीय " ग्रंथाचें नांव लीळासंवाद. ह्यांत मानभावांचा मुख्य अवतार जो चक्रधर त्याच्या एकंदर ४०६ लीळा वर्णिल्या आहेत. ४०७ वी लीळा अर्धी च लिहावयाची राहून शेवटल्या पानाचें पोट समाप्त झालें आहे. अर्थात् ग्रंथ अपूर्ण आहे. पुढें आणीक किती लीळा वर्णावयाच्या राहिल्या आहेत, तें ह्या ग्रंथाची दुसरी एखादी पूर्ण प्रत हस्तगत होईल तेव्हां कळेल. ग्रंथाचा प्रारंभ एणेप्रमाणें:—

॥ कीत्रत्छडील्छिसकंढिसनेदमगेमकूर्सागर्भचीझतंमाग : ॥

म्हणजे:—

॥ छीनस्थळीस्थितपंडितकेशवदेवपूर्वार्द्धलीळासंवाद: ॥

लीळांचा आंख ३११ पर्यंत बरोबर लिहून ३१२ वा आंख १३२ असा लिहिला आहे व पुढें २२६ पर्यंत अशी च गणना केली आहे. म्हणजे एकंदर लीळा ४०७ आहेत, २२७ नाहींत.

६ लीळांत ऋद्धपुर, पैठण, देगांव, देवगिरी, वोरंगळ, एळापुर, मातापुर, आंध्रदेश, गुजराथ, द्रविडदेश, वडनेर, अळजपुर, वगैरे अनेक गांवांचीं व देशांचीं नांवें आलीं आहेत. चक्रधराच्या लीळा म्हणजे चक्रधरानें केलेले चमत्कार. या ४०७ चमत्कारांतून एक चमत्कार मासल्याकरितां येथें देतों.

( पान १९१ पोट ) ( लीळा ३३९ ) ( चुकीनें १३९ )

॥ : ध : उंग्यधठनठनाक्यरुथ : ॥

---

नठनीं वणागेमयारासें थाग्भ : ा : नयंपथेढिझें : ब : गात्राति ञिजाचे : सें उंग्यधटीं आउनिचें : ऽ : से पामों यिजाचे : वणागेमयामो नठनीं थाग्भ नयीस णोसा : अैता तबउं उंग्यधठ जीयाउतासें हेइत्रि नठना जोगा प्राति गात्र हेमो ञिजाचे : ग्गि : धों : उंग्यधठांसें : ४ : सा : उंग्यरा नठना पा वणागेमयारासें थाग्भ : समं उंग्यधटीं : उं : पी : पास अते नीं : धों ४ : मा सवणीं णीं पा : धीं : उं : पी : वीं दठ वीं सेछ पाहात्रि नाउ नयं ५ : वी त्रनभा दठ गेमो नाणीं : त्ज : त्रेत्रे : ४ वा पें झिरोति पेसनें

गेसी : सैतें ाझ सेसनें सव्गांति गेसी : सबसें वृथ किंसायिरा नयिसी : धीं :
उं : पी : आवसें कयिझे मिष वृथ किसयिरा नैतें नयिसी : पी : आव्णीं :
दृठ देमो : नांगीं : त्ज : ञेञों नीं : आव्णीं ञतृभे मेगकाटन : ४ : पा :
अैछीञ भाढिपस अतिपे नीं : धीं : उं : पीं : ४ : मय गिभचा : स :
णो नां : पी : पाउञ : ञ : नाउ जी : ाै : ऽ : ध : उंग्यधठ नठनाति
जेचे : वणागेमयारासें याग्भें णोस णोसें : सेछ जेचे : याराति आदी-
मीग नयूषि शैतचे : यारें : उं : णें नमष : उंग्यधठीं : उं : णे कृयनय
ञाजगेमधठ : आव्णीं : स : ताढेजांमंनय उंग्यधठ : ऽ : वणागेमयारें : उं :
णे ऽ ञाजगेमधठ नाउकृयनय मावञाझाराझे : वां : झे कषस : उंग्यधटीं :
उं : णो नां : यारें : उं : स : णे रोञ : त : ऽ : यारें : त्न : यूञि : धा :
१०] उंग्यधटासें वृथ किसय नेचें : कयोणिसीं याग्भसिभि नेचा : ऽ : आउञ
आबागञ शयमें नयूषि : ऽ : सेणीं सराति गझिषेति ताठि ताठि आसू :
ऽ। : सीत सीत आदृगाञा गिभचिरा : उंग्यधठ मित्वरो नर्थीसि : धी :
उं : णें तावछ : ४ां : झरा मयगाझें : ऽ : से वाजौसे सें ग्यम्र हेइञि :
४ां : काति नयंपथेढाति आचे : गों: ओ : शैतचे : ञा : ग्यम्र टेइञि अमहें
झि तांहिसचें : पी : अेनअेनाति ताठि ताठि आ. गिभचिरा : ऽ : ४ :
सेराझें ग्यम्र सराति गिभचें : ऽ : धीं : उंग्यधठीं : ४ां : झा ठाउं शयमे
गोञि : ऽऽ : नेचे : ऽ : ध : सें ग्यम्र हेइञि जामां ञिजाचें : हयीं मेझ
टेइञि सैते झि : ४ां : झरा : दीं : वाजौसे आचे धेठि पाची : गो : ओ :
उ : : ति शैतचे : ॥ १३९ ॥*

२० ]

## संकेताचा तर्जुमा

॥ : भ : इंद्रभट कटका प्रयूख ॥

कटकीं महादेवरायातें श्राद्ध : ाै : करंजखेडिचे : ब्राह्मण : दानासि निगाले : तें इंद्रभटीं आइकिलें : ऽ : ते जावों रिगाले : महादेवरावो कटकीं श्राद्ध करीत होता : ऐसां समइं इंद्रभट गौराइसातें घेउनि कटका गोदानासि दान घेवों निगाले : व्हि : भों : इंद्रभटातें : ४ : ता इंद्रय कटका जा महादेवरायातें श्राद्ध : तवं इंद्रभटीं : उ : जी : जात असे कीं: भों : ४ : वा : तुम्हीं हीं जा : भीं : उ: जी : मीं शठ मीं तेथ जाउनि

* या लेखांत अक्षरांना शिरीची रेघ नाहीं असें समजावें.

काइ करु जी : मी नसुधा शठ देवो काहीं : स्ग : नेनें : ४ : मा जें चियांसि जेतुकें देती : तैसें चि तेतुकें तुम्हांसि देती : तुमतें मुख्य पितरिया केरिती : भीं : उ : जी : आमतें परिक्षे विण मुख्य पितरिया कैसें करिती: जी : आम्ही : शठ देवो : कांहीं : स्ग : नेनों कीं : आम्हीं नसुधे वेदपाठक : ४ : जा : एथौनि धाडिजत असिजे कीं : भीं : उ : जी : ४ : वर दिधला : त : हो कां जी : जाइन : न : काइ जी : ीं : ऽ : भ : इंद्रभट कटकासि गेले : महादेवरायातें श्राद्धं होत होतें : तेथ गेले:रायासि आशीर्वाद करूनि बैसले : रायें : उ : हें कवण : इंद्रभटीं : उ : हे पुरकर नागदेवभट : आम्हीं : त : साडेगांवंकर इंद्रभट : ऽ : महादेवरायें : उ : हे ऽ नागदेवभट काइपुरकर वामनाचार्याचे : मां: चे पणतु:इंद्रभटीं:उ: हो कां : रायें : उ : त : हे योग्य : स : ऽ : रायें : स्क : रूनि : भा : इंद्रभटातें मुख्य पितर केलें : पुरोहितीं श्राद्धविधि केला : ऽ : आळन आछादन बरवें करूनि : ऽ : तेहीं तयासि दक्षिणेसि साठि साठि आसु : ऽ ा : तीस तीस आसुदाना दिधलिया : इंद्रभट विस्मयो करीति : मी :उ : हें सामर्थ : ४ां : चया वरदानें : ऽ : हे मागौते हें द्रव्य घेउनि : ४ां : पासि करंजखेडासि आले : दों : ऐ : बैसले : ना : द्रव्य ठउनि अवघें चि सांघितलें : जी : एकएकासि साठि साठि आसु दिधलिया : ऽ : ४ : तयाचें द्रव्य तयासि दिधलें : ऽ : भीं : इंद्रभटीं : ४ां : चा टाइं बरवें दोनि : ९ऽ : केले : ऽ : भ : तें द्रव्य घेउनि गांवा निगाले : घरीं वेचु ठेउनि तैसेचि : ४ां : चया : र्गा : मागौते आले भेटि जाली : दो : ऐ: उ:ल : पासि बैसले : ॥१३९ ॥

ह्या उताऱ्यांत दोन दोन शून्यांच्या मध्यें एकेकटीं अक्षरें आहेत. ते, अथात् सबंद शब्दांचे संक्षेप आहेत. त्यांची फोड अशी:—

| | |
|---|---|
| भ = भट | ४ = चक्रधर |
| ब्र = ब्राह्मण | दो = दोघ |
| व्हि = तेव्हळि | ऐ = ऐसे |
| भीं = भटीं | स्क = सत्कार |
| ४ = चक्रधरें ( चक्राची खूण ) | त = तथा |

उ = उत्तर केलें, प्रश्न केला, उत्तर दिलें.
भीं = भटीं
ध्रां = चक्रधरां
स्ग = स्क बद्दल चुकून
र्गा = मार्गी
ल = लक्ष्मी
र्दा = दर्शना

शक ११८२ पासून शक ११९३ पर्यंत देवगिरीस राज्य करणाऱ्या महादेवराव यादवाच्या काळाला अनुलक्षून ही लीळा आहे. चक्रधर महादेव यादवाच्या वेळीं होता. त्याचे शिष्य इंद्रभट व नागदेवभट. ते कटकास म्हणजे देवगिरीच्या खालील नगरास महादेवरायाच्या येथें श्राद्धास गेले. देवगिरीच्या खालील नगरास त्या काळीं कटक अशी संज्ञा होती असें दिसतें. ह्या कटक शब्दाचे खडक, खडकी हे मुसुलमानकाळचे अपभ्रंश होत. कटक–खडक–खडकी म्हणजे सैन्याचा तळ पडून बनलेलें शहर होय. स्कंधावार या शब्दापासून खंदार हा नगरवाचक शब्द जसा निघाला आहे. तसा च कटक या शब्दापासून खडक–खडकी हा नगरवाचक शब्द निघाला आहे. खंदार हें नगर निझामशाहींत सध्यां आहे. खडकी हें नांव दौलदाबादेला हि आहे व औरंगाबादेला हि आहे. देवगिरी हें किल्ल्याचें नांव आणि कटक हें किल्ल्याखालीं सैन्याचा कायमचा तळ पडून बनलेल्या शहराचें नांव.

महादेवरायानें इंद्रभटास श्राद्धसमयीं मुख्य पितर केलें व त्याला साठ आसू व तीस आगुदाना दक्षिणा दिली. आसू व आगुदाना हीं दोन नाणीं सोन्याचीं व रुप्याचीं अशीं दोनी धातूंचीं असावीं. पैकीं असू हा शब्द पाटण येथील भास्कराचार्यांच्या नातवाच्या शिलालेखाच्या मराठी भागांत येतो. आगुदाना हा नाण्याचा वाचक शब्द या लीळेंत नवीन च भेटला आहे. त्यावेळचें गद्यान हें नाणें प्रसिद्ध आहे. परंतु आगुदाना हें नाणें मी प्रथम च ह्या लीळेंत वाचलें.

७ महादेवराव यादवाचे उल्लेख ह्या ग्रंथांत पांच पंचवीस स्थळीं आले आहेत. कारण, चक्रधर आपल्या लीळा या राजाच्या कारकीर्दींत करूं लागला. महादेवाचे 'राजिके, राणे, राऊत; पाइक, मानकरी" इत्यादि राजसभेचे सर्व लोक चक्रधराच्या नादीं लागल्याचा उल्लेख १२८।१२९।१३०।१३१ ह्या लीळांत विस्तारानें आला आहे. एकटा महादेवराय व त्याचा प्रधान हे दोघे मात्र चक्रधराच्या विरुद्ध होते. ह्या विरोधासंबंधानें लिहिताना लीळारचणार म्हणतो:— '**महादेवरावो राजधर्म जाने; कान्हरदेवो आस्तिकु; पुढां रामदेवराजा.हो इल तो निःःपरवश.**" म्हणजे कृष्णदेव, महादेव, महादेव व रामचंद्र या तीन यादवांचा उल्लेख लीळारचणार करितो. त्यांत रामचंद्राला तो निःशेष परवश म्हणजे अत्यंत

परावलंबी म्हणजे दुसऱ्याच्या बुद्धीनें चालणारा किंवा शत्रूंच्या अंकित या विशेषणानें संबोधितो. ज्ञानेश्वर रामदेवाला न्यायाचें पोषण करणारा ठरवितो. परंतु, हा लीळाकार त्याला परतंत्र ऊर्फ कमकुवत म्हणतो. हें गुणवर्णन चिंत्य आहे. कृष्णदेव, महादेव, व रामचंद्र यांच्या कारकीर्दींत हा एकवर्णी मानभावपंथ फार वाढला. त्यामुळें, प्रजेंत दुफळी होऊन दुर्बलता आली असण्याचा संभव आहे. पण, मानभावांचे इतर जुने ग्रंथ पाहावयास व मनन करावयास मिळाल्यावांचून, ह्या महत्वाच्या बाबीसंबंधानें स्पष्ट मत प्रदर्शवत नाहीं.

८ चक्रधरानें नाशिक, त्रिंबक, पंचवटी वगैरेंची यात्रा केली. तिचें वर्णन करतांना, लीळाकार नाशिक, पंचवटी व त्रिंबक येथील सुंदरनारायण, पंचायतन, राम, लक्ष्मी, घाट, वगैरेंचे उल्लेख करितो. त्यावरून नाशिकचीं तीनशें वर्षांपलीकडील, [१० कदाचित् सातशें वर्षांपलीकडील, देवस्थानें कोणतीं होतीं तीं कळण्याला अवकाश होतो. नाशिकच्या यात्रेच्या वर्णनांत आलेल्या देवालयनामांचा व तीर्थांचा निर्देश येथें करणें अयुक्त होणार नाहीं.

१ भोगरीं सोमनाथ २ जोगेश्वरी ३ तेथौनि नासिकासि ४ तेथ महालक्ष्मीचें देऊळ ५ पंचवटिये रामनाथ ६ दोन गुंफा, एक पूर्वमुख, एक उत्तरमुख ७ आदित्याचें देऊळ ८ तेथ महालक्ष्मीचें देऊळ ९ गणेशाचें देऊळ १० एकवीरेचें देऊळ ११ सोमनाथाचें देऊळ १२ कपाळेश्वर १३ कपाळेश्वराच्या उत्तरेस गुंफा, पूर्वेस गुंफा, दक्षिणेस गुंफा १४ वरुणासंगम १५ शाळा १६ हाट १७ हाटीं देऊळ १८ चास १९ ढग २० जळसेन २१ घाट २२ पांचायतनः—एकवीरा, विनायक, केशव, महादेव, आदित्य २३ सुंदराचें देऊळ २४ नासिकीहूनि गोवर्धनासि २५ [२० तेथ गदाधरीं २६ भैरवाचें देऊळ २७ घाट २८ गंगा २९ अजनेरी ३० तेथ बौद्धाची घुसे ३१ तेथोनि त्र्यंबक ३२ त्र्यंबकाचें देऊळ ३३ मांधानीचें उदक ३४ लिंगत्रय ३५ जगती बाहेर मठ ३६ गौतमाळ ३७ त्र्यंबका पश्चमे जगती आंतु विहीर बाहीर गुंफा ३८ गंगाद्वार ३९ कुशावर्त्त ४० गंगाळें ४१ रामतीर्थ, लक्ष्मणतीर्थ ४२ रामविहिरा, लक्ष्मणविहिरा ४३ कोळाइचा घाट ४४ गंगाद्वार ४५ कोळाइच्या उत्तरेस नरसिंहीं ४६ मठाची पटिशाळा ४७ धाकुटें कुंड ४८ कोळाइच्या बोंबींतून पाणी निघत असे ४९ सीतेचे कोथळे मोथळे ५० तेथौनि कोंकण व समुद्र

कोंकणाचा उल्लेख करतांना लीळाकारानें परशुरामाचा हि उल्लेख केला आहे व तेथील कांहीं लोकांना यज्ञोपवीत घालून परशुरामानें ब्राह्मण बनविलें असें म्हटलें आहे. [३०

९

९ मानभावांचा व्याप अफगानिस्तान, काफरिस्तान, पंजाब, माळवा, नागपूर, खानदेश, वऱ्हाड, गोदातीर, अहमदनगर, पुणे, सातारा, विजापूर, सोलापूर, वोरांगळ, ह्या प्रांतांत फार आहे; कोंकणांत मुळींच नाहीं. अफगानिस्तानांतून व खैबरखिंडींतून येणाऱ्या अविंधांशीं या लोकांचा कांहीं तरी संबंध असावा, असा संशय येतो. देवगिरीच्या यादवांच्या विरुद्ध हे लोक होते. त्या काळीं माळव्यांत, पंजाबांत व अफगानिस्तानांत यांचा रिगाव होता कीं नव्हता, वगैरे अनेक बाबी कळण्यास, या लोकांचे अत्यन्त जुनाट लेख उपलब्ध झाले पाहिजेत, इतकें च नव्हे, तर सध्यां ज्या ज्या प्रांतांत हे लोक हिंडतात त्या त्या प्रांतांत शोधकांनीं जाऊन, यांच्या पूर्वेतिहासाचा व हालचालीचा व पंथप्रसाराचा सानुभूतीनें व स्वतंत्रपणें अभ्यास व चिंतन केलें पाहिजे. बसवाच्या लिंगायतपंथानें कल्याणीच्या कलचुरींच्या राज्यांत बखेडा केला. मुसुलमान अवरंगझेबाच्या राज्यांत नानकाच्या शीकपंथानें घालमेल केली. तशी च कांहीं घालमेल चक्रधराच्या मानभावपंथानें रामदेवराज्याच्या कारकीर्दींत केली असल्याचा संभव फार दिसतो. ह्या लीळासंवादांत महादेवरायाचे सर्व लोक चक्रधराच्या नादीं लागून, राजाला अपमानित झाले, असें वर्णन आहे. ह्याचा अर्थ काय ? नीट उत्तर देण्यास, मानभावांचे अत्यंत जुने लेख सांपडले पाहिजेत. यादवांच्या अखेरीच्या इतिहासावर मानभावग्रंथांच्या साहाय्यानें जास्त प्रकाश पाडितां येईल असें अनुमान करणें अयुक्त नाहीं.

१० मानभावांचा हा लीळासंवाद ग्रंथ त्यांच्या च लीळाचरित्र ग्रंथाहून निराळा आहे. लीळाचरित्रांत महादेवराय यादव, रामदेवराय यादव, वगैरेंच्या संबंधानें कांहीं उल्लेख आहेत, म्हणून कित्येक मानभाव सांगतात. यादवांच्या पदरच्या दोन चार मराठी कवींची हि हकीकत एका मानभावानें मला कोणच्याशा मानभावी ग्रंथांतून वाचून दाखविली. तो ग्रंथ वाचावयास मला द्या, असें त्या वेळीं त्या मानभावास मीं म्हटलें. परंतु, तो ग्रंथ मानभावेतरांना वाचण्यास देतां येत नाहीं, असें त्यानें मला उत्तर दिलें. शिवाय, असें हि बजाविलें कीं, ग्रंथ सांकेतिक लिपींत लिहिलेला आहे, तेव्हां मला तो वाचतां येणार नाहीं. तें हि खरें च होतें. हा प्रसंग होऊन, तीन चार वर्षें लोटल्यावर, गेल्या महिन्यांत श्रीमंत सरदार खंडेराव मेहेंदळे यांजकडे उकलण्याकरितां लीळासंवाद नामक प्रस्तुत सांकेतिकलिपिनिविष्ट ग्रंथ आनंदाश्रमाचे व्यवस्थापक रा. रा. हरि नारायण आपटे यांजकडून आला. तो त्यांनीं कृपाळूपणें माझ्या स्वाधीन केला. इतिहासदृष्टीनें, लोककथादृष्टीनें, चमत्कारदृष्टीनें, धर्मदृष्टीनें, भाषादृष्टीनें वगैरे अनेक दृष्टींनीं ग्रंथ प्रसिद्ध करण्या लायक आहे. ग्रंथाची भाषा एकनाथकालीन आहे. कदाचित् मूळ ग्रंथ एकनाथकालाच्या बराच

पूर्वी रचिला असण्याचा संभव फार आहे. भाषाशास्त्रोपयोगास व इतिहासोपयोगास मानभावग्रंथांच्या अत्यन्त जुन्या अशा हस्तलिखित प्रती मिळाल्या पाहिजेत. मग त्या वाटेल त्या संकेतांत लिहिलेल्या असोत. एका मनुष्यानें बनाविलेला संकेत प्रायः दुसऱ्या मनुष्याला प्रयत्नांतीं उलगडतां येतो, ही अनुभवाची व प्रत्यक्षाची गोष्ट आहे.

मानभावांच्या सुमारें १२।१५ सांकेतिक लिपी आहेत. पैकीं दोन सध्यां आपल्याला सुटल्या आहेत. उत्तरोत्तर ग्रंथ जसजसे मिळतील, तसतशा बाकींच्या हि सुटतील. परंतु या लोकांचे ग्रंथ मिळतां मिळतां तपेचीं तपें लोटतात व प्रगति फार मंदगतीनें होते. एका वर्षाचें काम शंभर वर्षांनीं होतें. ह्यांचा आत्मा अमर असल्यामुळें कोणतें हि काम धीरें धीरें करण्याची तर संवय ह्यांना लागली नसेल ना !

वि० का० राजवाडे

# १३ अकरा

एक = एक, येक

प्रायः प्राकृतांत द्विवचन नाहीं. तेव्हां द्विचें अनेकवचन, द्वीनि नपुंसक-लिंगें करून ;

द्वीनि = दोण्णि = दोनि = दोन
त्रीणि = तिण्णि = तीनि = तीन
चत्वारि = चत्तारि = चआरि = च्यारि = चार
पंच = पांच
षष् = छा = सा = साहा
सप्तन् = सत्त = सात
अष्टन् = अट्ठ = आठ
नव = नौ, नऊ
दशन् = दह = दहा

येथपर्यंत संस्कृतांतून महाराष्ट्रीद्वारा व अपभ्रंशद्वारा एकपासून दहापर्यंत मराठींत आंखाचीं नांवें नियमाप्रमाणें निष्पन्न होतात. ह्यांच्या निष्पत्तीसंबंधानें कांहीं एक अडचण नाहीं. पण, संस्कृत एकादश पासून मराठी अकरा कसा निघतो, हा प्रश्न आहे. एकादश या संस्कृत शब्दाचें नियमांप्रमाणें एआअह असें रूप व्हावें. परंतु, तें तसें होत नाहीं; एआरह असें होतें. अपभ्रंशांत एग्गारह असें रूप आढळतें. आाण वर्तमान मराठींत अकरा असें रूप आढळतें. अर्थात् महाराष्ट्री एआरह संस्कृत एकादश पासून निघालेला नाहीं. मध्यें र कोठून आला ? अपभ्रंश एग्गारह महाराष्ट्री एआरह पासून आला नाहीं. कारण महाराष्ट्री एआरह चें अपभ्रंशांत एआग, आरा, एरा अशीं रूपें व्हावीं. तसा कांहीं एक प्रकार न होतां, एग्गारह असें अपभ्रंशांत रूप आढळतें. तेव्हां, अपभ्रंश एग्गारह महाराष्ट्री एआरह व संस्कृत एकादश यांपासून निघालेलें नाहीं. मराठी अकरा अपभ्रंश एग्गारह पासून निघूं शकेल. एग्गारह=एकारा = अकारा = अकरा. पण अपभ्रंश एग्गारह तरी कोठून आला ? मध्यें र कोठून आला ? खुद्द संस्कृत एकादश शब्द कसा निष्पन्न झाला ? एक + दशन् = एकदशन् व्हावें; पण वस्तुतः एकादशन् होतें. क चा का काय म्हणून झाला ? पाणिनि एवढें च सांगेल कीं एक व दशन् यांचा समास होतांना क तील अ चा आ होतो. कशाचें काय होतें, एवढें च पाणिनि सांगेल. पण कां होतें, हें पाणिनि सांगत नाहीं. एक + अ + दशन् = एकादशन्, अशी वास्तविक स्थिति आहे. येथें जास्त अ कां आला व कोठून आला ? माझ्या मतें एकादश हें रूप पूर्ववैदिक म्हणजे वेदाच्या हि पूर्वीच्या भाषेंतून अपभ्रंश होऊन आलेलें आहे. अधिक या अर्थी पूर्ववैदिक भाषेंत कांहीं तरी शब्द असावा. एक + (अधिक या अर्थी पूर्ववैदिक शब्द)+ दशन् = एकादश. अशा परंपरेनें पूर्ववैदिक शब्दाचा अपभ्रंश वैदिक भाषेंत एकादश झालेला आहे. वैदिक व संस्कृत भाषांचे जसे पाली, महाराष्ट्री हे अपभ्रंश आहेत, तशी वैदिक भाषा ही पूर्ववैदिक भाषेचा अपभ्रंश आहे. एकाधिकदशन् असा लांब समास उच्चारण्याला कंटाळून, एकादशन् असा संक्षिप्त उच्चार वैदिक लोक करूं लागले. तात्पर्य, एकादशन् हा वैदिक शब्द एकाधिकदशन् या किंवा याच्यासारख्या लांब पूर्ववैदिक शब्दाचें संक्षिप्त रूप आहे, यांत संशय नाहीं. हा पूर्ववैदिक शब्द बहुशः एकापरदशन् असा असावा. संस्कृताचें महाराष्ट्रींत विपरिणमन होतांना जे नियम लागू होतात, ते किंवा त्यांच्या सारखे च नियम पूर्ववैदिकाचें वैदिकभाषेंत विपरिणमन ऊर्फ अपभ्रंश होतांना लागू होत होते असें गृहीत धरून,

एकापरदशन् = एकाअअदशन् = एकादशन्

असें वैदिक व संस्कृत रूप निघतें. अधिक Additional या अर्थी अपर शब्द आहे. पूर्ववैदिकांतून वैदिकांत येतांना एकापरदशन् चा एकादशन् अपभ्रंश झाला

असें जरी कबूल केलें, तत्रापि वैदिक व संस्कृत एकादशन् पासून महाराष्ट्री एआरह शब्द कसा निघावा? मध्यें च र कोठून आला? तेव्हां एआरह हा एकादक या वैदिक व संस्कृत शब्दाचा अपभ्रंश नाहीं. हा एआरह महाराष्ट्री शब्द पूर्ववैदिक एकापरदशन् शब्दाचा अपभ्रंश मानला तर च र ची उपपत्ति लागते.

एकापरदशन् = एआअरदशन् = एआअरअह = एआरह

म्हणजे महाराष्ट्री ही संस्कृताचा साक्षात् अपभ्रंश नसून, वैदिक व संस्कृत भाषांच्या बरोबर पूर्ववैदिक भाषेपासून निघालेल्या अपभ्रंशाचा अपभ्रंश आहे, असें म्हटल्याशिवाय गत्यन्तर नाहीं. वैदिक व संस्कृत भाषा प्रचलित असतांना, पूर्व-वैदिकापासून निघालेला एक किंवा अनेक अपभ्रंश किंवा प्राकृत भाषा चालू होत्या व त्या प्राकृत भाषांचा अपभ्रंश महाराष्ट्री आहे. आणि हें उघड आहे. देशांत शिष्ट भाषा व अपभ्रष्ट प्राकृत भाषा एका च कालीं असतात, हें आपण प्रत्यक्ष पहातों. पुण्याची शिष्ट मराठी भाषा चालू असतांना, इतर प्रांतिक मराठी भाषा व जाति-परत्वें कुणबाऊ, परभटी, वगैरे अपभ्रष्ट मराठी भाषा हि चालू असतात. तद्वत् च पूर्ववैदिक, वैदिक, व संस्कृत शिष्ट भाषा चालू असतां, इतर प्रांतिक व जातिक प्राकृत भाषा उर्फ अपभ्रंश चालू असले च पाहिजेत.

महाराष्ट्री एआरह पासून अपभ्रंशातील एग्गारह शब्द निष्पन्न होत नाहीं. आ चा ग्गा कसा व्हावा? तेव्हां अपभ्रंशांत जो एग्गारह शब्द सांपडतो तो इतरथा व्युत्पादिला पाहिजे.

एकापरदशन् = एगाअरअह = एग्गारह

अशी परंपरा दिसते. महाराष्ट्रींत संस्कृत क चा अ होतो. परंतु अपभ्रंश ज्या प्राकृतांपासून निघाला त्यांत संस्कृत क चा ग्ग होत होता. अर्थात् हेमचंद्रानें दिलेला अपभ्रंश, महाराष्ट्रीचा अपभ्रंश नव्हे; दुसऱ्या च कोणत्या तरी प्राकृताचा अपभ्रंश आहे.

अपभ्रंशांतील ऍग्गारह शब्दापासून मराठी अकरा शब्द निघूं शकतो.

ऍग्गारह = ऍकारा = अकरा

येथें ग चा क होत आहे. तात्पर्य मराठी अकरा हा शब्द पूर्ववैदिक एकापर-दशन् शब्दापासून प्राकृतद्वारा निघालेला आहे, एकादश या संस्कृतशब्दद्वारा निघा-लेला नाहीं.

द्व्यपरदशन् = बिअअरअह = बारह = बारा

त्र्यपरदशन् = तिअअरअह = तेरह = तेरा

पंचापरदशन् = पंञाअरअह = पंणाराह = पंण्णरा = पन्हरा = पंधरा

षडपरदशन् = सळअळअह = सोळाह = सोळा

सप्तापरदशन् = सत्ताअरअह = सत्तरह = सतरा

अष्टापरदशन् = अट्ठाअरअह = अट्ठारह = अठारा = अठरा

येणेंप्रमाणें अकरा, बारा, तेरा, पंधरा, सोळा, सतरा, अठरा ह्या शब्दांतील र चा उगम पूर्ववैदिक भाषेंत व त्या पूर्ववैदिक भाषेच्या अपभ्रंशांत आहे.

दोन शब्दांचा समास होतांना कोठें कोठें प्रथम शब्दाच्या अन्त्यस्वराला वैदिक
१०] भाषेंत दीर्घत्व येतें. जसें, मित्रः+ वरुणः = मित्रावरुणौ. येथें पाणिनि एवढें च सांगेल कीं समास होतांना कित्येक सामासिक शब्दांत असा दीर्घत्वाचा चमत्कार होतो हा चमत्कार कां होतो, तें पाणिनि सांगणार नाहीं व तें सांगण्याचें त्याचें काम हि नव्हतें. तो कांहीं व्याकरणाचा इतिहास लिहीत नव्हता.

मित्र + अ + वरुण = मित्रावरुणौ

या समासांतील अ चा अर्थ काय ? माझ्या मतें ह्या द्वंद्व-समासांतील अ चा अर्थ आधिक्य Addition असा आहे. अ हें अक्षर पूर्ववैदिक अपर ह्या शब्दाचा अपभ्रंश किंवा संक्षेप आहे. द्वंद्व-समास म्हणजे दोन अथवा अधिक शब्दांची मिळवणी.

मित्रेण अपरः नाम अधिकः वरुणः = मित्रावरुणौ =

वरुण Together with मित्र = वरुण and मित्र

२०]

## (२) विंशति

द्विदशति = विअशति = विंशति

पूर्ववैदिक भाषेंत दशन् प्रमाणें दशति हा शब्द १० दहा या अर्थी होता. द्विदशति म्हणजे दोन दहा. द्विदशति या पूर्ववैदिक शब्दाचा अपभ्रंश विंशति. द्वि तला प्रथम द् काढून टाकला आहे व दशति यांतील प्रथम द् च्या बदला अनुस्वार उच्चारला आहे. कित्येक भाषाशास्त्रज्ञ शति, शत या शब्दाचा अर्थ पूर्ववैदिक कालीं दहा होता, असें प्रतिपादन करतात. परंतु तें असामंजस्यास्तव मला रुचत नाहीं.

त्रिदशति = त्रिअशति = त्रिंशति = त्रिंशत्

चत्वारिदशति = चत्वारिअशति = चत्वारिंशत्

पंचदशति = पंचअशति = पंचाशत्

पंच या शब्दांत अन्त्य अ असल्यामुळें द् चा लोप होऊन तत्स्थानीं अनुस्वार झाला नाहीं.

षष्दशति = षष्षटि = षष्टि

दोन ष झाल्यामुळें एकाचा लोप. षष्टि म्हणजे सहा दहा

सप्तदशति = सप्तअति = सप्तति

अष्टदशति = अषअति = अषीति = अशीति

मधल्या अ बद्दल ई व ष बद्दल श

पूर्ववैदिक अष्टदशति चा वैदिक अपभ्रंश अशीति.

किंवा

अष्, अश् असा हि आठ ह्या अर्थी पूर्ववैदिक शब्द असावा.

नवदशति = नवअति = नवति

संस्कृत = मराठी

विंशति = वीस

त्रिंशत् = तीस

चत्वारिंशत् = चाळीस

पंचाशत् = पंनास

षष्टि = साटि = साठ

पण

सप्तति = सत्तर

सप्तति चें सत्तर कसें व्हावें ? र कोठून आला ? प्राकृतवैयाकरण सप्तति चें सत्तरि असें रूप निपाततात इतकें च. कारण देत नाहींत. स चा स रहातो. प्त चा त्त होतो. पण ति ची रि कशी व्हावी. ति ची इ होईल, रि कोणत्या हि समजस नियमानें होणार नाहीं. सप्तति चा अपभ्रंश होतांना ति ची रि होते, असें म्हणणें म्हणजे कांहीं नियम सांगणें नव्हे, व कारण हि देणें नव्हे. अनेक वस्तूंच्या ठाई जो येक सामान्य धर्म

रहातो त्याचें कथन करणें म्हणजे नियम सांगणें. तसा प्रकार सप्तति चा अपभ्रंश सत्तरि होतो. हें सांगतांना झालेला दिमत नाहीं. तेव्हां, मराठी सत्तर ह्याचा उगम संस्कृत सप्तति शब्दांत नाहीं. मला वाटतें, पूर्ववैदिक भाषेंत सात ह्या अर्थी सप्तृ असा शब्द असावा.

सप्तृदशाति = सत्तरअअइ = सत्तरि = सत्तर

अशा दृष्टीनें पाहिलें असतां, आपल्या पूर्ववैदिक कोशांत सप्तृ हा शब्द गणावा लागतो. अन्यथा मराठी सत्तर शब्दाची यथाशास्त्र व्युत्पत्ति होत नाहीं.

वि. का. राजवाडे

## १४ चौधरी

हा शब्द चक्रधारी या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. चक्र म्हणजे पांच चार गांवांचा समूह. त्यांचें काम पहाणारा जो तो चक्रधारी.

चक्रधारी = चकरधारी = चअरधारी = चवधारी = चौधारी = चौधरी

चक्र म्हणजे व्यापाऱ्यांचा वगैरे संघ. त्यांचा जो मुख्य तो हि चौधरी या शब्दानें म्हणजे चक्रधारी या शब्दानें ओळखला जात असे व जातो.

चौधरी हा शब्द हिंदी, बंगाली, गुजराथी वगैरे गौड भाषांत आहे.

चतुर्धर असें एक विशेषनाम एका ग्रंथकाराचे (उदा. नीलकंठ चतुर्धर) सापेक्षतः बऱ्याच अर्वाचीन ग्रंथकारांचें आहे. हा चतुर्धर शब्द संस्कृत नाहीं. चौधरी या प्राकृत शब्दाचें संस्कृतकिरण करून हा चतुर्धर शब्द बनविलेला आहे तेव्हां ह्या चतुर्धर शब्दाकडे विशेष लक्ष देणें नलगे. चौधारी हा उच्चार अशिष्टांत अद्याप ऐकूं येतो.

वि. का. राजवाडे

## १५ जुनें वैद्यक–मराठी पोथी

१ ही पोथी येवल्यास मिळाली. पोथीचीं पानें १२३ वर असावीं. पैकीं फक्त ९ पानें उपलब्ध आहेत. अक्षराचें वळण शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांतील आहे. सांपडलेलीं पानें ५९ पासून ६६ पर्यंत आठ व १२३ वें पान मिळून नऊ. दर

पृष्ठास ओळी ११; दर पानास ओळी २२; मिळून एकंदर ओळी १९८ आहेत. एका ठिकाणीं पृष्टमात्रा आलेली आहे (पान ५९ पाठ, ओळ १).

२ संस्कृत श्लोक व त्याचें मराठी भाषान्तर, असा क्रम आहे. हारीत, सुश्रुत, गलंड, वृंद, भेड, हरिमेखल, इतक्या ६ पुरातन संहिताकारांचीं नांवें ह्या नऊ पानांत आलेलीं आहेत. संस्कृत फार अशुद्ध लिहिलें आहे. संहितांतील पाठ ताडून पहाण्यास हे श्लोक अशुद्ध असले तरी उपयोगी पडतील. हरिमेखल वगैरेंच्या संहिता तर सध्यां केवळ नाममात्रानें हि श्रुत असतील नसतील. त्यांतील एखादा हि श्लोक किंवा वचन मिळल्यास तज्ज्ञांस आनंद होणार आहे. हा ह्या पोथींतील पहिला विशेष.

३ ह्या पोथींतील मराठी ज्ञानेश्वरकालीन भाषेंतलें आहे. हा या पोथीचा दुसरा विशेष.

## पृष्ठ ५९ पोट

(१) ॥ ८२ ॥ गुळवे : पापडा : मोथा : काराइते : सुंठि : वातपित
(२) ज्वरिं : काढा दिजे : समे ॥ पंचरुद्र ॥ छ ॥ मूस्ता मारग्वधोशीरः
(३) हरिद्रा दारुसाह्वयं : पटोळं पिचूमंदं च : यष्टिमधूकमेव च
(४) ॥ ८३ यककषाय सिद्ध स्या : द्वातपितज्वरोद्भवं ॥ छ ॥ मो
(५) था बाहावा : वाळा : दारुहळदि : पटोळि : कडूनिंबु : जेष्टिम
(६) धू : काढो वातपितज्वरु समे ॥ मूस्तादि ॥ निळोत्पळमूशीरा
(७) णिं : वळा पद्मकमेव च : कार्श्मरि मधूकं द्राक्षा : मधूका
(८) निं परुषकं ॥ ८४ ॥ पेय शीतकषायोयं : वातपितज्वरापहं :
(९) सप्रळापं समोहं च शमयेत्पैतिकं ज्वरं ॥ ८५ ॥ निळोत्पळें :
(१०) वाळा चिकणा : पद्मकु : सिवर्नि : जेष्टिमधू : द्राक्षा महुवें :
(११) फणंस : काढा शितळु दिजे : वातपितज्वरु शमे ॥ छ ॥ के

## पृष्ठ ५९ पाठ

(१) वळ पितज्वरु हि समे ॥ छ ॥ मसूराणां द्वौ मसूराणां । मूर्वमधूक
(२) चंदनं : शारिवोशीरमृद्वीका : परुषकफळोत्पळं ॥ ८६ ॥ पटोळ
(३) पिचूमंदं च : शीतपाकि तथाशनं : पक्वातछर्करा क्षौद्रयुकं पी
(४) तांनिळाज्वरे ॥ ८७ ॥ पटोळि कडूनिंबु : गाडे चिकणा : काढा मधू

( ५ ) सापरेसिं दिजे : वातपितज्वरु समे ॥ ७ ॥ षर्जुरोर्शारमृद्विका :
( ६ ) पद्मकं पद्मकेशरं : धात्रि परुषकं ष्याम्रिः बळा मधूकचंदनं ॥
( ७ ) ८८ ॥ मधूकपुष्पकार्श्मार्यः शीतपाकिफळं तथा : पक्कपर्युषि
( ८ ) तं रात्रौ स्थितं मृद्राजने नवे ॥ ८९ ॥ लाजाचूर्णं प्रतिवापं : श
( ९ ) र्करामधूसंयुतं : जातिपुष्पाधिवासंतुं पिबेतृर्छार्दिमूर्छितं ॥ ९० ॥
(१०) दाहभ्रममदाष्टोवातपीतज्वरुर पीत्वा निवृतिमाप्नोति दितं
(११) गृहमिवांबुभि ॥ ९१ ॥ उततिया वाळा : द्राक्षा : पद्मकु निळोत्प

## पृष्ठ ६० पोट

( १ ) ळें : आवळकठिया : परुषक : रिंगणिं : चोकणां : जेष्टीमधू : चंद्
( २ ) न : महुवें : शीवनिं : गाडे धामणिं : चीं फळें समभागें कढूनु : नवि
( ३ ) ये भांडां रात्रि निवों दिजे तांदुळां चिया लाह्या : आणिं साषरमधू :
( ४ ) जाईं चियां फुलां चा वासु देउनु पाजिजे : तहान ओकारे : मूर्छा दा
( ५ ) हो : भ्रमू : मदू : वांतपितज्वरु : कटि : आतुर यां शांति करिं : जैसें ज
( ६ ) ळतेया घरां उदक ॥ हरितात् ॥ ७ ॥ मुद्गामळकचूर्णानि : मधु
( ७ ) कानिं घृतेन तु : अंबुकांजिकयुक्तानिं : प्रदाहे दाहनाशनां ॥ ९२ ॥
( ८ ) मूगां आवळियां चें चूर्ण : तुपें कालविजे : जैसा पिंडू होंएं : तो कां
( ९ ) जियें पाणियें कालउनुं दिजे : दाहो शमे ॥ ७ ॥ दाधिछं दाडिं
(१०) बं रोध्रं : विदारिबिजपुरुकं : शिरप्रदेशे शैौथं : तृष्णाद्दाहनिवा
(११) रणं ॥ ९३ ॥ कविठ दाडिंब रोध्र : भुंईकोहळे : मातुळिंग : पा

## पृष्ठ ६० पाठ

( १ ) णीयें वाटूनु : माथा लेपु दिजे : ताहान दाहो समे ॥ भेडात् ॥ इति वा
( २ ) तपितज्वर ॥ ७ ॥ स्तैमित्यसर्वांगाविमर्दनं : शिरोव्यथा हीमश्वे
( ३ ) दगुरुत्वकामत्वकसनं निद्रास्यो : नतितापज्वरा कफानिळा स्यां
( ४ ) मिति : शास्त्रभावितं ॥ ९४ ॥ सर्वांगी व्यथा जडत्व : शिरव्यथा : हिं
( ५ ) व घामू : कासू : निद्रा : पडिसां : तापु मंदु मंदु : ष्कासु : आळस्यु ईहिं
( ६ ) लक्षाणिं वातश्लेष्मज्वरु जाणावा ॥ ७ ॥ तुल्यो नागरभूनिंबः गु
( ७ ) डुचिमूस्तकैश्शृतं : कषायं येच्दामे ज्वरे ज्वरविनाशनं ॥ ९५ ॥ मुं
( ८ ) डि चिराईतें : गुळवें : मोथा : समभागें कढूनुं दिजे : वातश्लेष्म

( ९ ) कु ज्वरु पचे ॥ छ ॥ किराततिक्तकं मूस्तं : गुडूचिविश्वभेषजं : पाटा
(१०) मूशीरसोदि्च्य पीबेद्वातज्वरशांतये ॥ ९६ ॥ चीराईतें : कडूई :
(११) मोथा : गुळवे सुंठी : पाहाडवाळा : काळा वाळा : कढूनु दिजे :

## पृष्ठ ६१ पाट

( १ ) पाचन होऐ ॥ छ ॥ षर्परभृष्टं पटुछितं : कांजिकसिक्तो हि वालुका
( २ ) स्वदृशं स्वदस : मयाति : वातकफामयां मस्तकशूळांगभंगा
( ३ ) दि च ॥ ९७ ॥ षापरि वालु ताविजे : ते वालु येक वस्त्र आंथुरुनु त्या
( ४ ) वरि येरंडपानें घालुनुं : वरि रिचविजे : कांजिये सींपौनु पोटळि
( ५ ) या किजाति : तेणें सेकिजे तेणें मस्तकसुळ : मुष्य : सर्वांगोचें टु
( ६ ) षणें सामि : वतश्लेष्मिकु दोषु शमे ॥ वालुकास्वेदु ॥ श्रोतसां [१०
( ७ ) मर्द्दनं नुत्वा गित्वा पचकमाशयं : हत्वा वातकफघ्नं तं : स्वेदो ज्व
( ८ ) रमपोहति ॥ ९८ ॥ येरंडेलें माघुनुं : सगडिया अथवा ईटा सर्वां
( ९ ) ग सेषीजे : जवं घामु ये : तेणें हिं वातश्लेष्मकु ज्वरु समे ॥ छ ॥ मा
(१०) तुळंगफळं केशरोधृत : सिंधूजन्ममरिचानी तो मुखे हंति
(११) वातकफरोगमशांगशोषमाशू जडतामरोचकं ॥ ९९ ॥ मातुळिं

## पृष्ठ ६१ पाठ

( १ ) गाचि चूडि: सैधवमिरियें मुषिं धरितां निष्टीवनें : वातकफरोग
( २ ) अरोचक शमे ॥ छ ॥ पीप्पलि पीप्पलिमूळं : चव्यचीत्रकनागरैः
( ३ ) दिपनिय स्मृतो वर्ग : कफनिळागदापहं ॥ १०० ॥ पींपळिया पीं
( ४ ) पळमूळ : चविचीत्रिकु सुंठि : काढा दिजे : कफवातज्वरु शमे ॥ [२०
( ५ ) हा पंचकोळु ॥ आरग्वधग्रंथिकमूस्ततिक्ताहरीतकीभि क्वथि
( ६ ) त कषाय समे शशूळे कफवातयुक्ते : ज्वरे हिते दिपनं पाचनं श्च :
( ७ ) ॥ १ ॥ बाहावेया चे सेंगे चा मो टांक २ पींपळिमूळ टांक २ मूस्ता टांक
( ८ ) २ केदारकुडि टांक २ काढा अग्निविशेषु किजे दिजे :
( ९ ) सामू ज्वरु शुळ : कफवातरोग समति ॥ बाहावापंचकु ॥ पींप्प
(१०) लिभि श्रतं तोयं मनंभिष्यंदि दीपनं वातश्लेष्मं विकाराघ्नं : प्लिहघ्नं
(११) ज्वरनाशनं ॥ २ ॥ टांक १० पींपळिया पाणिं सेर २ आंतु कढिजे पाई

## पृष्ठ ६२ पोट

( १ ) सरु १ दिजे : वातश्लेष्मविकार घामू प्लिहा ज्वरु शमे ॥ छ ॥ मूस्ता
( २ ) पर्पठदुस्पर्शगुडूचिविश्वजं जलं : कफवातरुचिर्छर्दिदाहशो
( ३ ) षज्वरापहं ॥ ३ ॥ मोथा : पापडा : दुराळभा : गुळवे : सुंठि : काढा क
( ४ ) फ अरुचि : छर्दि : दाहो शमिं ॥ छ ॥ मूस्तापंचकु ॥ दशमूलिश्रतं पे
( ५ ) यं : कणायुक्तकफानिळे : अविपाकेतिनिद्रायां : पार्श्वरुक्श्वास
( ६ ) कासके ॥ ४ ॥ दशमूळा चा काढा पींपळि प्रतिपाकेंसीं दिजे : क
( ७ ) फवातज्वरु : अपकु अतिनिद्रा : पार्श्वशूळु स्वासु कासु शमे ॥ छ ॥
( ८ ) निदिग्धीकामृताशुंठि : पुष्कराह्वे श्रतं पचेत् । काथकासरुचि
१०]( ९ ) श्वासकफवातज्वरापहं ॥ ५ ॥ रिंगणिं : गुळवे : सुंठि : कोष्ट : का
(१०) ढा क्षुद्रादि दिजे : वातकफु शमे ॥ छ ॥ दारुपर्पटकं मूस्तं : मभ
(११) ( या ) विश्वभेषजं : भूनिंबकफळं भार्गी कुस्तंबुरुसमांशकं ॥ ६

## पृष्ठ ६२ पाठ

( १ ) ॥ क काथ पिवे हि तं : मधूयुक्तं ज्वरापहं : वातश्लेष्मांणिं कासे च :
( २ ) कंठरोगे गळग्रहे ॥७॥ देवदारु : पापडा मोथा : हिरडा : सुंठि : भूनिंबु :
( ३ ) कटूफळ : भार्गी : कोथुंबुरि : समभागें काढा मधेंसिं दिजे : वातश्ले
( ४ ) ष्मज्वरु काशू कंठावरोधू : गळग्रहो हे शमति ॥ छ ॥ हरितात् ॥
( ५ ) कंठावरोधा चिकिछा ॥ कटूफळ इंद्रजव : काकडासिंगी : क
( ६ ) टूकिः पींपळि : गजपिंपळि : भारांगी मूस्ता : सुंठि : वेषंड : पींपळी
२०]( ७ ) मूळ : हिरडा : चिराईतें : कचोरा : पाहाड : सेउगा : धामासाउं :
( ८ ) पटोळि : जिरें : गुळवे : रुईशाचें फळ : काथू ज्वरु धापः पोटफु
( ९ ) लावा समे ॥ छ ॥ कटूफळादिकाथु ॥ छ ॥ कटूफळा पुष्करा अ
(१०) ब्दकटूकाः पाटावचाकर्कटैः पथ्या–धान्य–सुरद्रुभेषधकाणां
(११) शेंगीसटीतिक्तके : भार्गीजीरककरतृणै । श्रतिगळव्याध्य

## पृष्ठ ६३ पोट

( १ ) स्वरोधं हरेत् : कासं वातकफज्वरो श्रतिशिरोजाड्यं सहिग्वार्द्धक
( २ ) ॥ १ ॥ कटूफळ कोष्ट : मोथा केदारकडूई : पाहाड वेषंड : पापडा : को

( ३ ) थूचुरि : देवदारु : इंद्रजव सुंठि : पींपळी काकडसिंगी : कचोरा :
( ४ ) कीराईतें : भारांगी जीरें : रोईसाचें फळ : अष्टाविशेष पचिजे : प्रति
( ५ ) पाकु हिंगु : आलेरसु ॥ बहिरत्व शीरव्यथा : हिंवं कंठावरोधू : हे
( ६ ) रोग शमति ॥ कटूफळादि ॥ छ ॥ ईति वातश्लेष्म : द्वंदज ॥छ॥ तृट्का
( ७ ) शमोहास्यविलेपतिक्तां क्षयो विदाहो रुचिशैत्यतंद्रां : नेत्रद्वये
( ८ ) तप्तमश्मृव्यसंकुळां : स्वेदोपि गात्रे कफपितजे ज्वरे ॥ ८ ॥ तृषा
( ९ ) काशू : दुचितपणं : तोंड तिळितिळित : मूष कडू होऐ : क्षणीं घट
(१०) चटि : अरुचि स्वाशू : सैत्य तंद्रि : डोळे धडधडितां गळति : आं
(११) +++++ मेजे : ईहिं लक्षणिं : पीतश्लेष्मीकु ज्वरु जाणीजे ॥ छ ॥

## पृष्ठ ६३ पाठ

( १ ) + + + + + + + + पर्पटकाथमधूयुतं पिबेत् ॥ द्राक्षापटोळभू
( २ ) निंब : काथ पाचन उच्यते ॥ ९ ॥ सर्वद्वारेषु संम्यत यथादोष बपु
( ३ ) ति ॥ छ ॥ दुराळभा : पापडा : काढा मधू प्रतिपाके दिजे ॥ तथा द्राक्षा
( ४ ) पटोळा : भूनिंबु : काढा मधें दिजे पाचन सर्व ज्वरिं होऐ ॥ छ ॥ सुश्रू
( ५ ) तात् ॥ कंटकार्यामृताभेगी : नागरेंद्रजवासकं : भूनिंबचंदनं श
( ६ ) स्तं : पटोळं कटुरोहिणिं ॥ १० ॥ कषायं पयये देयं : पितश्लेष्मज्व
( ७ ) रापहं : दाहतृष्णां रुचिछर्दिकासहृत्पार्श्वशूळजित् ॥ ११ ॥ रिं
( ८ ) गणिं गुळवे : भारांगि : सुंठि : ईद्रजव दुराळभा : भूनिंबु चंदन :
( ९ ) पटोळि कटुरोहिणिं : काढा दीजे : दाहो : तन्ह : अरुचि ऊकारि :
(१०) सहित पितश्लेष्मु ज्वरु समे ॥ छ ॥ गुडूचिनिंबधान्यकं : चंद
(११) नं पद्मकारिणां : येष सर्वज्वरान् हंति : गुडूच्यादिशू दिपनं ॥ १२

## पृष्ठ ६४ पोट

( १ ) गुळवे : भूनिंबु : धणे : पद्मकु : चंदन काढा दिजे : सर्व ज्वर सम
( २ ) ति ॥ छ ॥ गुडूच्यादि ॥ पटोळं चंदनं मूर्वा : पाटा तिक्तामृतागणां : पी
( ३ ) तश्लेष्मज्वरछर्दि : दाहकंपविषापहं ॥ १३ ॥ पटोळि चंदन : महुर
( ४ ) सि : पाहाड : कडूई : गुळवे : काढा दिजे : पीतश्लेष्मीकु ज्वरु ऊका
( ५ ) रे दाहो कंपु विष ई शमे ॥ छ ॥ सपत्रपुष्पवासायां : रक्षाक्षौद्रासि

( ६ ) तायुतः कफपितज्वरं हंती : सास्रपितां सकामळ ॥ १४ ॥ आडूळिसे
( ७ ) याचेयां पांनां फुलां चा रसू : मधूसाम्रेसिं दिजे : कफपितज्वरु र
( ८ ) कपितं : कामळ हे रोग शमति ॥ छ ॥ रुशर्करामात्रकटुकामूष्ण
( ९ ) वारिणां : पीत्वा ज्वरं जये जंतु : कफपितसमुद्भवं ॥ १४ ॥ केदारकु
(१०) डी : उन्हवणियें वाटूनु : त्यांतु साघर टांक ५ घालुनु दिजे : क
(११) फपितज्वरु समे ॥ छ ॥ पटोळं पींचूमंदं च : त्रिफळा मधूकं बळा

## पृष्ठ ६४ पाठ

( १ ) साधितोयं कषाय स्या पितश्लेष्मोद्भवे ज्वरे ॥ १५ ॥ पटोळि निंबु
( २ ) त्रिफळा : जेष्टिमधू : चीकणां : काढा दिजे : पीतश्लेष्मज्वरु समे
( ३ ) ॥ छ ॥ शम्याकशंबरीराष्णां : त्रिफळा आटरूषकै : येककषाय
( ४ ) सिध स्या : पितश्लेष्मोद्भवे ज्वरे ॥ १६ ॥ बाहावा सांवैरि : राष्णा त्रेफ
( ५ ) ळा : आडूळिसा : काढा दिजे : पीतश्लेष्मज्वरु समे ॥ छ ॥ त्रायंति
( ६ ) कटुका मूस्ता : चंदनौशरिसारिवां : पटोळपत्रामधूकचाख्यस
( ७ ) मीति ॥ १७ ॥ तप्तकं मधूना येय : कफपितोद्भवे ज्वरे ॥ छ ॥ त्रायमां
( ८ ) णं : केदार कडूई : मोथा चंदन : वाळा : काउळि : पटोळि पत्रकु :
( ९ ) जेष्टिमधू : महुवें : समभागें काढा मधू प्रातिपाकेंसिं दिजे : कफ
(१०) पतिज्वरु समे ॥ छ ॥ कांश्मर्यफळमुद्रिका : शीतपा।किपरुषकं :
(११) मधूकं त्रिफळा मुस्ता चंदनोशीरपद्मकं ॥ १८ ॥ त्रायंतिकटुका

## पृष्ठ ६५ पोट

( १ ) ++ यष्टयाह्व चापि तत्समं : पींचेत् पर्युषीतं रात्रौ मधूना श्लेष्म
( २ ) पीतानुत् ॥ १९ ॥ शीवानिंफळें : द्राक्षा : गाडेचिकणां : फणंस : महु
( ३ ) वें : त्रेफळा : मूस्ता चंदन : वाळा : पद्मकु : त्रायमाणं : केदारकुडि :
( ४ ) जेष्टिमधू : समभागें पाणियें वाटूनिं : रात्रि नीवळत ठेविजे : उ
( ५ ) दैक निवळि मधें सिंदिजे : श्लेष्मपितज्वरु शमे ॥ छ ॥ भेडात् ॥
( ६ ) पटोळारिष्टपत्राणिं : साभयं कटुरोहिणिं : हरिद्रे द्वे समधूकं मूशी
( ७ ) रं चातुरंगुळं ॥ २० ॥ पींबेत्कषायं मधूना श्लेष्मपितज्वर तु चे ॥छ॥ ह
( ८ ) रितात् ॥ पटोळि निंबाचिं पानें : हीरडा : कटूरोहिणिं : हळदि : दारु
( ९ ) हळदि : जेष्टिमधू : वाळा बाहावा : काढा मधूसिं दिजे : श्लेष्मापितज्वरु

(१०) समे ॥ श्लेष्मपितज्वरा चिकिछा ॥ ७ ॥ सश्रावं कलुषं विलाचनयुगं
(११) निलुस्त रक्तप्रभं तंद्रामोहविदाहसैत्ये : कशनं : स्वासप्रळापं भ्रमं

## पृष्ठ ६५ पाठ

( १ ) अस्तिसंधीन् मूर्द्धिरुक्कहृदयं निद्राक्षयं : स्वेदनं : क्रिसंकठविकुजने ग्ट
( २ ) लिभवं पितां शृजे ष्टीकनं ॥ १ ॥ मूकत्वं मूषनाशिकोष्टरसनां पाकश्च
( ३ ) जित्वा स्वराः स्पर्शामूत्रविशाचिराः द्गीगलिताः स्यात्संन्निपाताज्वरपुर्णे
( ४ ) सर्वगुणे : भवेद्गुणितां : नष्टनराणां : मृति किंचित् लक्षणं संयुतेः प्रति
( ५ ) ज्जीवंति कष्टे नं च ॥ २ ॥ डोळे कश्मळ गळति : लोहित्वे होंति : छायाही
( ६ ) ण दिसे : तंद्रि दुचितेपणं : दाहो श्वासु : सैत्य : कासु प्रळापु : भमूं हाडां
(७) चिया सांदि : कपाळिं उरि व्यथाः नीद्रा न ये : स्वेदु आंग तुटे : गळा घु[१०
( ८ ) रघुरि : कानिं ध्वनिं उठिति : रक्तपित वमिं : मूकेपणं : तोंडअ्ढ कां
( ९ ) न जिभ येथें फोड उठिति : जिभ परबड : कष्टीं मळमूत्र होंति : ईहिं
(१०) लक्षणिं संनिपातु संपुर्णु : यरि आंगीं चेतनां नांहिं : तो रोगीया अ
(११) साध्यु ॥ थोडिं लक्षणें असति : तेया प्रतिकारु बहुतकरि वांचे कां

## पृष्ठ ६६ पाठ

( १ ) + + + ॥ गलंडात् ॥ लंघनं वालुकास्वेदः : नस्यनिष्टीवनं तथा : अ
( २ ) अवलेहांजनं काथं : प्रकुप्रायोज्य त्रिभेषजें ॥ ३ ॥ लंघन : वालुकास्वेदु :
( ३ ) नस्यु निष्टिवन : अवलेहो : अंजनं : काढा परिपाठि चिं त्रिदोषीं कीजेती
( ४ ) ॥ ७ ॥ त्रिरात्रं पंचरात्रं वा : सप्तरात्रमथापि वा : लंघनं शंनिपातेषु : कुर्या
(५) दारोग्यदर्शनात् ॥ ४ ॥ तिनिं रात्रें कां पचरात्रें : कां सप्तरात्रें : कां संन्निपा[२०
( ६ ) तीं जवं आरोग्यता होऐ ॥ तवं वरि लंघन ची करावविं ॥ ७ ॥ दोषाणां
( ७ ) मेहसा शक्ति : लंघनं यो सहिष्णुता : न तु दोषक्षयां कश्चि : त्सहते लंघनं
( ८ ) दिर्कं ॥ ५ ॥ दोषासि बळ तवं चि : जवं लंघन न घडे : दोषाचें नवेपणं
( ९ ) वायु चा पडिभरु : लंघनें शमे ॥ ७ ॥ कफपितोद्भवे धातु : सहते लंघ
(१०) नं महन् : मक्षयाद्धमपि वायु नं सहने क्षणात् ॥ ६ ॥ सर्परभृष्ट ई
(११) ती ॥ वृंदात् ॥ सैंधवं मरिचं क्षुद्रं शर्कराकुष्टमेव च : वत्सम्

## पृष्ठ ६६ पाठ

( १ ) त्रेणं सांगितो : नस्यं तद्रिनिवारणं ॥७॥ सैंधव मीरियें रिंगणेया चा विलु :

( २ ) राईकोष्ट : वेषंड : बोकडमूत्रें : वाटूनु : नस्यु दिजे : तंद्रि निवारे ॥छ॥ मे

( ३ ) डातू ॥ तंद्रिनस्यांजन ॥ व्योषं च कोशांतकिदेवदाळि सिघ्रेयगंधा :

( ४ ) बृहतिद्वये च : हीयांवळिभूतमनागवल्लि : सज्ञां प्रबोधाय वदींदंती

( ५ ) नश्यं ॥ ८ ॥ त्रिकटुक : रानदोडाकि : फळरज : देवडांगरि : फळरज :

( ६ ) सेउगा : वेषंड : रिंगणि डोराळि फळें : हियांवळि : निर्गुंडि : नागवेलि

( ७ ) पत्रें समभागें चूर्ण करुनि : संदे भरिजे : यथामात्रा नांकिं नस्यु

( ८ ) दिजे : भ्रमू फिटे : सन्निभ्र लोटे ॥ छ ॥ हरिमेषळात् ॥ मधूकासा

( ९ ) रसिंधूळं : वचोषणं कणां समं : सज्ञां प्रबोधनं नस्यं : संन्निपातं

(१०) कफात्मकं ॥ ९ ॥ टोळांचे–मज्जा : सैंधव : वेषंड : मीरियें पींपळि : सम

(११) भागें नस्यु दिजे : सज्ञां करि : कफोतर संन्निपातु हरे ॥ छ ॥ त्रीकटू

## पृष्ठ १२३ पोट

( १ ) टीका ॥ तेल्या पळें४ अंबर पळें४ तुप पळे दो २ चंदनें टांक १ २चेरी टांक न ९

( २ ) मधु टांक ६ नाबाद टांक ९ शिळारस्रु टांक ६ लवंग टांक६ नषटांक ति

( ३ ) ३ कोष्ट टांक ४ लोबाण टांक चो ४॥ मेण टांक दीड १॥ एकत्रं पीष्ट करुनु

( ४ ) भीजउनुं सात दीन ७ मग यंत्रीं भरीजे : पाताळयंत्रीं तेल काढीजे: या नावं

( ५ ) कामिनींमनोहरगंधराजु ॥छ॥ वसुदेवपळं चाज्यं पळं द्वादश चंदनं ॥ तै

( ६ ) ल्यं दशपळं योज्यं वाळा दशपळं सिता ॥ १ ॥ मुस्तालवंगलोबाणगु

( ७ ) ग्गुळं तगरं मधु ॥ हिमचंदननळिका पृथगश्पळं भवेत् ॥ २ ॥ अंबरं बे

( ८ ) रीतादारुजाजीकोष्टं नखं पृथक् ॥ एकैकपळसंधानं राजदूजापळे ग

( ९ ) वि ॥ ३ ॥ घृतसंधानमांयं च पक्षभूषरयंत्रकं ॥ ४ ॥ टीका ॥ तेल्य टांक

(१०) चौवि २४ अंबर टांक चौ २४ लोबाण टांक चो २४ चंदन पळ ये १ तगर

(११) पळ १ देवदारु पळ ये १ कोष्ट पळ ये १ नष पळ ये १ राळ पळ २

## पृष्ठ १२३ पाठ

( १ ) + + + + + पक्ष येक भीजों देईजे : मग यंत्रीं घालीजे : गंधराजु

( २ ) ॥ छ ॥ तैलं वाष्टपळं शशीवसुपळं श्रीचंदन द्विपळं लोबाणं नषकीं

( ३ ) श्पूटीतजकं बेरीलवंगं घृतं ॥ पृथगेकसळं सवेद्तिळजं एकत्र

( ४ ) भांडे मुने ॥ भांडे यंत्र विधाय भूमि नीवसे सत्यं क्षिपेत् केतकी ॥ १ ॥ भूपा

( ५ ) नां जनवल्लभं रमणिकं कंदर्पकोलाहलं ॥ १ ॥ टीका ॥ तेला पळ ८ सीसव

( ६ ) काष्ट पळें ८ चंदनं पळें २ पीत म्हणतां अगरु पळे २ अंबर पळें मधू
( ७ ) पळें २ लोबाण पळ १ घृत पळ १ तिळज म्हणतां तेल पळ पांच ५ येकत्र फ
( ८ ) ढवीजे : दीसां सातां ७ यंत्रीं भरीजे : पाताळयंत्रें तेल घेईजे : केतकीप
( ९ ) त्राचा वासु देईजे : या गंधराजा नाव कंदर्पकौतूहळु ॥ छ ॥ पळं चत्वारि तै
(१०) लानां द्विपळं स्नेहमुच्यते ॥ मधुलोबाणबेरी च क्षौद्रजांबरपंकजं ॥
(११) ॥ १ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥छ॥ गोसावीयाचेया सीस०८१७८९१०११गंधराजुः

वि. का. राजवाडे

# १६ हातगा ऊर्फ भोंडलें*

१ महाराष्ट्रांत हातग्याचीं ऊर्फ भोंडल्याचीं गाणीं घरोघर मुलींच्या सर्वतोमुखीं आहेत. हस्तनक्षत्राच्या प्रारंभापासून शेवटल्या दिवसापर्यंत दर रोज एकेक गाणें वाढवीत सोळाव्या दिवशीं सोळा गाणीं म्हणतात. शेजारच्या पाजारच्या दहापांच मुली तिसऱ्या प्रहरीं एकत्र होतात, वेचून आणून चार खडे मांडतात व हातगा म्हणून त्यांची फुलांनीं व पानानीं पूजा करतात आणि नंतर फेर धरून हीं गाणीं म्हणतात. हातगा म्हणजे हस्तग्रह. भोंडलें किंवा भोंडला म्हणजे काय तें समजत नाहीं. ह्या शब्दाचा अर्थ च माझ्या ध्यानांत येत नाहीं. व्युत्पत्ति हि माहीत नाहीं. हातग्याला च दुसरें नांव भोंडलें असावें. परंतु निश्चयानें कांहीं च सांगतां येत नाहीं.

२ गाण्यांत प्रारंभ एका विषयाचा असतो व शेवट त्या विषयाला सोडून निराळा च कांहीं असतो. उदाहरणार्थ पहिलें गाणें. ह्या गाण्यांत प्रथम गणपतीचें नांव घेतलें आहे. तें रास्त च आहे. अयलमा म्हणजे अथम व पयलमा म्हणजे प्रथम.

**अथ + ळ + म = अहलम = अअलम = अयलम=अयलमा (सप्तमी)**
**प्रथ + ळ + म = पहलम = पअलम = पयलम = पयलमा (सप्तमी)**

नंतर, गणेशाला मुलगी प्रार्थिते कीं, माझा खेळ मांडण्यास अनुज्ञा दे. खेळ गांवच्या वेशीच्या दारीं मांडिला. तों वेशीच्या बुरजावर पारवा घुमत होता त्याकडे लक्ष्य गेलें, तो फकिरासारखा एकटा च होता. त्याचे डोळे गुंजेप्रमाणें लाल होते. त्याच्या दुष्ट डोळ्याच्या टीका गांवच्या भुलोजी नांवाच्या नाइकानें ऊर्फ पाटिलानें

* या गाण्यांत पाठभेद फार आहेत, व हीं गाणीं म्हणण्याच्या वेळा प्रांतोप्रांतीं निरनिराळ्या आहेत. शिवाय गाण्यांची संख्या हि क्वचित् जास्त आहे.

काढून टाकिल्या. नंतर मुली वेशीच्या दारीं पुनः खेळ खेळूं लागल्या. तांळ कांडून त्यांचे त्यांनीं पांढरे तांदूळ काढिले. त्या तांदुळांचे साऱ्या मुलींच्या आयांकरितां दुधउंडे केले. ते दुधउंडे खातां खातां मुलींच्या आयांचे टाळे बसले. तेव्हां जवळ च माळी होता त्याजवळ मुलींनीं औषध मागितलें. औषध आणावयास माळी शेतास गेला. तों पाऊस आला. थेंबाथेंबीं पडूं लागला. धान्याला ओंब्या आल्या. त्या आपल्या च वजनानें लोंबूं लागल्या. एकेका आंकणाला सात सात कणसें धरलीं. असे हस्ताच्या भरपूर पावसाचे एक ना दोन सोळा वर्षाव झाले. वर्षे हा शब्द वर्षाव या अर्थी येथें योजिला आहे. असा हा पहिल्या गाण्याचा मथितार्थ आहे. गाणें मोठें नामी आहे. कल्पना उड्यावर उड्या घेत आहेत. एकेका कल्पनेचें शब्दचित्र एकेका ओळींत मोठ्या चातुर्यानें व औत्कट्यानें रेखाटलें आहे. ह्या शब्दचित्रांत इतिहास खचून भरलेला आहे. हें शब्दचित्र जेव्हां रचिलें गेलें त्या काळीं कोणतें हि कृत्य आरंभण्याच्या पूर्वी प्रथम गणपतिपूजन करीत. त्या काळीं गांवांतल्या मुली गांवच्या वेशांवर येऊन कांहीं खेळ खेळत. गांव म्हटला म्हणजे त्याला कुसूं, बुरुज व वेस ह्या तीन वस्तू त्या काळीं हटकून असावयाच्या च. गांववेशांवर पारवे घुंमत, इतक्या त्या जुन्यापुराण्या झालेल्या होत्या. मुसुलमानी अंमल झालेला होता व गावोगाव फकीर व दर्गे मातलेले होते. फकीर निशा करून असत व त्यांचे डोळे लालगुंज झालेले असत. त्यांची दृष्टि गांवच्या स्त्रियांवर जाई. तेव्हां पाटिल त्यांचे डोळे काढून टाकी. म्हणजे ऐन मुसुलमानी अंमल ढिला पडत चालला होता. गानरचनाकाली तिळाचें उंडें हें प्रिय पक्वान्न होतें. माळी लोकांना सामान्य रोगांवर सामान्य वनस्पति माहीत असत.अमरकोशांत वनस्पतिसंग्रह आहे तो उगा च नाहीं. सामान्य लोकांत हि वनस्पतींचें ज्ञान त्या काळीं कामापुरतें बरें असे. हस्ताचा पाऊस पडून, धान्य मुबलक येई. अशी त्या काळीं समाजस्थिति होती. तिचें हें सूचक शब्दचित्र आहे. एकेका वाक्यानें हजारो इतर कल्पनांचे ओघ डोळ्यापुढें उभे रहातात. म्हणजे ह्या गाण्यांत काव्य आहे. तात्पर्य, हें गाणें बहुतच बहुत गोड आहे व लहान मुलींच्या डोक्यांत नाना तरंग उठविणारें आहे. गांव, कुसूं, बुरुज, पाखरें, देवळें, शेतकरी, फकीर, चित्रविचित्र शेतें व पाऊस, वगैरे मानव व सृष्ट चमत्कारांचें हें नामी चित्र आहे.

२ दुसरें गाणें : श्रावणांत व भाद्रपदांत लिंबाला अति भर येतो. तेव्हां तीं लिंबें मुली झेलतात. मग पांच लिंबांचीं माळ हणमंताचे गळ्यांत घालतात. हणमंताचें देऊळ पाणवठ्याला असे. हणमंताची निळी घोडी जातां येतां कमळें तोडी कमळाच्या आड एक चिमकुली अचरा होती. तिला मुली विचारतात कीं पाणी कुठें आहे. ती उत्तर देते, ही यमनाजमना आहे, नुसतें रोजचें पाणी नाहीं. यमुनेच्या बारीक वाळूवर यादवकुळटिळक जो बाळकृष्ण तो खेळतो. त्याला भूक लागली. तेव्हां

सोन्याच्या शिंपीनें दूध पाजिलें आणि मग त्याला झोपी लावलें. नंतर मुली माळा-वर खडे वेचावयाला गेल्या, त्या खड्यांत एक मोठा खडा असेल त्याला गवरा म्हणतात. गवरीचा नवरा गवरा. गवऱ्याला मुली विचारतात, बा, कधीं येशील. चैत्रांत येईन, म्हणून तो सांगतो. तेव्हां मुली चैत्राला म्हणतात, चैत्रा चैत्रा, लवकर ये, म्हणजे हातग्याला हात घालूं व देव्हाऱ्यांत देव बसवूं. नंतर देव बसविल्यानंतर देव्हाऱ्याच्या चवकटीपुढें मुली नाचतात व म्हणतातः—देव्हाऱ्याच्या चवकटीं, उठतां बसतां लाथबुक्की.

ह्या गाण्यांत लिंबं, हणमंत, निळी घोडी, कमळें, अचरा व गवरा ह्यांचा उल्लेख आला आहे. सर्व च कल्पना अतींद्रिय आहेत. मारुती अप्सरा व गवरे, एतत्संबंधी भूतसृष्टींतील ज्या काल्पनिक गोष्टी समाजांत त्या कालीं प्रचलित होत्या त्यांचें वर्णन ह्या गाण्यांत आलें आहे. एकंदरींत गाण्याचा अर्थ सोपा नाहीं, गूढ आहे.

४ तिसरे गाणें : गांवांत एक खाऱ्या पाण्याचा आड आहे. तो च कल्पनासृष्टीला व शब्दचित्राला पाया म्हणून घेऊन, त्याच्यावर कल्पना चालविल्या आहेत. खाऱ्या आडाच्या खाऱ्या पाण्यांत वडील बाया मुलांच्या आंग्या टोप्या धूत आहेत. इतक्यांत आडांत साप निघाला व आंग्या टोप्या हरवल्या. आळ सापावर आला. साप म्हणतो मी एकुलता एकटा आहें, दारच्या पिकल्या आंब्याला विचारा. तों खरें च. आंब्याची कोय दारीं पडली होती. लुचा आंबा आंग्या टोप्या घेऊन पळाला, पण आपली कोय न्यायला विसरला, त्यामुळें उमगला. आंब्याची झडती घेणें जरूर झाले. आंब्यावर मोर नाचूं लागले. बायांनीं दिवट्या घेऊन आंग्या टोप्यांचा शोध चालविला. इकडे मुली आपला खेळ खेळूं लागल्या व खेळतांना म्हणतातः—आम्हीं सुंदर मुली डोळ्यांत सुंदर काजळ घालूं व सासरमाहेर करूं, आमचें सासरमाहेर इतर घरांप्रमाणें साधें नाहीं, गचर आहे, तेथें मातीच्या चुली नाहींत, तांब्याच्या चुली आहेत. मुली मलकापूरच्या होत्या. मलकापूर ह्या शब्दाचा खरा उच्चार मलकान्पूर मलिक याचें फारशी अनेकवचन मलकान्. मलकांचें जें शहर तें मलकानपूर. त्याचा मुलींनीं अपभ्रंश मकलामपूर असा केला. मलकापूर हें गांव कोल्हापूर इलाख्यांत आहे व तें तेथील प्रतिनिधींची सध्यां राजधानी आहे. गाणें फार जुनाट आहे. इतकें च कीं ज्या प्रदेशांत ज्या कालांत हें गाणें म्हटलें जातें त्या देशांतील व कालांतील शहराचें नांव त्यांत सहज च येतें. मकलामपूर हें नांव मुसुलमानी अंमलानंतर गाण्यांत शिरलेलें आहे, हें उघड आहे.

५ गाणें चोथेंः हें गाणें फार सुंदर आहे, अप्रतिम आहे. धाकुटी चंद्रावळ घराच्या अंगणांत खेळत होती. तिचा पदर धाकुट्या कृष्णानें धरिला. त्याचा चंद्रावळीला तिटकारा आला व तिनें वैराग घेतला. ती गुसार झाली. तिनें एक बाभळ तोडिली, चौरंग घडविला

वं त्या चौरंगावरून पारिजातकाचीं सुवासिक व दिखाऊ वृक्षांचीं फुलें तोडिलीं व त्यांचा हार गुंफून हातग्याला वाहिला. पांच चार भापांतलीं मीं पुष्कळ सुंदर गाणीं वाचिलीं आहेत. परंतु ह्या तोडीचें गाणें मला कोठें आढळलें नाहीं. वैताग हा शब्द वित्याग शब्दाचा अपभ्रंश आहे. विशेषेण त्याग वित्यागः

६ गाणें पांचवें : हें गाणें देवगिरीच्या यादवांच्या वेळचें किंवा त्यांच्या हि पूर्वीचें आहे. कारण, पंढरपूर एवढेसें गांव होतें, असें यांत म्हटलें आहे. ह्यांत पंढरपूरच्या माळणीचें आपल्या नवऱ्यावरील प्रेम व कंगण्या देणाऱ्या राजाचा तिरस्कारा कवीनें दाखविला आहे.

७ गाणें साहावें : ह्यांत मामावरील प्रेम, मामीचा कंजुषपणा व दिराची थट्टा केलेली आहे.

८ गाणें सातवें : ह्यांत सोनचाफ्याच्या फुलांचे हार हातग्याकरितां गुंफिले आहेत.

९ गाणें आठवें : ह्यांत आईचें आपल्या लहान मुलावरील वात्सल्य वर्णिलें आहे.

१० गाणें नववें : ह्यांत मामाच्या घराचें वर्णन आहे व धाकट्या दिरावरील प्रेम दाखविलें आहे. कोल्हापुराजवळील रत्नागिरीचा उल्लेख आहे. तेलंगपूर कोठलें कोण जाणे! पण ते त्या कालीं लुगड्याबद्दल प्रसिद्ध पेठ असावें.

११ गाणें दहावें : यांत कोथिंबिरीला उद्देशून कवन केलें आहे. नामी आहे.

१२ गाणें अकरावें : यांत मुंज्या भाऊ व त्याची बहीण यांचें वर्णन आहे.

१३ गाणें बारावें : यांत नव्या नवरीचें सासरीं जाणें वर्णिलें आहे.

१४ गाणें तेरावें : यांत वडील जावेची थट्टा केली आहे.

१५ गाणें चौदावें : यांत नव्या नवरीचें सासरीं जाणें वर्णिलें आहे. कडेगांवचा उल्लेख आहे.

१६ गाणें पंधरावें :

१७ गाणें सोळावें : कोळशासारख्या काळ्या घुलोजीचें वर्णन आहे.

१८ गाणें सतरावें : हें एक उखाणें-वजा गाणें आहे.

१९ गाणें अठरावें : यांत सासरच्या माणसांचा विनोद आहे.

सांगली-देशस्थ ब्राह्मण मुलगी ( द ) हातग्याचीं गाणीं हस्तनक्षत्रीं सुरू.
दर दिवशीं एक एक गाणें वाढवीत जावयाचें सोळाव्या दिवशीं सोळा गाणीं.

## ( १ ) हातगा

१ अयलमा पयलमा गणेश देवा । २ माझा खेळ मांडू दे करूं तुझी शेवा ॥
३ माझा खेळ मांडिला वेशीच्या दारीं । ४ पाखळ घुंमते बुरजा वरी ॥
५ पाखळ फकिराचे गुंजाणे डोळे । ६ गुंजाणे डोळ्याच्या सारविल्या टीका ॥
७ आमच्या गावच्या भुलोजी नायका । ८ एवी निघा तेवी निघा ॥
९ कांडा तीळ बाई तांदूळ घ्या । १० आमच्या आया तुमच्या आया ॥
११ खातील काय दूध-उंडे । १२ उंडयांशी लागली टाळी ॥
१३ औषध दे रे बा माळी । १४ माळी गेला शेता भाता ॥ [१०
१५ पाऊस लागला येता जाता । १६ पड पड पाउसा थेंबा थेंबीं ॥
१७ थेंबा थेंबी आळ्या लोंबी । १८ आळ्या लोंबती आंखण ( आंकण ) ॥
१९ ( क ) आंखणा तुझी सात कणसें । २० हातग्या तुसी सोळा वर्षे ॥

## ( १ ) हातगा

| | |
|---|---|
| १ भोंडलें भावे भावे ।<br>२ तुम्ही निघा पेवे पेवे ।<br>( १०) ३ आमच्या आया तुमच्या आया | } हा प्रारंभ कोठें कोठें करतात. |
| २१ आतूला मातूला ।<br>२२ चरणीं घातूला ।<br>२३ चरणींचे सोंडे ।<br>२४ हातपाय खणखणीत गोंडे ।<br>२५ एक एक गोंडा विसाचा ।<br>२६ नेसा ग नेसा भावल्या नों ।<br>२७ वरीस वरीस पावल्यानों । | } हे चरण आणीक कोठें कोठें म्हणतात, [२० |

## ( २ ) हातगा ( द )

१ एक लिंबू झेलूं बाई दोन लिंब झेलूं । २ तीन लिंब झेलूं बाई चार लिंब झेलूं ॥
३ तीन लिंब झेलूं बाई चार लिंब झेलूं । ४ चार लिंब झेलूं बाई पांच लिंब झेलूं ॥

५ पांच लिंग पाणवठा । ६ माळ घाली हणमंता ॥
७ हणमंताची नीळी घोडी । ८ येता जाता कमळें तोडी ॥
९ कमळा पाठी मागें होती राणी । १० अग अग राणे कुठ कुठ पाणी॥
११ पाणी नव्हे यमना जमना । १२ यमना–जमनाची बारीक वाळू ॥
१३ तिथ खेळ तिळार–वाळू । १४ तिळार-वाळूला भूक लागली ॥
१५ सोन्याच्या शिंपीनें दूध पाजिलें । १६ नीज नीज बाळा वेल्हाळा ॥
१७ आम्ही जातो वरच्या माळा । १८ वरच्या माळा जाउंगा ॥
१९ पाच खडे आणूंगा । २० एक खडा मोठा ॥
२१ गवरे आले पोटा । २२ गवऱ्या तुझें ठाणग ॥
२३ आतां कधीं येणें ग । २४ आतां येणें चैत्रमासीं ॥
२५ चैत्रा चैत्रा लवकर ये । २६ हस्त घालीन हस्तारा ॥
२७ देव बसवीन देव्हारा । २८ देव्हाऱ्याच्या चवकटीं ॥
२९ उठतां बसतां लाथबुकी ॥

## ( ३ ) हातगा

१ आड बाई आडवणी । २ आडाचें पाणी खारवणी ॥
३ आडांत होत्या बायका । ४ आंगी टोपी ल्याह्यका ॥
५ आंगी टोपी हरपली । ६ हरपा पायीं दडपली ॥
७ सरप म्हणे मी एकूला । ८ दारीं आंबा पिकूला ॥
९ दारीं आंब्याची कोय ग । १० आंबा नाचतो मोर ग ॥
११ रंभा पाही दिवट्या । १२ आम्हीं लेकी गोमट्या ॥
१३ गोमट काजळ लेउंगा । १४ सासरीं माहेरीं जाउंगा ॥
१५ सासरीं माहेरी तांब्याच्या चुली । १६ मंडप घातला मकलामपुरी॥

## ( ४ ) हातगा ( द )

१ धाकुटी चंद्रावळ बाई खेळती आंगणी । २ खेळतां खेळतां बाई कृष्णानी देखिली॥
३ कृष्णानी देखिली बाई पालवा धरिली । ४ सोड सोड पालवा मी तिकडे जाईन ॥
५ तिकडे जाईन तो वेताक घेईन । ६ वेताक घेईन मी बाभळ जे तोडीन ॥

७ बाबळ जे तोडीन मी सुतार जे होईन । ८ सुतार जे होईन मी चौरंग जे घडवीन॥
९ चौरंग जे घडवीन मी कळ्या जे तोडीन। १० कळ्या ज्या तोडीन मी हार जे गुंफीन॥
११ हार जे गुंफीन मी हातग्याला वाहीन ॥

## (५) हातगा

१ एवडसं होतं पंढरपुर । २ एवडसं होतं पंढरपूर ॥
३ विठोबारायाचं नगर । ४ रखमाबाईचं सासर ॥
५ विठोबा राया दारोदारीं । ६ शंभो मोट मोट धारी ॥
७ अगग भुलाई माळणी । ८ तुला राजा बोलावितो ॥
९ तुला कंगण्या घडवितो । १० जळो मेल्याच्या कंगण्या ॥
११ विकीन सोनीयाची भाजी १२ घेईन मोतीयाचा तेजी ॥
१३ माझा माळी जो बरवा । १४ दंडी रुमाल हिरवा ॥
१५ दंडी रुमाल काय काय परी । १६ हिरा झळकतो तून्या घरी ॥

## (६) हातगा

१ बाईच्या परसांत भेंडीचं रोप । २ भेंडीचं रोप सारवलं ॥
३ मामाचं घर थोरवलं । ४ मामाच्या घरीं येऊं-जाऊं ॥
५ तूपरोटी खाऊं-जाऊं । ६ घाल ग मामी तुपाची धार ॥
७ तुपाची धार गेली वान्यान । ८ आई आली चूड्यान ॥
९ बाप आले घोड्यान । १० बहिणी आल्या पालखीन ॥
११ भावजी आले कुत्रीन । १२ काहो भावजी रूसला ॥
१३ काळा विंचू डसला । १४ काळा विंचू पापी ॥
१५ रांजणाच्या काठीं । १६ रांजण गेला गडगडत ॥
१७ भावजी बसले चरफडत ॥

## (७) हातगा

१ सखूबाई तुमच्या आंगणी । २ सुंदर चाफा लावणी ॥
३ ऐसा चाफा फुलला । ४ चला बाई कळ्या तोडाला ॥

५ आम्ही बाई कळ्या तोडील्या । ६ आम्ही बाई हार गुंफीले ॥
७ हारा हारा प्रेमाळी । ८ तिकडनं आले वनमाळी ॥
९ सोडा सोडा काचोळी । १० रात्र झाली गोकूळी ॥

## ( ८ ) हातगा

१ एवडं एवडसं पाखरूं । २ लाल लाल की त्याची चोच ॥
३ गुंजावाणी ग त्याचे डोळे । ४ सात पाताळी बाळ खेळे ॥
५ कीं पाखरूं माझं । ६ कोण्या बाजाराशीं गेलं ॥
७ कोण्या नारीनं खूणाविलं । ८ कीं पाखरूं माझं ॥
९ दह्या दुधानीं भरल्या वाट्या । १० वरि साखर रायपूरी ॥
११ माझा जेवणारा नाना परी । १२ कीं पाखरूं माझं ॥
१३ कोण्या बाजाराशीं गेलं । १४ कोण्या नारीनं खूणाविलं ॥
१५ दह्या दुधांनी भरल्या । १६ वाट्या वरि साखर रायपिठी ॥
१७ उठ गोविंद जेवायाला । १८ कीं पाखरं पाझं ॥
१९ हस्तीदंतांची आणा फणी । २० जांवळ विंचरूनी घाला वेणी ॥
२१ कीं पाखरूं माझं । २२ कोण्या नारीनं खूणाविलं ॥
२३ कीं पाखरूं माझं । २४ कोण्या माळ्यानं केला मळा ॥
२५ तेथं पाखरूं तूझा मेळा ॥

## ( ९ ) हातगा

१ पानपुडा कीं शंकरचूडा कीं शंकरचूडा ।
२ माझा मामा ग लेकूरवाळा कीं लेकूरवाळा ॥
३ मामाच्या घरीं दुभतंच कांहीं कीं दुभतंच कांहीं ।
४ सोळा म्हशी कीं दोन च गाई दोन च गाई ॥
५ मामा पाहुणा आला बाई ग आला बाई ।
६ साकरउंडे कीं दोन च मांडे कीं दोन च मांडे ॥
७ मामासंगट मामी भांडे कीं मामी भांडे ।
८ मामा गेला ग तेलंगपुरा कीं तेलंगपुरा ॥

९ तेलंगपुरासनी आणली साडी ग आणली साडी।
१० नेसून गेले मी बरव्या पाण्या कीं बरव्या पाण्या ॥
११ तेथे होता ग धाकटा दीर कीं धाकटा दीर ।
१२ उतरून घेतला मी कडेवरी कीं कडेवरी ॥
१३ चार चाबूक चमकावीले कीं चमकावीले ।
१४ माझ आजोळ रत्नांगिरी ग रत्नांगिरी ॥
१५ रत्नांगिरीच्या टांक्यावरी ग टांक्यावरी ।
१६ शेला वाळत चांफ्यावरी ग चांफ्यावरी ॥

## ( १० ) हातगा

१ कोथिंबिरी बाई ग । २ आतां कधीं येशील ग ॥
३ आतां येईन श्रावणमासीं । ४ श्रावणा श्रावणा लवकर ये ॥
५ तुळा घालीन हौसरी । ६ हौसरीचा चोळा मोळा ॥
७ देव बैसले देव्हारा । ८ देव्हाऱ्याच्या चौकटचा ॥
९ उठतां बसतां लाथाबुक्या ॥

## ( ११ ) हातगा

१ आला चेंडू गे चेंडू राय चेंडू दुधा । २ आलंगीची गया बाई पलंगीची गया ॥
३ आपण चाले हत्ती घोडे रांम चाले पायीं ।
४ रामा ग वेचिति कळ्या, सीताग गुंफिति जाळ्या ॥
५ आल्याग लगिन वेळा, दस्तुरि घातिले बहुल ।
६ आकाशी घातिला मांडव, दर्शन दर्शी बसल्या पंक्ति ॥
७ भुलोजी राया मुंजा बाळा । ८ मुंजा बाळाची मुंजक दोरी ॥
९ ती च दोरी सावध करी । १० सावता सावता लागला दोर ॥
११ तो च दोर सावध करी । १२ आणा दोर बांधा चोर ॥
१३ बांधला चोर झाडाशी । १४ झाड झबका फूल टपका ॥
१५ ते म्यां फूल तोडिलें । १६ वहिणी माथा सोविले ॥

१२

१७ वहिणी तुझी वेणी ग । १८ केतकाची फणी ग ॥
१९ वहिणा तुझा भांग ग । २० मोतीयाचा चांद ग ॥

## (१२) हातगा

१ नणंदा भावजया खेळत होत्या । २ खेळता खेळता झगडा झाला ॥
३ भावजई वरी डाव आला । ४ — ∽ गेली समजावयाला ॥
५ उठा उठा वहिनी चला घराला । ६ सगळा खेळ देते तुजला ॥
७ मी नाहीं यायची तुमच्या घराला।८ सासुरवासी सुन रुसून बैसली कैसी ॥
९ यादवराया राणी रुसून बैसली कैसी । १० भाऊजी गेले समजावयाला ॥
११ पाटी पेणसील देतो तुजला । ११ सासुरवाशी सुन रुसून बैसली कैशी ॥
१३ यादवराया राणी रुसून बैसली कैशी । १४ जाऊ गेली समजावयाला ॥
१५ उठा उठा बाई चला घराला । १६ मी नाहीं यायची तुमच्या घराला ॥
१७ सासुरवासी सुन रुसून बैसली कैशी।१८ यादवराया राणी रुसून बैसली कैशी ॥
१९ सासू गेली समजावयाला । २० उठ उठ मूली चल घराला ॥
२१ ताकाचा डेरा देते तुजला । २२ मी नाहीं यायची तुमच्या घराला ॥
२३ सासुरवाशी सून रुसून बैसली कैशी।२४ यादवराया राणी रुसून बैसली कैशी
२५ सासरा गेला समजावयाला । २६ उठ उठ मुली चल घराला ॥
२७ दौत लेखण देतो तुजला । २८ मी नाहीं यायची तुमच्या घराला ॥
२९ सासुरवाशी सून रुसून बैसली कैशी ।३० यादवराया राणी रुसून बैसली कशी ॥
३१ पति गेले समजावयाला । ३२ उठ उठ राणी चल घराला ॥
३३ लाल चाबुक देतो तुजला । ३४ उठली ग उठली गजबजौनी ॥
३५ ओचा घेतला सावरौनी । ३६ पदर घेतला आवरूनी ॥
३७ उठ उठ राणी चल घराला । ३८ मी येते तुमच्या घराला ॥
३९ सासुरवाशी राणी घरासी आली कैशी।४० यादवराया राणी घरासी आली कैशी ॥

## (१३) हातगा

१ अवद बाई कवट ग । २ कवठासन आणिला कागद ग ॥
३ तो पडला गंगेत ग । ४ अचकुल मिचकुल भाऊ ग ॥

५ वडील माझी जाऊ ग । ६ वड्या कशा कापीती ॥
७ बचक बचक वाढिती । ८ वाढितानी देखीली ॥
९ भाऊजीनी ठोकीली ॥

## ( १४ ) हातगा

१ आरडी बाई परडी ग । २ परडी येवढे फूल ग ॥
३ दारीं मूळ कोण ग । ४ दारीं मूळ सासरा ॥
५ सासऱ्यानं आणील्या पाटल्या । ६ येत नाहीं बरोबर ॥
७ बसत नाहीं घोड्यावर । ९ आरडी बाई परडी ग, परडी येवढे फूल ग ॥
१० दारीं मूळ सासू । ११ सासूनं आणिल्या साखळ्या ॥
१३ येत नाहीं बरोबर, बसत नाहीं घोड्यावर । [१०
१५ आरडी बाई परडी ग, परडी येवढें फूल ग ॥
१६ दारीं मूळ दीर । १७ दीरानं काय आणीलं ॥
१८ दिरानं आणिले वाळे । २० येत नाहीं बरोबर, बसत नाहीं घोड्यावर ॥
२२ आरडी बाई परडी ग, परडी येवढें फूल ग । २३ दारीं मूळ नणंद ग ॥
२४ नणंदेन काय आणिलं ग बाई । २५ नणंदेनं आणिले गोट ग ॥
२७ येत नाहीं बरोबर, बसत नाहीं घोड्यावर ।
२९ आरडी बाई परडी ग, परडी यवढें फूल ग ॥
३१ दारीं मूळ कोण ग, दारीं मूळ पति । ३२ पतिनं काय आणले ग बाई ॥
३३ पतिनं आणिली नथ।४५ येते तुमच्या बरोबर, बसते तुमच्या घोड्यावर॥
३६ आरडी बाई परडी ग ॥ [२०

## ( १५ ) हातगा

१ एवडासा तांदुळजा । २ नखांनीं खुडीला ।
३ बारा जिऊ बांधिला । ४ वेशी बाहेर टाकून दिला।
५ गाय आली हुंगून गेली । ६ म्हैस आली खाऊन गेली ।
७ म्हशीला जाहाला रेडा । ८ गाईला झाला पाडा ।
९ तो चे रेडा पाडा माझ्या बापाजींचा वाडा॥

१० बापाजीनं दीला जांभळा घोडा । ११ जांभळ्या घोड्याची नीटकी चाल॥
१२ जेथें पाऊल पडे तेथे केडगाव शहर । १३ केडगांवचे रुंद रुंद ठश्शे ॥
१४ ठश्शे ठश्शे अंबर घुश्शे ।

## ( १६ ) हातगा

१ काळा कोळसा झिकू झिकू राणा । २ पालखीत बसला घुलोजी राणा ॥
३ घुलोजिची घोडी कितक्याची । ४ नाईग हाम्मा मोत्याची ॥
५ मोती खरडून शष्कूल । ६ शष्कूलाच्या टिका ग ॥
७ टिका टिका म्हणूनी नगराशी जाता । ८ नगरासी जाता भोजन करिता॥
९ भोजन करितां लागली काडी । १० काडी मोडून बांधली माडी ॥
११ माडी मोडून बांधलें तळे । १२ त्या बाई तळ्यांत परिट कोण धुतो ॥
१३ विठोबाच्या टोपीला निळा रंग देतो । १४ रखमाईच्या चोळीला शाहारंग देतो॥

## ( १७ ) हातगा

१ भोपळीचं फूल बाई फुल रंजना । २ मळ्याच्या काठीं मळ रंजना ॥
३ माळ्यानं सांडली भीकबाळी । ४ हुडकुन दे बा भूषणा ॥
५ हुडकली पण गवसे ना ॥

## ( १८ ) हातगा

१ काळी चंद्रकळा नेसू कशी ? । २ गळ्यांत हार, वाकूं कशी ? ॥
३ पायांत पैंजण, चालूं कशी ? । ४ बाहेर मामंजी, बोलूं कशी ? ॥
५ दमडीचं तेल आणूं कशी ? । ६ दमडीचं तेल आणिलं ॥
७ सासूबाईचं न्हाण जाहालं । ८ वन्सबाईची वेणी जाहाली ॥
९ भाऊजीची शेंडी जाहाली । १० मामंजीची दाढी जाहाली ॥
११ उरलं तेल झाकून ठेविलं । १२ लांडोरीचा पाय लागला ॥
१३ वेशी बाहेर ओघळ गेला । १४ त्यांत रेडा वाहून गेला ॥

१५ सासूबाई सासूबाई अन्याय जाहाला । १६ एवढा अन्याय पोटांत घाला ।
१७ दूध-भात जेवायला घाला ॥

वि० का० राजवाडे

## १७ मध्व.

मध्वाचार्य हा समास मधु + आचार्य किंवा मध्व + आचार्य असा दोन प्रकारांनीं सोडवितां येतो. म्हणजे द्वैतसंस्थापकाचें नांव मधु व मध्व असें दोन प्रकारचें असावें, असा निष्पाद होतो. मधु या शब्दाचा अर्थ गोड ( विशेषण ) व मध ( नाम ) असा आहे. ( मध्व ) मध्वक या शब्दाचा अर्थ भुंगा असा आहे. मधु हें संस्कृतांत देवदैत्य व मानव यांचें नांव आढळतें. मध्व हें नांव संस्कृतांत मनुष्याचें मध्वाचार्य ह्या समासाखेरीज इतरत्र कोठें आलेलें मला माहीत नाहीं. तेव्हां, प्रश्न असा उद्भवतो कीं, ह्या द्वैताचार्याचें मूळ नांव मध्व कां मधु ? दोन्ही नांवें एका च व्यक्तीचीं असूं शकणार नाहींत. एक मधु तरी मूळ नांव असेल किंवा मध्व तरी असेल. मधु हें जर मूळ नांव असतें, तर त्यापासून तद्धित शब्द माधव असा होता. पण माधवमत असें कोणी म्हणत नाहीं. माधवमत असा बोलण्याचा व लिहिण्याचा प्रचार आहे. सबब, द्वैताचार्याचें मूळ नांव मध्व होतें, हा पक्ष खरा मानावा लागतो. मध्वक म्हणजे षट्पद, भुंगा, मध गोळा करणारा. परंतु मध्वक म्हणजे कांहीं मध्व नव्हे. मधु + अक = मध्वक, असा जर विग्रह असेल, तर मध्वक हा मूळ शब्द होईल, मध्व होणार नाहीं. मध्व हा शब्द अपभ्रंश म्हणावा लागेल. मध्व असा स्वतंत्र शब्द संस्कृतांत मध्वाचार्याच्या पूर्वी नाहीं. तेव्हां एक च तोड रहाते. मध्व हा मध्वक शब्दाचा अपभ्रंश आहे. तात्पर्य, मध्व हा एका प्रकारचा प्राकृत शब्द आहे, असें म्हणावें लागतें. मध्वाचार्य फार विख्यात पुरुष झाला, त्यामुळें मध्व हा प्राकृत शब्द स्वतंत्र संस्कृत विशेषनाम म्हणून योजिला जाऊं लागला इतकें च.

वि. का. राजवाडे

## १८ अनुभवामृतांतील कांहीं अप्रसिद्ध ओवी

सर्व साधुसंतांचे ग्रंथ, होतील तितके मूळ प्रतीवरून छापण्याचा, प्रयत्न होणें अत्यन्त अवश्यक आहे हें मत आतां सर्वत्र माह्य झालें आहे. तेव्हां

त्याच्या युक्तायुक्ततेबद्दल विवेचन करण्याची आतां जरूरी नाहीं. मूळ प्रतीवरून ग्रंथ छापविणें हें इतर साधुसंतांच्या बाबतींत जितकें अवश्यक आहे, त्याहून-अनेक दृष्टीनें-श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे ग्रंथांचे बाबतींत तें अधिक इष्ट व आवश्यक आहे. परंतु दुर्दैवानें त्या दिशेनें अद्याप मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होऊं लागला नाहीं. परमेश्वरकृपेनें तशा प्रयत्नांची स्फूर्ति आधुनिक विद्वानांच्या चित्तांत लवकर च उद्भवो, निदान होणाऱ्या प्रयत्नांत ते अडथळा आणण्याची भावना न धरोत.

माझ्या संग्रहीं एक बरीच जुनी 'अनुभवामृता'ची पोथी आहे. ती बहुधा मोगलाईंत मला उपलब्ध झाली असावी ( निश्चिततेनें सांगतां येणें शक्य नाहीं ). तिच्यांतील पाठ जुने आहेत; व हल्लीं प्रसिद्ध असलेल्या सर्व पोथ्यांतील पाठांहून ते अत्यन्त भिन्न आहेत. याहून हि विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें हें आहे कीं, आज प्रसिद्ध असलेल्या सर्व पुस्तकांत अगदीं शेवटली म्हणून जी ओवी प्रसिद्ध आहे त्या ओवीनंतर इच्यांत आणखी २५ ओवी जास्त आहेत. त्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओवींसारख्या च आहेत हें त्या प्रत्यक्ष वाचल्यावरून तेव्हां च ध्यानीं येईल.

आज ज्या छापीव प्रती आहेत, त्याच्यांत ओवींच्या संख्येंत एकवाक्यता मुळीं च नाहीं. ह. प. विष्णुबुवा जोग यांच्या प्रतींत एकंदर १० प्रकरणें मिळून ८०६ ओवी आहेत. रा. आण्णासाहेब कुंटे यांच्या प्रतींत ९ वे प्रकरणीं एक ओवी वरच्याहून कमी आहे. ती हीः—

पाहे या अवघेया । रूखा रूखेंचि यया ।
परि दुसरा नाहीं तया । विस्तारु जेवीं ॥ ४२ ॥

प्रकरण ६ यांत हि एक आहे आहे तीः—

सूर्य सूर्यासी विवळे । फळ आपणयां फळे ।
कीं परिमळु परिमळे । घेपतसे ॥ ७८ ॥

या वरील दोन्ही ओवींवर शिवकल्याणांची टीका नाहीं.

रा. थत्ते यांनीं शक १८०४ त व रा. सावंत यांनीं शक १८१९ त ज्या प्रती छापविल्या आहेत त्यांत ९ वे प्रकरणांत एक ओवी ह. प. विष्णुबोवांच्या ग्रंथांतील ओवींहून अधिक आहे तीः—

चूतांकुर जाला कोकिळ । अंगवले मलयानिळ ।
रस जाला रसाळ । रसनावंत ॥

( ग्रंथांत हि परस्परांत पाठभेद आहेत ).

इतका जेथें प्रत्यक्ष ओवींच्या संख्येंत घोटाळा आहे तेथें या निरनिराळ्या पुस्तकांतून असलेल्या भिन्न भिन्न पाठांपैकीं मूळपाठ कोणते व अपपाठ कोणते हे बाह्य साधनावांचून निर्णित करणें अत्यन्त दुष्कर, नव्हे अशक्य होय. आणि अशा स्थितींत अशा ग्रंथांच्या श्रवण, मनन व पठणावरून कोणतीं हि अनुमानें काढणें एक प्रकारें धाष्ट्यांचें होईल. असो.

वर दर्शविलेल्या माझ्या जवळील पोथींत ज्या ओंवी आहेत त्या खालीं देतो.

जे ग्रंथाचा आदि सेवटीं । आणि मध्यभागाचा पोटीं ।
ना ना अधिकार स्फुटीं । अनुभवा चि जे ॥
ते ईतुकें ग्रंथ विस्तारी । निरूपण केले परोपरी ।
पदापद कुसरी । अक्षरांचेनि ॥
तया अक्षरांचा गाभा । अवघें स्वरुप चि शोभा ।
जे आदि अंतु दिग् नभा । माजी परुतें जें ॥
तें क्षराक्षर मात्रुकाक्षरीं । र्‍हस्व दिर्घ ना प्लुत उच्चारिं ।
काना मात्र बिंदुले या परि । विस्तारलें ॥
येसें काना मात्र बिंदुलेनी । अक्षरांचिये उभवणी ।
वोविभागे वोविसुनि । अखंडते ते ॥
तेया तंतु चि महिमा । सुत्रें मणिगणा येसी सिमा ।
जेवि तंतु पटु अंतर्वाहिमा । पटरुप ॥
तेवि सुवस्त्राचि परी । अक्षरांचिये कुसरी ।
शब्दरत्नाचे नि परोपरी । शृंगारिलीं ॥
जेवि अमृताचिये सोटी । ना तरी घृत थीजे घटीं ।
ते कणीकाकार दिसे दीठी । परी घृत चि सगळें ॥
तेवि अनुभवामृत सागरीं । अक्षरें उमळलि परोपरी ।
ते दिसति तरंगाकारीं । सगळेंत ग्रहें ॥
तैसें अमृतानुभव घृत । अक्षेरें कणीकाकारें थीजत ।
शब्दरत्नाचे गरे होत । वोवियां सहित ॥
तेंचि प्रमेय यके जळ । सुख स्वानुभवासि होति कल्लोळ ।
आनंदा आनंदी सुकाळ । सकळपणाचा ॥

तें विवेकाचेन हातें । अनुभवाचि जीभ तेथें ।
सत्ताप्रकाशाचेनि दांतें । चुंबिजे अमृताक्षरें ॥
मन ठेउनि अंतरिं । इंद्रियें घालुनि बाहेरि ।
बुद्धि चित्त अहं हें सारी । निपटुनियां ॥
एवं शुद्ध होउनि स्वप्रकाशा । आळंगीजे तें परियेसा ।
जेवि आकाशिं अवकाशा । तादात्म्य भावो ॥
तैसा आत्मभावें भरला । ब्रह्मगोळ कोंदाटला ।
बाहेरि भीतरी उरला । पुरोनियां ॥
तें चि पुरोनि उरलें । तया नाव अनुभवामृत बोलिलें ।
जेवि चंद्रें उमजविलें । चकोरांसी ॥
तेवि ' त्वं तदसि ' कथन । केलें ब्रह्मनिरूपण ।
जेवि वेदांताचें मथन । उपनिषद्वागें ॥
तें सकळ शास्त्रांचें सार । वेदांताचें गहिंवर ।
पुराणीचा विचार । विचारिजो ॥
जें सकळांचें निजधन । सकळ जाणीवेचें निज ज्ञान ।
ज्ञेयातीत आनंदघन । सत्तामात्र जें ॥
जें सकळ ध्येयाचें ध्येय । सकळ लयाचें लय ।
सकळ बो × चें बे (1) ध्य । स्वयंबोध्य जें ॥
जें सकळ ध्यानाचें ध्यान । सकळ ज्ञानाचें ज्ञान ।
सकळ अंजनाचें अंजन । निरंजन जें ॥
जें सकळ दृशाचें दृश । सकळ रहस्याचें रहस्य ।
सकळ प्रकाश्याचें प्रकाश्य । स्वप्रकाश जें ॥
जें सकळ गुह्याचें गुह्योत्तम । सकळ निरुपमाचें निरुपम ।
गुरुशिश्याचें गुजात्म । अनुपम्य जें ॥
तें चि ये ग्रंथीं प्रस्तुत । जे बोलिले होते श्रीनिवृत्तिनाथ ।
तो चि अनुभवामृतार्थ । ज्ञानदेवो म्हणे ॥
ॐ तत्सदिति श्रीग्रंथ परिपुर्ण । पुर्णपणें ग्रंथ प्रमाण ।
वोवियाचें अनुसंधान । संपुर्ण जाले ॥

१०] या ओवीबद्दल विशेष चर्चा करण्याची माझी इच्छा नाहीं, तथापि अनुकूल प्रतिकूल एक दोन गोष्टी येथें नमूद करून ठेवणें इष्ट वाटतें. १ शिवकल्याणांनीं

आपल्या टीकेंत अनुभवामृताच्या ८०० आठशें च ओवी आहेत म्हणून स्पष्ट नमूद केलें आहे. माझ्या या पोथींत ओवी ८०२ असून शिवाय या वर दिलेल्या अधिक आहेत. इतर सर्वत्र ८०६ अगर ८०८ इतक्या आहेत. म्हणजे मीं वर नमूद केलेल्या अप्रसिद्ध ओवी सोडल्या तर माझे पोथींत ८०२; कुंट्याचे प्रतींत ८०४; विष्णुबोवांचे प्रतींत ८०६; व इतरत्र ८०७।८०८ इतक्या ओवी आहेत.

शिवकल्याणांचा काल त्यांचे च कथनावरून १५५७ चा शक सुमार आहे. ( अमृतानुभवावरील टीका संपली श्रीपंढरपुरे येथें शक १५५७ युवा संवत्सर ). एकनाथमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरी शक १५०६ तारण संवत्सरीं शुद्ध केली; व तींत फेरफार केला. तंजावर येथील शक १५१६ तील श्रीज्ञानेश्वरींत,' ज्ञानेश्वरीपाठी । ओवी करील जो मऱ्हाठी । इत्यादि ही ओवी उपलब्ध होत नाहीं यावरून ) असा च फेरफार जर श्रीज्ञानेश्वरांच्या इतर ग्रंथांत हि त्यांनीं केला असेल तर शिवकल्याणांनीं शक १५५७ मध्यें

यावरी भाषा ओवीबद्ध । अष्टशत मूळ प्रबंध ।
तो दहा प्रकरणीं विविध । विवरिला ग्रंथु ॥ ८ ॥

असें विधान करणें अशक्य नाहीं.

धुळें, आषाढ शु॥ ११/९ } गो० का० चांदोरकर

# १९ श्रीतुकाराममहाराज यांचें सदेहप्रयाण

चमत्काराची परंपरा आमचे कडे उपनिषद् कालापासून आहे. निदान त्या काळच्या उल्लेखांचा अर्थ चमत्कारदर्शक आहे अशी आज समजूत आहे. जड भिंती चालविणें, पशू कडून वेद बोलविणें, व सदेहप्रयाण करणें, हे अर्वाचीन कालचे चमत्कार आहेत. या चमत्कारांचीं वर्णनें अनेक संतांनीं परोपरीनें दिलीं आहेत. तथापि त्यांच्याबद्दल निश्चय कधीं होईल कीं नाहीं हें अनिश्चित आहे. या साधु-संतांच्या पुराव्याच्या ग्राह्याग्राह्यतेंत व्यक्तीव्यक्तींच्या मनोरचनेचा पुष्कळसा भाग असल्यानें मला वाटतें असले चमत्कारांचे प्रश्न नेहमीं संदिग्ध च राहणार.

तुकाराममहाराजांच्या सदेह प्रयाणाचे बाबतींत साधकबाधक अनेक पुरावे मागें येऊन गेले व हल्लीं येत आहेत.

प्रथम तो पाय घातला पाण्यांत । " तुका म्हणे " मात । राहिली ते ॥

यावरून श्रीतुकाराममहाराजांनीं घरींच प्रयाण केलें व त्यांस तत्कालीन साधूंच्या पद्धतीस अनुसरून, कृत्रिम विमानांत घालून जलसमाध दिली, असें एक मत आहे. त्यांनीं आपण होऊन, श्रीनाथ वगैरे संतांनीं जो मार्ग आक्रमिला त्यास अनुसरून देहूचे डोहांत जलसमाध घेतली असें दुसरे प्रतिपादन करतात. महाराज " तीर्थयात्रेस निघून गेले " याचा रूढ अर्थ घेऊन, खरोखर च ते तीर्थयात्रेस गेले असा कित्येकांचा तर्क आहे. तर दुसरे म्हणतात कीं, महाराज गुप्त झाले; व हे सर्व भिन्नमतवादी आपापल्यापरीनें साधक बाधक प्रमाणें देऊन या चमत्काराचा ऊहापोह करतात. मला वाटतें शक ११०० पासून शक १७४०
१८]पावेतों आज उपलब्ध झालेले ग्रंथ ( संतांच्या कृतीचे बाबतींत ) अनुपलब्ध अशा ग्रंथांच्या मानानें अत्यन्त थोडे आहेत; व त्या च मानानें ज्ञानाचा परिघ हि संकुचित आहे. तेव्हां या काळांतील आपलें कर्तव्य अशा सहज श्रद्धा न बसणाऱ्या गोष्टींच्या बाबतींत अथवा इतर बाबतींत होईल तितका साधकबाधक पुरावा नमूद करून ठेवण्यापलीकडे कांहीं नसावें. कारण हा पुरावा जसा जसा चमत्काराच्या कालाचे जवळ जवळ जाऊन पोहोंचेल तसें तसें आपलें तत्संबंधीचें ज्ञान निर्दोष होऊन तद्भुत प्रमेयें हि बिनचूक होतील. कोणत्या पुराणगोष्टीवर आज च शेरा मारण्याची घाई कां व्हावी ? आतां कोणतें हि ज्ञान सान्त नाहीं हें जरी खरें आहे तरी पण ही त्याची अंतिम सीमा ध्यानांत घेऊन अपक्व ज्ञानावर हि इमारत उभारणें हि अयुक्त आहे. तशांत वर नमूद केलेल्या ६०० वर्षांच्या कालासंबंधीं
२०]निराश होण्याचें हि आतां कारण नाहीं. अशीं चिन्हें स्पष्ट दृग्गोचर होताहेत. संशोधनाचें काम करण्याची सुशिक्षितांस स्फूर्ति होऊं लागली आहे व ज्या कालाचें संशोधन करणें आहे तो राष्ट्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे व तसेंच तो काल हि पण अत्यंत पुरातन नाहीं. तेव्हां कोणत्या हि दृष्टीनें निराश होण्याचें कारण नाहीं व तसेंच अधीर होण्याची हि अवश्यकता नाहीं. असो. ह्मणून महाराजांच्या प्रयाणासंबंधीं अगदीं तात्कालीन असा एक पुरावा मी आज नमूद करून ठेवीत आहे. आजपर्यंत उपलब्ध व प्रसिद्ध झालेला असा साधकबाधक पुरावा जरी कोणी एकत्र संकलित करील तरी सुद्धां त्यानें सारस्वताची एक मोठी कामगिरी बजावली असें होईल. आज मी जें काय आपलें पुढें ठेवणार आहे तें एक पद आहे.

३०] हें पद विठ्ठलनाथांचें आहे. विठ्ठलनाथांचा शककाल प्रत्यक्ष असा कोठें हि दिलेला माझे पहाण्यांत नाहीं. पण तो आपल्याला शोधून काढण्यास साधनें मात्र उपलब्ध आहेत. विठ्ठलनाथांची कृति प्रसिद्ध फारच थोडी; म्हणजे सारीं १०

पदें आहेत. उपलब्ध मात्र त्या मानानें बरीच जास्त आहे. त्यांपैकीं 'अश्वमेघ' नांवाच्या ग्रंथांत त्यांनीं असें म्हटलें आहेः—

सद्गुरू माझा गणेशनाथ सारशांत राहतो ।
ऐका रसाळ अश्वमेध विठ्ठलनाथ गातो ॥ २६ ॥

यावरून या विठ्ठलनाथांचे गुरु सारशांत राहणारे गणेशनाथ कोणी होते हें उघड आहे. या सारशांतील गणेशनाथांचा उल्लेख महिपतिबावा व भक्तमंजिरीकार राजारामप्रासादी यांनीं दोघांनीं हि आपले ग्रंथांत स्पष्ट केलेला आहे. पैकीं महिपतिबावांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. व भक्तमंजिरी ही फक्त उपलब्ध आहे. महिपतिबावा आपल्या भक्तिविजयाच्या ५५ वे अध्यायांत गणेशनाथासंबंधीं उल्लेख करतात कीं:— [१०

" गणेशनाथ हे सारसी उज्जन बालेघाटीचे नाथपंथी. शिवाजीराजे पंढरीस असतां वृक्षांस उपदेश करतांना गणेशनाथ त्यांस आढळले. "

या उताऱ्यावरून गणेश नाथांची वर ओळख पटलीच परंतु त्यांचा काळ हि कळला. हे समर्थकालीन होते याबद्दलचा पुरावा भक्तमंजिरीकार हि देतात.

राजारामप्रासादी यांनीं केशवस्वामी भागानगरकर यांचें चरित्र वर्णन केलें आहे त्यांत त्यांनीं असा उल्लेख केला आहे:—

पंढरीस होणाऱ्या स्वामींच्या कीर्तनास रामदास (श्रीसमर्थ), रंगनाथ, निरंजन, गणेशनाथ हे येत असत.

यावरून महिपतिबोवा व भक्तमंजिरीकार यांची दोन गोष्टींत एकवाक्यता आहे. [२०

पहिली गोष्ट अशी कीं ' नाथगणेश ' हे श्रीशिव अथवा श्रीसमर्थकालीन होते व दुसरी गोष्ट ही कीं त्यांचा वास कांहीं काल पंढरींत होता.

इतका भक्कम पुरावा मिळाल्यानंतर आतां गणेशनाथांचें समर्थकालीनत्व आणि विठ्ठलनाथांचें व त्यांचें गुरुशिष्यत्व निःसंदेह शाबीत झालें असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं असें माझें मत आहे.

तेव्हां विठ्ठलनाथांनीं श्रीतुकाराममहाराजांच्या प्रयाणासंबंधी जें काय लिहिलें आहे तें विचार करण्यासारखें आहे हें उघड आहे. आजपर्यंत एक च गणेशनाथ व एक च विठ्ठलनाथ उपलब्ध आहेत, व वरील पुराव्यावरून विठ्ठलनाथांस तुकाराममहाराजांचे समकालीन म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## विठ्ठलनाथांचें पद

जड देह कसा घेउनि गेला तुकाराम वाणी ॥ ध्रु० ॥
भजन पूजन भावबळें । जिंकियलें कळि काळ ।
गर्जताति तिन्ही ताळ । ऐकताति कांनीं ॥ १ ॥
पंढरिचा देव गडि । पाववील पैल थडि ।
विठ्ठलनाथ गरिब गडि । त्यासि कोण मानी ॥ २ ॥

' जडदेह टाकून' आम्ही सर्वच जाउं व आजपर्यंत सर्व गेले. ' जड देह घेऊन' गेला हें सांगण्यांत कांहीं विशेष असल्यावांचुन त्याचें मुद्दाम कोणी वर्णन करणार नाहीं. जलसमाधि घेणें हें आम्हांस आज जरी चमत्कार वाटणारें आहे तरी पैठणास
१०] जाऊन जो शोध करील त्यास असें दिसून येईल कीं नाथांच्या वेळीं जलसमाध घेणें हें कांहीं आश्चर्याचें नव्हतें. तेव्हां तुकाराममहाराजांनीं जलसमाध घेतली हें विठ्ठलनाथांस कांहीं इतकें अश्रुतपूर्व नसलें पाहिजे कीं, ज्यायोगें त्यांनीं इतर साधु-संतांच्या जाण्यांत व तुकाराम महाराजांच्या प्रयाणांत एवढा विशेष पहावा कीं तें प्रयाण त्यांनीं मोठ्या प्रेमानें गावें व तें हि ' जड देह घेऊनि गेला' या शब्दांनीं गावें.

पण मीं जें हें पद वर दिलें आहे तें एका समकालीन संताचा पुरावा म्हणून दिलें आहे. या प्रश्नाचें समर्थन अथवा खंडण करण्याचा माझा हेतु नाहीं.

धुळें,
ज्येष्ठ व. ४।३५

गो. का. चांदोरकर

२०]

# २० चोंभाकवि व संत

मंडळाच्या शक १८३३ च्या अहवालांत या कवीच्या उषाहरण काव्याचीं कांहीं त्रुटित पत्रें छापलीं गेलीं तेव्हां या कवीचें नांव आधुनिक महाराष्ट्रानें प्रथम ऐकलें. श्रीसमर्थांच्या वेळेपर्यंत हा कवि महाराष्ट्राला पूर्ण ठाऊक होता. पण पुढें आपणांस त्याचा विसर कसा पडला कोण जाणें ! शक १६०८ त देवदास होऊन गेले, त्यांना चोंभा कवीची चांगली ओळख होती. चोंभा हे नुसते कवि नव्हते तर संत हि होते. त्यांचा निर्देश रंगनाथस्वामींनीं आपल्या संतमालिकेंत केला आहे ही गोष्ट रा. पोतदार यांनीं आपल्या नजरेस आणली च आहे. रा. राजवाडे

यांनीं देवदासकृत संतमालिका कांहीं वर्षांमागें ग्रंथमाला मासिकांत प्रथम छापली व रा. पोतदार यांनीं निराळ्या प्रतीवरून सदरहु मालिका स्वतंत्र पुस्तकरूपानें गेल्या चैत्रांत छापली. या संतमालिकेंच्या हस्तलिखित प्रती बहुतेक रामदासी मठांतून आढळतात. देवदासांच्या पश्चात् या प्रती कांहीं फार वर्षांनीं झाल्या नाहींत. असें असतां प्रती करणारांच्या हातून पुढील चूक कशी झाली याचें नवल वाटतें.

सदरहु संतमालिकेच्या ७३ व्या ओवीचें प्रथम चरण रा. राजवाडे व रा. पोतदार यांना मिळालेल्या प्रतींत खालीलप्रमाणें आहे.

राजवाडेप्रतः— चाव भाव काम उघेश ।

पोतदारप्रतः— चाऊ भाउ कामेद्देश ।

आणखी एक प्रत उदाहरणार्थ घेऊं. डोमगांव मठांतील बाड अनुक्रमांक १८[१० यांत वरील चरण असा आहेः—

डोमगांवप्रतः— चावभावकामघेश ।

वरील सर्व प्रतींनीं थोडथोडया चुक्या करून आज आपणांस कसें घोंटाळ्यांत पाडलें आहे. आपण आतां रा. राजवाडे यांचा पाठ उदाहरणार्थ घेऊं.

चाव भाव काम उघेश ।

यांत " व " च्यां ठिकाणीं पोतदार प्रतींतील " उ " व " घे " च्या ठिकाणीं डोमगांव प्रतींतील "घे" घालून जरा निराळ्या रीतीनें पदें पाडलीं म्हणजे

चाउभा उका मउघेश ।

असा पाठ मिळतो. आणि हा पाठ आतां

चौंभा येका मुघेश । [२०

असा वाचावयास कांहीं हरकत आहे काय ? आणि तसा च तो तंजावर–भीमस्वामींच्या मठांतील बाड अनुक्रमांक ६ यांत आहे.

अशुद्ध पाठामुळें अर्थाचा अनर्थ कसा होतो, याचें हें एक गमतीदार उदाहरण आहे.

शेवटीं मला इतकें च म्हणावयाचें आहे कीं, श्रीएकनाथांच्या हि पूर्वी होऊन गेलेल्या या संतकवीविषयीं पूर्ण शोध करण्याची ईर्षा संशोधकांना वाटली पाहिजे. व हे चोंभा कोण होते, कोठें व केव्हां होऊन गेले, त्यांनीं कोणकोणते ग्रंथ केले इत्यादि माहिती संशोधकांच्या मंडळानें महाराष्ट्रास करून दिली पाहिजे.

शं. श्री. देव

( संस्काररत्नमाला ग्रन्थाचे कर्ते )

## २१ गोपीनाथ दीक्षित ओक यांचें एक पत्र

" श्रीः

श्रीमद्राघोजिनामाकृतरिपुदलनोंगारकोपाभिधानो
राज्ञा दत्ता तु यस्मै सरखिलपदवी शोभते तत्पदव्या ।
शौर्यौदार्याद्यनेकैर्विविधगुणगणैः शोभमानः प्रभुर्यः
तं त्वां पायादजस्रं तुहिनगिरिसुतानंदनः सिद्धिभर्त्ता ॥ १ ॥

स्वस्ति श्रीमद्रमोमारमणभजनपराय-
णासीमानुपमसद्गुणगणमंडित सत-
तविविद्वद्वृंदप्रतिपालक धर्मस्थापक सर-
खेलाभिधपदवीविराजमान अंगारकोपा-
भिधानक रघुनाथाभिध प्रभुवर्येषु

कृपेक्षु गणवर्यकृपापीयूषरसास्वादेक्षुकौकोपाख्य गोपीनाथ दीक्षितकृतानेका आशीराशिततयः समुल्लसंतु विशेषस्तु पौष शुक्ल प्रतिपदवधि यथातथमवगंतव्यं उदंतस्तु भाषया पत्रलेखन कारण ऐसें जें आमचा चित्तामध्यें हें कीं श्रीवक्रतुंडदर्शन घ्यावें यानिमित्त आपल्या प्रांतांत यावयाविषई चित्त उद्युक्त आहे यास प्रस्तुत यावें तर अग्निहोत्र स्वीकार करून संवत्सर संपूर्ण जाहाला नाहिं चैत्र शुद्ध अष्टमीस संवत्सर होतो संवत्सर संपूर्ण जाहाल्यावाचून आपत्तिविना सीमातिक्रम करून जातां न ये यास्तव प्रस्तूत येतां न ये प्रस्तूत आपत्ति ही नाहिं कळावे अनाखि विशेष वे॥ बाळंभट्ट अग्निहोत्री हे पुण्यामध्यें आले यांची ही भेट जाहाली फार थोर शिष्ट सदाचारादिसंपन्न ज्या विषयानिमित्त ते पुण्यास आले तो विषय ध्यानास आला शेणव्याचे येथें श्राद्धादिविषई काशीमध्यें सकल शिष्टांची प्रवृत्ति आहे तेव्हां अग्निहोत्र्यानी ती प्रवृत्ति पाहून तुमचे प्रांती ही अशी च प्रवृति ही आहे असे श्रावणामध्यें आहे असें असतां दोषाक्षेपाचा संबंध नाहीं सूचनार्थ लिहिलें असे सूज्ञ प्रभुप्रति बहुत काय लिहिणें निरंतर कृपाभिवृद्धि करीत असावें हे अनेक आशीर्वाद

× × ×

असें एक बाळबोध अस्सल पत्र चउलास एका सद्गृहस्थाकडे मिळालें. गोपीनाथ दीक्षितांचे वैदिक ब्राम्हणांवर अनंत उपकार आहेत, तेव्हां त्यांचें हें पत्र वाचण्यांत हि एक प्रकारचा आनंद आहे.

पत्रावरून शकाचा निर्णय होत नाही. तें रघोजीराव आंगरे यांस लिहिलेलें आहे. रघोजीरावांची कारकीर्द शके १६८० पासून १७१५ पर्यंत होती व दीक्षितांनीं हि आपला सर्वमान्य ग्रन्थ शके १६८७ त संपविलेला आहे. या पत्रावरून पुढील बोध होतो:—

( १ ) रघोजीराव आंगरे यांची योग्यता त्यांना दिलेल्या विशेषणांवरून कळते.

( २ ) गणपति हें दीक्षितांचें इष्ट दैवत च होतें. तेव्हां वक्रतुंडदर्शनाविषयीं त्यांना आतुरता वाटणें साहजिक आहे.

( ३ ) चैत्र शुद्ध अष्टमीस दीक्षितांनीं अग्निहोत्राचा स्वीकार केला होता.

( ४ ) अग्निहोत्र घेतल्यानंतर एक संवत्सर आपत्तीविना सीमातिक्रम करूं नये.

(५) दीक्षित नेहमीं काशीस असत, पण त्यांनीं पुण्यास येऊन अग्निहोत्र घेतलें.

( ६ ) थोर शिष्ट सदाचारादिसंपन्न ब्राह्मणांना रघोजीरावांचा आश्रय असे व अशा ब्राह्मणांपैकीं च वे. शा. सं. बाळंभट्ट अग्निहोत्री हे एक होते.

( ७ ) शेणव्यांच्या येथें श्राद्धादि विधि करावा कीं न करावा असा चउलास वाद पडला होता.

( ८ ) अशा धार्मिक वादांचा हि निर्णय त्या काळीं पेशव्यांच्या राजधानीस होत असे.

( ९ ) शेणव्यांचे येथें श्राद्धादिविषयीं काशीमध्यें सकल शिष्टांची प्रवृत्ति होती.

(१०) कुलाबा प्रांतांत हि तशी प्रवृत्ति होती.

(११) प्रस्तुतचा वाद अकारण आहे असें दीक्षितांनीं 'सूचनार्थ लिहिलें असें.

या पत्राचा रा. राजवाडे यांना हि थोडासा उपयोग होणार आहे. मंडळाच्या गेल्या वार्षिक संमेलनप्रसंगीं रा. राजवाडे यांनीं "भारतीय आर्यवंश" म्हणून एक अत्यंत उपयुक्त निबंध वाचला होता. गोत्रनामांवरून आडनांवें कशीं पडलीं असावीं याचें सदरहु लेखांत त्यांनीं केलेलें विवेचन अगदीं नवीन आहे. त्या निबंधांत "आंगरे" हें आडनांव "आंगिरसाः" या गोत्रनामावरून निघालें अशी उपपत्ति त्यांनीं गोत्र १७४ वें व ३४२ वें या दोन ठिकाणीं दिलेली आहे. परंतु वरील

पत्रांत दीक्षितांनीं "आंगरे" यांचें "अंगारक" असें उपाभिधान दोन ठिकाणीं दिलें आहे, तें रा. राजवाडे यांना विचारांत ध्यावें लागेल, असें वाटतें.*

शं. श्री. देव.

## २२ पेशव्यांच्या ग्रामदेवता व कुलदेवता

श्रीमंत दादासाहेब ओंकार यांचे दप्तरांत वाकेनीस (ठोसर) यांचे कांहीं कागदपत्र सांपडले त्यांत लेखांक १ चा कागद मिळाला व लेखांक २ चा कागद रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनीं कर्व्यांच्या दप्तरांतील दिला. पेशव्यांच्या कुलदेवता व ग्रामदेवता मिळून एकंदर १५ आहेत.

लेखांक १ मध्यें अखेर बेरीज २५ दिली आहे. ती चुकीची आहे. देवता फक्त १०]१५ आहेत. व ह्या देवतांना नवरात्रादि प्रसंगीं किती वेळां नैवेद्य दाखवावयाचे त्याचे आंकडे त्या त्या प्रसंगाचे नांवावर दिलेले आहेत. श्रावणीचे दिवशीं फक्त एक नारळ फोडीत असत व गुळाचा नैवेद्य असे.

लेखांक २ मध्यें उल्लेखिलेले बाजीराव हे कोणते असावेत याबद्दल त्यावर मित्ती शक वगैरे कांहींच नसल्यामुळें समजत नाहीं. लेखांक १ मध्यें असलेल्या देवतांचा यांत उल्लेख असून शिवाय समस्तकुलदेवता म्हणून एक सदर जास्त आहे.

लेखांक १

श्री

यादी ग्रामदेवता वगैरे देवतास नैवेद्य घालावयाचे ते

१५ नवरात्रांत व कार्यप्रयोजनी घालावयाचे तपसीलवार

२०] १ उतरेश्वर कुलस्वामी

१ जोगेश्वरी कुलस्वामी

१ महालक्ष्मी कोलापुरवासिनी

१ हरीहरेश्वर वस्ती हरेश्वर

---

* दीक्षितांनीं आंगरे याचें संस्कृतीकरणानें अंगारक असें रूप बनविलें इतकें च. आंगिरसाः हेंच खरें रूप व तें आजवर अज्ञात होतें.

१ कालभैरव वस्ती हरेश्वर
६ गणपती हरेश्वराचा
१ भैरव वस्ती श्रीवर्धन
१ जिवनेश्वर वा। श्रीवर्धन
१ लक्ष्मीनारायण वा। श्रीवर्धन
१ स्थानपुरुष वा। श्रीवर्धन
१ सोमजाई वा। श्रीवर्धन
१ कुसुंब देव वस्ती श्रीवर्धन
१ वाघ देव दिव्याचा
१ कालेश्वरी पुजाऱ्याची १०
१ काळकाई मघऱ्याची

१५

२ नवरात्रांत दसऱ्यापावेतो
१ दिपवाळीचे पाडव्यास
१ वर्षप्रतीपदेस
१ सिमगी पौर्णिमेस
१ व्रतबंधास
१ विवाहास
१ आन्यत्र पुण्याहवाचन दिवसी- श्रावणीचे व शात्योदक मात्र खेरीजकरून [२०
१ मखादिक कर्माचे दिवसी
१ श्रावणीचे दिवसीचे दिवसी स्थान पुरुषाचे नावे नारळ एक फोडावा व गूळ पावशेर वजनाचें प्रमाण नाहीं

२५

लेखांक २

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ अद्येत्यादि० प्राप्त्यर्थं गार्ग्यगोत्रोत्पन्नेन बाजीरावशर्मणा मम यजमानेन अनुज्ञातोहं तत्पुत्रस्य भाविव्रतबंधकर्मणः निर्विघ्नतासिद्ध्यर्थं प्रथमं तद्ग्रामदेवताभ्यः कुलदेवतादिभ्यश्च तांबूलसमर्पणं अक्षतसमर्पणं च करिष्ये ॥

१४

१ श्रीलक्ष्मीनारायणाय सांगाय सपरिवाराय तांबूलं स०
१ श्रीस्थानपुरुषाय नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीकालभैरवाय नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीकुसुमादेव्यै नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीमहालक्ष्म्यै नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीउत्तरेश्वराय नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीभैरवाय नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीकालश्रियै नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीगणपतये नमः तांबूलं समर्पयामि
१ श्रीकालिकायै नमः तांबू०
१ श्रीजीवनेश्वराय नमः तांबूलं०
१ श्रीसोमजाईदेव्यै नमः तांबूलं०
१ श्रीयोगेश्वर्यै नमः तांबूलं०
१ श्रीहरिहरेश्वराय नमः तांबूलं०
१ श्रीचावदेवाय नमः तांबूलं०
१ श्रीसमस्तकुलदेवताभ्यो नमः तांबूलं०

ग. ना. मुजुमदार.

## २. देवानंपिय

१ देवानंपिय व पियदसि हे दोन प्राकृत शब्द अशोकाच्या शिलाशासनांत येतात. पैकीं, देवानंपिय ह्या पांच अक्षरांसंबंधानें विवेचन करतों. हीं पांच अक्षरें जुळून लिहिलीं तर ह्या पांच अक्षरांचा एक सामासिक शब्द होतो. ह्या पांच अक्षरांतून पहिलीं तीन अक्षरें जुळून निराळीं लिहिलीं, म्हणजे देवानं व पिय असे दोन व्यस्त शब्द होतात. आतां अशोकाच्या शिलाशासनांत पांच हि अक्षरें मिळून एक च सामासिक शब्द मूल लेखकानें मानिलेला होता किंवा देवानं व पिय असे दोन शब्द मानिले होते, तें शिलालेखांवरून स्पष्ट होत नाहीं. शिलालेखांत प्रायः एकापुढें एक सारखीं अक्षरें लिहिलीं असल्यामुळें; समास आहे कीं व्यास आहे हें प्रथम दर्शनीं सांगणें अवघड जातें. तेव्हां, आपल्याला एक च तोड राहते. समास मानून अर्थ काय होतो व संदर्भाला कितपत जुळतो हें पहावयाचें; किंवा व्यास मानून

अर्थ काय होतो व संदर्भाला कितपत जुळतो हें पहावयाचें. पैकीं समास मानून अर्थ काय होतो, तें प्रथम पाहूं. देवानंपिय या प्राकृत सामासिक शब्दाचें संस्कृत रूप देवानांप्रिय. देवानांप्रिय ह्या संस्कृत सामासिक शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक, मूर्ख हा अर्थ; व दुसरा देवप्रिय हा अर्थ. दिव् धातूचे दोन अर्थ होतात, (१) खेळणें व (२) प्रकाशणें. पैकीं, खेलनार्थक दिव् पासून निघालेल्या देव शब्दाचा अर्थ जुगारी असा होतो; व प्रकाशनार्थक दिव् पासून निघालेल्या देव शब्दाचा अर्थ निर्जर असा होतो. पहिल्या पक्षीं देवानांप्रिय या सामासिक शब्दाचा अर्थ जुगाऱ्यांचा लाडका, अतएव निंद्य, मूर्ख असा निंदार्थक होतो; व दुसऱ्या पक्षीं अमरांचा लाडका, अतएव पूज्य असा स्तुत्यर्थक होतो. दोन्ही अर्थ अशोकाच्या कालीं प्रचलित होते, हें उघड आहे. स्तुत्यर्थानें यद्यपि कोणीं देवानांप्रिय हा सामासिक शब्द आपल्याला लावून घेतला, तत्रापि ऐकणाऱ्याच्या मनांत त्या समासाचा मूर्ख हा निंदार्थ उठण्यासारखा आहे. तेव्हां, हा द्व्यर्थक सामासिक शब्द अशोकानें आपल्याला लावून घेतला असेल, असें मानण्याकडे प्रवृत्ति होत नाहीं. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, देवानांप्रिय ह्या शब्दाचा लाक्षणिक अर्थ मूर्ख असा अशोकाच्या नंतर झाला, अशोकाच्या कालीं त्याचा देवप्रिय हा एक च वाच्यार्थ होता. पतंजलि, शंकराचार्य व बाण यांनीं देवानांप्रिय हा सामासिक शब्द स्तुत्यर्थक योजिलेला आहे, तेव्हां अशोकानें हि तो स्तुत्यर्थक च योजिलेला आहे, असें हि कित्येकांचें म्हणणें आहे. ह्या म्हणण्यानें देवानांप्रिय ह्या शब्दाच्या मीं दाखविलेल्या द्व्यर्थत्वाला कोणत्याही प्रकारचा बाध येतो असें दिसत नाहीं. अशोक, पतंजलि, बाण यांनीं प्रकाशनार्थक दिव् धातूपासून निघालेला स्तुत्यर्थक देवानांप्रिय समास योजिला असेल व प्रकरणानुरोधानें ऐकणाऱ्याच्या किंवा वाचणाऱ्याच्या मनांत स्तुत्यर्थ संदर्भानें उद्भवूं हि शकेल. परंतु, निंदार्थ अगदीं उद्भवूं शकणार नाहीं, असें नाहीं. पतंजलि, शंकराचार्य व बाण, ह्यांनीं हा शब्द संदर्भानुरोधानें स्तुत्यर्थक योजिला असल्यामुळें, त्यांची गोष्ट सोडून देऊं. अशोकानें प्रौढीनें व सद्भावानें हे विशेषण आपल्याला लावून घेतलेलें आहे; तेव्हां वाचणाऱ्याच्या किंवा ऐकणाऱ्याच्या मनांत देवप्रियतेच्या बरोबर मूर्खत्वाचा हि अर्थ उठण्यासारखा आहे. विशेषतः वाचक किंवा श्रोता जर विरोधिपक्षाचा किंवा थट्टेखोर स्वभावाचा असेल, तर दोन्ही अर्थ त्याच्या मनांत उद्भवून, त्याच्या मुखावर हास्याची छटा तेव्हां च उमटेल. प्रत्यन्तरार्थ एक उदाहरण घेऊं. समजा कीं, भगवान् बुद्धानें आपल्याला सिद्धार्थ हें नांव घेतलें व तें सद्भावानें घेतलें. निरनिराळ्या श्रोत्यांच्या मनावर ह्या शब्दाच्या श्रवणानें काय भावना उमटतील तें पहा. श्रोता जर बुद्धानुयायी असेल, तर सिद्धार्थ शब्दानें चारी अर्थ ज्याचे सिद्ध झाले आहेत अशा थोर पुरुषाची कल्पना त्याच्या मनांत

उभी राहील. परंतु, श्रोता जर बुद्धविरोधी असेल, तर सिद्धार्थ म्हणजे फोडणी देण्याची मोहरी असा अर्थ करून, तो चार थट्टेखोर लोकांत बरा च हंशा पिकवील. असा हंशा उत्पन्न होऊं नये म्हणून च कीं काय, अमरसिंहानें बुद्धाच्या नाममालिकेंत सिद्धार्थ हा शब्द न घालतां, त्याचा पर्याय शब्द जो सर्वार्थसिद्ध तो घातला आहे. सिद्धार्थो मत्स्यं चखाद, हें वाक्य ऐकून, ( १ ) बुद्धानें मासा खाल्ला हा अर्थ जसा भाविकाच्या मनांत उद्भवेल, तसा च ( २ ) मोहरीनें मासा खाल्ला, हा अर्थ विरोधी थट्टेखोराच्या मनांत उद्भवल. ग्रंथांतून सिद्धार्थ शब्द येतो, परंतु द्व्यर्थ्यानें तो थट्टेस पात्र होईल, हें त्या ग्रंथकारांच्या ध्यानांत यद्यपि आलें नाहीं, तत्रापि तें अमरसिंहाच्या ध्यानांत आलें व त्यानें तो शब्द मुद्दाम गाळला, असें मला वाटतें. तो च प्रकार अशोकाचा कां न व्हावा ? प्रायः झाला असावा; व त्यानें देवानांप्रिय हा शब्द सामासिकभावनेनें योजिलेला नसावा, व्यस्तभावनेनें योजिलेला असावा.

२ वरील पृथक्करणानें एवढें निश्चित झालें कीं देवानंपिय असा समास धरून अर्थ नीट बसत नाहीं, संशयाला जागा रहाते. तेव्हां व्यस्त पदें धरून काय अर्थ निष्पन्न होतो तें पाहूं. दे वा नं पि य ह्या एकापुढें एक येणाऱ्या पांच अक्षरांचे असे दोन भाग पाडले असतां, दोन अर्थ निष्पन्न होतात. देवानां प्रियः हा एक अर्थ व देवेभ्यः प्रियः हा दुसरा अर्थ. प्राकृतांत चतुर्थीचें काम षष्ठी करते. देवानांप्रिय म्हणजे देवांचा लाडका व देवेभ्यः प्रियः म्हणजे देवांना लाडका. दोन्ही विभक्ती घेतल्या तरी मतलब एक च. देवानां प्रियः म्हणजे liked of the gods व देवेभ्यः प्रियः म्हणजे dear to the gods. ह्या दोन्हा अर्थांतून व्हिन्सेन्ट स्मिथ्चा Sacred हा अर्थ वाटेल तितकी ओढाताण केली तत्रापि निघत नाहीं. आपल्या Early History of India, 2nd. Ed. P.166-Note मध्यें स्मिथ् येणें प्रमाणें लिहितोः— "His Sacred and Gracious Majesty" is a fair equivalent of देवानंपिय पियदसि which words formed an official title and cannot be rendered faithfully by etymological analysis.

स्मिथ्नें Sacred हा अर्थ कित्येक यूरोपीयन राजांच्या बिरुदावळींच्या उपमानांवरून काढिलेला आहे. इंग्लंडचे राजे आपणास धर्माचे व संस्थानाचे मुख्य समजतात व स्वतःस Sacred, High, Gracious वगैरे बिरुदें लावितात. तो च प्रकार अशोकानें केला असावा, असें स्मिथ्ला वाटलें इतकें च. परंतु स्मिथ्नें एक च गोष्ट ध्यानांत घ्यावयाची होती, ती ही कीं, इंग्लंडांतल्याप्रमाणें भारतवर्षांत धर्माचें आदिस्थान राजाच्या ठायीं कधीं हि व कोणीं हि मानिलेलें

नाहीं. धर्माचें आदिस्थान भारतवर्षांत फार पुरातन कालापासून वेदादिग्रंथांच्या व त्यांचा आशय सांगणाऱ्या धर्मगुरूंच्या ठायीं अधिष्ठापिलेलें आहे. इंग्लंडांतल्याप्रमाणें भारतवर्षांत धर्म हा राजाचा अंकित नाहीं; राजा धर्माचा अंकित आहे. भारतवर्षांत वस्तुतः राज्य कोणाचें ? तर धर्माचें. मोठमोठ्या राजांच्या व महान् महान् महंतांच्या अशा उक्ती आहेत कीं, भारतवर्षांत धर्मराज्य आहे. या धर्मराज्याचीं, पुरोहित, राजा, अमात्य, दुर्ग, बल, कोश वगैरे अंगें आहेत. म्हणजे भारतवर्षांत राजा हा धर्मराज्याचें एक अंग आहे. इंग्लंडांतल्याप्रमाणें धर्माच्या वरती अधिकार करणारा नाहीं. तेव्हां, स्मिथ् म्हणतो त्या अर्थानें Sacred हें विशेषण अशोक आपणा स्वतःला खुळ्यासारखा लावील, हें बिलकुल संभवत नाहीं. आपण देवांचे किंवा देवांना लाडके आहोंत, असें अशोक स्पष्ट म्हणतो. ह्या म्हणण्याचा आशय काय ? इतर माणसें काय देवांचीं लाडकीं नाहींत कीं अशोकानें च तेवढी आपल्या लाडकेपणाची फुशारकी मिरवावी ? तर तसें नाहीं. अशी फुशारकी अशोक मिरवीत नाहीं. अशोक एका वैदिक संप्रदायाला अनुसरून हे शब्द वापरीत आहे. भारतीय आर्यकुलांत फार पुरातन कालापासून असा एक संप्रदाय आहे कीं, आपलें पाळण्यांतील खरें नांव कोण्या हि आर्यानें प्रकट करूं नये; एखाद्या टोपण नांवानें आपली प्रथा करावी किंवा निदान मूळ नांवांत थोडा तरी फेरबदल करून मग तें प्रकट करावें. ह्याविषयीं सूत्रांतून स्पष्ट उल्लेख आहेत व हिंदुस्थानांत हा संप्रदाय अद्याप हि विद्यमान आहे. ऐतरेयोपनिषदाच्या तृतीय खंडाच्या शेवटीं ह्या पुरातन संप्रदायाचें एक नामांकित उदाहरण दिलें आहे. त्याला ब्रह्म दिसलें. तेव्हां इदं अदर्शम् असे उद्गार त्यानें काढिले. ह्या उद्गारावरून त्याचें नांव इदंद्र असें पडलें. त्या इदंद्राला परोक्षत्वानें सर्व देव इंद्र असें म्हणूं लागले. कां कीं, देव परोक्षप्रिय आहेत. प्रत्यक्ष जें इदंद्र हें अक्षरत्रयात्मक नांव तें परोक्षप्रिय देवांना आवडलें नाहीं, एतदर्थ त्यांनीं इंद्र हें अक्षरद्वयात्मक परोक्ष नांव पसंत केलें. " तं इदंद्रं सन्तं इंद्र इति आचक्षते परोक्षेण, परोक्षप्रिया इव हि देवाः । " ह्यांत, देव हे परोक्षप्रिय आहेत, ही गोष्ट प्रामुख्यानें लक्ष्यांत ठेवावयाची आहे. पशू जे आहेत तें प्रत्यक्षप्रिय असतात. म्हणजे इंद्रियांना जें सहज गोचर होईल तें पशूंना किंवा पशुतुल्य द्विपादांना पसंत किंवा प्रिय होतें. परंतु जे देव आहेत, जे ज्ञानी आहेत, त्यांना परोक्ष जें अनुमानादिप्रमाणजन्य ज्ञान तें प्रिय असतें. असें जे परोक्षप्रिय देव त्यांनीं इदंद्र हें जें प्रत्यक्ष नांव त्यांत फेरबदल करून इंद्र असें परोक्ष नामाभिधान पसंत केलें. आतां अशोकाच्या शिलाशासनांतील देवानं प्रिय पियदसि राजा या शब्दांत हा पुरातन संप्रदाय कसा प्रतीत होतो तें पहा. अशोकाचें मूळ पाळण्यांतील नांव अशोक. हें प्रत्यक्ष नांव स्वतः उच्चारणें किंवा योजणें पुरातन संप्रदायाच्या विरुद्ध. सबब

पियदसि ह्या परोक्ष नांवाचा अशोकानें उपयोग केला आहे. उपयोग करतांना असा परोक्ष नांवाचा उपयोग कां केला तें हि अशोक देवानंपिय ह्या शब्दांनीं व्यंजीत आहे. देवानां म्हणजे परोक्षप्रियाणां प्रियः अहं, असें अशोक व्यंजीत आहे. परोक्षप्रिय जे देव त्यांचा प्रिय जो परोक्ष नांवानें प्रथित पियदसि राजा तो असा हुकूम करतो इ. इ. इ. शिलाशासनांत अशोक असें नांव अशोकानें कोठें हि कोरवलेलें नाहीं; पियदसि हें परोक्ष नांव च तो स्वतः सदा योजीत असे. कारण, तसा संप्रदाय भारतवर्षांत फार प्राचीन काळापासून होता. तात्पर्य, प्रियदर्शिन्, पियदसि, हें अशोकाचें परोक्ष नांव आहे. स्मिथ् म्हणतो त्याप्रमाणें पियदसि ह्या शब्दाचा अर्थ gracious असा नाहीं. मूळीं हें विशेषण नाहीं. हें विशेषनाम आहे. दीपवंशांत अशोकाला पियदसि ह्या च नांवानें उल्लेखिलेलें आहे. दीपवंशांत असा प्रयोग व प्रकार झालेला आहे, हें हि स्मिथ् विसरला आहे व अज्ञानानें gracious असें भाषान्तर करता झाला आहे.

३ स्मिथ् ज्याप्रमाणें पियदसि या शब्दाचा अर्थ गाफिलपणानें Gracious असा करतो, त्याप्रमाणें च इतर कित्येक लोक या शब्दाचा अर्थ Seeing bliss, आनंद पाहणारा असा तितक्या च गाफिलपणें करतात. खरा अर्थ असाः— परोक्षप्रियाः देवाः । परोक्षं प्रियं येषां ते परोक्षप्रियाः । देवांना परोक्ष हें प्रिय आहे. तें परोक्ष अशोक पहातो. तेव्हां तो देवांना जें प्रिय तें पहातो. अर्थात् अशोक देवांना प्रिय असणार च. तेव्हां प्रियदर्शिन् याचा अर्थ Seeing inferentially असा आहे. अशोक हा साध्या प्रत्यक्ष तेवढ्या गोष्टी पाहून राज्य हांकणारा नव्हता. तर परोक्ष अनुमानानें विचक्षणा व अन्वीक्षण करून राज्यकारभार शिताफीनें चालविणारा धुरंधर मुत्सद्दी होता. ही गोष्ट प्रियदर्शिन् या शब्दानें व्यक्त होते. यद्यपि प्रियदर्शिन् या शब्दांत असा खोल अर्थ आहे, तत्रापि अशोकानें हा शब्द आपलें विशेषनाम केलें आहे व प्राचीन संप्रदायाचा बोज राखिला आहे. चाणक्यानें आन्वीक्षिकी विद्येचे मोठे गोडवे गायिले आहेत ते कौटिलीय अर्थशास्त्र या नांवाच्या नुकत्या च प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत पहावे.

४ आतां देवानं पिय पियदसि राजा या शब्दांचें भाषांतर करूं. देवांना लाडका जो पियदसि नांवाचा राजाः King पियदसि beloved of the Gods स्मिथ्चें Sacred and Gracious Majesty हें भाषांतर ह्यापुढें त्याज्य व दुष्ट मानावें हें उचित आहे.

वि. का. राजवाडे.

# २४ व्याडि-संग्रह

पाणिनीयावर संग्रहनामक ग्रंथ करणारा जो व्याडि त्याचा हा संग्रह-ग्रंथ पतंजलिकृत महाभाष्याच्या अगोदर लुप्त झाला व ती उणीव भरून काढण्याच्या हेतूनें पतंजलीनें महाभाष्य रचिलें, वगैरे दंतकथा विद्यमान वैयाकरणांत प्रचलित आहे. परंतु, ही दंतकथा खालील उल्लेखावरून अविश्वास्य असावी असें ह्मणण्यास वाव होतो. बाणभट्ट हर्षचरितांच्या तृतीय उल्लासांत व्याडिकृत संग्रहाचा येणेंप्रमाणें उल्लेख करितोः—

"तच्छ्रुत्वा बाणस्य चत्वारः + + + + + भ्रातरः प्रसन्नवृत्तयः गृहीतवाक्या, कृतगुरुपदन्यासाः न्यायवेदिनः सुकृतसंग्रहाभ्यासगुरवो लब्धसाधुशब्दा लोक इव व्याकरणेपि"

येथें सुकृतसंग्रहाभ्यासगुरवः या पदांत व्याडीच्या संग्रहनामक ग्रंथाचा अभ्यास बाणाच्या चार भावांनीं केला होता, असें ह्मटलें आहे. संग्रह ह्मणजे व्याडिकृतग्रंथ असें विवरण शंकर टीकाकारानें केलें आहे. सुकृतः चासौ संग्रहश्च सुकृतसंग्रहः । तस्य अभ्यासेन गुरवः महान्तः । उत्तमोत्तम रचलेल्या व्याडिकृत संग्रहग्रंथाच्या अभ्यासानें जे उपाध्याय या महान् पदाला पोहोंचलेले आहेत, असा सुकृतसंग्रहाभ्यासगुरवः या पदाचा अर्थ होतो. Cowell and Thomas ह्यांनीं ह्या समस्तपदाचें भाषांतर 'deep in the study of able works असें केलें आहे व त्यांच्या गाढ अज्ञानाचें पूर्ण दर्शक आहे. असो; Cowell आणि Thomas यांशीं सध्यां कांहीं कर्तव्य नाहीं. बाणानें संग्रहग्रंथ, व्याडीचा संग्रहग्रंथ आपले चार भाऊ पढले होते असें ज्याअर्थी स्पष्ट ह्मटलेलें आहे, त्याअर्थी बाणाच्या कालीं ह्मणजे शक ६०० त व्याडीचा संग्रह हयात होता, हें उघड आहे.

वि. का. राजवाडे.

# २५ मुकुंदराजाचा एक संस्कृत ग्रंथ

१ वऱ्हाडांत चिंचेचें कारंज नांवाचें एक मध्यम शहर आहे. तेथें प्रस्तुत पोथी सांपडली. कारंजें इतिहासदृष्ट्या पुण्यतीर्थ आहे. कारण, शिवाजीमहाराजांनीं हें

एकदां लुटलें होतें. हुबळी, सुरत, बार्सिलोर इत्यादि सुवर्णशिलांप्रमाणें च कारंजें हि उद्धारार्थ शिवपादस्पर्शाची वाट च पहात होतें. फार पुरातन कालापासून हें शहर व्यापाराची उतारपेठ आहे. येथें अगणित संपत्ति त्या काळीं सांठली होती आणि स्वातंत्र्यार्थ प्रयत्न करणाऱ्या वीराच्या गळ्यांत माळ घालण्यास उत्कंठित झाली होती.

२. ह्या पोथीचें नांव **परमार्थतत्वप्रबोध** असें पूर्वार्धाच्या समाप्तींत दिलें आहे व **महाभाष्य** असें उत्तरार्धाच्या समाप्तींत दिलें आहे. पोथीचीं एकंदर पानें ३९ आहेत. पूर्वार्धाची समाप्ति अशीः—

"इति श्रीसकलयोगीश्वराचार्यश्रीहरिनाथचरणारविंदानवरताशि(शु)श्रूषाप्रसादलब्ध-ज्ञानतरणिकिरणश्रेणीनिरस्तसमस्तविद्यांधकारश्रीरामनाममुनींद्रचरणारविंदमकरंदास्वादमधुव्रतेन निरस्ताखिलसंसारविकारेण श्रीमुक्तिनाथमुकुंदमुनिना विरचितो निखिलाज्ञानवनदहनपटुः परमार्थतत्वप्रबोधः संपूर्णमस्तु ॥छ॥ श्रीकृष्ण ॥ इ. इ. इ."

उत्तरार्धाची समाप्ति अशीः—

वेदान्तसारसर्वस्वं पापंडा नैव मान्यते ॥
किं जानीयुरिमे पापा हताः स्वीयासदुक्तिभिः ॥ १ ॥
पाषांडानामभक्तानां नृणामुत्पथगामिनाम् ॥
एतद्विज्ञानसर्वस्वं मतिमान्न प्रकाशयेत् ॥ २ ॥
शुद्धानां गुरुभक्तानां श्रद्धालूनां दयावताम् ॥
सुशीलानां सुशिष्याणां शास्त्रमेतत्प्रकाशयेत् ॥ ३ ॥
आत्मज्ञानैकमूले भवसलिलनिधौ क्लिष्य(श्य)मानान्मनुष्यान् ।
दृष्ट्वा ज्ञानोपदेशात्सकरुणहृदयाक्रांततत्तारणेच्छुः(च्छुः) ॥
विष्णुर्भूमौ युगेस्मिन्हरिरिति गदितः प्राप्तमाध्यंदिनीय- ।
स्वाध्यायप्रोक्तसर्वस्ववितरणजनित(?)ख्यातिरग्रेवतीर्णः ॥ ४ ॥
जानानेन सताप्ये(प्यनो)न तपसा त्वाराधितः शंकरः ।
पूर्णाहुत्यवसानहोमसमये प्रादुर्बभूव क्षणात् ॥
अग्नेरर्चिरिवापरः प्रकटितो ज्ञानैकमूर्तिस्तदा ।
मत्तः किं त्वमभीप्ससीत्यभिदधे तस्याग्रतस्तच्छि(स्थि)वान् ॥ ५ ॥
तत्तस्योपदिदेश सांगमखिलं यत्नेन जिज्ञासितं ।
मोदं मेदुरयन्नुवास च पुरः स्वांते च तत्स्थः क्षणं ॥

पार्वत्या सहितः शिवः शिववपुस्तास्मिन्पुरस्तात्स्थिते ।
पश्यत्येव सविस्मये सकुतुके क्षिप्रं किलांतर्दधे ॥ ६ ॥
वेदांतप्रतिपाद्यतत्त्वमहसो ज्ञात्वादिनाथाद्धरिः ।
सच्छिष्यानधिकारिणो बहुतरान्संबोध्य तत्त्वं परं ॥
तन्मध्ये गुणवत्तरं वितमसं श्रीरामनाथो मुनिं ।
साम्राज्येभिषिषेच योगविधिना पादान्वितं योगिनां ॥ ७ ॥
ज्ञाने कस्याधिकारो भवति बहुतरः स्वेषु शिष्येषु मध्ये ।
ध्यात्वैवं स्वेन चित्ते सकलगुणनिधिं श्रीमुकुंदं मुनीशं ॥
निश्चित्यार्थान्वगृण्हन्(?) निखिलमपि तदाज्ञानसर्वस्वमस्मै ।
सच्छिष्यायोपदिष्टं प्रसरति बहुशः किं च संचीयते च ॥ ८ ॥
तच्छिष्यत्वमवाप्य सम्यगखिलान् मायोक्ततत्वार्थ विभु- ।
त्वमंकृतवाद्मं(?) महिमा श्रीमान्मुकुंदो मुनिः ॥
शिष्येष्वन्येषु सर्वेष्वहमधिककृपावानस्यास्मि(?) जातो ।
ग्रंथं मद्बोधसिद्ध्यै कुरु बहुसुगमं ज्ञानसर्वस्वसारं ॥
एवं विज्ञापितः सन् अवनतशिरसा जित्यपालेन धीमान् ।
सद्यो(द्यः)कृत्वा हि तस्मै सकरुणहृदयः श्रीमुकुंदो मुनींद्रः ॥ ९ ॥
ॐ तत्सत् श्रीमत्सकलवेदान्तार्थब्रह्मावबोधज्ञानसागरश्री-
मुकुंदराजमुनिनिर्मितमहाभाष्यं समाप्तं ॥ छ ॥ श्री—

३ ह्या समाप्तींत आदिनाथ—हरिनाथ—रामनाथ ऊर्फ रघुनाथ—मुकुंदनाथ—अशी गुरुपरंपरा दिली आहे. मुकुंद हें पाळण्यांतील नांव व मुक्तिनाथ हें गुरुशिष्य परंपरेंतील नांव असावें. रा. रा. चांदोरकर यांच्या संग्रहीं केज येथें मिळालेली एक विवेकसिंधूची प्रत आहे तिच्या पूर्वार्धाच्या शेवटीं ११७ व्या पृष्ठावर खालील श्लोक आहे:—

शिष्येष्वन्येषु सत्सु स्वयमधिककृपापात्रमासं तवांतो(?) ।
ग्रंथं यद्बोधसिंधुं कुरु शिशुसुगमं वेदवेदान्तसारं ॥
एवं विज्ञापितः सन् सविनतशिरसा जैतपाळेन वंद्यः ।
सद्यः चक्रे मुकुंदो मुनिरमळमहाराष्ट्रवाणीविगुंफं ॥

ह्या मराठी विवेकसिंधूंतील संस्कृत श्लोक वरील महाभाष्यांतील संस्कृत श्लोकासारखा हुबेहुब आहे व गुरुशिष्यपरंपरा एक आहे, तेव्हां मराठी विवेकसिंधूचा व ह्या

संस्कृत महाभाष्याचा कर्ता एक च मुकुंदराज आहे, हें स्पष्ट च आहे. जैतपालाचें नांव मराठींत व संस्कृतांत दोन्हीं ठिकाणीं येतें. तेव्हां विवेकसिंधूचा जो कर्ता मुकुंदराज म्हणून प्रसिद्ध आहे तो च ह्या संस्कृत महाभाष्याचा हि कर्ता होय, ह्यांत बिलकूल संशय नाहीं.

४ विवेकसिंधूच्या शेवटीं ग्रंथकार आपणास बोबडा, आरुषवचन बोलणारा, अज्ञ, वगैरे विशेषणें लावतो. तीं लाक्षणिक आहेत. संस्कृत महाभाष्यावरून दिसत च आहे कीं ग्रंथकार मुकुंदमुनि परम विद्वान् व संस्कृतज्ञ आहे.

५ रा. रा. चांदोरकर यांजवळील मराठी विवेकसिंधूच्या प्रतीच्या उत्तरार्धाच्या समाप्तींत खालील ओंव्या आहेत:—

वर्ते शके अकरा दाहोत्तरू । साधारण सवत्सरू ॥
राजा शारंगधरू । राज्य करी ॥ १३३ ॥

अध्याय ११, उत्तरार्ध.

ह्यावरून असें दिसतें कीं जैतपाळ वारून उत्तरार्ध संपावयाच्या कालीं त्याचा कोणी तरी शारंगधर नांवाचा संबंधी छिंदवाड्यांत किंवा आमगडांत राज्य करीत असावा.

६ वैनगंगेच्या तिरीं । अंबा नाम नगरी ॥ असें चरण विवेकसिंधूंत आहे. ही अंबा नगरी ह्मणजे भंडाऱ्याजवळील वैनगंगेच्या तीरचें अंभोरें हें तीर्थ आहे. येथें हरिनाथाची समाधि आहे. ह्या ठिकाणीं सध्यां वार्षिक उत्सव मोठ्या थाटानें होत असतो. रामनाथाची समाधि छिंदवाडांत आहे व खुद्द मुकुंदनाथाची समाधि बेतुल जवळ खेडले या गांवीं आहे. अर्थात् मुकुंदराज (व जैतपाल) हा बैतुल, छिंदवाडा, अंभोरें या वैनगंगेच्या भोंवतालील प्रांतांतील आहे. मुकुंदराजाच्या समाधीचा संबंध जोगाईच्या अंब्याशीं बिलकुल नाहीं. अंबा या नांवावरून कोणीं जोगेश्वरीचें अंबें (उर्फ मोमिनाबाद) म्हणून जें एकदां प्रचलित केलें तें तसेंच प्रचलित झालें. परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आंबें ह्मणजे अंभोरें, भंडाऱ्याजवळील नागपूर प्रांतांतील समजावयाचें आहे. ह्या प्रांतांत मुकुंदराजाची शिष्यपरंपरा अद्याप हि आहे.

७ मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांची परंपरा आदिनाथापासून आहे. ह्या दोघांत अंतर ४० वर्षांहून जास्त नसावें, असें कित्येक वर्षांपूर्वीं मीं ह्मटलें आहे. तें च येथें हि पुनः नमूद करून ठेवितों.

८ महाराष्ट्रांत विचारप्रदर्शन दोन भाषांत–संस्कृतांत व मराठींत–होत असे, असें गेल्या वर्षी एका निबंधांत मीं सिद्ध केलें आहे–त्याला मुकुंदराजाच्या ह्या संस्कृत महाभाष्यानें बळकटी येते.

वि. का. राजवाडे

टीप—मागें ' करमणूक ' पत्राचे वर्ष १७ चे २७ वे अंकांत मुकुंदराजांची समाधि मध्यप्रांतांत बदनूराजवळ खेडले येथें आहे; जयत्पाल हा रजपूत राजा होता; वगैरे हकीकत प्रसिद्ध झालेली ह्या शोधाचे संबंधांत खास मोकाबल्याचे दृष्टीनें वाचनीय आहे. — संपादक.

# २६ ( प्राकृत ) प्रास्ताविकपद्यानि

१ श्रीमंत सरदार गंगाधरराव मुजुमदार यांच्या संग्रहास असलेल्या एका पोथींत चिमनीकाव्य वगैरे पांच काव्यें आहेत. त्यांतील ७।८।९।१० या पृष्ठांवर हीं पद्यें आहेत. सुभाषित आहेत. निरनिराळ्या प्राकृत ग्रंथांतून काढिलेलीं दिसतात

२ भाषा महाराष्ट्री व क्वचित् शौरसेनी आहे. पद्यांत कोठें कोठें संस्कृत रूपें हि आहेत.

३ चोविसाव्या पद्यांत शंकर नामक दैवताचा उल्लेख आला आहे.

४ बहुतेक सर्व पद्यांत शृंगाररसाचें व्यंजन आहे.

५ पांच चार पद्यांचें संस्कृत मूळांत नाहीं, तें मीं दिलें आहे.

श्री

( प्राकृत )

तं णत्थि राउलं तं णत्थि घरं देउलं वि तं णत्थि ।
जत्थ अआरणकुविआ दो तिं वि खला ण दीसंति ॥ १ ॥

( संकृत )

तन्नास्ति राजकुलं तन्नास्ति गृहं देवकुलं अपि तन्नास्ति ।
यत्र अकारणकुपिता द्वौ त्रयो वा खला न दृश्यंते ॥ १ ॥

( टीका )

संतीति भावः

( प्राकृत )

दीसई विविहचरित्तं जाणिज्जइ सुजणदुज्जणा विसेसेण ।
अप्पाणं च कलिज्जइ हिंडिज्जइ तेण पुहवीए ॥ २ ॥

( संस्कृत )

दृश्यते विविधचरित्रं ज्ञायंते सुजनदुर्जनाः विशेषेण ।
आत्मानं च कलयते[1] हिंड्यते तेन पृथिव्यां ॥ २ ॥

( टीका )

पृथिवीभ्रमणे एतद्भानं भवतीत्यर्थः ।

( प्राकृत )

भ्रमरा जाणाहि गुणा जो चुंवइ बहुफूलजादाइ ।
घुणह किं जाणइ वपुरा सूकी लाकर खाइ ॥ ३ ॥

( संस्कृत )

भ्रमरो जानाति गुणान् यः चुंबति बहुपुष्पजातानि ।
घुणकः किं जानाति निकृष्टां शुष्कां लगुडिकां खादति ॥ ३ ॥

( टीका )

वपुरा निकृष्टे; लाकरि काष्ठे देशी । स्फुटं अन्यत् ।

( प्राकृत )

अप्पत्थावे भणिअं असरिसमग्गे सुगाइअं गीअं ।
मा-मा-निसेहवअणं सुरए तिणि वा लोका ण अग्घंति ॥ ४ ॥

( संस्कृत )

अप्रस्तावे भणितं असदृशमार्गे सुगीतं गीतं ।
मा-मा-निषेधवचनं सुरते त्रीणि वा लोका न अर्हंति ॥ ४ ॥

---

१ कलयते बद्दल कल्यते असें रूप हवें.

२ ह्या प्राकृत पद्याचें संस्कृत मूळांत दिलें नाहीं, तें मीं दिलें आहे.

भ्रमरा जाणाहि बद्दल भ्रमरो जाणइ असें हवें.

चुवइ बद्दल चुंचई हवें.

वपुरा ह्मणजे बापुडी. बापुडी ह्मणजे क्षुल्लक, निकृष्ट. बापु (ज्ञानेश्वर), बापडा, ह्या शब्दाचें मूळ वपुरा. परंतु हा प्राकृत वपुर (निकृष्टार्थक) कोणत्या संस्कृत शब्दापासून निघाला आहे तें शोधिलें पाहिजे, सध्यां लक्ष्यांत येत नाहीं.

( टीका )

न श्लाघंते ।

( प्राकृत )

मेहस्स जलं चंद्स्य[३] सीअलं दिणअरस्स करप्फंसं ।
सप्पुरिसाणं वित्तं जीअणं सअललोअस्यं[४] ॥ ५ ॥

( संस्कृत )

मेघस्य जलं चंद्रस्य शैत्यं दिनकरस्य करस्पर्शः ।
सत्पुरुषाणां वित्तं जीवनं सकललोकस्य ॥ ५ ॥

( टीका )

एते परोपकारार्थमेवेति भावः ।

( प्राकृत )

हरिणा जाणंति गुणा वणे वसिऊण गीहमाहप्पं ।
ताणं वि अ णत्थि धणं जीअं वाहस्स अप्पंति ॥ ६ ॥

( संस्कृत )

हरिणा जानंति गुणान् वने वसित्वा[५] गीतमाहात्म्यं ।
तेषां अपि च नास्ति धनं जीवं[६] व्याधस्य अर्पयंति ॥ ६ ॥

( टीका )

गीतलोभेन पशवोऽपि प्राणांस्त्यजंति नराणां का वार्तेति भावः ।

( प्राकृत )

वाहम्मि गीअमाणे हरिणा अंगं अ जीविअं दत्तं ।
धणो कुरंगणाहो वैलिकण्णा[७] जिणिया जेण ॥ ७ ॥

( संस्कृत )

व्याधे गीयमाने हरिणा(?) अंगं च जीवितं दत्तं ।
धन्यः कुरंगनाथो वलिकर्णो जिनो येन ॥ ७ ॥

---

३ चंद्स्य बद्दल चंदस्स हवें.

४ लोअस्य बद्दल लोअस्स हवें.

५ वसित्वा बद्दल उषित्वा पाहिजे.

६ जीवं बद्दल जीवितं घेतलें तर उत्तम.

७ (प्रा.) वलि, ( सं. ) वलि म्हणजे काय ?

( टीका )

जीवदानेन ततोऽप्ययं अधिक इति भावः ।

( प्राकृत )

जणणी जणअं भक्खं बंधुं गेहं धणं अ धण्णं अ ।
अवमाणहता पुरिसा वित्तं दूरेण छुट्टंति ॥ ८ ॥

( संस्कृत

जननीं जनकं भक्ष्यं बंधुं गेहं धनं च धान्यं च ।
अपमानहताः पुरुषा वित्तं दूरेण त्यजंति ॥ ८ ॥

( टीका )

छुट्ट त्यागे देशी । सत्पुरुषा अपमानं न सहन्ते इति भावः ।

( प्राकृत )

णेहो कुह वि ण किज्जइ अह किज्जइ रत्तकंवलसरिछो ।
दिणमाणधोअमाणं सदा अ रंगं ण छुट्टेइ ॥ ९ ॥

( संस्कृत )

स्नेहः कुत्रापि न कार्यः अथ कार्यः रक्तकंबलसदृक्षः ।
दिनं बाष्पधौतमपि सदैव रागं न त्यजति ॥ ९ ॥

( प्राकृत )

जम्मंतरेण विरहे उत्तमपुरिसाइ जंतिअं पेम्मं ।
कालिंदी किह्लविरहे अज्जवि कालं जलं वहइ ॥ १० ॥

---

८ छुट्ट हा प्राकृत धातू श्वट् ( संपणें) या संस्कृत धातूपासून निघाला आहे- श्वट् = छुट् = सुट. श्वठय = सोड ( णिच् ). हें लक्ष्यांत न घेतां, प्राकृत वैयाकरण छुट्ट हा देशी शब्द अज्ञानानें व हलगर्जीपणानें समजतात व छुट्ट याचें संस्कृत भाषांतर त्यज् या धातूनें करतात. वस्तुतः भाषांतर श्वट् या धातूनें केलें पाहिजे.

९ प्राकृताचें शब्दशः संस्कृत असें:—

स्नेहः कुत्रापि न क्रियेत अथ क्रियेत रक्तकंबलसदृक्षः ।
दीयमानधूयमानं सदा च रंगं न श्वटयति ॥

( संस्कृत )

जन्मांतरेण विरहे उत्तमपुरुषैः यंत्रितं प्रेम ।
कालिंदी कृष्णविरहे अद्यापि कालं जलं वहति ॥ १० ॥

( प्राकृत )

चउरासि-णिअबंधेहिं णिज्जिअ-चउरासि-सिद्धपुरिसाए ।
अहिणव-सुरआरंभे सजओ ते दुलहो-होइ ॥ ११ ॥

( संस्कृत )

चतुरशीतिनिजबन्धैः निर्जितचतुरशीतिसिद्धपुरुषायाः ।
अभिनवसुरतारंभे स जयस्तव दुर्लभो भवंति ॥ ११ ॥

( टीका ) [१०

पुराणबंधास्त्वया ज्ञायंतेऽधुना मया नूतनबंधः कार्यो
यस्तया विदित इति भावः ।

( प्राकृत )

अहिणवसुरआरंभे जे रइकम्माणि होंति छइल्ला ।
ते णारीणं हिअजे जीएण समं ण जांति विस्मरणं ॥ १२ ॥

( संस्कृत )

( अभिनवसुरतारंभे ये ) रतिकर्मणि भवंति विदग्धाः ।
ते नारीणां हृदयजीविताभ्यां समं विस्मरणं न यांति ॥ १२ ॥

( टीका )

संभोगे स्त्रीणां अतीव सुखं इति भावः । [२०

१० कंसांतील संस्कृत मूळ पोथींत नाहीं तें मीं दिलें आहे. दुसऱ्या ओळीचें संस्कृत असें पाहिजेः—

ते नारीणां हृदये जीवेन समं न यांति विस्मरणं ।

प्राकृत श्लोकांत विस्मरणबद्दल विसुमरणं असा पाठ हवा. छइल्ल शब्दापासून मराठींत छेल शब्द आला आहे. छेलबकावलि ह्या सामासिक शब्दांत हा छेल शब्द दिसतो. छइल्ल शब्द देशी समजतात, परंतु तो संस्कृतोत्पन्न असावा. नक्की मूळ मला अजून आढळलें नाहीं.

( प्राकृत )

घरणाहे विगए सइ रअणीमज्झे वि चतुरनारीए ।
दोहो सप्पो लिहिओ हे सुंदरि केण अत्थेण ॥ १३ ॥

( संस्कृत )

गृहनाथे [११]गते सति रजनीमध्येपि चतुरनार्या ।
दीर्घः सर्पो लिखितः हे सुंदरि केन अर्थेन ॥ १३ ॥

( प्राकृत )

वीसमउ विरहविहत्था दिट्ठी खणमत्थ सप्पदिट्ठीए ।
अंधारे घरसो(सो)क्खे सप्पो लिहिओ तदत्थेण ॥ १४ ॥

( संस्कृत )

विश्राम्यतु विरहविह्वला दृष्टिः क्षणं अत्र सर्पदृष्ट्या ।
अंधकारे गृहसौख्ये सर्पो लिखितस्तदर्थेन ॥ १४ ॥

( टीका )

सर्पभयेन विरहव्याकुला दृष्टिः स्थिरा भवेत्, यद्वा भवद्वियोगेन गृहं सर्पमयं दृश्यते इति, अथवा सर्पाद्युपघातेन मर्तव्यमिति सूच्यते ।

( प्राकृत )

किं जीविअस्स चिन्हं का भज्जा कामएअस्स ।
का पुण भूपतिघरिणी परिणीआ किं कुणइ वाला ।
का विसुमरइ ण सअअं का दुलहा तिणि-लोअस्स ॥ १५ ॥

( संस्कृत )

किं जीवितस्य चिन्हं का भार्या कामदेवस्य ।
का पुनर्भूपतिगृहिणी परिणीता किं करोति बाला ।
का विस्मरति न सततं का दुर्लभा त्रिलोकस्य ॥ १५ ॥

( टीका )

किं जीवितस्य चिन्हं ? कामः । यावज्जीवति तावत्कामाभिलापो भवति ।

---

११ गते बद्दल विगते पाहिजे.

का भार्या कामराज्ञः? रतिः । का पुनर्भूपतिगृहिणी? कंदलारातिः । कंदली कलहयुक्ता रतिर्यस्याः । परिणीता किं करोति बाला? । का विस्मरति न सततं? । कामकं । कामः शृंगारः तस्य कं सुखं न विस्मरति । का दुर्लभा त्रिलोकस्य? कामकंदला रतिः । न इति त्रैलोक्ये दुर्लभा इति भावः ।

( प्राकृत )

विरहो वसंतमासो णवणेहो पुढमजोवणारंभो ।
पंचमराअस्स धुणी पंचाग्गिं को जणो सहइ ॥ १६ ॥

( संस्कृत )

विरहो वसंतमासो नवस्नेहः प्रथमयौवनारंभः ।
पंचमरागस्य धुंनिः पंचाग्निं को जनः सहते ॥ १६ ॥

( प्राकृत )

जासि विदेसं पहिअ णाहविरहेण सामलंगीए ।
मुखमुण्णमिअ कहियो गआगअे तुज्झ कुसलमत्थीति ॥ १७ ॥

( संस्कृत )

यासि विदेशं पथिक नाथविरहेण श्यामलांग्याः ।
मुखमुन्नम्य कथनीयं गतागते तव कुशलमस्तीति ॥ १७ ॥

( प्राकृत )

[१४]वसिऊण मज्झ हिअए जीअं गहिऊण कुत्थ चलिदोसि ।
पंथिअ परघरमंडन गमनं ते कहं होइ ॥ १८ ॥

( संस्कृत )

उषित्वा मम हृदये जीवं गृहीत्वा पुनः कुत्र चलितोऽसि ।
पथिक परगृहमंडन गमनं ते कथं भवति ॥ १८ ॥

---

१२ संस्कृत विपरिणाम मीं दिला आहे.

भांडकुदळ हा शब्द भंडकंदल या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. कंदल म्हणजे कलहयुक्त. कंदल याचें कुदळ. भंडपासून भांड. भांडकुदळ म्हणजे भांडखोर.

१३ धुनिः बद्दल ध्वनिः पाहिजे.

१४ ह्या पद्याचें संस्कृत मूळांत नाहीं तें मीं दिलें आहे.

( टीका )

यत्र तिष्ठसि तस्यैव सर्वस्वं गृहीत्वा गच्छसि । अतः कुत्रापि ते स्थलं नास्ति । अतः पथिक भ्रमणशील । अन्यच्च पथिकस्य कुत्रापि स्वगृहं नास्ति अतः परगृहमंडन । इदमपि परकीयं तत्किं न तिष्ठसि । किं च यत्र तिष्ठसि तस्य धनं गृहीत्वा चेद्गम्यते तं राजा बध्नाति अतः कथं गमनं इति भावः ।

( प्राकृत )

रससत्ता ससिवअणा हरहारआहारवाहणणअणा ।
जलअरअरिवरगमणा हे मुग्धे कुत्थ दीसेसि ॥ १९ ॥

( संस्कृत )

१०] रसासक्ता शशिवदना हरहाराहारवाहननयना ।
जलचरारिवरगमना हे मुग्धे कुत्र दृश्यसे ॥ १९ ॥

( टीका )

रसासक्ता शशिवदना । हरस्य हारः सर्पः । तस्य आहारः वायुः । तस्य वाहनं मृगः । तत्तुल्यनेत्रा । जलचरः मत्स्यः । तस्यारिः हंसः । तत्तुल्यगमना । हे मुग्धे कुत्र दृश्यसे ।

( प्राकृत )

होतु तुह सव्वसिधी सुंदर चलिओसिं जत्थ कज्जेण ।
छप्पअ-नास-णिवासो तं दिज्जइ मज्झ नामेण ॥ २० ॥

( संस्कृत )

२०] भवतु तव सर्वसिद्धिः सुंदर चलितोसिं यत्र कार्येण ।
षट्पदवासनिवासः तं(?) दीयतां मम नाम्ना ॥ २० ॥

( टीका )

तव विरहेण मया मर्तव्यमिति भावः ।

( प्राकृत )

जणणीं जणणुप्पत्तिं पिअसंगं जीविअं धणासं च ।
सहिऊण वहइ णारी लोका दुःखेन मुंचंति ॥ २१ ॥

( संस्कृत )

जननीं जननोत्पत्तिं प्रियसंगं जीवितं धनाशां च ।
सहित्वा वहति नारी लोका दुःखेन मुंचंति ॥ २१ ॥

( टीका )

यावज्जीवं तेन दुःखेन तापिता भवंति इति भावः ।

( प्राकृत )

पाउससमयपवासो  जोवणसमए वि होइ दारिद्दं ।
पुढमसिणेहविभेदो तिण्णि वि गरुआइं दुःखाइं ॥ २२ ॥

( संकृत )

प्रावृट्समयप्रवासः यौवनसमये पि भवति दारिद्र्यं ।
प्रथमस्नेहविभेदः त्रीणि अपि गुरूणि दुःखानि ॥ २२ ॥

( प्राकृत )

हा हिअअं मम विहिणा घट्टिअं वज्जेण वज्जसारेण ।  [१९
वल्लहवियोअकाले जन्नगआइं खंडखंडाइं ॥ २३ ॥

( संस्कृत )

हा हृदयं मम विधिना घट्टितं वज्रेण वज्रसारेण ।
वल्लभवियोगकाले यन्न गतानि खंडखंडानि ॥ २३ ॥

( टीका )

यन्न गतानि खंडखंडानि खंडशः इत्यर्थः । स्पष्टं शेषं ।

( प्राकृत )

रे संकर मा सिज्जसि अह सिज्जसि मा देहि माणवं जम्म ।
अह जम्म मा खु पेम्मं अह पेम्मं मा उण वियोअं ॥ २४ ॥

( संस्कृत )  [२०

रे शंकर मा सृज अथ सृजसि मा देहि मानवं जन्म ।
अथ जन्म मा खलु प्रेम अथ प्रेम मा पुनः वियोगं ॥ २४ ॥

( टीका )

सिज्जसि सृजसीत्यर्थः । स्पष्टमन्यत् ।

( प्राकृत )

हिअअ कदुअ पवासं सहेइ तं अज्जिअं दुःखं ।
पिअमाणससारिछं सदा भमंतो ण पावेसि ॥ २५ ॥

( संस्कृत )

हृदय कृत्वा भवासं सहस्व तदर्जितं दुःखं ।
प्रियमनुष्यसदृशं सदा भ्रमन् अपि[15] न प्राप्स्यासि ॥ २५ ॥

( टीका )

जन्मांतरेपि तादृशप्रियसदृशो दुर्लभ इत्यर्थः ।

( प्राकृत )

मा जाणसि विस्मरिअं तुह मुहकमलेत्थि परमहंसो मे ।
सुण्णं भमइ सरीरं जत्थ तुअं तत्थ मे जीओ ॥ २६ ॥

( संस्कृत )

मा जानासि विस्मरितं तव मुखकमलेऽस्ति परमहंसो मे ।
शून्यं भ्रमति शरीरं यत्र त्वं तत्र मे जीवः ॥ २६ ॥

( टीका )

अन्योपि हंसः कमले तिष्ठति । अत्र परमहंसो जीवः । आत्मा त्वदधीन इत्यर्थः ।

( प्राकृत )

तुह रूअं उरधरिअं कंठे तुह गुणमुत्तिआमाला ।
तव णाम संजपंतो रुइऊण वासरं गमए ॥ २७ ॥

( संस्कृत )

तव रूपं उरसि[16] धृतं कंठे तव गुणमौक्तिकामाला ।
तव नाम संजपन् रुदित्वा वासराणि[17] गमये ॥ २७ ॥

( प्राकृत )

तुह चित्ते णअणजुअं तुह जससवणे सुकण्णो(?)मे ।
जीहा तुह णामकिए हिअअं तुह पेमभावणं वहइ ॥ २८ ॥

( संस्कृत )

तव चित्ते नयनयुगं तव यशःश्रवणे सुकर्णौ मे ।
जिव्हा तव नामकृते हृदयं तव प्रेमभावनं वहति ॥ २८ ॥

---

१५ प्राकृत पद्यांत अपि नाहीं.

१६ उरोधृतं पाहिजे. १७ वासरं पाहिजे.

( प्राकृत )

सो को वि णत्थि सुजणो जस्स कहिआमि अप्पदुःखाइं ।
आअंति जांति कंठे पुरेव हिअअं विलग्गंति ॥ २९ ॥

( संकृत )

स कोपि नास्ति सुजनः यस्य कथयामि आत्मदुःखानि ।
आयांति यांति कंठे पुरेव हृदयं वि[१८]लग्नंति ॥ २९ ॥

( टीका )

अस्मद्दुःखं अस्मानेव पीडयति । तदपहर्ता त्वदतिरिक्तः न इत्यर्थः ।

( प्राकृत )

विरला जाणंति गुणा विरला जाणंति णिद्धणसिणेहं ।
विरला परकज्जपरा परदुःखदुःखिआ विरला ॥ ३० ॥

( संस्कृत )

विरला जानंति गुणान् विरला जानंति निर्धनस्नेहं ।
विरलाः परकार्यपराः परदुःखदुःखिता विरलाः ॥ ३० ॥

( टीका )

दुर्लभा एतादृशा इत्यर्थः ।

( प्राकृत )

वक्त्रे सुरागरक्ता णेहे करवीरकुसुमसारिछा ।
गब्भोण्णआ भुजंगी वेस्याहिअअं तथा होइ ॥ ३१ ॥

( संस्कृत )

वक्त्रे सुरागरक्ता स्नेहे करवीरकुसुमसदृशा ।
गर्भोन्नता भुजंगी वेश्याहृदयं तथा भवति ॥ ३१ ॥

( टीका )

मुखेनैव रागं कुर्वंति । अचिरस्थितस्नेहाश्च । प्राप्तोन्नतगर्भा भुजंगी चालितुमशक्ता यं पश्यति तमेव भक्षयति । तथा वेश्यापि प्राप्तं जनं भक्षयति । तस्मात्तत्सामीप्यं त्याज्यं इति भावः ।

---

१८ विलगंति असें रूप हवें.

( प्राकृत )

एको विलिहइ सग्गं एको उण मत्तं गजं धरइ ।
अण्णो अहि लहइ मणिं वेशाहिअअं ण को लहइ ॥ ३२ ॥

( संस्कृत )

एको विलेढि सङ्गं एकः पुनः मत्तं गजं धरति ।
अन्यः अहेर्लभते मणिं वेश्याहृदयं न को लभते ॥ ३२ ॥

( टीका )

एतत्कदाचित्स्यात् । अपि वेश्याहृदयं तु दुर्ग्राह्यमेवेति भावः ।

( प्राकृत )

कुलसंखयं अकीर्त्ति होइ उण खलजनसमं सीलं ।
गमणं वेसाणं घरे ण जुज्जए धम्मसीलस्य ॥ ३३ ॥

( संस्कृत )

कुलसंक्षयं अकीर्ति भवति पुनः खलजनसमं शीलं ।
गमनं वेश्यानां गृहे न युज्यते धर्मशीलस्य ॥ ३३ ॥

( टीका )

कुलसंक्षयादिदोषावहमित्यर्थः ।

( प्राकृत )

हत्थं सप्पस्स मुहे [१९] वि णिक्खिपइ विसं कुणइ आहारं ।
करिणा अ कुणइ खेलं वेसाहिं समं तहा संगो ॥ ३४ ॥

( संस्कृत )

हस्तं सर्पस्य मुखे निक्षिपति विषं करोति आहारं ।
करिणा च करोति खेलं वेश्याभिः समं तथा संगः ॥ ३४ ॥

( टीका )

साहसं कर्मैतदिति भावः ।

---

१९ अपि संस्कृतांत हवें.

( प्राकृत )

पेम्मं धरिऊण जणं णँअरे रमअंति वारमहिलाओ[20] ।
चोरो को वि जणो जो अतणोभेदं ण जाणादि ॥ ३५ ॥

( संस्कृत )

प्रेम्णा धृत्वा जनं नयनेन रमयंति वारमहिलाः ।
चोरः कोपि जनो यो अतनोर्भेदं न जानाति ॥ ३५ ॥

( टीका )

अन्यस्तु हस्तेन गृह्णाति । वेश्यास्तु नयनेनैव । ये तनोर्भेदं न जानंति ते चौराः साहसिकाः अकस्मान्मरणं प्राप्नुवंतीत्यर्थः ।

( प्राकृत ) [ १०

जो जाणाइ जस्स णेहं सोस्स अवेक्खणं कुणइ ।
पद्मो रविकिरणाणं सुहइ प्फंसो ण चंद्स्स ॥ ३६ ॥

( संस्कृत )

यो जानाति यस्य स्नेहं तस्यापेक्षां करोति[21] ।
पद्मं रविकिरणानां सुखयति स्पर्शो न चंद्रस्य ॥ ३६ ॥

( टीका )

यैः सह येषां प्रीतिः स तीक्ष्णोपि तस्य सुखाय भवति ।
शीतलोपि स्नेहाभावान्न सुखदः । वेश्यापि प्रीतिवशात् आप्ता ।
कुलजाऽपि अप्रीतो अनाप्ता । इति भावः ।

( प्राकृत ) [ २०

आसा ण देइ मरणं मरणेन विणा ण लभ्मए पेम्मं ।
अवसर एव मरिज्जइ तेण लभिज्जए सुंदरो णाहो ॥ ३७ ॥

( संस्कृत )

आशा न ददाति मरणं मरणेन विना न लभ्यते प्रेम ।
अवसर एव मर्तव्यं तेन लब्धव्यः सुंदरो नाथः ॥ ३७ ॥

---

२० णअरे प्राकृतं पर्यात लिहिलें आहे तेथें णअँणेण असा पाठ हवा.

२१ सः अस्य अवेक्षणं असें संस्कृत हवें.

( टीका )

प्रत्याशया जीवितेन मया नाथो न प्राप्तव्य इति भावः।

इति प्रास्ताविकपद्यानि ।

वि. का. राजवाडे

## २७ पूर्णानन्द

' पूर्णानन्द ' यांचें आजपर्यंत फक्त नांव च काय तें माहीत होतें. पूर्णानन्द हे शिवराम स्वामींचे गुरु व रंगनाथ स्वामींचे परम गुरु यापेक्षां आपल्या माहितीची मजल जास्त पलीकडे गेली नव्हती. आज जी माहिती उपलब्ध झाली आहे तिचे योगानें 'पूर्णानन्दां'चे चरित्रावर विशेष कांहीं उजेड पडणार आहे असें मुळीं च नाहीं. परंतु एखादें दुसरें पाऊल आपण पुढें त्यामुळें गेलों आहों यांत संशय नाहीं.

अवधूतगीतेवरील टीकेची पोथी श्रीमंत चंद्रचूडांचे संग्रहांतील आहे. ही टीका आपला शिष्य जो ' चिदानंद ' त्याचे करितां पूर्णानंदांनीं केलेली आहे.

या टीकात्मक गीतेचे एकंदर अध्याय ७ आहेत.

ओवी ३२४ + १७८ + १७८ + ७७ + ८७ + ९६ + १२३ = १०६३. एक हजार त्रेसष्ट आहेत. मूळ श्लोक देऊन त्यावर टीका केलेली आहे. अवधूतगीता म्हणजे दत्तगोरक्षसंवाद आहे, हें विश्रुत च आहे. त्यांत

सखे मनः किं बहुजल्पितेन । सखे मनः सर्वमिदं च तत्वं ।
यत्सारभूतं कथितं मया ते । त्वमेव तत्वं गगनोपमं हि ॥

या पहिल्या अध्यायांतील श्लोकानें संवादभंगाचा दोष येऊं नये म्हणून पूर्णानंद स्वामींनीं आपल्या टीकेंत स्पष्ट उल्लेख केला आहे तोः—

ऐसा दिगांबर अवधूत । मन म्हणजे गोरक्षाशीं सांगत ।
त्या संस्कृताचा मऱ्हाटा अर्थ । मी बोलिलों ॥ २४७४ ॥

तेव्हां अवधूतगीता ही गोरक्ष अवधूत संवाद नसतां स्वतःचे मनास केलेला ' मनोबोध ' आहे; व हा विशेष लक्षांत टेऊन टीकाकारांनीं प्रत्येक ठिकाणीं ' मनास ' च बोध केलेला आहे.

जेतें आकाश लागलें दिसे पर्वतीं । हे तव लटिकी च भ्रांति ।
तैशी मना जाण गति । बंध–मोक्षाची ॥
तत्वमस्यादि वाक्येंनि । सकळ प्रपंच निरसुनि ।
आत्मस्वरूपनिर्वाणीं । लीन होई मना ॥
सखेया मना येक विचारु । जंववरि नाहिं स्वस्वरूपाचा निर्धारु ।
तंववरि प्रपंचाकार । सर्व निरसावा ।
जेथें घट चि नाहीं । तेथें घटाकाश कैंचें काई ।
मना तूं चि नाहीं । तेथें जीवित्व कैंचें ॥

असो.

टीकेबद्दल इतकें च लिहिलें असतां पुरें होईल, कीं मूळ ग्रंथ अद्वैतपर असून हि –जितका सोप्या भाषचे यागानें सुबोध व आनंददायक आहे तितकी च–जास्त होणें शक्य नसल्यानें–सुबोध व आल्हादकारक ही स्वामींची प्राकृत टीका आहे. व या कालांतील उपलब्ध होणारे इतर ग्रंथ यांवरून सुचणारीं कित्येक प्रमेयें नमूद करण्याचें हें स्थल नसल्यानें या टीकेसंबंधीं विशेष लिहित नाहीं. तथापि एक गोष्ट येथें नमूद करून ठेवावीशी वाटते व ती ही कीं चोंभा कवीप्रमाणें अगदीं तुरळक अपवाद अपवाद म्हणूनच गणले तर शक ११०० ते शक १४०० अखेर सर्व श्रेष्ठ वर्णाचे ग्रंथकार हे अद्वैत विषयाचें प्रतिपादन करणारे असून त्यांच्या कृतीवरून ते अनुभवी असावेत असें स्पष्ट दिसतें. त्यांची दृष्टि काव्याकडे नव्हती. लोकोपकाराकडे होती. आणि म्हणून च श्रीज्ञानेश्वरमहाराजांस सर्व प्राकृत–ग्रंथकारांत आद्य मान आहे. कारण कीं अद्वैतासारखा दुर्बोध विषय आपल्या स्फूर्तिजन्य, प्रासादिक, व प्रतिभाप्रचुर धाटणीनें त्यांनीं अत्यन्त सुबोध व काव्यमय केला आहे. असो.

पूर्णानंदस्वामींची ही टीका शक १५३२ साधारण संवत्सर माघ शुद्ध पंचमी सोमवार, या दिवशीं

सह्याद्रिपर्वत निश्चित । नाटल नगर आत्मकुंड तीर्थ प्रसिद्ध ।
जटार आश्रमीं शुद्ध ।
संपूर्ण केली.

नाटल ग्राम सह्याद्रीचे पाठारावर आहे त्याचें हल्लींचें नांव काय असावें तें मला समजलें नाहीं. कदाचित् नातें पुतें असावें. पण हा तर्क आहे व त्यास आधार नाहीं.

स्वतः स्वामींनीं च एक शंका घेतली आहे.

मंज ज्ञानविज्ञानाचा श्रम । नावडे चेकपण लटिका भ्रम ।
तेथ हा ग्रंथ करणें अधर्म । मा  मज चि भासे ॥

मग हा ग्रंथ कां केला ? तर

फळला निजानंदाचा धर्म त्वरित ।

आपला शिष्य जो चिदानंद त्यास बोध व्हावा म्हणून हा "ग्रंथरचनेचा गदारोळ" झाला आहे. हे चिदानंद

कुशस्थळीं ब्राह्मणवंशामाझारीं । जन्म घेऊन वत्स गोत्रांतील गणेशाचा आत्मज जो गुळगुळा (?) गोविंद त्याचे पोटीं बल्लाळ या नांवानें आला होता. त्या बल्लाळनें पूर्णानंद स्वामींची सेवा करून त्यांचे प्रसादानें चिद्रानंद हें नांव मिळविलें.

स्वामींनीं जी आपली गुरुपरंपरा दिली आहे ती स्वामींच्या च शब्दांनीं दिलेली वरीः–

आम्हां आदिगुरु आदिनाथु । तया पासूनि दत्ता हा बोधु निश्चितु ।
× × × ×
तयाचेनि प्रसादें । सदानंदा हें सुख आनंदें ।
× × × ×
सदानंदापासाव । रामानंदा बोध स्वभाव ।
सदानंद अवधूत । त्रियंबक-शिखरीं बहुत । जाहालें तप × ×
× × × ×
तें चि हें सुखाचें भरतें । गंभिरानंदाशीं निश्चित
× × × ×
तें चि हें सुख । गंभीरानंदापासाव देख ।
ब्रह्मानंदा आइक । दाटला बोध स्वस्वरूपाचा ॥
तें चि हें गुह्य । सहजानंदीं होय ।
× × × ×
तयाचें उच्छिष्ट शेष । पूर्णानंदा निःशेष ।

हे सर्व अवधूत ( दीक्षा धारण करणारे ) होते.

तेव्हां परंपरा अशीः—

श्री आदिनाथ—दत्त (अवधूत) —सदानंद—रामानंद—गंभीरानंद— ब्रह्मानंद—सहजानंद—पूर्णानंद.

यांच परंपरेशीं आपण आणखी एक परंपरा देऊन तिचा विचार करूं.

श्री आदिनाथ—मत्स्येंद्र—गोरक्ष—मुक्ताबाई—चांगदेव.

श्री मुक्ताबाई शक ११९७ मध्यें जन्मल्या व त्यांच्या वयाचे पांचव्या वर्षीं त्यांस उपदेश श्री गोरक्षनाथांचा झाला आहे, म्हणजे शक १२०२ मध्यें. ही आख्यायिका खरी नसली तरी शक ११९७-१२१९ हा श्रीमुक्ताबाईंचा काल आहे. तेव्हां शक १२१५ पावेतों हि अथवा फार कशास शक ११९७ पावेतों श्री गोरक्षनाथ असावेत च; कारण श्रीमुक्ताबाईस स्वप्नांत उपदेश झाला असा कोठें उल्लेख नाहीं. आतां 'अवधूतगीता' ही श्रीदत्तगोरक्ष म्हणजे 'अवधूतगोरक्ष' संवादरूप आहे. तेव्हां अवधूतगीतेचा काल व श्री गोरक्षनाथांचा काल ठरविण्यास आपणांस फार उत्तम साधन आहे.

त्यांची तुलनात्मक मांडणी करतांः—

(१२००-१२५०) श्री अवधूत-(१२५०-१३००) सदानंद-(१३००-१३५०) रामानंद(१३५०-१४००)गंभीरानंद-(१४००-१४५०)ब्रह्मानंद-(१४५०-१५००) सहजानंद-(१५००-१५५०) पूर्णानंद.

रा. देवांनीं पूर्णानंदांचा काल शक १५७० म्हणून दिला आहे. मीं स्थूलमानानें येथें उल्लेख केलेला आहे. कारण काल अवधूतगीतेचा ठरविणें आहे. तेव्हां ७ पिढ्यांत वीस वर्षांचा फरक फार नव्हे. असो.

पन्नास वर्षांची पिढी एक असें गणन केलें तर वर लिहिल्या प्रमाणें शक, प्रत्येक अवधूताचा येतो. आणि म्हणून श्री अवधूत, श्री गोरक्ष, श्री ज्ञानेश्वर महाराज, व श्री मुक्ताबाई हे सर्व शक १२०० मध्यें समकालीन होते; व म्हणून 'नवनाथ-चरित्र-कारांनीं' श्रीगोरक्षांचा जो समाधि शक "नवनाथ भक्ति-सारां"-त दिला आहे तो चुकीचा आहे. श्री गोरक्षनाथ हे उत्तम संस्कृतज्ञ होते हें त्यांच्या गोरक्ष-संहितेवरून दिसत च आहे; व त्या संस्कृत रचनेवरून आणखी असें हि प्रमेय-अंधुकतेनें-काढतां येईल कीं प्राकृतांत ग्रंथरचनेचा उपक्रम होण्याच्या कालापूर्वीं ते होते. तेव्हां अवधूत-गीतेचा हि काल श्रीगोरक्षांच्या हयातींत च म्हणजे शक १२०० चे सुमारास च असावा. हे तर्क आहेत. जास्त पुराव्यानें विशेष उजेड यावर पडेल.

आषाढ शुा ९।३५<br>धुळें

गो. का. चांदोरकर

# २८ सद्दानंद

एका परंपरेंत एका च नांवाच्या एकाहून अनेक व्यक्ती बहुधा असतात; यामुळें एकाहून दुसरा निवडणें फार जड जातें; ग्रंथांतील भाषेवरून ही निवड करणें तर फारच धोक्याचें आहे; कारण भाषेंत फरक एका शतकाचे अवधीनें उमगण्या-सारखा पडतो व तो हि भाषा परिपक्व स्थितींत येण्यापूर्वीं म्हणजे ती स्थित्यंतर पावण्याचे दशेंत असेल तर. तेव्हां ग्रंथरचनेच्या शकावरून च वर दिलेला भेद स्पष्ट करणें शक्य आहे; एरवीं तो बहुधा अशक्य च समजला पाहिजे. परंपरा दिली असल्यास ती परंपरा हि एक प्रकारचें साधन होऊं शकेल, परंतु या साधनाचा उपयोग करतांना हि फार सावधगिरी बाळगिली पाहिजे. कारण असें पुष्कळ वेळ पहाण्यांत येतें कीं, परंपरेंतील कित्येकांचीं नांवें गाळलेलीं असतात; विशेषत: अत्यंत पुरातन परंपरा असल्यामुळें तिच्यांत नांवांचा विशेष भरणा असल्यास ही गाळण्याची पद्धत तर हटकून अमलांत आणली असते; दुसरें आणखी असें आहे कीं, एखाद्या अर्वाचीन मुमुक्षूस उत्कट मुमुक्षा उत्पन्न होऊन तो साधकाचा सिद्ध बनण्याचे योग्यतेस आला असतां त्याचें उपास्य किती हि पुरातन असलें तरी त्या उपास्याची कृपा झाल्याबरोबर तो आपला गुरुवंश त्या उपास्यापासून च गणतो. उदाहरण देऊन याची सत्यता दाखविण्याची जरूरी नाहीं. तेव्हां या हि कारणानें परंपरा ही सुद्धां कालगणना करण्यास अथवा काल निश्चित ठरविण्यास एक साधन आहे असें सर्वथैव धरून चालणें बिनचूक होणार नाहीं.

हा सर्व विचार लक्ष्यांत ठेवून च मी ‘ सद्दानंदा ’ संबंधीं थोडें लिहूं इच्छितों. त्यांत चुकी झाल्यास ती केवळ साधनांच्या अभावामुळें झाली असेल इतकें च मला सुचविणें आहे.

शक १८३३ चे अहवालांत रा. राजवाडे यांनीं ‘ गीताचंद्रिका ’ प्रसिद्ध केली आहे. ती पूर्णानंद-शिवराम यांची आहे. त्या ग्रंथाच्या आरंभीं रा. राजवाडे यांनीं शिवराम स्वामींची गुरुपरंपरा दिली आहे ती अशी:—

( १ ) सदानंद ( २ ) रामानंद ( ३ ) निर्मलानंद ( ४ ) गंभीरानंद ( ५ ) ब्रह्मानंद ( ६ ) सहजानंद ( ७ ) पूर्णानंद ( ८ ) सदानंद.

या परंपरेस जो आधार आहे तो असा:—

ईव दत्त तथा सदानंद तयाच्या शिष्य रामानंद निर्मळदेव तो गंभीर गुरुरावो।
ब्रह्म आनंदाख्य सहजानंद यागीराज पूर्णानंद चित्तीं साठवा तुम्ही सदानंद ॥२५॥

रंगनाथ स्वामी निगडीकर यांची हि परंपरा ही च. भक्तमंजरीकारांनीं ( राजाराम प्रासादी ) या स्वामींची जी परंपरा दिली आहे ती अशीः—

(१) सहजानंद—(२) रामानंद—(३) अमलानंद—(४) गंभीरानंद—(५) ब्रह्मानंद—(६) सहजानंद—(७) पूर्णानंद— (८) निजानंद— (९) रंगनाथ.

या दोन्ही परंपरेंत नांवांत फरक असा वस्तुतः एकाच बाबतींत आहे. मूळ सदानंद असून ते सहजानंद म्हणून भक्तमंजरी कार म्हणतात.

आतां खुद्द पूर्णानंदांनीं जी आपली परंपरा अवधूतगीतेवरील आपल्या टीकेंत दिली आहे ती अशीः—

(१) सदानंद—(२) रामानंद—(३) गंभीरानंद—(४) ब्रह्मानंद—(५) सहजानंद—(६) पूर्णानंद—(७) चिदानं .

यांत ' निर्मळानंद ' अथवा ' अमलानंद ' यांचें नांव नाहीं. अवधूतगीतेवरील टीकेंतील परंपरेच्या ओवी मीं फार लक्ष्यपूर्वक पाहिल्या परंतु ज्या कोणत्या हि पदांतून ' निर्मल ' अथवा ' अमल ' असा अथ निघेल असें क हि पद नाहीं. तेव्हां हा भेद रुघ्यां तरी दुर्ज्ञेय आहे. असो.

या परंपरेपैकीं दोन परंपरा–मालिकेंत प्रथम एक स ानंद आहेत व एकींत शेवटील ८ वे पुरुष दुसरे सदानंद आहेत. पैकीं प्रथमचे ' सदानंद ' ' जे रामानंदा'चे गुरु होते ते शक १२०० चे सुमारास असावेत असें मीं पूर्णानंदावरील माझे लेखांत लिहिलें आहे. कदाचित् ' विट्ठलांस ' —श्री ज्ञानेश्वर महाराजांचे वडिलांस—संन्यस्त करून फिरून गृहस्थाश्रम घेण्यास गुर्वाज्ञा करणारे जे 'रामानंद' त्यांचे गुरु हे सदानंद–प्रथमचे–असावेत.

दुसरे ८ वे पुरुष जे ' सदानंद ' आहेत त्यांचा गीताचंद्रिकेंत जो उल्लेख आहे त्यावरून ते स्वतः शिवराम वामी असावेत असा संशय येतो. पूर्वाश्रमीचें नांव ' शिवराम ' व संन्यस्त झाल्यावर त्यांचें ' सदानंद ' हें नांव गुरूंनीं दिलेलें असावें. असो. पण प्रस्तुत विषयाचे ' सदानंद ' हे दोघांहून हि भिन्न आहेत.

श्रीमंत सरदार मेहेंदळे यांनीं रा. अतीतकर अभंग यांचे संग्रहापैकीं एक ग्रंथ मला कृपेनें दिला तो पद्मपुराणांतर्गत जनकयोगिनी-संवाद यावरील सदानंदांच्या टीकेचा आहे. ही टीका सदानदांनीं कधीं केली त्याबद्दलचा उल्लेख ग्रंथांत कोठें हि नाहीं, यामुळें हे सदानंद कोण? असा प्रश्न उत्पन्न झाला व म्हणून च हे दोन शब्द लिहिण्याचा प्रसंग आला.

हे सदानंद श्री ज्ञानेश्वर महाराजांचे मागून झाले आहेत असें ग्रंथांतगत पुराव्यावरून सहज सिद्ध करतां येतें. पहाः—

दुसऱ्या प्रकरणाच्या आरंभीं सदानंदांनीं सद्गुरूस नमन केलें आहे तें असें:—

ॐ नमो सद्गुरु सकळाद्या । नमो निगमागमप्रतिपाद्या ।
नमो भवरोगवैद्या । आराध्यमुर्ती ॥ २ × १ ॥

श्री ज्ञानेश्वरी पहा:—

ॐ नमो आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ × १ ॥

नमो जगदखिलपालणा । मंगलमणि निधाना ।
सज्जनवनचंदना । आराध्यलिंगा ॥ १० × ३ ॥

तसेंच आणखी दुसरें उदाहरण पहा:—

तेथ आत्मबोध पाक । पीकलें हें अमोलीक ।
तो ग्रंथ सज्जन लोक । संग्रह करीतु ॥ ८ × २३ ॥

हे सज्जनाची वरो । येणें चि काळ सरो ।
हा दुःकाळ न थारो । क्षीण हि भरि ॥ ८ × २४

आतां सुखसुकाळ व्हावया । हे अध्यात्मिक कथा बोलिलि मियां ।
प्रीति पावो दत्तात्रेयां । सदानंदु म्हणें ॥ ८ × २५

हें वर दाखविलेलें साम्य प्रत्यक्ष दिसण्याऐवजी मनास भावणारें आहे. असो. परंतु या साम्यतेवरून च केवळ श्री ज्ञानेश्वरांचे नंतर हे सदानंद झाले असें ठरविणें धोक्याचें होईल; म्हणून आणखी बलवत्तर असें एक अंतःप्रमाण देतों:—

सदानंदांनीं जी आपली परंपरा दिली आहे ती अशी:—

तो चि अत्री उदयाचळीं । पूर्व–अनसूयेचा करकुळीं ।
प्रकाशे अंशमाळी । दत्तात्रयें ॥'
मग सदानंदु पद्मसंकोचु । होता तो पावतां रश्मीमेचु ।
ब्रह्मानंदु (?) विकचु । जाला मगु ॥
तोशवावया परागु । धरूनि जीविं अनुरागु ।
केमयानंदु महाभृंगु । पावला तेथ ॥
सर्वे स्वजाति विलयानंदु । सुखविभागिया तत्वविदु ।
तो केमयानंदु आमोदु । आत्मबोधु दिधला ॥

ऐसा दत्तात्रय ओंगुमाळी । प्रगटला सदानंद हृदयकमळीं ।
तो परागु सेवितां आली । केमयानंदु   २० ॥
तें देखोनि विद्रद । पावले सज्जन षट्पद ।
माजी भोक्ता विलयानंद । विचक्षण ॥
ना तो विलयानंदु मेघु । फेडावया मुमुक्षवसुधेचा दाघु ।
जाला तो वृष्टिप्रसंगु । सदानंदु भूमी ॥ २२ ॥

७ यावरून जी परंपरा उघड दिसते ती अशीः—

दत्त—( १ ) सदानंद—( २ ) केमयानंद—( ३ ) विलयानंद—( ४ ) सदानंद.

या परंपरेंतून ब्रह्मानंद मीं मुद्दाम गाळले आहेत, कारण २० वे ओवीवरून हे पुरुष परंपरेंत नव्हते असें उघड दिसतें. [१०

ही परंपरा आणि पूर्णानंद अगर सदानंद ( शिवराम स्वामी ) यांनीं दिलेली आपली परंपरा एक करून आपण पाहूं ह्मणजे या सदानंदांचा काल तेव्हां च स्पष्ट होईल. दोन्ही परंपरा एक केल्या तर अशी एक परंपरा दिसेलः--

श्री आदिनाथ
|
दत्त
|
सदानंद

( १ ) रामानंद
( २ ) गंभीरानंद
( ३ ) ब्रह्मानंद
( ४ ) सहजानंद १५१४
( ५ ) पूर्णानंद १५३२
( ६ ) सदानंद ( शिवराम )

( १ ) केमयानंद
( २ ) विलयानंद
( ३ ) सदानंद

या परंपरेंतील प्रत्यक्ष ज्यांचा काल माहीत आहे असे दोन पुरुष आहेत. एक पूर्णानंद. यांच्या अवधूतगीतेचा रचना-शक १५३२ हा आहे. आणि त्यांचे च

गुरु जे सहजानंद त्यांनीं केलेल्या योगवाशिष्ठसार या ग्रंथाचा रचना-शक १५१४ ( पंचराशेंत आगळीं चतुर्दशें ) नंदन संवत्सर हा आहे. तेव्हां पूर्णानंदांचा काल अत्यंत स्थूल मानानें शक १५००–१५४० हा धरण्यास बिलकुल हरकत नाहीं. तसें च सहजानंदांचा काल १४८०–१५२० हा गणल्यास चूक होईल असें हि नाहीं. या मानानें सहजानंदांचे गुरु जे ब्रह्मानंद त्यांचे सम पिढींतील जे 'सदानंद' ते वर दर्शविल्याप्रमाणें १ ले व ८ वे सदानंद यांच्याहून भिन्न असून ते बहुधा १४२०–१४८० या सुमारास होऊन गेले असावेत. वर दर्शविलेल्या दोहों सदानंदांहून यांची परंपरा भिन्न आहे व तसाच काल हि भिन्न आहे.

ॐ आषाढ शुा ११।३५ } गो. का. चांदोरकर

१०] सूचनाः—' पूर्णानंद ' या माझ्या लेखांत अत्यन्त स्थूल दृष्ट्या मीं त्यांच्या परंपरेंतील पुरुषांचे काळ दिले आहेत, त्यांत व आतां दिलेल्या पूर्णानंद व सहजानंद यांच्या कालांत भेद आहे. परंतु हे दोन्ही काल मीं त्यांच्या आयुष्यांतील एक शक निश्चित धरून त्यावरून अनुमित असे गणलेले आहेत, तसेंच पूर्णानंदांवरील निबंध मीं जेव्हां लिहिला तेव्हां सहजानंदाचा शक निश्चिततेनें मला उपलब्ध झाला नव्हता.

गो. का. चांदोरकर

## २९ सहजानंद

२०] ॥ सहज पूर्ण निजरंगीं रंगला ॥

या एका पद्यार्धांत परंपरेंतलि चार संतांचीं नांवें आलीं आहेत. सहजानंद, पूर्णानंद, निजानंद, व रंगनाथ. हे जे रंगनाथांचे परात्पर गुरु सहजानंद त्यांचे ग्रंथांसंबंधीं आज थोडें लिहीत आहें.

ग्रंथाबद्दल लिहावयाचें म्हणजे ग्रंथकाराबद्दल हि त्रुटित माहिती असावी, परंतु तशी माहिती ' सहजानंद ' स्वामीबद्दल देण्यास आज साधनें उपलब्ध नाहींत. फक्त गुरुपरंपरा मिळाली आहे ती पूर्णानंदांचे निबंधांत मीं मागें दिली च आहे. वाचकांस त्रास पडूं नये म्हणून पाहिजे तर पुन्हां देतों:—

श्रीदत्त—सदानंद—( निर्मल अथवा अमलानंद )—गंभीरानंद—ब्रह्मानंद—सहजानंद— पूर्णानंद.

या परंपरेवांचून इतर कांहींएक माहिती स्वतः स्वामीबद्दल मला उपलब्ध झालेली नाहीं.

तेव्हां आतां ग्रंथाबद्दल च थोडें लिहिणें योग्य होईल. सासवड येथील श्री सोपानदेव मठांतील संग्रह वरवर चाळीत असतां सहजानंदांचे नांवावर असलेला, एक ज्ञानप्रदीप अथवा ज्ञानदीपिका या नांवाचा ग्रंथ माझे पहाण्यांत आला. हा ग्रंथ त्रुटित च त्यावेळीं उपलब्ध झाल्याकारणानें त्याबद्दल विशेष बोध होण्यासारखा नव्हता. फक्त एके ठिकाणीं

‘ सिद्ध कपिल ऋषी संवाद ’

असें ह्मटलें आहे व इतरत्र

‘ शिव भगवान संवाद ’

असें आहे.

यावरून ही कदाचित् कपिलगीतेवर टीका असावी असा संशय येतो, परंतु वेळ नसल्याकारणानें मला विशेष चौकसपणा धरतां आला नाहीं. तथापि माझ्या जवळ सासवड मठाची जी टिप्पणी आहे तींत या ज्ञानप्रदीपाचे नांवासमोर एक शेरा आहे तो विशेष महत्वाचा आहे; तो शेरा असाः—

## भाषा जुनी

म्हणजे या पोथींतील रूपें जुनीं आहेत व इतकीं ओळखतां येण्यासारखीं जुनीं रूपें ज्या पोथींत आहेत ती बहुधा नाथांचे वेळीं लिहिली गेली असावी असा तर्क आहे. संशोधकांनीं जरूर या ग्रंथाबद्दल शोध करून तो हस्तगत होईल असें करावें.

दुसरा ग्रंथ सहजानंदांचा मला श्री. सरदार मेहेंदळे यांनीं दिला. या ग्रंथांत सहजानंदांचें नांव प्रत्यक्ष कोठें हि नाहीं व ग्रंथ हि अत्यन्त त्रुटित आहे. परंतु त्यांत सद्गुरु ब्रह्मानंदांस नमन आहे व भाषा जुनी आहे. यावरून हा ग्रंथ सहजानंदांचा च आहे असें निश्चिततेनें सांगतां येतें.

ग्रंथ ‘ योगवशीष्टसार ’ नांवाचा असून त्याचें फक्त १० वें प्रकरण च उपलब्ध झालेलें आहे व तें हि अपूर्ण च आहे. आरंभीं मात्र

जय जय सद्गुरु ब्रह्मानंदा । जय जय सद्गुरु परम सुखदा ।
जय जय सद्गुरु चिदाचिद्भेदा- । तीत सदा ज्ञानमूर्ति ॥ १ ॥

ग्रंथारंभीं सद्गुरु यां पदानें संबोधून ज्या अर्थी ब्रह्मानंदांस नमन आहे त्याअर्थी ते प्रत्यक्ष सद्गुरु च असले पाहिजेत ह्मणजे त्यांच्या प्रत्यक्ष शिष्याची च ही रचना असावी असें अनुमान सहज च निघतें व तें चुकीचें नाहीं हें पुढें दिलेल्या ग्रंथरचनाशकावरून हि स्पष्ट होईल. असो.

श्रीमद्भगवद्गीतेइतका जरी नाहीं तरी ' योगवाशिष्ठ ' हा ग्रंथ अत्यंत संतप्रिय होता हें त्याच्या प्राकृतांत झालेल्या अनेक प्रतिकृतींवरून स्पष्ट होईल. हरिदास, शिवराम, व्यंकट, रंगनाथ, माधव यांनीं योगवाशिष्ठाचें प्राकृतांत रूपांतर केलें आहे व हीं रूपांतरें उपलब्ध हि आहेत. परंतु आजपर्यंत उपलब्ध नसलेलें असें श्रीज्ञानेश्वर महाराजांचें ' योगवाशिष्ठ ' हि मला नुकतें च उपलब्ध झालें आहे. श्रीमद्भगवद्गीते-वरील सर्व टीकांत जसें श्रीज्ञानेश्वरीस अग्रस्थान, तसें च या वर दिलेल्या सर्व योगवाशिष्ठांत श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या टीकेस अग्रस्थान मिळेल असा तो अप्रतीम ग्रंथ आहे.

त्याचप्रमाणें— म्हणजे श्री ज्ञानेश्वर महाराजांचा जसा ' योगवाशिष्ठ ' नुकता च उपलब्ध झाला तसा—सहजानंदांचा हि नवीन च उपलब्ध झाला आहे. सरदार मेहेंदळे यांनीं ३ ग्रंथ माझे स्वाधीन केले. त्यापैकीं दोघांसंबंधीं पूर्वी लिहिलें आहे च. राहिलेला ३ रा ग्रंथ हा सहजानंदांचा ' योगवाशिष्ठ ' नांवाचा आहे.

> इतुकिया वरि टीकाकर्ता । कर जोडुनि प्रार्थी संता ।
> श्रीराम वाशिष्ठसंवादु निरुता । येथुनि जाला संपूर्ण ॥

यां ग्रंथाचीं एकंदर १० प्रकरणें आहेत असें स्पष्ट च दिसतें व सहजानंद स्वामी हि म्हणतात.

> म्यां यथामति करूनि साचें । केलें व्याख्यान दशप्रकरणाचें ।
> ना ना तुमचें तुम्हीं च बोलविलें वाचें । म्यां केलें हें हि म्हणों नये ॥

श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं हि आपल्या योगवाशिष्ठाचीं १० दहा च प्रकरणें केलीं आहेत. व ते साग्र असल्यानें त्यांचीं निरनिराळीं नावें हि देतां येतील. तसें सहजानंदांच्या योगवाशिष्ठाचें नाहीं. एक च प्रकरण उपलब्ध झालें व त्याचें हि शेवटचें पान उपलब्ध नसल्यानें तें त्रुटित असें आहे. त्यामुळें इतर नऊ प्रकरणांचीं नावें समजण्यास हलीं तरी मार्ग नाहीं च नाहीं परंतु दहाव्याचें नांव समजणें शक्य नाहीं. तसें च एकंदर ग्रंथ संख्या किती आहे त्याची हि अटकळ बांधवत नाहीं. कारण प्रत्येक प्रकरणाची ओवी–संख्या सारखी च असते असें नाहीं. फरक तरी थोडा थोडका असतो असें हि नाहीं. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या योगवाशिष्ठांतलि प्रकरणांची

ओवी संख्या पाहिली म्हणजे त्रुटित ग्रंथावरून एकंदर ग्रंथाच्या परिमाणाची अटकळ बांधणें किती धोक्याचें असतें असें सहज दिसून येईल. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या योगवाशिष्ठाचें प्रकरणांतील ओवी-संख्या अशीः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रकरण | १ | लें | — | ३६३ |
| ,, | २ | रें | — | ८३ |
| ,, | ३ | रें | — | ५६ |
| ,, | ४ | थें | — | ६३ |
| ,, | ५ | वें | — | ४२ |
| ,, | ६ | ,, | — | १४४ |
| ,, | ७ | ,, | — | ९२ |
| ,, | ८ | ,, | — | ४० |
| ,, | ९ | ,, | — | १०३ |
| ,, | १० | ,, | — | १५७ |

या दहा प्रकरणांपैकीं एखादें प्रकरण उपलब्ध झालें व त्यावरून इतर प्रकरणांच्या विस्ताराबद्दल अनुमान काढूं लागलों तर अत्यंत मोठा प्रमाद होईल. हें लक्षांत घेऊन सहजानंदस्वामींच्या या दहाव्या प्रकरणाची ओवी संख्या सुमार २७० असेल असें जरी गृहीत धरणें साधारणतः बिनचूक होईल तरी तेवढ्यानें इतर नऊ प्रकरणांचा विस्तार अमुक असावा असें अनुमान काढतां येणें शक्य नाहीं.

आतां विस्ताराबद्दल जरी साशंक असणें दुस्त्याज्य आहे तरी या एका च प्रकरणावरून एकंदर ग्रंथाच्या स्वरूपाबद्दल अनुमान काढणें कांहीं धाष्टर्य होणार नाहीं.

एकंदरींत रचना पंडितपद्धतीची आहे. नाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित व मोरोपंत यांचा कोणता हि ग्रंथ हातीं घेतल्याबरोबर ग्रंथकाराच्या पांडित्याचा जो ठसा मनावर उठतो तो च सहजानंदस्वामींच्या या योगवाशिष्टानें हि परिणाम होतो.

नाथांची अलोट भक्ति व भक्तिप्रेम, मुक्तेश्वरांचा प्रसाद, व मोरोपंताचे ठिकाणीं असलेलें या दोहोंचे हि मिश्रण यांचे योगानें त्यांच्या ग्रंथावर रचनेची छाप न बसतां उलट रसाचा परिपोष च होत गेलेला आहे. एरवीं संस्कृतशद्बांची ज्या मराठी रचनेंत बरीच भेसळ असेल ती साधारणतः दुर्बोध च व्हावयाची व ही दुर्बोधता रसभंगास विशेष कारणीभूत असते. उलट अत्यंत परिचयांतील निव्वळ मराठी शब्दांच्या योजनेनें कदाचित् ग्राम्यतेचा दोष येण्याची भीति असते; व म्हणून च

श्रीज्ञानेश्वर महाराजांचें ग्रंथरचनेचें चातुर्य जितकें वर्णावें तेवढें थोडें च होणार आहे. कवीची अलोट प्रतिभा, चित्रकाराची कल्पना, साक्षात्कार ज्यास झाला आहे अशाची अधिकारयुक्त वाणी, वादींयाची भेदकता, सद्गुरूची कळकळ, सद्भक्ताचें प्रेम व भाषाशास्त्रज्ञाचें शब्दनैपुण्य, व हीं सर्व एकवटून त्यांत चित्रकाव्याची हि भर पडल्यावर जो ग्रंथ निर्माण होईल, त्याची योग्यता काय वर्णावी ! श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा कल्पनामहोदधी इतका विस्तृत आहे कीं त्याचें उल्लंघन अद्याप कोणत्या हि प्राकृत कवीनें केलें नाहीं. मात्र त्यांच्या मागून आलेल्या सर्व संत-कवींनीं त्याचा मनसोक्त उपयोग मात्र आपले ग्रंथांत केलेला आहे. व्यासोच्छिष्टं जगत्त्रयम् अशी म्हणण्याची पद्धत आहे, तसेंच ' ज्ञानोच्छिष्टा प्राकृतकवि कृतिः ' म्हटलें तरी हि शोभण्यासारखें आहे. असो.

सहजानंद स्वामींची रचना नाथांच्या रचनेप्रमाणें पण्डिती आहे परंतु ग्रंथविषय व ग्रंथविस्तार भिन्न व भिन्न प्रमाणाचा असल्यानें इतर गुणांचा विकास दृग्गोचर होत नाहीं. ओवी साडेतीन चरणी च आहे परंतु ती आटपशीर नसल्यानें तिच्यांत श्रीज्ञानेश्वरींतील ओवींसारखी सगर्भता नाहीं. तथापि लांबलचक शब्दांनीं कां होईना पण विषय विशद करण्याची हातोटी बरी आहे. एक दोन उदाहरणें घेऊं:—

दृश्यदर्शनसंबंधान्नभवेत् परमं सुखम् ।
दृश्यसंवलितो बन्धः तन्मुक्त्या मुक्तिरुच्यते ॥

या श्लोकावरील टीका पहा:—

जालिया इंद्रियांसि पदार्थदर्शन । दृश्य हें पदार्थासि होये अभिधान ।
आणि इंद्रियांचां ठाई जाण . दर्शनसंज्ञा बोलावी ॥
हा दृश्यदर्शनसंबंधु आत्मयासी । लावुनि आणिलें जें द्रष्टुत्वासी ।
तें चि मन बोलिजे निर्धारेसि । सुखदुःखासि कारण जें ॥
एवं दृश्यदर्शसंबंधें प्राप्ति । द्रष्टुत्व आणूनि आत्मयाप्रति ।
आपुलिया संकल्प बहुवृत्ति । सुखदुःखातें उपजवी मन ॥
जेथ सुखदुःखासी अधिवासु । तेथ कैंचा परम सुखाचा लवलेशु ।
सुखदुःख विलक्षण जो उल्हासु । तें चि बोलिजे परम सुख ॥
यावरि सद्गुरु खुणा । जरि आम्हां नव्हे दृश्य देखणा ।
तरी ठाव कैंचा उरेल मना । मनाभावें सुखदुःख नसे ॥
जेथ सुखदुःखाची नास्तिकता । तेथें चि परम सुखाची आस्तिकता ।

तस्मात् करणात् आतां । इदं मिथ्यं हे चि रघुपाति ॥
आत्मा दृश्य योगें करून । पावे द्रष्टुत्वाचें बंधन ।
तें निंबधाचें लक्षण । आतां मुक्ति ते ऐसी ॥
सोडी आत्मया ते दृश्यभ्रांति । द्रष्टुत्वाची होये उपशांति ।
द्रष्टोपशमनीं मोक्षप्राप्ती । ते चि मुक्ति बोलिजे ॥

उतारा लांबलचक झाला तरी पण येकंदर ग्रंथरचनेची कल्पना होण्यास एवढा अवश्य च आहे.

या एका प्रकरणावरून विपयाच्या मांडणीची जी कल्पना होते ती अशी कीं अद्वैत प्रतिपादनाचा हा विषय असून हि श्लोकांत पूर्वापर संगति नाहीं. प्रत्येक श्लोक स्वतंत्र आहे; म्हणजे असें कीं एक श्लोक त्याचे पूर्वींचे जागीं न ठेवतां इतरत्र ठेवला तरी हि अर्थभेद होणार नाहीं, उघड च आहे जेथें मागचे श्लोकांतून पुढचे श्लोकाची उत्पत्ति नाहीं म्हणजे जेथें विचारसंतति नाहीं तेथें श्लोकांची रचना सूत्रग्रथित मण्यांसारखी परस्पर भिन्न च असावयाची.

यांतील सर्व च भाग उत्कृष्ट आहे, त्यांत हि माझे दृष्टीनें अधिक चांगला जो भाग आहे तो देऊन हा लेख पूर्ण करतों.

श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं ३ रे आध्यायांत खरें नैष्कर्म्य कोणतें याबद्दल उपदेश केलेला आहे च. ' कर्मत्याग ' म्हणजे ' अकर्मी ' राहणें नव्हे.

म्हणौनि संगु जवं प्रकृतीचा । तवं त्यागु न घडे कर्माचा ।
एथ करुं म्हणति तेयांचा । आग्रहो चि उरे ॥

असे जे आग्रही आहेत त्यांस ' नैष्क्रियत्व ' बाणलेलें नाहीं. तो खरा 'नैष्क्रिय'

जो इंद्रियां आज्ञा करी । विषयांचें भय न धरी ।
प्राप्त-कर्म नव्हेरी । उचित जें जें ॥
म्हणौनि जे जे उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।
तें कर्महेतुरहित । आचरे तुं ॥

याबद्दल सहजानंदांनीं केलेली टीका देतों:—

आणि दृष्टि देउनि श्रेयावरि । विहित-कर्म कदा न करी ।
कां जे अद्वितीय स्थिति च सूपरि । बाणलेंसे निरपेक्षत्व ॥
एवं दोष न देखोनि जरि । निषिद्ध कर्माचा त्यागु करि ।

आणि विहित कर्मातें आंगिकारि । श्रेयभाव न देखोनि ॥
करूं नये तें न करी । करू ये तेणे चि वर्ते व्यवहारीं ।
परंतु करणे न करणे कुसरी । त्याचीं ठाई बोलों चि नये ॥
त्याची सहजी बुडाली हेतु । म्हणौनि सहजप्रवाहे वर्ततु ।
ये अर्थी येकु असे दृष्टांतु । तो अवधारी रघुत्तमा ॥
जैसें बालक निर्हेतुकपणें । कर्म कार्य कर्तव्य नेणे ।
कोण्हि येकु आपुला प्रवाह तेणें । इंद्रियद्वारा वर्ततसे ॥
तैसि सहज समाधि बाणे जया । जो उमजोनि जाला नुमजण्या ठाया ।
तो स्वप्रवाहे वर्ते परि तया । कार्य कर्तृत्व न स्फुरे ॥
एवंविध प्रवाह तरि नुमजाचा । परि सत्कर्मचि रूपभाव त्याचा ।
ये अर्थी दृष्टांतु गंगेचा । बोलिजेल ते आकर्णी ॥

नैष्कर्म्याबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें व सहजानंदस्वामींचें अशीं दोन्ही निरूपणें वाचकांपुढें ठेविलीं आहेत. तीं लक्षांत घेऊन मी जें वर स्वामींच्या रचनेबद्दल विधान केलें आहे त्याच्या सत्यासत्यतेबद्दल वाचकांनीं च आपल्या मनाशीं निर्णय करावा.

ग्रंथसमाप्ति कालः—
पंधरा शतें आगळिं चतुर्दशें । इतुकीं शालिवाहनशकासी वर्षें ।
नंदनसंवत्सर असे । येणे समयीं ॥
× × मास तरी पुण्यरूप अश्विन ।
पक्षु तरि कृष्णाभिधान । तिथि तरि अष्टमीसह नवमी ॥
वासरू सोमसुताचा निश्चित ।

शक १५२४ नन्दन संवत्सर अश्विन कृष्ण ८।९ बुधवार.

आषाढ शुा १३।३५ } गो. का. चांदोरकर
धुळें

## ३० महालिंगदासाची सिंहासन ३२ शी

हा ग्रंथ प्रस्ताविक । राजनीती अत्यंतक ।
डोळस होय लोक । आईकीलीया ॥ ३२ × ४५ ॥

वेताळपंचविशी व सिंहासनबत्तिशी हे ग्रंथ गद्यांत बरेच प्रसिद्ध व प्रिय आहेत. ते बरेच प्राचीन हि असावेत असें वाटतें. कारण महालिंगांनीं आपल्या वर दिलेल्या ग्रंथांत त्या दोहोंचा हि उल्लेख स्पष्ट केलेला आहेः–

रिद्धि सिद्धि प्रसन्न करणे । म्हणे राया तु वेताळ आणणे ।
हे कथा पूर्वी च तुज जाणे । सांघीतली असे ॥ ३१ × ५ ॥
मागे दीगांबराचिया बोला । राजा वेताळ आणो गेला ।
पंचवीस वेळा आला गेला । तेव्हां आणिला तो वेताळ ॥ ६ ॥
मग ते वेळी वेताळे । पंचवीस कथेचे उच्चारण केले ।
याकारणे जगी बोलीले । वेताळपंचवीसी ती ॥ ७ ॥

यावरून वेताळपंचवीसी या ग्रंथाच्या पूर्वी च झालेली होती हें उघड आहे. आतां ती गद्यांत होती अथवा पद्यांत होती हें निश्चित सांगतां येत नाहीं तथापि वरील ओवींवरून असें अनुमान निघतें कीं, महालिंगदासांनीं जशी सिंहासनबत्तिशी गद्यांत असलेली ओवीबद्ध केली तद्वत् च वेताळपंचविशीचा हि इतिहास असावा.

सिंहासनबत्तीशी ही पूर्वी गद्यांत होती यास प्रमाण खुद्द महालिंग च या ग्रंथांत म्हणतातः–

× आधार मऱ्हाटी । केली म्या बरवी प्रपाठी ।
जें गायनकळा गोमटी । चांग दीशें ॥ ३२ × ३७ ॥

यावरून उघड आहे कीं या ग्रंथास प्रथम आधार 'मऱ्हाटी' असून 'चांग दीशे, म्हणून 'गायन कळेंत' महालिंगदासांनीं त्याचें रूपांतर केलें.

महालिंगदासांचें हें 'गायनं कळे' तील रूपांतर

शालीवाहन शकी । चौदा सत्यशाहासी देखीं ।
रक्ताक्ष संवत्सरी ऐकी ।

पुढचें शेवटचें पान दुर्दैवानें उपलब्ध झालें नाहीं, तरी शक १४८७ रक्ताक्षींत झालेलें आहे हें उघड आहे. तेव्हां या कालापूर्वी वेताळपंचविशी व सिंहासन बत्तीशी आपापल्या गद्य ( ? ) रूपांत प्रचलित होत्या यांत संशय नाहीं. आतां हा पद्य ग्रंथ कोणते योग्यतेचा आहे याबद्दल विचार करण्यापूर्वी ग्रंथकाराबद्दल थोडेंसें विवेचन करणें शिष्टाचारास अधिक धरून होईल म्हणून त्यांचा थोडा विचार करतों.

# महालिंगदास

पूर्व खानदेशांतील चाळीसगाव तालुक्यांत गिरिजा उर्फ गिरणा नदीचे कांठीं वाडें म्हणून एक खेडें आहे. जसें हें हल्लीं अगदीं लहान आहे तसें च १५ वे शतकांत हि लहान च असावें अशी कल्पना करण्यास एक कारण आहे, तें हें कीं, त्याचा उल्लेख महालिंगदास हे स्वतंत्र रीतीनें न करतां असा करतातः–

आचर्य देश म्लेछ राष्टरी। बहाळ समीप ग्रीजा तीरी।
वाडे ग्राम पवित्र थोरी। तेथ हा ग्रंथ केळा असे॥

या वरून स्वतःच्या पावित्र्याबद्दल कदाचित् मान्य, परंतु विस्तारानें अगदीं लहान असें च हें वाडें तेव्हां असावें असा या उल्लेखानें बोध होतो. वाडें व बहाळ हीं दोन गांवें, गिरिजेच्या दोन कांठास जवळ जवळ आहेत. या वाडें गांवीं हा ग्रंथ झाला. यावरून महालिंगदास हे १४८७ चे वेळीं वाडें येथें खानदेशांत होते या पेक्षां यांची अधिक प्रत्यक्ष अशी माहिती कांहीं आजपर्यंत उपलब्ध झालेली नाहीं. तेव्हां त्यांच्या ग्रंथावरून अप्रत्यक्षतेनें जी माहिती मिळेल ती बरीचशी तर्कावर अवलंबून असावयाची हें उघड आहे. तरी प्रत्यक्षाच्या अभावीं अप्रत्यक्ष हि बोधप्रद व सूचक होईल म्हणून तशी थोडक्यांत देण्याचा प्रयत्न करतोः—

यांचे गुरु कदाचित् **महालिंग** हे असतील व म्हणून च हे स्वतास **महालिंग-दास** म्हणवितात असें वाटतें. हा तर्क खरा असल्यास हे महालिंग नांवांवरून बहुधा लिंगाइत असावेत. व म्हणून ग्रंथकार हि बहुधा लिंगाइत च असावेत लिंगाइताचा शिष्य लिंगाइत च असतो च असा कांहीं नियम नाहीं. **शांतलिंग** हे लिंगाइत होते पण त्यांचे शिष्य कृष्णापा—जयराम स्वामींचे गुरु—हे लिंगाइत होते असा कोठें उल्लेख सांपडत नाहीं.

महालिंगदास हे संस्कृतज्ञ तर होते च, परंतु ते बहुश्रुत हि होते. विष्णुशर्मा पंडितामाणें गोष्टीचे रूपानें ज्ञानबोध करणें हें सामान्यतः बहुश्रुतता अंगीं आल्या-वांचून शक्य नाहीं. मधून मधून दिलेल्या संस्कृत श्लोकांच्या अवतरणांवरून त्यांचें वाचन विस्तृत होतें हें तर दि[illegible]च, परंतु त्यावरून त्यांची योजकता हि स्पष्ट होते. हे 'वेदांतमतानुयायी' होते असें येथें च सांगून ठेवणें बरें. श्रीविक्र-माच्या सभेंत भिन्नमतानुयायी पण्डितांची सभा भरली असतां तेथें वेदान्त-मताचा विजय झाला असें महालिंगदासांनीं वर्णन केलें आहे. यावरून त्यांचा कल कोणीकडे होता तें स्पष्ट दिसतें. त्यांच्या अवलोकनांत कोणकोणते ग्रंथ होते हें जरी निश्चिततेनें सांगतां येणें शक्य नाहीं तरी पण भर्तृहरीकृत शतकत्रय, सुभाषित, पंचतंत्र, श्रीमद्भगवद्गीता, श्रीज्ञानेश्वरी, श्रीमद्भागवत हे ग्रंथ त्यांनीं वाचले

होते च परंतु स्वतः संस्कृतज्ञ असल्यानें कदाचित् वेदान्तपर इतर संस्कृत ग्रंथ हि त्यांच्या अवलोकनांत असावेत अशी दृढ शंका येते. पण असला संकुचित निर्देश करणें अयुक्त आहे. पूर्वील ग्रंथकारांच्या अंगीं कोणते दर्जाची विद्वत्ता हवी असते अशाबद्दल कांहीं ठिकाणीं उल्लेख दिलेले आढळतात; त्यावरून असें दिसतें कीं ग्रंथकारांस संस्कृताचें ज्ञान उत्तम हवें असतें व तत्पूर्वीचे प्राकृत ग्रंथकार हि त्यानें वाचले असले पाहिजेत, शिवाय गुरुकृपा व प्राक्तन हीं निराळीं च. त्या दृष्टीनें महालिंगदासांची तयारी इतपत तरी असली पाहिजे असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं; आणि पुढील विवेचनावरून हें अधिक स्पष्ट होण्यासारखें हि आहे.

'सिंहासनबत्तिशी' हा ग्रंथ कल्पित आहे हें सकृद्दर्शनीं च उघड होतें; व सर्व ग्रंथाचा एकदम विचार केला म्हणजे असें दिसून येतें कीं, प्रासंगिक विचार बाजूस सारले तर-ग्रंथकाराचे मतें- या जगांत सर्व दुःखांस कारण, व बुद्धीस भ्रंश पाडण्यांत अग्रणी अशी जी कनककांतेची जोडी, तिचा पाश तोडणें-हें प्रत्येक विचारी माणसाचें आद्य कर्तव्य आहे; व या 'कनक व कांता' दुकलीचें वैयर्थ्य जितकें अधिक मनावर ठसेल तेवढें इष्टतर आहे अशा दृष्टीनें सर्व ग्रंथाची रचना झालेली आहे. विक्रमाचा जो मोठेपणा व जें 'उदार्य' हीं ३२ पैकीं बहुतेक पुतळ्यांनीं भोजरारापुढें गायिलीं तीं त्यानें अमोल वस्तू, अनर्घ्यरत्नें व अप्रतिम सुंदर स्त्रिया यांचा मोह कसा वेळोवेळीं सोडला याबद्दलचीं च होतीं. हा एक च विचार सर्व कथांतून गोंवला गेला असल्यानें सहज च ग्रंथ कंटाळवाणा व्हावयाचा परंतु प्रसंगोपात्त जे अन्य विचार महालिंगदासांनीं प्रत्येक कथेंत वाचकांपुढें मांडले आहेत, जो एक प्रकारचा व्यावहारिक सामान्य बोध केलेला आहे, व त्यांत जें व्यावहारिक चातुर्य गोंविलें आहे, आणि स्वतःच्या प्रमेयांच्या समर्थनार्थ जीं प्राचीन संस्कृत, सयुक्तिक व अर्थपूर्ण अशीं अवतरणें दिलीं आहेत, त्यामुळें संबंध ग्रंथास वैचित्र्य उत्पन्न होऊन, तो मनोरंजक झाला आहे व त्यावर सामान्यतः विद्वत्तेची छाक पसरली गेली आहे. असो,

त्या ८१ ग्रंथाचें आज पर्यालोचन साग्रतेनें न करता, त्यांतील ऐतिहासिक दृष्ट्या, जो एक महत्वाचा भाग आहे तेवढा च देतों, वस्तुतः भाषाशास्त्राच्या दृष्टीनें व इतर दृष्टीनें या १५ वे शतकातील ग्रंथाचें बरेंच महत्व आहे. कारण श्रीज्ञानेश्वरीनंतर नाथांच्या कालीं भाषत कसाकसा फरक होत गेला आहे हें दाखविण्यास जसा चोंभा कवीचा एक ग्रंथ अत्यन्त उपयुक्त झाला आहे, त्या च योग्यतेचा हा महालिंग दासांचा हि ग्रंथ आहेः, व या ग्रंथावरून नाथांचें भागवत-एकादश स्कंध-खरोखर कोणत्या स्वरूपांत पाहिजे आहे त्याची आपणांस खरी अटकळ होईल. सदरचा विषय एका निराळ्या स्वतंत्र निबंधांत गोंवण्याचा माझा विचार आहे; आज वर दर्शविल्या प्रमाणें एक ऐतिहासिक भाग मात्र येथें देतोंः-

११

एके वेळीं विक्रमानें ' छत्तीस कुळीचे ' थोर थोर । उपकुळीचे साठी ॥

३६ कुळीचे व ६० उपकुळीचे राजे मेळविले. हे ३६ व ६० मिळून ९६ कुळीचे रजपूत राजे एकत्र मिळाले. ते कोण कोण त्यांचीं नांवें महालिंगदास देतातः—

" सूर्यवंशी , सोमवंशी, यादव, विदर्भ, प्रभार, इक्ष्वाकु, चव्हाण, चाळके, चौळी, सिराळे, सैंधव, लाडीके, अतिहार, सिंधके, माणकयाण, चापोत्कट, शंख, शब्द-कुट, करपाळ, हरतिट, चंदेले, सुहील, सुहीलपुत्र, राज्यपाळ, पौतिक, धनपाळ, मासकाळे, तुरमोहीनि, हुन, अनंग, विकुंभ, दाहि, माहापरी, दधीपक, हांडोड, चोड, "

हीं ३६ कुळें सांगून महालिंगदास म्हणतातः—

आतां उपकुळें सांघेन । त्यासी द्यावे जी अवधान ।
छत्तिसामाजि अडनांवे जाण । परोपरींचीं ॥ ९१ ॥
जैसे स्थानीं वसले । ते चि अडनांव पावले ।
अथवा करणीस्तव जाले । नाना कुळाचे ॥ ९२ ॥

तीं साठ अडनांवें हींः—

वाघ, वेडाईत, पवार, देउरे, वक्राळेकर; हे कुळीचे प्रमार ॥

अहीरराय, सोनवणी, सोळचकी, देदरे, सदानसी, सुरवाड, कादरदेशी, महीडे-बीसे; हे चाळोके म्हणजिति ॥

तावडे, चव्हाण, वागुळ, राखोडे, मकोडे, नाहुले, ते जाधव बोलीजति ॥

कुठार, मालिंगें, यांत च तहळ मिसळतात, कळंब व कंदर्प हे एक च ॥

पुन्हां अडनांवें सांगतातः—

वाघेल ( त ? ) मकवाण, माडिये, जेठिये, सोडे, चावडे, गिरनार, महाले, कासेले, गोहेल, गोन्हाईत, पढियार, चांदेलेक, धुवर, देवडे, खुमाद, खेगार, सोढेले,

गोल्हाटीचे अडनांवे चि ते ।

पेडाराचीं अडनांवें:— मामैरे, डोंखळे, गदाळिये; वैस, दोरीक, डोड, बेहीये, धावड, चुडासमा, पान, गांधे, वाजी, जाडीजे, वसैर; शिधिले, वाडले, शीधोदये, बाहे; कडाडिये, भलेमले; सरडिये, येरडाये, सीसकुमर, कराळिये, उसीरे, बाहिरमथे, साटीये, सेलोटे, सेलार, डांचरे, बोरीचे करवंदकार, सलींग, लासेकार; गजताप

( जगताप नव्हे, ) खणकार, जोधा, बावीसव्हार, गरुडे, कसबे, पाद्रडे, भद्राळिज, बडे, सताळीच, गंगोडे, दाडिंग; चेहिलीच दासमोरे, बरडीये वाघ, चवरे, चके, भोरे, ( सामाळीये ) मोहारक, थोरहात ( थोरात ), सुरवे ( साळीचे ), मढवे, नागवंधारे, गाइकवाड, झालके, वइले, विंगळे, लेले, कोळीते, सीर, साहस, वाणेर, वाणखंड, काळभंवर, मोहिते, पगार, चिदार, ( अणीजवरीते ).

या होवोनि अगणित । परोपरीची बहुत ।
ते सांगता विस्तार होईल कथेस ।.तेणे श्रोते कोपती ॥

यावरून वर दिलेलीं नांवें संपूर्ण नाहींत हें उघड आहे आणि म्हणून राहिलेलीं " अगणित । परोपरींचीं बहुत । " यांत त्यांचा समावेश होतो.

श्रीशिवछत्रपतींच्या जन्मापूर्वीं केवळ ६२ वे वर्षी व शहाजी महाराजांच्या भर[१० अमदानीच्या पूर्वी सुमारें ५० वे वर्षी हा ग्रंथ लिहिला गेला. त्या वेळीं या च ' राजपुत्र ' ( महालिंगदास रजपुतांस राजपुत्र म्हणतात हें विचार करण्यासारखें आहे ) वंशांतील एक अद्वितीय पुरुष स्वपराक्रमानें आपल्या अखिल कुलास व कुलभूमीस केवढ्या योग्यतेस चढवील याची महालिंगदासांस कल्पना हि नव्हती ! कोठून असणार ! भावी गोष्टींचें अज्ञान असल्यानें वरींच सुखदुःखें या जगांतील हलकीं झालीं आहेत.*

गो. का. चांदोरकर

## ३१ श्रीसुषेणकृत आयुर्वेद महोदधि

मोगलाईत कन्नड येथें एका वैद्याकडे ग्रंथ पहात असतां हा ग्रंथ—अपूर्णच—मिळाला. एकंदर पाने १०२ आहेत. प्रत्येक पान चार बोटें रुंद असून १२ बोटें[२० लांब आहे. नक्की माप द्यावयाचें म्हणजे ३ इंच रुंद व ९ इंच लांब आहे. पान नेहमींचे पद्धतीप्रमाणें दोहों बाजूंनीं लिहिलेलें आहे. पूर्वीचे पद्धतीस अनुसरून कागद दुहेरी आहे प्रत्येक पानाचे एकेका बाजूवर ६ पासून ७ पावेतों ओळी आहेत. परंतु मध्यभागीं जागा सोडली असल्यानें ती बाजू दुहेरी लिहिल्यासारखी भासते.

अक्षर अत्यन्त वळणदार व शाई काळीभोर—पूर्वीची असावी. हल्लीं कित्येक

* सदरहु निबंध वाचला त्या वेळीं भोजापासून भोसले नांव व्युत्पादितां येतें असें रा. राजवाडे यांनीं प्रतिपादिलें.

ठिकाणीं शाई पुसट्र लागली आहे. पोथी कागदावर लिहिली असून तिचा विशेष असा आहे कीं तिला बरोबर मध्यभागीं एक वाटोळें छिद्र आरपार आहे. ताडपत्रावर पोथी लिहून नंतर तीं पत्रें सूत्रांत ओवण्यास सुलभ जावीं अथवा काष्टकीलिक तिच्यांत बसवितां यावी म्हणून त्या ताडपत्रास मध्यभागीं छिद्र पाडण्याची पूर्वीची वहिवाट होती व हल्लीं हि श्रीरामेश्वराकडे यात्रेकरूंचीं नांवें ताडपत्रावर लिहून देण्याची दक्षिणेंत पद्धत आहे. परंतु कागदाचे पोथीस असें छिद्र मी आज हें प्रथम च पहात आहे. हें एक या पोथीचा लेखन काल ठरविण्यास साधन च होईल अशी माझी समजूत आहे.

पोथी उत्तम रक्षण केली असून हि कागद इतका जीर्ण झाला आहे कीं, जेव्हां पोथी बाहेर काढावी तेव्हां तेव्हां पानांचे थोडेसे तुकडे पडतात च.

या पोथीवर शक कोठें दिलेला नाहीं. तथापि एकंदर स्वरूपावरून व अंतःप्रमाणावरून इचा संभवनीय काल माझ्या मतें शक ११०० ते १३०० मधील असावा, असें वाटतें. त्याचीं कारणें थोडींशीं देतों.

१ प्राचीन ' अ ' कार जो आज आपणांस माहीत आहे तो  असा आहे.

त्याचें शक १३०० चें सुमारचें रूप  फक्त इतकें च राहिलें आहे. त्यास

' उ ' जोडून त्याचा ' ओ '  या स्वरूपाचा त्या च वेळचा उपलब्ध

होतो. ओं हा  असा त्यावेळीं काढलेला आहे. या पोथींत हा कांहींसा

या च स्वरूपाचा आहे. ' ओ ' हा अलीकडील ' ॐ ' असा न काढतां अ + उ = ओ म्हणजे '  ' असा काढलेला आहे. यावरून ही लिपि जुनी आहे

व म्हणून ती शक १३०० चे पूर्वी अगर सुमारास लिहिली गेली आहे.

२ शक ११०० मधील पाटण येथील शिलालेखांत मात्रा मागे दिलेली दिसते. उदाहरणार्थ ' भेषजम् ' लिहिणें झालें तर तें ' ाभषजम् ' असें लिहिलेलें सांपडतें. ही मागें मात्रा देण्याची पद्धत शक १४ चे नंतर एखाद्या पोथींत अस-

लेली माझे पहाण्यांत नाहीं. या पोथींत अशी मात्रा मागे देण्याची सरास पद्धति ठेविलेली आहे.

३ ताम्रपत्रांत व शिलालेखांत सरेफ अक्षरें द्वित्त लिहिण्याची चाल आपण पहातों. उदाहरणार्थ ' वर्गः ' वर्ग्गः ' वर्ज ' वज्ज्र्जम् ' असें लिहिलेलें आढळतें. ही पद्धत पुरातन आहे. आधुनिक पोथींत असली पद्धत उचललेली आढळत नाहीं. अशीं सरेफ अक्षरें या पोथींत सर्वत्र द्वित्त आहेत.

४ ' भ ' हें अक्षर प्राचीन एका विशिष्ट पद्धतीनें होतें. हल्लीं हें अक्षर ' भ ' अगर ' भ ' असें काढतात. पुर्वी हे ' त ' असें काढीत असत. हा भकार शक १४०० नंतर कोठें हि दृष्टीस पडणार नाहीं अशी माझी पूर्ण समजूत आहे. १३०० मध्यें ' त ' व ' भ ' असा मिश्र सांपडेल. या पोथींत हा आधुनिक भकार नाहीं. [१०

५ ' ज्ञ ' या अक्षराचीं रूपांतरें होत गेली आहेत ' ज ' पासून ' ज्ञ ' निघाला असला पाहिजे हें उघड आहे. ' ज ' हा अत्यन्त पुरातन '  ' असा आहे.

त्याचें रूप पुढें '  ' असें झालें. पुढें ' अ ' दर्शक व पूर्ण उच्चाराचें साधन म्हणून जेव्हां एक काना बहुतेक–सर्व– अक्षरांचे मागे लागला तेव्हां ' ज ' चें रुप '  ' असें होऊन नंतर '  ' असें झालें. ' ज्ञ ' हा याच '  ' ला वर उभी रेघ जोडून काढूं लागले म्हणजे '  ' असें ' ज्ञ ' चें रुप बनले व पुराण्या पोथीं तून ' ज्ञ ' चें असेंच रुप सापडते हल्लीचे पोथींतवर दिलेलें '  ' हें रुप बनण्याचे पूर्वीचें रुप दिलेलें आहे म्हणजे तें '  '

असें आहे. थोडा सूक्ष्म विचार केला तर पूर्वीच्या ज पासून च हें रुप निघालें असून वर दिलेल्या ' ज्ञ ' चे रुपापेक्षां हें पुरातन आहे असें तेव्हां च नजरेस येईल. [२० शक १४०० शेंत हें रुप मिळावयाचें नाहीं.

६ पोथी संस्कृतांत आहे परंतु कांहीं कांहीं ठिकाणीं प्राकृत (मराठी) शब्द दिले आहेत तेथें ' ळ ' कार इष्ट असूत ' ल ' कार च लिहिलेला आहे. उदाहरणार्थः— तांदुळाचें पीठ केलें.

७ सर्वांत श्रेष्ट प्रमाण या पोथीचे शेवटीं एक पान आहे ( त्यावर ८५ असा आंकडा आहे ). त्यावर कुसळींचा मंत्र लिहिलेला आहे. तो देतोंः—

ॐ नमः कावरुल कामपीठ कामाक्षा ।जागिणी । लांवं कुंसळी
।म्र लोंणीं आपुलेया गुसलणां आणी । आरे दह्यां आार दुध्म डलसि
चलसि तरि ।ताय दुर्गेची आज्ञा । ध्मउलेया झडझडमा ॐ लेया
मसणीं खेल । मत्त ध्मवंत मसणी करी पीडा ।आार दह्यां आार दुध्म
डलसि चलसि तरि चोसठी ।जागिणीची आज्ञा ।दवां गुरूंची सिद्धि ।
ॐ नमो चामुंड प्रचंड तुजदांड कर्म नाटकिनी । अंधकासुरमर्दनीं
जीव रक्ष रक्ष नासाग्री वालाग्री अपदृष्टि य × व परदृष्टि बांधे
लांव बांधे लुत बांधे पिंसें बांधे तूत बांधे तीनिसें कुंसळीं बांधे पांच
सें लावां बांधे सातसें सांजटिंगां बांधे बांध ।र बांध । झोजाकाला
।क्षत्री बांध । बांध × × × × य हनुमंताची आज्ञा ।दवां गुरूंची
सिद्धि ॥ छ ॥ ॥ छ ॥

मार्गे अनुस्वार देण्याची पद्धति आधुनिक नाहीं.

गो. का. चांदोरकर

# ३२ मानभवोत्पत्ति कथा

शारीर शास्त्रावर ग्रंथ लिहिण्यांत ज्याप्रमाणें अश्लीलतेचा दोषारोप करणें अन्याय्य आहे त्या च प्रमाणें पूर्वेतिहास प्रसिद्ध करण्यांत निंदा करण्याचा हेतु गृहित धरतां येत नाहीं. इतकी च सूचना देऊन माझे संग्रहीं असलेली एक जुनी पोथी ऐतिहासिक दृष्ट्या व भाषाशास्त्राच्या दृष्टीनें आपले पुढें ठेवीत आहें. आंतील मजकुराची सत्यासत्यतता संशोधनीय आहे.

पहिलेपान ( १ ली बाजू )

हे पुस्तक आत्माराम स्वामीचा शिष्य सदानंद गोसा
विचे असे

मातंग्यंगज उत्पत्तिमार्ग कथनं ॥
माहात्माचा मार्ग उत्पत्तिः पत्राणि ॥ ७ ॥

---

१ मार्गे अनुस्वार देण्याची पद्धत या पोथीच्या लेखनकालीं होती हें स्मरणीय आहे.

हे पुस्तक धराणिधर छेत्र निवासी मधुसूदन धर्माधिकारी तत्पुत्र चिंतामणि धरमाधिकारी तत्सुत सदाशिव धर्माधिकारीचे असे ॥

ऐसा हा मातांग पाखंडचा मार्ग जाणावा

२ री बाजू

आनंदायनमः ॥ शालिवाहन शके १२५५ वे म
न्मथ नाम संवत्सरे माघ मास वदी तीज़ शुक्र वा
सरे ते दीवसी भटमार्गु जाला । ते समयी देवगीरी
स । रामदेवो राज्य करी तयाचा दायाज देवपाराजा
तो पैठणी राज्य करी । रामदेव रावो आणि देवपा
ल[1]राज हे दोघे गोत्रज होति । हे जाधव वंशिंचे राजे ।
ते समयी गोदावरी तिरी समीप मुगी पैठन नाम न
गरी तेथें तो देवपाल राजा राज्य करी त्याचा पुरोहि
त कृष्ण भट्ट तो देवपाळ याचा पुरोहित कृष्ण भट्टा ×
नगर [2]बाहिरी असे । तेथे कुरंग नाम मातां ×

२ पान

तो रायाची सेवा करी । त्या कुरंग मातांगाची कंन्या देवकी ।
सुंदरी ते गणीका कर्म करे । तीसी तो कृष्णभट्ट पुरोहित
लुब्ध जाला । तो सकलीक लोकांसी व ब्राह्मणासी ठाउ
का जाला । जे देवकी मातांगी गणिका वेश्यासी संबंधु घ
डला । अनामिकिसी व ब्राह्मना कृष्ण भट्टासी संबंधु घ
डला पाप लोपेना । जगप्रसिद्ध जाला ठाऊका । मग सक
ळा ब्राम्हणामध्यें श्रेष्ठ नागभट्ट तो पैठीनिचा आद्य उपाध्या मु
ष्या (ख्या) । तेनें देवपाळ रायासी जाउन ते मातु सागता जाला ।
जो तुमचा पुरोहित कृष्णभट्ट तो देवकी गणीका वेश्यासी
संबंधु जाला । हा ब्राम्हण आणि मातांगीनीसी संबंधु घ

२ री बाजू

डला हें सत्य ऐसें देवपाल रायासी सागीतलें नागभट्टानें ।
तव रायानें साक्षी पाहिली मग अंत्यजाला रायानें कृष्ण

---

१ 'ल' व 'ळ' दोन्ही आहेत. २ येथें वर रेघा देऊन कांहीं अक्षरें बाद केलीं आहेत.

भट्टासी बोलाविलें । देवकी गणीकेचा समाचार पुसी.
ला तव कृष्णभट्टाचा मुखचंद्र उतरला । मग कृष्णभ
ट्टची स्त्री बाळकें सहित जातिवेगला घातला । हांडी भां
डी माहारा मे×स्याचे हाती बाहीर काहाडविली । मग
तो कृष्णभट्ट पुढें कुरंगमातांग वाडिसी राहिला । तेथे वे
श्या असे । ऐसी एकी ठाई असु लागली । मग त्यानें कृष्ण भ
ट्टे देवकी गणीका प्रबोधिली । किं तुझेंनि या संगति नि
मित्य मज जाति वेगळें घातलें । अनामिकपना पावलों ।

३ पान

१०] तरी आतां तुं मज अंतर नेदि । तु स्त्री आपन पुरुष ऐसे
दोघे वर्त्तो । तु मज अंतर नेदि । मी तुज अंतर नेदी । हें सत्य
मांझि भाक असे दोघा भाक सुकात झालें साक्षि गाहीस
चंद्र सूर्य ठेविले जै पतिव्रता धर्म वर्त्तावें ऐसा दोघाचे स
त्यं सुकीत वचन नेमु जाला ऐसीं दोघ हि वर्तु लागले ।
मग कृष्णभटें डोयी बोडिलिः काळे नेसलाः
मग ते देवकीस माहात्मी वेषु केला मग पाखांड वेषु दीध
ला तिचे नाम भटोबायी ठेविलें मग ते भटोबायी आनी
कृष्णभट्ट दोघे गोदावरी तिरीं पैठनाहुनी सात गावे पश्चिम देशिं
गांव एक असे तेथें ते कृष्णभट्ट आनी भटोबाई दोघें वंगि (?)
२८] ] तेथें मठ बांधला । त्यासी डोमग्राम म्हणति । त्यां डोंबें डोम]
तीर्थ स्थापिलें । तें डोंबेंग्रामीं भटोबायीस पांच पुत्र जाले

२ रीबाजू

दत्ता दत्तात्रेयांचा म्हणति । चागा तो चांगदेवाचा म्हणाति ।
त्याचा पहिला पुत्र कृष्ण १ दुसरा पुत्र दत्ता २ तिसरा
पुत्र चागा ३ चवथा पुत्र गुंडा ४ पाचवा पुत्र परसा ५
ऐसे पंचपुत्र भटोबायीस जाले । कृष्णा तो कृष्ण द्वा
रकेचा म्हणाति । गुंडो तो गुंडो म्हणति रीद्धपुरीचा । प

रसा तो प्रतिष्ठानीचा त्यासी श्रीप्रभुचक्रधर म्हणाति ।
ऐसे हे पांच हि बांधव विप्रीत शास्त्र पढिवीलें त्या रु
ष्णभट्टे । मग त्यासी पंच पुत्रांसी माहात्मी वेधु केला । डो
थी बोडीली उफराटे नेसला त्यासी चुडा म्हणाति ।
कृष्ण तो द्वारकेचा म्हणाति ।
दत्तो तो दत्तात्रयाचा म्हणाति । चागा तो चागदेवाचा
म्हणाति । गुंडो तो सीन्द्रुपुरीचा म्हणाति । परसा तो म्हणाति

४ पान

प्रतिष्ठानिचा म्हणति । डोर्यास पदरु घातला । चुरु पाघु
रति । एकें थीगळें लाउन वस्त्रें पाघुरति । त्यासी फाळु
कें नाव ठेविति । फाळुके म्हणीजे डोयींकडे वोहडींती ।
पायाकडे न पुरे । त्या पायाकडे वोहडली पा(या?) डोईकडे न पु
रे । तें फाळुकें म्हणाति ऐसीं वस्त्रें पाघुरति । येर हे अवघे
ब्राम्हणासीं नींदिति । मग रुष्णभेट्टे भट्टमार्ग थापिला हा भ
ट्टमार्गु तेथुन म्हणति । वासुदेव वासना माया केली ।
वासना गोत्र । वासना शास्त्र प्रवीण केलें क्रियाधर्माचें
नाव व्याजन ऐसें नाव ठेविलें । भीक्षा सकळ वर्णा मा
गा आदरललींनी ये झोळीचें नाव फुलरी ठेविले । येकाक्षरा
चि लींप उफराटी केली लतोग म्हणाति (?) बातो म्हणति (?)

२ री बाजू

ऐसी लिप केली । अक्षराचि शिरीं आडवी रेघ पुसिली ऐ
सी लिपी शास्त्रें केली । पाच हि पुत्र विपरीत शास्त्र पढवि
लें। भटोबायींस शिष्यवर्ग आईसां बाईसां असे म्हणाति।पुढें त्या रुष्ण
भट्टें वेवादस्थल मांडिलें त्या नागभट्टास वेवादु माडिला
होये तें न होतें होयें ऐसें म्हणों दड करी कवनां न मानी वेद
शास्त्र लटकें म्हणों ब्राम्हणाची चेष्टा करी षडदर्शनाचि
चेष्टा करी आपण थोर जे मांगवाडा देवपूजा थोर म्हण
ऐसें रुष्णभट्टाचें बोलनें आयेकुन मग सकळीक

विद्वांस व ब्राह्मण व सन्यासी व जोगी जंगम सकल द र्शन बैसोनी विवाद् मांडीला रुष्णभट्टांसी खंडीलें जे वे दपुरुषु तो आदिपुरुष म्हणवीजे तो केवि ल

## ५ पान

टिका होये जो देव पुराणी शास्त्री जलीं स्छलीं काष्टीं पाषाणीं जंगम स्छावरीं तो सकलीक लोकि दृष्ट अदृष्ट मुळ प्रकृतिरूपें असे सर्वत्री तो परमेश्वरः तयातें ना हिं म्हणाति ते मुर्ख ऐसा तो कृष्णभट्ट फजीत केला । पु ढे ते भटोबायी भवत्या सीशी × मठी बांधली त्याचें ना व डोंबेंतीर्थ ठोविलें तेथें शूद्र अनामीक सीष्य केलें पा यें पीडिलें पाखंडमार्गु जे भजति आनीक शिष्य जे होति तव कर्मयोनी न चुके शिष्याचि कुळदेवता कुलधर्म सांडविति पितृश्राद्ध न करू देति । आपना भजविति पं च पुत्र ते पंच कृष्णनाम उच्चारिति । मोक्षु उधारें बोलि (ति) ऐसें शिष्यास उपदेशीति । या शिष्यास भोंवाळ ऐ

## २ री बाजु

से नाम ठेविति । कृष्णा आणि दत्ता हे दोघे मातापुरीं राहिले । तिहिं कीतिक शिष्य केले शूद्र अनामीक आणि खणदे शिं तिसरा चागा पुत्र रनाखटक संगमी तेथें तो आप णां चागदेव म्हणवी तेथें त्यानें शिष्य शूद्र अनामीक केले शिष्य तेथें । परसा तो प्रतिष्ठानीं पंचालेश्वरीं राहीला परसा तो प्रभुचक्रधर आपणातें म्हणवि त्याने शिष्य अ नामिक शुद्र शीष्य केले । गुडा क्षराउळ आपना म्हणवि तो वराड देशि रिद्धपुरीं राहिला मठ बांधलापा त्यानें गुं डमें अभ्यासिलें कुडें कपट मोहन उच्चाटन वेश्यकरण मंत्र कुयंत्र विधा मेसको मायराणी कान्हायी मंत्र चेडें । मायावीमंत्र कुविद्या अभ्यासिली । मातांग वाडा ( चि )

६ पान

पुजा षट्कथा (?) ब्रम्हणा अधिकारु नाहि । ऐसें शिष्या (× ?)
उपदेशिति । अडरा पगडे यातिसीं भीक्षासीं उपदे(शिती)
अठरा हि जातिचि भीक्षा मागति । हीन पद्धति पंच × ×
च कृष्णनाम उच्चारिति ते चि पंच मंत्र जगजह × × ×
शिति । देवता साधन आपन करिति । शिष्यास बोलो
नेदेति । जे देवता साधन मानिति आपन देवताची अनु
क्रम करीति ये । तितुकें कुडयत म्हणाति । नामानिति पंच
कृष्ण स्थापिति भक्तिभावो आचरति संपादिति शिष्या
चे स्त्रीयेसी प्रबोधिति पतिधर्मु साडाविति कनिष्ठीकागनी
मार्गु उपदेशिति । आपन तयासिं भग दरुशन घेति । जे तुम
च्या उदरा पंच कृष्ण येति । म्हणउगी वासना वासुदेव पो

२ री

षिति । षट्मोक्ष उधारें बोलिति । हा मातांगबाडा देवचा
गाव म्हणउणी बोलिति । षट्कर्मी ब्राह्मण अधिकारु
नाहि ऐसें बोलति । षट्दर्शनाचि निंदा करिति । सकळ
सकाम निःकाम स्थापिति कर्म उपाय स्थापि (ति) सधर्म अना
दिसी धरुणीया न मानिति । अनादि धरुणीचि चेष्टा क
रीति । मातांगासी का मातांगआत्माया यासी मानति । शुद्ध
मुद्रासी न मानिति । ऐसा हा मातांग पाखांड भट्टमार्गु ऐ
सें हें जानौनी जे शिष्य होति त्यासी कर्मयोनि न चुके ×
या शिष्यासीं कर्म (यो) नी बोली असे । हे वेद श्रुति नाग × ×
षा × ब्राह्मण कृष्णभट्ट । देवकी मातांगी तिचे उदरीं पाच
जाले । ते मातांगात्मा म्हणउणी माहात्मा ऐसें आपणा (ना)

७ पान

ष ठेविलें । कृष्णभट्टे मार्ग स्थापिला । म्हणउ(णी भट्टमा)
र्गु हा म्हणति हा पाखांड मार्गु जाला ते क (× × × था १ लावी)
हें मार्गु । दूसरां कायापराधि । तीसरा डफगा × ×

थेरकरी ४ पाचवे रनमल । ऐसे पाच पाखांड ( मार्ग ) जाले । हें नागभट्ट पैठनी बोलिले । ऐसे हें सत्य वचन हें जो लटीके बोले त्याचे मायेवर गर्धव ऐसें जो हें लटिकें ली हील त्याचे मायेवर गर्धव असे । इति भटमार्ग जन्मपत्रं लिखीतं नागभट्टेन पैठनकर तेने लिहिलें संपूर्ण जातं ॥ सत्यमेव अत्र अन्यथा न भवति तर्न्हि किं सत्यमेव श्रीः ॥

## २ री बाजू

श्री दत्तोबा गोसावियाच्या श्रीचरणशरणा ॥ १ ॥

श्रीकृष्णोबा गोसाविच्या श्रीचरणा शरणा ॥ २

श्री गुडुंब रावुळ गोसावियाच्या श्रीचरणा शरणा ॥ ३

श्री चागाबा गोसाविच्या श्रीचरणा शरणा ॥ ४

श्री परसाबाबावा गोसावियाच्या श्रीचरणा शरणा ॥ ५

हे पंच मंत्र उपदेशिति । पंचकृष्ण याते ह्मणति ॥

पंच स्थाने ह्मणति । दत्त माहुरीचा ह्मणति १ ॥ ××

कृष्ण द्वारकेचा बोलति २ ॥ ××

गुडुंब रावुळ रीद्धपुरीचा वाखानिति ॥ ३ ॥ ××

चागा चागदेवीचा स्थापिति ॥ ४ ॥ ×××

परिसा पैठनिचा आधिष्ठिति ॥ ५ ॥ ××

---

या पोथीबद्दल थोडेसें लिहिणें जरूर आहे. असें:—

लिहिणाराने स्वतःस शपथ घातली आहे म्हणून जर आंतील मजकूर खरा असेल तर तो तत्कालीन 'महात्मा पंथा'स अनुलक्षून असेल. हल्लींच्या ज्ञानप्रसाराच्या कालीं त्या पंथाचीं सर्वच तत्वें पूर्वपरंपरागत टिकलीं असतील असें वाटत नाहीं. त्या मुळें या पोथींत दिलेल्या विवेचनावरून सध्यांच्या 'महात्मा' पंथाचे स्वरूपाची अटकळ बांधणें बहुधा योग्य होणार नाहीं.

दुसरें असें कीं भिन्न पंथाबद्दल लिहिण्यांत किती हि सावधगिरी ठेविली तरी लेखणी थोडी घसरते च. हें विशेषतः परस्पर भिन्न मताचे अत्यन्त अभिमानी असल्यास जास्त संभवते. अभिमान—आपण दुरभिमान म्हणूं पहिजे तर—कोणास निंद्य वाटो पण त्याचे योगानें अंगीं एक प्रकारचें तेज असतें. व हल्लींच्या शिथिल मनोविका-

रांच्या काळांत जसा दुरभिमान व यथाभिमान यांच्यांतील सूक्ष्म भेदाची चर्चा करतां येते तसें पूर्वी कदाचित् शक्य नसल्या कारणानें हि या पोथींत जरा ढोबळ चित्र रेखाटलें गेलें असेल.

वर दिलेलें विवेचन ध्यानांत धरून व ऐतिहासिक आणि विशेषतः भाषाशास्त्राची दृष्टी ठेऊन या पोथीचा विचार करावा. दोन विशिष्ट पंथांची तुलना व्हावी म्हणून हा लेख मुळीं च लिहिलेला नाहीं

धरणीधर ग्राम ह्मणजे कदाचित् नागपूर वाटण्याचा संभव आहे. परंतु एका गृहस्थाच्या माहितीवरून तें खानदेशांतील धरणगांव आहे. आनंद सांप्रदायी मठ तेथें आहे, व सदानंद हे आपले पूर्वज ह्मणून ह्मणणारे तेथील धर्माधिकारी हि आहेत.

सदानंद शक १६२१ चे सुमारास झाले यांचे बरेच ग्रंथ मला उपलब्ध झाले आहेत पण त्यासंबंधी पुढ एखादे वेळीं लिहूं.

या पोथींत 'झ' पुरातन आहे ह्मणजे 'ज' चें किंचित् रूपांतर आहे. कसें तें लिपिशास्त्रज्ञांस स्प करून सांगणें नको. पोथी चोपडे गांवीं रा· राजवाडे यांस उपलब्ध झाली.

आषाढ वा। ६ । ३५ }
धुळें }

गो. का. चांदोरकर

## ३३ श्रीज्ञानेश्वर महाराजांचें मूळ नांव कोणतें ?

हा प्रश्न उद्भवण्यापूर्वी मूळ नांव होतें कां ? असा प्रश्न सहज च कोणी विचारील त्यास माझें उत्तर असें कीं शक ११ शें पासून जो कोणी संतांचीं चरित्रें–हल्लीं ज्या स्वरूपांत उपलब्ध आहेत तशीं च पाहील—त्यास या प्रश्नाचें उत्तर स्वतःस च देतां येईल. सांप्रदायिक नांवें व मूळ नांवें हीं बहुधा भिन्न असतात असें अनेक संतांच्या चरित्रांवरून सिद्ध होत आहे.

" गुप्तनाथ " हे पूर्वीचे गंगाबाई नांव धारण करणारे होते; उद्बोधनाथ हे पूर्वींचे उद्धव; सनाथ हे केशव; शिवदिन छांदसि; ब्रह्मानंद हे गणेश अथवा श्रीधर; व निजानंद हे बाणाजी, अशीं एक कां दोन

आणखी कित्येक उदाहरणें देतां येतील तेव्हां सांप्रदायिक नांव असूं शकतें हें उघड आहे; मग तें श्रीज्ञानेश्वरमहाराजांस हि असूं शकेल. कारण श्रीनिवृत्ती श्रीज्ञानेश्वर श्रीसोपान किंवा श्रीमुक्ताबाई हीं नांवें साधारणतः ब्राह्मणांत सार्वत्रिक नाहींत तशांत आणीक परंपरेचें एक अनुष्टुभ आहे, त्यावरून तर हीं नांवें सांप्रदायिक आहेत हें उघड होतें.

तें अनुष्टुभ हें:—

आदिनाथं च मत्स्येंद्रं गोरक्षं गहिनीं तथा ।
निवृत्तिं ज्ञाननाथं च भूयो भूयो नमाम्यहम् ॥

तेव्हां ज्ञाननाथ अथवा श्रीज्ञानेश्वर हें सांप्रदायिक नांव आहे अशी बलवत्तर शंका येते व तिन्ही भावांच्या नांवांतील गर्भितार्थ पाहिला, म्हणजे मनाचा निश्चय होतो कीं, हीं नांवें कांहीं " पाळण्यांतलीं नांवें " नाहींत.

श्रीज्ञानेश्वरींत हि सर्वत्र महाराजांनीं स्वतःस "ज्ञानदेवो । निवृत्तीचा ॥ असें म्हटलें आहे. यावरून हि हें च दिसतें कीं सद्गुरूनीं दिलेल्या नांवानें च स्वतःचा उल्लेख त्यांनीं केलेला असावा.

वस्तुतः श्रीमुकुंद अथवा मुक्तिनाथ आणि श्रीज्ञाननाथ या आद्य संत-कवींचीं चरित्रें आज मुळीं च उपलब्ध नाहींत व ह्या दिशेनें अद्याप प्रयत्न हि झालेला नाहीं. पण यांचीचशीं काय, इतर कोणते असे संत आहेत, कीं ज्यांचें जीवनचरित्र निःसंशयतेनें महाराष्ट्रास अवगत झालेलें आहे ? असो. तेव्हां संतांसंबंधीं जें काय लिहावें, तें बहुधा तर्क म्हणून च लिहिलें पाहिजे. या दोन संतश्रेष्ठांचे चरित्रांतील एक दोन गोष्टी माझे नजरेस आल्या आहेत, त्यांचा पर-स्पर संबंध आज जरी दाखवितां आला नाहीं, तरी त्या गोष्टी संशोधकांपुढें अस-लेल्या बऱ्या, म्हणजे कदाचित् मध्यें कमी असलेलें दुवे उपलब्ध होतील, या दृष्टीनें हा उपक्रम करीत आहे.

रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांस उपलब्ध झालेल्या व आमच्या येथील सत्कार्योत्तेजक–सभेनें प्रसिद्ध केलेल्या श्रीज्ञानेश्वरींत शेवटीं एक श्लोक आहे, तो असाः—

श्रीमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा ।
विद्याधराय शिष्याय स्वीए स्वत्वं न शोभते ॥ १ ॥ ७ ॥

या श्लोकाचा सरळ अर्थ असा होईलः— "श्रीसद्गुरु मुकुं नीं शिष्य विद्या-

धर यास शुभा अशी ही ज्ञानेश्वरी दिली; जें आपलें आहे तें आपलें ह्मणण्यांत शोभा नाहीं. "

यावरून या श्लोकांत जो भेद दाखविला आहे, तो दत्ता, स्वत्वं व स्वीयें या तीन शब्दांत दाखविला आहे हें उघड आहे. दिली म्हणून ती स्वतःची झाली, असा अर्थ येथें इष्ट नाहीं; कारण मग स्वतःच्या वस्तूंत स्वत्व शोभत नाहीं हें ह्मणण्यांत स्वारस्य काय ? मला वाटतें याचा अर्थ असाः— " स्वतःच्या वस्तूंत स्वत्व दाखविणें शोभत नाहीं, ( म्हणून ) श्रीसद्गुरुमुकुंदानें च ही ज्ञानेश्वरी मी जो विद्याधर नांवाचा शिष्य त्यास दिली " व हें ह्मणणें अधिक योग्य आहे.

हा अर्थ जर योग्य असेल, तर त्यावरून अनेक विचार सुचतात. श्रीसद्गुरु मुकुंदानें आपल्या शिष्यास काय दिलें ? ग्रंथ दिला हें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं; कारण तो पूर्वी च स्वीय होता. तेव्हां एक च अनुमान सयुक्तिक दिसतें तें हें कीं, शिष्यानें एखादा ग्रंथ स्वतः च रचून, तो मला श्रीगुरूंनीं दिला हें ज्या अर्थानें त्या सत्शिष्यानें म्हणावें, त्या अर्थानें च दत्ता हें पद या श्लोकांत योजिलेलें *दिसतें, एरवीं त्याचा अर्थ सयुक्तिक लागत नाहीं.

तेव्हां श्रीज्ञानेश्वरीचे कर्ते विद्याधर म्हणून होते व हे च विद्याधर, श्रीज्ञानेश्वरमहाराज होत, असें अनुमान निघतें; व श्रीज्ञानेश्वरांचे श्रीमुकुंद हे विद्यागुरु व श्रीनिवृत्तिनाथ हे मोक्षगुरु असे दोन भिन्न गुरु असावेत असें वाटतें. एकाहून अधिक गुरु असणें कांहीं अश्रुतपूर्व नाहीं.

श्रीमुकुंदांचा व श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा काल एक च होता; व त्यांचे गुरु-शिष्यांचें नातें होतें हें दाखविणारें प्रमाण नुकतें च उपलब्ध झालें आहे; त्यावरून तर वर दिलेल्या अनुमानास अधिक पुष्टि येते. तें प्रमाण असें:—

रा. खं. चिं. मेहेंदळे यांजकडून मला " डेक्कन कॉलेजांतील " संस्कृत विवेकसिंधुची प्रत पाहण्यास मिळाली. ती प्रत व रा. राजवाडे यांस नुकती च उपलब्ध झालेली प्रत ह्या एक च स्वरूपाच्या आहेत. परंतु पहिल्या प्रतीच्या शेवटीं एक श्लोक दिला आहे तो हाः—

> शिष्येष्वन्येषु सत्स्वप्यहमधिककृपापात्रमस्यास्मि जातो ।
> ग्रंथं मद्बोधसिध्यै कुरु शिशुसुगमं ज्ञानसर्वस्वसारम् ।

---

* श्रीज्ञानेश्वरानंतर परंतु ज्या वेळीं त्यांची स्मृति ताजी होती अशा वेळीं, हा श्लोक कोणी केलेला आहे असें ' ज्ञानेश्वरी ' या शब्दावरून दिसतें. ' ज्ञानदेवी ' हें अभिधान पुरातन असावेसें माझें मत आहे.

एवं विज्ञापितः सन् अवनतशिरसा ज्ञानदेवेन धीमान् ।
सद्यः कृत्वा हि तस्मै सकरुणहृदयः श्रीमुनींद्रो मुकुंदः ॥ १० ॥

रा। राजवाडे यांच्या प्रतींत—

जित्यपालेन धीमान्

असा पाठ आहे. इतर दुसऱ्या प्रतींत हे श्लोक च नाहींत. तेव्हां वर दिलेल्या पाठभेदयुक्त श्लोकांवरून काहीं अनुमान काढून दोघांचा मेळ बसविणें आज परावयाचें नाहीं. हें मला हि दिसतें. परतु या दोन संतश्रेष्ठांच्या चरित्रांतील दुसऱ्या कित्येक आख्यायिका लक्षांत घेतल्या म्हणजे यांचा परस्पर परिचय असणें असंभवनीय नाहीं असें दिसतें; तशांत मी वर स्पष्टपणें नमूद करून ठेविलें च आहे कीं
१०] हा केवळ माझा तर्क म्हणून मी विद्वानांपुढें मांडीत आहे.

गो. का. चांदोरकर

# ३४ खरपुडी येथील रामेश्वराच्या देवालयावरील शिलालेख

खरपुडी बु॥, ता. खेड, जि० पुणें हा गांव खेडाचे पुर्वेस दोन कोसांवर भीमानदीचे कांठीं आहे. तेथील श्रीरामेश्वराचें देवालयावर खालील प्रमाणें शिलालेख आहेतः—

१ देवालयाच्या बाहेरील दरवाजावरील लेख

श्रीभीमा उत्तरे तीरे । खर्पुटीग्राम संन्नीधौ ॥
प्रासादनीर्मीतं शुद्धं । हरिसुतेन श्रीमताः ॥ १ ॥
वासुदेवस्य ग्रहिणी । सती च कमलाभीधा ॥
तयारब्धं श्रीशिवालं । रामेश्वर प्रसादता ॥ २ ॥

२०] कासिवासी वासुदेवो ज्योतिर्विदुपनामकाः तस्य दत्ता तु नगरी
नानाख्य प्रभुणा स्वयं ॥३॥ शके १६७८ धातानामसंवछरे माघ
सुध प्रतीपदा त दिने पायास प्रारंभः शालीवाहन शके कार्यंषु रामचंद्र

२ गाभाऱ्याचे दरवाजावरील लेख

श्री

भीमा उत्त

रे तीरे खर्पुटी ग्रामसन्नीधौ ॥
प्रासादं नीर्मीतं शुद्धं वासुदेवेन श्रीमता ॥ १॥
वासुदेवस्य गृहीणी सती च कमलाभीधा तयारब्धं
श्री शैवालं रामेश्वर प्रसादता ॥ २ ॥

सदरील लेखांवरून वासुदेव हरि जोशी यास श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं खरपुडी गांव इनाम करून दिल्याचें स्पष्ट होतें. वासुदेव हरि हे काशीस असतांना, त्यांची पत्नी कमला हिनें ह्या देवालयास आरंभ केला, असा लेखांत उल्लेख आहे. [१०
खरपुडी येथील देवालयाप्रमाणें च या बाईनें खरपुडी खुर्द, वाकळवाडी, रेटवडी वगैरे ठिकाणीं मिळून महादेवाचीं आणीक आठ देवालयें बांधिलेलीं आहेत. सदरहु रामेश्वराचे खर्चाकरितां एक खंडी इनाम आहे. सदरहु जोशी कल्याणनजीक कुळगांवचे रहाणारे. तेथें त्यांचे वंशज अद्याप आहेत, वरील लेखांत उल्लेखिल्याप्रमाणें खरपुटी गांव जोशांकडे इनाम होता. पुढें रावबाजीचे कारकीर्दीत तो देवधर डमढेरे यांजकडे जाऊन; अव्वल इंग्रजींत खालसा झाला; अशी ह्या गांवासंबंधानें तेथील कुळकर्ण्याकडून माहिती मिळते. श्री. नानासाहेब पेशवे ह्यांच्या विश्वासांतील वासुदेव जोशी व वरील लेखांतील वासुदेव हरि जोशी हे एक च काय ?

ग. ना. मुजुमदार

## ३५ अनंतसुत संत पुरोहित तुकदेव [२०

१ ह्या कवीचें नांव आजवर ऐकून हि माहीत नव्हतें. पाबळ येथें रा० रंगनाथ वामन बारसोडे यांचे संग्रहीं तुकदेवकृत स्वात्मानुभवतरंगिणी नामक सप्ततरंगात्मक प्राकृत ग्रंथाची कवीनें स्वहस्तानें लिहिलेली अशी संपूर्ण पोथी आहे. ग्रंथसंख्या ८६१ असून ग्रंथ वेदांतपर आहे. श्रीशंकराचार्यकृत 'अपरोक्षानुभूती' चे आधारें कवीनें हा ग्रंथ रचिलेला आहे. "तयाची अपरोक्षानुभूती । ग्रंथ सांपडला संतामती ते बोलिले प्राकृती । स्पष्ट कराया ॥ " १/८ असें कवी ह्याविषयीं म्हणतो.

२ कवीनें अपली गुरुपरंपरा देतांना, आपणासंबंधानें, किंबहुना आपल्या कुळा-संबंधानें खालील माहिती दिली आहे:—

तरंग १ **पुरुषोत्तम** जो परात्परु । **विनायक** तयाचा कुमरु ॥
तयापासुन माझा गुरु । प्रकाशला ॥
अथर्ववेदी कर्मनिष्ट । कौसिक गोत्र वरिष्ट ।
**श्रीअनंत** नामे स्पष्ट । व्यवहारला ॥
तो माझा देसिक । सकळ दाऊनी कौतुक ॥
विळया नेलें सम्यक । रज्जु सर्पवत् ॥

कवीच्या ह्या उद्गारांवरून पुरुषोत्तम—विनायक—अनंत—तुकदेव अशी परंपरा निघते, व कवीचें गोत्र वगैरे गोष्टींचा हि बोध होतो.

३ सदरहू ग्रंथ कोणी करविला ह्याविषयीं हि कवीनें उल्लेख केला आहे. सदरहु उल्लेख ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा आहे. कवी म्हणतो:—

सपर्द्धनाच्या कुळाकाशीं । कामराज उदेला शशी ॥
कलियुग पूर्णमेसी । पूर्ण जो कां ॥
तयाचा उदंड विस्तार । घाटिगे ऐसा आहे व्यवहार ॥
तयांमाजि संत सुंदर । नामासारिखा ॥
तेणें हा ग्रंथ करविला । तेथिच्या सारस्या भुकेला ।
म्हणउनी म्या हि केला । परमानंदें ॥

४ ग्रंथकारानें श्रीशंकरार्यांची स्तुति खालील ओव्यांत केली आहे.

तो सकळ सिद्धांचा सिरोमणी । अध्यात्मविद्येची खाणी ।
अगाध जयाची । वाणी नसे ॥
जो ब्रह्मानंदाचा वोतला । गोठोनी स्वानुभव पुतला ।
जाळा तो हा जनीं फळला । कृपाकल्पतुरु ॥
तीर्थें तपें यमानियमें । कृच्छ्र चांद्रायणादि बद्धभ्रमें ।
श्रमले वैराग्यसंभ्रमें । जे येथ आले विश्रांति ॥
देवगुरुची वाक्शक्ति । भार्गवाची काव्यव्युत्पत्ती ।
व्यासादिकाचिया युक्ति । देहस्थिती आलीया ॥

कीं शुकादिकांचा अनुभव हा । प्रत्यक्ष धरूनिया देहा ।
प्रवर्तविला मार्ग हा । सद्विद्येचा ॥

५ ग्रंथ कोठें रचिला ?

उभय कावेरी मध्यदेशी । श्रीरंग जेथ रहिवासी ।
श्रीरंगपट्टणी संतोषी । आरंभ केला ॥
तंत्र मनी उद्भवलें उत्कंठीं । शिवाचिये जावे भेटी ।
तया पहावें अमृतें दृष्टी । भरूनिया ॥
तो माझा परम मित्र । सदाचार संपन्न पवित्र ।
जो पहा थोर पात्र । द्विजासीर्विचना ॥
तयाचि होतां भेटी । उपजलिया संतोष कोटी ।
तेणे ग्रंथप्रवाह नेटी । सेवटवरी चालीला ॥
श्रीरंग आणि चंद्रशेखर । उभयतां राहती एकत्र ।
तें पहा भास्कर क्षेत्र । इरापुरनामें ॥
तेथें ग्रंथ समाप्त जाला । श्रीसद्गुरुचरणीं निवेदिला ।
हे ही तयाची च कला । अघटित घडवी ॥

६ ग्रंथ केव्हां रचिला ? शके १६४०.

स्वास्ती श्रीशालिवाहनास । शके जाहाली विशेष ।
आकाशनिगमरस । भू मांडितां ॥ १६८८ ॥
अंकानां वामतोगति । ऐसे ज्योतिःशास्त्री वदती ।
अंक मांडिजे त्याची युक्ति । गणना ते चि ॥ १८९ ॥
विलंबी संवत्सर दक्षिणायनी । आश्विन मासी शोभनी ।
बहुल पक्ष प्रतिपादिनी । इंदुवासरीं ॥ १९० ॥
समाप्ति पावला ग्रंथ । प्रीति श्रीगुरु अनंत ।
तयातें पहा विनवीत । तुकदेव हा ॥ १९१ ॥

इति स्वात्मानुभवतरंगिणी श्रीमदनंतसुत संत पुरोहित तुकदेवकृत सप्तमस्तरंगः ॥ स्वस्ति श्री शक १६४८ वर्षे पराभव संवत्सरें चैत्र शुद्ध ५ इंदुवासरे अथर्वणवेदिना तुकदेवेन लिखितमिदं पुस्तकं शुभंभवतु ॥

निंबगांव, मि० कार्तिक शु. ११/३५ रविवार. — पां. न. पटवर्धन

# ३६ आंग्र्यांच्यासंबंधीं कांहीं टांचणें

चउल येथील रा. लक्ष्मण गोविंद मनोहर यांच्या दप्तरांत पुढील टांचणांचा एक जुना कागद होता, तो एका इतिहासभक्तानें मजकडे पाठविला.

स्वराज्यस्थापनेनंतर मराठ्यांच्या इतिहासांत जी अत्यंत महत्त्वाची व परीक्षेची वेळ आली होती, ती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील स्वराज्यरक्षणेची होय अशा त्या मनोरम काळांतील जी जी गोष्ट नवीन कळेल, ती ती भावी इतिहासकारांसाठी अवश्य नमूद करून ठेविली पाहिजे. पुढें नमूद केलेल्या टांचणांपैकीं पहिली बाब ह्या काळांतील आहे. त्या काळीं महाराष्ट्रराज्यरक्षणार्थ ज्यांनीं परिश्रम केले अशा कांहीं नवीन पुरुषांचीं नांवें पहिल्या कलमांत आलीं आहेत. दुसऱ्या कलमावरून सेखोजी आंगरे यांची उत्कट धर्मश्रद्धा दिसून येत आहे व तिसऱ्या कलमांत त्यांची निधनतिथि दिली असून त्यांच्या पश्चात् कोणी कारभार पाहिला त्यांचीं नांवें आलीं आहेत. मिळालेल्या कागदावरील पुढील तिन्ही बाबी जशाच्या तशा सादर करितो.

(१)

मामले मूर्तजाबाद ऊर्फ चउल सरकार तळकोकण

हकिकत

सुा समान तिसेन व अलफ

शके १६१९ ईश्वरनाम संवत्सरे

श्रीमंत राजश्री कान्होजी आंगरे सरखेल जंजिरा कुलाबा यांही तळकोकणांत पुंडावे होऊन प्रांत वयराण पडला महाराष्ट्रधर्म रहावा असें नव्हतें त्या वेळेस फिरंगी व हबशी यांही प्रांतांत धर्मउच्छेद करावयास प्राप्त जाहाले होते तेव्हां सरखेल साहेबाचे पुण्यप्रतापें व स्वरक्षणार्थ थोर थोर मातबर सरदार जमाव होऊन शामलाची क्षिती केली सक्रोजी मोहिते व राणोजी गोळे व खंडोजी नाळकर व रुमाजीराव खराडे व कृष्णाजी मोड व हासनखान जमातदार यांही सरखेलसाहेबाचे समागमे युधप्रसंग करून शामलाची क्षिती केली आणि श्रम पाऊन कोंकणांत धर्म राहिला हें सरखेल साहेब यांही दिलांत आणून श्रीमंत महाराज छेत्रपती व राजश्री बाळाजीराव पंतप्रधान याजकडे सरफराजी फार जाहाली सरदार यांही राजकारणामुळें फार उपयोगी पडले हे सरखेल साहेब यांही सरदार यांस श्रमहार होये असे करून दिल्याचा प्रकार तो

१ सेक्रोजी मोहिते सरदार यास पालखी व येक गांव

१ राणोजी गोळे सरदार यांस येक गांव व पालखी दिली

१ कृष्णाजी मोड सरदार यास तीन गांव व पालखी ही दिल्ही

१ हासनराव जमादार यास येक गांव व पालखी दिल्ही

( अपूर्ण )

येणे प्रमाणे मातबर सरदार यांही राज्यरक्षण केलें म्हणोन आपल्या बराबर वेतनें देऊन राज्यांत राखिले सरखेल साहेब यांही धर्मस्थापना केली ही कीर्त ह्या लोकीं परलोकीं भरून उरली आहे

( २ )

सु ॥ इसने सलासनि मया व अलफ शके १६५३ विरोधीकृत नाम संवत्सरे माहे आषाढ शु॥ ३ श्रीमंत सकोजी आंगरे सरखेल यांही श्रीरामेश्वर येथें कुंड उघडिले पर्जन्यवृष्टी जाहाली असे

( ३

सु॥ सलास सलासीन शके १६५४ परिधावी नाम संवत्सरे माहे पौष व॥ १ रोज रविवार ते दिवसीं सकोजी आंगरे सरखेल यांस देवाज्ञा जाहाली पुढें अमल संभाजी व येसाजी शके १६५६ पावेतो केला

अशीं हीं तीन कलमें आहेत. शके १६५४ च्या पौष वा॥ १ ला रविवार नव्हता, गुरुवार होता. वा॥ १ आहे तेथें वा॥ ४ किंवा ११ असती तर जुळलें असतें. हस्तदोषानें ४ च्या ऐवजीं १ पडणें जरा कठीण च, पण ११ च्या ठिकाणीं चुकून १ लिहिणें शक्य आहे. तेव्हां शके १६५४ पौष वा॥ ११ ही सकोजी आंगरे यांची निधनतिथि ठरते.

शंकर श्रीकृष्ण देव

## ३७ अच्युताश्रमांचा वैरागर ग्रन्थ

(१) सदरहु ग्रंथ अप्रकाशित असून त्याची एक हस्तलिखित अपूर्ण प्रत आपचंद मठांत मिळाली (अनुक्रमांक २८ ). मिळालेल्या प्रतींत दहा प्रकरणें पूर्ण असून अकरावें च अपूर्ण राहिलें आहे. नवव्या प्रकरणाचा आरंभ

संपलें शरीरार्ध पूर्व ।आतां सांगावें उत्तरार्ध अपूर्व ॥

असा आहे, त्यावरून ग्रन्थाचीं एकंदर सोळा प्रकरणें असावींत, असें अनुमान आहे.

(२) मिळालेल्या प्रकरणांतील विषय व ओवीसंख्या येथें देतों, ह्यावरून ग्रंथाच्या स्वरूपाचा बोध होईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें—प्रास्ताविक— | ओवीसंख्या | १७६ |
| ,, | २ रें—गुरुलक्षणें— | ,, | ६७ |
| ,, | ३ रें—शिष्यलक्षणें— | ,, | ८३ |
| ,, | ४ थें—स्थूळ देह— | ,, | ११२ |
| ,, | ५ वें—लिंग देह— | ,, | १४१ |
| ,, | ६ वें—कारण देह— | ,, | १४१ |
| ,, | ७ वें—महाकारण देह— | ,, | १२२ |
| ,, | ८ वें—ब्रह्मांडाची उभारणी— | ,, | १४५ |
| ,, | ९ वें—गुणरूप— | ,, | ११८ |
| ,, | १० वें—गुरुस्वरूप— | ,, | ९८ |
| ,, | ११ वें—ब्रह्मस्वरूप— | ,, | १२१ |

( ३ ) अच्युताश्रमांचे गुरु सहजानंद होत. ग्रंथांत ठिकठिकाणीं सहजानंदांना नमन केलें आहे. ग्रंथाला आरंभ च असा केला आहेः—

श्री शिव सहजानंद सद्गुरु ब्रह्म विस्तारलें अगोचरु ।
भुवनत्रयाचा जाल्प विस्तारु ।कैसा साकारु आकारला ॥ १/१ ॥

सहजानंदांचा काल शके १४६० आहे. सहजानंद हे पूर्णानंदांचे गुरु व पूर्णानंद हे श्रीसमर्थकालीन शिवरामांचे गुरु. तेव्हां अच्युताश्रम हे श्रीएकनाथकालीन होत. ग्रंथांतील भाषेवरून हि असें च वाटतें. मिळालेली प्रत जुनी आहे.

( ४ ) पहिल्या च प्रकरणांत ग्रन्थाचें प्रयोजन देण्यापूर्वी इतर कांहीं ग्रन्थांचा अस्पष्ट उल्लेख आला आहे, तो असाः—

ग्रन्थ जाहाले अगोचर । आत्मज्ञानी अपरांपर ।
भागवतादि करुनि अपार । सुखें सादर सांगती ॥ १/३४

कल्पतरु स्वल्प सुमानि । अल्प कळें लागाळि गगनिं ।
विवेकसिंधू परमज्ञानि । मांहा मुनीनें रचिला ॥ ३५ ॥
रजसत्वतमादि गुणागुणिं । पांचिकर्ण माहावाक्ये वचनिं ।
भेदाभेद आवलंबोनि । मांहां मुनि बोलिला ॥ ३६ ॥
भगवद्गितेचें निरोपण । स्वता करितसे नारायेण ।
आत्मस्वार्थालागि संपूर्ण । उत्धवालागि जाण बोळला ॥ ३७ ॥
अर्जुनासि करुयियां मेढा । उपदेशो केला धडपुडा ।
दाविलीया वाटा अवघडा । तो निधडा देखणा ॥ ३८ ॥

याहून जास्त स्पष्ट उल्लेख कोणाचा च नाहीं.

(५) सहजानंदाचे गुरु ब्रह्मानंद होते, याविषयीं वाद नाहीं. परंतु सहजानंदांना ब्रह्मानंद नांवाचे पुत्र असून ते त्यांचे शिष्य होते कीं काय, व ब्रह्मानंद म्हणून त्यांना एकादे बंधु हि होते कीं काय याविषयीं निश्चय होत नाहीं. प्रस्तुतच्या ग्रंथत तिसऱ्या, चवथ्या व साहाव्या प्रकरणांत पुढील ओव्या आहेत.

सहजानंदाचा साक्षात बंधु । ब्रह्मानंद स्वानंद अवधु ।
तयान केला लिळाविनोदु । सांगितला भेदु सुगमार्थें ॥ ३/८० ॥
ब्रह्म भुवनाचा ब्रह्मानंदु । सहजानंदाचा जीवन कंदु ।
नाहिं दोघासि भेदाभेदु । परत्वें बंधु जाहाले ॥ ८५ ॥
गुरुसिष्यासि अंतर नाहिं । गुरु तो चि शिष्ये पाहिं ।
हें लटिक सांगत नाहिं । अवतार पाहिं युगायुगिं ॥ ६/८६ ॥
प्रथम गुरु ब्रह्मनंद होता । सहजनंद शिष्ये तत्वता ।
सहजानंद होऊनि पिता । शिष्ये तत्वता ब्रह्मानंदु ॥ ६/८८ ॥

सहजानंदाचे गुरु, बंधु आणि पुत्र असे तिघे ब्रह्मानंद होते कीं काय याचा निर्णय केव्हां तरी झाला पाहिजे. वरील चार ओव्यांबरोबर दुसऱ्या ठिकाणच्या खालील ओव्यांकडे हि दृष्टी असावी.

तंजावर सरस्वतीमहालांतील २० व्या दप्तरांत " प्रणवविवरण " प्रकरण आहे त्याचा शेवट असा आहे:—

ब्रह्मानंद ह्मणे जाण । गुरुगम्याची खूण ।
सहजाचे कृपेकडोनि । केलें प्रणवाचें विवरण ॥
जाणतियानीं गुरुपुत्री ध्यावे मेळवून ।
न कळे त्यानी विचारोनि जावें सहजासी शरण ॥

तसें च २२ वें दप्तरांत " ब्रह्मांडाचें विवरण " आहे त्याचा अंत असा आहेः-

सहजानंदाचा बाळ । ब्रह्मानंद वेल्हाळ ॥

इत्यादि.

( ६ ) प्रस्तुतचा ग्रंथ नवीन आहे. त्याची सबंध प्रत संशोधकांनीं मिळवावी व सहजानंद आणि ब्रह्मानंद यांच्या परस्पर संबंधाचें कोडें केव्हां तरी उकलावें म्हणून हें टांचण आज सादर करीत आहे.

धुळें, कार्तिक शु. ११ १८३५ } शंकर श्रीकृष्ण देव

## ३८ श्रीरामदासतुकारामसंवाद

श्रीसमर्थ आणि तुकाराममहाराज यांचा परस्पराशीं कितपत संबंध होता, असा
१०] एक प्रश्न आहे. त्यांचा निकट संबंध होता असें उत्तर देण्यास विशेष प्रत्यवाय आहे, असें मला वाटत नाहीं. यासंबंधाचे व भेटीचे प्रसंग उभयतांच्या हि चरित्रांत वर्णिलेले आहेत. तथापि आपल्या चिकित्सक बुद्धीस पटतील अशा प्रमाणांची विद्वान् लोक अलीकडे अपेक्षा करीत असतात, नुसत्या चरित्रांतील कथांवर विश्वास टाकण्यास त्यांची तयारी नसते.

तेव्हां असें आणखी एक प्रमाण आज येथें नमूद करून ठेवीत आहे. आपचंद-मठांतील बाड १८ यांत पुढील दोन पदें एकाखालीं एक अशीं लिहिलेलीं आहेत तीं येथें उतरून घेतों. कल्याणस्वामींचे शिष्य शिवरामस्वामी यांचें हें बाड आहे. शके १६७८ त शिवरामस्वामी समाधिस्थ झाले, तेव्हां प्रस्तुतचें बाड बरेंच जुनें आहे. पदावरून अनुमानें काढण्याचें काम आपणांवर सोंपवितों.

२०] ( १ ) पद

कधिं वा रिकामा होसी । कधिं संतापासीं जासी ॥ ध्रु ॥
कधिं नाम वाचे स्मरसी । कधिं सद्गुरुते वंदिसी ॥ १ ॥
ऐसें म्हणतां जन्म गेला । माझें माझें ह्मणतां मेला ॥ २ ॥
रामीं भजावें भजावें । रामदासी राम चि व्हावें ॥ ३ ॥

(२) पद

जधिं मी निवारी कामा । तधिं होइन बा रिकामा ॥ ध्रु० ॥
जाऊं ह्मणतां संतापासीं । पोरें आणिती संतापासी ॥ १ ॥
कथा ऐकूं जरि भवतरणी । जाऊं नेदी बाइल तरणी ॥ २ ॥
जालों शास्त्री वय्याकरणी । बोलासारिखी नाहीं करणी ॥ ३ ॥
विठ्ठलभजन न ये कदापी । करितां खळ जन येक दापी ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐशा नरा । न चुकती येरझारा ॥ ५ ॥

अशीं हीं दोन पदें आहेत. तीं प्रश्नोत्तररूपाचीं आहेत, हें स्पष्ट दिसत आहे. दुसरें पद केवळ यदृच्छेनें रचलेलें दिसत नाहीं. तें रचतांना तुकाराममहाराजांना श्रीसमर्थांच्या पहिल्या पदाची निदान आठवण झाली होती, हें निर्विवाद आहे. श्रीसमर्थ तीर्थाटणें करून शके १५६६ चे सुमारास कृष्णातटाकीं आले व तुकाराममहाराज १५७० त वैकुंठाला गेले, ह्या गोष्टी विद्वानांनीं मान्य केलेल्या आहेत. तेव्हां हा प्रश्नोत्तराचा प्रसंग या दोन शकांच्या दरम्यानचा असला पाहिजे, हें उघड आहे.

शिष्यसमवेत श्रीसमर्थ व तुकाराममहाराज चर्चा करीत बसले आहेत, अशा एका प्रसंगीं कोणी प्रपंची मनुष्य त्यांच्या दर्शनास आला असतां समर्थांनीं “ कधिं बा रिकामा होसी ” असें त्यास विचारलें, तेव्हां त्यानें उत्तर देण्याची वाट न पाहतां तुकारामांनीं च “जधिं मी निवारी कामा” असें आपल्या सर्वांच्या च वतीनें उत्तर दिलें ! असा एकादा प्रसंग या उभयतां सत्पुरुषांच्या चरित्रांत आला असावा, हें अशक्य वाटत नाहीं.

तें कांहीं असो. हीं दोन पदें विद्वानांचें रंजन करून विचार करण्यास त्यांना प्रवृत्त करतील, यांत मला शंका वाटत नाहीं.

शं. श्री. देव

## ३९ शक १३३५ तील बांदीवडे येथील एक मराठी शिलालेख

(गोवें, फोंडा)

१ गोवें प्रांतांत फोंडें तालुक्यांत बांदीवडें गावीं श्रीनागनाथाचें देवालय आहे. तेथें तळीवर प्रस्तुत शिलालेख आहे. शिळा काळ्या फत्तराची आहे. अक्षरें शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांतील असून भाषा मराठी आहे. दोन

२२

चार स्थलीं गोंवें प्रांतांतील कोंकणी मराठी भाषेचीं रूपें आलेलीं आहेत. ज्ञानेश्वरीनंतर हा शिलालेख बराबर १२३ वर्षांनीं खोदला गेला. अर्थात् भाषेंत हि फरक झाला. तेया बद्दल तया हें रूप ह्या सवाशें वर्षांत गोव्यासारख्या मागसलेल्या प्रांतांत हि रूढ झालें. म्हणजे शक १३०० च्या सुमारास तेया हें रूप मराठी भाषेंतून प्रचारांतून जात चाललें होतें हें उघड आहे. ह्याचा अर्थ असा कीं ज्या एखाद्या अस्सल लेखांत तया हें रूप सांपडेल तो लेख जुन्यांत जुना म्हणजे शक १३०० च्या अलीकडील असला पाहिजे. ज्ञानेश्वरी भाषा शक १३०० च्या सुमारास किंचित् बदलावयाला लागली, हें वरील बाबीवरून निःसंशय ह्मणता येतें व एतदर्थ, हा शिलालेख भाषेच्या स्थित्यन्तरांत मर्यादा होतो. उनु प्रत्ययान्त धातुसाधितें राजारामाच्या कारकीर्दीपर्यंत म्हणजे शक १६२२ पर्यंत, क्वचित् शाहूच्या कारकीर्दीतील पत्रांत हि आढळतात. तेव्हां करुनु, घेऊनु हीं रूपें शक १६६२ च्या नंतरच्या भाषास्थित्यन्तराचीं दर्शक आहेत, असें म्हणणें प्राप्त होतें. परंतु तया हें रूप शक १३०० च्या वेळच्या भाषारूपान्तराचें दर्शक आहे, हें निश्चित होय.

२ हा शिलालेख विजयानगरच्या पहिल्या देवरायाच्या शेवटल्या वर्षांतील म्हणजे शक १३३५ तील आहे. मिति शक १३३५ पौष बहुल ३० रविवार ह्मणजे इ. स. १४१३ ची २४ डिसेंबर होते. त्या दिवशीं देवराय हयात होता.

३ हा शिलालेख मुंबईच्या रॉयल एशिआटिक सोसायटीच्या जर्नलमध्यें तीन चार वर्षांखालीं प्रसिद्ध झाला होता. परंतु, त्यांत बरेच वाचनाचे व पदव्यवच्छेदाचे प्रमाद राहिले होते. प्रस्तुत वाचनांत हे प्रमाद शुद्ध केलेले आढळतील.


४ ह्या शिलालेखांत अनुस्वार व अनुनासिक ह्यांबद्दल बिंदु व अर्धचंद्र सरहा दिलेले आढळतात. घेउनि, करुनि वगैरे इकारान्त धातुसाधित एक हि नाहीं; सर्व साधितें उकारान्त आहेत.

५ शिलालेखाच्या मथळ्यावर खालील आकृती आहेतः—

डावीकडे सूर्य 

उजंवीकडे चंद्र 

मध्यें लिंग



शिलालेखाच्या शेवटीं गाढवाच्या तळखेचें चित्र कोरलें आहे.

## शिलालेख

१ श्रीगणाधिपतये नमः। नमस्तुंगशिरश्चुंबिचंद्रचामरचारवे॥ त्रैलोक्य-
नगरारंभमूलस्तंभाय शंभवे ॥

२ स्वस्ति श्रीसालवाहनसंकु[2] १३३५ वरिषं अय महाराजाधिराजपरमे-
श्वरश्रीवीरप्रतापदेवरायमहाराय

३ विजयानगरीं सुखसत्कथाक्रीडाविनोदें सकळराज्य प्रतिपालित
असतं काळीं त्यॉचा प्रतिहस्तु[3] गो-

४ वे–सिंहासनीं धर्माधर्मविचारपचु[4] नंजण[5]गोसांवीं राज्य करीते
कालीं विजयसंवत्छर पुष्य ब ३० र-

५ वी अर्धोदयपुण्यकॉलीं कुकळी[6]ग्रामे पुरुषसेणवैयासुतुमाइसेणवे-
यासि बंदेवाड[7]ग्रामे

६ ग्रामपुरुष रामनायकु । नागणनायकु । रामप्रभु . मांगेप्रभु ॥ हे मुख्य
प्रर्ज[8] सहित समे[9]-

---

१ श व स ह्यांच्या खुणा शिलालेख खोदणारा सारख्या च खोदतो ज्या-
अर्थी लि बद्दल ल खोदला आहे त्याअर्थी श पेक्षां स हें अक्षर येथें लिहि-
णाऱ्याला व खादणाऱ्याला इष्ट होतें, असें दिसतें. २ सकु अशीं अक्षरें इतर लेखांत
हि येतात. ३ प्रतिनिधि. सम्राट देवराय व गोवे येथें त्याचा प्रतिनिधि नंजण
होता. ४ पचु = पटु. ५ प्रतिनिधीचें नांव, तृतीया. ६ गांवाचें नांव. सध्यांचें
कुकळ्ळी. ७ बंदवाड म्हणजे सध्यांचें बांदिवडें व पोर्तुगीज Bandora. ८ प्रज
म्हणजे गांवांतील व्यक्तिशः लोक. प्रजा म्हणजे लोकसमुदाय. ९ समध = समद्य
सर्व.

७ ध ग्रामिचेनि दत्तैः[10] धर्मसासनाचि भासी[11] ऐसि आमच्या गावाभितरिं श्रीनागनाथदेवा सानिधि गोपाळभ-

८ टा नावे वेदखंडिकेचे[12] कुळाग्र[13] प्राक्[14] श्रीमांहालक्ष्मीसदेवीसि[15] अखंडे[16]-ज्योतीसि वर्षप्रतिवर्ष

९ तेला बारा तांब्रिए वेगळे करुनु त्यै[17] उपरि गोपाळभटानें[18] यावे टॉ २॥ तथा सुनु केशोभटा नावे मैळो[19] कु-

१० ळाग्र कदुंब्राण[20] टॉ ६ पैकीं कार्त्तिक[21] २ बॉदेधौवा[22] टॉ १ उतउंभापजे[23] [24]टॉके ३ ॥ संमंधें[25] तथा मॉइं सेणवैयाँ[26]-

११ ह श्रीग्रामान रोकडे टॉ २० घेउनु तयाच्या कुळाग्रावरि आचंद्रार्कपर्यंत सहिरण्योदकदानधारा-

१२ पूर्वक करुनु सर्वनमस्य-सर्वबाधाविवर्जितं करुनु[27] दिधले तथा मॉइ सेणवैएं आपुलीए भक्तिपूर्वक

१३ श्रीनागनाथदेवासि वर्ष । प्रतिवर्ष कार्त्तिकपुनवे दिपमाळा जळूंचिये[28] भासे आचंद्रार्कप-

१४ र्यंत तया गोपाळभटानें तया पुनवेचां दिसिं प्रवर्तचिया[29] तांबिया येका प्रति सोळसिया[30] १७ लेखिं

---

१० विसर्ग निरर्थक. ११ भास = भाषा. १२ वेदखंडिका हे कुळाग्राचें नांव. १३ कुळाग्र म्हणजे कुळागर. १४ प्रथम १५ नागनाथाच्या समोर च लक्ष्मी आहे. १६ नंदादीपाकरितां. १७ त्य = त्या. त्यउपरि = त्यावर, आणिक. १८ न = (सध्याचा) नें. १९ मळई. २० एक कर आहे. २१ कार्तिकाच्या हप्त्यास २ टाक द्यावे. २२ दुसऱ्या हप्त्याचे नांव. त्या हप्त्यास १ टाक द्यावा. २३ तिसऱ्या हप्त्याचें नांव, त्या हप्त्यास ३ टाक द्यावें. २४ टांक याचें अनेकवचन टांके. सध्यां पोर्तुगीज भाषेंत ह्याला tanga म्हणतात. २५ सर्व, एकूण, संपूर्ण. २६ सेणवैयाह = सेणवयापासून. पंचमी. २७ रु वर अनुनासिक किंवा बिंदु निरर्थक. २८ जळूंचीये भासे = जाळण्या करितां; कोंकणाप्रयोग. २९ प्रवर्त्त = प्रवर्त्त = प्रारंभ. ३० सोळसी हें एक माप आहे. सोळाव्या हिश्शाचें माप.

१५ तेला तांब्रिये तिनि समंध सोळासिया ५१ तिळेल नाहिं तरि नारळेळ
अथवा तुप मेजुनु देउळें या-

१६ वें तथा दिपमाळेसि पणतियां ४०० वातिसि लौंग[31] तेतुकें सुत येतुकें
गोपाळभटानॅ देउनु दिपमा-

१७ ळ करावि श्रीनागनाथदेवासि रात्री महा[32]स्नपनगंधधूपदीपउपाहारा[33]
तांदु[34]ळां चौथें[35] २ तुप सोळ-

१८ सि १ ॥ पक्कं[36]नां वडे [37]कां [38]घारीया ८ [39]शाक २ विडा १ श्रीमहालक्ष्मी
देवीसि अभिसेकु गंधधूप-

१९ दीपउपाहारासि तांदुळा चौथु ४ तुप गिंदु[40] १ पक्कां[41]न वडे ४ शाक २
विडा १ [42]दोइ देउळि मंत्रअव[43]सें-

२० रु करावा दिपमाळेच्या खांबापासि गिदा २ चा निवेद्यु[44] करावा हेयां[45]
येतुक्यासि तथा मांइ सेणवैयें

२१ तया गोपाळभटासि तयाच्यॉ दो कुळाग्रिचे टांके ३ ॥ दिधले
[46]सैमंधि तथा गोपाळभटाचिये जात-

२२ प्रजातसंततिन आचंद्रार्कपर्यंत चालवावा तथा दिने नागनाथदेवा-
च्या उपाहारा [47]वाँरिये माळि

२३ रउळगिधू[48]र्वीळिमरत्यान दो [49]वेगिं दिपमाळ जळावी तयाच्या जात-
प्रजातसंततिन दिपमाळा ज-

२४ ळावी तथा ग्रामान तया माइ सेणवैयासि कुरु[50]पांगुसिवाडे [51]रुवो कु-
ळाग्र १ ना[52]गेझरि मळो सेत १ दत्तभु-

२५ मि दोंनि देंता कुं[53]ग्राचे माइ सेणवैया हस्ते ग्रामानं टांके ५० घेउनु
सहिरंण्योदकदानधारापूर्वक सर्व-

---

३१ लाग = लागे. ३२ महास्नान. ३३ उपाहारास, चतुर्थी. ३४ तांदुळां = तांदुळांच्या षष्ठी. ३५ चौथ हें एक माप आहे. चौथ्या हिश्शाचें माप. ३६ पक्कान्न. ३७ किंवा. ३८ घारगे. ३९ भाजी. ४० गिदु हें एक माप होतें, गिंडी. ४१ पक्कान्न. द्वित्त न्न हवा. ४२ दोहीं. ४३ मंत्रावसर ४४ नैवेद्य. ४५ हा हेया, एया, हीं जुनीं ज्ञानेश्वरीं रूपें १३३५ प्रचलित होतीं च फक्त तया हें रूप प्रचारांत येत चाललें होतें इतकें च. ४६ सर्वांनीं. ४७ ? ४८ ? ४९ दोघां जणानीं. ५० वाडीचें नांव. ५१ रुवो हें कुळागराचें नांव. ५२ नागझरी हें मळईचें नांव. ५३ ळा मध्यें खोदावयाचा राहिला आहे.

२६ नमस्यसर्वबाधाविवर्जित करुनु ग्रामानॅ. माइ सेणवैयासि आचंद्रार्क-
पर्यंत दिधलें ॥

२७ तथा मांइसेणदेएँ आपुले भक्तिपूर्वक रुवो कुळाग्र श्रीनागनाथदेवासि
प्रात:कालिं आठवॅं[५४]-

२८ ळिएच्या उपाहारासिं प्रतिदिवसिं । ६ पॉ[५५] १ कॉ[५६] [५७]सुरै सडिक तांदुळं
गिदा १ लेखिं करउँ[५९]चिए भासे

२९ तथा रुवो कुळाग्र गोळॅं[६०]तिवाडे लखुम सेणवैयासुतु विठल सेणवैयासि
तयाचे जातप्रजा-

३० तसंतनिसि आचंद्रार्कपर्यंत दिधले नागझरि मळो सेत श्रीमहालक्ष्मि-
३०] देविासि प्रातका-

३१ लिं आठवळीएच्या उपहारासि दिधलें समंधिं तथा देवतेच्या पुजा-
ऱ्यान तथा क्षेत्रीं[६१] घेउ-

३२ नु देवतेसि अभिषेकुगंधधूपदीप सुरै सडिक तांदुळ गिदा १ लेखिं
उपहारु करावा विडा

३३ मंत्रावसरु करावा तथा उपाहारु देवोरि[६२]यासि । हा केला धर्मु ग्रा-
मान चालवावा सिंहास-

३४ निच्या रायॅं[६३]न अधिकारिया वळितिॅं[६४]यान पाळावा हा केला धर्मु जो
मोडि तेणे वाराणॅ[६५]-

३५ सि श्रीविस्वेस्वरा सानिधि सूर्यग्रहाणि आपुला मातापितॅ[६६]गाए वदि-
२०] ल्यॅ[६७]ा पापासि जाए

३६ दानपालनयोर्मध्ये दानोत्त्रॅ[६८]यानुपालनं । दानात्स्वर्गमवाप्नोति पालना-
दच्युतं

---

५४ पहाटेस आटवून जी पेज प्यावयाची तिला आठवली म्हणतात. ५५ ? ५६ ? ५७ सुरै म्हणजे न उकडलेले तांदूळ. ५८ तांदुळां षष्ठी. कान्हा लावा-वयाचा राहिला आहे. ५९ करण्याकरितां. ६० वाडीचें नांव. ६१ शेत. ६२ देवहरी = देवारी. पूजाहारी = पूजारी. ६३ देवरायानें. ६४ अधिकार वळत्यानें म्हणजे गोव्याच्या प्रतिनिधीनें ६५ सप्तमी ६६ आई,बाप व गाय. ६७ वधिल्या. ६८ श्रे हवें.

३७ पदं ॥ सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणा काले काले पालनियो भवद्भिः
३८ सर्वानेतां न्भाविनः पार्थिवेंद्रां भूयोभुयो याचते रामचंद्रः
३९ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्चं वसुंधरां षष्टीवर्षसहस्राणि वि
४० ष्टायां जायते कृमि ॥ तथा उपहारु आणितां प्रौक्रु देवाचे उ-
४१ ळिगाचे माणुसि उळिग करुनु उपाहारु न्यावा ॥ श्रीशुभं
४२ भवतु श्री ॥

वि. का. राजवाडे
द. वि. आपटे

श्री.

## ४० कोडीत येथील एक सनद

सोबत 'शुद्ध सन ११०१ शव्वाल'ची एक सनद पाठविली आहे. फिरंगी '१७०० अक्टोबर' हा काल येतो. श्री छत्रपति राजाराम महाराज हे शक १६२२ त परलोकवासी झाले. ते मार्च महिन्यांत निवर्तले असें ग्रांटडफ ह्मणतो. यावरून त्यानंतरची ही सनद आहे.

या काळीं मोगलांची शिस्त किती बिघडली होती, मोगली सरदार नीतिदृष्ट्या किती भ्रष्ट झाले होते; भावी स्थितीच्या कल्पनेनें उत्पन्न होणारें औदासिन्य व तद्द्वारा आलस्य यांचा त्यांचेवर किती पगडा बसला होता, याचें वर्णन ग्रांटडफनें केलें आहे. अशा 'बेबंद' शाहींत धाडशी माणसाचें फावतें.

पुढें दिलेल्या सनदेंत मोंगली राज्यव्यवस्थेचा एक लहानसा मासला आहे, तो अज्ञात व मनरंजन करणारा असल्यानें दिला आहे. विशेषतः तो 'खान-देशी' आहे.

श्री

मौजे कोडीत तो शिरपूर येथील सनद.

( वर सर्व फारशी त्याचा तर्जमा मोडी. )

जीकर कवसद्र परुानराय सीके करासिया मौजे कोडित मामुदाप्रगणें थाळनेर मजमजाफ सुमे खानदेस सरकार असर अन आबाद गुजपंद दर मौजे वनावल आमला प्रगणे मजकूर सकुनत राहणार दास्त मुदामअन हाकाम प्रगणे मजकूर

---

६९ मा पर बिंदू निरर्थक. ७० नी हवी. ७१ ता वर बिंदु निरर्थक. ७२ नू बद्दल बिंदु. ७३ च हवा. ७४ ष्टि हवी. ७५ रु हवा. ७६ नंतर.

आज रयत सकुनत मौजे कोडीत मामुल रहाणार असोन तेथें रहण्यास अजारी व वाऱ्याचे उपद्रवामुळें सर्व मेत जालें राहिलेले मुले येका मौजे वनावल येथे आले बादशाकडुन तंटा करून मौजे कोडीत येथें कांहीं लोक घेऊन येऊन राहिला आणि आपला हुा चालउ चालला. हुसेन बागे खानी उ × आसा या नावानी हुदा चालउ लागला आणि गावास मौजे कोडित हा गाव चांगला आबाद करून त्या गावांत म्हशिदी वगैरे बांधून तेथे राहिला आणि आपला सर्व कबजा करूं लागला तेव्हां गोबजी पाा वाघाडीकर हा त्यास हे काम करण्याविसिं ताकीद देत असत त्यावर त्याणीं ऐकिले नाहीं जे वेळेस गोबजी पाा मना करीत होता त्या वेळेस त्याणी लढाईचा इरादा करावा आणि त्याणी आपल्या मनांत मी कोण सरदार आहे असे समजून कोणास मान करून आपदिन बाहाराने खानी व मनसुरु हा त्याचा मोठा सरदार खात्रीचा होता असे दोघे बआणखीन कांहीं लोक जमा करून सर्व आपला हक्क बजाउ लागला नंतर जावजी ( नावजी ) पाा वाघाडीकर यास धरून थाळनेर येथें किल्यांत पोहोचऊन दिल्हे नंतर अजुबाजूचे गांव लुटू लागला त्यामुळे गावे बहुनेक उज्याड जाले व मोटा दंगा करू लागला नंतर बादशहाकडील हुदेदार परमनाथ, डांगरी व सोनगीर व पढावद येथें आले म्हणून गोबजी वाा बधुजी पाा हे डांगरी व बेटावद व सोनगीर येथे बादशा कडील अनेक सरदार यास भेटून त्यास मौजे कोडीत येथील सर्व मजकूर सांगितला नंतर थाळनेरचे मुक्कामी सर्व बेहरानखाचा वर्तमान कळविला त्यावरून त्याणी रघुनाथराव देशपांडे थाळनेरकर व त्याजबरोबर कांहीं लोक लढाउ त्याजबरोबर देऊन हुा दिला मौजे कोडीत येथें जाऊन त्या दंगे खोरास ठार मारावे नंतर रघुनाथ देशपांडे थाळनेर येथून निघून मौजे वाघाडीस येऊन तेथें गोबजी बधु पाा यास जमावानिसी बरोबर घेऊन चढाई केली त्या लढाईत कोडीत येथे कापाकापी करून त्याजकडील फौजदार सरदार मोठा होता त्यास रघुनाथ व गोबजी यांणीं ठार मारिला आणि थोडे लोक जखमी जालें नंतर दुसरे दिवशीं मौजे कोडीत याजवर चढाई करून तेथे काही लोक रघुनाथ व गोबजी याणी त्यास कळविले की तू नावजी (जावजी) यास आता सोडून दे त्यावरून त्याणी सोडले नाही मी लढाईस तयार आहे नंतर लढाई सुरू करून बरेच दिवस चालली त्यात बधु पाा हा मैत जाला नंतर गोबजी याणीं मोठी कतल करून कोडीत हा गांव अपले कबज करून बंडखोर लोक सर्व पळून गेले नंतर गोबजी याणी सरकारला मोठी मदत दिलि करितां हि सनद दिल्ही आहे सन ११०१ ताा १ माहे शव्वाल.

गो. का. चांदोरकर

# ४१ छत्रपति संभाजीच्या कारकीर्दीतील अव्यवस्था

सोबत जोडलेलें पत्र छ ७ साबान खमस समानीन अलफ ह्मणजे शक १६०६ श्रावण शु॥ ८ मीस मोरेश्वर पंडितराव याणें लिहिलें. तें बार तिसा समानीन अलफच्या ५ जिल्हेजला ह्मणजे शक १६१० आश्विन शुद्ध ७ स झालें. ह्मणजे बार व्हावयास ४ वर्षे २ महिने लागले. संभाजीला अवरंगझेबानें शक १६१० च्या श्रावणांत मारिलें. तदनंतर थोड्याच दिवसांनीं पत्र बार झालें. याचा अर्थ असा होतो कीं शक १६०६ पासून शक १६१० च्या श्रावणापर्यंत ह्मणजे संभाजीच्या समाप्तिपर्यंत संभाजीचें दफ्तर अव्यवस्थित होतें. त्यांत व्यवहाराची दाद लागत नसे. संभाजी वारल्याबरोबर लगे च व्यवस्था सुरू झाली. उघड च आहे, कवजीबावा अस्तंगत झाल्याबरोबर सर्व प्रधानमंडळी आपापल्या कामावर रुजू झाली व व्यवस्थित व्यवहार पुनः शिवाजीच्या कारकीर्दींतल्याप्रमाणें चालू झाला. संभाजी शक १६१० च्या माघांत किंवा फाल्गुनांत मारला गेला वगैरे गप्पा कित्येक टिपणकारांनीं मारिल्या आहेत, त्या अर्थात् अविश्वसनीय आहेत. संभाजी शक १६१० च्या श्रावणांत मारला गेला हें विश्वसनीय आहे. अस्सल पत्राची नक्कल येणेंप्रमाणें:—

श्रीशंकर

शक १६०६ अधिक श्रावण शु॥ ८

० श्री ०
चिंतामणिच
रणशरण

श्रीसकलगुणमंडितअखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य राजश्री देवाजी विठ्ठल देशाधिकारी व लेखक प्रांत राजापूर वर्तमान व भावी गोसावीयासी

पोष्य मोरेस्वर पंडितराई नमस्कार राज्याभिसेक सक ११ रक्ताक्षीनामसंवछरे श्रावण शुध अष्टमी ब्रस्पतीवार वेदमूर्ति हरिभट विश्वनाथभट पटवर्धन वस्ती मौजे पावस ता मा ब्राह्मण योग्य देखोन धर्मादाय देविले तांदूल कैली कोठी मापें मण ८२॥ अडीच जोवरी वेदमूर्ति क्षेम पावतील तोंवरी प्रतिवर्षी परामर्ष घेउनु प्रविष्ट करीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें प्रती लिहून घेउनु

मुख्य पत्र भट गोसावी याजवळी देणे रा छ ७ माहे शाबान सुा खमस समाननी

अलफ पाा हुजूर हे विज्ञप्ति

सुभं
भवतु

बार सूद छ ५ जिल्हेजु सन तिसा समानीन

बार सूद

पो छ १९ जिलकाद

साल मजकूर *

---

## ४२ तळेगांव ढमढेरे येथील श्रीसंभूनाथबावा

तळेगांव-ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणें येथें जीं कांहीं प्रेक्षणीय देवालयें आहेत, त्यांसंबंधानें त्रुटित माहिती देवालयांवरील शिलालेखांच्या आधारें भा. इ. सं. मंडळापुढें वाचण्यांत आली आहे च.‡

वृत्तांत उल्लेखिलेल्या पांच देवालयांशिवाय तेथें आणीक एक प्रसिद्ध देवालय आहे. हें देवालय म्हणजे वेळ नदीचे कांठीं च असलेलें 'नाथां' चें देवालय होय. ह्या ठिकाणीं एका च आवारांत श्रीविश्वेश्वराचें देवालय व नाथबुवांची समाधि अशीं असून देवालय 'नाथां'चें देवालय ह्या नांवानें च संबोधिलें जातें. हें नाथाचें देवालय, किंबहुना नाथबुवाचा काळ ह्याविषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत. कोणी कोणी तर हे नाथबुवा शातवाहन शकाच्या तेराव्या शतकांत होऊन गेल्याचें बेशक प्रतिपादितात. परंतु हा निव्वळ तर्क आहे. ज्या बावांच्या संबंधावरून देवालयास नाथांचें देवालय असें नामाभिधान प्राप्त झालें आहे, त्या बावास तळेगांव येथील 'मोकदम व समस्त दाहीजण' यांनीं शके १६९१ ज्येष्ठ वद्य १, मंगळवार, ता. २०।६।१७६९ रोजीं दिलेल्या इनामपत्रावरून ह्या नाथबुवांचा काळ

---

* हें पत्र अणसुरें येथें पुराणिक गाडगिळांच्या येथें सांपडलें.

‡ ( शके १८३४ चा अहवाल, पान २७६ पहा,).

निश्चित होतो. सदरील बुवांचें उपास्य दैवत 'श्रीकाशीविश्वेश्वर' असल्यामुळें, सांप्रत दर शिवरात्रीस तेथें मोठ्या थाटानें होत असलेला उत्सव शके १६९१ चे पूर्वीपासून च चालत आला असला पाहिजे. ह्या माझ्या अनुमानास समर्थक असा पुरावा इनामपत्रांतील 'शिवरात्रीचा उत्साह साल दरसाल तुमचे मठीं होतो' ह्या उल्लेखावरून मिळतो. शिवरात्रीस होत असलेला हा उत्सव अर्थात् शंकराचा असून, शिवोपासक नाथबुवामुळें च, ह्या उत्सवास 'नाथांचा उत्सव' असें म्हणण्याची पद्धत पडलेली दिसते. सदरहु नाथबाबा जातीनें कासार असून, त्यांचें उपनांव 'धुमाळ' असें होतें, ह्याशिवाय त्यांचेसंबंधानें जास्त माहिती मिळत नाहीं. मठांत हि कांहीं संग्रह नाहीं. देवालयाचे जीर्णोद्धाराचें काम सांप्रत चालू आहे.

---

श्रीशंकर

इनामपत्र शके १६९१ विरोधी नाम सवछरे जेष्ट वद्य १ प्रतीपदा ते दिवसी तपोनिधी श्रीसंभुनाथबावा मठ को। तळेगाव स्वामीचे सेवेसी मोकदम व समस्त दाही जण कसबे मजकूर ता। पाबळ सरकार जुनर सुहुर सन सबैन व आलफ सन हजार ११७९ कारणे इनामपत्र करून दिल्हे ऐसीजे सिवरात्रीचा उछाव साल दरसाल तुमचे मठीं होतो व आतीत आभ्यागत येऊन मठी राहातो ऐसा खर्च जाणोन तुम्हास गावनिसबती इनाम थेवल थळ पैकी रुके ८६ सजगाणी सिकरापूरचे सिवेस वरुडाचे वाटे खालती गोमाजी माळी भुजबळ वाहतो ते जमीन तुम्हास इनाम करून दिधली आसे ते जमिनीत तुम्ही जिराईत बागाईत करून उत्पन्न होईल तें घेत जाणे तुमचे शिष्यशाखा सदरहु इनामाचा भोगवटा घेऊन उछावाचा व मठचा खर्च चालवितील आपणहि वंशपरंपरेनें इनाम चालऊ यांसी अंतर करणार नाहीं हे इनामपत्र लेहून दिधले सही

तेरीख छ १५ माहे सफर

निशाणी नागर आमानत

बिा। कृष्णाजी सदासिव जोसी
कुलकर्णी को। मा।र

गोही

सुलतानजी चौगुले
सुपेकर को। मा।र

त्रिंबक गोविंद महाजन येडके को। मजकूर
देवजी माळी भुजबळ को। मा।र

सुलतानजी सेटे को। मा।र

पां. न. पटवर्धन

---

श्रीराम

# ४३ हरिदासांचा सोळा हाजारांचा योगवासिष्ठ ग्रन्थ

हा प्रचंड ओवीबद्ध ग्रन्थ आपचंद मठांत मिळाला. तो छापलेला पाहण्यास सांपडेल अशी मला आशा नाहीं ! तेव्हां त्याची प्रत करून घेऊन तो मी सदरहु मठाकडे परत केला आहे. तत्पूर्वीं त्याची माहिती साधुसतांच्या महाराष्ट्राला करून द्यावी असें वाटून हें टाचण आपणाकडे पाठवीत आहे.

मूळ योगवासिष्ठाचे ३२००० श्लोक आहेत हें सर्वांना माहित च आहे. त्यापैकीं ६००० श्लोक निवडून काढून त्यांवर कोणा काश्मीरस्थ पंडितानें संस्कृतांत भाष्य केलें आहे. त्या भाष्याचा आधार घेऊन आपण ही टीका करीत आहोंत असें हरिदासांनीं म्हटलें आहे. हरिदासांची टीका नक्की १६६३१ ओवी आहे, म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ सरासरी एकनाथी भागवता एवढा आहे. त्याचा तपशील येणेंप्रमाणें:—

| | प्रकरण | आधारास घेतलेले संस्कृत श्लोक | सर्ग | ओवीसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वैराग्य | ३९३ | १३ | २३३२ |
| २ | मुमुक्षु | १४० | ६ | ८२४ |
| ३ | उत्पत्ति | १००० | १५ | ३४५५ |
| ४ | स्थिति | ५४० | ६ | १७२८ |
| ५ | उपशम | ११९० | १० | ३०६२ |
| ६ | निर्वाण | १७४२ | १७ | ५२३० |
| | | ४९२५ | ६७ | १६६३१ |

२१५५६

ग्रंथ अप्रतिम असून प्रासादिक आहे. त्याची यथार्थ कल्पना एकाद्या लहानश टांचणानें करून देणें कसें शक्य आहे ! तेव्हां या टाचणांत ग्रन्थाविषयीं सामान्य माहिती देण्यापलीकडे जास्त कांहीं करतां येत नाहीं. ती माहिती ग्रन्थकाराच्य च शब्दांत देणें बरें.

१ ) ग्रन्थकाराचें नांवः—

रामकथा सुरस गायन । ते चि हरिदासा जीवन ।
गुरुकृपा संजीवन । अमृतपान सर्वदा ॥ १५१ ॥

शांतानंदाचे अंकित । श्रीरघुनाथ नामांकित ।
हरिदास नाम सद्गुरुदत्त । ग्रंथ समाप्त योजला ॥ ६ १७/३८१ ॥

( २ ) ग्रन्थकाराचें गोत्रः--

उपजलों ज्यांचिये वौंसीं । नमन तया भारद्वाजासी ।
श्रीराम उपासना मिरासी । म्हणोनि भजनासी विनटलों ॥ १ १/१ ॥

( ३ ) ग्रन्थ कोठें रचलाः—

गोदातटीं वाल्मीक नगर । जैंराम पंडित योगेश्वर ।
त्याचिया संवादें टीका सुंदर । जाला विस्तार ग्रंथासी ॥ ६ १७/३८८ ॥

( ४ ) ग्रन्थ केव्हां रचलाः--

वैशाख शुद्ध सप्तमीं । भृगुवासर पूर्व यामीं ।
संवत्सोळा शत दशमीं । ब्रह्मत्व ब्रह्मीं प्रतिष्ठा ॥ ६ १७/३९० ॥

( ५ ) ग्रन्थाचें प्रयोजनः--

बत्तिस सहस्र योगवासिष्ठ । बोलिले स्वामी श्रीवासिष्ठ ।
श्रीरामउपदेसीं वरिष्ठ । केलें अभिष्ट सर्व लोकां ॥ १ १/५३ ॥
त्यामध्यें सा सहस्र । निवडूनि काढिले नवनीत सार ।
त्यावरी आत्मसुख भाष्यकार । जाला विस्तार भूतळीं ॥ ५४ ॥
परिव्राजाकाचार्य स्वात्मसुख । निरसावया कळिकाळदुख ।
तारावया जड मूढ मूर्ख । टीका सुरेख संस्कृत ॥ ५५ ॥
येथें अधिकारी पावले । संस्कृत वक्ते बुझावले ।
बाळे भोळे जन उरले । यालागीं प्रेरिलें गुरुदेवें ॥ ५६ ॥
जयासि वासिष्ठिं परम प्रीति । नाहीं संस्कृति वित्पत्ति ।
तयांसि व्हावि अपरोक्ष प्राप्ति । माहाराष्ट्रभाष्योक्ति करि ग्रंथ ॥ ५७ ॥
येसें गुरु आज्ञापित । तैसें च संताचें हि आर्त ।
वेगिं चालविं वासिष्ठ ग्रंथ । साह्य रघुनाथ तुज असे ॥ ५८ ॥
अंतरिं चाळक श्रीराम मूर्ति । वाचा वदे त्याचिये स्फूर्ति ।
तेणें चि ग्रंथासि अभिव्यक्ति । साशंक चित्तीं कां होसी ॥ ५९ ॥
सर्व भूतीं भगवद्भावो । हा चि भजनाचा निर्वाहो ।
मीतूंपणा कैंचा ठावो । येदर्थी संदेहो कायसा ॥ ६० ॥

६ ) ग्रन्थकाराचे गुरुः—

आनंदवन वाराणसी । मानससरोवरनिवासी ।
ब्रम्ह वोतलें साकार वेषीं । विश्वोधारासी शांत मूर्ति ॥ १ १/३४ ॥

७ ) शांतानंदांच्या उपदेशाची हातवटीः--

उपदेशाची हातवटी । नाहीं लक्ष दावणें दृष्टि ॥
न गोवि नादाचे संकटीं । मुद्रेची गोष्टी कायसी ॥ ६ १७/३८० ॥
ध्यान धारणा आसन । न लावी क्रिया कर्म साधन ॥
शुध भावार्थ देखोन । ब्रह्मज्ञान उपदेशित ॥ ३८१ ॥
शिष्य न देखे शिष्यपण । नाहिं गुरूचा अभिमान ।
ब्रम्ह सम समान । ब्रम्ह परिपूर्ण बोधित ॥ ३८२ ॥
आपुले तपाची संपत्ति । शिष्यीं प्रगटे ब्रम्हस्फूर्ति ॥
बंधमोक्षाची नुरऊनि भ्रांति । जीवन्मुक्ति दशा पावे ॥ ३८३ ॥

( ८ ) गुरुपरंपराः—

आनंदवन वाराणसी । मानससरोवरनिवासी ॥
ब्रम्ह वोतलें साकारवेशीं । स्वानंदरासी सदा शांत ॥ ६ १७/३६८ ॥
संप्रदाये आश्रम सूत्रीं । गुरुसंप्रदावे विस्तारी ॥
आदि ब्रम्हांडजगदोधारी । उपदेश करी वसिष्ठ ॥३६९ ॥
तेथोन शक्ति पाराशर । नारद व्यास विश्रांतिकार ॥
पूर्ण ब्रम्ह शुक योगींद्र । पुढें विस्तार तो ऐसा ॥ ३७० ॥
गौडपाद श्री गोविंद । शंकराचार्य विज्ञानबोध ॥
स्वरूपाचार्य प्रबुध । तेथून प्रसिध व्यासाश्रम ॥ ३७१ ॥
पुरुषोत्तम अद्वयानंद । उपेंद्राश्रम पूर्ण बोध ॥
जगन्नाथ सुखस्वानंद । शुध बुध उत्तमाश्रम ॥ ३७२ ॥
सुरेंद्राश्रम राघवेंद्र । वासुदेव पुरुषोत्तम सांद्र ॥
जगन्नाथ योगेश्वर । विज्ञानभद्र केशवाश्रम ॥ ३७३ ॥
वामनाश्रम विश्वनाथ । गोविंद पद्मनाभि समर्थ ॥
हरिहराश्रम करुणावंत । जगविख्यात पुरुषोत्तम ॥ ३७४ ॥
महादेव परमोदार । जनार्दन जगद्दोधार ॥
रामकृष्ण दिगंबर । अगम्य चारित्र जयाचें ॥ ३७५ ॥
परिव्राट अद्वैताश्रम । चिदानंद मंगळधाम ॥
चहुं आश्रमा विश्राम । शांताश्रम दिव्य मूर्ति ॥ ३७६ ॥

ब्रम्हानंद वासिष्ठ वर्य । पूर्ण ब्रम्ह दत्तात्रय ॥
जनार्दन अपर सूर्य । परमोदार येकनाथ ॥ ३७७ ॥
श्री रघुनाथ चिदानंद । शांत मूर्ती स्वानंदकंद ॥
प्रगट केला ब्रम्हबोध । स्वाराज्यपद पैं देता ॥३७८ ॥
शांतानंद परमोदार । उपदेशून तारक मंत्र ॥
श्रीराम द्वय अक्षर सार । साक्षात्कार ब्रम्हपदीं ॥ ३७९ ॥

(९) प्राकृत कवींचा निर्देशः-

प्राकृत कवि येकनाथ । ज्ञानदेवादि संत महंत ॥
अनन्य भावें अभिवंदित । ईप्सितार्थ पुरवावा ॥१$\frac{१}{९०}$ ॥

(१०) ग्रंथाचा प्रसादः—

ॐ नमों सद्गुरु श्रीरामचंद्र राजा । शांतानंद विश्वतो बीजा ॥
भक्त तारिसी आपुले पैजा । न्यून्य त्या काजा पूर्ण करिसी ॥ ६$\frac{१७}{१}$ ॥
आपुली सांडूनि सत्य प्रतिज्ञा । राखिलें भीष्माचिया पणा ॥
हारीं आणूनि आपणा । भक्तमहिमाना वाढविसी ॥ २ ॥
गजेंद्राचें सोडवणें । गरुड सांडूनि धांवणें ॥
महा संकटीं रक्षून । निज पद पावन पैं केलें ॥ ३ ॥
असरें प्रल्हाद गांजितां । खांबीं अवतरोनि भगवंता ॥
विदारुनि दैत्यनाथा । आपुले भक्तासी राखिलें ॥ ४ ॥
अंबऋषींचे गर्भवास । स्वयें सोशिले सावकास ॥
संकट मांडल्या भक्तास । देवा आपणास वोडविसी ॥ ५ ॥
द्रुपदि गांजितां सभेसी । लाज लाविली दुर्योधनासी ॥
स्वयें रक्षिलें पांचाळीसी । जगीं कीर्तीसी विस्तारिलें ॥ ६ ॥
नाना आपदीं पांडवां । केला तयांचा सावाधावा ।
भजन प्रेमाचा गौरवा । दयार्णवा प्रगट केलें ॥ ७ ॥
अनंत भक्तांचियां रासी । संकटीं पावला हृषीकेशी ॥
त्यांचियां लिहितां विस्तारासी । परि तो गणितासी कदा नये ॥ ८ ॥
मदें मातला अहं रावण । चोरिलें जानकी चिद्रत्न ॥
बंदिं घातले सुरगण । विश्व दुंदुंद्रानें पीडिलें ॥ ९ ॥

त्याचिये सोडवणें दयाळा । मेळऊनि वानरपाळा ॥
सेतु बांधला अवलीळा । आले सुवेळा रामचंद्र ॥ ३० ॥
सकुळ दशमुख विदारून । स्वपदीं स्थापिले विबुध जन ॥
सोडऊन जनकनंदन । राज्यीं बिभीषण स्थापिला ॥ ११ ॥
ऐसा विरुदांचा बडिवार । लिहितां वाढेल ग्रंथ फार ॥
यालागीं असो विस्तार । अपार चरित्र देवाचें ॥ १२ ॥
परि हा नवलाव अद्भुत । मज मूर्खाचेन मुखें वासिष्ठ ग्रंथ ॥
देशभाषा टीका प्राकृत । केली विस्तारित जनहितार्था ॥ १३ ॥
देखोनि प्रतापाचें चोज । आश्चर्य वाटे माझें चि मज ॥
१०] बाप कृपाळु रघुराज । निजात्म गुज प्रगट केलें ॥ १४ ॥
अवघा तूं चि विश्वंभरा । तेथें मीपणासी कैंचा थारा ॥
कोणें सुचावें परिहारा । सद्गुरुवरा देवदेवा ॥ १५ ॥

(११) रामावताराचें कारणः—

अहंमदें क्रूर दारुण । तेणें मातला रावण ॥
जेणें करूनि शंकरभजन । वरद संपूर्ण लाधला ॥ २१६ ॥
शंकरवरदाचें महिमान । जेणें जिंतिलें त्रिभुवन ॥
त्रिगुणापासून नाहीं मरण । ऐसें विंदान जयाचें ॥ २१७ ॥
फरशराम तये समईं । होता भूमंडळाचें ठाईं ॥
आपुल्या हस्तें मरण नाहीं । यालागिं तो हि स्वस्थ राहे ॥ २१८ ॥
१०] ब्रह्मा इंद्र यम वरुण । चंद्रसूर्यादि देवगण ॥
रावणबंदीं सेवा करणें । भय दारुण मानिती ॥ २१९ ॥
देवां मानवां ऋषींप्रती । नव ग्रह सदा पीडिती ॥
ते हि रावणाचे पायीं दडती । चरफडिती सर्वदा ॥ २२० ॥
अग्नि आणि पवन । तयां रावणाचें दृढ बंधन ॥
कोण्हाची न चले आंगवण । आक्रंद्रें रुदन करिती ॥ २२१ ॥
असो बोलणें बहूत येथें । त्रिभुवनीचीं जें दैवतें ॥
ते त्या रावणाचिये हस्तें । दुःख भोगिते छेपन युगें ॥ २२२ ॥
देव म्हणती विधातियासी । तूं सर्वांचा पितामहो होसी ॥
रावणबंदीं आम्हांसी । गति कायेसी सांग पां ॥ २२३ ॥

स्वप्नीं तऱ्ही होऊन मुक्त । अथवा ऐसे मरोन पचत ॥
ऐसें दुःख अनुवादत । विकळ चित्त सर्वदा ॥ २२४ ॥
जाणोनि भविष्याची गति । स्वयंभु बोले तयांप्रति ॥
भय न धरावें समस्तीं । स्वस्थ चित्तीं असावें ॥ २२५ ॥
अनादि जें परब्रह्म । दाशरथी आत्माराम ॥
अवतरेल पुरुषोत्तम । देवांचा श्रम हरावया ॥ २२६ ॥

(१२) ग्रंथाची फलश्रुतिः—

वासिष्ठाचें श्रवण कथन । करिती जे का सभाग्य जन ॥
त्यांचें निरसे जन्ममरण । निजात्मदरुषण संप्राप्त ॥ ६३४६ ॥
जयासी नित्य पारायण । नित्य करी श्रवण कथन ॥
तो त्रिलोकी होये पूज्यमान । वंदिती सुरगण अत्यादरें ॥ ३४७ ॥
वासिष्ठाचें पुस्तक लिहून । जो मंदिरीं राखे सुयेत्नें ॥
अथवा आर्तासी करी दान । तयासी रघुनंदन स्वयें रक्षी ॥ ३४८ ॥
त्याचीं विघ्नें भस्म होती । अभ्योदय करी उन्नति ॥
घरीं तिष्ठे भक्ति मुक्ति । अपार संपत्ति तो भोगी ॥ ३४९ ॥
कथा रामायणी श्रेष्ठ । त्या हि माजी योगवासिष्ठ ॥
मस्तकीं वंदी नीळकंठ । पूजिती वरिष्ठ लोकत्रई ॥ ३५० ॥
जयासी ब्रह्मविद्येचें आर्त । तेणें पाहावा वासिष्ठ ग्रंथ ॥
निजात्मज्ञान होये प्राप्त । पद अच्युत तो भोगी ॥ ३६१ ॥

(१३) प्रतीचा लेखनशकः—

प्रति लेखन ग्रंथ शके १६१९ ईश्वर नाम संवत्छरे दक्षणायेने आश्विन वदि सप्तमि भानुवासरे भागानगरस्थळिं लेखन समाप्ति ॥

असें या ग्रन्थाचें थोडक्यांत स्वरूप आहे. लहान मोठे हजारों संस्कृत ग्रन्थ ह्रीं अज्ञात वासांत आहेत, त्यांत च हा हि एक ग्रन्थ आहे! त्या त्या ग्रन्थांचा उदय-काळ आला म्हणजे तो तो ग्रन्थ प्रगट होणार आहे. तोंपर्यंत हे सारे ग्रन्थ आपापल्या आराध्यदैवतीं लीन होऊन आहेत! श्रीसमर्थांचें च असें वचन आहे.

खुद्द ग्रन्थकाराविषयीं व त्यांचे मानससरोवरनिवासी गुरु शांतानंद याविषयीं, वर आली आहे त्याहून जास्त माहिती ग्रन्थांत नाहीं व इतरत्र हि मिळाली नाहीं.

ती मिळविली पाहिजे. काश्मीरस्थ पंडितांची संस्कृत टीका प्रसिद्ध असल्याचें ठाऊक नाहीं. ती प्रसिद्ध नसल्यास तिचा शोध केला पाहिजे. तसें च हें वाल्मीकनगर कोणते तें मला कळत नाहीं. वेरुळ कीं काय ? वेरुळ म्हणावें तर तें प्रत्यक्ष गोदातटीं नाहीं. हें वाल्मीकनगर कोणतें त्याची माहिती होणें अत्यन्त अगत्याचें आहे. मोगलाईंत ठिकठिकाणीं जो ग्रन्थसंग्रह मिळाला त्यांत बरेचसे ग्रन्थ या वाल्मीकनगरांत लिहिलेले आहेत.

कार्तिक व. ११
१८३५ } शंकर श्रीकृष्ण देव

## ४४ ब्रह्मीभूत देवराव हिंगणे

१०] १ पेशवाईंतील प्रसिद्ध साडे तीन शहाण्यांचीं नांवें चटकन् ध्यानांत यावीं ह्मणून एका चतुर पंडितानें 'सखा देवा विठ्ठला' असें सूत्र रचिल्याचें इतिहासज्ञांस विदित आहे च. वरील त्रिवर्गापैकीं मधील 'देवा' ऊर्फ देवराव हिंगणे ह्यांचें महत्व मराठ्यांच्या इतिहासांत अपूर्व आहे. मेणवली येथील नानांच्या दफ्तरांतील पत्रें रा. ब. द. ब. पारसनास यांनीं 'इतिहास-संग्रहां' तून प्रसिद्ध केलीं आहेत; त्यांवरून देवरावांच्या दिल्ली येथील राजकारगावर बराच उजेड पडतो. हिंगण्यांचा व होळकरांचे दिवाण चंद्रचूड यांचा विशेष घरोबा होता व या उभयतां मुत्सद्द्यांनीं रचिलेल्या डावपेचांचें यथातथ्य वर्णन चंद्रचूडांच्या अप्रकाशित व इतिहासदृष्टीनें अत्यंत महत्वाच्या संग्रहांत उत्कटत्वानें प्रतिबिंबित झालें आहे. माझी अपेक्षा आहे कीं, हा बहुमोल संग्रह प्रकाशित करण्याचें श्रेय आपल्या मंडळानें शक्य तितक्या लवकर
२०] घ्यावें. इतिहासजिज्ञासूंस चटका लावून सोडील, अशा किंमतीचा हा संग्रह ईशकृपेनें उपलब्ध झाला आहे. अस्तु.

२ देवराव हिंगणे व श्रीमंत पेशवे सरकार यांजमध्यें कांहीं कारणामुळें तेढ उत्पन्न होऊन, देवराव हिंगणे आपले स्नेही चंद्रचूड यांचेकडे निंबगांवीं येऊन राहिले व तेथें च 'संन्यस्त होऊन समाधिस्त जाले.' 'ब्रह्मीभूत देवराव महादेव 'यांचे समाधीचे पूजा नैवेद्य' वगैरेंस निंबगांव येथील वेदमूर्ति राजश्री धोंडभट बिन विठलभट उपनाम सुदामे यांस शके १७३३ चैत्र शु. १ स दिलेल्या सनदेवरून देवराव हिंगणे हे निंबगांवीं च समाधिस्थ झाले, असें निर्विवाद ठरतें. त्यांची ही समाधी निंब-

गांव येथें गंगोबा तात्या चंद्रचूड यांनीं बांधिलेल्या श्रीगणपतीचे देवालयासमोर च आहे. मूर्ति दशभुजांनीं युक्त असून ध्यान फारच मोहक आहे. देवराव हिंगण्यांचे जे कागद मुद्रणयंत्रांतून बाहेर पडले त्यांत त्यांच्या मृत्यूच्या प्रकारासंबंधानें कांहीं हकीकत दिली गेली नाहीं. रा. ब. पारसनीस यांनीं सुमार इ. स. १७८३ हा त्यांच्या मृत्यूचा काल धरलेला आहे; परंतु माझे मित्र श्रीमंत मुजुमदार यांनीं मला कृपाळुपणें दिलेल्या कागदावरून हा काल साफ चुकीचा ठरतो. देवराव हिंगण्यांचे वंशज चांदोरी येथें नांदत आहेत, त्यांचे संग्रहीं कांहीं महत्वाची ऐतिहासिक सामुग्री आहे. असो, हा कागद म्हटला म्हणजे निंबगांव येथील कुळकर्ण्याचे दफ्तरांत श्री० चंद्रचूड यांच्या निंबगांव येथील जोसपणाच्या.वृत्तीसंबंधानें शके १७२९ आषाढ महिन्याचे हिशेबासंबंधींचें मिळालेलें एक विश्वसनीय टांचण होय. ह्या टांचणांत देवराव महादेव हे संन्यास घेऊन समाधिस्थ झाल्याबद्दलचा स्पष्ट उल्लेख असून, शिवाय अकराव्या, बाराव्या व तेराव्या दिवशींच्या श्राद्धानिमित्त दक्षिणा व इतर सामान जमेकडे लिहिलेलें आहे. ज्या अर्थी देवरावांच्या पुण्यतिथीपासून अकरावा बारावा व तेरावा हे तीन दिवस अनुक्रमें शके १७२९ आषाढ शु० २।३।४ ह्या तिथींस पडत असल्याचें ह्या कागदांत दिलें आहे, त्या अर्थी शके १७२९ ज्येष्ठ वद्य सप्तमी, शनिवार, ता. २७ जून इ. स. १८०७ ही देवराव महादेवांची समाधितिथी निःसंशय ठरते.

## सनद*

**लेखांक १** श्रीरामचंद्र

वेदमूर्ती राजश्री धोंडभट बिन विठ्ठलभट उपनाम सुदामे गोत्र वासिष्ठ सूत्र आश्वलायन शाखा शाकल वास्तव्य मौजे निंबगांव तरफ खेड प्रांत जुंनर स्वामीचे शेवेशी

ॐ सेवक गोविंदराव पुर्षोत्तम व दामोदर देवराव हिंगणे साष्टांग नमस्कार विनंती उपरी सुरु सन अशर मया तेन व अलफ शके १७३२ प्रमोदी नाम सवत्सरे तुम्ही पुण्याचे मुकामी येऊन विनंती केली कीं आम्ही कुटुंब वत्सळ ब्राम्हण

---

* सदरहू सनद व नमणुकीची यादी असे दोन्ही कागद सुदामे यांचे विद्यमान वंशज वे. शा. सं. त्र्यंबकभट सुदामे, निंबगांव यांजकडून मिळाले.

आमचे योगक्षेमाची सोई नाहीं याजकरितां रुपा करून कुटुंबाचे स्वास्त्यानिमित्य योजमा करून देविली पाहिजे आम्ही स्नानसंध्या करून ब्रम्हीभूत देवराव महादेव संन्यस्त होऊन मौजे मारी समाधिस्त जाले त्यांचे समाधीची पूजा नैवेद्य करून आपले आभिष्टचिंतन करू त्याजवरून आम्ही मनास आणितां तीर्थरूप ब्रम्हीभूत त्याचे समाधीचे पूजा व नैवेद्य चालविला पाहिजे ऐसे तीर्थरूप मातुश्री राजसबाई याणी आज्ञा केली कीं भटजी थोर सतपात्र विद्वान स्नानसंध्या करून समाधीची पूजा नैवद्य करतील यास्तव आम्हास इनाम देह मौजे चांदोरी पो नासिक हा गाव पातशाई आलतमगाहा श्रीमंताचे सरकारातून पेशजीपासून आम्हांकडे चालत आहे येथील निवारसी गाव चालीची गतकुळी जिराईत अवल दुयंम तियंम तीन प्रतीची १०] रुपये १५० दीडशे याचे बिघे सुमार ६० आक्षरी साठ याची चतु:सीमा पूर्वक जळ तरु तृण काष्ठ पाषाण निधि निक्षेप आदीकरून खेरीज हाकदार तुंम्हास इनाम करून दिल्ही असे तरी तुंम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें त्या जमिनीचा अनुभव घेऊन श्रीस्वामीचे समाधीची पूजा नैवेद्याचे नेमणुकीची यादी आलाहिदा करून दिल्ही असे तरी आमचे आभिष्ट चिंतन करून सुखरूप आनुभव घेत जाणें आपले वंसीचा तुम्हास आक्षेप करणार नाही आक्षेप केल्यास श्रीमहालक्ष्मी व श्रीस्वामीचे चरणाची शपत असे रा छ ७ रविलावल बहुत काय लिहिणें

श्री
महाल
क्ष्मि चरनी त
त्पर देवराव
महादेव नि
रंतर

मोर्तब
सुद

लेखांक २

श्री

नकल

यादी नेमणूक श्रीब्रम्हीभूत देवराव माहादेव हिंगणे मौजे निंबगांव ता। खेड प्रांत जुंनर भीमातीर येथें संन्यस्त होऊन समाधिस्त जाले त्याचे समाधीची पूजा नैवेद्य जाला पाहिजे यास्तव मौजे चांदोरी पो नासीक हा गांव इनाम आह्माकडे पेसजी-पासून चालत आहे त्या पो रुा १५० दीडशे याची जमीन आलाहिदा सनद वो धोंडभट बिन विठलभट खुदामे मौजे मार यांस पूजा सांगून नेमणूक करार करून दिल्ही बिा

७५ वेतन सालीना [१०

३६ भोजनखर्च

१७ पूजासाहित्य

१ चंदन खोड

॥ बुका

। कापूस वातीस

१ खारका वजन ००४

१। सुपारी

॥ कापूर

।॥ उदबत्त्या

॥ वस्त्र खादीचें [२०

४ तेल दिव्यास

१ साकर

६ गुरुवार दरमाहा ॥ प्रो

१७

२२ पुण्यतीथ समंधी

१५०

सदरहू येकूण रुा दीडशें येणेप्रो करार

सुर सन आशर मया तैन व अलफ शके १७३२ प्रमोद नाम संवत्सरे माहे रवि-लावल शके चैत्र मास शु॥ १ मुकाम पुणे .

निंबगांव, मित्ती आश्विन वा॥ ११।३५ शनिवार. पां. न. पटवर्धन

# ४५ आनंदीबाई पेशवीण इचा पुराणिक

रत्नागिरी जिल्ह्यांत राजापुराजवळ विजयदुर्गाच्या रस्त्यावर अणसुरें नांवाचें एक गांव आहे. तेथें गिरीश्वर नामक देव व त्याचें देवालय डोंगरावर आहे. त्याचे पुजारी व पुराणिक गाडगीळ नांवाचे ब्राह्मण आहेत. ह्या गाडगिळांचा एक पूर्वज प्रख्यात आनंदीबाई पेशवीण—राघोबादादाची बायको—इचा पुराणिक होता.
१०] तत्संबंधीं एक पत्र पुढें देत आहे. ह्या गाडगिळांच्या घरांत बरेच पुरुष चांगले श्रौतादिशास्त्रज्ञ झाले. पेशव्यांच्या आश्रयानें त्यांनीं थोडीफार संपत्ति हि अणसुऱ्यास कमाविली व तेथील गिरीश्वराच्या देवळाचा व इतर देवळांचा जीर्णोद्धार केला. ह्यांच्याकडे देशोदेशींचें गरीब ब्राम्हण सहाय्याच्या इच्छेनें येत. पैकीं एका द्रविड ब्राम्हणाचें एक विनंतिपत्र पुढें देत आहे. ह्या घराण्याकडे विपन्न लोक व ब्राह्मण गहाणापाणाकरितां हि वारंवार येत. पैकीं बटीक गहाण ठेवण्याकरितां एका ब्राह्मणानें पाठविलेलें पत्र हि पुढें देत आहे. पुराणिकाचें नांव वासुदेवभट्ट गाडगीळ. अस्सलपत्रें सोबत जोडिलीं आहेत. हीं पत्रें अणसुऱ्यास पुराणिक गाडगिळांच्या येथें मिळालीं.

२०] लेखांक १

श्री

तीर्थस्वरूप अनंतभट्ट दादा वडिलांचे सेवेशी

अपत्यवद्वासुदेवाचे शिरसाष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता॥ मार्ग शुध प्रति-पदा मोकाम थेउर वडिलांचे आशीर्वादे सुखरूप असें विशेष वाईहुन वडिलांची आज्ञा घेऊन निघालो तो श्रीमंताजवळ यथापूर्व सुखरूप पावलो येतांच सो॥ श्रिमदानंदी

बाईकडे पुराण भागवत सांगो लागलों वडिलांचे आशीर्वादे येथापूर्वक पाउन+ + +
वडिलांचे चरणाचा प्रताप + + + + + + + + + + + + + + + +
+ + + + + + + + प्रयोजने आहेत तीं सर्व संपादून यावी—पैक्याची चिंता
न करावी वडिलाचे च आशीर्वादे पैका पुष्कल मिळेल स्वशरीरिं बहुत निघा करून
सुरक्षीत असावें चिरंजीव कृष्ण वाईस मुलें घेऊन आला ह्मणोन ऐकिले उत्तम आहे
दाणादुणा–भात–गवत घेऊन ठेवावे कागदपत्र पाठवावा विशेष वर्तमान श्रीमंता-
कडील कृष्णंभट्ट देवधर निवेदन करितील पुण्यास या मुकामाहून आल्यावर
धडवती लुगडी पाठवितों खर्चास हि शीघ्र च पाठवितों हे विज्ञापना

## लेखांक २

श्री [१०

॥ विहगपुंगवपुंगववाहनं
मकरकुंडलिकुंडलिकुंडलि
वपुरुमाधवमाध (व) यो श्रियं
दिशतु चंद्रकिचंद्रकिशोरकि

॥ श्रीमत्सकलगुणमाणिक्यमंडलमंडितानां ॥ निखिलसुरासुरानिककंन्यरत्नमुकुटतट-
रत्नप्रभापाथोनिधिरब्जानिभनखरंजितशिंजन्नूपुरकिंकिणीकंकणग्रैवेयकाद्याभरणभूषित –
नवाजापरिवृढ – काकोदर–ग्रैवेइकाब्ज – चूडामणि – महादेवपादपद्मभ्रमरीकृतानां ॥
बंधुजनसज्जन – विद्वज्जन – चकोरचक्रमधुपचंद्रमित्रसहस्रपत्राणां ॥ आव्हानना
न्मात्रसित्वानां प्रभूणां ॥ चित्रोपलदुर्गवाशिना वेंकटाचार्येणकृताःनतयः ॥ युष्मदीय-
कृपाचंद्रचंद्रिकालोलुपं द्विजं दृष्ट्वामामे यथासौख्यं तथा कुरु महामते ॥ युष्मदभ्युद- [२०
याकांक्षीमासं मासार्धमेव वा ॥ धर्मकालभया सोहं वसामि तव सन्निधौ ॥ महायात्रा-
निमित्तेन युष्मदीय पुरं प्रति आगतोहं गुणा श्रुत्वा वसामि तव पटणे ॥ नैवार्थकामुकः
सोहं प्रत्यहं तव दर्शनं ॥ तदेव शुभदं मन्ये परं यद्भाविनो भवेत् ॥

## लेखां ३

( कांहीं ओळी गहाळ )

साष्टांग नमस्कार विनंति विशेष + + वडापर्यंत जावयाची तर + + + रून
निघोन जावें दाहाचाळीस आणावे संवत्सराची वेगमी करावी आणि बंधुदर्शनार्थ

जावें हा हेतु धरूनि ( नि ) घोन जावे हा उद्योग योजिला तों प्रारब्धानुरूप पाय मोडला मास दोन मास पाय बरा होत नाहीं भक्षावयास पाहिजे पदरीं ति रुका नाहीं धान्य पांच कुडव आहे हें सरल्यावर उपाय नाहीं या करितां बाइकोला पाठविली आहे रुपये १०० एक शत दिल्हे पाहिजेत श्रावणसी व्याजसुधा रुपये देईन नाहीं पावले तरी मनी बटीक नगनगोटेंसुधा तुम्हास देईन विश्वास न ये तरि बटीक व साठि पाउणशें रुपयाचें नगनगोटें सुधा आजि घेऊन जावी श्रावण मासीं रुपये देईन आणि बटीक नेईन अथवा तुम्हास पाहिजे तरि रुपये घेईन आणि बटीक देईन परंतु आजि माझे कार्य केल्यास मज सुधा कुटुंब खरीद करुन पाळण पोषण केलें येवढें श्रय आपणास येईल याकरितां कृपा करून कार्य केलें पाहिजे रुपये तुम्हापशी नसतील तरि दुसरियाचे घेऊन द्यावे आणि माझे कर्य संपादून यशविभाग घेतला पाहिजे अगतिक गति जाणोन लिहिले आहे व्याज दर माह द ( र सेकडा तुम्ही म्हणा ) ल त्या प्रमाणें ( देईन )

त्रि. का. राजवाडे

## ४६ 'श्रीशक' १०३ मधील मराठी ताम्रपट

रा. विनायकराव भावे यांनीं मजकडे भिमथडी तालुक्यांतील सोमर्यांचें करंजे येथील रा. बाबूराव बळवंतराव मोकाशी गांडवलकर, यांजकडे निघालेलें एक दानपत्र लिहून पाठविलें तें आज आपणापुढें सादर करीत आहे.

हे एकंदर तीन पत्रे असून, मधला पत्रा दोहों बाजूंनीं लिहिलेला आहे. पत्रे प्रत्यक्षतेनें मज समोर नसल्यानें त्यांचीं लांबी, रुंदी, जाडी; अक्षरांचें वळण वगैरे संबंधी मला कांहीं एक लिहितां येत नाहीं, परंतु ज्या ठिकाणीं या तिन्ही पत्र्यांतून कडी ओविलेली दिसते त्यावरून हे पत्रे आडवे लिहिले असावेत असें अनुमान निघतें. पहिल्या पत्र्याचे आंतील बाजूवर, दुसऱ्याचे पहिल्या बाजूवर, १३।१३ ओळी असून, दुसऱ्याचे बाहेरील बाजूवर १२ आणि तिसऱ्याचे आंतील बाजूवर १४ अशा एकंदर बावन्न ओळी आहेत.

यक १, दोनी २, तीनी ३, चारी ४, असे शब्द व आंकडे प्रत्येक लिहिलेल्या त्या त्या बाजूवर कोरलेले आहेत. ते उजवे बाजूवर आहेत. चाऱ्ही लिहिलेल्या बाजूवर वरचे अंगास प्रथम ओळीचा आरंभ होण्याचे पूर्वी कांहींशा डावेबाजूकडे तलवारी व मध्यभागीं अर्धचंद्राकार बाण यांच्या आकृती कोरल्या आहेत.

१ ल्या पत्र्याच्या वरच्या अंगास प्रथम दोनरेघेचा 'अर्धचंद्र' कोरून त्याचे आंत 'चंद्रमा, अशीं अक्षरें आहेत व त्याचे खालीं

पत्र लीषीत काळभटु कामना
क थळ लोणी सीवाले वेचु
१००००० सोनटके

हा लेख आहे. तिसऱ्या पत्र्याचे बाहेरील अंगावर पूर्ण शून्याकार द्विल परिघाचा 'सूर्य' कोरून आंत 'सुरीयो' 'ह्रां' अक्षरें असून त्या खालीं

ॐकी बावन ५२

असें लिहिलें आहे.

कडीवर मुद्रा नाहीं. व कडीचीं तोंडें सांधलेलीं नाहींत.

या शासनांत श्री शक १०३ असें म्हटलें आहे. हा शातवाहन शक नाहीं हें तर उघड आहे. तेव्हां हा शक कोणता असावा असा प्रश्न सहज च उत्पन्न होतो. [१० अंतर्गत पुराव्यावरून याचा निश्चय करतां येण्यासारखा आहे. त्याचा थोडासा प्रयत्न करतों.

यांत जीं मऱ्हाटकुळींचीं नांवें आलीं आहेत तीं अशीं:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ शीरसठ | २ जाधव | ३ चौव्हाण | ४ यादव, |
| ५ सूर्यवंशी | ६ रीठाडु | ७ पवार | ८ माना |
| ९ पोळ | १० सुलोकी | | |

यापैकीं शीरसठ हे शिरके, रीठाडु हे राठोड व सुलोकी हे सोळुंके असावेत. शीरसठ यांस शिरके म्हणण्याचें कारण मीं पुढें देत आहे.


जाधव व यादव हे एक म्हणून आज पावेतों समजूत होती, परंतु या शासनपत्रावरून या दोन भिन्न कुळी दिसतात. [२०

आतां पवार किंवा परमार, राठोड हीं नांवें जरी पुरातन कालीं हि आपणांस आढळतात तरी ' जाधव ' हें नांव ११ वे शतकाचे पूर्वी मला कोठें उपलब्ध झालेलें नाहीं. तें ज्या अर्थी या शासनपत्रांत दिसतें त्या अर्थी हें ११ वे शतकांतील अगर त्या नंतरचें असलें पाहिजे.

याहून आणखी एक अन्य प्रमाण आहे तें

यांत राजांचीं जीं नांवें दिलीं आहेत व त्यांचीं जीं नातीं आहेत तीं अशीं:—

२५




यांतील ' जैतपाळ ' ' भिल्लम ' हीं नांवें आपल्या ओळखीचीं आहेत. वैनगंगेचे तीरीं । अंबा नाम नगरीं ।। या आंब्याचा 'जैतपाळ' घेतला काय किंवा जोगाईच्या अंब्यावर हुकमत चालविणारा ' जैतपाळ ' घेतला काय ज्यांत याचें नांव आलें आहे तें शासन पत्र १२ वे शतकानंतरचें च असलें पाहिजे. जैतपाळा नंतरचा ४था पुरुष 'बळियेपा' याचा उल्लेख यांत असल्यानें १३ वे शतकानंतरचें हें शासन असावें.

तथांत 'बळियापा' चा यांत जो उल्लेख आलेला आहे तो भूतकाळच्या माणसा-संबंधी जसा करावा तसा तो केलेला आहे. इतकें च नाहीं तर पुढें स्पष्ट केल्याप्रमाणें

ह्या बळियापा 'बराच' या वेळीं पुरातन झाला होता असें उघड दिसतें. तेव्हां बळियापा नंतर हि शतक दोन शतकांनीं हें शासन लिहिलें असावें, असें वाटतें.

पण याहून हि एक अत्यन्त महत्वाचा पुरावा आहे तो असा:—

जाहाली, तिन्हें, तेण्हें, तिनें, तेणें, सांगीजे, 'व' अर्थी वा. हीं रूपें श्रीज्ञानेश्वरोत्तरीन कालचीं आहेत. परंतु

पुजारा, गोरउ, पाषाळणें

हीं रूपें १६ वे शतकांतील खास नाहींत. याहून आणखी महत्वाचे शब्द यांत आलेले आहेत ते

'मुसारा' 'नफरां'

हे होत. हे अर्थात 'मराठी' नाहींत ते फारशी आहेत व ते या शासनांत [२० येण्यास त्याचा काल शक १२१२ चे नंतरचा असला पाहिजे हें उघड आहे.

तेव्हां १६ वे शतकापूर्वी व १३ वे शतकानंतर केव्हां तरी या शासनाचा काळ असला पाहिजे हें उघड आहे. तो आपण ठरविण्याचा प्रयत्न करूं.

दुर्मति संवत्सरः—

१२४३।४४, १३०३।०४, १३६३।६४, १४२३।२४ व १४८३।८४

या शकांत येतो. या पैकीं चैत्रशुद्ध पंचमीस ज्या शकीं सोमवार असेल तो शक खरा धरला पाहिजे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शक | १२४३।१२४४ | मध्यें | चैत्रशुा ५ लां | —रविवार येतो. |
| शक | १३०३।०४ | मध्यें | ,, | —मंगळवार ,, |
| शक | १३६३।६४ | मध्यें | ,, | —बुधवार ,, |
| शक | १४२३।२४ | मध्यें | ,, | —शुक्रवार ,, |

[२०

आणि

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शक | १४८३।८४ | मध्यें | ,, | —सोमवार येतो. |

या दृष्टीनें या शासनांत दिलेला शक शातवाहन शकाच्या दृष्टीनें १४८३।८४ हा येतां, तेव्हां 'श्रीशक' १०३ या शातवाहन शकांत येण्यास तो शक १३८०।८१ मध्यें सुरू झाला असला पाहिजे हें उघड आहे. तेव्हां १३८० शकांत कोणाचा शक सुरू झाला हें कळलें पाहिजे.

यांच्या स्वरूपावरून हें शासनपत्र नसून बहुधा हकीकतपत्र आहे असें दिसतें. हा १३८० मध्यें सुरू झालेला 'श्रीशक' एक तर शिलाहारांचा असावा अथवा शक १३७७ ग्रांट डफ म्हणतो त्या प्रमाणें मलिक-उल्-तुजार याच्या ७ हजार सैन्याची जी शिरक्यानें कतल केली त्यानंतर निर्भय झालेल्या शिरक्यांचा असावा. प्रस्तुतच्या हकीकत – नाम्यांत 'भिलम (कुन्हां)' महाभिलम अथवा त्यांच्या कुळांतील 'बळीयेप्पा' या तीन नांवा खेरीज अथवा 'बळीयेप्पाचा 'वीला' राधागी या खेरीज इतर नांवापुढें 'दरणा' हें उपपद लाविलें आहे. यांत जीं नांवें आलीं आहेत तीं सर्व बळियेप्पाच्या धोरणानें दिलीं आहेत. त्यांचा स्वतंत्र असा उल्लेख नाहीं, 'बळीयेपाचा' अथवा त्याच्याचा अमुक असा सोपस्कर उल्लेख असल्यानें मुख्य 'बळीयेप्पा व त्याचे अनुषंगानें इतर अशी भावना सहज होते व म्हणून 'दरणा' हें उपपद कमी दर्जा दर्शविणारें आहे असें वाटतें.

या वरून शिरके अथवा शिलाहार (शेलार) यांच्या शक १३८० मध्यें सुरू झालेल्या श्रीशकाच्या १०३।१०४ थे वर्षी चैत्राच्या शुक्ल ५ स हें पत्र कोरलें गेलें आहे.

आंतील भाषा सोपी असल्यानें तिच्या गोषवाऱ्याचें स्वतंत्रतेनें उद्घाटन करीत नाहीं. टीपा दिल्या च आहेत.

जीं बारा गांवें इनाम दिलीं आहेत तीं अशीं.

| | |
|---|---|
| गुरुवास सहा<br>व<br>इतर मिळून सहा | सकुर्रे, शंभुपुर, अंवरडोह, धवळें, पिंगळजा, मालीवण, कारवडें, सुखासन, थादाळें, कोथळें, जांभुळणी व पिंपरी. |

हीं गांवें 'पारंपार' परंपरेनें उपभोगावीं.


चंद्रमा



# पत्र लीपीत काळभटु कामना क थळ लोणी सीवाले वेचु १००००० सोनटके



 यक १


१ श्री सकु १०३ वरुषः दुर्मती[1] नाम छंवछरे[2]: चैत्र मासेः सुक्ल पक्षेः मो
२ मदीनेः पचमी तैं[3] दीनीः पुर्वे[4] पत्र लोहीलें: सभुवनदेॐ[5] त थांनी[6] बै
३ सलैं[7]: सीरसदु बलीयेपुः बीन गोपतीः वों[8] जाधव वैंसी[9] कुन्हा भील
४ मुः बीन माहा भीलमुः वों चौव्हाण रामाजीः बीन दसमदरैंणा[11]
५ वों यार्धव[12] वैसी लषमाजीः बीन गोपाळदरैंणा[11]: वों सुर वं[13]सीं सुरा [१०
६ जीःबीन घाटदरैंणा[11]: वों रीठोडु[14] गमलुः बीन जैतपाळदरैंणा[11]: वों
७ पवार धारमलुः बीन हबीरदरैंणा[11]: वों मानो[15] गोपाजीः बीन रा
८ जदरैंणा[11]: वों पोळु[16] पद्माजीः बीन हरीपाळदरणों[11] : वों पुजारें[17] वी
९ जभरडाः बीन सघर भरडा  [18] से समस्त गण भगत वैसलेः स
१० भुवनदेॐ साक्षे करानु प्रवें[19] आदी पाहिलिः सैंाटी[20] योगं[21] जाहाली

११ ह्या प्रवनांसिः कीर्तेयोगीं[22] कात प्रवर्तुः[19] त्रीतों[23] योगी[21] इंद्रकीळ प्रवर्तुः[19] द्वापा
१२ रीं लींगमै प्रवर्तुः[19] कैळीयां[24] अती कोथळे प्रवर्तुः[19] पर सीवोळे[25] नव्ह

---


१ दुर्मति. २ संवत्सरे. ३ ते. ४ पुर्वपत्र ( हकीकतनामा ). ५ शंभु वनदेव. ६ स्थानीं. ७ प्रतिष्ठा केली. ८ प्रत्येक नांवाची कुळी प्रथम दिली आहे. ९ व. १० वंशी. ११ देशमुख ! १२ यादव. १३ सूर्यवंशी. १४ राठोड. १५ माने. १६ पोळ. [२० १७ पुजारी. १८ येथें व पुढें प्रत्येक भोंकाचे ठिकाणीं अक्षरें गेलीं आहेत. 'ऐसें'. १९ पर्व (त). २० साठ. २१ युगें. २२ कृतयुगीं. २३ त्रेत. २४ संस्कृत 'कल्याम्' या धर्तीवर सप्तमी. २५ शिवालय.

( पत्रा २ पहिली बाजू )　　　　　　　　दोनी २




१ तें लींगच व्होतें[1]: उपरी सीषर वा षाबें टके वा उबरेश्वरु वा साकुरें ही
२ सीवालें बळीयेपें माधलीं[3] उपरी बळीयेपाची माताह्मा[4] भीलमाची
३ कन्या गोपाई तीने गोपेस्वरी  [5] वाले माधलं[3]: उपरी बळीयेपाची
४ राणी: दसमदरण्याची कन्या, [6]वती तीन्हे कामेस्वरीचें सीवाले
५ माधलें[3]: उपरी बळीयेपाचा वीलाँ[7] राधागो तेण्हें सभुपुरीचें सीवाले माधँ[3]
६ लें: हे सीरसाटांची अदी: उपरी कुंन्हा भिलमु: बीळीयेपाचा माउळा गो
७ पाईचा बदुं तेणें चींचणेस्वरीचें सीवाले माधलें[3]: उपरी भीलमाची माता
८ घाटदरण्याची कन्या रामाई तीनें रामेस्वरीचें सींवाले माधलें[3]: उपरी
१०]९ भीलमाची राणी रीठॅ[10]या जैतपाळाची कन्या माणकाई तीन्ह मोणगांवीं
१० चें सीवालें माधलें[3]: हे जाधवांची आदी: उपरी चव्हाण रामाजी ब
११ ळींयेपाचा मेहुणा पद्मावतीचा बदुं तेण्हें बेळेस्वरीचें सी
१२ वाले माधलें[3]: उदरी रामाजीची राणी पोळी[11] हरीपाळ दरण्या
१३ ची कन्या कमलाई तीन्हें कण्हेरेस्वरीचे सीवले माधलें:

(पत्रा २ रा दुसरी बाजू)　　　　　　　　तीनी ३

१ उपरी ह्या सीवाल्याच पुजारीं[12] गौरॅ[13] बीजभरडा तेणें पालवणीचें सी-
वाले मॅपेळें[14]:
२ ह्यां सीवाल्याचा कामकरी ऊॅडॅ[15] मुॅखे[16] तापीच पुतॉ[17] हबीरनॉकु[18] बीन
ब्रह्म ना
३ कु: त्या षाली ऊॅडॅ[15] येकु हजार त्यासी वज मुसारीं[19] दर मासा चहु
देखीली

---

२०] १ व्हते (ग्राम्य). होतें. २ सांग. ३ बांधलीं. ४ मातामही. मातामह याचें स्त्रीलिंगी मातामहा. ५ शिवालय. ६ पद्मावती. ७ पुत्र ८ मामा. येथें आजेमामा. ९ बंधु. १० राठोड ! ११ जसें माना, पुजारा, तसें पोळा=गोळ १२पुजारी. १३ गुरव.१४बांधलें. १५ ऊंट. १६ मुख्य. १७ 'तापीच पुता'. हें लिहिलेलें बरोबर असेल तर उंटाचा लमाण आईचे नांवावरून ओळखला जात असे, असें दिसतें; पण त्याचे बापाचें हि नांव पुढें दिलें च आहे 'गोतमीपुत्र' अशीं नांवें अनार्यांचीं पूर्वीं होतीं. १८ नाईक, नायक=मुख्य. याचे हाताखालीं एक हजार ऊंट होते. १९ मुशाहिरा.



४ आं दोघां नफरीं[2] सोनटकां[3] पाचसे *ॐडां बळियपाचें देणें: अडाचसें
*ॐ

५ डां भीलमाचें देणें: दोनीसें *ॐडां रामाजीचें देणें: पनासा *ॐडां वीज
६ भरड्याचे देणें: येसी चौदा वरुसीं सीवाले कळसा आंली: श्रीवेंस
९ क्ष्या येकु लक्षु: सोनटके देषीलें[6] चुना येकुसें बतीस सस्त्र[7] षंडी कात गुळ
८ तागु[9] तीनसेसाटी षांडी:[8] लोषठें[10] येकसे तेरा षडी: चीरे षाणी लोण पणु
९ दुरें वा फळठणें:[11] ह्या सीवाल्यास बारा गांउ ईनाम पुंजेसं वीज भर-
ड्यास सकु

१० रे संभुपुरु वा ॐवरडोहो वा धवळे रः वा पींगळजा वा पाली-
वण हेसा [१०

११ गाउ वीजंभरड्यान पुजेस षाईजे[12] त्रीकाळ पुजा कीजे पारेपा
१२ रुं[13] जाण वजि भगतापें[14] येगु सागीजे कारवडें ईनाम पारंपारें[15]:

( पत्रा ३ ) चारी ४

१ वालांघी[17] सभु बीन हीव जो सीवालें लोटींजे[16] नाहाणि पाषीळिजे[16] पुजेस
२ उदक आणीजे देवाची पालषी वाहिजे सुकासन ईनानें[17] षाईजे पारेपा
[‡ईनाम षाईजे पा

३ रः वा सो र टे गो ना भा ना पाउ वाची जा कीजे[18] थादाळें‡
४ रंपारः व घडेंसी बेलो बीन बन्हा ाट उवांचें वा धावेंणें[19]
कीजे कोथळें ई-

---

* ऊंट १ दरमहा चांददर्शनीं (शुद्धद्वितीया). अस्सल मुसलमानी. २ [२० हा शब्द फारशींत उंटाच्या टोळीस लावण्याचा प्रघात आहे. जसें 'उंट नफर नउ'= उंटांच्या नऊ टोळ्या. ३ सोन्याचें नाणें. ४ पूर्ण झालीं. ५ द्रव्यसंख्या. ६ सह, समावेश करून, 'सेरीज,' याच्या उलट. ७ सहस्त्र. ८ खंडी. ९ ताग. १० मानी गोळे ? ११ चिरे, पाणी, लोण, पणदुरे व फळठण. १२ पूजेस खाईजे—पूजेस्तव खाईजे. १३ परंपरेनें. १४ भागतापे—भगतांना ! १५ ? १६ झाडावें. स्वच्छ करावीं. १७ इनाम. १८ पायवाट कीजे. 'पाउवाची जागा कीजे'. १९ वाजंत्री, गुरवाहून भिन्न जात. २० ?

५ नाम षाईजे पारेंपारः दोंगट भारा गोरा भगतां माळा देईजे बाण कुचा
६ वाहीजे जाभुळणी इनाम षाईजे पारेंपारः वा लोणारे भारमलु बीन बाबना
७ क सीवालयास चुना नवे सारीजे पीपरी ईनाम षाईजे पारेंपारः
८ येसे बारा गाऊंः पहीली गुडी परडी माळ पुर्व दारवठा सीरसाट वा
९ सुलोकी दोही वगाचा मानुः दुसरी परडी गुडी पछीम मुंगतुद्वार याधव
१० माने वा रीठे मानु जाणीजेः तीसरी परडी गुडी उत्रदारवठां जाधवां वा
११ पवार मानु जाणीजेः चौथी परडी गुडी दषीण दारवठा चव्हाण वा सु
१२ रेवसी मानु जाणीजेः पाचवी परडी नदीची पोळांचा मानु जाणीजेः
१०]१२ येसें प्रुवपत्र लीहिलें सभुवनदेॐ साक्षे करुनुः हें जो चालवील त्यैस तीहीं लो
१४ कीचा धर्मु जोडेलः हो जो न मनी आसैते करी त्याचण प्रवर्जांसी गडधो०

( पत्रा ३ वरची बाजू बाहेरील )

सुरीयो

ॐळी बावन ५२

गो. का. चांदोरकर

## ४७ बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा उल्लेख करणारीं दोन पत्रें

२०] १ चिपळूण येथील कुलकर्णी वासिष्ठगोत्री वसिष्ठ या आडनांवाचे आहेत. त्यांच्या येथील कसरीनें व वाळवीनें भुगा होत असलेल्या कागदांच्या गळाठ्यांत खालील दोन कागद सांपडले. एक सचा तिसैन अलफ सालचा म्हणजे शक १६१८ चा राजाराम छत्रपतींच्या राजवटींतील आहे; व दुसरा दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींतील आहे. पहिला महजर आहे. त्यांत बाळाजी विश्वनाथाचा दोनदां उल्लेख आलेला आहे. एकदां हजर मजालसींतील देशकांच्या म्हणजे देशमुखांच्या यादींत

१ नवा. २ वर्गाचा, दर्जाचा. ३ मुकद्वार. ४ उत्तर. ५ त्यास. ६ धर्मु. ७ असत्य. ८ पूर्वजासी. ९ शापोक्ति.

आलेला आहे व दुसरा महजराच्या शेवटीं शेवटीं आलेला आहे. पहिला उल्लेख असाः—

राजश्री बाळाजी विश्वनाथ देशमुख मामले दंडाराजपुरी व अधिकारी श्रीवर्धन

ह्यावरून उघड च आहे कीं शक १६१८ त बाळाजी विश्वनाथ दंडाराजपुरीचा देशमुख होता व श्रीवर्धनचा अधिकारी होता.

दुसरा उल्लेख असाः—

छ १३ माहे शौवलीं रविवारीं नर्जीक जुमा मसीद कसबेमजकूर येथें (म्हणजे दाभोळ येथें) राजश्री माहादजीपंत सुभेदार व राजश्री बाळाजी विश्वनाथ सभासद इ. इ. इ.

ह्या उल्लेखांत बाळाजी विश्वनाथाची सभासदांत गणना केली आहे.

ह्या दोन उल्लेखावरून एवढें स्पष्ट होतें कीं शक १६१८ त बाळाजी विश्वनाथ दंडाराजपुरीचा देशमुख श्रीवर्धनचा अधकारी व दाभोळचा सभासद होता. देशमुखाचा हुद्दा सर्व प्रसिद्ध आहे. अधिकारी हा हुद्दा गांवचा आहे. गांवचा जो मुख्य कामगार तो अधकारी. अधकारी हा शद्ब परभू, ब्राह्मण, वगैरेंचें धंद्यावरून किंवा वतनावरून आडनांव झालेला आढळतो. सभासद म्हणजे किल्ल्यावरील किंवा सुभ्याच्या ठाण्यावरील कौन्सिलदार. सभासद ही राजमान्य पदवी असे. त्याचें काम कोणत्या हि मुलकी लष्करी किंवा निवाड्याच्या कामीं किल्लेदाराला किंवा सुभेदाराला सल्ला देण्याचा असे. कौन्सिलच्या मदतीनें मराठेशाहींत कारभार पहाण्याची पद्धति असे व ही पद्धति पुरातन काळापासून भारतवर्षांत रूढ असलेली च मराठेशाहींत आलेली आहे.

२ बाळाजी विश्वनाथ घाटावर कधीं गेला हा प्रश्न अद्याप सुटलेला नाहीं. शक १६१८ च्या आधीं तो घाटावर गेला असावा व कांहीं कामांकरितां शक १६१८ त कोंकणांत आला असावा. त्या च वेळीं हा महजर व निवाडा होण्याची गांठ पडली, व ह्या महजरांत त्याच्या नांवाचा उल्लेख झाला.

३ दुसऱ्या कागदांत बाळाजी विश्वनाथाचा येणेंप्रमाणें उल्लेख केलेला आहेः—

बाळाजीपंत नाना देशमुख शामळाचे दंग्यामुळें वरघाटी (म्हणजे चिपळूणास) आले ते समयीं आम्हीं (म्हणजे चिपळूण येथील गांव कऱ्यांनीं) (त्यांस) जागा नेमून दिल्हीं

२६

ह्यावरून एवढें खरें दिसतें कीं शामळाच्या दंग्यामुळें म्हणजे त्रासामुळें दंडाराजपुरी व श्रीवर्धन सोडून बाळाजी विश्वनाथ चिपळूणास येऊन घर करून व बांधून राहिला. चिपळूणास बाळाजी कधीं आला तें नक्की ठरविण्यास सध्यां मजजवळ साधन नाहीं.

## लेखांक १

माहाजर ब तारीख छ ५ माहे जिलकाद अज मोकाम कसबे चिपुलण मामले हमजाबाद अमल बद्र मैमुन मुस्तफाबाद सुहुर सन सबा तिसैन अलफ बिहुजूर हाजीर मजालसी

वेदमूर्ति कसबे मजकूर

अवधूतभट धर्माधिकरणी

सिवराम भट धर्माधिकरणी

हर जोसी गोविंद जोसी

अनंत भट मंत्रभट

विश्वनाथभट पटवर्धन

राजश्री बाळाजी विश्वनाथ देशमुख मामले दंडाराजपुरी व अधिकारी स्रीवर्धन

राजश्री उधाजी भागवत

सताजी भागवत

देवजी भागवत

जोत्याजी चवाण

जैतोजी रणनवरे

राणोजी वागचवरे

पाटील मौजे आलगाव ता तरवडे

मलजी गावडे गौड बस्ती राजोली ता फलटण

बवाजी होनमणे वास्ति तराडगा ता फलटण

सखोजी गाजरे पाटील

राजश्री गणेश माहादेव हवालदार ता मजकूर

रामाजी पंताजी मजमदार ता मजकूर

### देसक मामले मजकूर

रंगोबा नाइक सरदेसाई

खंडो अबाजी जानीब

खंडो बलाल देसमुख

नारो रघुनाथ मोकादम दिा सावरकर

### देसक कर्याती चिपुलण

महमदजी देसाई

श्रावणसेट सेटिया

तुकसेट माहाजन

हरी कृष्ण आा कदीम देशकुलकर्णी काले

राघो विस्वनाथ जानीब त्र्यंबक राद्गुजी

मौजे मणुर बुा ता वाई
कासोजी गाजरे पाटील
मौजे पारनेर पा हुजर
सुभानजी रणनवरे पाटील
मौजे रांक पा सासवड
संताजी सिंदे
शामजी कायदेव वावरे
पाटील कसबे कुडाल
विष्णु अबाजी

## मोकासाई

| | |
|---|---|
| अंताजीराव पेडायकर | संभाजीराव पेडायकर |
| तानाजीराव वाडकर | येसाजीराव वाडकर |
| गंगाजीराव तिवरेकर | धारोजी राव तिवरेकर |
| राधाजीराव व रामाजीराव अडिरेकर | सूर्याजीराव नादिवसेकर |
| भानोजीराव ठेरुकर | सूर्याजीराव बोवलीकर |
| तानाजीराव रुद्राजीराव कादवाडकर | |

कृष्णाजी व रामजी इगवला
वस्ती मौजे दलवठणे

गोविंद रघुनाथ निघावन
कसबे मजकूर
अंता परशराम व निळो
नरसीह पतकी जकात
मजकूर
गंगाधर-हरि

## उदमी कसबे मजकूर

| | |
|---|---|
| तिमाजी नाइक देउसकर | त्रिंबक नाइक चिटले पोतदार मीठचंद्र मजकूर [१० |
| नारोबा नाइक वालदेव | नारोबा खोडगडां माहाजन |
| गणो अबाजी | परशराम मोहिता |

## वकाल कसबे मजकूर

| | |
|---|---|
| लखसेट चौधरी | गोदसेट वाडकर |
| बालसेट पोतदार | जैतसेट माहाकाल |

## ता जमाती

हसजी वणगा अलजी देसाई
हसाजीराव व बाबाजीराउ पाळांडे ता कासार [२०
भीकसेट

## ता सोनार

कृष्णसेट सेटिया

## ताफे गोली

संभु म्हेतर हर गोली ठसाल

## ताफे साली

संभु तावेिया विठोजी कावली
तुकसेट बैलकरी कसबा

## ताफे साठिये

आबाजी म्हेतर इसुफजी म्हेतर [३०

ठाणगे ता। मजकूर

मुडकोजी पड- माहादजी कडु

वेल

डांगिये जकात चौधरे मजकूर

कानोजी डांगी येलोजी डांगी

भिका तेली कसबे मजकूर

कानसेट म्हेतर सिंपी

निला व धारा परीट

हजाम म्हेतर

तेज माहाला व राम माहाला

जोग सालवी व बाजे कुंभार

पिला वावरी

पिलभा गुरव भैरवकर

लखमोजी गुरव केदारकर

सया माहार कसबे मजकूर

जाहाला माहाजर ऐसा जे बाकोजी धाटोरा व मानाजी धाटोरा वस्ती मौजे दलवठणें ता। मजकूर हाली वस्ती मौजे सिंदी ता। मलवडी अग्रवादी बादजी बिन तुकोजी सावलकर व बाजी सावलकर वस्ती अधली ता। मलवडी पस्चमवादी या उभयतामध्यें पेठ धणगराची ता। मजकूर येथे त्याचे वडीलपणाचे गाउडिकीचा वेव्हार लागला म्हणून भांडत ता। मजकुरास आले गोतांमध्ये मनसुबीस उभे न राहातां बाकोजी धाटोरा व मानाजी धाटोरा हे दोघेजण राजश्री गणेश माहादेव हवालदार ता। मजकूर याजवल येउन उभे राहिले त्याही गोत मेलउन हरदु जणाच्या तकरीरा लिहोन घेतल्या छ २० माहे रजब

बाकोजी धाटोरा व मानाजी धाटोरा अग्रवादी याणी तकरीर केली की ता। मजकूरचे पेठेचे गावडेपण पुरातन आपलें चालत आले ऐसियासी माहाराज राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामीचे नवी

बादजी सावलकर व बाजी सावलकर पस्चमवादी याणी तकरीर केली की पेठ मजकूरचे वडीलपण आपले पिढी दर पिढी चालत आले आहे पिढ्या

१ राघोजी

१ गोसाजी

काबिजात जाहाली ते सम-
ई केशवसेट सेटे ता। मज-
कुर गाव टाकून कन्हाड प्रांते
गेले ते समई आपला बाप प-
दाजी घाटोरा सेटिये बाहीर
पडिले म्हणून घाटावरी गेला
तेथे पदाजी घाटोरा मरोन गेला
आपण लाहान होतों कोंकणात
यावया फावले नाहीं वरकड
धणगर पेंठेस येत च होते त्या-
मध्यें तुकोजी सावलकर वडी-
लपणाचे पान घेउ लागला हे
वर्तमान आपणास कळले त्यास
आपण हि पोख्ता जाहालो म-
ग आपण हिंदुलवठगे यासी
आलो तुकोजी सावलकर याची
पेठ आली फरोख्त जाहालिया-
वरी घाटावरी जातां दलवठणें
येथे भेटला तेथे हटकिले की
आपले वडीलपणाचे पांन कां
घेतोस ऐसे बोलिलो त्यास
वाद सांगो लागला मग माण-
कोजी जमादार याजवल उभा
राहोन तुकोजीस आणविलें त्या-
णे हरदु जणाचा कथला आइकोन
त्यांणे सांगितले की तुकोजीस
पान घ्यावया निसबत नाही
आम्ही घाटोरियानी वडील-
कीचे पान घ्यावे ऐसे केले
याउपरी बादजी सावलकर याणे
आपल्या पिढिया सांगितल्या
त्या लटिकया याचा आजा

१ सिरसोजी
१ बादजी
१ तुकोजी
१ बली बादजी
६
येणेप्रमाणे आपले वडीलपण
पिढी दर पिढी चालत आलें
आहे मध्ये बाकोजी घा-
टोरियाने आपला बाप तु-
कोजी यासवे दुलवठणियात
कथला करून माणकोजी
जामदार मौजे मजकुरी
होता त्याजवल आपल्या
बापास नेऊन बोलिला की
घाटोरे दुलवठणियात रा-
हातात आणि तुम्ही येऊन
यासी न भेटता जाता येता
वडीलकीचे पान घेता म्हणू-
न हटकिले त्यावरी हरदु ज-
णाचा वाद जाहाला पेठ को-
ण तागायत चालते आणि दु-
लवठणियात वस्ती कधी हे
जातीची बोलणे जाहाले त्याव-
रून त्याणे घाटोरीयास ल-
टिके केले आपल्या बापास
सांगितले की तुम्ही जैसी
पेठ घेऊन येता तैसे येत
जात जाणें त्यावरी आपणास
कोणी अटक केंले नाही अ-
गर दुसरा कोणी पेठेस आला
नाही पहिल्यापासून चालत
आले आहे तैसे चालवीत
आहो सांप्रति हालि बाको

बादजी सावलकर वरकड
धनगर येतात ते जातीने ये-
उ लागले त्यामागे सावलक-
रांचे कोणी येत नहुते सांप्रति
वडीलपणाचे पान घेतो तक-
रीर सही

जी व मानाजी धाटोरा कथ-
लियास उभा राहिला घाटावरी
दोन तीन स्थली मनसुबी मां-
डिली परंतु जाहाली नाही उभे
राहिलो परंतु घाटोरा समजेना
झाली येथे आला आहे हे त-
करीर सही

येणेप्रमाणे तकरीरा लिहोन दिल्या त्याउपरी गोताने हरदु जणासी पुसिले की घाटावरून दोन तीन स्थलीहून मनसुबीस उभे राहोन फिरत आलेत याउपरी हे स्थलीची मनसुबी मनात असेल तरी मान्यपत्रें लिहोन देणे त्या उपरी हरदूजण स्थलास मान्य होऊन राजीनामे लिहोन दिले की चिपुळणचे स्थली मनसुबी निवडील त्याप्रमाणे राजी जो नाइके कथला करील तो गोताचा वादी व दिवाणचा अन्यायी म्हणून हरदूजणानी राजीनामे लिहोन दिले दुसरे दिवसी मनसूबीस गोत मिळाले मनसूबीस हरदूजण उभे राहिले मनसूबीमुळें वृद्ध वृद्ध साक्ष मनासी आणिले.

तुकसेट कऱ्हाडकर बैलकरी
कसबेमजकुर उमर वर्से
७०।७५ बोलिला की
बकोजी घाटोरा व मानाजी
याचा बाप पदाजी यास
सेटीने वडीलकीचे पान
दिले परंतु भोगवटा का
राहिला हे कळत नाही म्हणून
बोलिला
याकुबजी जमाती व कानोजी
डांगीया उमर वर्से ६०।६५
बोलिले की सावळकर पेठ
घेऊन येतात पान सावळकरास
दिवाण देतें म्हणून हरदूजण बोलिले

जोसी उपाध्ये ब्राह्मण वतनदार
यासी पुसिले त्यास ते बोलिले
की हा दिवाणगीचा विचार आप
णास न कळे परंतु बाला घाटीं
धनगर येतात त्याही आपल्या
वडिलास धर्मादायपत्र दिले
होते ते मनास आणून सांगो
त्यावरून पत्रें आणिली तेथें
मकसूदपत्र वेदमूर्ति नरजोसी
बिन रघुनाथजोसी सुा इहिदे
अर्बैन अलफ तेथें सीरतोजी
व भानजी व रायोजी व काळो-
जी समस्त धनगर सेकीन
अधली व सींदी व बाजे मुकाम
आइंदे पेठ मजकूर लिहोन दिले
की भटगोसावी प्रतिवर्षी चिन्हाडास

अंताजीराव सरमोकासाई
मौजे पेढांचें व रायाजी-
राव मोकासाई अडीरेकर
व बाजे मोकासाई बोलिले
की घाटोरे ठावके नाही
सावळकर पेठ घेऊन
येतात आम्हास ठावके
आहे

एऊन तीथ वार नक्षत्र सांगतींत
म्हणून कांचलियाच्या नगास ८३
रुके बक्‌ धर्मादाय करून दिला
त्या पत्रावरी निशानी

| | |
|---|---|
| सिरसोजी | राघोजी |
| भानजी | काळोजी |
| कचाजी | मालजी |
| बाधजी | संभाजी |
| नावजमिगर | संडोजी |
| माल गावडा | तुकोजी |
| संडोजी इळा | रत्नोजी |
| बादजी पितळा | म्हाकोजी |
| विठ गावडा | कुमाजी |
| दळवठणेकर | मालजी मगर |

येणेप्रमाणे गोही जाहाल्या त्यावरून सभासद गोत याही विचार केला की बाकोजी घाटोरा याणे तकरीर केली जे बादजी सावळकरापासून सावळकर कोकणांत दाही धणगर येतात ते जातीने येतात ऐसीयास सावळकराच्या वडिलीं कसबे मजकूरचे जोसीयास धर्मादायपत्र करून दिल्हे आहे तेथें नाव सिरसोजी आहे ऐसीयासी पत्र जे करून दिल्हे ते वडील रणा बेवळ देवत नाही त्यावरून बाकोजी घाटोरा याची तकरीर लटकी जाहाली सावळकराचा भोगवटा चालत आहे व गोही आहेत यावरून सावळकर खरा दिसतो घाटोर याचा भोगवटा नाही एक तुकसेट बैलकरी म्हणतो की केशवसेट सेटेया वडीलकीचे पान घाटोरेयास दिले ऐसीयासी दळवठणेयामध्ये धणगर नांदत होते त्यांची गाउडकी दिली की कसबियाचे पेठेचें दिलें हा सिधांत तुकसेटीस न कळे जर कसबेयाचे पेठेची गाउडकी वडीलपण दिले असतें तरी काही दिवस भोगवटा चालता तो हि नाही याउपरी माणकोजी जामदार म्हणजे लस्करचा याजवळ घाटोरा उभा राहिला तर कोशाचे अंतरें माहाल असोन जामदाराजवळ उभे राहावें हा हिसाब नव्हे व देसक सेटे माहाजन माहाली होते तरी पेठेस एऊन कोणास हि भेटला नाही वर्तमान हि दखल केले नाही उपरी घाटोरा दळवठणेयामध्यें नांदत होता परंतु कसबेमजकूरचे पेठेचा भोगवटा नाही यावरून घाटोरा बातील ऐसे दिसोन येते त्याउपरी घाटोरा बोलिला की आपणास गोही साक्षपत्र भोगवटा नाही म्हणता तरी आपण दिव्य काढीन पांढर हात देईल तरी पेठेची गाउडकी करीन खोटा जाहालो

तरी आपण वतनाबाहीर होईन ऐसे बोलोन गैरहाजीर जाहाला त्या उपरी काहींका दिवसी राजश्री माहादाजी बलाल सभासद नामजाद सुभा दाभोळ याजवळ घाटोरा उभा राहिला त्यावरून मागती सुभाहून देशक व महस्त व लस्करी लोक पाटील मिरासदार ऐसे समस्त गोत मेळऊन श्री देवस्थानजीक मनसूचीस बैसले हरदूजणाच्या तकरीरा मनास आणून गोही मोझे पाहोन मागती सदर्हू मनसूची प्रमाणे निवाडा जाहाला व माणकोजी जामदार याणे मनसबी केली ते वेळेचा गोही एमाजी सींदा मौजे दळवटणेंयामध्यें आहे म्हणून बोलिला त्यावरून तो आणून मोझा मनास आणिला त्याणे तकरीर केली की हरदू धणगर त्या जवळ उभ राहिले भांडत होते परंतु माणकोजी जामदार याणे एक खरा व खोटा केला नाही म्हणून तकरीर केली त्याउपरी सभासद याही घाटोरियास सांगितले जे तूं वतनास लाभत नाही त्यावरी घाटोरा बोलिला की आपण रवा काढीन यामुळें निवडेल त्याप्रमाणे वर्तणूक करीन हे वर्तमान राजश्री सुभेदारी गोतमुखे चित्तास आणून विचार केला की हरदूजणाजवळ पत्र नाही अगर गोही सुधा नाही घाटोरा न समजे रवा काढीन म्हणतो ऐसीयास रवा दिल्यावेगळे समजत नाही त्यावरून घाटोरे याही रवा काढावा बादजी सावळकर याणे सावली करावी ऐसा तह करून छ १३ माहे शौवली रविवारी नजीक जुमामसीद कसबे मजकूर एथे राजश्री माहादाजीपंत सुभेदार व राजश्री बालाजी विश्वनाथ सभासद व राजश्री गणेश माहादेऊ हवालदार व कारकून ता। मजकूर व लोक हुजरात व लस्करी पाटील व देसक महस्त गोत बैसोन घाटोरेयास रवा दिल्हा बाकोजी घाटोरा याणे रवा काढिला बादजी सावळकर याणे सावली केली बाकोजी घाटोरा रव्यास लागला आणि खोटा जाहाला म्हणून त्यापासून गुन्हेगारी व बादजी सावळकर हे खरे जाहाले म्हणून यापासून हरकी एकून हरदूजण वादियापासून गुन्हेगारी व हरकी दिवाणांत घेऊन सुभेमजकुरी कमावीस केली सदर्हूचे कौल दिवाणचे अलाहिदे असेत बादजी बिन तुकोजी सावळकर व बाजी बिन खंडोजी सावळकर यांचे वतन याचे हवाला केले पुत्रपौत्री ता। मजकूरचे पेठेची गाउडकी वडीलाराग चालवावे जाहाला महजर सही

## लेखांक २

श्री.

सेवेसी वतंदार कसबे चिपळूण ता। मजकूर तालुके अंजणवेल क्षेत्र श्रीपरशुराम कृतानेक विज्ञापना ऐसी जे श्रीमंत कैलासवासी बाळाजीपंत नाना देशमुख मामले दंडाराजपुरी हे कसबेमजकुरी आले ते समई आम्ही जागा नेमून दिल्ही तेथे घर बाधोन राहिले शामळाचे दंग्यामुळे वरघाटी आले ती जागा सालगुदस्ता माहा-

राजानी पाहून वाडा बाधांवयाचा विचार केला परंतु जागा लहान याजकरितां त्या जाग्यां लगत बखल जागा आहे ती सुध्धा मिरास करून दिल्ही यास वाडा बांधोन उपभोग करांवयासी एईल म्हणोन आज्ञा जाहाली त्याजवरून राजश्री ज्यनार्दनपंत देशपांडये शिवापूरकर याणी वतंदारांस बोलाऊन चौकसी करून पत्राचे मसूद्याची याद समस्त वतंदाराचे नावे ठरोन कुलकर्णीयाचे हातची लेहून घेतली त्याप्रमाणे जाग्याचे पत्रं व्हावे ती याद एकीकडे ठेऊन चौघा वतनदारांचा के (लो ! ) प करून एकटा बंदरचा सेट्या आपले नावचें पत्र आपल्या हातून लिहून गैरमाहितांच्या व दहशतीनें व भिडेने साक्षी घालून पत्र करून देतो त्यास कसबे मजकूरची व्यवस्था तरी खोती सर्व अधिकार श्रीकालंबहिरवदेव याचे खुमाखुमाचे कारभारी सरकारची उगवणी करितात अंगारकाचे कारकीर्दीत जमाती खुमाचा कारभारी [१० सणग्या याणे सरखेल यास नजर देऊन खोतीचे वतनपत्र करून घेऊन वहीवाट करू लागला स्वराज्य होतां च सरकारांत आम्ही सर्वांनी विनंति करून सणग्यापासून खोतीचे पत्र माघारे घेतले व हाली सेट्यापा याणे सरसुभा गैरवाका समजाऊन कारभाराचे पत्रं करून घेतले हे आम्हांस समजल्यावर उलट–पत्र घेतले असे असोन शेट्यांपा सर्वां वतंदारांचा उपमर्द करून आपल्यें नावाचे आपल्ये हातून पत्र लेहून देतो याचां अंगीकार वेदमूर्ति राजश्री धोडभट तात्या भागवत सेट्याचे साधनविषई एकपक्षी मजकूर महाराजास समजावितात आमचा मजकूर साहेबाची गाठ पडोन निवेदन होत नाही त्यास महाराज कृपाळू होऊन सर्वां वतनदारांचे नावे पत्र घेऊन पुरातन जागांचा जीर्णोद्धार करावा ऐसा सर्वांचा मनोछाहे आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना [२०

## ४८ देवरूख येथील शके १५७५ मधील शिलालेख

१ हा शिलालेख रामाच्या देवळांतील रामापुढील मारुतीच्या देवळाच्या माथ्यावर आहे. लांबी ३१ इंच व रुंदी ६ इंच अक्षर बालबोध मराठी. 'विजयाभिधे' या पदाचा उच्चार 'विजय्याभिधे' असा वृत्तसुखार्थ करावयाचा आहे. शुचौ म्हणजे गुरौ. सान्नायान्वय ह्मणजे साने यांचा वंश. हे साने देवरुखास उपाध्ये आहेत.. कृष्ण सान्यानें गोपिनाथ नांवाच्या लिंगाची स्थापना मारुतीच्या देवळांत केली. शिवाय त्रिपुर वृंदावन, पवळ ह्मणजे प्राकार, पापडि ह्मणजे दगडी रस्ता, तटाक ह्मणजे तळें, अश्वत्थचत्वर ह्मणजे पिंपळाचा पार, या कृष्ण सान्यानें च बांधला. खर्च १०० सुवर्ण होन लागले असावे. शिलालेख १५८१ त कोरला. गांवाचें नांव ' दिवरखि ' असें

२७


शेवटीं लिहिलेलें आहे; त्याचें,च रूपांतर श्लोकांत देवराखि असें केलेलें आहे. लेख व इमारत वगैरे मुसलमानी अंमल जाऊन शिवाजीचा अंमल कोकणांत होऊन, स्थिर-स्थावर झाल्यावर रचलेली आहे. मुसलमानी अमलांत रामाच्या मूर्ति तळ्यांत पडल्या होत्या , त्या मराठी अमलांत देवळांत आणून पुन्हा बसविल्या.

१श्रीगणेशायनमः शाके बाणतुरंगबाणकुमिते वर्षे विजयाभिधे मासे माधवसंज्ञ
२ के हरितिथौ वारे शुचौ हस्तभे सान्नायान्वयजेन कृष्णविदुषा देवर्षिपुर्यां
शुभे श्रीरा
३ मायतने कपीशनिकटे लिंगप्रतिष्ठादिकं त्रिपुर वृंदावन । पवळ पापडि
४ तटाक अश्वथ–चत्वर
५ लिंगनाम गोपिनाथ
६ १५८१ द्रव्य १००
७ दिवराखि

वि. का. राजवाडे
द. वि. आपटे

## ४९ कर्णेश्वराचे देवळांतील शिलालेख

मुकाम संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी, येथील कर्णेश्वराच्या देवळांतील दगडी सभा मंडपाच्या एका खांबावर एक तिकोनी लेख आहे. तो येणेंप्रमाणें:—




शिलालेखाचें क्षेत्र त्रिकोण आहे. पाया ६ इंच व लंब ९ इंच आहे.

इतकीं अक्षरे शिलालेखांत आहेत. गद्याण व दाम हीं नाणीं होतीं. रजत या शब्दावरून असें दिसतें कीं हे गद्याण रुप्याचें असावें. शिलालेखांत याहून जास्त

अक्षरें नाहींत. तेव्हां गयाण व दाम कशाकरितां दिले होते या बाबीचा निश्चयानें खुलासा करतां येत नाहीं.

वि. का. राजवाडे

द. वि. आपटे

## ५० हडकोळण येथील शंभु छत्रपतीचा शक १६१० तील मराठी शिलालेख


१ गोंवें प्रांतांत, फोंडें महालांत, हडकोळण गांवीं कुंडईपासून भाणस्तरीहून देवीच्या देवळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस दक्षिणाभिमुख एका चौथऱ्यावर हा शिलालेख सुबक कोरलेला आहे. काळा फत्तर आहे. शिळेची बैठक जमीनींत गडलेली असून सबंध शिळा शाबूत आहे. सबंध शिळेची लांबी ३६ इंच व रुंदी २२ इंच आहे. चारी बाजूस समास सोडून मुख्य लेख खोदण्याकरितां २१ इंच × १७ इंच इतकें क्षेत्रफळ अर्धा इंच आंत खोदलें आहे, त्यांत लेखाच्या एकंदर २० ओळी आलेल्या असून राहिलेल्या शेवटच्या दोन ओळी शिळेच्या खालच्या समासावर लिहिलेल्या आहेत. खालच्या समासावर या दोन ओळींच्या खालीं उजव्या व डाव्या बाजूस गाईचीं दोन चित्रें काढली असून, मध्यें "शुभं भवतु" हीं अक्षरें खोदलेलीं असावीं; परंतु सध्या तीं पुसून जात चाललेलीं आहेत. मधल्याकडील समासांत सूर्य, अष्टदल कमळ, व चंद्र कोरलेले असून सर्वांच्या वर "श्रीरामाय" हीं रामदासी अक्षरें निराळ्या वळणांत दुसऱ्या कोण्या खोदणाऱ्यानें खोदिलीं असावींत असा संशय येतो. तथापि मूळ खोदणाऱ्यानें हि तीं खोदिलीं नसतील च असें म्हणवत नाहीं. मुसलमान अगर फिरंगी यांचे कडून शिळेच्या त्या भागाला इजा झाली असण्याचा संभव आहेत.

२ लेख शक १६१० तील आहे. तिथ, वार बरोबर आहेत भाषा मराठी आहे. मुख्याधिकारी जो धर्माजी नागनाथ त्याच्या वाडयाची बखळ सध्यां फोंड्यांत असून तीवर सध्या मुसलमान काजीचें घर आहे.हा धर्माजी नागनाथ देशस्थ ब्राह्मण होता म्हणून रा. रा. वि. रा. सरज्योतिषी कवळेकर सांगतात. या मुख्याधिकाऱ्याचे कागदपत्र सदर सरज्योतिष्यांचे संग्रहीं सध्या आहेत. मुसलमानी अमलांत देसाई व सरदेसाई यांजकडून च वसुलाचें काम घेत; परंतु मराठी अमलांत वसुलाचें व अंमल बजावणीचें काम सरकारी अधिकारी करीत.

३ या शिलालेखांत तरीवरील आंगभाडें धर्माजी नागनाथानें व्यापाऱ्यांच्या हितार्थ माफ केलेलें आहे. आंगभाडें बसविल्यापासून मालाची आणने कमी होते व आंगभाडें सोडल्यापासून मालाच्या आणनेला उत्तेजन मिळतें, ही बाब लक्षांत घेऊन कराची माफी केलेली आहे.

४ या शिलालेखांत "अनंतउर्ज" हा शब्द आलेला आहे. शक १३१३ तील एका ताम्रपटांत या प्रांताला "अंतुरुज" असें म्हटलें आहे. त्यास सध्यां लोक "अंत्रुज" असें म्हणतात.

### श्री रामाय



श्रीगणेशायनमः

१०] १ श्रीलक्ष्मीप्रसन्न ॥ स्वस्ति श्री नृपशाळीवाहन शके ॥
२ १६१० वर्षे । वर्तमान विभव नाम संवत्सर चैत्र शुद्ध
३ प्रतिपदा गुरुवासर गोमंतक प्रांत अनंतउर्ज देश
४ क्षत्रियकुळावतंस राजा शंभु छत्रपति यांचे आज्ञानुव-
५ र्ती राजश्री धर्माजी नागनाथ मुख्य देशाधिकारी प्रां-
६ त मामले फोंडा याप्रति तिम नायकाचे पुत्र सां[1]-
७ म नायक याहि विनंति केलि जे पुर्वि मुसलमाना-
८ च्या राज्यामध्ये तरि अनंतउर्जेसि लोकास आंगभा-
९ डे घेत नव्हते तेणेकरुन व्यावहारिक लोंके[4] सुखे
१० येत तेणेकरुन राजगृहि हांसिल[5] होय आता हे
२०] ११ हिंदुराज्य जाहाले पासोन आंगभाडे घेउ लागले तेणेकरुनि राजगृहि[6]

---

१ एक बेपारी. २ तर, नाव. ३ व्यावहारीक=वोहारी; शक १६१० तील गोव्या तील वोहारी उर्फ सामान्य व्यापारी लोक. ४ लोक याचें अनेकवचन लोके. ५ उत्पन्न. ६ दिवाणांत.

१२ हासिलासि धका बैसला त्यासि ते कृपाळु होउन आंगभाडें उरपासि जाव
१३ दुडुंवा अर्धकोसी चौदा दुडु घेत आहेति मना करावे पण काहि राज-
१४ गृहि आदाय होईल ऐसि विज्ञापना केलि ते प्रमाण जाणुन
१५ भाणस[10]तरि व पारवं[11]गावि व मांदुस[12] कुंडे[13]चि येथिल आंगभाडे सोडी-
१६ ले पूढे याप्रमाणे सकळांहि चालवावें सहसा धर्मकृत्यास नाश क-
१७ रु नये कर्त्तिलें[14] त्यासि महापातक आहे ॥ श्लोकं ॥ श्वं[15]कृतं वा परे-
१८ णापी धर्मकृत्यं कृतं नरः ॥ यो नाशयति पापात्मा स याति
१९ नरकान् बहून् ॥ १ ॥ लोभान्मत्सरतो वापि धर्मकार्यस्य
२० दुस्यं[16]कः ॥ यो नरः स महापापी विष्टायां जायते क्रीं[17]मि ॥ २ ॥
२१ दानपाळं[18]नयोर्मध्ये दानात् स्रेयों[19]नुपाळं[20]नं ॥ दानात् स्वर्गमवा-
२२ प्नोति पाळं[21]णादच्युतं पदं ॥ या धर्मकार्या समस्ति मान देवावे

( गाईचें चित्र ) ( गाईचें चित्र )

द. वि. आपटे

## ५१ शिंद्यांचा गृहकलह

पेशवाईचा अखेर ज्या कालांत झाला त्याचें वर्णन करणारी एक हि बखर अद्याप साप-डली नाहीं अशी माझी समजूत आहे. शक १७१७ ते १७३५ हा काल अत्यंत धाम-धुमीचा परंतु अत्यंत महत्वाचा आहे. त्या कालांतील शकवार माहिती देणारी व ती हि अगदीं साग्रपणें देणारी एक शकावली सुदैवानें मला एका मित्राच्या साह्यानें उपलब्ध झाली आहे. ती प्रसिद्ध करण्याचा विचार आहे, तत्पूर्वी थोडासा मासला

---

७।८ "उरपासि जाव" हा कोंकणी प्रयोग आहे. उरप म्हणजे बंद होणें. जाव म्हणजे पाहिजे—उरपासि जाव म्हणजे बंद होणें पाहिजे. ९ दुडु=पैसा. दुडुवा=पैसे १० भाणस गांवची तरी ११ या गांवाचा व तरीचा पत्ता मला लागला नाहीं. १२ कुंडेच्या जवळील गांव. १३ कुडे=कुंडे, ग्रामनाम. १४ म्हणजे 'कार्तिल'. 'ति' वर रेफ काढण्याऐवजी 'त्र' या अक्षरामधील रकार काढतात त्या प्रकारचा, पण वाटीच्या आकाराचा रकार मूळ शिलालेखांत कोरलेला आहे. हा रकार अक्षराच्या रेषेवर नसून खाली आहे. 'त्त' या अक्षरांतील द्वित्वाची रेघ बाकदार केली असतां या अक्षराची कल्पना येईल. १५ 'स्व' हवे १६ दूषकः १७ कृमिः १८ 'ल' हवा. १९ 'श्र' हवा. २० 'ल' हवा. २१ 'ल' हवा.

मंडळास यावा अशा इच्छेनें शिंद्यांचा गृहकलह असें नांव देऊन शकावलींतील कांहीं भाग निवडून पाठविला आहे.

( शके १७२० कालयुक्त नाम संवत्सरे )

१ महादजी सिंदे याच्या तीन बायका दौलतराव यांजवळ होत्या. त्या पैकीं धाकटी बायको दौलतराव सिंदे यांचे लक्षांत मिळाली. त्यामुळें दोघी बायकांचे मनांत धाकडेपणा आला; त्यावरून सर्जेराव यांणी त्या बायास मारहाण करून छ २८ जिल्काद वैशाख वा ३० चे दिवशीं लक्ष्मीबाई व यमुनाबाई या उभयतांस कैदेंत ठेवण्याकरितां नगरास रवाना केल्या. ती संधी शेणवि मंडळीनें पाहून मराठी वगैरे सारी फौज येक जाहाली. बाया कोरेगांव पर्यंत गेल्या इतक्यांत मुजफरखान पटाण व नारायणराव बक्षी व मराठी फौज जाऊन बायांस सामील जाली. रावसाहेब जुन्नरास जाण्याकरितां बाहेर निघाले होते. त्यांचा मुक्काम तिकडे च होता. सर्जेराव पलटणें घेऊन बायांचे फौजेवर गेले. त्यांची व बायांचे फौजेची लढाई जाहाली. सर्जेराव यांचा मोड होऊन माघार आले. अमृतरावसाहेब लढाईस सामिल नव्हते. परंतु लढाई जाल्यावर बाया अमृतरावसाहेबांस म्हणों लागल्या कीं, आपण आमचा बंदोबस्त करून द्यावा; व त्यावरून बाया व अमृतरावसाहेब कुच करून खडकीचे पुलानजीक येऊन राहिले. बाया विठ्ठलवाडीकडे राहिल्या.

१ अमृतराव साहेब बायाचें बोलणें बोलूं लागले, त्याजवरून बायाचा समेट करून खलप मोडावयाची तजवीज होत होती, त्याविसी भोसले यास बाजीरावसाहेब यांणी पत्र लिहिलें आहे त्यांत मजकूर आहे. इतक्यांत सर्जेराव यांणी पलटणें व तोफा ताबूत थंडे करावयाचे निमित्यानें तयार करून, खडकीचे पुलानजीक जाऊन ताबूद नदींत पोहचउन, तसेंच अमृतरावसाहेब यांचे गोटावर तोफेचे गोळे मारले. अमृतरावसाहेब बेसावध होते, यामुळें बुणगे व डेरे दरोबस्त लुटले गेले. रावसाहेब गणेशखिंडीकडे जाऊन वडगांवास बायाचे लगतीस मुकाम करून राहिले. सिंदे यांची फौज बहुतेक बायांकडे गेली. सिक्के कटार व जरीपटका देखील बायाकडे गेला. पलटणें मात्र सिंदे याजवळ राहिली. सारी फौज उठोन गेल्यावर, सिंदे यांणीं पलटणे वाड्या भोंवती ठेऊन बंदोबस्त करून राहिले. बाया कडील फौज दिवसास, रात्रीस, जाउन सिंद्याचे लस्करांत बाण लावीत, असें होऊं लागलें. त्या योगानें सिंदे यांचा दाब कमी पडला.

अमृतरावसाहेब यांस बायांचे मसलतींतून वेगळे केल्यासिवाय बखेडा मोडत नाहीं, असा विच्यार सिंदे यांणीं करून अमृतरावसाहेब यांची समजूत करावी

असें बाजीरावसाहेब यांस बोलणें ठरविलें. त्यावरून गोविंदराव काळे व सिवरामपंत थत्ते याजकडून बाजीरावसाहेब यांणीं अमृतरावसाहेब यांस पेगम लावून, सातलक्षाची जहागीर तोडून द्यावयाचा करार केला अमृतरावसाहेब याचे लस्कर लुटले गेले, खर्चाची अडचण फार पडली, यामुळें त्यांणीं समजुतीवर घेतलें. गोविंदराव पिंगळे व नारोपंत चक्रदेव व सिंदे; याजकडील कारभारी जाऊन समजूत जाली. रावसाहेब माघारे कुच करून पर्वतीस रमण्यानजीक येऊन राहिले. याप्रकरणीं सिवरामपंत थत्ते यास, रावसाहेब यांणीं चिठ्या पाठविल्या त्या महिपतराव चिटणीस याजवळ आहेत. त्यांत ये विसींचा मजकूर संक्षेप आहे. अमृतरावसाहेब यास सात लक्षाचा मुलुक द्यावयाचा ठरला. त्याची याद रात्रिंनूसनूसाहेब याजवळचे कागदांत सांपडली, त्यांत सात लक्षाचे महाल व गांव वसुली सरंजामास लावून द्यावे, येविसीं सनदापत्रें लागतील तीं द्यावीं, म्हणोन छ २० राखर सन तिसा तिसैन भाद्रपद मासची याद आहे, त्या वरून.

१ बाया फौजेसुद्धा वाई, सातारा, करवीर, प्रांतातून फिरल्या व त्यांतील कांहीं फौजाचे जमाव पंढरपुराकडून मिरजप्रांत कर्नाटक पर्यंत जाउन मुलुक लुटून भारी उपद्रव केला.

× × × × × ×

१ बायाचे बात ( बदलांत, बाबतींत ), सिंदे यांची फौज गेली, त्या फितुरांत आहेत असें निमित्य ठेऊन सिंद्याचे पदरचे माणसे सरजेराव यांणीं मारलीं वितोा.

१ धुळोजी मोरे
१ येशवंतराव सिवाजी
१ तुळसाजी सिंदे
१ ...... वचले
४

सदरहू पैकीं कांहीं तोफेचे तोंडीं दिल्हे कांहीं मेखसु डोकींत घालुन मारले. या प्रमाणें उन्मत्तपणानें सर्जेराव कारभार करूं लागले. हें सिंदे यास हि असाह्य जाले. त्याजवर पलटणवाले याची व फकीरजी गाढवे याची कलागत जाहली. गाढवे याचा पक्ष सर्जेराव याणीं धरून, जरबेनें बोलों लागलें; त्याजवरून सिंदे यांणीं पलटणवाले यास इशारा करून सर्जेराव यास कैद करून पलटणांत ठेविले.

१ बायांचे बखेड्यामुळें शेणवी मंडळ हिंदुस्थानांत आहेत ते बिघडतील याजकरितां, हिंदुस्थानांत जावें असें सिंदे यांणीं मनांत आणिलें. परंतु नानास कैदेत

ठेऊन जाणें ठीक नव्हे व खर्चास नाहीं, तेव्हां नानास मोकळे करून त्याजपासून खर्चास घ्यावे असा बेत करून, श्रीमंतांचा रुकार न घेतां महाडचे मुक्कामीं दोन कोट रुपये घ्यावयाचा करार नानानीं केला होता, त्यापैकीं बाकी राहिली ती घ्यावयाचा करार करून मोकळे करून लस्करांत आणोन अधिक श्रावण शुद्ध ६ छ ४ सफर बुधवारीं नऊ घटका दिवसास भेट होऊन वस्त्रे कंठी वगैरे दिल्हे. त्यांचे लस्करांत च होते. त्यांचा सरंजाम जप्त केला होता तो सोडला, व जप्तीपैकीं कांहीं सामान माघारे दिल्हे. नानाचे वाडयांत सर्जेराव राहिले होते, त्यांणी वाड्यांत बकरीं वगैरे मारलीं, सबब वाडयाची शुद्धता केली व श्रावण मासीं नाना खासगीची दक्षणा वांटीत होते ती लस्करांत च वाटली.

× × × ×

१ बाया व बक्षी व पलटण वगैरे यांणीं तमाम ठाणीं जासगांव, चांभारगोंदे, सुद्धां बसवून सिंद्याचा राऊत लस्करापासून बाहेर कंपूपासून दूर सांपडल्यास धरावा,लुटावा, असें करूं लागले. बाग तोडले, मार्ग चालेनासा जाहाला, पुण्यांतील लोक कितेक पळाले. सावकारा बंद जाहाला. सिंद्याचे घरचा फितूर जाहाल्यामुळें दौलतराव यांची सत्ता राहिली. श्रीमंत वाडयांत, शहराभोंवत्या फौजा फिरो लागल्या. हुकुम कोणाचा नाहीं, सेते उगवलेलीं कापलीं, रयतेस उपद्रव बहुत जाहला

१ बायाचे समजुतीस बाबुराव आंग्रे, व गोपाळराव चिटणिस, व रामचंद्र अण्णा, यांस पाठविलें. ते नीरा नदीवर गेले.बायाचा मुद्दा बाळोबा तात्या कैदेतून मुक्त होऊन आल्या सेरीज समेट करावयाचा नाहीं. व त्याणीं बोलण्याच्या यादि दिल्या त्यांत त्याचे च हुकुमांत सिंदे याणीं चालावें असीं कांहीं कलमे आहेत त्या यादि राबिनूसनूसाहेब याजवळचे कागदांत सांपडल्या त्यांतील हासील मजकूर.

१ प्रतयाद कलमबंदी प्रो दौलतराव सिंदे याणीं वहिवाट करावी म्हणोन

१ दौलत प्रकर्णीं राजकारणीं मजकूर बायास कळवून करीत जावा.

१ वाड्यांत चौकीस लोक पाटिलबावाचे चालीप्रमाणें असावे.

१ घाटगे व गाढवे यांस दूर ठेवावे तेथें जामीन देऊन राहावे.

१ भागिर्थिबाईची नेमणूक करून जाहागीर द्यावी तेथें त्यांणीं असावें.

१ दौलतीस कारभार्‍ी श्रीमंताचे व बायाचे व दौलतराव व नाना यांचे विच्यारें करणें तो करावा.

२ प्रत यादि बायाचे बोलण्याची कलमे त्याजवर सिंदे यांची उत्तरे

२ किता कलमे

१ पलटणे दरोबस्त कूच करून पाचा कोसावर लोणीवर मुक्काम करावा.

१ खातर जमेचे जे गृहस्त मागू ते द्यावे.

—
२

सदरहू कलमाचे उत्तर दोही कंपूवाल्याकडून याचे वाकडे होऊं नये व त्याजकडुन हि दौलतीच्या नुकसानाची व बखेड्याची व कोणाच्या अदावतीची गोष्ट होऊं नये सरकार लक्ष ठेऊन वर्तणूक करावी म्हणोन पामर साहेब याणी, दुतर्फाची [१० साहा महिन्याचे मुदतीनें खातर जमा करावी.

२ किता कलमें

१ मार्तोउश्री ( मातुश्री ) बायाचे जाहागिरीच कलम

१ मातुश्री बायांनीं ज्यास जे वचन देण्याघेण्याविसिं दिल्हे असेल त्याप्रमाणें चालवावे.

—
२

सदरहू कलमाचे उत्तर सनदा पेशजी जाल्या आहेत त्याखेरीज जाजती येका लाखाची जाहागीर द्यावी.

१ सावकारा कडून कर्ज घेतले असेल ते हिसेब पाहून फडता करावा. कलम. [२०

उत्तर. सावकाराचे कर्ज व दंडपुरोई व जप्तीमुळें व नेहलें आणिलें असेल तें वगैरे कुळ जमा हिसेबी कचे समजावे त्यांत वाजवी खर्च जाला असेल तो वजा करून बाकी सावकाराचे देणे निघेल त्याची तोड सरकारांतून काढली जाईल.

१ हलकी माणसे जवळ नसावी ... कलम

उत्तर सदरहू प्रमाणें

१ बक्षीकडून नजरास दस्ताऐवज घेतला असेल तो माघारा द्यावा. कलम.

उत्तर. बक्षीनें सरकार लक्ष ठेऊन येकनिष्ठेनें वर्तणुक करून पहिला दस्तैवज आहे त्याप्रो वहिवाट करावी नगरास दस्तैवज घेतला आहे तो माघारा द्यावा.

१ लक्षण अनंत व जगन्नाथ रामचंद्र यास मोकळे करून त्याचे काम त्यांस सांगावें.

उत्तर. त्यांणीं सरकार लक्ष ठेऊन एकनिष्ठनें वर्तणूक करावी त्याजला माकळे करून त्याचे काम त्याजला सांगावें.

१ लोकाचा करार देण्याघेण्याचा पेशजी ठरला असेल त्याप्रमाणें रार पाडावा (1). कलम.

उत्तर. धरणे बसोन ज्या लोकास ऐवज पावला व राहिले लोकास ऐवज द्यावयाचा त्या सान्याचे हिसेब हजन्. ग व त्या तारखा पाहून पेशजीच्या चालीप्रमाणें कबज करून त्यांत आदावजा होऊन बाक्या निघतील त्याची तोड दौलतीचे चाली प्रमाणें अवघ्याची पडली जाईल.

१ विठ्ठल नारायण याचा ऐवज उष्टरखान्याकडे मोबदला पडला त्याचा फडसा करावा कलम.

उत्तर. उष्टरखान्याकचे हिसेब पांहून हिसेबाचे अन्वये विल्हे लाउन देविले जाईल.

१ किल्ला असरीचा नेमणूकी सुद्धां द्यावा.
उत्तर. किला असरीचा द्यावयाचा किल्याचे नेमणूक सुद्धां सनद करून द्यावी.

१ जाहागीर खाजगत खर्चास द्यावी, राहण्यास जागा बागपुर द्यावे. कलम.

उत्तर. अकरालक्षाचे जाहागिरीस महाल बागपुर सुद्धां बायाकडे लावून द्यावे.

१ दौलतील बखेडे होऊन श्रीमंत व बरोबरीचे भाउ व नबाब व इंग्रजीयांस विलग पडत गेले धणी कारभारी मिळोन दौलतीचा बंदोबस्त राखावा. कलम.

उत्तर. पुर्वील सिलसिले चालत आल्या अन्वये घडेल.

१ वस्तभाव जडजवाहीर कापड सोने रुपे दागिने हाती घोडे वगैरे आहेत दरोबस्त यावे. कलम.

उत्तर. जामदार खान्यांतील वस्तभाव बायाची व घोडी हाती यावे. वस्तभाव दंग्यामुळें गाहाळ जाहाली असेल तिचे मोबदला दागिना अगर किंमत द्यावी.

१ लोक आम्हांबरोबर आले त्याचे घरचे वगैरे जमीस गेले त्याप्रो चौकसी करून यावे. कलम.

उत्तर. चीजवस्त लोकाची उभयपक्षी परस्परें याबी.

१ करवीरकर महाराज यांचा व परशरामपंतभाउचा तह करून यावा. [१०

उत्तर. येविसीं सरकारांत बोलू यतांचे तहाचा ठराव करून यावयास येईल.

१ येशवंतराव सिवाजी याजकडील यादीप्रो जाबसाल व्हावे. कलम

उत्तर. अलाहिदा यादीवर कलमें लिहिलीं आहेत ती समजून वाजवीचें रितीनें मखलाशा होतील.

---

१७

१ प्रत बायाकडील कलमबंदी श्रीमंताच्या राज्यासी व सिंद्याच्या दौलतीची वहिवाट करावी म्हणोन कलमे

१ श्रीमतांचा हुकुम खावंदी ठेऊन कारभार करा [२०

१ सिंद्याचे दौलतींत हुकुम बायाचा असावा व दौलतराव बाबा याणी त्याचे आज्ञेप्रमाणे करीत जावे. कलम.

१ सरकारचे वाडयांत चौकी पठाणाची नसावी, पागे सिलेदार याची पेशजी पासून आहे त्याप्रो असावी कलम

१ घाटगे व गाढवे वगैरे लबाड आहेत त्यांस बायांचे स्वाधीन करावे

१ दौलतीस कारभारी श्रीमंताचे व बायाचे विच्यारास येईल तो करावा

१ भागीर्थीबाई यांस बायांचे स्वाधीन करावे.

१ या कलमाच्या दरम्यान पामरसाहेब यास यावे. [३०

---

४

सद्रहू प्रमाणें चार यादी तह (प १ )सील सिंदे यांणी बायाचे हुकुमांत चालावें असें जालें, त्यावरून बाबूराव आंगरे माघारे आले गोपळाराव व रामचंद्रअण्णा पंढरपुराकडे फौजेसुद्धां गेले पुर्वींच चिंतो आत्माराम फौजसुद्धां बायाचे दुमाल्यावर होते त्याची व गोपालराव व रामचंद्र अण्णा यांची गाठ पंढरपुरावर पडली त्यांणी मंगळवेढे पावेतों खंडणी घेऊन गुजर चालविली

शके १७२१

१ दौलतराव सिंदे यांणी बायांचा समेट व्हावयाकरितां बाळोबा पागनीस व धोंडोबा व बाजी मोधी नगरांत कैदेंत होते त्यास नगराहून सोडून आणिले ते चैत्र वद्य ३ सोमवार छ १६ जिल्काद वानवडीस वाड्यांत येऊन भेटले त्यास वस्त्रे
१०]जवाहीर दिल्हे आणि कारभारांत घातले नंतर बाळोबा तात्या व बाबूराव अंगरे व अबा चिटणीस त्रिवर्ग मिळोन बायाचा समेट करविला. बाया जेजुरी आलीकडे राजेवाडीवर भाद्रपद वा ७ येऊन राहिल्या बाळोबा वगैरे वानवडीस आले. नंतर बायांनीं सांगोन पाठविलें कीं आमचें जवाहीराचे संदुक आहेत ते आम्हाकडे या मुक्कामी पाठवावे म्हणजे आम्ही लस्करांत येऊं त्यावरून बाळोबा तात्यांनीं सिंदे यांस सांगोन बायांचे संदुक बायाकडे पाठविले ते घेऊन बाया कुच करून वानवडीस न येतां पैठण खांबगावचे सुमारे गेल्या तेव्हां सिंदे यांनीं बाळोबा तात्यांस विचारलें त्यांणी सांगितलें कीं गेल्या तरी चिंता नाहीं असें बोलून नारायणराव बक्षी यांस बायाचे लस्करांतून बोलाउन आणिले, व फौज हि फोडून आणिली. बाबुराव आंगरे याची रवानगी कुलाब्यास करून सारा कारभार पाग-
२०] नीस करूं लागले. बाया गंगेकडे गेल्या.

गो. का चांदोरकर

---

# ५२ कशेळी येथील शक ११९३ तील शिलाहारांचा ताम्रपट

१ रत्नागिरि जिल्ह्यांत अडिवऱ्याजवळ कशेळी नांवाच्या गावांत कनकादित्याच्या देवळांत दास्तानदार रा. रा. विष्णु रामचंद्र भागवत यांजपाशीं हा ताम्रपट आहे. ह्याचें वजन सुमारें पुणेरी सव्वा आठ शेर आहे. पत्रे तीन असून, ते कडींत अडकविलेले आहेत. कडीवर मारुतीची मुद्रा आहे. प्रत्येक पत्र्याची लांबी १२॥ इंच रुंदी ८-३/४ इंच जाडी १/८ इंच आहे. पहिल्या पत्र्याच्या पाठीवर मध्यें सवत्स गाय, तिच्या

शृंगांच्या वरती चंद्र-सूर्य व तिच्या पुढें तरवार कोरिली आहे. सूर्याच्या कोटीजवळ खालील अक्षरें आहेत:--देवप्रद.

२ लेख संस्कृतांत व मराठींत आहे. पहिलीं चार पृष्ठें संस्कृतांत आहेत व पांचवें पृष्ठ मराठींत आहे. लिपि शातवाहनाच्या बाराव्या शतकांतील देनागरी आहे. पहिलीं चार पृष्ठें शक १११३ त कोरिलीं व पांचवें पृष्ठ शक १२०१ त कोरिलें. पहिलें पृष्ठ पहिल्या पत्र्याच्या पोटावर कोरलें आहे. दुसरें व तिसरें पृष्ठ दुसऱ्या पत्र्याच्या पोटावर व पाठीवर कोरलें आहे. चौथें पृष्ठ तिसऱ्या पत्र्याच्या पाठीवर कोरलें आहे. व पांचवें पृष्ठ तिसऱ्या पत्र्याच्या पोटावर कोरलें आहे.

३ संस्कृत लेखाच्या एकंदर ५८ ओळी आहेत व मराठी लेखाच्या एकंदर १६ ओळी आहेत. संस्कृत ५८ ओळी सबंद शाबूत आहेत. परंतु मराठी लेखाच्या पहिल्या ८॥ साडेआठ ओळी घासटून जाऊन बहुतेक पुसटून गेल्या आहेत. पैकीं जितकीं अक्षरें शाबूत होतीं तितकीं उतरून घेतलीं आहेत. बाकीच्या ७॥ साडेसात ओळींतील बहुतेक सर्व अक्षरें शाबूत आहेत. कांहीं पुसट झालेलीं आहेत तीं मीं प्रयासानें लावलीं आहेत.

४ सिलारांची वंशावळ इतर लेखांतल्या प्रमाणें च आहे.

५ कसेलिग्रामांत बारा ब्राह्मणांना दररोज जवावयाला घालण्याकरितां कसेलिग्रामाचें उत्पन्न गोविंदभट नांवाच्या ब्राह्मणाच्या स्वाधीन भोजराजानें युवराज गंडरादित्य याच्या विज्ञापनेवरून केलेलें आहे. कसेलि म्हणजे सध्यांची कशेळी. अट्टवेर म्हणजे सध्यांचें अडिवरें. कसेलीच्या दक्षिणेस सावुरे म्हणजे सावरे नांवाचा पर्या म्हणजे ओढा म्हणजे शुष्कस्रोतस्. पश्चिमेस समुद्र. उत्तरेस केसंडिका म्हणजे सध्यां ज्याला सेंकडीचा पर्या म्हणतात तो क्षुद्रस्रोतस्-के उदके खंडः खंडिका वा सा केसंडिका, असा एका शास्त्र्यानें विग्रह केला. समुद्राच्या पाण्याला जेथें प्रतिबंध होतो, जेथपर्यंत समुद्राचें पाणी येतें तो ओढा केखंडिका ऊर्फ सेंकडी-पूर्व दिशेस कुरुल नदी-ह्या नदीचें नांव कसेळींतील लोकांस सध्यां माहीत नाहीं. अंबेवेरिक ऊर्फ अंबेवेर म्हणजे सध्यांचें अंबेरुख. अंबेरुख ही कसेळाची सध्यां एक वाडी आहे.

६ अट्टवेर व अंबेवेर ह्या ग्रामनामांसंबंधानें किंचित् टीका करतों. रामायणांत शृंगवेर नामक पुर उल्लखिलेलें सर्वश्रुत आहे. त्या नांवांतील वेर शब्द अट्टवेर अंबेवेर या नांवांतील जो वेर शब्द ता च आहे. पाणिनीयांत नगरवाचक नांवाचे उत्तर अवयव ज्या शब्दांनीं घटित होतात म्हणून सांगितलें आहे त्यांत वेर शब्द नाहीं. अर्थात्, रामायणांतील शृंगवेर हें नांव पाणिनीनंतरचें आहे व तन्नामक शहर हि, अर्थात्, पाणिनीनंतरचें आहे.

७ पांचव्या पृष्ठांत जो मराठी मजकूर आहे तो शक १२०१ तील आहे, म्हणजे ज्ञानेश्वरीच्या पूर्वी अकरा वर्षांचा आहे व कोंकणांतील आहे. नायकें मंडलिकेहिं, मंडलिकें, उद्धारु, केला, सर्ते, एका, भागवता, भटा, हरिदेवें, कोंतापुरी-चेन, सोनारें, हीं रूपें ज्ञानेश्वरींतल्या सारखीं हुबेहुब आहेत. कोंतापुर म्हणजे सध्यांचे कोंतापुर, अडिवऱ्याजवळ आहे

८ ह्या लेखांत 'भागवता माधवभटा' असा प्रयोग आला आहे. भागवत म्हणजे भागवित्ति किंवा भागवित्तायन. भागवित्ति हें लौकिक गोत्र आहे. त्यापासून सध्यांचें भागवत हें कुलनाम ऊर्फ आडनांव आलेलें आहे. माधवभट हा सध्या कनकादित्याचे जे दास्तानदार भागवत उपनामाचे गृहस्थ आहेत त्यांचा पूर्वज. अर्थात् कऱ्हाडे ब्राह्मणांची वस्ती कसेळी गांवांत शक १२०१ पासून शक १८३५ पर्यंत अखंड चालली आहे. इतकें च नव्हे, तर संस्कृत भागांतील गोविंदभट्ट हा हि आपला च पर्वज आहे, असें कसेळीकर भगवत म्हणतात, त्या अर्थी, भागवत नांवाच्या कऱ्हाड्या ब्राह्मणांची वस्ती कसेळी गांवांत व कोंकणांत शक १११३ पासूनची आहे. म्हणजे भागवतांचें कुळ कसेळीस आज ७२२ वर्षे नांदत आहे.

९ सेणवे हा हि शब्द कोंकणांत शक १२०१ त असलेला आढळतो.

१० कशेळी गांवांत शूद्रांचीं खालील आडनांवें सध्यां विद्यमान आहेत:— (१) भोंसले, (२) वारिक, (३) टुंबरे, (४) ठुकरुल, (५) माडवकर, (६) जोंवळे, (७) डुकळे, (८) थारळी, (९) बावकर, (१०) गोरुले, (११) दुदम, (१२) तांबे, (१३) परभू, (१४) पेटावे, (१५) माळी, (१६) राडिये, (१७) भोंवड, (१८) धरणकर, (१९) शेंयवणकर, (२०) लाड, (२१) दुर्पे, (२२) घेलिये, (२३) गोठणकर.

## पत्रा १ पोट

१ ॐ स्वस्तिश्रीः जयत्याविष्कृतं विष्णोर्वाराहं क्षोभिताणर्वं दक्षिणोन्नतदं-
ष्ट्राग्रविश्रांतभुवनं वपुः ॥१॥

२ आसीद्विद्याधरः पूर्वं नाम्ना जीमूतवाहनः । परार्थे जीवितं येन गरुडाय निवेदितं ॥ शिलाहाराख्य-

३ वंशोयं तगरेश्वरभूभृतां । तद्वंशे जतिगो राजाजनि भूभृच्छिखामणिः ॥ स्वस्ति श्री जतिगक्षितीश-

४ तनयो नायिम्मनामा नृपः पुत्रस्तस्य च चंद्रराद्[1]। पृथुयशास्तस्यापिसूनुः किल । संजातो ज-

५ तिगो जगज्जननुतश्रीमांश्च तन्नंदनः गोंकल्लो भुवि भूमिपालतिलक स्तस्याप्यभूदादितः । गूवं-

६ लेशोथ तद्भ्राता कीर्त्तिराजोनुजोस्य च । चंद्रादित्य इति ख्यातश्चक्रे राज्यमकंटकं ॥ श्रीमद्गोंक-

७ लभूमिपालतनयश्रीमारसिंहो पः । तत्सूनुर्नृपमौलिलालितपदश्रीगूवला-ख्यो नृपः । तद्भ्रा-

८ ता भुवि भोजराजनृपति वैरीभपंचानन श्चक्रे राजमखंडितं पृथुयशा लंकेशतुल्यं [१०

९ किल ॥ तस्यानुजातो विदितप्रतापो बल्लालदेवक्षितिपस्सदैव । श्रीकामिनीशो

१० विनतावनीशो दिक्प्रांतरूढः प्रथितः[2]प्रतापः ॥ तस्यानुजो धर्म्मधरो धरित्र्यां दधारे[3] वर्ण्णा-

११ नखिलान्स्वधर्म्मे ॥ धैर्याग्रधुर्यो धनदो धनानां श्रीगंडरादित्य इति प्रसिद्धः ॥ दीनानाथदरिद्र-

१२ दुःखविकलव्याकीर्ण्णनानाविधप्राणित्राणपरायणं[4] प्रतिदिनं शुप्ताख्यदानेन यः य[5]क्कृष्णा-

१३ जिनधेनुभूम्युभयतो मुख्यादिदानप्रदः । शश्वद्ब्रह्ममतिप्रवीणहृदयो भूदेवकल्पद्रुमः [२०

१४ तुलापुंर्ष[6]दानादिषोडशक्रतुकारकः।शौचगांगेयकीर्त्यैकनिलयस्वगुणै र्भुवि। तन्नंदनं[7]प्र-

१५ बलमण्डलिकद्विपेंद्रपंचाननो जनि जगत्त्रितयैकवीरः । प्रत्यर्थिपार्थिवललाटतटस्थपादपीठ-

१६ स्फटीजलयशा विजयार्कदेवं[8] ॥ दानाय द्रविणार्ज्जनं जनपरित्राणाय वीरव्रतं सत्याय प्रि-

---

१ रेव निरर्थक २ विसर्ग निरर्थक ३ दधार वर्ण्णा या अक्षरांच्या पूर्वी दुसरी कांहीं अक्षरें खोदलीं होतीं तीं सरडून हीं अक्षरें पुनः खोदिलीं आहेत. ४ णः पाहिजे ५ यष् बद्दल यः हवा ६ पुरुष हवा ७ नंदनः हवा ८ देवः हवा

## पत्रा २ पाठ

१७ यभाषणं हरिपद्ध्यानायचेतास्थितिः । संपत्तिस्सुमनौ विपद्विहतये यस्य प्रकामं कविः । क-

१८ श्शक्तः प्रविविच्य तस्य विजयादित्यस्य वक्तुं गुणान् ॥ येन स्थानकमंडले तदधिपाः भ्रष्टाः पुनस्था-

१९ पिताः । गोवायां परिनष्टभूमिपतयः सुस्थापिता स्तेजसा यत्सख्येन च चक्रवर्तिपदवीं प्रापातु- ×

२० लौ बिज्जणस्सोभूत् श्रीविजयार्कदेवनृपाति वैरीभकंठीरवः॥ तंनंदन स्सकलदिक्तटवर्त्तिकीर्त्तिर्भूभं-

१०]२१ गमात्रपरिसाधितवैरिवर्गः । विश्वंभराभरधुरीणभुज स्सदैव विभ्राजते नृपवरो भुवि भोजदेवः ।

२२ संग्रामांगणभैरवः क्षितिभुजां संहारभेरिरवः । कीर्त्याक्रांतजगत्रय स्तनुभूतां निर्धूं-[१]

२३ तत्तापत्रयः ।श्रीरत्नाप्रियनंदनः परिजनानंदैकसंक्रंदनः । प्राप्ताशेषमहीतल-

२४ स्स जयतात् श्रीभोजरत्नाचलः ॥ स्वस्ति समधिगतपंचमहाशब्द महामं-

२५ डलेश्वर । तगरपुरवराधीश्वर । जगज्जनमनोनुरागसागरप्रवर्द्धन-

२६ शरच्चंद्र । श्रीशिलाहारनरेंद्र । विद्वज्जनमनोरथफलप्रदपारिजात । जीमूतवाह-

२७ नान्वयप्रसूत । विरोधिधराधीशवंशगहनदहनधूमध्वज । सुवर्ण्णगरुड-
२०] ध्वज । रिपुम-

२८ देभविदलनोत्कंठकंठीरव । मंडलिकभैरव । विंद्विष्टमंडलिकपन्नग । वैनतेयाशौच-

२९ गांगेय । युवतिजनमनस्संमोहनाभिनवकंदर्प्प मरुवक्कसर्प्प । क्षत्रिय-शिखामणि

३० श्रीविजयादिय देवनसिंग । साहसोत्तुंग । अरिनृपालराज्यलक्ष्मी समाकर्षणमं-

३१त्रसिद्धि शनिवारसिद्धि । सकलशास्त्रपारावारपारायण।रूपनारायण।सकल-

---

१ धूं हवा.

## पत्रा २ पोट

३२ जगतीजनस्तुत्य इंदुवरारित्य । जयपताकापवनविघटितारातिसेनाघ
३३ न । गिरिदुर्ग्गलंघन । उद्धृतधराधीशकुलशिखरिकुलिश । कलिगलंकुश ।
३४ वीरलक्ष्मीलतालंबनप्रचंडभुजदंड । मंडलिकजवदंड । मंडलिकनरनारसिंग ।
३५ मंडलिकवेश्याभुजंग । बलवदरिचतुरंगसंघट्ट । वैरिघरट्ट । उरसासवा-
३६ रिमदनमहेश्वर । प्रतापलंकेश्वर । मंडलिकगंडपेंडार । एकांगवीर । शरणा-
३७ यातभूभृत्रिवहरक्षणसमुद्र । परबलविलयकालाग्निरुद्र । सुगीतकृतिचातुर्य-
३८ हर्षितशिवांतरंग । प्रशस्तवस्तुकवितप्रसंग । विविधधर्म्मनिर्म्माणनि-
३९ त्यप्रमोद । श्रीमहालक्ष्मीदेवीलब्धवरप्रसादादिसमस्तराजावलीविरा
४० जित श्रीमन्महामंडलेश्वर श्रीभोजदेवः पद्मनालदुर्ग्गे सुखसंकथाविनोदेन
४१ राज्यं कुर्वाणः । सकवर्षेषु सत्रयोदशशताधिकसहस्रेषु गतेषु वर्त्तमान- [१०
४२ विरोधिकृत्संवत्सरे आषाढशुद्धचतुर्थ्यां बृहस्पतिवारे दक्षिणायन
४३ संक्रमणपर्वनिमित्तं कुमारगंडरादित्यविज्ञापनेन तस्याभ्युदया-
४४ र्थं अट्टविरे-कंपणमध्यवर्त्ति-कसेलिग्रामे प्रतिदिनं द्वादशब्राह्मणभोजना-
४५ र्थं तद्ग्रामपिंडादानद्रव्यं सर्वं तत्रत्यगोविंदभट्टहस्ते धारापूर्वकं सर्वन-

## पत्रा ३ पाठ

४४ मस्यं सर्वबाधापरिहारं राजकीयानामनंगुलिप्रेक्षणीयमाचंद्रार्कं प्रादात्
४५ तस्य ग्रामस्य सीमा । पूर्वस्यां दिशि कुरुलनाम नदी । दक्षिणस्यां दिशि सावु-
४६ रे नाम शुष्कस्रोतः । पश्चिमस्यां दिशि सरित्पतिः । उत्तरस्यां दिशि केखंडिका- [२०
४७ल्यक्षुद्रशुष्कस्रोतः । अंबेवेरिकस्थितपूगीवृक्षसमूहपर्यंतं सीमा॥ बहुभिर्वसु-
४८ धा दत्ता राजभिः सगरादिभिः। यस्य यस्य यदा भूमि स्तस्य तस्य तदा फलं॥
४९ मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेतमनसो भुवि भूमिपालाः ।
५० ये पालयंति मम धर्म्ममिमं समग्रं तेभ्यो मया विरचितोंजलिरे-
५१ ष मूर्ध्नि ॥ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुंधरां । षष्टिवर्षसहस्राणि
५२ विष्टायां जायते कृमिः ॥ षष्टिर्वर्षसहस्राणि स्वर्गे तिष्टति भूमिदः आच्छेत्ता चानुमंता च तान्येवं न

५३ रके वसेत् ॥ अतिदानं तु सर्वेषां भूमिदानमिहोच्यते । अचला ह्यक्षय भूमि स्सर्वान्कामान्प्रयच्छति

५४ सुवर्ण्णं रजतं तांत्रं मणिमुक्ताफलानि च । सर्वमेतन्महाप्राज्ञ ददाति वसु

५५ धां ददत् ॥ भर्त्तुर्न्निश्रेयसे युक्ता संग्रामेभिमुखे हताः । तां गतिं नाप्नुवंतीह भूमि

५६ दा यद्व्राप्नुयुः ॥ सामान्यो यं धर्म्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः । सर्वा

५७ नेतान्भाविनः पार्थिवेंद्रान्भूयोभूयो याचते रामचंद्रः ॥ उत्कटितं विप्रवामियणेन संगलमहा

१०] ५८ श्रीः

## पत्रा ३ पोट

५९ स्वस्ति + + + + + + + + + +

६० त गांव ।+ + + + + + + + + +

६१ गावी + + + + + + + + + + त

६२ ते पंवा + + + + + + + + + +

६३ ता पर १ + + + + + + + + + +

६४ नट + + + + + + + + + + + केली

६५ हस्तोदकं + + + + + + + + +

६६ + + + + + + + + + + + + + + तव

१०]६७ + + + + + + + × स्वस्ति श्री शैलाहारे ॥ जिमूतवाहनान्वयश्रीह

६८ रिपाळदेव विंमयरायेदेव । भ्रित्यश्रीमचारायणमंडालिकपितामहश्रीविजुना-

६९ यकें अनंतरें रमणस मंडलिकेहिं । ग्रामदेवरासुतस्तेपया-

७० तत भ्राता कांदेव । सुत । श्रीमहामंडलेश्वरश्री

७१ जाषणमंडलिकें जिण्णोंद्धारु केला । सषवर्षेंबु स

७२ तें द्वादस मेका । प्रमाथिसंवछरे भाद्र वदि ८ बुधे दृष्य-

७३ णायने कन्यगते संक्रांतिपर्वे भागवता मागवभटा हस्तोदकं ददत्

७४ लिषीतं सेणवे हरिदेवें उतकटित कोंतापुरीचेन वज्जन सोनारें

---

वि. का. राजवाडे

# ५३ तुकारामसमकालीन व्यक्ती

सदरहू टांचण मला निंबगांव येथें मिळालें. त्यांत तुकारामाचे नातेवाईकांचीं नावें असून तत्कालीन व्यक्तींचे हि उल्लेख आहेत. हें टांचण अलीकडे लिहिलेलें नसून जुनें आहे.

या टांचणांत नामोल्लेखाशिवाय दादो कोंडदेव मोकाशी व तुकाराम या दोघांचे हि मरणकाली दिलेले आहेत. त्यापैकीं दादो कोंडदेव यांची मृत्युतिथि "फालगुण शुद्ध ११ येकादसी" याप्रमाणें दिली आहे. परंतु भारत–इतिहास–संशोधक–मंडळाच्या शके १८३३ च्या अहवालांत चिटणिसांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत ... "दादो कोंडदेव यांचा मृत्यु आश्विन वा। १३ शके १५६९ रोजीं झाला हें सिद्ध करीत असलेलें पत्र" रा० वि० का० राजवाडे यांनीं मंडळापुढें वाचल्याबद्दल म्हटलें आहे.

वरील टांचणांत फक्त महिना व तिथि असून शक अगर वार दिलेला नाहीं. जरी रा० राजवाडे यांचे म्हणण्याप्रमाणें शक १५६९ धरला तरी तें पत्र व हें टांचण यांतील महिना व तिथि यांचा मेळ कसा बसावा ? *

श्री

वोंसे तुकाराम नीरंजेन ॥

॥ वडील कांता रखुमाई ॥ धाक ॥
॥ टी आवलाई ॥ जीजाई ॥ कंता
॥ तुकाराम ॥ ज्येष्टपुत्र संतोबा नाम
॥ जाग वडील कन्या कासिबाई ॥ पाज्या (पांड्या ? )
॥ माहादाजीपंत ॥ कांता आवली क्काई
॥ माया मेली : उरला तुका ॥ १ ॥

---

* रा. राजवाडे यांनीं दिलेली तीथ अस्सल पत्रांत आली असून पत्र पुण्याच्या देशपांड्यांच्या संग्रहांतील होतें. अर्थात् अस्सल पत्र व पत्रांत आलेली तीथ स्मरणार्थ केव्हां तरी केलेल्या टांचणापेक्षां जास्त विश्वास्य. परंतु हा दादाजीच्या मृत्यूचा उल्लेख नमूद केलेला असावा म्हणून येथें छापला आहे. या टांचणांतील तुकारामाच्या निर्याणाचा शक हि चुकीचा आहे. तुकारामाचा निर्याण शक १५७० आतां ठरला आहे.

चिटणीस.

॥ बुबाई दासि जेनी ॥ १ ॥ माहादेव ॥
॥ पुत्र व विटोबा दोघे पुत्र तुकाराम
॥ कासि व भागिरथी दोन्ही जाणा कन्या
॥ न्शा ॥ आपाजी गुळव्या ॥ शेसुर ॥
॥ श्राधी जेंवविले रुक्मीणीवर तुकाराम
॥ रामेश्वरभठ ॥ आनघड फकीर ॥ आ-
॥ वलाई ॥ गंगाजी मवाळ संताजी
॥ तेली ॥ रामेश्वरभठ ॥ सिवजी का-
॥ सार ॥ सिवाजी राजा ॥ जीजाबाई राज्या-
॥ ची माता ॥ नावजी माळी भक्तराज ॥
॥ कोडभठ ॥ महिपतीबाबा भक्तराज चींता ॥
॥ मणी देव ॥ वेलवाडकर ॥ मालजी गाज्या(उन्या)
॥ जावाई ॥ संताजी तेली व गंगाजी माव-
॥ ळा दोघे ॥ गगाबाई कासिबाई भागी
॥ रथीबाई ॥ नाम कन्या तुकाराम दो
॥ दु कोडदेव मोकासिसि ॥ दादु कोड
॥ भेटीले तुकोबासि ॥ दादो कोडदेव । १ नारा-
॥ येणरूप फालगुण शुद्ध ॥ ११ येकादसी
॥ नीजेधाम पावले ॥ उद्धव आक्रूर आंब
॥ रूसि ॥ सके १५७१ नारायेण बावा वोष्णव
॥ गवाशेठ वाणी भक्तराज ॥ गवा शेठ
विनवि जे औसे भाग्य नाही देवा ॥ विरो-
॥ धी नाम सवछरे वर सोमवार × ठीक
॥ च्यार दिवस ॥ आसे तुकाराम नीजे
॥ धाम मंदिर गेले औसे ॥ संताजी ते-
॥ ली जेगनाड्या चाकणकर ॥ माहादा
॥ गंगाराम मवाळ ॥ टाळकरी ॥

गं. ना. मुजुमदार

# ५४ गाणपत्यांची एक यादी

माझे स्नेही श्री. दादासाहेब ओंकार यांच्या एका जुन्या हस्तलिखित बाडांत गणेशयोगी, निरंजन, मोरया गोसावी, गोसावीसुत (वासुदेव), निरंजनात्मजसुत, केशव गुरु निरंजन, चिंतामणी, नारायण, व भागीरथी ह्या गाणपत्यांनीं केलेले गणपतिपर अभंग, ओवी, पदें, आख्यानें, कटिप्रबंध, आरत्या, भुपाळ्या, पाळणे, स्तोत्रें, श्लोक वगैरेंचा पुष्कळ भरणा आहे. त्यापैकीं एका कटीबंधांत गणपतिभक्तांची एक मालिका दिली आहे. तीपैकीं कारणापुरता उतारा खालीं दिला आहे. या मालिकेंत श्रीमंत पंत प्रधान नानासाहेब पेशवे व त्यांचे पुत्र श्रीमंत माधवराव रावसाहेब यांचीं नांवें आहेत.

सदरहू बाडाचीं पानें पाठपोट १६७ लिहिलेलीं असून तें सुमारें १२५ वर्षांपूर्वी लिहिलेलें असावें.

चिंचवडीं ते मोरेश्वरगोसांवि ख्याते रूपे बहुतें लंबोदर हेमाडपंत गोसांविनंदन चतुर साचा चिंचवडीं मोरेश्वरदेव श्रीचिंतामणि नारायण नृप चिंतामणि धरणीधर देवादिक नारायण मयुरेश्वर गुरु अनंतरूपें अवतरलासे या धरणी प्रति किती यथामति कथन करावें तथपि भावें बोल बोबडे हे ऐकावे हो श्रीनिरंजन सज्जनरंजन भवभयभंजन सुत रत्नाकर देव तनय गुरु ढुंडिराजमहाराज विराजे काशिनाथ अनाथा तारक विश्वनाथ निजशांत स्वरुपीं भगवत्पर भगवंत देव भूदेव कपेश्वर चरणी तत्पर अनंत मूर्ति तारक श्री बल्लाळ देव कृत पुराण गणपति प्राकृत आकृति टिका विराजे जीवन हरि रघुनाथ देव कृष्णाप्पा मंगलमूर्ति चिमणा वैद्य सदाशिव गणेश भटजी भिकभट बाळंभट नारायणभट मल्हारि हरभट केळे केशव गोळे महा धुरंधर अनेक शिष्यत्वाच्या पंक्ति कथन सरेना शरणागत मयुरेशचरणा प्रभुवर पंत प्रधान नाना तत्सुत माधवराय विराजे अष्टप्रधानादिक हि सहजें तथा प्रजा हें वचन हि जाणा आत्मानात्मविचार प्रमाणा जाणुनि केशवसुत मयुरेश्वर दास मिरें करि वंदन चरणा हो

गं. ना. मुजुमदार

# ५५ शिवाजी महाराजांचा वाडा

१ श्रीशिवाजमिहाराज यांच्या पुण्यांतील राजवाड्यासंबंधाची हकीकत 'Gazetteer of the Pombay Presidency Volume XVIII Part III Poona ' ह्या पुस्तकाच्या ३३१ व्या पानावर खालीलप्रमाणें देण्यांत आली आहे:—

" The Ambarkhána, literally the Elephant-carriage-house, in Kasaba Ward originally known as Lal Mahal or the Red Mansion was built in 1636 to the south of Poona fort by Shahaji for the use of his wife Jijibai (Jijábai ?) and her son Shiwaji (1627-1680) then a boy of twelve. It was strongly built and had many under-ground rooms, some of which remain.........The name Ambarkhana or Elephant-car-house was given to the palace under the Peshawas when it was turned into a store-house for elephant-cars or "*ambaris* ". ह्या च माहितीचा अनुवाद रा. गायकवाड यांनीं आपले पुणें-वर्णनांत केला आहे. सार्वत्रिक समज हि असाच आहे कीं, येथील म्युनिसिपालिटीकडून जो पाडण्यांत आला तो शनवार वाड्याचे पूर्वेकडील अंबरखाना, हा च शिवाजीमहाराजांचा वाडा; येथें च महाराजांचें बालपण गेलें, व ह्याच वाड्यांत महाराजांनीं शाहिस्तेखानाचीं बोटें छाटून त्यास नामोहरम केलें. परंतु ग्यांतिटिअरकार व त्याचे अनुयायी अंबरखान्याला च शिवाजी महाराजांचा वाडा असें कोणत्या आधारावर म्हणतात, हें कळत नाहीं.

२ शिवाजीचे लालमाहालाचा श्रीमंत पेशव्यांनीं हत्तींच्या अंबाऱ्या ठेवण्याकडे उपयोग केला असें बेधडक लिहून, अंबाऱ्या ठेवण्याची जागा ती अंबरखाना अशी अंबरखान्याची ग्य झिटिअरकरानें दिलेली व्युत्पत्ती तर अजब आहे ! वास्तविक महाराष्ट्र-साम्राज्यसंस्थापक श्रीशिवाजी महाराजांसंबंधानें व त्यांच्या पश्चात् गादीवर आलेल्या छत्रपति संभाजीमहाराजांसंबंधानें पेशव्यांच्या ठिकाणीं किती विलक्षण आदरबुद्धि होती, हें खालील प्रमाणांवरून स्पष्ट होईल. श्री. नानासाहेब पेशवे हे शके १६७४ कार्तिक व. १० रोजीं पिलाजी जाधवराव यांस लिहिलेल्या पत्रांत "आम्हीं गनीम लोक शिवाजमिहाराजांचे शिष्य आहों" असा अर्थ पूर्ण मार्मिक व ठसकेदार इषारा देतात

( राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ६, पृष्ठ ३५६ ); व श्री. सवाई माधवराव साहेब कसबे संगमेश्वर येथील श्रीसंभाजी महाराजांचे राजवाड्याचे चौथऱ्यावर सदाशिव दादाजी मावळंगकर यानें हट्टानें बांधिलेलें घर मोडून, सदरील जागा चौथऱ्याजवळ असलेल्या महाराजांच्या बागेतुद्धां इ. स. १७९० मध्यें "सरकारांत ठेविनात" (सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, भाग. १, पृष्ठ ४१।४२). आपणांस अभिमानपूर्वक शिवाजीचे शिष्य म्हणविणारे व संभाजी महाराजांचे वाड्याचें काळजीपूर्वक संरक्षण करणारे पेशवे, छत्रपतींच्या वाड्यांत अंबाऱ्यांचें ढीग घालण्या-इतके कृतघ्न बनतील ही कल्पना चिलकुल संभवत नाहीं. ग्याझिटिअरकारानें ही माहिती कोठून आणिली ईश्वर जाणे !

३ वास्तवीक अंबरखाना, ह्या शब्दाचा अर्थ धान्यागार असा आहे. धान्याच्या कोठाराला अंबर हा शब्द अजून हि लावितात. प्रस्तुतच्या अंबरखान्याची बखळ करितांना, खालीं एका अंगास कोठ्या दिसत होत्या व त्या धान्याच्या च असाव्या, असें चटकन लक्षांत येई. अंबरखाना म्हणजे धान्य ठेवण्याची जागा. तिच्या अंबाऱ्या किंवा राजवाडा ह्यांशीं, अर्थात् कांहीं एक संबंध नाहीं. तस्मात् शिवाजीमहाराजांचा वाडा कोठें तरी निराळ्या ठिकाणीं असला पाहिजे. यास एक विचारणीय प्रमाण आहे. ता. २८।६।११ चे केसरींत, महाराष्ट्रांतील शिवकालीन समाजरचना, या निबंधात रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांनीं खालील हकीकत दिलेली आहे. "पंचवीस तीस वर्षांपाठीमागें पुण्यास सकपाळ नांवाचा वृद्ध मराठा असे; तो कोटांतील पुरंदऱ्यांच्या वाड्याशेजारील शिवाजीमहाराजांच्या जुन्या घराच्या बखळीचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नाला स्पर्श करीत नसे" ह्यावरून श्रीशिवाजी महाराजांचा वाडा जुन्या कोटांत पुरंदऱ्यांचे वाड्याशेजारीं जी बखळ (घ. न. १३५६ कसबापेठ) सांप्रत दिसते तीवर असावा. त्या बखळीवर वाडा असावा असा अद्याप हि भास होतो, कारण बखळीच्या पायांस दोन बुरूज असून एक दगडी जिना आहे. व म्हणून नेमनिष्ठ वृद्ध सकपाळ ह्याची माहिती हि विश्वास्य दिसते. अंबरखाना कसबा पेठच्या बाहेरच्या टोंकास आहे; परंतु शिवकालीन पुण्याचा विस्तार लक्षांत घेतां, वाडा पेठेच्या या टोंकास नसून पुरंदऱ्याचें वाड्याचे आसपास नदीलगत असावा, हें च सिद्ध होतें रा. ब. पारसनीस इतिहास—संग्रहाच्या चवथ्या वर्षाचे पहिल्या जोड अंकांत पुण्याचे राजवागेची माहिती देतांना. शिवाजीचे वाड्यास रजमहाल अशी संज्ञा चुकीनें देतात. महाराजांच्या वाड्यासंबंधाची ही हकीकत झाली. षाहिस्तेखानास ज्या ठिकाणाहून आपला जीव घेऊन पळून जाणें भाग पडलें तें इतिहासप्रसिद्ध ठिकाण हल्लींच्या सदाशीव पेठेच्या एका भागातलें असून, त्यावेळीं तेथें एक बाग व मोठा वाडा होता, असें एका प्रसिद्ध इतिहासभक्तानें मला नुकतें च सांगितलें.

४ पुण्यांतील ह्या व अशा च इतर महत्वाच्या बाबीं संबंधानें यथास्थित माहिती कोठें च उपलब्ध असूं नये व ग्याझिटिअरांवर व त्याच्याच आधारें अनुवादण्यांत आलेल्या माहितीवर सर्वस्वी विसंबून राहण्याचा प्रसंग यावा, या परती आश्चर्याची व दुर्दैवाची गोष्ट ती कोणती ? पुणें वर्णनपर एक पुस्तक कोणी जोशी उपनामक गृहस्थानें फार दिवसांपूर्वी छापून प्रसिद्ध केलें. रा. गायकवाड यानीं हि पुणेंवर्णन केलें आहे. जोशांचें पुस्तक सांप्रत मिळत नाहीं व गायकवाडांचे पुस्तकांत ग्याझिटिअरचा च अनुवाद आहे. अशा स्थितींत पुणेंवर्णनपर एकादें नवीन पण यथातथ्य माहिती देणारें पुस्तक प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. महाराष्ट्रांतील संशोधक ह्यासारख्या महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष पुरवून जुन्या पवित्र स्थळांचें लोकांस ज्ञान करविण्याचें श्रेय १०] घेतील, अशी आशा आहे.

पांडुरंग नरसिंह पटवर्धन

## ५६ क्षेत्र माहुलीसंबंधानें दोन सनदा

श्रीक्षेत्र माहुली हा गांव अफळे प्रकृति ६१ ब्राह्मणांकडे अग्रहार असून, अद्याप हि तो त्यांजकडे च आहे. तत्संबंधीं नुकत्याच उपलब्ध झालेल्या सनदा खालीं देत आहेत.

लेखांक. १

श्री

॰ श्री ॰
श्री ॥ राजाराम
नरपति हर्ष निदान
मोरेश्वर सुत नीळक-
ठ मुख्य प्रधान.

शिक्क्यांतलि अक्षरें
समजत नाहींत.

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके १९ श्रीमुखनाम संवछरे वैशाख शुध पुर्णिमा भौमवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री देशाधिकारी

व लेखक वर्तमान व भावी सुभा पा। वाई यांसी आज्ञा केली ऐसी जे वेदमुर्ति विनायकभट बिन नारायणभट अफळे व समस्त ब्राह्मण वास्तव्य स्थल मौजे माहुली सा। निच कृष्णवेणी सगम याचा विशी वेदमूर्ति हरभट बिन जनार्दनभट व विनायेकभट बिन येकनाथभट आफळे या उभयेतानी चदीचे मुकामी स्वामी सनीध येऊन विदीत केले की विनायकभट आफळे व समस्त ब्राह्मणास येदीलशहाचे वेळेपासून मौजे सा। मजकूर हा गाव इनाम चालत होता त्यावरि हा देश राजश्री कैलासवासी स्वामीस हस्तगत जाहला त्या दिवसापासून ब्राह्मणाचे इनाम अमानात करून ब्राह्मणाच्या योग्यता व कुटुंबे पाहून त्या त्या योग्य ब्राह्मणास धान्य देविले होते ते हा कालपावेतो चालत आले आहे त्या अन्नेकडून ब्राह्मणाची अग्नहोत्रे व कुटुंब सवरक्षण होता बहुत प्रयास होऊ लागले यास्तव स्वामीसनिध आलो आहे ऐसीयास माहाराज धर्मप्रभु कितेक देवब्राह्मणाचे इनाम पूर्वप्रकारे चालते केले तरी आपणास इदलशहाचे वेळेस गाव इनाम चालत होता त्या आलीकडे हा काळ पावेतो इनाम गाव न चालता भोगवटा तुटक आहे तरी पूर्वप्रकारे इनाम चालवावया आज्ञा केली पाहिजे म्हणोन श्रुत केले त्यावरून मनास आणिता विनायकभट अफळे व समस्त ब्राह्मण हे बहुत थोर जाले विद्यावंत कुटुंब व स्थल कृष्णातीरी वास करून राहाणार ऐसे जाणोन यास पूर्वी धान्य द्यावयाची मोईन आहे ते अमानत करून हाली नूतन इनाम मौजे माहुली सा। मजकुर हा गाव १ एक कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी जल तरु पाषाण निधि निक्षेप झाड झाडोरा पडले पानसहित सेरीज इमानती व हकदार करून इनाम दिल्हा असे तरी सदरहू वृत्ती येदलशाहाचे वेळेस सर्वमान्य ब्राह्मणास होता ते समई ज्या ज्या ब्राह्मणी अणभाविले असेल ते मनास आणून तेणेप्रमाणें त्या च ब्राह्मणास चालवणे हे वृत्ति यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणे वर्ष प्रतिवर्ष नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र विनायेकभट आफळे याजवळी परतोन देणे जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा.
जते.

लेखांक २

श्री

× ॰ श्री ॰ ×
शिव नरसिंह-
र्प निधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

स्वति श्री राज्याभिशक शके ३४ सर्वजितनाम संवछरे पौष्य बहुल चतुर्दशी मंदवासरे क्षेत्रीये कुलावतस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री देशाधिकारी लेखक वर्तमान व भावी प्रांत वाई यांसी आज्ञा केली ऐसीजे वेदमूर्ती विनायकभट बिन नारायेणभट आफळे व समस्त ब्राम्हण वास्तव्य स्थल मौजे माहुली सा निंब कृष्ण संगम याचेविशी वेदमूर्ती हरभट बिन जनार्दनभट व विनायकभट बिन येकनाथ आफळे या उभयतानी कसबे निंब पा मजकूर येथील मुकामी स्वामी सनिध येऊन विदीत केले की विनायकभट आफळे व समस्त ब्राम्हणास येदिल शहाचे वेळेपासून मौजे माहुली पा मार हा गाव इनाम चालत होता त्यावरी हा प्रांत राजश्री कैलासवासी स्वामीस हस्तगत जाला तेव्हा ब्राह्मणाचा गाव अमानत करून कुटुंबे व योग्यता पाहोन त्या योग्य धान्य देविले होते ते कित्येक दिवस चालिले तेणेकरून कालक्षेप न चाले म्हणून आपण राजश्री राजाराम याचे कारकीर्दीस चंदीचे मुकामी जाऊन कितेक प्रकारे विदित केले की धान्यानेच केवळ अग्निहोत्रे व कुटुंबे संरक्षण होत नाहींत माहाराजे पूर्व—इनाम चालिले आहे त्याप्रमागें चालावयास आज्ञा केली पाहिजे त्यावरून त्याणी मौजे मजकूर ब्राम्हणास इनाम करून देऊन देशाधिकारी यासी पत्र करून दिले आहे सांप्रत माहाराजाचे येणे जाले आहे तरी ज्याप्रमा पहिले इनाम चालत आहे त्याप्रमाणे करार करून देविले पाहिजे म्हणजे स्नान संध्यादि सत्कर्मे आचरोन सदैव माहाराजास व महाराष्ट्र—राज्यास कल्याग चिंतून सुखरूप राहूं म्हणून विदित केले त्यावरून मनास आणून पहिले पत्र वेदमूर्ती जवळी आहे ते हि अवलोकन केले व ब्राम्हण समुदाय भले वैदिक अग्नहोत्री याचे असीर्वादे करून राज्याचे व स्वामीचे कल्याण आहे याकरिता पेशजीप्रमाणे यासी मौजे माहुली सा निंब पा मार हा गाव कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी जल तरु पाशाण निधि निक्षेप झाडझाडोरा पडिले पानसहित खेरीज इनामती व हकदार करून देह सुमार १६ येक रास इनाम करार केलेला असे

तरी सद्रहू वृत्ती येदिलशहाचे वेळेस सर्वमान्य ब्राह्मणास होता ते समई ज्या ज्या ब्राम्हणी अनभविले असेल ते मनास आणून तेणे प्रा त्याच ब्राम्हणास पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा उजूर न करणे या पत्राची प्रती लेहोनु घेऊन असल पत्र विनायकभट आफळे याजपासी भोगवटीयास परतोन देणे जाणिजे

मयादेयं
विराजते

पां. न. पटवर्धन

---

## ५७ गुजराथ

—•∞—

१ अमरकोशांत खालील श्लोक आहे:--

विद्याधरोऽप्सरोयक्षरक्षोगन्धर्वकिन्नराः ।
पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोऽमी देवयोनयः ॥ ११ ॥ [१०
स्वर्गवर्गः ।

ह्या श्लोकांत (१) विद्याधर, (२) अप्सरस्, (३) यक्ष, (४) रक्षस्, (५) गन्धर्व, (६) किन्नर, (७) पिशाच, (८) गुह्यक, (९) सिद्ध व (१०) भूत, हीं दहा नांवें देवयोनींची आहेत, असें म्हटलें आहे. देवयोनि ह्या समासाचा विग्रह, देवाः योनिः एषां ते देवयोनयः, असा भानुजी दीक्षित करतो. देवयोनयः म्हणजे देवांशकाः असें हि भानुजी दीक्षित सांगतो. ह्या विग्रहाचा ऐतिहासिकरीत्या अर्थ करूं. भानुजी दीक्षित इतिहासरीत्या अर्थ करीत नाहीं, हें आपल्याला माहीत आहे. भानुजी दीक्षिताच्या कालीं इतिहासरीतीचें खोचरें होऊन हजार पंधराशें वर्षें लोटलीं होतीं. अमरसिंह हि इतिहासदृष्टीनें देवयोनींचा निर्देश करीत नाहीं. त्याच्या हि कालीं इतिहासदृष्टि लुप्त होऊन बरींच शतकें गेलीं होतीं. देव म्हणजे अमर अति-[१०
मानुष कोटींतील प्राणी, असा अर्थ अमरसिंह करतो व त्या अतिमानुष कोटींतील प्राण्यांच्या योनींत अंशतः जे जन्म पावले त्यांची गणना विद्याधरादि कोटींत तो करतो. देव किंवा विद्याधरादि जीव मनुष्य प्राणी असावे किंवा आहेत, असा संशय

हि अमरसिंहाला नाहीं, तसा संशय वर्तमानकालीन जे आपण त्यांना येतो. देव म्हणुन कोणी मनुष्यप्राण्यासारखे च लोक आहेत व विद्याधरादि लोक देवांपासून देवेतर जातींतील स्त्रियांच्या ठायीं झालेले Half-caste ऊर्फ देवांश आहेत, असें म्हणण्याकडे इतिहासदृष्टि धावते. देवांच्या बीजाचा अंश ज्यांच्या हाडामासांत खेळत आहे ते देवांश किंवा देवयोनि. हे विद्याधरादि देवांश तुमच्या आमच्या सारखे मनुष्य होते.

२ ह्या दहा देवयोनींपैकीं ( १ ) विद्याधर हे पुराणें व इतिहास यांत प्रसिद्ध आहेत. जिमूतवाहनादि विद्याधरांपासून कोंकण व कऱ्हाड येथील शिलाहार राजे उत्पन्न झाले. हे विद्याधर काश्मीराच्या पूर्वेस हिमालयांत रहात असावे. विद्याधरमिथु नांचा उल्लेख संस्कृत ग्रंथांत येतो. (२) घृताची, मेनका, रंभा, उर्वशी वगैरे अप्सरा पुराणेतिहासांतून मशहूर आहेत. ह्यांना अमरसिंह स्वर्वेश्या म्हणतो. अप्सरस् शब्द स्त्रीलिंगी चालतो. मेरु पर्वताच्या दक्षिणेस सध्या जो काश्मीर म्हणून देश आहे तो सरोवरांनीं व्याप्त आहे. त्या सरोवरांत वावरणार जे लोक ते अप्सरस् होत. अप्सरांचा सौंदर्याबद्दल ख्याति असे. सध्यां हि काश्मीरांतील स्त्रिया सौंदर्याबद्दल प्रख्यात आहेत. तेव्हां ह्या अप्सरांचा देश पुरातनकालीं सध्याचा काश्मीर असावा, असें निश्चित अनुमान होतें. ( ३ )कुबेराची राजधानी अलका व त्याचें राज्य गुह्यक, यक्ष, रक्षस् व किन्नर या चार लोकांवर असे. पैकीं किन्नर म्हणजे मयु हें दुसऱ्या एका लेखांत मी दाखविलें आहे. हिमालयांतील कैलासपर्वतावर अलका हें नगर होतें. व त्या अलकेच्या भोंवतीं यक्ष, रक्षस् व किन्नर या लोकांचे मुलूख होते. कुबेराचें मुख्य नांव गुह्यकेश्वर. या गुह्यकां संबंधानें पुढें वशेष्यानें लिहितो. (४) पिशाचपुर ऊर्फ पेशावर प्रांतांत रहणारे जे ते पिशाच. ( ५ ) गंधार देशांत रहाणारे जे ते गंधर्व. (६) भूतानांत पुरांतनकालीं रहाणारे जे ते भुत. ( ७ ) सिद्ध हे हि हिमालयांत च रहणारे लोक असावे. परंतु त्याचें अमुक च स्थान असें नक्की सांगतां येत नाहीं. तात्पर्य, अमराच्या ह्या श्लोकांत उल्लेखिलेले लोक हिमालयाच्या आसपासच्या प्रांतांतील पुरातन रहिवाशी होत.

३ पैकीं गुह्यकांसंबंधानें येथें विशेषतः लिहावयाचें आहे. गुह्य, गुह्यक हे लोक कुबेर ज्या वंशांत झाला त्या पैकीं होते व देवांश होते. गुह्यकेश्वर, गुह्यराज्, गुह्यकराज् हीं जशीं कुबेराचीं नांवें, तसें गुह्यराज् हें नांव कालान्तरानें सर्व गुह्यकांनीं स्वीकारलेलें दिसतें. बहुतेक सर्व मराठे क्षत्रिय स्वतःस जसे राव या पदवीनें भूषवि ण्यांत अभिमान बाळगितात, तसें हे गुह्यक आपणास गुह्यराज् ह्या पदवीनें भूषवीत असावे. ह्या गुह्यराज् शब्दाचा अपभ्रंश गुज्जराअ. गुज्जराअ शब्दाचा अपभ्रंश गुज्जर. गुज्जर शब्दाचें पुनः संस्करण गुर्जर. हे गुज्जर किंवा गुर्जर लोक कालान्तरानें व

सोईप्रमाणें पंजाबांत, रजपुतान्यांत व गुजराथेंत शिरले. गुह्यराष्ट्र म्हणजे गुह्यांचें राष्ट्र. गुह्यराष्ट्र या शब्दाचा अपभ्रंश गुज्जराठ किंवा गुजराथ. हा गुजराथ शब्द पंजाबांतील एका प्रांताला व काठेवाडानजीकच्या दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशाला लावतात. कारण या दोन्ही प्रदेशांत गुह्य लोकांनीं वसाहत व अंमलचजावणी केली.

४ हे गुह्य ऊर्फ गुह्यक लोक देवांश होते, म्हणजे मानवांना ऊर्फ आर्यांना जे प्रिय देव त्यांच्या बीजापासून उत्पन्न झालेले होते. अर्थात् चातुर्वर्णिक आर्यांत सर्व तन्हांनीं समाविष्ट होण्याला लायक होते. ह्या गुर्जर, ऊर्फ गुज्जर, ऊर्फ गुह्यक, ऊर्फ गुह्य लोकांचें खरें मूळ व खरी व्युत्पत्ति माहीत नसल्यामुळें, त्यांचें परिगणन कित्येक शोधकांनीं Foreign tribes, म्हणजे Un hindoo tribes ह्या मथळ्याखालीं केलें आहे व चातुर्वर्णिक हिंदूंत वर्णहीन म्लेंछांचा समावेश पूर्वी होत असे हा असिद्धान्त ठरविण्यास ह्या अप्रतिष्ठित तर्कांचा आधार घेतलेला आहे. खोट्या व्युत्पत्तींनें खोटे व धेडगुजरी सिद्धान्त निष्पन्न होतात, हें स्पष्ट आहे.

वि. का. राजवाडे

# ५८ मयु

—००—

१ "The earliest of these Indo-Parthian kings apparently was Maues or Mauas who obtained power in the Kábul valley aud Panjáb about 120 B. C., and adopted the title of 'Great king of Kings'".

ह्याप्रमाणें Vincent Smith ( Early History of India, P. 202 First Edition ), Maues हा कदाचित् Indo-Parthian वंशाचा राजा असावासा दिसतो, असें लिहितो. तात्पर्य, Maues Indo-Parthian असावा किं नसावा ह्या बद्दल इतिहासकारांस संशय आहे. Maues हा Indo-Parthian वंशाचा नाहीं, हें सिद्ध करण्यास मजजवळ कांहीं सामग्री जुळली आहे, ती इतिहासज्ञांच्या पुढें मांडण्याची परवानगी घेतो.

२ विष्णुपुराण-- चतुर्थांश--अध्याय २४--अंक १३:--

"ततश्चाष्टौ यवनाः चतुर्दश तुषाराः मुंडाश्च त्रयोदश एकादश मौनाः ।"

असें वाक्य आहे. ह्यांत मौनाः म्हणून जो शब्द आहे तो व Maues हा शब्द एक च आहेत, असें मी म्हणतों.

३ अमरकोश-- प्रथम कांड-- स्वर्गवर्ग-- ७२

"स्यात् किंनरः किंपुरुषस्तुरंगवदनोमयुः "

या श्लोकांतील मयुः हा शब्द व नाण्यांवरील Maues शब्द एक आहेत. Maues या अक्षरांचा उच्चार मयुस् अथवा मयुः-मयुस् हा किंनरवाचक शब्द आहे, म्हणून अमरसिंह सांगतो. तें जर खरें असेल, तर Maues हा राजा किंनरवंशीय होता, व Indo-Parthian नव्हता, असें म्हणावें लागतें.

४ विष्णुपुराणांत अकरा मौनानीं राज्य केलें, असें सांगितलें आहे. Vincent Smith मयूंची याद येणेप्रमाणें देतोः--

(1) Maues. (2) Onones. (3) Azes. I (4) Azilises. (5) Azes II (6) Gondophares or Guduphara. (7) Abdagases. (8) Orthagnes (9) Arsakes. (10) Pakores. (11) Sanabares.

Vincent Smith हि विष्णुपुराणांतल्या प्रमाणें च अकरा मयुंनीं राज्य केलें, असें हिंदू व युरोपीयन शोधकांच्या शोधांवरून म्हणतो. अर्थात् विष्णुपुराणांतील मौन म्हणजे युरोपीयन शोधकांचे व अमरसिंहाचे मयू होत ह्यांत संशय नाहीं. मयु पासून मौन हा अपभ्रंश असा निष्पन्न होतो. मयु तील यु चा उच्चार सानुनासिक होत असावा.

मयुँ = मऊँ = मउन = मौन

अनुनासिकाचा न असा उच्चार होतो. मयुन, मउन अशा परंपरेनें मौन असें अपभ्रष्ट रूप साधलेलें आहे व तें च विष्णुपुराणकर्त्यानें स्वीकारलेलें आहे. अमरसिंहानें मूळ मयु असें शुद्ध रूप दिलेलें आहे.

५ हे मयु ऊर्फ किंनर लोक अलकेस राहणाऱ्या किन्नराधिपतीचे म्हणजे कुबेराचे परिचारक होत. अलका हें नगर काश्मीराच्या उत्तरेस आहे. ह्या प्रदेशाच्या शेजारीं च पश्चिम दिशेस किंपुरुषवर्ष आहे. किंपुरुषवर्ष म्हणजे किन्नरांचा देश जंबुद्वीपाचा एक भाग आहे. मौर्यांचें राज्य बुडाल्यानंतर जो गोंधळ उडाला व जी बजबजपुरी माजली त्या कालांत कुबेराच्या ह्या मयु नामक परिचारकांनीं काबुल व पंजाब या दोन प्रदेशांत कांहीं काळ आपली सत्ता उभारली.

६ तात्पर्य Maues ऊर्फ मयु वंशांतील राजे किन्नरजातीय होते, Indo-Parthian ऊर्फ पारदजातीय नव्हते, असें निश्चयानें म्हणतां येतें.

वि. का. राजवाडे

## ५९ तुषार

१ विष्णुपुराणाच्या चतुर्थांशाच्या चोविसाव्या अध्यायाच्या तेराव्या कलमांत खालील वाक्य आहे:--

"तत श्चाष्टौ यवनाः, चतुर्दश तुषाराः,
मुंडा श्च त्रयोदश, एकादश मौनाः ।"

ह्या वाक्यांतील चतुर्दश तुषार कोण व कोठील हें शोधावयाचें आहे.

२ Historian's History of the World च्या सातव्या खंडाच्या ६० पानावर खालील वाक्य आहे:—

" Strabo says that the nomadic peoples of the Asii, Pasiani, Tochari, and Sacaraucæ, dwellers in the land of the Sacæ, beyond the Jaxartes, opposite to the Sacæ and Sogdians, came and took Bactria from the Greeks."

ह्या वाक्यांत Tochari, तोखारी, म्हणून शकदेशांत रहाणारे जे परके लोक वर्णिले आहेत ते च विष्णुपुराणांतील तुषार होत. चौदा तुषारानीं राज्य केलें, म्हणून विष्णुपुराणकर्ता लिहितो.

तुषार = तुखार = तोखार

हे तुषार यवनांचे व मौनांचे समकालीन असावे. B. C. १४० नंतर ह्या तुषार लोकांचें नांव ऐकूं येतें.

वि. का. राजवाडे

## ६० भांडारी

१ कोकणांत भांडारी नामक दर्यावर्दी लोकांची जात आहे. ह्या लोकांत मायनाक, रामनाक, वगैरे नाकप्रत्ययान्त नांवें असतात. नाक हा नाग ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. उघड आहे कीं हे भंडारी लोक नागवंशीय आहेत. ह्यांचा पिढीजात धंदा दर्यावर्दीपणाचा आहे. संस्कृतांत भांड म्हणजे गलबत. गलबतांनीं समुद्रावर हालचाल करणारे जे ते भांडाहार.

भांडाहार = भांडार

भांडार ते च भांडारी.

२ महारांच्या हि नांवांपुढें नाक, नाग हे शब्द लागतात. तेव्हा महार हि नागवंशीय होत.

३ भारतांत नागांच्या वंशावळी दिलेल्या आहेत. त्यापैकीं बहुतेक सर्व वंश सध्यांच्या मराठा क्षत्रियांत आढळतात. इतिहाससंग्रहाच्या दुसऱ्या वर्षाच्या चवथ्या अंकांत नागांविषयीं मीं एक विस्तृत लेख लिहिलेला आहे. त्यांत नागवंशीय मराठा क्षत्रियांच्या आडनांवांचा ऊहापोह केला आहे.

४ तात्पर्य, प्राचीन नागलोकांत क्षत्रिय, नावाडी व अतिशूद्र अशा तीन जाति
२०] असाव्या किंवा होत्या, हें निःसंशय आहे.

वि. का. राजवाडे

## ६१ मौजे चिंचोली येथील गहिनीनाथाचे देवालयावरील शिलालेख

श्रीगैबीपीर

देवळ बांधले लमानराव सहानव
फतेजग बा। दुर मोकदम
मौजे चींचोली, चकले पाटवदे
मामले बीड सके १६१९ वी
स्वर नाम सवछरे जे
२०] ष्ट सुध त्रयोदसी सन ११६६

अहमदनगर जिल्ह्यापैकीं जामखेड तालुक्यांत चिंचोली गांवचे हद्दींत घाटावर खोलग्यांत श्रीगहिनीनाथाचे देवालय आहे. येथें पूर्वी हेमाडपंती देऊळ होतें. तें औरंगजेब बादशहानें पाडून तेथें कबर बांधली होती. त्यावर लमानराव यानें पुत्राकरितां नवस केलेला होता त्याप्रमाणें पुत्र झाल्यावर हें देऊळ बांधलें.

लमानराव सहानव हा जातीचा लमान असून मथुरा येथील रहणारा होता. तो नेहमीं या देवालयाच्या टेंकडीवर तांडा घेऊन बैल विकावयास येत असे. त्यास

संतति नसल्यामुळें त्यानें श्रीगहिनीनाथास नवस केला. त्याची इच्छा पूर्ण झाल्यावरून त्यानें हें देऊळ बांधलें असें तेथील वृद्ध लोक सांगतात.

मौजे चिंचोली येथें पूर्वी 'महारनवर' आडनांवाचे मोकदम पाटील होते. त्यास फत्तेजंग बाहद्दर मोकदम हा किताब होता. हे अतिशय आडदांड असून शेजारच्या पांच पन्नास कोसांच्या टापूंत लुटारुपणा करीत असत. पुढें पेशवाईंत 'सकु रुद्राजी' नांवाचे सरदारानें ह्यांचें प्रस्थ मोडून यांच्या गढीवरून गाढवाचा नांगर फिरवून समूळ नाश केला. त्यांचे हल्लीं असलेले वंशज रखेपासून झालेले आहेत. याप्रमाणें थोडी माहिती समजते. लखनराव व फत्तेजंग बाहद्दर यांचा एकत्र उल्लेख वरील शिलालेखांत आला आहे यामुळें परस्परभिन्न दंतकथांवर कितपत विश्वास ठेवावा हें समजत नाहीं.

सदरहू देवालयाचे पुजारी "मुजावर" यांजकडे जुन्या सनदा, ताम्रपट वगैरे आहेत असें खात्रीलायक समजतें. परंतु ते दाखवीत सुद्धां नाहींत.

प्रस्तुत शिलालेख देवालयाचे दरवाजावर १८"×१४" लांबीरुंदीच्या दगडावर उठाव अक्षरांत आहे.

या देवालयांतील कबरीची पूजा हिंदु व मुसलमान करितात.

या शिलालेखाचा उतारा व त्यासंबंधीं इतर माहिती माझे मित्र रा. विष्णुपंत रामचंद्र देशपांडे यांनीं लिहून मजकडे पाठविली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

गं. ना. मुजुमदार

## ६२ कचेश्वरकृत आत्मचरित्र

१. महाराष्ट्रांतील ह्या मध्यकालीन कवीसंबंधानें, रा. राजवाडे यांनीं माजी श्रीसरस्वतिमंदिराच्या आठव्या वर्षाचे आठव्या अंकांत 'संकीर्ण लेख' ह्या मथळ्याखालील आपल्या लेखांत खेड येथील राजगुरूंच्या जवळील अस्सल कागदपत्रांवरून बरीच माहिती संकलित केल्यानंतर, सदर कवीसंबंधानें अत्यंत त्रुटित व पुष्कळ ठिकाणीं चुकांनीं व्याप्त अशी माहिती इतिहाससंग्रहाच्या पहिले वर्षाचे पांचवे अंकांत आलेली आहे. शिवाय राजारामप्रासादीकृत भक्तमंजरीमालेच्या ७३ वे अध्यायांत ह्या कवीसंबंधानें माहिती दिलेली असून, अकोलें येथील महाराष्ट्र-

साहित्य-संमेलनप्रसंगीं रा. ब. पारसनीस यांनीं हि सदर कवीसंबंधानें गौरवपर उद्गार काढिले आहेत. चाकण येथील ह्या ब्रम्हे कुलोत्पन्न कवीच्या घराण्याचे दुसरें शास्त्रसंबंधानें मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या १५ व्या खंडांत—शिवकालीन पत्रव्यवहाराच्या पहिल्या खंडांत—' चाकण-ब्रम्हे ' ह्या सदराखालीं रा. राजवाडे यांनीं बरेच ऐतिहासिक महत्वाचे कागद उजेडांत आणिले आहेत. सदर कवीसंबंधानें आजतागायत प्रसिद्ध झालेल्या सामुग्रीचा हा त्रुटित इतिहास होय.

२. शोधाअंतीं अनीत ता. सातारा येथें तेथील इनामदार श्री. रा. महादाजी विश्वनाथ ऊर्फ बाळासाहेब राजगुरू यांजवळ सदर कवीचें संपूर्ण आत्मचरित्र उपलब्ध झालें. सदरहू आत्मचरित्राचा उत्तरार्ध रा. राजवाडे यांस खेड येथें मिळाला होता व त्यांनीं तो ' मंदिरां'तील आपल्या लेखांत दिला आहे. मजला कचेश्वराचें सबंध आत्मचरित्र मिळाल्यामुळें, उत्तरार्धापुरता पुनरुक्तीचा दोष माथीं घेऊन हि, सदर आत्मचरित्र येथें सामग्र्यानें देत आहें. इतिहाससंग्रहाच्या लेखकानें आपल्या माहितींत कचेश्वराच्या कोणी शिष्यानें ' आदि ' नांवाचा सदर कवीसंबंधानें चरित्रात्मक ग्रंथ रचिल्याचें लिहिलें आहे, परंतु उपलब्ध झालेल्या ह्या चरित्राचे आद्यंतीं ' आदि ' शब्दाचा उपयोग केलेला असल्यामुळें, व तो हि ग्रंथवाचक च आहे हें उघड असल्यामुळें, कवीच्या कोणी शिष्यानें ' आदि ' नांवाचा ग्रंथ रचिल्याचें दिसून येत नाहीं.

३. दोन दत्तपदांकित मुकुंदाचे आत्मचरित्रावरील आपल्या लेखांत* रा. गो. का. चांदोरकर यांनीं ' निरंजन माधवाचें त्रोटक आत्मचरित्र, प्रत्येक संत कवीची गुरुपरंपरा, व विष्णुदासनामा अगर नामदेवराय यांची तीर्थावली या वांचून इतरत्र आत्मचरित्र अथवा प्रवासवर्णन उपलब्ध असलेलें पहाण्यांत अगर ऐकण्यांत नाहीं ' असा उल्लेख केला आहे व तो एका दृष्टीनें यथार्थ हि आहे. त्यांच्या ह्या आत्मचरित्राच्या व्याख्येंत आजचें कचेश्वराचें आत्मचरित्र हि येत असल्यामुळें, तें जमेस धरणें इष्ट व युक्त आहे.

४. हा कवि चाकणच्या ब्रम्हे घराण्यांतील होय. याचे आजे मेंगनाथ बिन शंकरभट यांजकडे शिवरायांच्या घरचा ' ब्राम्हत्वाचा अधिकार ' पूर्वापार होता व त्याजबद्दल त्यांस शाहजीराजे यांचे कारकीर्दींत शंभर होनांचें वर्षासन चालू होतें, असें शाहजी राजे यांचे वेळच्या सनदेच्या नकलेवरून म्हणतां येतें. कवीच्या बापाचें नांव सिद्धेश्वर. वर उल्लेखिल्याप्रमाणें शंकर—मेंगनाथ—सिद्धेश्वर—कचेश्वर अशी वांशिक परंपरा निष्पन्न होते. कचेश्वरकृत आत्मचरित्रावरून त्याचा जीवनवृत्तांत ठोकळ मानानें अजमावतां येण्यासारखा आहे. बाळपणीं असलेला हूडपणा, घरांतील वडील मंडळींचा व ह्याचा ह्याचे वर्तनामुळें उडत असलेला खटका, त्याची जुन्नर व

* पहा भा. इ. सं. मंडळ—ग्रंथमाला पु. ४ थें, भाग २, पृ. १८२.

खेड इत्यादि ठिकाणची भ्रमंती, तुकारामशिष्य व त्याचे चौदा टाळकऱ्यांपैकीं एक अंबाजीपंत लोहगांवकर यांजकडून त्यास मिळालेल्या तुकारामाच्या वह्या, तुकारामाचा स्वप्नांतील उपदेश व वाफगांवचे रानांत त्यास झालेली महाविष्णु-मूर्तिची उपलब्धी इत्यादि गोष्टींचा त्याचे संबंधींच्या कथाभागाशीं नामी मेळ बसतो. व ह्या दृष्टीनें पहातां, सदर कवीचें चरित्र लिहिणारास ह्या आत्मचरित्राचा बहुत उपयोग होणार आहे.

५ रा.राजवाडे आपल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या ४ थ्या खंडांत पृ.७८ वर जुन्नर शब्द व्युत्पादितांना, 'दक्षिणच्या इतिहासांत डॉ. भांडारकर म्हणतात कीं जुन्नर हा शब्द जुन्नर, जूननर, जूर्णनगर व जीर्णनगर, अशा परंपरेनें जीर्णनगर म्हणजे जुनें नगर ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा. माझ्या मतें जुन्नर हा शब्द शिवनेर वगैरे शब्दाप्रमाणें जुन्नर, जुन्नेर, जिवनेर, व जीवनीर अशा परंपरेनें जीविनीर ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा ' इ. इ. लिहितात. प्रस्तुत आत्मचरित्रांत कवीनें जुन्नर ह्या शब्दाऐवजीं 'जीर्णपूर' ह्या शब्दाचा उल्लेख केला आहे ( ओं. ७ ). माझ्या मतें, ' जीर्णपूर ' हें जुन्नर शब्दाचें संस्कृतीकारण होय.

## आदि बाबाची

परिसावें आतां । जालें वर्त्तमान । वेदावीण आन¹ । कांहीं नेणें ॥ १ ॥
कथा तों कोणाची । आयिकिली नाहीं । निंदा बहु देहीं । करूं वाटे ॥ २ ॥
काम क्रोधें लोभें । भरलेंसे पोट । विकार उद्भट । असे चित्तीं ॥ ३ ॥
संध्या स्नान निष्ठा । काडीचीही नसे । अहंता ते असे । दृढतर ॥ ४ ॥
छळावेंसें वाटे । पढतां द्विजांसी । त्यांचे या चित्तासि । क्षोभवावें ॥ ५ ॥
ऐसा अवगुण । परिपूर्ण देहीं । पाप पुण्य कांहीं । नये चित्ता ॥ ६ ॥
प्रपंचाच्या योगें । गेलों जीर्णपुरा² । होतों निदसुरा । कृष्णघरीं ॥ ७ ॥
कोण्ही येक कांहीं । उपदेश केला । पूजनासि चला । देवतेच्या ॥ ८ ॥
भ्रमास्तव त्याणी । आधिं हाकारिलें । मग उपेक्षिलें । नका येऊं ॥९॥
समागमी गेले । आदरें पूजेसी । माझिया मनासी । दुःख जालें ॥१०॥
तेव्हां वाटे चित्ता । शाक्त मी असतों । तरि हो बैसतों । शाक्तांमाजि ॥ ११ ॥
रात्रि गेल्यावरी । घेईन मी मंत्र । यंत्र मंत्र शास्त्र । विचारीन ॥ १२ ॥
ऐसा चित्तामाजि । केला दृढनेम । रात्र गेली याम । सार्द्ध त्रय ॥ १३ ॥
तावत्काळ निद्रा । आली नाहीं मातें । केव्हां आगमातें । धुंडाळीन ॥ १४ ॥
ऐसें विचारितां । कांहीं निद्रा आली । देहबुद्धि गेली । विचाराची ॥ १५ ॥
१०]सहस्रभोजनीं । कृष्णभट आले । स्वप्नीं म्यां देखिले । तयेवेळीं ॥ १६ ॥

---

१ अन्य. २ जुन्नर.

अद्भुत तें रूप । साजिरें सुंदर । मंद हास्यकीर । देखियलें ॥ १७ ॥
हात जोडूनियां । मातें विनविलें । म्हणे नव्हे भलें । मंत्रशास्त्र ॥ १८ ॥
हांसोनियां म्हणे । यांत न पडावें । सांगतों तें भावें । धरा मनीं ॥ १९ ॥
कर्णापाशीं माझ्या । श्रीमुख आणिलें । बीज सांगितलें । एकांतीचें ॥ २० ॥
नका करूं याचा । म्हणती अव्हेर । निज प्रणवाक्षर । हें चि जपे ॥ २१ ॥
ऐसा उपदेश । पडतांचि कानीं । होतें जें जें मनीं । तें तें गेलें ॥ २२ ॥
चित्ता दृढ आलें । गीता ही पढावी । आनंदें पाहावी । नित्य टीका ॥ २३ ॥
एक दीसीं घरीं । पुस्तक वाचितां । कांहीं आलें चित्ता । वडीलांच्या ॥ २४ ॥
तीर्थस्वरूपानीं । घातलें ताडन । गीतार्थ नमन । करूं नको ॥ २५ ॥
२०]घोकूनियां गीता । भावें पाठ केली । अविद्या चालली । हळू हळू ॥ २६ ॥
त्रिज्यापुरा गेलों । वडीलांच्या भेणें । पृछा नारायणं । मांडियली ॥ २७ ॥
पूर्वस्थिति आतां । नाहीं कां तुमची । स्थिति अर्जुनाची । काय जाली ॥ २८ ॥
नारायणें मातें । स्वप्नीं आज्ञा केली । गीता म्हणविली । यजमानें ॥ २९ ॥
दों कां ठायीं त्याणी । काढिलें अबद्ध । केली गीता शुद्ध । अष्टादशा ॥ ३० ॥
नारायणें कर । मस्तकीं ठेविला । भला म्हणे भला । स्वप्नामाजी ॥ ३१ ॥
तेथूनि प्रकट । गीता म्हणों लागे । सोडीलें उद्वेग । कांहीं कांहीं ॥ ३२ ॥
चमत्कार कांहीं । माझा मज आला । जीवासी लागला । गीताछंद ॥ ३३ ॥
जरि प्रभातेंती । न म्हणतां गीता । पाषाण तत्वता । ताडूं पाहे ॥ ३४ ॥
कोण्ही एक नर । दिव्य दीगंबर । हाणाया प्रस्तर । पाहे वेगीं ॥ ३५ ॥
२०]करितसे पूजा । भावार्थे लिंगाची । अध्यां[1] एक वाचों । नित्य नेम ॥ ३६ ॥
सहस्रनामाचा । करीं नित्य जप । मनीं वाटे व्याप । न करावा ॥ ३७ ॥
मध्यें कांहीं जाला । अघात विषाचा । तेणें देह साचा । जाला क्षीण ॥ ३८ ॥
विष पाडावया । नाना यत्न केले । सिद्धि नाहीं गेले । जाला श्रम ॥ ३९ ॥
विषाच्या संयोगें । लागलीसे धाप । रात्रिंदिस झोंप । स्वप्नी नसे ॥ ४० ॥
करूं काय आतां । ऐसें मज वाटे । देह जरि सूटे । तरी बरें ॥ ४१ ॥
मारीच्या[2] प्रसंगें । सिरोलिस गेलों । सुख जें लाधलों । सांगों काय ॥ ४२ ॥
हरिभक्तीं तेथें । आरंभिली कथा । भावार्थें सर्वथा । ऐकि(य)ली ॥ ४३ ॥
मला स्वस्त वाटे । करावें कीर्तन । संतांसिं नमन । करूं वाटे ॥ ४४ ॥
म्हणउनि गेलों । सेटक[3]ग्रामासी । नारायणापासीं । सर्व भावें ॥ ४५ ॥
३०]तया विनवीलें । द्यावीं पांच पदें । लेहुनि आल्हादें । तुकोबाचीं ॥ ४६ ॥
पृछा ऐकुनी । दिधलें उत्तर । अंबाजी[4]चें घर । तेथें जावें ॥ ४७ ॥

---

१ अध्याय. २ महामारी, पटकी. ३ सेड (जि० पुणें). ४ अंबाजीपंत लोहगांवकर.

सर्वही संग्रह । तुकोबाच्या वह्या । जावें लवलाहें । तुम्ही तेथें ॥ ४८ ॥
आज्ञा घेऊनियां । भावार्थे निघालों । देऊळासी आलों । विठोबाच्या ॥ ४९ ॥
देखोनियां देव । आनंदलें मन । ऐकिलें कीर्तन । संतामुखें ॥ ५० ॥
कथा जाल्यावरि । देखिलें कौतुक । मोठें अलौलिक । सांगवेना ॥ ५१ ॥
प्रत्यक्ष तुकोबा । करीतसे कथा । आनंदें सर्वथा । डोलसते ॥ ५२ ॥
कर्दळी हेलावे । जैसी चंड वातें । तैसें तुकोबातें । देखियलें ॥ ५३ ॥
भास गेला ऐसा । माझिया मनासी । पडेल भूमिसी । काय करूं ॥ ५४ ॥
म्हणुनीया खांदा । घेऊनि आंवरी । बळें ही सांवरी । आंवरेना ॥ ५५ ॥
ऐसा धीर केला । एक म्यां प्रहर । जालेंसे शरीर । क्षीण माझें ॥ ५६ ॥
जागिनला भाव । अंतरीं व्यापकें । कथा कौतुकें । पूर्ण केली ॥ ५७ ॥
ठेविचला माझ्या । मा‍थ्यावरी हात । स्वयें जाला गुप्त । स्वप्नामाजि ॥ ५८ ॥
तेथुनियां स्फूर्ति । तुकोबानें दिल्ही । येरेदिसीं केली । कथा दीनें ॥ ५९ ॥
स्वर ताळ ज्ञानें । नव्हेंन ठाऊकें । कथा कौतुकें । करविली ॥ ६० ॥
व्यथा जे जे होती । ते ते सर्व गेली । प्रचित घडली । माझी मज ॥ ६१ ॥
मग म्यां सोडीली । लोकीकाची लाज । ईनरासीं काज । काय माझें ॥ ६२ ॥
ब्राह्मण म्हणती । यासि काय जालें । कांहीं संचरलें । महद्भुत ॥ ६३ ॥
बापापासीं हूंवें । सांगती गार्‍हाणें । तुमच्या पुत्रानें । बुडविलें ॥ ६४ ॥
लाज येते आम्हा । वैदीक आमचा । पुत्र हा तुमचा । म्हणुनीयां ॥ ६५ ॥
नाचतो बाजारीं । यासि शिक्षा करा । येऊं नका घरा । देऊं तुम्ही ॥ ६६ ॥
भळत्यासि कैसें । करितो नमन । देतो आळींगन । लघूवर्णा ॥ ६७ ॥
ऐसें ऐकिलें । ब्राह्मणाच्या मुखें । अत्यंत त्या दुःखें । कष्टी जाले ॥ ६८ ॥
बोलति कष्टोनी । कोठें तीर्थरूप । कैसा पापरूप । पोटा आला ॥ ६९ ॥
त्यासि पढविलें । सर्व सिकविलें ॥ वृथा वायां गेलें । काय करूं ॥ ७० ॥
कष्टाचें सार्थक । माझ्या जालें नाहीं । म्हणोनि देहीं कष्टी जाले ॥ ७१ ॥
सांडि करुनियां । वेगळें घातलें । अन्नवस्त्र दिल्हें । थोडें बहु ॥ ७२ ॥
संतासि करिती । गाळीप्रदानाचें । अर्भक आमुचें । वेडें केलें ॥ ७३ ॥
वाळीत घालावें । कोण्ही बोलियलें । मजपासीं आले । कैसें आतां ॥ ७४ ॥
आवश्य म्हणुनी । आज्ञा म्यां दिधली । उकि तों खुंटली । ब्राह्मणाची ॥ ७५ ॥
सांभाळाया आले । हरिभक्त कोण्ही । देखिलें दुरूनि । दिनवाणें ॥ ७६ ॥
चिंता नको करूं । अर्शीर्वाद देती । धन धन्य येती । आपें आप ॥ ७७ ॥
आसीर्वाद त्यांचा । मानिला विश्वासें । जीव श्वासोश्वास । दाटलासे ॥ ७८ ॥
ईश्वराची माया । कोण्हाही कळेना । प्रेपिलें सदना । पत्र पंतीं ॥ ७९ ॥
नारायणें दील्हा । चव्होली मोकासा । जालासे भर्वसा । आहे देव ॥ ८० ॥

ईछा जाली चितीं । निस्पृह असावें । स्थळ दल्हिें देवें । तव्यापासीं ॥ ८१ ॥
काष्ट तोडावी ना । संकल्प म्या केला । देवें सिद्धि नेला । पण माझा ॥ ८२ ॥
विहीर खणावीं । ऐसी जाली वांछा । देवें तेही इच्छा । पूरविली ॥ ८३ ॥
पुजाविसी वाटे । महाविष्णूमूर्ति[1] । देवें अवचिती । तेही दील्ही ॥ ८४ ॥
विस्तीर्ण असावें । स्थळ कथेसाठीं । देवानें सेवटीं । पूर्ण दील्हें ॥ ८५ ॥
अग्नि होत्र घ्यावें । स्मार्ताग्निसहित । देवानें साहित्य । घडविलें ॥ ८६ ॥
करावीसी वाटे । स्वयें देवस्तुती । देवें दिल्ही स्फूर्ती । कवित्वाची ॥ ८७ ॥
जो जो हेत माझ्या । मनामाजि येतो । तो तो पुरवितो । स्वामि माझा ॥ ८८॥
कोठें ही अंतर । पडों नेदी कांहीं । संसाराची नाहीं । मज चिंता ॥ ८९ ॥
माझा अंगीकार । पूर्ण देवें केला । अनुभव आला । अंतरासी ॥ ९० ॥
मागें पुढें देव । मज सांभाळितो । बाळातें पाळितो । माय बाप ॥ ९१ ॥
आतां वगारण । करूं कास्यासाठीं । हृदयसंपुटीं । आला देव ॥ ९२ ॥
माझा योगक्षेम । चालवितो देव । त्यासि अहंभाव । पूर्ण माझा ॥ ९३ ॥
त्याणें उणें कांहीं । केलें नाहीं मज । इछिलें सहज । पावतों मी ॥ ९४ ॥
स्नानसंध्या माझी । नित्य चालवितो । कथा करवितो । अहोरात्री ॥ ९५ ॥
जाऊं नेदीं कोठें । आपल्या वेगळें । न धरी निराळें । बाळकासीं ॥ ९६ ॥
संकटाचा कांहीं । येऊं नेदी वारा । वारितो परभारा । स्वामि माझा ॥ ९७ ॥
होणारासारिखी । करितो सूचना । सादवितो दीना । होइं जागा ॥ ९८ ॥
किती उपकार । आठऊं स्वामिचे । सर्व खेळ याचे । आगणित ॥ ९९ ॥
अनंत ब्रह्मांडें । व्यापूनि भरला । पुरोनि उरला । निराळाची ॥ १०० ॥
इच्छाविना काडी । पानही न हाले । जग चाले बोले । सत्ता त्याची ॥ १०१ ॥
हानी मृत्यु लाभ । उत्पत्ति प्रळय । स्थिति समुदाय । कर्ता तोची ॥ १०२ ॥
याचा पार वर्णी । ऐसा आहे कोण । शेषाही संपूर्ण । वर्णवेना ॥ १०३ ॥
वेद नेति नेति । स्तवितां सिणले । तटस्त राहिले । अधोमुखें ॥ १०४ ॥
ब्रम्हादिक अंत । पाहतां भागले । साधक शिणले । ठाइं ठाइं ॥ १०५ ॥
तोचि कृपा करी । जरी दीनावरी । भुक्ति मुक्ति त्यान्ही । दासी होती ॥ १०६ ॥
वर्म आहे थोडें । स्वामीचें आईका । भक्तिभावें एका । वश्य होतो ॥ १०७ ॥
कलयुगामाजि । वर्णाश्रम धर्म । करूनि सत्कर्म । आचरावें ॥ १०८ ॥
ऐसें प्रेरूनियां । कथा करावितो । नित्य चालवितो । महाविष्णू ॥ १०९ ॥
पुढील प्रसंग । जाणे नारायण । अवस्थेचा प्रश्न । ऐसा आहे ॥ ११० ॥
पुढेचें उत्तर । वदावितो देव । बोले अनुभव । कचेश्वर ॥ १११ ॥
॥ इति आदिकथानुसंधानअवस्थाप्रश्न शुभमस्तु ॥ छ ॥ छ ॥

पां. न. पटवर्धन

---

१ ही मूर्ति खेडास आहे.

# ६३ कचेश्वरानें पाडलेला पाऊस

कचेश्वरानें आपल्या सामर्थ्यानें पाऊस पाडिला अशी एक दंतकथा रा. राजवाडे यांनीं 'मंदिरां'तील कचेश्वरावरील आपल्या लेखांत दिली असून, सदर कवीवर कोणा कवीनें रचिलेल्या एका अष्टकांत हि असाच उल्लेख सांपडतो. श्री. रा. गणपतराव जगन्नाथ ऊर्फ आबासाहेब राजगुरु इनामदार, अतीत, यांचेकडून कांहीं ऐतिहासिक कागद मला मिळाले त्यांत च खालीं दिलेले दोन्ही कागद होते. साधुसंतांचा पंचमहाभूतांवर हि पगडा चालू शकतो यासंबंधींचा प्रत्यक्ष पुरावा म्हणून कोणी हे कागद शिरीं धारण करतील, तर कोणी हे फक्त काकतालीयत्व होय असें आग्रहपूर्वक प्रतिपादितील. अशा प्रकारचे हे दोन्ही उद्देश कसे व कितपत साध्य होण्यासारखे आहेत याचा प्रस्तुत विचार न करितां, पूर्वकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक मनाचा ठाव घेणाऱ्या भावी इतिहासकाराकरितां हे दोन्ही कागद येथें सादर केले जात आहेत. ज्यानें त्यानें या कागदांचा आपापल्या इच्छेनुरूप खुशाल उपयोग करून घ्यावा.

शके १६०७ माघ शु. ७ बुधवार रोजचे पत्रावर चाकण परगण्यांतील चौसष्ट गांवच्या च मोकदमांच्या निशाण्या आहेत; तेव्हां संभाजीमहाराजांच्या राजवटींत चाकण परगण्यांत फक्त चौसष्ट च गांवें होतीं कीं काय हें समजत नाहीं. इतिहासदृष्ट्या हा ही प्रश्न विचार करण्यासारखा आहे. तसें च सदरहु चौसष्ट गांवांतील तत्कालीन मोकदमांचीं नांवें येथें एकत्र अशीं दिलेलीं नव्यानें सांपडतील.

## लेखांक १

स्वस्ति श्रीनृप शालीवाहन शके १६०७ क्रोधननाम संवछरे माघ शुध ७ सप्तमी बुधवार त दिनी वेदमूर्ती राजेश्री कचेश्वर भट बिन सिधेश्वर भट ब्रम्हे उपाध्ये कसबे चाकण यांसी येसाजी वलद संताजी व विटोजी वलद बाबाजी देशमुख व नारोजी चंद्रस व बाळाजी बापूजी देशपांडिये व समस्त मोकदम देहाये परगणे मजकूर दंडवत अनुक्रमे नमस्कार सु॥ सन सीत सन १०९५ कारणे आत्मसंतोषे पत्र (ले) हून दिधले ऐसे जे सालमजकुरीं पर्जन्य मुतलक गेला या निमित्य किलेदार व फौजदार साहेबीं अम्हास फर्मावि (ले) कीं पाउस गेला या कारणे कसबे मजकूरचे व परगणे मजकूरचे समस्त ब्राह्मण मेळउन आनुष्ठान करउन प (र्ज) न्य पडे ऐसे करणे त्यावरून समस्त ब्राह्मण मेळउन अकरा दिवस अनुष्ठान केले परंतु पर्जन्य न पडे त्यावरी समस्ता ब्राह्मणांनी व्यंगोक्ती केली कीं अमचे मुख्य महंत त्यांस अम्हामध्यें आणिले पाहिजे त्यावरून स्वामीस आम्ही अनुष्ठानाच्या ब्राह्मणांत घेऊन अलों त्यास स्वामींनी उत्तर दिधलें कीं या ब्राह्मणांस अज्ञा देणे आणि हनुमंताचे देवळी अनंदागिरीचे मठी हरिकथेस मंडप दे (णे) कथा परमेश्वराची करून देवाचा धावा करून म्हणिजे पर्जन्य पडेल संशये नाही ऐसी स्वामींनी प्रतिज्ञा

केली त्यावरून अपण समस्त मिळोन हरिकथेचे साहित्य केले स्वामींनी कथा अरंभीतांच पर्जन्य आहोरात्र पडला पुरे पुरे केलें आम्ही समस्त सुख पावलो त्यास स्वामीचें कांही उतराई जाले पाहिजे म्हणऊन कसबे मजकुरीं व परगणे मजकुरीं दर गांवास टकाशाही एक १ व धान्य मण ०१ येक येणेप्रमाणे करून दिधले असे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें दर हरसाल पाववीत जाऊन यात अन्यथा करून अथवा अमचे वंशपरंपरेचा होऊन पुढे अन्यथा करील त्यास श्री ची व कुळस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राह्मणांची आण असे हे पत्र लिहून दिधले सही तेरीख ५ माहे रबिलावल वली ३१

श्रीरुन्मु
ख सताजी सु
त यसाजी देश-
मुख प्रा चाक
ण —

## गावगणा मोकदम नावनिसी तितपसील

१०] कसबे चाकण मोकदम
कडू देशमुख १

मौजे काळोस मोकदम
१ रखमाजी पा पोवळा
१ तुकोजी पा पोवळा
२

मौजे भोसे मोकदम
१ साघाजी वलद संताजी
१ मकाजी कुंटे
२

कसबे इंदुरी मोकदम
१ रायाजि पा पवार
१ राजाजी पा कासीद
२

मौजे जाचोडे मोकदम
येमाजी पा नाटक १

मौजे आकुरडी मोकदम
रेखोजी पा लोढा १

२५८ ]

मौजे अवळे मोकद्म
भांनजी अभेरा १

मौजे कोयेळी मोकद्म
१ तिमाजी कासार
१ नागोजी धणगर
१ त्रिबकजी भाडला
३

मौजे सिरे मोकद्म दावलजी
वलद हणमाजी मोढवा १

मौजे सिंदे मोकद्म
१ कोत्ताजी पानबंद
१ मावजी धणवट
२

मोजे सेलगाऊ मोकद्म
येसजी वलद नावजी आवटी १

मौजे सांगुरडी मोकद्म [१०
माहादजी वलद दांवजी भिसा १

मौजे पिपळे मोकद्म
१ आपाजी बेलभर
१ राजजी जगथाप
१ बहिरजी वा।
३

मौजे सालुबरे मोकद्म
रखमाजी बिरादर तुकोजी घोतरा १

मौजे गोलेगाऊ मोकद्म
१ बापुजी वा। रायाजि चौधरी
१ माणकोजी चौधरी
२

मौजे सावरदरी मोकद्म
१ भिवजी वा। माणकोजी कणसा
१ केरोजी राऊत
२

मौजे सोळु मोकद्म येस
पा। वा। फिरंगोजि पा। ठाकूर १

मौजे भाबोली मोकद्म
कोताजी राउत १

मौजे चऱ्होली मोकद्म
मोगजी पा। थोरवा १
११

मौजे अबेठाण मोकद्म [२०
पिलाजी पा। मांडेकर १

मौजे केळगाऊ मोकदम
१ धारोजी मुगसा
१ पदाजी मुगसा
२

मौजे सेळु मोकदम
जामोजी ठोबरा १

मौजे माहाळुगे मोकदम
१ भिवजी वा। जयेतजी माहाळुगेकर
१०]१ गोदजी वा। सूर्याजी सिवळा
२

मौजे वेलवाडी मोकदम
१ बाजी पा। वा। चिनाजी गाडे
१ रेखोजी पा। बोतरा
२

मौजे गोनवडी मोकदम
बासाजी खाटीक १

मौजे पिपरी बु॥ मोकदम
१ रामाजी पा। ठाकूर
२०]१ सावजी पा। ठाकूर
२

मौजे तळेगाऊ मोकदम
२ दाभाडे
१ बायाजी पा। वा। नेवजी
१ देकोजी
२

मौजे किवळे मोकदम
सिरसोजी पा। सीवळे १

मौजे कुरळी मोकदम
१ मुधोजी माळी
१ १ तिमाजी वा। तुकोजी सोनवणी
२

मौजे कोरेगाऊ बु॥ मोकदम
येस पा। वा। सूर्याजी डावरा १

मौजे असखेडे खुर्द मोकदम
परसोजी निमोरा १

मौजे सुदुलवाडी मोकदम
बाजी पा। फरजद येसाई १

मौजे कान्हेवाडी मोकदम
१ म्हाळोजी पवार
१ झुगोजी वाटमेढा
२

मौजे भिकार वडगौ मोकदम
परसोजी पा। पाटोळा १

२ भेगडे

१ बाळोजी वा। भिमजी

१ हरजी वा। बावाजी

२

४

मौजे सिरोली मोकदम

मोत्याजी आहिरराऊ १

मौजे वांकी खुर्द मोकदम

कमळोजी वा। कान्होजी कडू १

मौजे रासें मोकदम

१ विरोजी सिदा

१ मालजी मुगसा

२

मौजे वडगाऊ घेणंद मोकदम

सूर्याजी पा। घेणंद १

मौजे दायवडी मोकदम

१ भिवजी वा। जोमाजी पा। गाडगे

१ तुकोजी वा। बावाजी पा। गाडगे

२

मौजे करंदी मोकदम

१ राणोजी पा। दरेकर

१ मल्हारजी चिरादर

पिलाजी ढोकळा

१

मौजे वराळे खुर्द मोकदम

नजीक इंदोरी

१ माऊजी मन्हारा

१ बोतरा मोकदम

२

मौजे आंबी मोकदम

१ अनाजी मल्हार

१ कान्होजी वा। रायाजी दरेकर

२

मौजे नाणोली मोकदम [१०

सूर्याजी पा। ढोरा १

मौजे कल्हेट मोकदम

१ रायाजी आगलावा

१ पिलाजी करवद चौगुला

१ सिऊजी मोरे पा।

३

मौजे कोये मोकदम

पदाजी पा। राळा १

मौजे कुरकुंडी मोकदम

हरजी भोकसा १ [२०

मौजे वांसोली मोकदम
१ संत पा फरजद
१ फरजद भोर
२

मौजे मळकर मोकदम
१ दागोजी पा लोखंडे
१ नावजी पा लोखंडे
२

मौजे वराळे बुा नजीक भाबोली
मोकदम मलजी बुवा १

मौजे धानोरे मोकदम
१ पदाजी गावडा
१ सिवजी वा मालजी गावडा
२

मौजे चालीज मोकदम
नाऊजी पा कारला १

मौजे बीरदवडी मोकदम
१ गिरजोजी चिरादर रायाजि पा
१ मावजी पा काळडोके
२

मौजे मोये मोकदम पदाजी
गोवारी १

मौजे निघोजे मोकदम
१ माळजी पा वा मावजी येल्होडा
१ भिवजी येल्होडे
२

मौजे असखेड बुा मोकदम
पदाजी गाडे १

मौजे पिंपळगाऊ मोकदम
अकुस पा वा रामाजी चौधरी १

मौजे कोरेगाऊ खुर्द मोकदम
बोवाजी पा कडूसकर १

मौजे आळंदी मोकदम
१ नावजी घुंडरा
१ पदाजी कुऱ्हाडा
२

मौजे पिंपरी खुर्द मोकदम
फरजद येसाजी काळा १

मौजे चिबळी मोकदम लख पा जैद १

मौजे रोहकल मोकदम
१ नावजी वा सोनजी कातळा
१ पदाजी थोचैरा.
२

मौजे वांकी बुा मोकदम
तान्हाजी वा सायाजि कडू १

मोजे खरपुडी मोकदम
राणोजी वा संताजी गाडे १

कसबे खुदुबरे मोकदम दस पा गाडा १

सद्रहू लिहिल्याप्रमाणे समस्त मान्य असो प्रतीवर्षी स्वामीचा परामर्ष करून लेंकराचे लेंकरी पावीत जाऊन हे पत्र लिहून दिधले सही

बिा जासो विटल गुं॥ मोहरीर
देसपाडिये पा मजकूर

## लेखांक २ (शके १६५२)

श्री

श्री
वार्धिष्णुर्विकर्मै
विष्णोसामूर्तिरिव
वामनी शंभु सूनो
रसौ मुद्रा शिवरा
जस्य राजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५६ साधारण नाम सवत्सरे वैशाख शुध पंचमी मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी वेदमूर्ती राजश्री कचेश्वर भट बिन सिधेश्वर भट ब्रह्मे उपाध्ये कसबे चाकण यांसी दिल्हे वृत्तीपत्र ऐसे जें तुम्ही स्वामीसंनीध कसबे उंबरजेचे मुकामी विनंती केली जे सके १६०७ कोधन नाम संवत्सरी पर्जन्न मुतलक गेला यां निमित्य किलेदार व फौजदार याणी देशमुख व देशपाडिये व मोकदम देहाये पा मजकूर यांसी सांगितलें कीं पा मजकुरी पर्जन्य गेला या कारणें कसबे मजकूरचें व पा मजकूरचे समस्त

श्री
राजा शाहू नरप
ति हर्षनिधान बा
जीराव बलाळ
मुख्ये प्रधान

श्री
श्री आई आदि पुरु
ष श्री राजा शाहु छत्रप
ति स्वामि कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि

ब्राह्मण मेळउन अनुष्टान करुन पर्जन्य पडे ऐसी गोष्टी करणें त्यांवरून समस्त ब्राह्मण मेळउन आकरा दिवस अनुष्टान कलं; परंतु पर्जन्य पडे ऐसी गोष्टी करणे त्यावरून समस्त ब्राह्मण मेळवून आकरा दिवस अनुष्टान केले परंतु पर्जन्य पडिला नाहीं त्यावरून समस्त ब्राह्मणानी व्यगोकी केली कीं आमचे मुख्य महंत आहेत त्यासी आह्मामध्यें आणिल पाहिजे त्यांवरून त्यानी आम्हास बोलाउन नेऊन सांगितलें कीं, तुम्ही आनुष्टानाच्या ब्राह्मणात मिळोन आनुष्टान करून पर्जन्य पडे ते गोष्टी करणें त्यावर आपण त्यासी उत्तर दिल्हें का या ब्राह्मणास आज्ञा देणे आंणि श्री हनुमंताच्या देवालई आनंदगिरीच्या मठी मडप देणें तेथे कथा परमेश्वराची करूं व देवाचा धावा करूं म्हणजे पर्जन्य पडेल संशये नाही ऐसी प्रतिज्ञा केली त्यावरून ते समस्त मिळोन मडप देऊन हरिकथेचे साहित्य केलें आपण कथा आरंभिताच पर्जन्य आहोरात्र पडिला पुरेपुरें केलें आवघें लोक संतोषी जाहाले त्यावरून येसाजी वलद संताजी व विठोजी वलद बाचाजी देशमुख व नारोजी चंदरस व बालाजी बापोजी देशपाडिये व समस्त मोकदम देहाये पा मजकूर बोलिले जे आपले मनोदय पूर्ण जाहाले स्वामीचें काही उतराई जाहालें पाहिजे म्हणून कसबे मजकूरी व पा मजकूरी दर गावास टकाशाही १ येक व धान्य उत्तम केली मापे मण ०१ येक येणेंप्रमाणें सालिना वर्षासन लेकराचे लेकरी करून सके १६०७ क्रोधन नाम संवत्सरे माघ शुध सप्तमी बुधवार तें दिवसीं शफतपूर्वक पत्र करून दिल्हे आहे ते स्वामींनी मनास अणून तेणेप्रमाणे वृत्तीपत्रें करून देऊन वंशपरंपरेने चालविले पाहिजे म्हणून विनंती केली त्यांवरून तुम्ही भले सत्पात्र थोर माहापुरुष तुमचे चालवणे स्वामीस अवश्यक जाणून तुम्हाकडील पूर्वील पत्रे बजिनस मनास आणून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन कसबे मजकूरी व देहाये पा मजकुरी प्रतिवर्षी दरगावास वर्षासन करून दिल्हे चिा शाही टका येक १० धान्य उत्तम कैली मापे मण ०१ येकून टका येक व धान्य मण येक येणेप्रमाणें तुम्हास व तुमचें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करून दिल्हें असें तरी तुम्ही सदरहू प्रमाणे कसबे मजकुरी व देहाये पा मजकूर पैका घेऊन वंशपरंपरेने अनभउन सुखरूप राहाणे जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजू संमत सां सां
सुमंत मंत्री सरकार

१५४ ]

तेरीख ३
सौवाल सु॥ सलासीन मया आलफ
बारसुद सुरुसुद बार बार बार बार

पां. न. पटवर्धन

## ६४ कचेश्वराच्या तुकारामावर आरत्या

कचेश्वरकवीकृत पदें, आरत्या वगैरे प्रकरणें मला नुकतींच मिळालीं आहेत. आरत्यांपैकीं तुकारामावरील खालील दोन्ही आरत्या बऱ्याच प्रसिद्ध असल्यामुळें, व तुकारामासंबंधानें त्यांत सहज स्पष्ट उल्लेख आल्यामुळें, त्या मी येथें देत आहें.

कचेश्वरास तुकारामाचा स्वप्नांत उपदेश मिळाला असल्याबद्दल सदर कवीच्या आत्मचरित्रांत प्रत्यंतर पुरावा मिळतो. पहिल्या आरतींत कचेश्वरानें आपल्या गुरूच्या—तुकारामाच्या—देहयष्टीचें वर्णन केलेलें आहे. तुकारामानंतर लागलीच झालेल्या पिढींतील त्याच्या एका सच्छिष्यानें केलेलें वर्णन ह्या दृष्टीनें तें इतिहाससंशोधकांस व भाविकांस बहारीचें वाटेल. *तुकारामानें आपल्या आंगलटीचें वर्णन कोठें हि केलेलें दिसून येत नाहीं. तें हें येथें पहिल्यानें च प्रसिद्ध होत आहे.

दुसऱ्या आरतींत ' संतांत किर्ति केली ' येथपासून तों ' जना देख दाविली ' येथपर्यंत कवीनें केलेलें तुकारामवर्णन मोठें नामी आहे. तुकारामाचे सदेहप्रयाणाचे बाबतींतील साधकबाधक पुरावा ह्या दृष्टीनें तत्कालीन कवीचा हा उल्लेख हि मननार्ह आहे.

( १ )

आरती तुकोस्वामी, भक्तिभाव दे नामीं,
व्यापका गुरुराया, नेई सायोज्यधामीं ॥ धृ० ॥
स्वप्नींचें ध्यान दावीं, तुकोस्वामी गोसावी ।
कीर्तनीं जें देखियलें, त्याची सोय बा लावी ॥ १॥
निर्गुण गुणवंता, तुकोराज समर्था ।
मागुती भेटी देई, पायीं ठेवितों माथा ॥ २॥
देखिलें रूप जेसें, तेंचि दावीजे तैसें ।
सांवळे रूप बापा, याचें लागलें पीसें ॥ ३ ॥

---

* ' रोडके हातपाय दिसे अवकळा' वगैरे स्ववर्णन श्रीतुकाराम करितात. परंतु तें विनयानें केलेलें आहे. चिटणीस

वर्तुळ दोंद पोट, नेत्र नासिका नीट, ।
देखिल्या दंत-पंक्ती, लघु आरक्त वोट ॥ ४॥
उंच ना ठेंगणें हो, ध्यान हेंचि हें राहो ।
मानसीं कचेश्वरा, गुरु तुकोबा पाहो ॥ ५॥

( २ )

आरती तुकोराया, नेई विलया माया ।
षड्रिपू मर्दुनीया, लावि मुक्तिचा ठाया ॥ ध्रु० ॥
सामर्थ्य वर्णवेना, लीळा केलिया नाना ।
रक्षिल्या वह्या जळीं, आतां तारावें दीना ॥ १ ॥
संतांत कीर्ति केली, कुडी सायोज्जीं नेली ।
आश्चर्य थोर केलें, जना देख दाविली ॥ २ ॥
दीनाशि तारि भूपा, आतां चुकवी खेपा ।
चौऱ्यायशीं लक्ष फेरे, कचेश्वराचे बापा ॥ ३ ॥

पांडुरंग नरसिंह पटवर्धन

## ६५ रावबाजी व फुलशहर

पुण्यापासून सुमारें आठ कोसांवर भीमेचे कांठीं फुलगांव या नांवाचें एक लहानसें पण टुमदार खेडेगांव आहे. दुसरे बाजीरावांचें हें विलासस्थान असून, येथें त्यांनीं आपल्या आयुष्यांतील बरेच दिवस चैनींत घालविले असल्याचें त्यांच्या राजवटीचें बारकाईनें निरीक्षण करणारास सहज दिसून येईल. रंगेल रावबाजींनीं येथें पेशवाई थाटाचा एक टोलेजंग वाडा उठवून 'फुलशहर' वसविण्याचा हि उपक्रम केला होता. एवंच श्री. बाबासाहेबांच्या कारकीर्दींत ह्या गांवास एक प्रकारें विशेष महत्व आलें होतें. ह्या गोष्टीस पोषक व समर्थक असा ऐतिहासिक पुरावा रा. रा. दत्तात्रेय बळवंत कुळकर्णी, फुलगांव, यांचे दप्तरीं मला नुकताच मिळाला.

श्रीमंतांनीं वाडा बांधण्याकरितां, थळ ' गाढवदरा ' यांपैकीं दहा बिघे जमीन शके १७३५ आश्विन शुद्ध ५ रोजीं रु. १०० यांस महादजी बिन बाबूजी व येसाजी बिन आबाजी पाटील खुळे, मौजे फुलगांव, या उभयतांपासून वतनी मिरास करून घेऊन, त्यावर जंगी इमारत उठाविली. त्यासंबंधीं जें ' पत्र ' उपलब्ध जाहलें आहे, त्यावरून एक महत्वाची गोष्ट लक्षांत येते. ती ही कीं श्री. बाबासाहेब आपल्या या खाजगी व्यवहारांत ' देशमुख मामले दंडाराजपुरी' हा आपला वांशिक

वतनी हक्क नमूद करण्यास विसरत नाहींत. श्रीमंत थोरले माधवरावसाहेबांनीं देशमुखी वतनांतील आपला हिस्सा मृत्युसमयीं हरिपंत फडके यांस बहाल करून दिल्याचें रा. ब. का. ना. साने यांनीं संपादिलेल्या 'पेशव्यांच्या बखरी'त नमूद आहे. हरिपंत फडक्यांकडील ह्या हिश्शाचीं किंबहुना पेशव्यांच्या ह्या वतनाचीं आजतागायत काय काय स्थित्यंतरें होत गेलीं ही गोष्ट इतिहासदृष्ट्या विचारार्ह आहे. अस्तु. फुलगांव येथें श्रीमंतांनीं आपल्या आश्रितांस किंबहुना आपल्या कक्षेंतील मंडळीस घरें बांधून दिल्याबद्दलचीं जीं टांचणें मला मिळालीं आहेत, त्यांवरून कोणत्याहि प्रकारचा पक्षपात न करितां श्रीमंतांनीं कोंकणस्थ, देशस्थ इत्यादि पक्षांच्या ब्राम्हणांस घरें बांधून दिलीं होतीं, हें स्पष्ट होतें. इतिहासविचिकित्सकांच्या दृष्टीनें ही गोष्ट मननीय आहे.

लेखांक २ यांत उल्लेखिलेला वाडा, त्याचे पूर्व पश्चिम असलेल्या दुसऱ्या इमारती व बाग हीं ता. ९ माहे डिसेंबर सन १८२९ इ० च्या सरकारी हुकमानें 'ईस्ट इंडियन असोशियन'चे हवालीं केल्याचें सदरील प्रसंगींच्या 'इजारपट्ट्या' वरून दिसतें. ह्या 'इजारपट्ट्या'वरून श्रीमंतांच्या वाड्याच्या विस्तृततेची साहजीक कल्पना होते. सन १८२९ नंतर ह्या वाड्याची कोणकोणतीं स्थित्यंतरें झालीं हें समजण्यास तूर्त तरी मार्ग नाहीं. परंतु सांप्रत ह्या वाड्यावर नांगर फिरत असलेला दिसत असून, ह्या वाड्यानें व्यापिलेली सर्व जागा खुळे नांवाच्या इसमाचे वहिवाटीस आहे. वाड्यापैकीं सुमारें दीड हात उंच व चार हात रूंद अशी जिन्याची भिंत काय ती आज उभी आहे! वाड्यालगतची 'पुष्करणी' अद्याप कायम आहे. पुष्करणी संबंधानें न्यायदरबारीं 'फैसला' होऊन ती सरकारी ठरल्याचें कळतें. १२ रुपये साऱ्याचा 'सरकारी बाग' येथें च असून कागदोपत्रीं नुसत्या 'बाग' ह्या नांवानें ओळखिला जातो. श्रीमंतांच्या आश्रितांपैकीं भिडे उपनामक ब्राह्मणाशिवाय बाकी कोणाचें हि कुटुंब सांप्रत येथें नांदत नाहीं. हत्तीखाना, शंभर खणी, गांवच्या निरनिराळ्या भागांतील आकरा मारुती, नुकतेच उजेडांत आलेले पांच-पंचवीस बदामी आड, सरकारवाड्याची जागा व पुष्करणीचा हौद, श्रीमंतांनीं बांधिलेला प्रचंड घाट व श्रीमहादेवाचें प्रेक्षणीय देवालय ह्या व असल्या प्रकारच्या पेशवाईच्या पडत्या काळांतील अवशिष्ट खुणा इतिहासभक्तांच्या दृष्टीनें एकवार पहाण्यालायक आहेत.

## लेखांक १ श्री

श्रीमंत महाराज राजश्री बाजीराव बाबासाहेब देशमुख मामले दंडाराजपुरी साहेबांचे शेवेस

आज्ञाधारक माहदजी बिन बाबुजी व येसाजी बिा आबाजी पाटील खुळे मौजे फुलगांव तर्फ सांडस प्रां पुणें

३३

सां दंडवत विज्ञापना ऐसा जे साहेबी मौंजे मारि वाडा बांधावयाकरितां थळ गाव्वदरा येथील माझे हिशाची जमिनी प्रो दाहा बिघे जमीन वतनी करून द्याव-याविसी आज्ञा जाली त्याजवरून साहेबास जमीन द्यावयाची त्याची मोजणी दर काठी पंधरा तमूचे हाताने पाच हात पाच मुठीप्रो काठया

लांबी दक्षण उत्तर काठया
गुण काठ्या

रुंदी पूर्व पछम काठया
दर बिघा काठया
४००

त्यासे प्रो जमीन बिघे
यासी चतुः सीमा

पूर्वेस पाणदीचे वोह्या-
ची हद्द १

पछमेस थळ मार पो
साहेबी सदरहू जमीन हल्ली
खरीदी घेऊन बाकी जमीन
राहिली त्याचे पूर्वेकडील हद्द
१

दक्षणेस पुणेमार्गाचा रस्ता
पूर्वपछाम आहे त्या
ची हद्द १

उत्तरेस तुळापूरचा मार्ग या
ची हद्द १

एकूण दाहा बिघे जमीन चतु:सीमापूर्वक लिहिल्याप्रो आम्ही आपले स्वसंतोषे रजावंदीनें साहेबापासून किंमत रुपये १०० एकशे चांदवड घेऊन साहेबास वतनी मिरास करून दिल्ही असे साहेबी सदरहू जमीनीचा उपभोग पुत्रपौत्रादि वंशपरंपरानें करावा या जमीनीविसी आमचा अर्थाअर्थी संमंध राहिला नाहीं याविसी कोणी भाली वारसदार उभा राहिल्यास त्यासी जाब आम्ही करू त्याणें साहेबापासी बोला-वयाचे प्रयोजन नाही सदरहू दाहा बिघे जमिनीचा धारा सरकारचा गावचे सिरस्ते-प्रो जो येईल तो साहेबी (सां) भाकावा शेतसाऱ्याचा लढा अम्हाकडे नाही मिा आश्विन शुा ५ पंचमी शके १७३५ श्रीमुखनामसंवछरे छ ३ माहे सवाल सुा आर्बा आसैर मया तैन व आलफ सन १२२३

बिा सखाराम कासीनाथ होनप देशपांडे प्रा मजकूर

माहादजी बिा बाबुजी पा खुळे
मौंजे मार

एसाजी बिन आबाजी पा
खुळे मौंज मा

दोही सद्याचे बिा सखाराम कासीनाथ होनप देशपांडे पा मार

लेखांक २

ज्यार्ज निचर्न साहेब बाहादूर इस्कोयेर

कलेक्टर सुभा पुणे याणी.

बनाम ईस्ट इडेन असोसीयन वासी लिहून दिल्हा इजारपटा ऐसी जे सुहूर सलासीन मया तैन व अलफ मौजे फुलगाव तर्फे साडस परगणे भिमथडी येथें सरकारी वाडा व त्याच्या पूर्व पश्चिम दुसऱ्या इमारती आहेत ते व बाग सरकारचा मौजे मजकुरीं आहे त्या सुधा तुमचे हवाली करावा ह्मणोन सरकारचा हुकूम इंग्रजीन तारिख ९ माहे डिजेंबर रुन १८२९ इसवीचा आला त्याजवरून सदरहू प्रमाणे तुमचे हवाली करण्याचे त्याचा तपसिल व त्याचे वहिवाटीची बितपशील कलमे

इमारती प्रकर्णी तपसील

१ वाडा मौजे मारचे पश्चिमेस नजीक भीमानदी वाड्याचे उत्तरेस आहे वाडा दुमजला पूर्व पश्चिम लांबी खण सुमार १७ सतरा रुंदी पाच दालने उत्तरेचे दालनापुढें निमपडवी खण सुमार १७ सतरा खुले आहेत त्यावर चुनेगची आहे वाड्याचे दक्षणेस चौक एक पूर्व पश्चिम दक्षण तीन सोपे तीन दालणी त्यापैकीं पूर्वेकडील सोप्यात दक्षणेचे बाजूस तीन खणावर कौलार आहे बाकी खण पाटलेले आहेत वर मालवद आहे उत्तरेचे बाजूस सोपा आहे एक दालनी पाटल्यावर मालवद आहे व चौकाचे दक्षणेस सोपा दोन दालणी खण सुमार १७ पो पश्चिमेकडील नऊ खण पाटलेले आहेत बाकी पूर्वेकडील आ (ठ) खणास वासे घालून छावणी केली आहे वरते मालवद आहे येणेप्रो वाडा आहे त्यात दिवानखाने व कोठड्या आहेत बितपशील

१ वाड्यापुढे निमपडवी पूर्व पश्चिम खण सुमारी १७ सतरा खुले आहेत वर चुनेगची आहे

१ वाडा दुमजली रुंदी पाच दालनी लांबी पूर्व पश्चिम खण सुमार १७

१ पुढील दुपई त्यात कोठड्या सुमारी ३ तपशील

३

१ पूर्वेकडील बाजूस दुदालनी कोठडी येक ए॥ खण पूर्व पश्चिम सुमारी ५

१ मध्ये कोठडी येक दुदालनी लांबी पूर्व पश्चिम खण सुमार ७

१ पश्चिमेकडे कोठडी दुदालनी १ येक लांबी पूर्व पश्चिम खण सुमार ५

पांच बाजूस सेतखाणा उत्तरेस आहे

१ मद्‌घर एक दालनी लांबी पूर्व पश्चिम खण सुमार १७ पो खुले सुमार १५ पश्चिमेकडील बाजूस दिवानखाना त्यांत मुरूचे खांबाचे तीन खण दक्षण उत्तर त्याचे पुढे पाच खण दक्षण उत्तर उजेडात खिडकी आहे पश्चिमेकडे एकूण ... ठडी एक

१ मद्‌घरचे दक्षणेस दुदालनी लांबी पूर्व पश्चिम खण सुमार १७ येकूण कोठड्या

१ पूर्वेकडे दुदालनी लांबी खण सुमार ५ एकूण कोठड्या २ तपसील

१ मद्‌घरचे लगत एक

१ सदरहूचे दक्षणेकडे लगत येक त्यात पूर्व पश्चिम खणात न्हाणी न्हावयाची खोली आजमासे हात ३ तीन बाजूने उतरावयास पायेऱ्या आहेत.

—

२

१ मध्ये सात खण खुले दुघई आहेत

१ पश्चिमेस पाच खण दुघई आहेत पूर्व पश्चिम

१ एक दालण दक्षणेकडील खुले आहे.

१ दुसरे दालण उत्तरेकडील त्याचे बाजूस पूर्व पश्चिम दोन कोठड्या आहेत मधे खण खुले आहे

—

२

—

३

तळमजला

दुसरा वर मजला

१ पुढील दिवानखाना तिघई खांब मुरूचे खण पूर्व पश्चिम सुमार १७ यासी कोठड्या आहेत चितपसील

१ उत्तरेकडील दालनास मधे तेरा खण पूर्व पश्चिम खुले आहेत बाजूस कोठडया पूर्व पश्चिम दोन दोन दोन खणाच्या आहेत पश्चिमेकडील कोठडीत खाली उतरावयास जिना आहे पूर्वेकडील कोठडीत सेतखाना आहे

१ सदरहू दालनाचे दक्षणेत दुसरे दालन एक खण पूर्व पश्चिम सुमार ९ मधे खुले आहेत बाजूस पूर्व पश्चिम कोठड्या दोन आहेत.

१ तिसरे दालॅन सदरहूचे दक्षणेस मधे खुले खण पूर्व पश्चिम सुमार ५ बाजूने कोठड्या दोन पूर्व पश्चिम आहेत बाजूस पूर्वेकडे जिना खाली उतरावयास मद्‌घरचे भिंतीस आहे.

—

३

१ पश्चमेकडे दिवानखाणा दुवई पुढील दिवानखाना वर लगत त्यात सुरूचे सांबाचे तीन खण दक्षण उत्तर याचे पुढे पाच खण दक्षण उत्तर येकूण दिवानखाणा १

१ पूर्वेस दिवानखाणा दुवई पुढील दिवानखाण्याचे लगत त्यात सुरूचे सांबाचे तीन खण दक्षण उत्तर पुढे पाच खण दक्षण उत्तर आहेत.

येकूण दिवानखाणा १

१ पुढील दिवानखाण्याचे दक्षणेस दुवई पूर्व पश्चिम लांबी खण सुमार १७

१ दक्षणेकडील दालनात मधे खुले खण सुमार ९ बाजूस कोठड्या दोन च्यार च्यार खणाच्या पूर्व पश्चम आहेत पूर्वेकडील कोठडीत सेतखाणा आहे

१ सदरहू दालनाचे उत्तरेस दालन येक मधे खुले खण सुमार ५ बाजूस पूर्वपश्चम कोठड्या दोन दोन दोन खण्याच्या आहेत

१ दुसरे मजल्यावर तक्तपोसी करून वर कौलार आहे

४

दुसरा मजला

१ वाड्याचे पिछवाडीस दक्षणेकडे कौला(रु) सोपे तीन तिवई आहेत व एक सोपा अरुंद आहे यो चौक एक

१ पूर्वेकडील सोपा खण सुमार ९ दक्षण उत्तर

१ दक्षणेकडील सोपा खण सुमार १७ पूर्व पश्चम मधे पडवी पूर्वेकडील सात खणास आहे मधे तीन खणावर कौलार आहे लगत जिना मालवदावर जावयास आहे

१ पश्चमेकडील सोपा दक्षण उत्तर खण सुमार ९

१ उत्तरेकडील सोपा एक दालनी अरुंद आहे

४

( पुढील मजकुराचें पान गहाळ. )

## लेखांक २

श्री

यादी सरकारातुन ब्राह्मणास ऐवज घरास दिल्हा याची नाघनिसी सुरु सबा असर मया तैन व आलफ

कोंकणस्त आपस्तंभ ब्राम्हणाची घरे

१ बाळंभट भिडे रु. २०००
१ निळकंठ दीक्षित बापट रु. २०००
१ विठलभट दात्ये रु. २०००
१ बाजीभट गोखले रु. २०००
१ गणेशपंत गोखले रु. २०००
१ बापूभट घारपुरे रु. २०००
१ मेरुशास्त्री गोडबोले रु. २०००
१ लक्ष्मण भट दात्ये रु. २०००
१ गंगाधरपंत गोखले रु. २०००
१ वासुदेवपंत गोखले रु. २०००
१ बाजी भट दात्ये रु. २०००
१ नारोपंत गोखले रु. २०००
१ केशवभट लिमये रु. २०००
३ किता घरे
१ शिवरामपंत अभ्यंकर रु. २०००
१ रामाजीपंत भिडे रु. २०००
१ राजाराम भट गोडबोले रु. २०००

३

१६

श्री

यादी सरकारातून ब्राह्मणास ऐवज घरासंसमेध दिला त्याची नावनिसि सुरू सबा असर मया तैन व आलफ

कोंकणस्त रगवेदी ब्राम्हणाची घरे

१ आपाभट फाटक रु. २०००
१ चिंतामणभट माटे रु. २०००
१ गोपालभट पराजपे अग्नहोत्री २०००
१ परशरामभट केळकर रु. २०००
१ बापुभट गाडगीळ रु. २०००
१ सखारामभट चितळे रु. २०००
१ हरजोसी पालगडकर रु. २०००
१ बापूभट साठये रु, २०००
१ अनंतभट आठवले रु. २०००
१ परशरामभट जोगळेकर रु. २०००
१ शिवरामशास्त्री फडके रु. २०००
१ लक्ष्मणभट धामणेकर रु, २०००
१ लक्ष्मणपंत फडके रु. २०००
१ गोविंदपंत वैद्य रु. २०००
४ किता घरे
१ केशवभट परांजपे रु. २०००
१ वासुदेवशास्त्री आगाशे २०००
१ सदाशिवपंत पेंडसे रु, २०००
१ रघुनाथपंत घांगरेकर २०००

४

१८

१ त्रिंबकभट चितळे

श्री

यादी सरकारातून ब्राह्मणास घरे बांधावयास ऐवज दिल्हा त्याची नावनिसि सुरु सबा असर मया तैन व आलफ

देशस्त ब्राह्मणाचीं घरें

१ कृष्णभट मरकळे रु. १०००
१ कोंडभट मळकरे रु. १०००
१ विठलभट मळकरे रु. १०००
१ गोपाळभट मळकरे रु. १०००
१ नारायणभट मळकरे रु. १०००
१ हातवळणे रु. १०००
१ बाबाजी पंढरपूरकर रु. १०००
—
७

२ वाज्यसनी ब्राह्मणाची घरे
१ अनंतभट आग्नहोत्री रु. २०००
१ मल्हा(र)राव काळे रु. २०००
—
२

१ राघवाच्यार्य रामानुज रु. २५००

श्री

* यादी मौजे फुलगाव येथील ब्राह्मणाची घरे नवीन सुरु समान असर मया तैन व आलफ शके १७३९ ईश्वरी नाम संवछरे

घरे तयार करून घरात कुटुंबसुद्धा राहातात

१ चिंतामणभट माटे
१ गोपाळभट परांजपे
१ निळकंठ दीक्षीत बापट
१ राजारामभट गोडबोले
१ वासुदेव शास्त्री आगाशे
१ बाळंभट भिडे
१ आपाभट फाटक
१ शिवरामभट आभ्यंकर
१ बाजीभट दात्ये
१ हरजोसी पालगडकर
१ परशराम भट जोगळेकर
१ आबा भट मळकरे
१ नारायणभट मळकरे

घरे मात्र तयार केली परंतु येथे राहात नाही

१ बाजीभट गोखले
१ जयवंतराव गोखले
१ राघवाचार्य
—
३

घरे तयार करून वास्तुशांत जाली नाही सबब घराजवळ छपरी घालून राहातात

१ त्रिंबकभट चितळे
१ अनंतभट आठवले
१ कोंडभट मळकरे
१ कृष्णभट मळकरे
१ गोविंदपंत वैद्य
—
५

---

* अशीच एक अपूर्ण यादी मिळाली आहे तीवर शके १७३९ आषाढ बा। ८ भानुवासरे अशी तिथी आहे.

१ रघुनाथभट घांगरेकर
१ अनंतभट पाठक आ-
मिहोत्री कडूसकर
१ मल्हारराव काळे सिलेदार

१६

जोती मात्र तयार केली वस्ती
येथें नाहीं
१ सखोपंत पटवर्धन
१ ब्रह्मंभट कायगावकर
१ भिनंभट जोगळेकर
१ विनायकभट जोगदेव
१ बाळंभट बापट
१ शिवरामभट टोकेकर
१ माहादेवभट खाडीलकर

१ नरसिंहभट उकडवे
१ गंगाधरभट डोंगरे
१ लक्षुमणभट धामणकर

१०

घर पुरती तयार ना-
हीं परंतु घराजवळ छपरी
घालून कुटुंब सुा। राहातात
१ गंगाधरपंत गोखले
१ बासुदेवपंत गोखले

२

पाया मात्र भरिला वस्ती येथें
नाहीं
१ बाळंभट जोगळेकर
१ सदाशिवभट केळकर
१ गदाधरभट गाडगीळ
१ हरभट भट
१ बाळंभट भिडे

५

घरे पुरती तयार नाहीं व आपण येथें
नाहीं
१ नारोपंत गोखले
१ लक्ष्मणपंत फडके

२

१ आबाजी पंढरपूरकर जागा मात्र
घेऊन गेले आपण येथें नाहीं
व मुहूर्त ही नाहीं

१

घरे मात्र तयार केली परंतु
येथें राहात नाहीं.
१ सदासिवपंत पेंडसे
१ रामचंद्रपंत भिडे
१ बापूभट गाडगीळ
१ बापूभट घांगरेकर

| | |
|---|---|
| १ बापूभट गोखले पा- याचा मुहूर्त करून गेले आहेत. | १ परशुरामभट केळकर |
| | १ बापूभट साठये |
| | १ केशवभट पराजपे |
| — | — |
| १ | १ बाळंभट दात्ये |
| | १ भाऊ हातवळणे |
| | १ रामभट कामतकर |
| | १ केशवभट लिमये |
| | १ मेरुशास्त्री |
| | १ विठलभट मळकरे |
| | — |
| | १३ |

[१०

पां. न. पटवर्धन

# ६६ जेजुरी येथील शिलालेख

जेजुरी क्षेत्रीं खंडोबाचे देउळीं पायथ्याचे वाटेपासून डाव्या उजव्या हातास दरवाजांवरून, दीपमालांवरून अनेक लहान लहान शिलालेख आहेत. बरेच शके १६५० च्या पुढील आहेत. कित्येक होळकरांचे आहेत. Poona Gazetter मध्यें १३४ पृष्ठावर असा उल्लेख आहे " An inscription in the inner hall bears a date corresponding to A. D. 1675 ( Shake 1597 ) and another on the inner threshold is dated [२० (Sha-ke 1303) 1381 A. D." ह्या वाक्यांतील दोन्ही शक चुकलेले आहेत. पहिला लेख ( म्हणजे माझ्या यादींतील बारावा ) शके १५९७ मधील नसून शके १६९७ मधील आहे व तो Inner hall मध्यें खरा, परंतु चांदीच्या मखरावर आहे. मखर देणारे जाचकाचे वंशज अद्याप आहेत. दुसरा लेख (म्हणजे खालीं दिलेला अकरावा ) त्याच्या प्राचीनत्वामुळें अत्यन्त महत्वाचा आहे. तो हि शके १३०३ मधील नसून संवत् १३०३ मधला आहे. म्हणजे शके ११६८ ( सन १२४६ ) मधील आहे. अर्थात् ज्ञानेश्वराच्या हि पूर्वीचा आहे. 'यक्षप्रतिमयं* कारिता ' ही शेवटची ओळ स्पष्ट लागली. बाकीचीं अक्षरें कांहीं तरी दिसलीं तशीं दिलीं

* येथें 'म'वरील मात्रा मागें कान्यासारखी जोडली आहे. ही प्राचीनत्वाची खूण च आहे.

आहेत. यावरून कोण्या रजपुताने येथला गाभारा प्रथम बांधल्याबद्दलची जा बोलवा आहे, तिचा याशीं संबंध असावा अशी शंका येते. लेखाची अस्सल प्रतिमा ( प्रकाशालेख्य ) घेणें अगत्यार्चे आहे. सदर लेख मुख्य गाभाऱ्याचे दरवाजावर उजव्या बाजूस मध्यावर एका मूर्तीचे खालीं आहे. लेखाची लांबी ८ बोटें व रुंदी ३ बोटें. मूर्ति लहान असून पांढऱ्या दगडाची आहे.

Gazetteer मध्यें नमूद नसलेला परंतु प्राचीनत्वामुळें महत्वाचा असा एक शिलालेख जेजुरीस गांवाबाहेरील प्रख्यात हेमाडपंती लवथलेश्वराला उतरतांना उजव्या हाताला आहे. तो माझे नजरेस आणल्याबद्दल तेथील शाळेंतील एक शिक्षक रा. खेडकर यांचा मी आभारी आहे. सदर लेख बराच फुटून व झिजून गेलेला आहे. दगडाच्या कपऱ्या निघाल्या आहेत. तरी शकसंख्या व कांहीं अक्षरें स्वच्छ लागलीं. लेखाचा शक १५३० आहे अर्थात् लेख ३०० वर्षांहून प्राचीन आहे.

ज्या ठिकाणीं अक्षराखालीं रेघ दिली आहे, तीं अक्षरें शिलालेखांत मोडींत आहेत.

१

( मुख्य वेशीनंतर नंदीपुढील दरवाजाचे डावे बाजूवरील )

श्रीमार्तंड भैरव चर
णी तत्पर आपाजी सो
पु व सी सरव पुर
नीरंतर संवत् १५६८ (?)

२

( बुळ्यांचे नवीन दीपमाळेजवळच्या ६ दीपमाळेंपैकीं ५ वरील )

श्री मार्तंडचरणी
तत्पर कृष्णाजी
+ + त निरंतर
सन ( ? ) १७८०

३

( हेगडे प्रधान यांचे देवळाजवळील वाटेवरील )

श्री कमळोजी कदम रावत्म(?)ज रघूजी कदम
राव पाटील कोरेगाव वडगाव त्याचे दि-
वाण गोविंद गणेश कृत सेवा दरव
जा श्री मार्त्तंड भैरव चरणारविंदी सपूर्ण
मस्तू शुभं भवतु ॥ छ ॥ तरफ सांडस प्रा
त पुणे सान्निध्यवती भीमातीर ॥ छ ॥

॥ शके १६६४ दुंदुभि संवत्सरे श्री
मार्तंड चरणी तत्पर गणेशसुत
गोविंद कुलकर्णि श्रीगोंदेकर

४

( या पुढील दरवाजावर उजवे बाजूस )

श्री मार्तंडसाहे मनाजी प
त खंडोजीपत व त्रींबकपंत आ
कोळकर शके १६७९ ई
श्वर नाम सवत्छेरे वैशा
ख शुद्ध त्रीतिया गु
रूवार शुभं भवतु ॥

५

( या पुढील दरवाजावर उजवे बाजूला )

श्री

श्री सके १६८० बहुध
न्य नाम । छर श्रावण
सुध १ श्री मार्तंड चरणी त
त्पर ष(?) लाजी +
+

६

( प्राकाराच्या आंत शिरल्याबरोबर डाव्या हातास खांबावर )

श्री मार्तंडचरणी तत्पर
मल्हारजीसुत तुको
जी होळकर नीरतर स
के १६९२ वीकुती नाम
सवछरे श्रवण सुधि
प्रतीपदा सोमवार का
रखाना कीताब तळम
लफात शामजी ना
रायेण राजापुरक
र परगणे दीजेरि

## ७

( शेजारी डाव्या कोपऱ्यांत )

श्री मार्त भैरवचा भत्क भारवज
जीने श्र श्रु दीपोवळी व दोन्ही दा
ळ मडप व दोनी दीपमाळा व
दरवाजे देउळ व दोन्ही वीहीरी

## ८

( होळकरांच्या चौघडयाचे दारावरील )

श्री शके १६७८ धाता
नाम स्वंछर श्री मा
र्तंड भैरयचरणी
खडाजीसुत मल्हा
रजी होळकर णीरतर*

## ९

(मणिमल्लाच्या डाव्या हातास कोटाचे एका खांबावर )

श्री शके १६८० ब
हु धान्य नाम स
वत्सरे कार्तीक सु
ध पचमी मातडचर
णी त्रींबकराव सीवदेव

## १०

मुख्य देवळाला जातांना देवडीवरील उजव्या बाजूच्या खांबावर ८ ओळींचा घासला गेलेला उतरला नाहीं.

## ११

( मुख्य गाभाऱ्याचे दरवाजावर उजव्या बाजूस यक्षमूर्तीचे पायथ्यास )

सं १३०३ क्षदां श्रीः श्रें नाघाथे ॥
(।।० वीर पाल वीर मह सातत जा.
यउ त्नू के म स्वाक्ष था स क पा ई
यक्ष प्रति मयं कारिता

---

* ' त 'ला मोडीतला र खालीं जोडला आहे.

१२

( गाभाऱ्यांतील मखरावर जें चांदीचें कवच आहे त्याचे मध्यावर )

श्री मार्तंडचरणी तत्पर
रखमाजि जाचक निरंतर
सके १६९७ श्रावण शुध ७ ॥

१३

( देवळांत खंडोबाच्या व म्हाळसेच्या पितळेच्या मूर्ति आहेत त्यावर व त्यांच्या प्रभावळीवर असलेला हा श्लोक रा. बाबूराव बेलसरे यांचे तोंडून उतरून घेतला. )

मालोजी भोसल्याचे उदरजलनिधि शाहशीतांशु झाला
तद्गर्भि येकराजा तनयवर तिघे त्यास दीपांबिकेला
शाहक्ष्मापः शरीफा वनिपसुगुण तुकोजिभूपार्कवंशी
खंडेराया स्वदेवाशरभनृपवरें अर्पिलें जेजुरीसी

१४

( पंचलिंगाचे देवळांत शिरतांना उजव्या बाजूस )

श्री शके १६७७ युवा ना
म सवछेर श्री
पंच ल्लीगचरणी वीठल
शिवदेव सासवड
कर हा (¹) ना

१५

( म्हाळसेचा शिळा आहे तेथें बाहेरील खांबावर )

श्री शके १६६४ दुंदु
भी नाम सवत्सरे
श्री मार्तंडभैरव
चरणी खंडोजी सु
त मल्हारजी होळकर

१६

( भांडारगृहाच्या दरवाज्यावरील खांबावर )

श्री मार्तंड प्रसन
सके १६७८ धाता

१ 'हा' स 'र' मोडीतल्याप्रमाणें खालीं जोडला आहे.

नाम सवछरे चैत्र सु
ध प्रतिपदा भाशाग्रर
पैकी दवाजी चेवधरी
श्री गोदेकर याच्य वा ?
कर सु भवतु ॥

१७

( दोन घंटापैकीं एकावर )

1711

N. S. DASANGUST

१८

( दुसऱ्या घंटेवरील गोलाकार लिहिलेला )

श्री मार्तंड स्थान जेजुरी भक्तराज
वाल्हाजी व हारीबा बीन जानजी
माळा गा
१ बनारोडा

१९

( उतरावयाच्या रस्त्यावरील मध्यावर दरवाजाचे उजव्या बाजूस )

श्री सके १७०५ क्रोधी
सवछरे ते दिवसी श्री मार्त्तंड भै
रवचेरानि तत्प हायेबत
राव सुत खंडोजी अण्णा
गीरवीकर नीरंतर

२०

( श्री लवथळेश्वराचे दारावरील शिलालेख )

जळाशय कर्ता बा
बाजि धर्माजी काट
कार्यकर्ता हेगोजि का
ट परो [ प ] कारार्थ
धर्म पव्हे का७ ^

२१

(लवथळेश्वराला जातांना पायऱ्याच्या उजव्या बाजूस ७ओळींचा, वरींच अक्षरें फुटलेलीं)

श्रीगणेशायन
मा: श्री स्व (?) स्ती सके १५३०
सो म श्व (?) छ I श्री (?) म॥ वाध
रावीवार (?) कामळावीळे ×-|× धा+
धी फ मी
ठी पा (× ० ॥ ∞
+ + का

२२

( तुकोजी होळकर यानी मल्हारराव होळकर यांचे मंदिर बांधलें आहे त्याचे दरवाजावरील )

श्रीसके १७१२ साधारणनाम
सवछरे आस्वीन शुध दशमीं
श्री मल्हारगौतमेस्वरचरणी
मल्हारजी सुत तुकोजी होळकर

दत्तो वामन पोतदार

## ६७ जयाद्रिमाहात्म्य

जेजुरीचें माहात्म्य वर्णन केलेली सदर पोथी पेशव्यांचें घरीं आहे. सबंध गांवांत एकच प्रत आहे. पोथीच्या अंतावरून ती प्रत अर्वाचीन दिसते. आसपासच्या स्थानांना हि संस्कृत नांवें दिलीं असून क्षेत्राचें माहात्म्य शिवपांडवसंवादांत वर्णिलें आहे. पोथीचा अंतिमोल्लेख असा:—इति श्रीमत्पद्मपुराणे पाताळखंडे जेजुरीमाहात्म्ये शिवपांडवसंवादे श्रवणफळनिरूपणो नाममष्टादशाध्याय: ॥ १८ ॥ श्री मार्तंडभैरवार्पणमस्तु ह्माळसाकांत प्रसन्नोस्तु इदं पुस्तकं श्री ह्माळसाकांतदास दामोदरसुत गोवींदेन लीखीते ॥ यादृसिं पुस्तकं द्रिष्टवा तादृशि लीखीतं मया ॥ यदिशुध्यमशुद्ध वा मम दोष न वीद्यते शके १७६२ अश्वीन कृष्ण ५

नमुन्या करतां खालील श्लोक देतो:—"श्रीमार्तंड भैरव उवाच ॥ शृणु नारद वक्ष्यामि श्रवणस्य फलं पुन: ॥ सप्त स्थानेषु सप्तैव माहात्म्यानि च संति च ॥१४॥ तेषां जयाद्रिमाहात्म्यं प्रथमं समुदीरितं॥ द्वितीयं प्रेमरं प्रोक्तं [पाली-पेंबर] क्षे'(त्र)

माहात्म्यमुत्तमं ॥ ९५ ॥ अनयोरमेळा प्रोक्ता नान्येषामत्र कारणं ॥ आदौ जयाद्रि-माहात्म्यं चंद्राख्यानं तु मध्यतः ॥ ९६ ॥ प्रेमरक्षेत्रमाहात्म्यं तृतीयं तु ततः पठेत् । सर्वपापविशुद्धात्मा ममसानिध्यतां व्रजेत् ॥ ९७ ॥

दत्तो वामन पोतदार

## ६८ तीन देवदास

समर्थांची कविता खंड १ पृ. ४९९ वर समर्थांची निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. त्यांत ' देवदास ' हें हि एक नांव आढळतें. ह्या नांवावर असलेले दोन अभंग हि सदर पुस्तकांत पृ. २८३ ( अ. २०९ ) व पृ. ३०० ( अ. २८३ ) वर आढळतात. व्यंकटेशादि स्तोत्रनिर्माता देवदास हा तर निराळा ठरला च, आतां दादेगांवकर देवदास व देवदास नामधारी समर्थ हा मात्र एक नवीन च भेद होऊं पहात आहे. परंतु समर्थकालीन पत्रव्यवहारादि सामुग्री लवकर च बाहेर पडेल त्यावेळीं याची चर्चा करण्यास साधन उपलब्ध होईल.

दत्तो वामन पोतदार

## ६९ अठरा टोपकर

अठरा टोपकर असें शब्द पुष्कळ ऐकण्यांत येतात. त्याची यादी हि प्रसिद्ध असावी असें वाटतें. पण मला अद्याप ती कोठें न अढळल्यामुळें एका बाडांत खालील टांचण आढळलें तें चर्चेकरितां मंडळास सादर करीत आहे. ' यम्रदोर ' वगैरे शब्दांची मूळ रूपें मला सांपडलीं नाहींत. कंसांतील प्रतिशब्द मला सुचले तसे दिले आहेत. बाकी उतारा जशाचा तसा दिला आहे. वाड तळेगांव दाभाडे येथील भाऊभट बर्वे यांचेकडे मिळालें.

श्री

पाश्चात् प्रभेद टोपिया १८

| | |
|---|---|
| १ फिरंगी ( Portugal ) | १ इंगरेज ( England ) |
| १ वलंदेज ( Holland ) | १ फरासीस ( France ) |
| १ सुषेस ( Swiss ) | १ कसतत्यान (Satlaudian ! Celtic ! ) |
| १ निविशयान (Novwajian !) | १ विनेज ( Venetians ) |

१ यप्रदोर
१ मॅग ( Greek )
१ रखतार
१ लातियान ( Latian )
१ यहुदीन ( Jew )

९

१ दिनमार्क ( Denmerk )
१ उरुस ( Irish ? ) Russian
१ रुमियान ( Roman )
१ तलियान ( Italian )
१ प्रेमरयान ( Pomeranians )

९

संख्या १८

दत्तो वामन पोतदार

## ७० ' ड ' कार व ' छ ' कार

आपल्या मंडळाच्या शके १८३४ चा वृत्तांत इ. सं. रा. राजवाडे यांनीं पृष्ठ १५० वर 'वाग्भटकृत अष्टांग संग्रह संहिता'या मथळ्याचा एक लेख प्रसिद्ध केलेला आहे. सदरची संहिता त्यांचे संग्रहीं आहे व मी ती पाहिली आहे. अक्षर-दृष्ट्या व आयनमनदृष्ट्या रा. राजवाडे म्हणतात, त्याप्रमाणें ही संहिता खरोखर विचारणीय आहे व त्यांच्या शंकेस थोडीशी पुष्टी च पाहिजे असल्यास या लेखानें थोडीशी होईल. परंतु पृष्ठ१५३ वर एक संस्कृत श्लोक दिलेला आहे तो पहातां त्याच्या शेवटच्या चरणावरून लेखकाच्या दृष्टीनें तरी वाग्भट हा ' बोधिसत्व ' होता, असें दिसतें. तो चरण हाः—

। स वाग्भटो नंदतु बोधिसत्वः ॥

तेव्हां कदाचित् ' नमो शर्व्वाय ' हें लेखकाचें असावें. असो.

या च संहितेच्या आरंभीं कांहीं चिन्हें दिलीं आहेत, तीं चिन्हें कशाचीं आहेत अशाबद्दल येथील कांहीं मित्रांनीं विचारल्यावरून ही अडवणूक इतरांची हि असूं शकेल म्हणून त्यांचा माझ्या दृष्टीनें काय अर्थ आहे तो देतोंः—

हीं चिन्हें एकंदर पांच आहेत. त्यांत प्रथम ' ए ' असें प्रथमचें चिन्ह, या दोन रेघा आहेत, दुसरें चिन्ह अडव्या रेघेस अडकविलेला ' ड ' कार आहे. शक ६९७ मधील राष्ट्रकूटांचा जो ताम्रपट प्रभातांत छापला आहे त्यांत ह्या ' ड 'ची आकृति सांपडते. तिसरें चिन्ह ' शून्या'चें आहे. चौथें चिन्ह पुन्हां दोन रेघा आहेत व पांचवें चिन्ह ॐकार आहे. म्हणजे त्या सर्व चिन्हांचें सद्यःकालीन रूपांतर असें होईलः—

यापैकीं दोन ठिकाणच्या दोन दोन उभ्या रेघा वाक्यारंभ व वाक्यांत दर्शक आहेत हें सांगण्याची जरूर नाहीं. पूर्वकालीन बहुतेक मोडी पत्रांवर ' ड ' कार अथवा ' छ ' कार काढण्याची पद्धत असे. त्यांपैकीं ' ड ' कार हा ' शिव ' दर्शक आहे व ' छ ' कार हा ' शुद्धसत्व ' दर्शक आहे. येथें ' ड ' कार हा ' शिव ' दर्शक आहे.

आतां शून्याबद्दल माझें मत असें आहे कीं तें ' छ ' कार दर्शक आहे. मजजवळ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें बरेंच जुनें योगवासिष्ठ आहे. त्याचे पहिले अध्यायाचे शेवटीं ॥ छ ॥ ॥ ० ॥ असें लिहिले आहे. ॥ छ ॥ असें एकाहून अधिक वेळ ग्रंथांतीं लिहिणेचा प्रघात आहे. परंतु ॥ ० ॥ हें शून्य लिहिलेलें मला या योगवासिष्ठाचे पोथीवर च प्रथम पहाण्यास सांपडलें. तेव्हां ॥ ० ॥ हें शून्य ॥ छ ॥ छकाराबद्दल च असावें असें दिसतें.

तेव्हां ' अष्टांग संग्रह संहिता ' या ग्रंथांत प्रथमचीं अक्षरें अगर चिन्हें दिलीं आहेत तीं ' शिवार्थे व मांगल्यार्थे ' आहेत.

गो. का. चांदोरकर

## ७१ शक १५२२ तील एका कुणब्याचें हस्ताक्षर

१ रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुक्यांत कशेळी येथील कुळकर्ण्याच्या दफ्तरांत हा कागद सांपडला. जंजिऱ्याच्या हजरतखानाची स्वारी शक १५२१ त राजापूर प्रांतें झाली. त्या वेळीं ह्या कुणब्याचा कबिला हजरतखानानें दस्त करून नेला. तो सोडविण्यास कुणबी राजापुरास गेला व राजापुरचा मोकदम रुद्राजी हरिदेव शेणवी यास जमान देऊन कुणब्यानें आपला कबिला सोडून घेतला. तत्संबधीं हा कागद आहे. ह्याच्या शेवटीं कुणब्यानें स्वहस्तानें सही केलेली आहे. या सहीवरून एवढें सिद्ध होतें कीं, शक १५२२ त कोंकणांतील एका खेड्यांतील एका कुणब्याला लिहितां वाचतां येत होतें. ह्यावरून असें हि अनुमान निघतें कीं, यःकश्चित् कुणबी जर शक १५२२ त लिहूं वाचूं शकला, तर तत्कालीन जातीनें त्याहून सर्वथा उच्च जे मराठे व भंडारी हे हि बहुशः लिहिणारे वाचणारे असावे. ह्यांच्यांत हि कांहीं कनिष्ट लोक निरक्षर असतील. परंतु कांहींना लिहितां वाचतां येत असण्याचा बराच संभव होता हें उघड आहे.

२ ह्या पत्राचा दुसरा एक उपयोग आहे. त्या काळीं जंजिऱ्याचा शिद्दी कोंकणातील बंदरकिनाऱ्यावरील गांवांवर हल्ले करून माणसें दस्त करून बंदींत घालीत असे. खंडो बल्लाळ चिटणीस व बाळाजी विश्वनाथ भट यांच्यासारख्या वरिष्ठ जातीच्या लोकांना हि शिद्याचा हा उपसर्ग होत असे. मग इतर गरीबांचा काय पाड!

३ अस्सल पत्र मंडळाच्या सभासदांच्या अवलोकनार्थ मंडळाचे दफ्तरीं आहे त्याची नक्कल येणेंप्रमाणें:—

दाा बेाा अता पाडाव कुणबी व गणा गोठणकर कुणबी मौजे कसेली ताा राजापूर सुहुर सन इहिदे मया अलफ कारणे राजश्री रुद्राजी हीरदेव सेणवी माा मजकुरी गोसावियासी लिहून दिला कतबा ऐसा जे हजरत खानसाहेबाची आरमाराची स्वारी राजापूर प्राते जाहाली ते समई आपला कबिला दस्त करून राजापुरीस आणिला माणसे २

| | |
|---|---|
| कमली अवरत | राम मूल |
| खासा अता पाडाव | अता पाडाव |
| १ | १ |

यास तुह्मास जमान देऊन खंड करार केला रुपये

| | |
|---|---|
| ऐन खंड | २०० |
| भाते | १० |
| | २१० |

एकूण दोन से दाहा रुपये मुदत तीन महिनेयाने झाडा करून देऊन था खेरीज खर्चास घेतले रुपये १० दाहा सवाई प्रमाणे खंडाचा पैके बराबरी देउन सदरहू खेरीज जमानत लोक सर्ते प्रमाण देऊन मुदतीस दिले नाही तरी दर सदे

दर माहे व्याज प्रमाणे देऊन

छ १७ रमजान हा कतबा सही

निशानी

अंता पाडावा

४ हा कागद प्रारंभा पासून निशानी ह्या शब्दा सुद्धां कोण्या तरी कारकुनानें लिहिला, कुणब्याला लिहितां येत असेल किंवा नसेल या शंकेनें कारकुनानें निशानी हा शब्द लिहिला—हेतु असा कीं, नांगर, खुरपें, विळा, वगैरेची निशानी कुणब्याचा जी असेल ती आपण पुढें करावी. इतक्यांत असें कळलें कीं, कुणब्याला स्वतः लिहितां येतें. तेव्हां अर्थात् च त्याची सही त्याच्या हातानें कागदावर करून घेतली.

ह्यावरून निष्कर्ष असा एक निघतो कीं, प्रायः कनिष्ठ जातीचे लोक नांगर, खुरपें, अशी आपली निशानी ऊर्फ खूण करीत. परंतु दुसरा हि एक निष्कर्ष निघतो. तो असा कीं, सहीला हि निशानी ही च संज्ञा आहे व असे. निशानी सही अशी अक्षरें असलीं ह्मणजे साक्षर माणसाशीं गांठ आहे असा अर्थ होत असतो. प्रस्तुत कागदांत सही निशानी असे शब्द आहेत. तेव्हां हा लिहिणारा कुळंबी होता. हें कागद लिहिणाऱ्या कारकुनाला माहीत होतें, हें स्पष्ट आहे.

वि. का. राजवाडे

## ७२ हरिराज शेंडे कृत मुद्गलार्यांचें श्लोकबद्ध भाषान्तरद्वय

—००—

१०] १ हरिराज शेंडे, मुद्गलकर, यानीं मुद्गलभटकृत रामार्यांचीं दोन निरनिराळीं मराठी भाषान्तरें मला सांपडलीं आहेत. एक वऱ्हाडांत कारंजे येथें मिळालें; व दुसरें कोंकणांत राजापूर तालुक्यांत देवाच्या गोठण्या नजीकच्या धालवली गावीं रहाणाऱ्या रा. रा. वासुदेवराव गोखले यांच्या येथें मिळालें. कारंजे एथें मिळालेलें भाषान्तर कच्चें व अपरिपक्क असून कवीनें बालपणीं प्रथम च केलें असावेंसें दिसतें. धालवलीस मिळालेलें भाषान्तर पक्कें व सुरेख असून, कवीनें तें प्रौढ वयांत रचिलें असावें. धालवली येथील प्रतींत रामार्यांवर काकंभट्ट नांवाच्या कोण्या शास्त्र्यानें संस्कृत टीका हि दिलेली आहे. धालवली प्रतीचे आद्यन्त असेः—

आदि

" श्रीगणेशाय नमः ॥ सीतालतासमासक्तं रामं कल्पमहीरुहं ॥ सफलं
१०] शीतलछायं श्रांतविश्रांतिदं भजे ॥१॥ श्रीमद्मुद्गलभट्टेन रामचंद्रप्रभोः कृता॥ आर्यावृत्तैस्तुति स्तस्या व्याख्यानं क्रियते स्फुटं ॥ २ ॥

अंत

" हरिः ॐ । इति श्रीविद्वन्मुकुटमहामुद्गलभट्टविरचितं रामार्याशतं अष्टाधिकं संपूर्ण ॥ ॥ शुभमस्तु ॥

राघवमेघोऽमोघो विद्युत्पीतांबरप्रवरः ॥
जीवनदाता सविता हृदयाकाशे सदा ममोल्लसतु ॥ १ ॥
श्रीधनुर्बाणधरं धारं दशाननविमर्दनं ॥
प्रफुल्लनयनांभोजं भजे दशरथात्मजं ॥ २ ॥

१. त्त हवा.

पदार्थद्योतनी चेयं दीपिकार्यानुकूलिनी ॥
काकंभट्टैः सुविधृतां स्वसुखा[1]यै मुदा स्फुटं ॥ ३ ॥
मार्गशीर्षे सितेऽष्टम्यां सौम्ये थ विकृतौ शुभा ॥
सिद्धेयं दीपिकार्याणां मुदं वहतु सर्वदा ॥ ४ ॥

इति श्रीमहामुद्गलभट्टविरचितश्रीरामार्यास्तवपदार्थदीपिका संपूर्णा ॥ छ ॥

समुद्रवसनावर्तिविद्वन्मंडलमूर्तिना ॥
आर्या विरचिता श्रीमन्महामुद्गलसूरिणा ॥ १ ॥

गोदातीरीं विराजे विमल बहुवरें मुद्गल श्रेष्ट नावें ॥
पावे सत्पुत्रसौख्या जननिकर जया सेवितां येकभावें ॥
शेंडें तेथील जोशी विबुध बहुभले वेदविद्याविचारें
त्या वंशीं कश्यपाचा मुकुटमणि दिसे माणिकेशावतारें ॥ १ ॥

सत्पुत्र त्याचा हरिराज नामें
करि रविध्यानविधान नेमें ॥
करूनि आर्याश्रम अर्थ त्यानें
समर्पिला रामपदीं सुखानें ॥ २ ॥
माता मृता शिशुपणीं पण वाढवीलें
सद्बुद्धि देउनि मला मग सिद्ध केलें ॥
तो माणिकेश्वर पिता नमिला मनानें
भवें करूनि हरिराजकवीश्वरानें ॥ ३ ॥

इतिश्रीमन्महामुद्गलभट्टाचार्यसूरिणा विरचिता रामार्या[2] श्रीमज्जानकी-रमणचरणपरिचरणशीलाः सार्थाः संस्कृतप्राकृतार्थेन समाप्ता ॥ छ ॥ ॥

२ कारंजे एथील पोथींत शेंडें बद्दल शेटे असा पाठ आहे. परंतु शेंडें हा च पाठ खरा असावा. शेटे हें आडनांव ब्राह्मणांत आढळत नाहीं. शेंडें हें आडनांव ब्राह्मणांत आहे. गांवाच्या शेंवटीं जें मुळीं रहात असत ते शेंडे. कोंकणांत शेंडे चितळे, शेंडे सोमण अशी आडनांवें आहेत. शेंडे चितळे म्हणजे गांवाच्या शेवटास रहाणारे चितळे त्याप्रमाणें च शेंडे जोशी म्हणजे गांवाच्या शेवटास रहाणारे जोशी.

३ मुद्गलभट्ट कोण कोठील तें माहीत नाहीं. हा महाराष्ट्र ब्राह्मण होता, यांत संशय नाहीं. मुद्गलरामायण ज्या मुद्गलानें केलें तो च जर हा असेल, तर हा

---

१ णां २ च्या ३ भा

शिवाजी व संभाजी यांच्या कारकीर्दीत हयात असावा. काकंभटानें पदार्थद्योतिनी टीका विकृति संवत्सराच्या मार्गशीर्ष शुक्ल किंवा कृष्ण अष्टमी बुधवारीं संपविली. सौम्ये असा पाठ धरून शक १६३२,१६९२ किंवा १७५२ ह्या तीन सालांत मार्गशीर्ष शुक्ल किंवा कृष्ण अष्टमीस बुधवार पडत नाहीं.–तेव्हां पाठ सोमे असा धरावा. तो धरल्यास शक १६९२ च्या मार्गशीर्ष कृष्ण अष्टमीस सोमवार पडतो. तात्पर्य काकंभटाचा टीकाकर्तृत्वकाळ शक १६९२ धरावा. परंतु हरिराज केव्हां झाला, तें कळण्यास ग्रंथांत कांहीं एक गमक नाहीं. भाषा अगदीं अलिकडील आहे. कदाचित् हरिराज हा काकंभटाचा समकालीन असेल. दोन्ही भाषान्तरें मंडळाचे संग्रहीं आहेत.

१०] वि. का. राजवाडे

## ७३ गोत्र ऊर्फ कुलनाम ऊर्फ आडनांव

परवां सिन्नरास मला एक बेपारी साक्षर लाडवंजारी भेटला. त्याच्या बोलण्यांत कुलनाम ऊर्फ आडनांव या शब्दाऐवजीं गोत्र हा शब्द वारंवार आला. म्हणजे ज्याला आपण आडनांव किंवा कुलनाम ह्मणतो त्याला तो गोत्र ह्मणे. अपत्यप्रभृति गोत्र, ह्या पाणिनीय सूत्राला अनुसरून तो बोलल्यासारखा दिसला. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं त्याला पाणिनीयसूत्र माहीत होतें. अर्थ इतका च कीं त्याच्या जातींत पाणिनीनें नमूद केलेला संप्रदाय पूर्वापार प्रचलित होता. हा संप्रदाय ह्मणजे गोत्रनामाला कुलनाम समजण्याचा प्रघात भारतवर्षांत फार प्राचीन आहे. हर्षचरितावर व्याख्या करणारा शंकर ह्या प्रघाताचा उपयोग करतो. उदाहरणार्थः-

१०] । अनार्यः पुष्पमित्रः मौर्यं बृहद्रथं पिपेष

( हर्षचरितं—षष्ठः उच्छ्वासः )

यावर शंकर अशी व्याख्या करतोः—

। मौर्य इति गोत्रनाम ।

तात्पर्य, गोत्रनाम ह्मणजे कुलनाम ऊर्फ आडनांव.

वि. का राजवाडे

## ७४ दासींचीं नांवें संस्कृतांतून मराठी

हर्षचरिताच्या अष्टमोच्छ्वासांत बाणानें दासींचीं नांवें ( पृष्ठें २४६, २४७) दिलीं आहेत. त्यांवरून मराठींत खालील नांवें आलीं आहेत.

| | |
|---|---|
| १ कलहंसि = हंशे ( एकशेष ) | १३ नर्मदे = नर्मदे, नबु |
| २ सुंदरि = सुंदरे | १४ सुभद्रे = सुभद्रे |
| ३ मंगलिके = मंगळे | १५ वसंतिके = बसन्त्ये |
| ४ शबरिके = सबरे, सवरे, शबरे | १६ मुक्तिके = मुक्त्ये |
| ५ मातंगिके = मंगे | १७ मंजुलिके = मंजुळे |
| ६ वत्सिके = वच्छे | १८ कालिंदि = काळिंदे |
| ७ नागरिके = नागरे | १९ कमलिनि = कमळे |
| ८ विराजिके = बिर्जे | २० रोहिणि = रुई |
| ९ भृंगारधारिणि = भुंगे | २१ अंब = अंबे |
| १० केतकि = कैके | २२ अंबिके = अंबिके |
| ११ मेनके = मेनके | २३ सामांतिनि = शेवंते |
| १२ विजये = बिजे | |

हीं सर्व नांवें शूद्रांत महाराष्ट्रांत सध्यां हरहमेष आढळतात.

वि. का. राजवाडे

## ७५ विमानें व त्यांचा प्राचीन संस्कृत ग्रंथांत उल्लेख

१ विमानांचा उल्लेख भारतादि इतिहास व पुराणें यांतून सडकून आढळतो. ग्रीक पुराणांतल्याप्रमाणें च भारतीय इतिहासपुराणांत विमानांतून देवादि प्रवास करताना दिसतात. परंतु, हे उल्लेख पौराणिक अतएव कविकल्पित आहेत, अशी शंका सहज च येते. कालिदासादींच्या काव्यांतून देवांनीं पुष्पवृष्टी केल्याचीं वर्णनें सर्वश्रुत आहेत, परंतु, तीं हि काल्पनिक च होत, वास्तविक नव्हत. लक्ष्यार्थ किंवा व्यंग्यार्थ सोडून वाच्यार्थानें भौतिक पदार्थांनीं बनविलेल्या विमानाचा उल्लेख इतिहासाला बहुत उपयोगाचा होतो. पंचतंत्रहितोपदेशादि नीतिकथांत विमानाचा किंवा जादूच्या गरुडाचा उल्लेख येतो, तो हि काल्पनिक च दिसतो, वास्तविक म्हणवत नाहीं. म्हणजे

कोणी मनुष्य गरुडावर बसून राजकन्यच्या महालांत हवेंतून गेला, ही गोष्ट वास्तविकांत काढण्यास मन कचरते. उडत्या सतरंज्या, घोडे वगैरे सारखा च हा उडता मायावी गरुड होता, असें म्हणावें लागतें. तात्पर्य वर्तमान कालीं ज्या तन्हेच्या यानांना विमान ह्मणून समजण्यांत येतें व ज्यांत यांत्रिक गूढाहून इतर कोणतें हि मांत्रिक गूढ नसतें, त्या तन्हेच्या विमानांचा उल्लेख प्रायः इतिहासांतून, पुराणांतून व काव्यांतून आढळत नाहीं. परंतु ह्या विधानाला मला एक अपवाद आढळला. बाण आपल्या हर्षचरिताच्या सहाव्या उच्छ्वासांत खालील वाक्य लिहितोः—

"आश्चर्यकुतूहली च चंडीपातिः दंडोपनतयवननिर्मितेन नभस्तलयायिना यंत्रयानेन अनीयत क्वापि" ।

चंडीपति नांवाच्या राजाला ऊर्फ संस्थानिकाला कोण्या यवनानें आकाशांतून जाणाऱ्या यंत्रयानानें ऊर्फ विमानानें कोठें तरी नेलें, असें बाण लिहितो. एथें एवढें लक्ष्यांत ठेवावयाचें आहे कीं बाण प्रस्तुत प्रकरणांत ऐतिहासिक कालांत अनेक राजे कसकसे विपत्ति पावले तें सांगत आहे. पौराणिक किंवा काल्पनिक राजाचा उल्लेख बाण एथें करीत नाहीं. त्याच्या पूर्वींच्या हजार पाचशें वर्षांतील राजांचा निर्देश बाण करीत आहे. ह्या उल्लिखित राजांपैकीं कित्येकांचा पत्ता लागलेला आहे व कित्येकांचा लागावयाचा आहे. परंतु, एवढें निश्चित आहे कीं ह्या राजांपैकीं प्रत्येक व्यक्ति ऐतिहासिक आहे. प्रत्येकाचा अंत कसा झाला, तें बाणाच्या कालीं सर्वत्र मशहूर होतें. म्हणजे बाणाच्या कालीं तत्पूर्वींचा हजार पांचशें वर्षांचा इतिहास लोकांना माहीत होता असें झालें. ह्या ऐतिहासिक संस्थानिकांपैकीं चंडीपति हा एक संस्थानिक होता. ह्याला एका यवनानें विमानांत बसवून आकाशांतून कोणीकडे नेऊन टाकिलें तें कोणाला बाणाच्या काळापर्यंत माहीत नव्हतें. आश्चर्यानें व कुतूहलानें प्रेरित होत्साता चंडीपति यवननिर्मित विमानांत बसला व विपत्ति पावला, ही गोष्ट मात्र सर्वतोमुखीं झाली व तिची जागृत स्मृति बाणाच्या कालापर्यंत होती. सांगण्याचा मुद्दा एवढा च कीं आकाशयानाचा हा बाणकृत उल्लेख पौराणिक किंवा काल्पनिक नसून, केवळ वस्तुस्थितिदर्शक, अतएव विश्वास्य आहे ह्याच्या खरेपणाचा संशय येण्याला कांहीं एक कारण दिसत नाहीं.

२ बाण शक ५२२ च्या सुमारास झाला. तत्पूर्वीं केव्हां तरी हजार पांचशे वर्षांच्या आंत चंडीपति झाला असावा. चंडीपतीचा नक्की काल सांगतां येत नाहीं. तत्रापि अदमासानें तो शकाच्या दोनशाव्या वर्षाच्या अगोदर व शकपूर्व एकशेच्या नंतर कधीं तरी झाला असावा. ह्या तीनशें वर्षांत पंजाबाच्या आसपास यवनांची ह्मणजे ग्रीकोद्भव लोकांची हालचाल बरीच असे. तेव्हां प्रश्न असा उद्भवतो कीं त्या कालीं किंवा केव्हां हि यवनांत ह्मणजे ग्रीक लोकांत विमानाचा शोध लागला

होता कीं काय व आकाशमार्गानें गमन करण्याजोगें विमानकलेचें ज्ञान त्यांच्यांत त्या कालीं होतें कीं काय! एकदोन मान्य एन्सायक्लोपीडिया ऊर्फ विश्वकोश पहातां असें दिसतें कीं विमानयंत्राचा शोध ग्रीक लोकांस त्या कालीं लागला नव्हता. आतां बाण तर स्पष्ट म्हणतो कीं यवनानें राजाला विमानांतून कोणीकडे नेलें न कळे. तेव्हां ह्या परस्पर विरोधी विधानांची एकवाक्यता कशी लावावयाची ? किंवा ती लागत नसल्यास ह्या दोन विरोधी वचनांतून कोणतें विश्वास्य मानावयाचें ! एकंदरींत साधकबाधक प्रमाणें पाहतां, माझें असें निश्चित मत झालें आहे कीं बाणाचें विधान पूर्णपणें विश्वासपात्र आहे व त्यावरून अशी निष्पत्ति होते कीं त्या कालीं यवनलोकांत ह्मणजे एशिआटिक ग्रीक लोकांत विमानकला, कोणत्या तरी प्रकारची, प्रचलित होती. जड हवेंत विमान दोन तऱ्हांनीं तरंगवितां येतें· सामान्य हवा उष्णतेनें हलकी करून विमानाच्या फुग्यांत भरून तें हवेहून हलकें करावयाचें; किंवा हवेहून एखादा हलका वायु फुग्यांत भरून तें कार्य साधावयाचें. पैकीं दोन्हीं तऱ्हा तत्कालीन यवनांना माहीत असण्याचा संभव आहे. त्यांतल्या त्यांत ऊष्णतेनें हवा हलकी करून फुग्यांत भरण्याची तऱ्हा सहज उपलभ्य असते व फ्रान्सांत सवाशे वर्षांपूर्वीं मॉंड-गोल्फिए यानें या च तऱ्हेचा उपयोग केला होता. इतकें खरें कीं यूरोपियन शोधकांना यवनांना ही विमानकला माहीत होती कीं नव्हती एतत्संबंधीं साधनें जशीं व जितकीं उपलब्ध व्हावींत तशीं व तितकीं झालेलीं नसल्यामुळें त्यांनीं ग्रीकांना म्हणजे यवनांना ही कला माहीत नव्हती असा नकारात्मक निश्चय केला. परंतु, बाणाच्या ह्या निश्चीत व विश्वसनीय विधानानें ह्या नकारात्मक निश्चय बदलणें प्राप्त आहे. बाणाच्या विधानानें असें म्हणावें लागतें कीं बाणपूर्वकालीन यवनांना कोणत्या तरी प्रकारची विमान कला निःसंशय माहीत होती. विशिष्ट प्रकार कोणता होता, तें कळण्यास संस्कृत ग्रंथांत सध्यां तरी कोणतें च साधन मला उपलब्ध नाहीं.

वि. का. राजवाडे

## ७६ अजे, अजी

मराठींत म्हताऱ्या, खास संबोधितांना विशेष सलगी असल्यास अजे अशी हाका मारतात व बहुमानानें अजी अशी हाका मारतात. ही हाक मराठीनें सहज च संस्कृतांतून वंशपरंपरेनें घेतली आहे. बाण हर्षचरितांत अष्टमोच्छ्वासांत स्त्रियांना संबोधण्याचे दहा पांच प्रकार अर्थां सुद्धां देतो. त्यांत खालील वाक्य आहेः—

" कथं इव महानुभावां एनां आमंत्रये । वत्से इति अ-
तिप्रणयः । इ. इ. इ. । आर्ये इति जरारोपणम् ।

जरारोपण असतां बाणाच्या काळीं वृद्ध स्त्रियांस आर्ये अशी हाक मारीत. आर्य्ये चा अपभ्रंश अज्जे. अज्जे चा मराठी अपभ्रंश अजे. कुणबी व शूद्र घरांतल्या म्हातारीला अद्याप अजे अशी हाक मारितात. शिष्ट ब्राह्मण अजी अशी हाक मारितात. अजे चें अजी रूप शिष्टांनीं कसें साधलें तें उमगत नाहीं.

वत्से=बच्चे
पुत्रि=पोरी
मूलिके=मुली
भवति=बाई
मातर्=माई
भगिनि=बहिणि, बहिण्ये, वहिनी
बाले=बाळे

वगैरे हाका मराठीनें आपली अजी जी संस्कृत तिजपासून घेतल्या आहेत. ह्याला बाण साक्ष आहे ( निर्णयसागर प्रत, पृष्ट २४४ ).

वि. का. राजवाडे

## ७७ विवेकसिंधु व गुरुचरित्र

मुकुंदराजकृत विवेकसिंधु व सरस्वती गंगाधरकृत गुरुचरित्र या दोन ग्रंथांच्या रचनाकालामध्यें सुमारें १७५।२०० वर्षांचें अंतर आहे हें सर्वांस माहीत आहे च. परंतु आज मुद्दाम या दोन ग्रंथांचा एकत्र उल्लेख येथें करण्याचें कारण असें आहे कीं, विवेकसिंधूंतील व गुरुचरित्रांतील कांहीं ओव्या अगदीं सारख्या आहेत. कोठें कोठें फक्त एक अर्धे अक्षर बदललेलें आढळतें. अर्थात् विवेकसिंधूतील दृष्टांत हि गुरुचरित्रांत घेतलेले आहेत. विवेकसिंधु व गुरुचरित्र या प्रत्येकांतील प्रतिपाद्य विषय अगदीं भिन्न असल्यामुळें पहिल्याचें प्रतिबिंब दुसऱ्यांत सर्वत्र न दिसणें हें योग्य च आहे. या शिवाय, सरस्वती-गंगाधरानें एखादा वेदांतविषयक ग्रंथ रचिलेला असल्यास त्यांत यापेक्षां कदाचित् बरेंच साम्य दिसून येईल असें मला वाटतें. माझ्या लक्षांत आलेलें साम्य पुढें सदरवारीनें दाखवित आहे. त्यावरून पुढील अनुमान काढतां येतेः—

१ सरस्वतीगंगाधर यानें विवेकसिंधूचें परिशीलन विशेष केलें होतें. तें इतकें कीं, गुरुचरित्र रचतांना विवेकसिंधूंतील ओवी, शब्द व दृष्टांत वगैरे जसेचे तसे आपोआप त्याचे हातून अगर तोंडून बाहेर पडत असत.

या दोन ग्रंथांतील साम्य व त्यावरून निघणारें अनुमान यापासून कवि-काव्य-संशोधकांस कोणत्या हि दृष्टीनें फायदा होईल काय ?

| विवेकसिंधु | गुरुचरित्र |
|---|---|
| घालेपणाचे ढेकर । | तृप्ति झालियावरी ढेंकर । |
| जेवीं देती जेवणार । | देती जैसे जेवणार । |
| तेवी तुझ्या स्वरूपाचा उद्गार । | गुरुमहिमेचा उद्गार । |
| ते घोलती माता ॥ १/२ ॥ | बोलतसे अनभवोनी ॥ १/६० ॥ |
| चाड चातुर्यांथें जीणें । | तैसें माझें,बोलणे । |
| ऐसे बोलती शाहाणें । | ज्यासी चाड गुरुस्मरणें । |
| तरी तेथीचीये परमार्थुखुणे । | अंगीकार करणार शहाणे । |
| माह्य कां न व्हावें ॥ १/१३ ॥ | अनुभविती एकचित्तें ॥ १/६४ ॥ |
| उंसु कीरु दीसे काळा । | ग्रंथ कराल उदास |
| परी घेणें रसाचा गळाळा । | वांकुडा कृष्ण दिसे ऊस |
| तैसे बोल आरुष परी झलाळा । | परि अमृत निघे त्याचा रस |
| दीसे वीवेकाचा ॥ १/१६ ॥ | दृष्टी यावी तयावरी ॥ १/६३ ॥ |
| जेथ ब्रह्मरसाची गोडी । | ब्रह्मरसाची गोडी । |
| अनुभवीजे रोकडी । | अनुभवितां फळें रोकडी । |
| तया बोलाची आवडी । | या बोलाची आवडी |
| साधुजनांसी ॥ १/३३ ॥ | ज्यासी संभव अनुभव ॥ १/६५ ॥ |
| कल्पतरुसीं उपमा यावी । | कल्पतरुसी यावी उपमा । |
| तरी तो कल्पील्या आर्थातें पुरवी । | कल्पिलें लाभे त्याचा महिमा । |
| कल्पनातीत भेटवी । | न कल्पितां पुरवी कामा । |
| सद्गुरुनाथु ॥ १/७७ ॥ | कामधेनू श्रीगुरू ॥ १/३५ ॥ |
| म्हणौनी गुरुसीं उपमा । | म्हणोनी श्रीगुरु उपमा । |
| औसी कवणीं असे महिमा | ऐसा कवण असे महिमा । |
| प्रपंचची होये परब्रंह्म । | प्रपंच होय परब्रह्म । |
| प्रसादें जयाचेनी ॥ १/८१ ॥ | हस्त मस्तकीं ठेवूनियां ॥ ३/३४ ॥ |
| परोपकाराचेनी संतोषें । | तो दातार अखिल मही । |

पात्र कुपात्र न दृषे ।
गुरु मेघ सर्वत्र वरुषे ।
उदारपणें ॥ ८२[1] ॥
तथापी पात्रतावीषेशें ।
स्थीर होये सखोल भुमीके ।
थेंबु ही न न्हाये उटकें ।
जाये नीघोनीयां ॥ ८२[1] ॥
जी मीं संसारसमुद्री बुडाला ।
तापत्रये वडवामी पोळला ।
क्रोधाम्री जळचरी वीसंचीला ।
जाला अताशोच्यु ॥ १०[1] ॥
ज्ञानाचां तारुवीं बैसोनी ।
रुपेचें सुवाये पेलुनी ।
दैवेंचीं तारका होउनी ।
तारावें मातें ॥ ११[1] ॥
अैसी रुपा उपजोनी ।
वीनवी शीष्य शीरोमणी ।
मस्तक श्रीगुरुचरणीं ।
न्यसीता जाला ॥ १४[1] ॥
जैसें भागलें ढोर ।
पावे सुरवाडीक बान्हाड ।
तेथुनी उठीतां थोर ।
आगची घाली ॥ ४[2] ॥
तुझीया उपकारा ।
उत्तीर्ण न व्हीजे दातारा ।
.... ... ... ... ... ...
... ... ... ... ॥ २२[2] ॥
मग बोलीला तो योगींद्रु ।
बा रे तुं पुर्णचंद्रु ।
माझा बोधसमुद्रु ।
उल्हासीला तुंवा ॥ ३४[2] ॥
तुवां माहांसुख लाधलें ।

जैसा मेघाचा गुण पाही ।
पर्जन्य पडतो सर्वांठाई ।
कृपासिंधु ऐसा असे ॥ ३१[3]
त्यांताचि पात्रानुसार ।
सांगेन साक्षी एक थोर ।
सखोल भूमी उदक स्थिर
उन्नतीं उदक नाहीं जाणा ॥ ३२[3] ॥
तापत्रयाग्नींत पोळलों ।
मीं संसारसागरीं बुडालों ।
क्रोधादिजळचरीं वेष्टिलों ।
अज्ञानजाळें वेष्टूनियां ॥ २३[3] ॥
ज्ञाननौकीं बैसवोनी ।
कृपेचा वायु पालाणुनी ।
हृदे तारक करुनी
तारावें मातें ॥ २४[3] ॥
ऐशिया करुणावचनी ।
विनवीतसे नामकरणी ।
मस्तक सिद्धाचिया चरणीं ।
ठेविता झाला पुनः पुनः ॥ २५[3] ॥
क्षुधेनें पीडिलें ढोर ।
जैसें पावे तृणविढार ।
त्यातें होय मनोहर ।
न वचे तेथोनि परियेसा ॥ १५[3] ॥
ऐशा तवोपकारासी ।
उत्तीर्ण न व्हावें वंशोवंशी ।
... ... ... ... ... ..
... ... ... ... ॥ ११[13] ॥
मग काय बोले योगींद्र ।
बा रे शिष्या तू पूर्णचंद्र ।
माझा बोधसमुद्र ।
कैसा तुवा उल्हासविला ॥ ४१[3] ॥
तूतें महासुख लाधलें ।

जें गुरुदास्ये फळलें ।
परब्रंह्म आनुभवलें ।
तुज स्वानुभवें ॥ २/३६ ॥
अैसी सीष्याची वीनंती ।
अैकोनी गुरु काये बोलती ।
तें श्रोता आवधारावें चींत्ती ।
म्हणे मुकुंदराज योगी ॥ २/१० ॥
अैके सीष्यचुडामणीं ।
धन्य धन्य तुझी वाणीं ।
आठवे जेथीचा प्रश्नी ।
परमपुरुष ॥ ३/१ ॥

गुरुदास्यत्व फळलें ।
परब्रह्म अनुभविलें ।
आजिचेनि तुज आतां ॥ ३/४३ ॥
ऐशी शिष्याची विनंती ।
ऐकोनी सिद्ध काय बोलती ।
साधु साधु तुझी भक्ती ।
प्रीती पावो गुरुचरणीं ॥ ४/१ ॥
एक शिष्यचूडामणी ।
धन्य धन्य तुझी वाणी ।
आठवतसे तुझ्या प्रश्नीं ।
आपिमध्यावसानक ॥ ४/२ ॥

पीतयाचे रेत ।
मातेचे श्रोणीत ।
जननीगर्भीं होणें मीश्रीत ।
रुतकाळीं ॥ ६/१९ ॥
... ... ... ... ... ।
... ... ... ... ... ।
पांचे आहोरात्रें होये सुढाळु ।
बुब्दुदाकारु ॥ ६/१८ ॥

मातेचें शोणित पित्याचें रेत ।
संपर्क झाला जननीगर्भांत ।
जैसें सुवर्ण असे कढत ।
पांच दिवस बुद्बुदाकार ॥ ४५/७६ ॥

विवेकसिंधूंतील वरील उतारे मजजवळच्या एका जुनाट हस्तलिखित प्रतीवरून घेतलेले आहेत व गुरुचरित्रांतील उतारे छापील प्रतीवरून घेतलेले आहेत. प्रत्येक ओवीच्या शेवटीं दोन आंकडे आहेत त्यापैकीं रेघेवरील आंकडा अध्यायाचा असून खालचा आंकडा त्यांतील ओवीचा आहे.

गं. ना. मुजुमदार

## ७८ कपिलानिर्णय

ग्रंथनामः—कपिलानिर्णय । कपिलापदशक्यार्थनिर्णय ।

ग्रंथकारनामः—सिद्धगुणाकरपंडित

लांबीरुंदीः—६½ इंच × ३¾ इंच

पृष्ठेंः—७ × २संपूर्ण

पंक्तिः—दरपृष्ठास १० ते १२

अक्षरः---महाराष्ट्री बालबोधी अर्वाचीन
विषयः---कपिला गाईचें लक्षण
ग्रंथरचनाकालः---शक १७०० सुमारें
ग्रंथलेखनकालः---शक१७५० सुमारें
कागदः---इंग्रजी बंदरी
स्थळः---पुणें शहर
भाषः---संस्कृत गद्य
आद्यः---श्रीगणेशायनमः ।
श्रीपरब्रह्मणे ।
१०] सुश्रीमद्रघुनाथाव्हबाजीरावमुदे मया ।
कपिलापदशक्यार्थनिर्णयो लिख्यतेऽधुना ॥ १ ॥
अंतः---श्रीरघुनाथाज्ञप्त्याऽधिषणावीभत्वं विचार्य धर्मशास्त्राणि ।
सिद्धगुणाकररचितः कपिलकपिलोऽस्तु तत्तुष्ट्यै ॥ २ ॥
इति कपिलानिर्णयः समाप्तोयं ॥ छ ॥

पापक्षालनार्थ रघुनाथ बाजीराव ऊर्फ दादासाहेब यानीं सिद्धगुणाकरपंडित याजकडून कपिलादान करण्याकरितां कपिला गाईचें शास्त्रोक्त लक्षण काय कसावें त्याचा निर्णय करविला आहे. कोणत्या पापाच्या क्षालनार्थ हा निर्णय करविला त्याचा निश्चित उल्लेख ग्रंथांत नाहीं. ग्रंथ श्रीमंत चंद्रचूड यांचे संग्रहांतील आहे.

गं. ना. मुजुमदार

---

२०]

## ७९ कपिलानिर्णयकार सिद्धगुणाकर पंडित कोण ?

१ भा० इ० सं० मंडळाच्या शके १८३४ च्या अहवालांत प्रभू-प्रकरणीं दोन निवाडपत्रें छापिलीं असून, त्यांपैकीं शके १६७१ आषाढ शु० ५ चे पहिलें निवाडपत्रांत, श्रीवाराणसीक्षेत्राहून आलेल्या पांच पंडितांचीं नांवें आहेत. ह्या पांच पंडितांपैकीं पहिल्याचें नांव 'गुणाकर पंडित' असें दिलें आहे. ह्या गुणाकर-पंडिताविषयीं त्याचे विद्यमान वंशजांकडून अशी माहिती मिळते कीं, त्याचे पाळण्यांतील नांव वेगळे च असून, उपनांव काटे असें होतें. पुढें त्याच्या गाढ्या विद्वत्तेमुळें त्यास ( गुणानामाकरः ) 'गुणाकर' अशी बहुमानाची पदवी मिळाली.

त्यास गुणाकर पंडित ह्या नांवानें च संबोधण्यांत येत असे. शाहूमहाराजांची त्यांचे-वर फार कृपा असे. पुढें त्याचे वंशज हि आपलें उपनांव पंडित असें च लावूं लागले. पंडितगुणाकराचे वंशज सांप्रत फत्त्यापूर, जि० सातारा येथें नांदत असून, गुणाकरपंडितानें संपादिले जाहागिरीचा उपभोग घेत आहेत.

२ माझे स्नेही श्री० मुजुमदार यांनीं सिद्धगुणाकरपंडित यांनीं श्री० रघुनाथराव दादासाहेब पेशवे यांचे आज्ञेवरून रचिलेल्या 'कपिलानिर्णय' नामक संस्कृत गद्य ग्रंथासंबंधानें एक टांचण मंडळास सादर केलें आहे. सिद्धगुणाकर-पंडिताचा हा ग्रंथ श्री. दादासाहेब पेशवे यांचे आज्ञेवरून रचिला गेल्यामुळें, त्याचा रचनाकाल ठोकळ मानानें बसवितां येतो. शाहूमहाराजाच्या कृपेंतील गुणाकर पंडित हा ह्या वेळीं हयात होता. तेव्हां त्यानें च कपिलानिर्णय रचिला असल्याचा संभव आहे. दुसरे भाषेंत सांगावयाचें म्हणजे फत्त्यापूरकर पंडित घराण्याचा मूळ संपादक जो गुणाकर-पंडित त्यास च सिद्धगुणाकर म्हणत असून, त्यानें च हा ग्रंथ रचिला असें असण्याचा बराच संभव आहे. अर्थात् माझें हें अनुमान आहे, माझ्या ह्या अनुमानास सिद्धांताचें स्वरूप येण्यास ह्याहून पुष्कळ च माहिती पाहिजे आहे. संशोधकांनीं ती पुढें आणण्याचें श्रेय घ्यावें, एवढ्याकरितां मी आपली शंका भीत भीत च त्यांजपुढें ठेवीत आहे.

पांडुरंग नरसिंह पटवर्धन

## ८० आमच्या प्राचीन ग्रंथांची लिपि कशी ?

मोडींचें अथवा मौर्यीचें विवेचन 'आर्यलिपींत' करीत असतां ब्राह्मी अथवा 'देव लिपि' इचें उपलब्ध असें स्वरूप मौर्यी अथवा मोडी हें आहे असें मीं प्रतिपादन केलें आहे. आर्ष संस्कृतापासून प्रत्यक्ष निघालेली जी प्राकृत तिचें आविष्कृतरूप ही 'मौर्यी' व महर्षि पाणिनि यांनीं जिला संस्कार दिला आहे अशा संस्कृताचें मूर्तरूप ही 'देवनागरी' ( अथवा बालबोधी ). या वरून एक गोष्ट लक्षांत येईल कीं देवनागरी व मौर्यी ह्या मूळांत एक च परंतु साफसूफ केलेली मौर्यी ती देवनागरी इतका च काय तो भेद.

या च विषयासंबंधी गेल्या संमेलनाचे मीं वेळा मौर्यी व देवनागरी यांचा तौलनिक विचार करीत असतां देवनागरींतील अंगभूत असलेल्या उभ्या रेघेवरून, माथ्यावरील आडव्या रेघेवरून आणि इतर कारणांवरून मौर्यीहून देवनागरी ही अर्वाचीन आहे असें प्रतिपादन केलें असतां त्यावेळीं हजर असलेल्या एका सन्मा-

नेनीय मित्रानें मला प्रश्न केला कीं देवनागरी जर अर्वाचीन तर मग आमचे पुराण ग्रंथ कोणत्या लिपींत लिहिलेले अ ?.

त्या प्रश्नाचें उत्तर त्यावळीं मला दे आलें नाहीं. माझा शोध अपूर्ण म्हणून त्यावेळीं मला माझ्या मित्राची व एका दृष्टीनें सर्व मंडळाची जिज्ञासा अतृप्त ठेवावी लागली. आज त्या प्रश्नानें उत्तर देण्यास मला साधन उपलब्ध झालें आहे.

हें साधन माझ्या श्रमाचें फल न० . ज्या विद्वानाचा मला येथें सहवास आहे व ज्याच्या ज्ञानाचा मला वेळोवेळीं अत्यन्त उपयोग होतो, अशा रा. पाठक, उपनावाच्या सुप्रसिद्ध वैय्याकरणांच्या वाचनांत जें काय आलें तें त्यांनीं मज कडे पाठविलें व तें मी किंचित् विस्तारपूर्वक आपले पुढें ठेवीत आहे. तेव्हां या शोधाचें सर्व श्रेय विद्वन्मान्य पाठक शास्त्री यांस आहे.

पद्मपुराणांतील पाताल खंडांत 'पुस्तक व लिपि ' यांचा उल्लेख आलेला आहे. त्यावरून त्याकाळीं ' तालपत्रांचीं ' पुस्तकें असून तीं देवलिपींत लिहिलेलीं असत व ग्रंथोपजीवी जे आहेत, त्यांनीं असल्या ग्रंथांचें च पूजन करावें वगैरे तेथें मजकूर आहे. ही जी ' देवनागरी ' म्हणून लिपि म्हटली आहे तिच्यांतील, प्रणव, आकार, इकार व उकार कसे असतात त्यांचें हि वर्णन तेथें दिलेलें आहे. त्या वर्णनावरून ' देवनागरी ' लिपीच्या प्राचीन स्वरूपाचा निर्णय लागतो.

ते श्लोक असेः—

श्री तालपत्र लिखितं देवलिप्यन्वितं शुभम् ॥ ३ ॥
वन्धायान्ति प्रचंपट्टयुग्गुलात् प्रणवाक्षरम् ।
प्रागूर्ध्वं रेखयोः प्रान्ते प्रणवस्याग्रयोजिका ॥४ ॥
रेखैका तु भवेदेवमकारस्तस्य पार्श्वतः ।
शिरोभागमुपक्रम्य सकोणाधः प्रलम्बिनी ॥ ५ ॥
आकारः स हि विज्ञेयः पट्टिकादक्षरेखया ।
वामे षड् वक्रबिन्दू द्वाविकार इति कीर्तितः ॥ ६ ॥
तस्य वामशिरोलेखा लम्बिन्या ई उदाहृतः ।
सर्वाक्षरे शिरोरेखा अवक्रा प्रणवं विना ॥ ७ ॥
तस्यां तु लम्बरेखा स्यात्तदन्ते च लवित्रवत् ।
उकारः स हि विख्यातो लवित्रद्वयतस्तद्रू ॥ ८ ॥
एवमन्यानि सर्वाणि ह्यक्षरण्याह भारती ।
लिप्यनयैव लिखितं पुराणं तु प्रशस्यते ॥ ९ ॥

( अध्याय १०० )

या श्लोकांचा अर्थ शास्त्रीबुवांनीं दिला आहे तो जशाचा तसा च येथें देतों:-

ॐ विस्तृत रेशमी वस्त्राच्या दशेच्या गांठीजवळील दोन दोऱ्यांची आकृति काढून त्या दोन रेषांच्या उजवे बाजूनें वरपर्यंत जाणारी एक रेघ जरा वांकडी ओढावयाची म्हणजे ॐ ची आकृति झाली.

अ यांतील एक रेघ म्हणजे प्रणवाक्षरांतील रेघांपैकीं एक रेघ सरळ म्हणजे उभी लिहून तिच्या डाव्या अंगास शिरोभागापासून खालपर्यंत एक रेघ लिहावयाची मात्र तींत मध्यें एक कोण आला पाहिजे. जो आकार होईल तो, अ.

आ अशा तऱ्हेनें बनलेल्या 'अ'च्या जवळ पाटीच्या उजवें बाजूनें दुसरी एक रेघ ( उभी । ) लिहावी म्हणजे 'आ' कार झाला.

इ पाटीच्या डाव्या बाजूस सहाचा आंकडा लिहून त्यांत दोन वांकडे बिन्दू लिहावे म्हणजे ' ऱ्हस्व इ ' झाली.

ई वरील ऱ्हस्व इ या अक्षराची च शिरोभागावरील डावी रेघ लांबविली म्हणजे दीर्घ 'ई' हें अक्षर बनतें.

उ सर्वाक्षरोत्पादक जें प्रणवाक्षर त्यांतील शिरोभागाची सरळ रेघ घेऊन ती थोडी लांब लिहावी व तिच्या खालच्या टोंकास कोयत्यासारखी आकृति जोडावी म्हणजे ऱ्हस्व ' उ ' होतो.

ऊ वरील ऱ्हस्व उ काराच्या रेघेच्या शेवटच्या टोकास दोन कोयत्यांची आकृति काढली म्हणजे तो दीर्घ ' ऊ ' होतो.


अशा रीतीनें इतर सर्व अक्षरें सरस्वतीनें सांगितलीं. या च लिपींत लिहिलेलें पुराण श्रेष्ठ होय.

दुर्दैवानें उतारा फार लहान आहे. 'अशा रीतीनें' असें म्हणून ग्रंथकारांनीं जर आपलें विववरण थांबविलें नसतें तर व्यंजनाच्या कांहीं आकृती तरी आपणांस उपलब्ध झाल्या असत्या; असो. आहेत त्या स्वराकृतींवरून हि आपणांस अनुमान काढण्यास पुष्कळ सवड मिळालेली आहे. तेव्हां श्लोकांच्या धोरणानें ह्या स्वराकृती कशा होतात तें पाहूं:—

ॐ

रेशमी वस्त्राच्या दशेच्या गांठींजवळील दोन दोऱ्यांची आकृति म्हणजे 8——8 अशी व्हावयाची. किंवा हळेकन्नडांतील 'अ' काराची जशी आकृति आहे तशी . या दोन्ही आकृती मूलतः एक च आहेत असें थोडया विचारांनीं दिसून येईल.

या 'अ' कारापैकीं फक्त दोन रेषा घेऊन त्यांचे उजवे बाजूनें एक किंचित् बांकडी उभी रेघ ओढावयाची म्हणजे ' प्रणवाक्षर ' झालें. तें असें



नुसत्या श्लोकावरून ही आकृति सिद्ध करतां आली खरी, परंतु त्या श्लोकाचा अर्थ बरोबर न कळल्यानें कदाचित् कांहीं चुकी हि होण्याचा संभव आहे. परंतु या प्रणवाकृतीशीं अत्यंत साम्य असलेलें प्रणवाक्षर आपणांस पूर्वी एके ठिकाणीं पहाण्यास मिळालें आहे व तो ॐ कार कां व कसा याचें स्पष्टीकरण हि मीं एका लेखांत केलेलें आहे.

रा. राजवाडे यांनीं मंडळापुढें श्रीवाग्भट्टकृत 'अष्टांग संहिते'च्या शक १४ शें मधील त्यांस उपलब्ध झालेल्या प्रतीवर एक निबंध वाचला व सदरहू ग्रंथांत आरं-
१०] भी कांहीं आकृती दिल्या आहेत त्या हि मंडळा पुढें त्यानीं प्रत्यक्ष मांडल्या. ( पहा अहवाल शके १८३४ पृष्ठ १५० )

त्या आकृतींचा अर्थ काय याबद्दल हि मीं मंडळापुढें एका निबंधांत स्पष्टीकरण केलें आहे ( पहा पृष्ठ २७३ )


या आकृतींत प्रणवाक्षराची जी आकृति आहे तिचें व वर दिलेल्या आकृतीचें अत्यंत साम्य आहे.

शंका मला एक च आहे ती ही कीं या आकृतींत 'अ+उ' हीं दोहीं अंगें येतात परंतु 'म् ' काराचा समावेश केलेला येथें मला दिसत नाहीं. यामुळें श्लोकाचा केलेला अर्थ कदाचित् चुकीचा असावा अशी शंका येते.

दुसरें अक्षर अकाराचें.

२०] ' अ '

पूर्वी मीं दाखविलेल्या प्रमाणें या ' अ ' काराची परंपरा अशी:—



ही च आकृति येथें दिलेल्या श्लोकावरून सिद्ध होते, ती अशी:—

प्रणवाक्षरांतील दोन रेषांपैकीं एक रेघ उभी लिहून  तिच्या डाव्या अंगास

वरपासून खालपावेतों एक सकोण  रेघ काढावयाची  म्हणजे

'अ' कार झाला.

## आ

अ काढतां आल्यानंतर हल्लीं ज्याप्रमाणें 'आ' काढणें सोपें आहे त्याप्रमाणें च पूर्वी हि होतें असें स्पष्ट दिसतें. एका अधिक उभ्या रेघेनें दीर्घोच्चार दर्शविण्याची पूर्वी हि—पद्मपुराणांतील वर दिलेल्या श्लोकाच्या रचनाकालीं तरी निदान—पद्धत होतीसें दिसतें. या बाबतींत संशय इतका च कीं हल्लीं प्रमाणे ' अंगभर ' काना द्यावयाचा कीं आज पर्यंतच्या समजुतीप्रमाणें डोकीवरील आडवी रेघ उजवे बाजूस किंचित् खालीं वांकडी करावयाची ! म्हणजे



असा काढावयाचा कीं



असा काढावयाचा !

या ठिकाणीं आणखी एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, या पद्मपुराण ( आंतील विशिष्ट भाग ) रचनाकालीं,

आकार दर्शक काना कोणीकडे काढावयाचा हें दर्शविण्यांत दोन गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. एक पाटीचा व दुसरा उजवे बाजूचा.

पाटीचा उल्लेख केला असल्यानें, ' धूलिकाफलक ' किंवा जिला आपण धूळपाटी म्हणतों, तिचा प्रचार त्यावेळीं सर्रास होता, असें उघड होतें.

काना उजवे बाजूस काढावयाचा असें निक्षून सांगण्यांत 'मात्रा ' हल्लीं बहुदा-प्राचीन ग्रंथांत उपलब्ध होते त्याप्रमाणें अक्षराच्या डाव्याबाजूस खालीं कन्यासारखी देण्याची पद्धत असावी असें दिसतें.

## इ

डाव्या बाजूस सहाचा आंकडा काढून त्यापुढें तिरपीं दोन टिंबें दिलीं असतां ' इ ' कार पूर्ण होतो.

पूर्व चालुक्य, पश्चिमचालुक्य व केव्ह, यावेळचे आंकड्यांच्या ज्या आकृती मजजवळ आहेत त्यावरून सहाचा आंकडा त्या कालीं हल्लींप्रमाणें च होता. त्यापुढें तिरपीं दोन टिंबे दिलीं म्हणजे ती आकृति ६: अशी होते. तेव्हां इ = ६:

या 'इ'चे स्वरूपाबद्दल थोडा जास्त विचार करूं:—

आतां पावेतों ज्या 'इ' आपणांस माहीत आहेत त्या या तऱ्हेच्या आहेत:—



या आकृतींतील पहिली व दुसरी आकृति अशोककालीन मौर्यीतील म्हणजे ब्राह्मींतील आहे. पांचवी व सहावी आकृति हि वरच्या अर्वाचीन म्हणजे गुप्तकालीन आहे. तिसरी व चौथी हि वरी च अर्वाचीन म्हणजे शक ५००।६०० चे सुमारास उपलब्ध होणारी आहे.

पद्मपुराणांत जी 'इ' दिली आहे ती गुप्तकालीन आहे हें उघड आहे. या एका च गोष्टीनें कांहीं अधिक विचार सुचतात त्यांपैकीं थोडेसें येथें नमुद करतों.

( १ ) मौर्यी ही ब्राह्मीचें पूर्वरूप असून तिचें पद्मपुराणांत दिलेलें रूप मौर्यी अगर पुरातन मोडीहून कदाचित् अर्वाचीन असण्याचा संभव आहे; अथवा,

( २ ) एकाहून अधिक लिपींतील अक्षरें मौर्य अशोकाचें च वेळीं जर लिपींत होतीं तर मग गुप्ताचें वेळेच्या इच्या आकृतींत व मौर्याचे वेळच्या 'इ'कारांत असलेला फरक कदाचित् भिन्न वर्णामुळें असेल, एका च वर्णाच्या भिन्न संस्कृतीमुळें नसेल.

( ३ ) या दोन भिन्न आकृतींत खरोखर ब्राह्मीचें रूप कोणतें हें सांगण्याची आज साधनें उपलब्ध नाहींत.

( ४ ) आंकड्यांचा निर्देश केला असल्यानें अंक हे लिपीहून प्राचीन असतील असें जरी खरें आहे तरी तीन आंकड्यांपावेतों च प्रथम अंक होते हें जें कित्येकांचें ह्मणणें आहे तें कितपत सुयुक्तिक होईल !

( ५ ) या च ' इ ' चें रूप हल्लींच्या कानडींत उपलब्ध होतें यावरून 'आर्यलिपींत' जें मी पूर्वी म्हटलें आहे कीं ' हळेकन्नड ' ही ब्राम्हीची च शाखा आहे; तें च योग्य आहे.

## ई

या अक्षराबद्दल विशेष लिहिण्याची अवश्यकता नाहीं.

## उ

सर्वाक्षरोत्पादक जो ' प्रणव ' त्याची सरळ रेघ घेऊन त्यास खालचे टोंकास एक कोयत्याची आकृति लावावयाची ह्मणजे ' उ ' झाला उ = L

या श्लोकांत एक दोन गोष्टी महत्वाच्या आहेत ह्मणून त्यांचा येथें निर्देश करून ठेवणें योग्य होईल.

१ ' सर्वाक्षरोत्पादक ' असें प्रणवा ला विशेषण दिलें आहे. याचा दोन प्रकारचा अर्थ होईल. ६ एक प्रणवाच्या आकृतीपासून सर्व अक्षरांच्या आकृतींची

उत्पत्ति आहे असा, दुसरा प्रणवाच्या उच्चारापासून सर्व वर्णांचा उच्चार असा त्यांच्या युक्तयुक्ततेचा विचार श्रोत्यांनीं आपण च करावा.

२ दुसरी एक गोष्ट महत्वाची आहे ती अशी कीं लवित्र या शब्दानें सूचित जो कोयता तो आजच्या आकाराचा घेतला तर उ ची आकृति ' उ ' अशी हल्लींच्या आकाराची च होते. परंतु प्राचीन ' उ ' मीं वर दिला त्या आकाराचा आहे. ( ∟ )

तसें च हा कोयता कोणते बाजूस लावावयाचा याचें श्लोकांत स्पष्टीकरण नसल्यानें ⅃, ∟ अशा दोही आकृतींचा उ होऊं शकेल.

ऊ

याबद्दल जास्त लिहिणें नको च.

' आर्यलिपींत ' मी पूर्वी नमूद केल्याप्रमाणें मौर्यींतील, मोडींतील, अथवा ब्राम्हींतील ' ऱ्हस्व दीर्घ ' हें द्वित्तावर अवलंबून आहे. आधुनिक बालबोधी प्रमाणें डाव्याउजव्या बाजूवर नव्हे ही गोष्ट वरच्या उताऱ्यानें जास्त स्पष्ट झाली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

गो. का. चांदोरकर

## ८१ शिवकालीन शास्त्री व पंडीत

१ शिवकालीन धार्मिक व सामाजिक हालचालींचा इतिहास अवगत होण्यास तत्कालीन धार्मिक व सामाजिक निवाड्यांचें संशोधन व प्रकाशन होणें अत्यंत अवश्यक आहे. धार्मिक व सामाजिक निवाडे आज्ञापत्रें वगैरे तत्कालीन शास्त्रीपंडितांच्या वंशजांकडे सांपडण्याचा बराच संभव. राजापूर येथील संस्कृत पाठशाळेंतून ' श्येनवीजातिधर्मनिर्णयः ' नांवाच्या एका निवाड्याची नक्कल मिळाली. ती जशीची तशी संशोधकांस सादर करीत आहे. हेतु हा कीं ज्या शास्त्रीपंडितांचीं नांवें यांत आलीं आहेत त्यांच्या वंशजांकडे निवाडे मिळविण्यास संशोधकांस सोईचें व्हावें.

२ सातवा श्लोक संपल्यानंतर शिवरायाच्या राजशासनांतील एका प्रधानाचें संकीर्तन केलें आहे तें सर्व शिवभक्तांचे मनांत निरनिराळे विचारतरंग उत्पन्न करील या बद्दल माझी पूर्ण खात्री आहे.

३ शिवरायाच्या प्रशस्तीपर असलेले सात श्लोक सर्व शिवभक्तांनीं कंठीं धारण करावेत अशी माझी शिफारस आहे.

~~~~~~~~~~~~

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रीसीताराम चंद्राय नमः ॥ स्वस्ति श्रीमत्पंचधाभ्यस्तत्राप्युदितसदाचारचरणेषु जैमिन्याम्नातमहाशास्त्रपारावारानेकधुरीणेषु दृगंघ्रयामनाब्जाविर्भूतानेकतर्ककल्पपादपनिबिडारण्यानीककंठी ( सिंह )रवेषु क्षोणीभरोद्वहनालंकर्मीणकुंभीनसैकनाथजिव्हायुग्माभिपूर्णाननविषमसमुद्गीर्णवर्णरत्नावली भ्राजत्सानुशास्त्रगिरिभिदुरधिषणेषु महामुनिकपिलाचार्योदितविद्याचुंचुषु सांख्यशास्त्रकुशलसंख्यावदग्र्येषु महानुभावयाज्ञवल्क्याद्यनेकस्मृतिव्याख्यातृविज्ञानेश्वरमाधवादिरचितनानानिबंधालोकनप्रत्यक्षीभूतानेकलोकाचारपथेषु कृष्णद्वैपायनास्यकमलनिसृतवेदांतशास्त्राधील्याधिगतपरमार्थेषु राजन्वद्रजतपुरकांता...... पातुरस्थसमस्तकरहाटजातीयब्राह्मणेषु राजापुरप्रांतस्थसंगमेश्वरप्रांतस्थखारेपाटणस्थसंदलप्रांतस्थलांजेप्रांतस्थसैतवडेप्रांतस्थमुचुकुंदीनीरस्थकृष्णातीरस्थकरवीरस्थककुद्मतीतीरस्थसमस्तब्राह्मणानुष्ठितानेकसाष्टांगनतिततयो विलसंतु। क्रोधीसंवत्सरमाधवशुक्लपक्षत्यपक्षतमास्माकीनं भावुकमवबुध्य भवदीयभव्यलेखनेनास्मानानंदयितुमर्हथ। विशेषस्तुश्रीमद्भिस्तत्रत्योदंतपत्री दूतोस्मान्प्रेषितः तं गोचरीकृत्याततिरांतरस्मः स चेत्थं पुरा देशकालविप्लवेमात्रागतानां कतिपयानां राजापुरपट्टणदेशीयानां कोंकणाभिधानदधतां शेणवीति प्रसिद्धानां को धर्मः कीदृगाचार इति केचनात्र भृशमाक्षिपंत्यस्मान् अतः एतज्जातीया जनास्तत्र भूरिशो विद्यंते तेषां पूर्वपरंपरागत आचारो यथा वर्तते तथा लिखित्वा प्रेषेलिमस्तेनैवाचारपथेनैतान्वर्तयिष्यामः इति। तदुत्तरं तु

अस्ति प्रशस्तविभवोपगतप्रशस्तिविस्तारिणी भुवि शकाधिपराजधानी ॥
राजापुरीति विदिता नगरीमतल्लिपल्लीव भाति पुरतस्त्रिदिवोऽपि यस्याः ॥१॥

तस्यामभूद्विमलराजकुलांबुराशावुद्यत्प्रभूतशुभकीर्तिघनप्रकाशः ॥
लोकैः सदा हृदि धृतो गुणसंनिविष्टः श्रीशाहजीति नृपतिर्भुवनैक (शाह)रत्नम्।२।

तस्यात्मजः शिव इति प्रथितप्रभावः सिद्धांगनाजनसमाजसमिद्धकीर्तिः ॥
दाने यमः सुकृतिनां क्षिपति स्म दैन्यं सैन्येन वैन्यसदृशः प्रतिभूपतीनाम् ॥३॥

यस्मिन्नसाधारणधैर्यशौर्यगांभीर्यसौंदर्यगुणैकधुर्ये ॥
गिरीन्द्रभीमार्जुनसिंधुराजस्मराश्च साधारणतां भजंते ॥ ४ ॥

दानाय द्रविणार्जनं जनपरित्राणाय वीरव्रतं
सत्याय प्रियभाषणं हरिपदध्यानाय चेतःस्थितिः ॥
सत्सख्येन च चक्रवर्तिपदवीं याता नृपा भूरिशो
दिल्लींद्रः क्षयमाप यस्य कलहाल्लेकशतुल्योपमः ॥ ५ ॥
~~~~~~~~~~~~

असौ शिवाजी रुचिरेण धाम्ना नाम्ना च रूपेण च संगतार्थः ॥
रोषातुरे चक्षुषि यद्विपक्षो नितांतकांतारसमाश्रितोऽभूत ॥ ६ ॥
विश्राणनेषु व्यसनं यदीयं वियाप्रसंगेषु विनोदसौख्यम् ॥
यस्यावदातं च यशोवितानं दिग्मंडलीमंडपमातनोति ॥ ७ ॥

अयं शिवाजीराजा राज्यं प्रशासत्सवर्णाश्रमेतरायोनिवृतिधर्मालिंगासकरेण वर्तयन् कदाचिद्दिदृक्षया स्वजनपदानटसह्यप्रदेशवासिनः श्येनवीति प्रसिद्धान् द्विजवेषधरान् क्षेत्राजीवान् नानाविधान्युपायनान्यादाय राजदिदृक्षया समागतान् एतान् कौंकणान्दृष्ट्वा राजनिकटवासिनः सभ्यान्पंडितानेतद्देशीयभूधर्माधिकारिणश्च एषां को धर्मः कीदृगाचार इति समपृच्छत् । तत्र सभायां स्थिताः पंडिताः । गागाभट्टस्त्वनूचानो निगमागमवित्तमः । सभायां शुशुभे राज्ञः सुधर्मायां यथा गुरुः ॥१॥ दीक्षितः शितिकंठश्च रघुनाथो बुधाधिपः । कवीन्द्रः परमानंदो महादेवश्च पंडितः ॥२॥ प्रभाकर उपाध्यायस्तथा श्रीरंगशास्त्रिणः । नृसिंहशास्त्रिणश्चाथ भट्टविश्वंभरोऽपि च ॥३॥ अयाचितमहादेवः पंडिताग्र्यो विनायकः । सोमनाथो जगन्नाथो भट्टविष्णुस्तथैव च ॥ ४॥ भूगोपालाभिधोऽनंतोपाध्यायः पंडिताग्रणीः । शेषोपाख्यमहादेवः काशीस्थाः पंडिता अमी ॥ ५ ॥ सर्वशास्त्रांबुधेः पारदृश्वानो वेदपारगाः । विहितानुष्ठितिरता निषिद्धानां च वर्जकाः॥६॥ कृष्णागोदावरीनिष्ठाश्च बहवो बुधाः । स्थिता नृपसभे तत्र तथैतद्देशवासिनः ॥७॥ धर्माधिकारिणोत्यर्थधर्मशास्त्रार्थकोविदाः ॥ तत्र धर्माधिकारिलक्षणं इष्टापूर्ते व्रतं प्रायश्चित्तं ज्योतिषमेव च । पुराणं प्राड्विवाकत्वं राष्ट्रधर्मनिरीक्षणं ॥ अष्टधर्मस्य तत्त्वज्ञो नृपेणाधिकृतश्च यः । धर्माधिकारी विप्रेशो ब्रह्मवृंदप्रभुर्हि सः ॥ अथोपाध्यायलक्षणं । तत्र मनुः॥ एकदेशं तु वेदस्य वेदांगान्यथवा पुनः । योध्यापयति वृत्त्यर्थमुपाध्यायः स उच्यते ॥ याज्ञवल्क्यः॥ स गुरुर्यः क्रियाः कृत्वा वेदमस्मै प्रयच्छति । उपनीय ददद्वेदमाचार्यः स उदाहृतः ॥ एकदेशमुपाध्यायऋत्विग्यज्ञकृदुच्यते । वेदस्यैकदेशं संहिताब्राह्मणं वा धर्मार्थमध्यापयति अपरिभाषितवृत्त्यभिसंधानेन च पूर्वोक्तमध्यापयति एते त्रयोऽप्युपाध्याया इत्यर्थ इति मदनपारिजाते ॥

राजापुरप्रांते तु धर्माधिकारिणो गुर्जरोपनामकाः शिष्टा वियंते तथा तेषां *ताम्रपत्रेऽपि आचंद्रार्कमहीधरान्वयभृतामाब्राह्मणः शासना...नैध्रुवगोत्रगुर्जरभुवां भूदेवपूज्यात्मनां । आचारादिषु देशमान्यपदवी वर्वर्ति लोकोत्तरा कश्चिल्लंघयितुं तु तां चरिदृष्टीभूयाद्विधिरस्तं दहेत् ॥ इति ॥

धर्माधिकारिणश्चैते गुर्जरा उपनामतः । महातपस्विनः पांडुरंगोपाध्यायसूरयः ॥ कुलीनाः सत्यवचना वेदवेदांगपारगाः । येषां वचःप्रसादेन देवदेवः प्रसीदति ॥ उपाध्यायो रघुनाथस्तथोपाध्यायकेशवः॥उपाध्यायो विश्वनाथस्तथोपाध्यायविठ्ठलः॥ अष्टाधिकारिणश्चैते राजापुरनिवासिनः । उपाध्यायो गळवलीकरेऽनंतोऽभिधानतः ॥

---

* हा ताम्रपट संशोधकांनीं मिळविला पाहिजे.

धर्माधिकारी विप्रेशो संगमेश्वरराष्ट्रियः । सर्वेऽप्येते । धर्मशास्त्रार्थारूढा वेदसङ्गधरा द्विजाः । निर्जिताखिलक...दिशत्रवः तत्वदर्शिनः ॥ एते चान्ये च बहवः पंडिताश्च समागताः । कृत्वा समाजं सर्वे ते ग्रंथानादाय भूरिशः ॥ हेमाद्रिं माधवं व्याख्यां विज्ञानेश्वरयोगिनः । रत्नावलीं च मदनपारिजातं च चंद्रिकाम् ।। पृथ्वीं चंद्रोदयं कल्पतरुं च स्मृतिकौस्तुभं । मयूखान् सागरान् सप्त गोविंदाद्यं महार्णवं॥ तथा दिनकरोद्योतमपरार्कं च दर्पणं । मन्वाद्यनेकमुनिभिर्भाषिताश्च स्मृतीरपि ॥ मनुर्बृहस्पतिर्दक्षो गौतमोऽथ यमोऽङ्गिराः । योगीश्वरः प्रचेताश्च शातातपपराशरौ ॥ संवर्तोशनसौ शंखलिखितावत्रिरेव च । विष्ण्वापस्तंबहारीता धर्मशास्त्रप्रवर्तकाः ॥ एते ह्यष्टादश प्रोक्ता मुनयो नियतव्रताः । जाबालिर्नाचिकेतश्च स्कंदो लोगाक्षिकोऽसितः ॥ व्यासः सनत्कुमारश्च शंतनुर्जनकस्तथा । व्याघ्रः कात्यायनश्चैव जातूकर्ण्यः कपिंजलः ॥ बौधायनश्च काणादो विश्वामित्रस्तथैव च । पैठीनसिर्गोभिलश्चेत्युपस्मृतिविधायकाः ॥ वसिष्ठो नारदश्चैव सुमंतुश्च पितामहः । विष्णुः कार्ष्णाजिनः सत्यव्रतो गार्ग्यश्च देवलः ॥ जमदग्निर्भरद्वाजः पुलस्त्यः पुलहः क्रतुः । आत्रेयाश्च गवेयाश्च मरीचिर्वत्स एव च ॥ पारस्करश्चार्षशृंगो वैजवाश्च तथैव च । एतत्प्रोक्ताः स्मृतीः । अष्टादशपुराणानि पल्लवानि च सर्वशः । संहिताश्चापि विविधाश्चित्रार्था च बृहत्कथा ॥ एतानन्यांश्च विविधान् ग्रंथानालोक्य भूरिशः । परंपरागतश्चैषां धर्ममालोक्य तत्वतः ॥ गागाभट्टप्रभृतयः कृत्वा निर्णयमुत्तमं । राज्ञे न्यवेदयिषुस्........व्यलेखयत् ॥ तत्रत्यं सारमादाय किंचिदत्रापि लिख्यते । तत्र तावद्याज्ञवल्क्यः ॥ विप्रक्षत्रियविट्शूद्रा वर्णास्त्वाद्यास्त्रयो द्विजाः । निषेकाद्याः श्मशानांतास्तेषां वै मंत्रतः क्रिया ॥ इति ।

तत्र ब्राह्मणधर्माः । प्रातःस्मरणशौचदंतधावनप्रसाधनप्रातःस्नानसंध्यावंदनौपासनाद्यग्निपरिचरणवेदाभ्यासशास्त्राधिगमसमित्पुष्पकुशाहरणादयः स्मृतितोऽवगंतव्याः ॥ नरसिंहपुराणे ॥ दिवसस्याद्यभागे तु सर्वमेतत्समाचरेत् । इति ॥ दक्षः ॥ द्वितीये च तथा भागे वेदाभ्यासो विधीयते । वेदस्वीकरणं पूर्वं विचारोऽध्ययनं जपः॥ तद्दानं चैव शिष्येभ्यो वेदाभ्यासो हि पंचधा । समित्पुष्पकुशादीनां सकलाः समुदाहृताः ॥ पूर्वाह्नस्यैव भागकल्पना ॥ अथ पोष्यवर्गचिंता । तत्र दक्षः । तृतीये च तथा भागे पोष्यवर्गस्य शोधनं । पोष्यवर्गस्तु । माता गुरुः पिता भार्या प्रजा दीनः समाश्रितः । अभ्यागतोऽतिथिश्चाग्निः पोष्यवर्ग उदाहृतः ॥ ( मनुः ) पिता माता सुतो भार्या भगिनी चाविवाहिता । अप्यकार्यशतं कृत्वा भर्तव्या मनुरब्रवीत्॥ ( याज्ञवल्क्यः ) उपेयादीश्वरं चैव योगक्षेमार्थसिद्धये । ( विष्णुपुराणे ) ततः स्ववर्णधर्मेण वृत्त्यर्थं च धनार्जनं । कुर्वीत श्राद्धकर्माणि यजेत पृथिवीपते ॥ सोमसंस्थाहविःसंस्थापाकसंस्थादिसंज्ञकाः । धनायत्ता मनुष्याणां यत्नेनैव धनार्जनेति ॥ धनमूलाः क्रियाः सर्वा यत्नस्तस्यार्जने मतः । दानं च रक्षणं भोग इति तत्र विधिः

क्रमात् ॥ इत्यादिजीवनोपाया ब्राह्मणस्य च । अथापद्वृत्तिः । नैरुक्ते यास्कः । शकटः शाकिनी गावो जाल ........। उदधिः पर्वतो राजा दुर्भिक्षे नव वृत्तयः इति । मनुः । अजीवंस्तु यथोक्तेन ब्राह्मणः स्वेन कर्मणा । जीवेत्क्षात्रियधर्मेण सह्यस्य प्रत्यनंतरः ॥ उभाभ्यामप्यजीवंस्तु कथं स्यादिति चेद्भवेत् । कृषिगोरक्षमास्थाय जीवेद्वैश्यस्य जीविकाम् ॥ वैश्यवृत्त्या जीवन्तोऽप्यविक्रेयमाह । सद्यः पतति मांसेन लाक्षया लवणेन च । त्र्यहेण शूद्रो भवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात्॥ इतरेषां तु पण्यानां विक्रयादिह कामतः । ब्राह्मणः सप्तरात्रेण वैश्यभावं सम्........ ॥ आपदि कृषि वृत्तिरप्युक्ता कालिकापुराणे । कृषिगोरक्षवाणिज्यं विप्रस्यापदि संमतं । तथाप्यनडुद्युग्माभ्यां कृषिं चैव समाचरेत् ॥ द्विगवाभ्यां द्विषट्काभ्यां प्रहरार्धप्रमाणतः । द्वयोर्यामांतरं चैव कारयेद्धर्मतो द्विजः ॥ पिण्याकतृणतोयं तु तेषां दद्यात्प्रयत्नतः । धूमकंडूयनं चैव कृत्वैवं कारयेत्ततः ॥ वैणवीमपि भूमिं तु अधोमूत्रगताय च । कुर्वन्नेवं न सीदेत कृषिं विप्रो महामुने ॥ राज्ञां षड्भागमुत्सृज्य पंचमं कर्षकस्य च ॥ शिल्पिनः प्रकृतीश्चैव दीनांधांस्तर्पयेत्ततः ॥ शेषमात्मनि भुंजीत खलु क्षेत्रेष्वयं विधिः ॥ पराशरस्तु । स्वधर्मनिष्ठस्यापि विप्रस्य कृषिकर्मप्रवृत्तस्य प्रातः स्नानहोमानंतरं हलेऽष्टवृषनियो ...... वाहयेद्दिवसस्यार्धे पश्चात्स्नानं समाचरेत् ॥ वृक्षं छित्वा महीं भित्वा हत्वा च कृमिकीटकान् । कर्षकः खलयज्ञेन सर्वपापैः प्रमुच्यते ॥ स्वयं कृष्टे यथा क्षेत्रे धान्यैश्च स्वयमर्जितैः । निर्वपेत्पंच यज्ञानां क्रतुदीक्षां च कारयेत् ॥ हारीतः। अष्टागवं धर्महलं ष वं जीविकार्थिनां । चतुर्गवं नृशंसानां द्विगवं ब्रह्मघातिनां॥ बालानां दमनं चैव वहनं च न शस्यते । वृद्धानां दुर्बलानां च प्रजापतिवचो यथा ॥ पुच्छोपघातनं नासौ वाहानां कारयेत्ततः । वृद्धं युग्मे न युंजीत जीर्णं व्याधितमेव चेति ॥ यानि तु–वैश्यवृत्त्यानुजीवंस्तु ब्राह्मणः क्षत्रियोऽपि वा । हिंसाप्रायां पराधीनां कृषिं यत्नेन वर्जयेत् ॥ कृषिः साध्वीति मन्यंते सा वृत्तिः सद्भिर्गर्हिता । भूमिं भूमिशयांश्चैव हंति काष्ठमयो मुखम् ॥ संवत्सरेण यत्पापं मत्स्याघाती समाप्नुयात् । अयोमुखेन काष्ठेन तदेकाहेन लांगलीति ॥—तानि तु । वृत्तस्वाध्याया ... ... श्रोत्रियविषयाणि हलं तु ब्रह्मवर्चसमिति विशेषोपादानात्। कालिकापुराणपराशरादिवचनानि तु परंपरागतकृषिकर्मासक्तासद्द्विजविषयाणि वक्ष्यमाणयमवचनेनाकुलत्वात् । वंशपरंपरागतं साध्वसाधु वा कर्म कुर्यादित्याह मनुः ॥ येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः । तेन यायात्पथा नित्यं तथा गच्छन्न दुष्यतीति॥ बह्वृचा अप्यामनन्ति—इति स्तुतासो असथा दिशादसो येस्थ त्रयश्च त्रिंशश्च मनोर्देवा यज्ञियासः तेन त्राध्वं तेव तत उनो अधिवोचत मानः पथः पित्र्यान्मानवादधिदूरं नैष्टपरावतः—इतिऋग्द्वयस्य तात्पर्यार्थः । यज्ञांते यजमानो देवान् प्रार्थयते यज्ञियासः त्रयास्त्रिंशद्देवाः ये इति स्तुताः स्थ ते यूयं नः अस्मान् त्राध्वं रक्षतं अवत अव क्षरणादौ अधिवोचत ब्रूतेत्यर्थः। किमित्याह नः

पित्र्यात् पितुरागतात् मानवात् मनुसंमतात्पथः मार्गात् अधिदूरं मां नैष्ट तन्मार्गानुसारिणं मां कुरुतेत्यर्थः। अथापत्काले भक्ष्यमाह। मदनपारिजाते शंखः। भक्ष्याः पंचनखा मेध्या गोधाकच्छपशल्यकाः। शशश्च मत्स्येष्वपि हि सिंहतुंडकरोहिताः॥ भक्षणकालमप्याह स एव। प्राणात्यये तथा श्राद्धे प्रोक्षितं द्विजकाम्यया। देवान्पितॄन् समभ्यर्च्य खादन् मांसं न दुष्यति॥ इति। एवमापदं निस्तीर्य प्रायश्चित्तं कृत्वा स्वमार्गनिरतो भवेत्। तथा च याज्ञवल्क्यः। निस्तीर्यतामथात्मानं पावयित्वा पथि न्यसेत्। इति व्याचख्यौ च मदनपारिजातकारः तामापदं पावयित्वा प्रायश्चित्ते पथि स्ववर्णधर्मे इत्यर्थः। अनापदि आपत्कालवृत्त्या वर्तमानस्य तु अकुलत्वमाहुः यमशातातपव्यासाः। देवद्रव्यविनाशेन ब्रह्मस्वहरणेन च। कुलान्यकुलतां यांति ब्राह्मणातिक्रमेण च॥ यमः। गोभिः खरैश्च यानैश्च कृष्या राजोपसेवया। अयाज्ययाजनेनैव नास्ति केन च कर्मणा॥ कुलान्यकुलतां यान्ति यानि हीनानि मंत्रतः। मंत्रतस्तु समृद्धानि कुलान्यल्पधनान्यपि॥ कुलसंख्यां च गच्छन्ति कर्षन्ति च महद्यशः। अनृतं पारदार्यं च तथाऽभक्ष्यस्य भक्षणम्॥ ॥ अश्रौतकर्माचरणं मैत्रधर्मबहिष्कृतम्। ॥ एतानि चैव कर्माणि वर्जयेन्मानवः सदेति पारिजाते। अनापद्यभक्ष्यभक्षणादिनिषिद्धाचरणेनाकुलत्वप्राप्तानामभोज्यान्नत्वमाह मनुः। पारिजाते। नाश्रोत्रियतते यज्ञे ग्राम्ययाजिहुते तथा। स्त्रिया क्लीबेन च हुते भुंजीत ब्राह्मणः क्वचित्॥ मत्तक्रुद्धातुराणां तु न भुंजीत कदाचन।" गणान्नं गणिकान्नं च विदुषा तु जुगुप्सितं॥ स्तेनगायनयोश्चान्नं तक्ष्णो वार्धुषिकस्य च। दीक्षितस्य कदर्यस्य बद्धस्य निगडस्य च॥ अभिशस्तस्य षण्ढस्य पुंश्चल्या दांभिकस्य च।" चिकित्सकस्य मृगयोः क्रूरस्योच्छिष्टभोजिनः॥ उग्रान्नं सूतिकान्नं च पर्याचान्तमनिर्दशम्। अनर्चितवृथामांसमवीरायाश्च योषितः॥ द्विषदन्नं च गर्ह्यान्नं पतितान्नमवक्षुतं। पिशुनानृतयोश्चैव क्रतुविक्रयकस्य च॥ शैलूषतन्तुवायान्नं कृतघ्नस्यान्नमेव च। कर्मारस्य निषादस्य रंगावतरणस्य च॥ सुवर्णकर्तुर्वेणस्य शस्त्रविक्रयिणस्तथा। श्ववतां शौंडिकानां च चैलनिर्णेजकस्य च। रंजकस्य नृशंसस्य यस्य चोपपतिर्गृहे॥ ........ स्त्रीजितानां च सर्वशः। पक्षिमत्स्यमृगान्हन्ति यश्चाश्नातीह कामतः॥ तयोरन्नं न भोक्तव्यं मांसविक्रयिणोऽपि च। भुक्त्वा चान्यतमस्यान्नममत्या भक्षणे त्र्यहम्॥ मत्या भुक्त्वा चरेत्कृच्छ्रं पराकं मीनमश्नतः। इति प्रायश्चित्ताभिधानात्। अनापदि बहुकालं हीनवर्णकर्मानुतिष्ठतः सप्तमे.. तद्वर्णभावमृच्छतीह याज्ञवल्क्यः। जात्युत्कर्षो युगे ज्ञेयः सप्तमे पंचमेऽपि वा। व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चाधरोत्तरमिति॥ एतदुक्तं भवति। ब्राह्मणस्य कुले आनुपूर्व्येण षट्पुरुषां अविच्छेदेन वैश्यकर्मैवानुतिष्ठंति तस्मात्सप्तमो वैश्य एवेत्यर्थः तस्य संस्कारादि कर्म तु मदनपारिजाते मनुः। उत्कृष्टं चापकृष्टं च तस्य कर्म तु विद्यते। मध्यमे कर्मणी कार्ये सर्वसाधारणे हि ते॥ इति। उत्कृष्टं ब्राह्मणकर्म अपकृष्टं शूद्रकर्म न विद्यते मध्यमे कर्मणी सर्ववर्णसाधारणे इत्यर्थः। नारसिंहीये। येषां परंपराप्राप्तः सावित्रीग्रहणे

विधिः । निषेकाद्याः क्रियास्तेषां कारयेन्मंत्रतोऽखिलाः इति । कारयेदिति णिजंतनिर्दे-
शात् पुरोहितरीत्यावगम्यते इति प्रासंगिकं परिसमाप्य प्रकृतमनुसरामः ॥ एते कौंकणाः
शेणवींति नाम्ना प्रसिद्धास्तु पूर्वं ...ब्राह्मणाः एव स्थिताः परं तु अवृष्ट्या दुर्भिक्षादिना
भ्रष्टाचारा जाताः । तथा च श्रूयते । वानप्रस्थाश्रमोन्मुखं केतुमालिनं प्रति नारदोक्तिः ।
पद्मपुराणे–नारद उवाच । शृणुष्वावहितो राजन्नितिहासं पुरातनं । यमाकर्ण्य नृपो
राज्यं विरक्तोऽपि जहाति च ॥ ब्राह्मणोऽपि तथा श्रुत्वा निजकर्मरतो भवेत् । क्षुधुघ्नो
नाम राजाऽभूद्वंशे वैवस्वते नृपे ॥ स शशास महीं सर्वां साब्धिद्वीपां सपर्वताम् । सप्त-
पंचादश .........महौजसः । भुक्त्वा राज्यं यथाकामं काले बहुतिथं नृपः ॥ ईजे
स विविधैर्यागैरश्वमेधादिकैः क्रमात् । प्रतिष्ठासुस्तदा राजा तार्तीयीकमथाश्रमम् ॥
विभज्य राज्यं पुत्रेभ्यो दत्वा वनमुपाश्रयत् । समाः काश्चिदुषित्वाऽसौ वने संप्रस्थितो [१०
नृपः ॥ स्वर्याते जनके पुत्राः पितृमेधं विधाय च । साम्राज्यपदलाभार्थमन्योन्यं
युयुधुर्भृशम् ॥ ते राज्यं भ्रंशयांचक्रुः परस्परजिघांसया । तेषां च कलहाद्वर्णा निजधर्मं
जहुस्तदा ॥ सर्वे नेशुर्नृपा राजन्परस्परवधैषिणः । नावशिष्टः कुमारोऽपि तेषामेको
महीभृतां ॥ ततो निर्नायका लोका ह्यासुः स्वच्छन्दवर्तिनः । तिमिंगिलानां न्यायेन
बाधते स्म बलं बली ॥ अचलस्य धनं दारान् बलाद् जन्तुर्बलान्विताः । एवं बहुतरे
काले वर्णसंकरकारिणि ॥ तत्यजुः पृथिवीं देवा न ववर्षुः बलाहकाः । कदाचित्पा-
क्षिकी वृष्टिः कदाचिन्मासिकी नृप ॥ क्वचिच्च ह्रादिनीमात्रा पूरणी सरसः क्वचित् ।
एवं स दुस्तरः कालः षष्टिवर्षाण्यवर्तत ॥ विनष्टाः प्राणिनः सर्वे पशुपक्षिमृगादयः ।
मनुष्याः कर्शिता भ्रष्टा ब्राह्मणाश्च विशेषतः ॥ बहवो ब्राह्मणा राजन् विनिष्टाः
पीडिताः क्षुधा । केचिद्गंगां समाश्रित्य शाकाहारैरवर्तयन् ॥ शोणभद्रं गताः केचित् [२०
केचिज्जांबूनदं गताः । केचित्सिंधुनदं प्राप्ताः सरांसि च महान्ति च ॥ करतोयां
सदानीरां गताः केचित्तथा परे । जलपानैः फलाहारैः जलसेकोद्भवैः कणैः ॥
नीवारैः पद्मिनीकंदैः सस्यैः कच्छरुहैस्तथा । कृच्छ्रैराजीविकां कृत्वा निजधर्ममपालयन् ॥
रेवां गोदां च कालिंदीं शरयूं ताम्रपर्णिकां । कावेरीं केचिदा-
श्रित्य विप्राः कर्मपरायणाः । ररक्षुरात्मनः प्राणान्ब्राह्मीमुस्तकसेवनात् ॥
केचित्कृष्णातटं प्राप्य दूर्वारसमभक्षयन् । तीरनिष्ठगवां गव्यैः पयस्यैश्च तथा
परे ॥ केचिच्च पद्मिनीबीजैः करहाटैश्च केसरैः । शरीरयात्रां कृत्वैवं ररक्षुर्ब्रह्मकर्म
ते ॥ अथ ये त्वनया वृत्त्या प्राणान्धर्तुमशक्नुवन् । ते प्राणिहिंसया प्राणान्दधुर्धर्म-
पराङ्मुखाः ॥ सिंधुतीरं समाश्रित्य जीविताः पृथुरोमभिः । यादोभिर्विविधैश्चैव मृगैः
श्वेनैर्विभिस्तथा ॥ विविधैस्ताम्रचूडाद्यैर्ग्राम्यैर्वन्यैश्च जन्तुभिः । पुपुषुः स्वानि वर्त्मानि [३०
ब्रह्मकर्माणि तत्यजुः ॥ अवग्रहो भवन्नेवं सर्वभूतक्षयावहः । ततो दिवौकसः सर्वे
हविर्भागविवर्जिताः ॥ वास्तोष्पतिप्रभृतयः शरणं जग्मुरच्युतं । ज्ञात्वा विष्णुर्महेंद्रा-
दिदेवागमनकारणं ॥ उवाचैतान् प्रसन्नात्मा भगवान् लोकभावनः । श्रीभगवानुवाच ।

महाराजन्वती ह्यस्मादवृष्टिः समजायत ॥ तस्मात्कुरुत राजानं धर्मशीलं यशस्विनं । नारद उवाच । इति तस्य वचः श्रुत्वा देवाः शक्रपुरोगमाः ॥ आजग्मुस्त्वरिताः पृथ्वीं लोकानां हितकाम्यया । अभिषिच्य नृपं राज्ये भिंदिपालं जनातिगं ॥ ततो राजन्वती भूमिर्वृष्ट्या सस्येन भूषिता । अवशिष्टाश्च ये केचिद्ब्राह्मणाद्या जनास्तदा ॥ यथास्थानमवस्थाय पुनर्विस्तारतां गताः । भ्रष्टाचाराश्च ये पूर्वमभक्ष्यादिनिषेवणात् ॥ ते विप्राञ्छरणं जग्मुः कृष्णातीरस्थितान् शुचीन् । ततस्ते ब्राह्मणाः पूर्वं करहाटादिभक्षणात् ॥ ब्रह्मकर्मण्यरक्षन्ये सर्वे ते मीलितास्तदा । विचार्यापदमेतेषामनुग्रहमचीकरन् । ॥ निष्कृतिं कारयित्वैभिर्याजमान्ये न्यवेशयत् । यजनेऽध्ययने दाने ददुस्तेभ्योऽधिकारितां ॥ पौरोहित्यं स्वयं चक्रुर्याजनाध्यापनादिषु । वाणिज्यलेखनाभ्यां च कृष्या राजोपसेवया ॥ जीविकां कल्पयामासुरेतेषां ब्राह्मणास्तदा । यं यं देशं समाश्रित्य जीविकां स्वामकल्पयन् ॥ तत्तद्देशस्य नाम्ना ते प्रसिद्धा ह्यभवन्नृप । आपत्काले तु ये यत्र स्थित्वाऽऽपदमतीतरन् ॥ कौंकणे तु पुनस्तत्र स्थिताः सह पुरोहितैः । क्षत्रियाश्च तथा वैश्याः शूद्राश्चांतरजा अपि ॥ अवशिष्टाश्च ये तत्र ते कालेन च विस्तृताः । इति राजन्पुरावृत्तं ........विदां कुरु ॥ राजहीनाः प्रजाः सर्वा नश्यंत्येव विशांपते । कालो वा कारणं राज्ञां राजा वा कालकारणं ॥ इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणं । तस्मात्त्वमपि राजेन्द्र न राज्यं त्यक्तुमर्हसि ॥ सूत उवाच । इत्युक्त्वा नारदो योगी स राज्ञे केतुमालिने ॥ दिव्यानि निजधामानि पर्वतेन समं ययौ । राजापि वचनात्तस्य चक्रे राज्यं वशी पुनः ॥ आन्वीक्षिक्यादिविद्याभिः प्रकृतीर्वशमानयत् । इति पद्मपुराणेऽतिमदले पुरावृत्तस्य विद्यमानत्वात् । पूर्वं एतेऽचुधिस्था ब्राह्मणा एव स्थिता इति राद्धांतितं ॥ अथैषां धर्माः । धर्मश्चाचारयत्तः । तथा च मनुः । आचारः प्रथमो धर्मो विद्वद्भिः परिकीर्तित इति । अत्र कार्यकारणयोरभेदोपचारधर्मस्तज्जन्यं सुकृतं पूर्वं । तथा श्रुतिस्मृत्युदितः सम्यक्साधुभिर्यश्च सेवितः । तमाचारं निषेवेत धर्मकामो जितेंद्रिय इति ॥ स च तत्र यद्वै किंचन मनुरवदत्तद्भेषजमिति मनोर्वेदाहृतत्वेन तत्प्रमुखधर्मशास्त्रप्रणेतृप्रयुक्त एव ग्राह्यः । नन्वेषां मन्वादिधर्मशास्त्राणां वेदमूलेन परस्परमनपेक्षमाणत्वात्...........तत्र क्वचिदधिकांगकर्मविधिः क्वचिन्न्यूनांगकर्मविधिरिति परस्परविरोधादप्रामाण्यप्रसंग इति चेत् । मैवं । सर्वशाखा प्रत्येकं कर्मेति न्यायेन सर्वत्र विधेयस्य कर्मण एकत्वेन प्रधानाविरोधाभावादंगेषु प्रतीतिको यः परस्परविरोधस्तत्परिहारो मृग्यः स च परिहार आकांक्षावशात् आकांक्षा चेतिकर्तव्यतायां साचेतिकर्तव्यता यस्मिश्च्छास्त्रे न्यूना...........अनपेक्षप्रमाणमपि अनवगतांशे शास्त्रान्तरमपेक्षन इति नात्यन्तमनपेक्षाऽत एव विरोधान्न प्रामाण्यं. २...तमग्रांगकर्मण्यनुष्ठिते धर्मोऽपि समग्रो भवेत् । धर्माच्चेष्टसिद्धिः । स चाचारः मध्यमदशादिप्रसूतेभ्यो ब्राह्मणेभ्यो विज्ञेयः । यथाह मनुः । सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरं । तद्देवनामितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥ तस्मिन्देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः

वर्णानां सान्तरालानां स सदाचार उच्यते ॥ हिमवद्विंध्ययोर्मध्ये यत्प्राग्विनशनादपि । प्रत्यगेव प्रयागाच्च मध्यदेशः प्रकीर्तितः ॥ विनशनं सरस्वत्या अंतर्धानदेशः । आसमुद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात् । तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः ॥ इति । शंखस्तु प्रकारान्तरेणार्यावर्तमाह । कृष्णमृगो यावद्विचरति तावदार्यः स्यादिति । यावद्विचरति स्वत इत्यर्थः आर्यावर्त इत्यनुवृत्तौ । वसिष्ठोऽपि–यावद्वा कृष्णमृगो विचरतीति ॥ अन्यच्च मनुरेवाह–कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पांचालाः शूरसेनयः । एष ब्रह्मप्रदेशो वै ब्रह्मावर्तादनंतरः ॥ ईषन्न्यून इत्यर्थः । एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन्पृथिव्यां सर्वमानवाः ॥ आचाराद्विच्युतो विप्रो न वेदफलमश्नुते। आचारेण तु संयुक्तः स पूर्णफलभाग्भवेत् ॥ एवमाचारतो दृष्ट्वा धर्मस्य मुनयो गतिं । सर्वस्य तपसो मूलमाचारं जगृहुः परं। इति । प्रासंगिकं परिसमाप्य प्रकृतमनुसरामः । एतेषां संस्कारादीनि कर्माणि तु पूर्वपरंपरागताचारपर्यालोचनया तार्तीयिकवर्णाविदितविधिनानुष्ठीयन्ते पुरोहितैस्तद्युक्तमेव निषादस्थपतिमितिवत् । याज्ञवल्क्येन ज्ञात्युत्कर्षो युगे ज्ञेया इति पूर्वोदाहृतवचनेन वर्ण......तत्वापादनात् । यमेन गोभिः खरैः इत्यायकुलकरणे निवेशितत्वाच्च । उत्कृष्टं चापकृष्टं चेति पूर्वोपन्यस्तमनुवचनव्याख्यावसरे पारिजातकारेण हीनकर्मणः मध्यमे कर्मणी क्षत्रियवैश्यकर्मणी इत्युक्तत्वाच्च । क्षत्रियवैश्ययोरपि याज्ञवल्येन विप्रक्षत्रियविट्शूद्रा इत्यनेन समंत्रकसंस्कारानुक्तत्वात् । गर्भाधानादिसंस्काराः समंत्रका एव । येषां परंपराप्राप्त इति नारसिंहीयोक्तेश्च संस्काराणामव्याप्त्यतिव्याप्तिपरिहाराय परिगणनं कर्तव्यं । गर्भाधानं पुंसवनं सीमंतो जातकर्म च । नामचूडोपनयनसमावृत्तिविवाहकाः ॥ एते समंत्रकाः कार्या आवृत्तोपाकृतिर्भवेत् । पाकसंस्था नैतेषां नैतेषां पूर्वचरितं(?) अन्वष्टक्यं च पूर्वेद्युर्मासि मास्यथ पार्वणं । काम्यमाभ्युदयेऽष्टम्यामेकोद्दिष्टमथाष्टमम् ॥ श्राद्धान्येतानि चान्यानि स्यागेनैव च कारयेत् । अथवा स्वीयजातीयद्विजहस्ते यथाविधि ॥ अन्यानि तु—अपायुगमनुक्रांतिधृतिपातमहालयाः । अन्वष्टक्यं च पूर्वेद्युः षण्णवत्यः प्रकीर्तिताः इति संग्रहे ॥ एते अभोज्यान्ना इति मनुना अभोज्यान्नप्रकरणे निवेशितत्वाच्च । विंध्यस्य दक्षिणे भागे भागे मांसभुगिति पातित्याच्च ॥ अथैषामाश्रमविचारः–आद्यौ द्वावेव ब्रह्मचर्याश्रमो गृहस्थाश्रमश्चेति । तृतीयस्तु कलौ निषिद्ध एव । चतुर्थे किंचिदुच्यते । प्रथमं त्रैवर्णिकेषु को वाऽधिक्रियत इति विचार्यते । तत्र छंदोगसूत्रकारः–त्रयाणां वर्णानां वेदमधीत्य चत्वार आश्रमा इति । अपरार्के–ऋणत्रयमपाकृत्य निर्ममो निरहंकृतिः । ब्राह्मणः क्षत्रियो वाथ वैश्यो वा प्रव्रजेद्गृहात्॥ धर्मविवृतावपि–ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्ततो गच्छेद्वनं कृती । संन्यसेद्वासनाशांतः सर्वभूतदयापरः ॥ अतस्त्रैवर्णिकस्याधिकारमेतानि वाक्यानि विदधति । अतस्त्रैवर्णिकानामपि तुर्याश्रमेऽस्त्येवाधिकारः । या तु जाबालश्रुतिः–ब्राह्मणाः प्रव्रजंतीति—तस्या इयं गतिः । ब्राह्मणशब्दः प्रदर्शनार्थः । अतः क्षत्रियवैश्यावप्युपलक्ष-

यात तेन न विरोध इति । अथवा ब्रह्म वेदस्तन्निष्ठस्तदध्ययनवान् ब्राह्मण इति व्युत्पत्त्या ब्राह्मणशब्दो वर्णत्रयपरः । एतेन—आत्मन्यग्नीन्समारोप्य ब्राह्मणः प्रव्रजेद्गृहात् । इत्यादि मन्वादिवचनान्यपि व्याख्यातानि । यच्च दत्तात्रेयवचनं । मुखजानामयं धर्मो यद्विष्णोर्लिंगधारणं । बाहुजातोरुजातानामयं धर्मो न विद्यते ॥ इति । तथा गतिस्तुर्याश्रमे नास्ति बाहुजोरुजयोः क्वचित् । तुर्याश्रमे गतिः प्रोक्ता मुखजानां स्वयंभुवेति च । एतदपि वचनद्वयं वस्तुतो न विरुध्यते । मुखजा ब्राह्मणाः बाहुजाः क्षत्रियाः ऊरुजा वैश्याः । परेषामयं धर्मो लिंगधारणात्मको न विद्यते । लिंगं लक्षणं चिह्नं त्रिदंडैकदंडरूपं । तथा च दक्षः—मेखलाजिनदंडेन ब्रह्मचारीति लक्ष्यते । गृहस्थो यष्टिवेदाद्यैर्नखरोमैर्वनाश्रितः ॥ त्रिदंडेन यतिश्चैव लक्षणानि पृथक् पृथगिति ॥ त्रिदंडग्रहणमेकदंडस्यापि प्रदर्शनार्थं । एवंविधं लिंगं क्षत्रियवैश्ययोर्नेति दंडधारणनिषेध एव नाश्रमनिषेधः । तथा गतिस्तुर्याश्रमे नास्तीत्यस्यापि अयमेवार्थः । गतिज्ञानं सर्वे गत्यर्था ज्ञानार्था इति स्मरणात् । ज्ञानं च ज्ञापकनिष्पाद्यं अत एव तज्ज्ञापककार्यं तत् । तेन ज्ञानरूपेण कार्येण कारणं ज्ञापकदंडधारणं लक्ष्यते । तथा चैतदुक्तं भवति—क्षत्रियवैश्ययोर्दंडधारणं नास्तीति लिंगनिषेध एव न त्वाश्रमनिषेध इति दंडधारणं बहिरंगं विषयापराग एव मुख्यः विरागाभावे अधिकाराभावात् । यत्तु धर्मविवृताविव वचनांतरं—संन्यसेद्ब्राह्मणः सम्यग्वानप्रस्थो भवेन्नृपः । वानप्रस्थो भवेद्वैश्य एवं वर्णक्रमः स्मृतः ॥ इति । अत्रापि ब्राह्मणः सम्यक्संन्यसेदिति सम्यक्शब्दोपादानात् ब्राह्मणस्य बहिरंगभूतदंडधारणोपेत एव संन्यासो न तु तद्राहित इति गम्यते । तथा च क्षत्रियवैश्ययोस्तद्रहिताश्रमो भवतीत्यर्थादुक्तं भवति अन्यथा छंदोगसूत्रकारादिवचनविरोधापत्तेः । अयं च तात्पर्यार्थः—अबाधेनोपपत्तौ बाधो न न्याय्य इति न्यायेन श्रुतिस्मृतिवाक्यविरोधपरिहाराय विधिवाक्यानामाश्रमस्वरूपविधौ तात्पर्यं निषेधकवाक्यानां तु दंडग्रहणमात्रनिषेधे तात्पर्यं । तस्मात्क्षत्रियवैश्ययोर्दंडग्रहणमात्रनिषेधो नत्वाश्रमनिषेध इति । एवं प्राप्तेऽभिधीयते—श्रुतिस्मृतिविरोधे तु श्रुतिरेव बलीयसी । अतः श्रुत्यनुसारेण व्यवस्थात्र विधीयते ॥ ब्राह्मणाः प्रव्रजंतीति श्रूयते । अत्र ब्राह्मणशब्दस्य ब्राह्मणत्वं जातिवाच्योऽर्थः । ब्राह्मणोद्देशेन च प्रव्रज्या विधीयते । उद्देश्यविशेषणमेवाविवक्षितं हविरुभयत्ववत् ननूद्देश्यमविवक्षितं तस्मादिह ब्राह्मणोद्देशेन संन्यासविधानात् उद्देश्यं ब्राह्मणत्वस्य हविर्वद्विवक्षितत्वात्तस्यैव प्रव्रज्याधिकारो नान्यस्य । ननु यदि भवेद्ब्राह्मणशब्दस्य ब्राह्मणत्वं जातिवाच्योऽर्थस्तर्हि तस्योद्देश्यत्वेन विवक्षितत्वात् । क्षत्रियवैश्ययोः प्रव्रज्यायां मा नाम भूदधिकारः । न च तथा ब्राह्मणत्वजातिरर्थः । अपि तु ब्रह्म वेदस्तन्निष्ठस्तदध्ययनं वेत्ता ब्राह्मण इति वेदाध्ययनवत्त्वमेकोऽनुगतो धर्मः स च ब्राह्मणशब्दस्यार्थः । तथा वेदाध्ययनवत्त्वरूपेणैकेनोपाधिना ब्राह्मणक्षत्रियवैश्यास्त्रयोऽपि क्रोडीकृता भवेयुः । एवं च ब्राह्मणोद्देशेन प्रव्रज्याभिधानात् त्रयाणामपि वर्णानां तत्राधिकारोऽस्त्विति चेत् मैवं ।

यथा क्षत्रियशब्दस्य क्षत्रियत्वं वैश्यशब्दस्य वैश्यत्वं गोशब्दस्य गोत्वमर्थस्तथा ब्राह्मणशब्दस्य ब्राह्मणत्वमेवार्थः । इति शेषजैमिनिबादरायणादिभिरंगीकृतं तद्व्याघृत्येत (हन्येत)। अथोक्तव्याघातभयाद्ब्राह्मणशब्दस्य ब्राह्मणत्वं वेदाध्ययनत्वं चोभयमपि वाच्यत्वेन परिकल्प्येत तदन्यायश्चानेकार्थत्वमेकशब्दस्य निषिद्धं तेन न्यायेन सह विरोधः प्रसज्येत । अथैवं ब्रूषे-अन्यायश्चानेकार्थत्वमिति न्याये जाग्रत्यपि गवादिशब्दानां यथाऽनेकार्थत्वमेव ब्राह्मणशब्दस्यापि अनेकार्थत्वमस्त्विति । न चैतदुचितं । अगतिका हीयं गतिर्यदनेकशक्तिपरिकल्पनयापि अनेकार्थत्वस्वीकरणं शब्दार्थज्ञाने वृद्धव्यवहारः प्रमाणं वृद्धाश्च गवादिशब्दानां अनेकशक्तिकल्पनयाऽपि अनेकार्थत्वं अंगीकुर्वते । न ब्राह्मणशब्दस्य । अत एवाभिधानकारैरपि गवादिशब्दा अनेकार्थवर्गे परिगणिताः। तेषामपि व्यवहारः शब्दश्लेषादिष्वेव न शास्त्रार्थनिर्णये। शास्त्रार्थपरिज्ञाने तु प्रसिद्धस्यैव ग्रहणं (?) नेतरस्य। इतरस्यापि ग्रहणे गोपशुविधायकवाक्येऽपि सास्नाद्युपेतगोपिंडव्यतिरिक्तस्यापि ग्रहणं स्यात् । स च गृह्यते । तस्माच्छास्त्रार्थनिर्णयेषु प्रसिद्धस्यार्थस्यैव ग्रहणं (न!) युक्तं विपरीतार्थद्योतकवाक्यशेषाद्यभावे अतोऽनेकशक्तिकल्पनादोषभयात् । ब्राह्मणशब्दस्य ब्राह्मणत्वजातिरेवार्थः न तु जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिः ऋणवान् जायते इत्यत्र ब्राह्मणशब्दो यथा वर्णत्रयपर एव यत्राप्यस्त्विति चेत् मैवं दृष्टान्तदार्ष्टान्तिकवैषम्यात् । तथा हि ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्य इति वाक्यशेषे ब्रह्मचर्यादिभिर्ऋण्यादिऋणत्रयापाकरणप्रतीते ब्रह्मचर्यादिषु त्रैवर्णस्याधिकारात् फलचमसवत् मुखांतरेण जायमानो वै ब्राह्मण इत्यत्रापि त्रैवर्णिकानुप्रवेशाद्युज्यते तत्र त्रैवर्णिकपरत्वं । प्रकृते तु वाक्यशेषाद्यभावान्न त्रैवर्णिकपरत्वम्। किं च यावता कालेन अवयवव्युत्पत्त्या लक्षणया वा क्षत्रियवैश्यादयो ब्राह्मणशब्देन प्रत्याय्यन्ते ततः पूर्वमेव लब्धात्मिकाया रूढेः प्राबल्यात् अनुपपत्त्यभावाच्च रूढ्या ब्राह्मणत्वमेव प्रत्याय्यते । अतः प्रथमप्रतीतब्राह्मणोद्देशेन प्रव्रज्याविधेश्चरितार्थत्वात् । न चरमप्रतीतयौगिकार्थत्वस्वीकरणमुचितम् । ततश्च औदुम्बरीं स्पृष्ट्वोद्गायेत् इति श्रुत्या विरुद्धं औदुम्बरी सर्वा वेष्टयितव्येति स्मृतिवचनं । यथा विरोधाधिकरणे अप्रमाणमित्युक्तं एवं ब्राह्मणाः प्रव्रजन्ति इति जाबालिश्रुतिविरुद्धं त्रयाणां वर्णानां वेदमधीत्य चत्वार आश्रमा इत्यादिकं स्मार्तवचनं जातमप्रमाणमेव । यद्वा श्रुतिविरुद्धस्यापि स्मार्तवचननिचयस्य सर्वथा प्रामाण्यपरिजिहीर्षया श्रुत्यनुकूल एवार्थः कल्पनीयः । तत्र त्रयाणां वर्णानां वेदमधीत्य चत्वार आश्रमा इति । औचित्यं च श्रुतिविरोधात् ब्राह्मणस्यैव तुर्याश्रमाधिकारविधौ नान्यथा । त्रैवर्णिकानां संन्यासो विद्यते नात्र संशयः। शिखायज्ञोपवीतानांत्यागपूर्वकदंडयुगिति ब्रह्माण्डपुराणवचनमपि छंदोगसूत्रेण समानार्थम् । यच्च ब्रह्मवैवर्तवचनं वैराग्योत्पत्तिमात्रे च संन्यासे परियुज्यते । रागवान्ननु विप्रो वै वेदवेदांगवित्तम इति । वेदवेदांगवित्तमोऽपि विप्रो रागवांश्चेत्संन्यासेन परियुज्यते इत्यन्वयः ।

एवं च विप्रस्य विरक्तस्यैवाधिकारोऽभिहितो भवेत् न क्षत्रियादेः । यच्च स्मृत्यन्तरं—ऋणत्रयमपाकृत्य निर्ममो निरहंकृतिः । ब्राह्मणः क्षत्रियो वाथ वैश्यो वा प्रव्रजेद्गृहात् इति । अस्यायमभिप्रायः । गृहात्प्रव्रजेत् वानप्रस्थाश्रमं गच्छेत् । प्रव्रज्याशब्दो यद्यपि संन्यासे रूढस्तथापि श्रुतिविरोधपरिहारार्थं अत्र तृतीयाश्रमपरः अत्रापि वैराग्यहेतुकत्वात् । यद्वा यदा ब्राह्मणः स्ववृत्तावजीवन् क्षत्रियवृत्तिमाश्रितः तत्राप्यजीवन्वैश्यवृत्तिं ततश्च तां आपदं निस्तीर्यापि न वर्णान्तरवृत्तिं परित्यजति किंतु तत्रैव वृत्तावस्थितः तदा तत्तत्क्षत्रियादिवृत्तिजीवनेन स एव ब्राह्मणः क्षत्रिय इति वैश्य इति च व्यपदिश्यते । शास्त्रानभ्यनुज्ञातकालेपि क्षत्रादिवृत्तिनिरतत्वात् तस्यापि प्रव्रजेद्गृहादिति प्रव्रज्याधिकारं दर्शयति । अत एव ब्राह्मणः क्षत्रियो वाथ वैश्यो वा प्रव्रजेद् गृहादित्यथशब्द उपात्तः । ब्राह्मणः एव अथानन्तरं क्षत्रवृत्त्याश्रयणात्क्षत्रियः अथ वैश्यवृत्त्यानंतर्यप्रतिपादनादयमर्थो गम्यत इत्यर्थः । एतेन ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्ततो गच्छेद्वनं गृही । संन्यसेद्वाथवा...... इत्येतदपि व्याख्यातं । एवं च मनुदत्तात्रेयवचनान्यथानुकूलानि भवेयुः । अस्माच्छ्रुतिविरोधपरिहारायोक्तरीत्या अन्यान्यपि विरुद्धवचनानि ज्ञेयानि । यश्च जडभरतं प्रत्युपदेशः पैंग्यरहस्ये यदि मृत्योः परं शांतमनामयं शाश्वतम् । पदमिच्छसि तत्परमहंसो भवाहेति । अत्रेदं चिन्त्यम् । जडभरतं प्रत्युपदेश उत लक्षणया क्षत्रियमात्रं प्रति । आद्ये जडभरतस्यैवेति नेतरक्षत्रियप्राप्तिः । किं च जडभरतोऽपि प्रैषोच्चारणपूर्वकमाश्रमं गृहीतवानिति न क्वापि श्रूयते । अतो ब्राह्मणाः प्रव्रजन्ति इत्येतदनुरोधात्परमहंसो भवेदित्यस्यायमर्थः परमहंस इव निर्ममो भवेदिति । नापि द्वितीयः—तत्र हि लक्षणा सा च न युक्ता न विधौ लक्षणेति भट्टगुरुप्रभृतिभिर्विधौ लक्षणानिषेधात् । विधिरिति वदन्वादी प्रष्टव्यः किं विच्छिष्टविधिरुत प्राप्ते कर्मण्यधिकारिविधिरिति । पक्षद्वयेऽपि लक्षणाप्रसक्तिर्दुर्वारा । ननूद्देश्येन लक्षणा विधेयांशे अतो न दोष इति न चेत् तर्हि लक्षणोद्देश्येपि न युक्तेति ब्रूमः । तथाहि संबंधानुपपत्तिभ्यां हि लक्षणा । न चात्रानुपपत्तिः पूर्वोक्तरीत्या वाक्यस्यार्थान्तरपरत्वेनाप्युपपत्तेः । या तु जाबालिश्रुतिः जनकयाज्ञवल्क्यसंवादे तत्र परमहंसा नाम संवर्तकारुणिश्वेतकेतुदुर्वासोऋभुनिदाघजडभरतदत्तात्रेयरैवतकप्रभृतय इति । अत्रापि विधायकप्रत्ययाभावात् परमहंससदृशधर्मवंत इति । अहंकारममतयोरभावात्परमहंस इति व्यपदिश्यते । तस्मात्सिद्धं ब्राह्मणस्यैवाधिकार इति ॥

भवद्भिरेतत् सम्यग्विभाव्यानेनैवाचारमार्गेण तत्रत्याः कौंकणा वर्तयितव्याः अयं घण्टापथ एव कौंकणानां वंशपरंपरागत इति। भवद्देशस्थिता ये स्युः पंडितास्तत्त्वदर्शिनः । पत्रमेतत्समालोक्य तुष्यन्तु हृदयालवः ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

बिल्वपूरसमीपस्थो गोपालो गुर्जराह्वयः । यज्ञेश्वरात्मजश्चेदं पुस्तकं वै व्यली-

लिखत् ॥ शास्त्रज्ञानं समालोक्य आचारं च विचारतः । श्येनबीजातिधर्माणां निर्णयः कथितो बुधैः ॥

शके १८१७ आश्विन वद्य ८ भृगौ तद्दिने सान्ये विनायकेन लिखितं ॥

श्री ६ युत वेदशास्त्रसंपन्न गुरुवर्य दत्तात्रेय वासुदेवशास्त्री निगुडकर–श्रीसंस्कृत-पाठशाला प्रधानाध्यापक श्रीसंस्कृतपुस्तकसंग्रहालय व्यवस्थापक ( राजापुर ) –पूज्यचरण–शरणेन–पाटणकर-कुलोत्पन्न–देवगोब्राह्मणानुचर-श्रीकृष्णस्य तनूजनुषा रघुनाथशर्मणा विदुषामनुचरेण श्रीसंस्कृतपुस्तकसंग्रहालयार्थं विन्यस्तोऽयं श्येन-बीजातिधर्मनिर्णयः १७३४ आश्वयुजि सुदि नवम्यां मंदवासरे ॥ श्रीयुत वेदशास्त्र-संपन्न महादेव भाऊभट्ट नवरे ( मोकाशी ) महाशय समर्पितादर्शपुस्तकात् ॥ ( प्रायेऽशुद्धात् ) ॥ [१०

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभमस्तु ॥

## ८२ वाकेनीस ( ठोसर )

या वाकेनीस ( ठोसर ) घराण्याची संगतवार हकीकत पूर्वी कोठें च प्रसिद्ध झालेली नाहीं. पुढील हकीकत माझे मित्र श्री० दादासाहेब ओंकार यांच्या दप्तरांत २०] या घराण्याचे कांहीं कागदपत्र सांपडले, त्यावरून लिहिली आहे.

**१ वाकेनिसांचे मूळ संपादक** विठल कान्हो ठोसर यांस श्री० छत्रपति शाहुमहाराजांनीं वाकेनिशीची मुतालकी सांगितली. केव्हां सांगितली याबद्दल कोठें च उल्लेख नाहीं. राजदरबारची वाकेनिशी आपण स्वतः करीत असून आपले पुतणे मल्हार विश्वनाथ ठोसर यांस बाळाजी विश्वनाथ यांजकडे वाकेनिशीवर नेमून दिले.[२० पुढें ते ( विठल कान्हो) इ. सन १७२२।२३ सालीं महायात्रेस मल्हारपंतास बरोबर घेऊन गेले तों त्यांस वाटेंत देवाज्ञा झाली. जातांना त्यांनीं आपले राजदरबारचे कामावर आपले भाचे गणेशपंत बेहरे यांस बदली दिले व आपले घरादाराची एकंदर व्यवस्था सर्व त्यांचेकडे च सोंपविली होती. मल्हारपंत परत सातान्यास येऊन पाहतात तों गणेशपंत बेहऱ्यांनीं घरांतील सर्व विषय लांबविला व राजदरबारच्या असामीबद्दल हि कांहीं च दाद लागूं देईनात. मल्हारपंतांनीं पुष्कळ खटपट केली परंतु गणेशपंतास दरबारचा आश्रय असल्यामुळें मल्हारपंताचें कांहीं चालेना. शेवटीं तेथें कांहीं दिवस राहून शिवापुरास मुलें माणसें घेऊन रहाण्यास आले. तेथून हि कांहीं दिवसांनीं पुण्यास येऊन घर बांधुन राहिले.

विठल कान्हो यांचे बंधू दादो कान्हो हे प्रथम रसाळगड किल्याचे सबनिशीवर होते परंतु तो किल्ला अंगारकाकडे ( आंग्रे यांचेकडे ) गेल्यामुळें तळेगांवीं खंडेराव दाभाड्याकडे वाकेनिशीवर राहिले. तळेगांवीं त्यांनीं घर बांधिलें, नंतर चहुरास ( भोरास ? ) जाऊन तेथें हि घर बांधून राहिले. ते मरण पावल्यावर त्यांचे पुत्र कृष्णाजी व नातू बाळाजी हे पुण्यास येऊन घर बांधून राहिले.

मल्हारपंत पुण्यास आल्यावर लौकर च वारले. त्यानंतर श्री० छत्रपति शाहूमहाराज हि वारले. मग रामाजी काशी ठोसर आपल्या असामीकरितां गणेशपंत बेहऱ्यांचे पुत्रांशीं भांडावयांस सातान्यास गेले. त्याचवेळीं कृष्णाजी दादाजी ठोसर हे हि तेथे गेले होते. बेहऱ्याशीं भांडण करण्यामध्यें खर्च करणें भाग पडलें तर मदत करतील अशा हेतूनें कोनेर राम कोलटकर यांचें घरीं कृष्णाजी दादाजी बसले असतां त्यांस बोलवावयास रामाजी काशी गेले व त्यांस आपला हेतु सांगितला. तेव्हां कृष्णाजी दादाजी यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, " विठल कान्हो यांची जोड तुम्हींच मिळवून खाणें, आह्मास कांहींच नको." इतकें झालें असून हि बाळाजी कृष्णाजी व रामाजी काशी यांचा अपसांत तंटा लागला. रामाजीच्या पक्षाचें म्हणणें विठ्ठलपंताचे पश्चात् छत्रपतींनीं मल्हार विश्वनाथ यांस वाकेनिशी सांगितली व बाळाजीपंताच्या पक्षाचें ह्मणणें विठलपंताचे पश्चात् दादो कान्हो यांस वाकेनिशी मिळाली. या तंट्याचा निकाल होऊन रामाजी काशी यांस च वाकेनिशी मिळाली. ( इ. सन १७५० )

रामाजी काशी वाकेनीस यांची कारकीर्द इ. सन १७५०-१७८० पावेतों झाली असावी.

नंतर अंताजी मल्हार वाकेनीस झाले, ह्यांची कारकीर्द इ. सन १७८०-१७८७ पर्यंत झाली असावी.

त्यानंतर मोरो जनार्दन व विठल राम हे वाकेनिशींवर होते. यांची कारकीर्द कोठपर्यंत झाली हें समजण्यास मार्ग नाहीं.

अंताजी मल्हार यांचे पुत्र मल्हार अनंत ऊर्फ बाबा वाकेनीस हे इ. स. १८४७ मध्यें वारले. त्यांचे पश्चात् त्यांचें कुटुंब जानकीबाई सन १८५४ पर्यंत हयात असल्याबद्दल उल्लेख सांपडतो. त्यांस फक्त एक मुलगी काशीबाई या नांवाची होती. ती सदाशिव मोरेश्वर ऊर्फ बाबासाहेब ओंकार यांस दिलेली होती, तिचें सासरचें नांव वाराणशीबाई.

## २ वाकेनिसांचा वंशवेल:—

- वामनभट
  - कान्हो
    - बाळाजी
    - विसाजी
      - मल्हार
        - अंताजी
          - मल्हार ऊर्फ ब
    - विठल
      - काशी
        - रामाजी
          - चिंतोपंत
    - गोविंद
    - माहादाजी
    - दादाजी
      - कृष्णाजी
        - बाळाजी
  - हरि
    - केसो
    - बाळो
    - गणो

वरील वंशवेलांतील नांवांशिवाय माहादाजी राम, विठल राम, जनार्दन राम, [१ मोरो जनार्दन, गोविदपंत ठोसर हीं नांवें कागदपत्रांत बरेच ठिकाणीं आलीं आहेत परंतु हे कोणाचे कोण हें स्पष्ट समजलें नसल्यामुळें वेलांत दाखल केलेले नाहींत.

**३ वाकेनिसांचें काम:**—वाकेनिसांकडे श्रीमंतांच्या खास पंक्तीची व वाड्यांतील एकंदर जेवणारांची व्यवस्था होती. आचारी, पाणके, शागीर्द यांचे कामावर देखरेख ठेवून त्यांस काढणें व नवीन नेमणें, भाजीपाला, दूध, सरपण, वगैरे जिन्नस पुरविणें इत्यादि कामें ( लेखांक २–८ ) त्यांचेकडे असत. यांचेकडे मुदबख कोठीचा कांहींच संबंध नव्हता. कोठीवर स्वतंत्र मनुष्य असे ( लेखांक ११० ).

**४ उत्पन्न:**—

| | |
|---|---|
| ७—मोकासे गांव | इनाम |
| २ प्रां अकलकोट | १ वाडा ढोकमले [२१ |
| १ मौजे सिरोळ | कसबे नेवरे |
| १ मौजे चोरगांव | १ जमीन मौजे भाट- |
| २ | मरळी इनाम चावर १ |

१ मौजे किकवी प्रा सिरवल
१ मौजे खैरें प्रा महाड
१ मौजे जांब प्रा वांई
१ मौजे तुरल प्रा राजापूर
१ मौजे कडवई
---
७

१ जमीन मौजे जांबगांव
पा पारनेर

१ गांव मौजे पाटेगाव
पा पैठण

या शिवाय नेमणूक हुजरून पावे ती-—

तैनात होन पातशाही
१०००० साशास
१६०० कारकून असाम्या
 ४
दर ४०० प्रा
---
११६००

किता
७॥ सनगे मोईन खेरजि
दसरा

० घोडी पागेची बसाव-
यास दोन
२

या शिवाय वाकेनिसांकडे ( १ ) हुजुर बाजार अघाडी पिछाडीचा जकात अंमल ( लेखांक ११।१२।१३ ) ( २ ) नारायणजी बाबर यांचे पागेची फडणिशी ( ३ ) बाळाजी खंडेराव यांच्या पागेची मजमू ( ४ ) प्रांत बरडे येथलि मजमू ( ५ ) प्रांत पडतूरची मजमू ( लेखांक १४ ) इतके चालत होते.

वरील मोकासे, गांव, जमीनी, ह्यापैकीं कांहीं सुद्धां मल्हार अनंत ऊर्फ बाबा वाकनीस यांजकडे चालत नव्हतें असें त्याचें कारकीर्दींतील कागद पत्रावरून दिसतें. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत त्यांस दरमहा तीनशें रुपये नेमणूक होती. पुढें श्री. अमृतराव पेशव्यांचे निसबतींत खैरखाचे लोकांस (३४ असामी) एक लाख रुपये मिळत असत. त्यापैकीं बाबा वाकेनिसांस सालीना १२०० रुपये मिळत असत. शिवाय कंपनी सरकाराकडून सालीना रुपये ३०० नेमणूक होती. त्यांचे पश्चात् जानकीबाईस सरकारांतून सालीना नेमणूक फक्त रुपये १०० मिळत होते.

**५ यांचा वाडा**:-वाकेनिसांचा वाडा शनिवार पेठेंत भाव्यांच्या बोळांत गोखल्याचे दक्षिणेस आहे. इ. सन १८५० सालीं त्याचा घर नंबर ४६० होता व हल्लीं घर-नंबर ५९ आहे. हा वाडा हल्लीं चिंचवडचे रा. रबडे यांजकडे आहे. वाकेनिसांचे आणखी एक घर वेताळ पेठेंत आहे. तें कोठें आहे, व हल्लीं कोणाच्या ताब्यांत आहे हें मात्र समजत नाहीं.

६ पुढें प्रसिद्ध होत असलेल्या कागदांकडे कोणी बारकाईनें नजर फेकल्यास खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या नानांचें वाड्यांत जेवणाऱ्या असामींपासून हि लक्ष्य होतें हें दिसून येणार आहे. तसें च त्यांच्या शिस्तीचा हि नमुना लेखांक २ व ४ मध्यें पहावयास मिळेल.

---

## लेखांक १

श्री

जबानी आंताजी मल्हार वांकेनीस यांणी लिहून दिल्ही ऐसीजे आपले चुलत आजे विटल कान्हो यांस राजदरबारची वांकेनिसी होती तेथे आपले तीर्थरूप मल्हार विश्वनाथ व विठल कान्हो या उभययेतांचे कुटुंब येकत्र सातारियास होते सवसार येकत्र च होता ते समई आपले चुलत आजे दादो कान्हो यांस किले रसाळगडची सबनिसी होती तो किला आंगारकाने घेतलियावर सातारियास आले ते बेरोजगार सा विठल कान्हो याणी खंडेराव दाभाडे याजकडील वांकेनिसी त्यास लाऊन दिल्ही ते दाभाडे याकडे धंदा करीत आसतां तळेगावीं घर बाधोन राहिले होते काही एक दिवसी बहुरास घर बाधोन राहिलें तेथील धंदा चालेनासा जाहाला दादोपंत हि काही दिवसी मृत्य पावलियावर त्याचे पुत्र कृष्णाजी दादाजी (कृष्णाजी दादाजी) याचे पुत्र बाळाजी कृष्ण बहुरास होते अलिकडे पाच वर्षे पुणियांत घर बाधोन राहिले आहेत आपले चुलत आजे विटलपंत याणी रा। बाळाजी विश्वनाथ पंत प्रधान याजकडील वांकेनिसी — ····· ले तीर्थरूप मल्हार विश्वनाथ यांस सांगोन पाठविले राजदरबारची वाकेनिशी आपण करीत आसतां काही एक दिवसी वि॰ल कान्हो माहायात्रेस जाऊ लागले तेव्हां मल्हारपतांस समागमें घेऊन गेले ते मार्गी देवाज्ञा पावले त्याचे क्रियाकर्म सर्व मल्हारपंतानी केले उपरांत सातारियास आले ते काही येक दिवस सातारियास राहिले तेथे गणेशपंत बेहरे आपले तीर्थरूपाचे आतेबंधू हे राजदरबारचे आसामीवर ठेविले होते व घरचा खर्च वेच सवसार त्याजकडे होता त्याणे वित विषय आवघा आटोपून बसला व धधाहि आटोपून बसला मल्हारपंताचे काही चालो देईना त्याणी कजिया बहुतप्रकारें सांगितला परंतु दरबारचा आश्रय बेहरे यास बहुत यामुळे त्याचे काही न चाले तेव्हां काही दिवस मल्हारपंत सातारियास राहून मग माणसे घेऊन शिवापुरास येऊन राहिले तेथून काही दिवसी पुणियास येऊन घर बाधोन राहिले त्यास काही येका दिवसी देवाज्ञा जाहाली पुढे शाहूमहाराज कैलासवासी जाहाले ते समई आपले तीर्थरूपाचे चुलतबंधु याचे पुत्र रामाजी कासी हे गणेशपंत बेहरे याचे पुत्रासी कजिया सांगावयासि गेले ते समई कृष्णाजी दादाजी सातारियास आले होते ते द्रव्यवान सा त्यांस वाद सांगावयास कुमकेस

बोलावीत होते आपला संवसार वोसिस्त वाद सागावयास द्रव्यबळ पाहिजे सा ते द्रव्याची कुमक करितील आपण मेहनत करूं साधल्यास त्याचे द्रव्यबळ लागेल सा त्यांस काही देऊ ऐसे चितात आणून त्यांस कोन्हेर राम कोलटकर याचे घरी बसले होते तेथे बोलवावयास गेले तेव्हां कृष्णाजी दादाजी याणी उत्तर केलें की विठल कान्हो यांची जोड मेळऊन तुम्ही च खाणें आम्हास काही च नको आपण कजिया सांगत नाहीं गावडे गावी राहून स ····

( अपूर्ण )

(२) श्री

राजश्री अंताजी मल्हार गोसावी यासी सुा इहिदे समानीन मया व अलफ फरासखान्याकडील त्रिंबक विश्वनाथ अगर बालाजी शंकर याचे चिरंजीव पुरंदरी असल्यास खासा व शिष्य सरकारचे वाडियात दोन आसामीस भोजनास घालीत जाणे कारकून असल्यास एकास च भोजनास घालणे *जाणिजे छ २९ रोवल

(३) श्री

चिरंजीव राजश्री नारायणराव बलाळ याप्रती माधवराव बलाळ प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणे विशेष गंगाधर बाब्राजी कारकून नि॥ मराठे गाडदी याजला वाड्यांत जेऊ देणे † हे आसिर्वाद

पो छ २७ जमादिलाखर सुा सबैन

(४) श्री

राजश्री रामाजी कासी वाकेनीस गो

सुा आर्बा सबैन मयां व अलफ पुण्याचे वाड्यांतील जेवणारांचे यादीत गोंदुबाई देशमुखीण यांचे निसबतीचे जेवणार आसामी साहा होत्या त्यापैकीं तीन असामी करार केल्या होत्या हालीं पेशजीप्रमाणें साहा आसामी यांचे निसबतीच्या करार केल्या असेत यांस वाड्यांत जेऊं देणे ‡जाणिजे छ ११ मोहरम बहुत काय लिहिणे

लेखन सीमा

---

* नाना फडनवीस यांचें हातचें. † अक्षर खाशांचें ‡ हस्ताक्षर नाना फडनविसांचें.

(५) श्रीगणराज

विनंती उपरी श्रीमंत सौ बाई उदेक भोजनास वसंतबागांत भोजनास जाणार त्यास आपण मजला सागितले की साहित्य करून करावे त्यास आपले सागितल्या-प्रमाणे मी सर्व करितो परंतु दुसरा आचयारी व पाण्यास ब्राह्मण माकणसुधा व ताब्या येणेप्रमाणे आपण सागोन मग जावे क्षीरीस दुध व रकवान येणेप्रो पाहिजे हे विनंती

~~~~~~~~~~

(६) श्री

राजश्री रामाजी काशी गोसावी यांसि

सुा तिसा सबैन मयां व अलफ रा बापूजी नारायण जोसी यासी पुण्यास पा आहे तरी सरकारच्या वाड्यांत भोजन करून राहातील त्यांस राहू देणे यास तेथेच भोजनाची आज्ञा केली आहे तरी तेथे भोजन करून राहू देणे जाणिजे छ ४ रजबू

~~~~~~~~~~

(७) श्री

राजश्री अंताजी मल्हार गोाँ

सुा इसने समानीन मया व अलफ मल्हारजी तावरा खिजमतगार यांस जेवावयास पात्र १ येक दररोज वाड्यातून देविले असे तरी सद्रहु येक पात्र दररोज देत जाणे *जाणिजे छ २५ जिल्हेज

~~~~~~~~~~

(८) श्री

राजश्री अंताजी मल्हार गो यांसि

सुा सलास समानीन मया व अलफ देणे वो सदासीव दीक्षित कर्वे उपाध्ये याणी कुटुंब पुण्यात आणिले सबब दुध दररोज वजन पक्के ०॥०१ येकसेर देविले असे तरी कुटुंब पुण्यात आहे तो पर्यंत देत जाणे †जाणिजे छ २३ जिल्काद

~~~~~~~~~~

(९) श्री

राजश्री चिंतो विश्वनाथ दिा मुदबख कोठी गोसावी यांसि

सुा इसने सबैन मयां व अलफ राजश्री रामाजी कासी यांजकडे पेशजीप्रमाणे वाके-निसी करार केली असे त्यास वाडियातील जेवणार वगैरे यांचे बंदोबस्ताचें कामकाज

---

* हस्ताक्षर नाना फडनविसांचें. † हस्ताक्षर नाना फडनविसांचें.

तुम्ही करीत जाणे पेशजी तुम्हांस पत्र सादर जाहाले होते त्यास हालीं सदरहूचा बंदोबस्त पूर्ववत्प्रमाणें मारनिलें करितील तुम्हीं दखलगिरी न करणें जाणिजे छ ७ साबान आज्ञाप्रमाण

लेखन सीमा

---

(१०) श्री

राजश्री चिंतो विश्वनाथ गो यांसी

सुा इसने सबैन मया व अलफ पुण्यांत वाडियातील जेवणाराचा वगैरे कुलकारभार वाकेनीस याजकडे सांगितला असतां तुम्ही घालमेल करितां म्हणोन विदित जाले ऐसियास वाडियातील जेवणाराचा वगैरे कामकाज वाकेनीस करितील मुद्बख कोठीचे मात्र कामकाज तुम्ही करणे वाकेनिसाच्या कामकाजात तुम्ही घालमेल येकदर न करणे येविसी फिरोन बोभाटा येऊ न देणे जाणिजे छ १४ रमजान आज्ञाप्रमाण

लेखन सीमा

---

(११) श्रीशंकर

यादी आमलबंद जकात बाजार हुजुर स्वारी राजश्री पंत प्रधान सुा समाण तिसा सीतैन मीया व आलफ छ १३ मोहरम ता छ ८ माहे सफर आवल ता आखेर मीनहू

जमा —————————————— रुो
२५९।-

तपसील ——————————

९६ जकात सर १३७६॥· यो
८३॥ भुतसर १३३६ दर ८÷
१०॥।· किरानासर ३३॥ यो
१॥।· बागाईत सर ७ दर ·।·
————
९६
६३॥।· नकास यो
४॥- छपापाकापड यो

१ कमाविसे
११ म्हीनमाल
८३ गज बाजार पकी मका
२५९।=
------------------------------------------------ रुा

५७॥· चिटी सरकार आपाजीराव पाटनकर खाो उटे नफर २ किा रु ४६० दर
१२॥ प्राो
२५ छ ८ सफर सुाा समाण पकी चिटी हाणमंतराव ढमढेरे सीलदार सालगुदस्ता लस्करात खाो उटे नफर १ किमत रु २०० दोणेसे दर सेखडा रुा १२॥ प्राा याो

१९॥· सिबंदी आा याो ७ ------------------------------
५ कारकूण आा १
७॥· प्यादे आा ५ याो दररोज

२

१॥· विसमालखान
१॥· आबाजी मोव्होने
१॥· भवानी सितोला
१॥· सुलतान जेमाल
१॥· वाकु रायाजी
७॥·
७ सारवान विमाम मादे १
१९॥·
४ भोजन खर्च
१०६

बाकी ------------------------------------------------ रुाा
१५३।=

(१२) श्री

राजश्री रामाजी कासी कादार जकात बाजार लस्कर गोसावी यांसि सुहुर सन इहिदे सबैन मया व अलफ रा। विसाजी कृष्ण पागा याणी लस्करच्या बाजारात पागेकडे चार उंट अकराशे रुपयास सा। केले आहेत त्याचे जकातीचा आकार होईल तो पागेकडे खर्च लिहून जकातीचा तगादा न लावणे जाणिजे छ १६ सफर

(१३) श्री नकल

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण गोसावी यांसि

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष बाजार लस्कर आघाडी व पिछाडी येथील अमल दरोबस्त राजश्री रामाजी कासी याकेनीस याजकडे आहे तरी तुह्माकडील बाजारचे कमाविसीचे कामकाज मारनिलेकडील कारकुनाचे हाते घेणे जाणिजे छ २६ रजब सुा। तिसा सीतैन मया व अलफ बहुत काय लिहिणे

(१४) * श्री

चिरंजीव राजमान्ये राजश्री समसेर बहादुर यांसी सदासिव चिमाणाजी आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणे विशेष पा। पडतूरचे जागीरचा माहाल तेथील मजमू राजश्री रामाजी कासी यांसी सांगितली असे तर मशारनुलेकडील कारकून येईल त्याचे हातून पा। मजकूरचे मजमूचे कामकाज घेत जाणे वेतन नेमनुक पेस्तर साली करार करून दिल्ही जाईल जाणिजे छ २५ साबान सुा। सीतैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे आसीरवाद

ग. ना. मुजुमदार

*सबंद पत्र सदाशिवरावभाऊंच्या हातचें आहे.

# ८३ पेशव्यांचा गोखाना

शहर पुणे येथें शनिवार पेठेंत भाव्यांचें बोळांत गपचुपांचे वाड्याचे पूर्वेस गोखाना आहे. म्युनिसिपालकमिटीचे घरनंबर ३९ ते ५८ इतक्यांचा गोखान्यांत समावेश होतो हल्लीं तेथें वेगवेगळे मराठे धंदेवाले रहात आहेत. त्यांच्या पूर्वी सदर जागा शनिवार पेठेंतील निळकंठशास्त्री थत्ते यांचे वंशजाकडे होती. त्यांजपासून हल्लींच्या मालकांनीं विकत घेतलेली आहे. नं० ३९ ते ५८ इतके वेगवेगळे मालक असल्यामुळें इतके वेगळे नंबर पडले आहेत. इतकीं सर्व घरें मिळून पूर्वीं फक्त एकच नंबर होता. असें तेथील वृद्ध माणसांकडून समजतें. ज्याचा उतारा खालीं दिला आहे तो अस्सल कागद श्रीमंत दादासाहेब ओंकार यांच्या दप्तरांत वाकेनीस (ठोसर) यांच्या प्रकरणासंबंधीं कांहीं कागदपत्र सांपडले त्यांपैकीं आहे.

श्री

नकल

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी कासी वांकेनीस कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे शनवार पेठेत सरकारचे म्हसीचा वाडा आहे त्याचे दक्षणेस माझें घर आहे, त्यास म्हसीचे वाड्याचे दक्षणेचे सोप्याजवळ माझ्या घराचे पूर्वेचा सोपा बांधो लागलो तेव्हां येऊन रदबदल केली की मी सोपा बांधणार त्यास भिंत नवी घालावी तर जागा थोडी यामुळें सरकारचे सोप्याची भिंत कच्च्या इटाची आहे ती पाडून पक्या विटाची भिंत घालून पाणी माझ्या आंगणांत पडते तें भिंतवरून काढून रस्त्यांत पूर्वेकडे पाडतो आणि सोपा सरकारचे भिंतीपावेतो करितो या प्रो रदबदल केली त्याजवरून सरकारचे सोप्याचे पूर्वेच्या कोपऱ्यापासून पश्चमेकडे तेवीस हात माझा सोपा होणार त्यापर्यंत भिंत पाडून नवी भिंत घालावी भिंतीस खर्च लागेल तो निमे सरकारचा व निमे तुमचा व साऱ्या भितीची जागा सरकारची या प्रो सरकारात कागद लिहून देऊन काम करणे म्हणौन आज्ञा जाहली त्याजवरून सरकारचे सोप्याची तेवीस हात लांब व पावणे दोन हात रुंद व उंची एक मजला भिंत जुनी होती ती पाडून हाली आपण नवी भिंत पक्या विटाची घातली आहे त्याचा आकार रुपये ८०॥ त्या प्रो निमे भिंत मजकडील त्याचे निमे रु. ४०। व निमे भिंत सरकारची त्याचे रुपये ४०। सरकारातून पुढें द्यावयाचा करा(र) आसे मी लाविले आहेत

।. भितीची जागा सरकारची सरकारच्या सोयीचे पाणी भितीवरून काढावे ते मी काये लागतील ते लावुन काढून देतो एक मजल्यावर भित लागेल ती मी घालतो त्याचे सरकारातून कांहीं देऊ नये याप्रमाणे कबूल करून हे लिहून दिले असे.

ग. ना. मुजुमदार

# ८४ नाशिक येथील श्रीसुंदरनारायणाचें देवालय

चालू साली मंडळापुढें रा. वि. का. राजवाडे यांनीं " लीळासंवाद " नामक मानभावी ग्रंथावर निबंध वाचला त्यांत आठव्या ध्यान्यांत चक्रधरानें नाशिक, त्रिंबक, येथें यात्रा केल्याबद्दल लिहिलें असून नाशिकच्या देवालयांच्या नावांचा उल्लेख केलेला आहे. " सुंदराचें देऊळ " असा ग्रंथांत असलेला उल्लेख दिला आहे. १०]यावरून शके १२०० च्या सुमारास ज्या वेळीं चक्रधरानें यात्रा केली तेव्हां सुंदरनारायणाचें देवालय होतें. शके १२२५ चे सुमारास नाशिक भाग दिल्लीकडील दौलताबादच्या सुभेदाराकडे गेला, नंतर शके १२७२ चे सुमारास ब्राम्हणी राजाकडे आला. शके १४२५ चे सुमारास अहमदनगरच्या ताब्यांत येऊन शके १५२५ चे सुमारास मोगलांच्या ताब्यांत आला. मोगलांचे ताब्यांत हा भाग आल्यानंतर च श्रीसुंदरनारायणाचे देवालयाचा उच्छेद झाला असावा असा अदमास आहे. हे काल गॅझेटीयरमधुन घेतले आहेत.

ज्यावेळीं यवनलोक देवालयाचा विध्वंस करण्यास आले तेव्हां सुंदरनारायणानें रमा व लक्ष्मी यांसह जवळ च असलेल्या डोहांत उडी घेतली. नंतर देवालय जमीनदोस्त करून त्या ठिकाणीं कबरी व मशिदी बांधल्या अशी जनवार्ता आहे. २०]अशा रीतीनें देवालयांतील मूर्ति नाहींशा झाल्यानंतर पुजाऱ्यांनीं सुंदरनारायण व रमालक्ष्मीच्या दुसऱ्या मूर्ति करून त्या आपल्या घरांत गुप्त रीतीनें ठेवून ते पूजा करीत असत. शके १५६३ चा एक घरासंबंधीं कागद हल्लीचे पूजारी यांनीं मला दाखविला. त्यांत "ज्या घरांत देव आहेत" असा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणजे शके १५६३ चे पूर्वीं च देवालयाचा उच्छेद झाला हें उघड आहे. मात्र तो केव्हां व कोणीं केला याबद्दल आज निश्चित सांगतां येत नाहीं. पुढें शके १६७३ च्या सुमारास नाशिक प्रांत पेशव्यांच्या ताब्यांत आल्यानंतर व शके १६७८ चे पूर्वीं वे. रा. लक्ष्मणभट प्रभु धर्माधिकारी ( गोत्र काश्यप, सूत्र वाजसनेय ) यांच्या वडिलांच्या विनंतीवरून श्रीमंत नानासाहेब पेशवे व गंगाधार यशवंत चंद्रचूड हे त्यांच्या घरीं गेले. तेव्हां देऊळ बांधण्याबद्दल गोष्ट निघाली असतां गंगाधर यश-

वंत यांनीं सांगितलें कीं "येवनांचा वाद आम्ही घेणार नाही तुम्ही मसीद व कबरी पाडून जागा नीट केली म्हणजे आम्हीं देवालय बांधोन देऊ" याप्रमाणें झाल्यावर लक्ष्मणभटाच्या वडिलानें तेथें असलेल्या यवनांच्या मसिदी व कबरी सर्व खणून जागा चांगली केली ( लेखांक १ ); व डोहांतील मूर्ति काढून पुनः स्थापना केली. (डोहांत गुप्त असलेल्या मूर्ति हल्लीं देवालयाच्या बाहेरच्या गाभाऱ्यांत एका कपाटांत आहेत.) नंतर गंगाधर यशवंत यांनीं शके १६७८ पौष शुा १० भृगुवार रोजीं श्रीसुंदरनारायणाचें देवालय बांधण्यास प्रारंभ केला. ( लेखांक २ )

श्रीसुंदरनारायणाकडे हल्लीं इंग्रजसरकाराकडून दरसाल नक्त नेमणूक रुपये ८०२ मिळतात. गंगाधर यशवंत चंद्रचूड यांनीं देवाकडे पूर्वीं कोतूळ परगण्यापैकीं मेवसे हा गांव खर्चाकरितां दिला होता परंतु तो फार लांब असल्यामुळें त्याचे मोबदला पाा वण पैकीं मौजे वागळूद इनाम करून दिला. त्या गावापैकीं हल्लीं पूजारी यांस सालीना सुमारें १२५ रुपये उत्पन्न मिळतें.

लेखांक १ चा कागद व वरील माहिती ही हल्लींचे वहिवाटदार पूजारी वे० रा. त्रिंबक नारायण पूजारी संस्थान श्रीसुंदरनारायण देव यांनीं कृपा करून मला दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. यांचेजवळ फार जुने कागदपत्र व ग्रंथ आहेत. त्यांचा फायदा ते कोणा हि इतिहाससंशोधकास देण्यास आनंदानें तयार आहेत.

लेखांक २ शिलालेख-हा देवालयाच्या बाहेरच्या पूर्व दरवाजावर पांढऱ्या संगमरवरी दगडावर देवनागरी लिपींत कोरलेला आहे. दगडाची लांबीरुंदी ११½ × १० इंच आहे.

सुंदरनारायणासंबंधीं माहिती मुंबई गॅझेटीयर व्हॉल्युम १६ नाशिक यामध्यें पान ५०३।५०४ वर दिलेली आहे.

लेखांक १ श्री

INAM A COMMISSION
5879

वेदमूर्ति राजश्री अनंतभट व बाळभट

प्रभु गोसावी यांसि——————

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा इसने सबानीन मया व आलफ वो राजश्री लक्ष्मणभट प्रभु धर्माधिकारी पुजारी श्रीसुंदरनारायणदेव काो नाशिक याणी हुजूर विदित केले कीं श्रीसुदरनारायण देव याची पूजा वंशपरंपरा आम्हाकडे आहे त्यास मोगलाई अमलांत देवालयाचे जाग्यावर मसीद केली होती ते पाडून देवालय करावें सबब आमचे वडिलानी स्वराज्यात मल्हारजी होळकर याचे स्वारीबराबर श्रम सहास केले व श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यास व गंगाधर यशवत याजला घरीं नेऊन देवाची मूर्ति दाखविली ते समई गंगाधर येशवंत बोलिले कीं येवनाचा वाद आम्ही घेणार नाही तुम्ही मसीद व कबरा पाडून जागा नीट केली म्हणजे आम्हीं देवालय बाधोन देऊ तेव्हा आमचे वडिलानी सरकारची पत्रे नेऊन मसीद व कबरा खणोन जागा नीट केली त्या जाग्यावर गंगाधर यशवत याणी देवालय बाधोन दिल्हे आणि त्याणी सरकारांत विनंति करून संस्थानचे खर्चाबदल गांव वगैरे इनाम सरकारांतून देविला व पूर्वी देवाचे प्राकारातील जागा लोकानी घेतल्या होत्या त्या आमचे वडिलानी सरकारांतून सोडोन घेतल्या या प्रो आम्हाकडे चालत असतां यात विभाग घ्यावा हे दुराशा आमचे दायाज अनंतभट व बालंभट प्रभु याणी धरून पाचसात वर्षे कटकट करितात साप्रत त्याणी सरकारांत गैरवाका समजाऊन पाडुरंग धोडाजी कमादार पो नासीक यास पत्र नेले आहे आणि श्रीचे पुजेस आडथला करणार त्यास आमचे कागदपत्र व भोगवटा व येविसीचा दाखला होळकर व येशवतराव गंगाधर याजकडे मनास आणोन श्रीचे संस्थान पूर्ववत आम्हाकडे चालत आल्याप्रों चालविलें पाहिजें म्हणून ऐसियास येविसीचा दाखला मनास आणितां राजश्री तुकोजी होळकर व येशवतराव गंगाधर याणी सदरहूप्रों समजाविले तेव्हां तुम्ही सरकारांत गैरवाका समजाऊन पत्र नेले आणि श्रीचे पूजेविसी लक्ष्मणभट यासी खटला करणार हे ठीक नसे सा हे पत्र सादर केले असे तरी सुंदरनारायण संस्थान सुदामत लक्ष्मणभट याजकडे चालत आल्या प्रो चालावे तुम्ही गैरवाजवी खटला केल्यास कार्यास [ येणार नाही जाणिजे ]

छ ८ जमादिलावल आ[ज्ञाप्रमाण ]

लेखांक २

## शिलालेख

श्री

गोदादक्षतटस्छ नासिकपुरे
वस्वद्रिषट्‌भूमिते १६७८ शा
के धातरि वत्सरे ह्यबहुले पौषे
दशम्यां भृगौ ॥ श्रीमत्कामद
सुंदरायपदभृन्नारायणस्या
लयं भक्तश्चंद्रशिखोपनामक
विभुर्गंगाधरोरीरभत् ॥ छ ॥ [१०

गं. ना. मुजुमदार

---

# ८५ अंजनवेल तालुक्याची वहिवाट

चंद रास ३०

श्री

वहिवाट तालुके अजणवेल सुरु सन आर्बा ईशरीन मया तेन व अलफ———

हकीकत मागील राजे यांची वहिवाटीची————

कानडा रामराजा छत्रपती जातीचा वाणी लिंगाईत याचे अमलांत तालुके मजकुरी किले नवते मौजे गुढे तर्फ वलंबे येथे पवार म्हणोन जातीचा मराठा याणे गढी बांधोन गुढे वि [ बी ! ] लाईत असे नाव चालउन तेथे पेठेची वसाहात करून कारभार करीत असे त्यास वर्षे अजमासे सुार ६०० साहाशे जाहाली त्या कारकी-[२० र्दीत मुलुक वैराण बहुत होउ [ न ! ] [ न ! ] वी वसाहात होती तेव्हा जमाबंदी विधावर्णाची नवती लागवडीचा अजमास पाहून दरसाल रयतसमजुतीने टकबंदीचे चालीप्रमाणें ठराव करुन वसूल घेत असत ते काली पवार याचे तर्फेने ठाणी होती ते———

१ माणीकदुर्ग मौजे मांडकी तर्फ सावर्डे येथे गढी होती

१ मौजे सीर तर्फ वलंबे येथे कासारदुर्ग म्हणोन गढी होती

२

सदरहुप्रमाणे पावणें तीनशे वर्षे अजमासे वैहिवाट चालिली पुढे पादशाई अमल चालिला——————— १—कलम——

अलि ईदलशा व बहिरी निज्यामशा हे दोघे भाउ अनागोर्दीचे मु-

( पृष्ठ २ )

कामी कानडा रामराजा यासी मारुन आलि ईदलशा विज्यापुरी बादशाई तख्ती बसले तें साल सुन सलास तिसा मया शके १४२४ दुंदुभी नाम संवत्छेर या सालात अमल सर केला त्याचा तपसील—————— १

अलि ईदलशा खुद ईस्तकबील शके १४२४ सन सलास मीया तागायत सन समान अर्बैन व तिसा मिया शके १४६९ कीलक नाम संवछरे पर्यंत

१०]हकीकत सुभे—जाहाले ते

२४ प्रथम कोकणात सुभे मुस्तफाखान अमलदार विज्यापुराहुन आले त्याणी गुढे येथे पवार होता त्यांस मोडून त्याची ठाणी उध्वस्त केली आणि दाभेमेची वसाहात केली तेव्हापासून दाभेम सुभा असे नाव पडिले आणि दाभेमसुभ्या-कडे माहाल चालविले ते बितपसीलवार——

सदरहू माहालात वसाहात जुजबी होती तेव्हा मुलखाची आबादी होण्याबद्दल जमीदार खाते पाटील गावगंनाचे यासी आणोन दिलदिलासा देउन माहालास जमीदार देशमुख व सरदेशमुख व देशकुलकर्णी व गावकुलकर्णी व गावास खोत याप्रमाणे काईम करून गावगंनाची वसाहात करउन आबादीचे कौल सर्वास दिल्हे त्या कारकीर्दीत पिकाचा आजमास पाहून साहावा हिसा राजभाग म्हणोन सरकार

२०]याप्रमाणे जिराईत बा

( पृष्ठ ३ )

-गाईत याचे उत्पनाचे मानाने टकबंदीचे जमा साधणुक केली परंतु त्या वेळी जमिनीची मोजणी बिघावणी नवती नजरमान्याने आजमास करून टकबंदीची जमा ठराविली त्यात नेहमी खर्च ईनामत वजा देउन बाकी वसुली सरकारात घेत असत मुस्तफाखान याजकडे अमल ईस्तकबील तागाईत सन सीत ईशरीन व तिसा मिया शके १४४७ पर्यंत—— ——

१२ सुभे मुरादखान ईस्तकबील सन सबा ईशरी शके १४४८ क्षय नाम संवछरे तागाईत सन समान सलासीन व तिसा मिया शके १४५९ हेमलंबी नाम संव-छरे पर्यंत साले———

सुभे खुरासान खान नियाबत गैयती पटाईत इस्तकबील सन तिसा सलासीन व तिसा मिया शके† १४६० विलंबीनाम संवत्छरे तागायत सन इसने खमसेन व तिसा मिया शके १४७० परिधावी नाम संवत्छरे साले १४ पौ वजा कारकीर्द इभ्राम इदलशा साले ४ बाकी साले——

४६

कारकीर्द इभ्राम इदलशा पादशाई इस्तकबिल सन तिसा आबैन व तिसा मिया शके १४७० कीलक नाम संवत्छरे तागाइत सन समान समानीन व तिसा शके १५०९ सर्वजितनाम संवत्छरे——

४ सुभे खुरासन खान सन इसन खमसेन शके १४७३ पर्यंत——

१२ सुभे चंगीरखान सरनोबत दिवाण अलि नामजाद नि [१०

( पृष्ठ ४ )

या गयबती इस्तकबिल सन सलास खमसेन शके १४७४ परिधावी नाम संवत्छरे तागाइत सन आर्बा सितेन व तिसा मिया शके १४८५ रुधिरोद्गारी नाम संवत्छरे पर्यंत——

७ सुभे अफलज खान दिवाण खासमजलस इस्तकबील सन खमस सितेन व तिसा मिया शके १४८५ तागाइत सन इहिदे सबैन व तिसा मियां शके १४९२ प्रमोद नाम सवंत्छरे पर्यंत——

१७ सुभे मलिख याकुबखान दिवाण खास मजलस इस्तकाबिल सन इसन सबैन व तिसा मिया शके १४९३ प्रमाथी नाम संवत्छरे तागाइत सन समानीन व तिसा मिया शके १५०९ सर्वजित नास संवत्छरे पर्यंत—— [२८

४०

कारकीर्द सुलतान महमद इस्तकबील सन तिसा समानीन व तिसा मिया शके १५१० सर्वधारी नाम संवछरे तागाइत सन इशरीन अलफ शके १५२१ सिधार्थी नाम संवत्छरे पर्यंत——साले.

२ सुभे मलि याकुदखान खास दिवाण खास मजलस

१ सन तिसा समानी शक १५१०

१ सन तिसेन शक १५११

——वर्षे——

११ सुभे दौलतखान दिवाण खास मजलस इस्तकबिल सन इहिदे तिसेन शके १५१२ विकृती नाम संवत्छरे तागायत इहिदे अलफ शके १५२२ शार्वरी [३० नाम संवत्छरे पर्यंत——

† वास्तविक १४७४ पाहिजे.

४१

११ सुभे थिराइमखान दिवाण खास मजलस जा

(पृष्ठ ५)

कनाद हवालदारी इस्तकबील सन इसने अलफ शके १५२३ प्लवंग नाम संवछरे तागायत सन इसने इशरीन व अलफ शके १५३३ विरोधकृत नाम संवछरे पर्यंत————

८ सुभे बडे खान दिवाण खास मजलस इस्तकबिल सन सलास इशरीन अलफ शके १५३४ तागायत शके १५४१ सिधार्थी नाम संवछरे पर्यंत साले———

३२

कारकीर्द अलि इदलशाजी पादशाहा इस्तकबिल सन ईहिदे इशरीन अलफ शके १४८] १५४२ रौद्र नाम संवछरे तागायत सन आर्बैन अलफ शके १५६१ प्रमाथी नाम संवछरे पर्यंत————————————————साले

१ बडे खान दिवाण खास मजलस इस्तकबिल सन इसने इशरीन अलफ शके १५४२ रौद्र नाम संवछरे———

१९ सुभे महमदखान दिवाण खास मजलस इस्तकबील सन इसने इशरीन अलफ शके १५४३ दुर्मती नाम संवछरे तागायत आर्बैन अलफ शके १५६१ विक्रती नाम संवछरे पर्यंत——————साले———

२०

कारकीर्द सुलतान महमुदीन इस्तकबील सन इहिदे आर्बैन शके १५६२ विक्रती नाम संवछरे तागाईत सन इसने खमसेन अलफ शके १५७३ खर नाम संवछरे

२०] ६ सुभे शाबुदीन खान नामजाद हवालदार इसन ईहिदे आर्बैन अलफ शके १५६२ विक्रती नाम संवछरे तागाइत सन सीत आर्बैन अलफ शके १५६७ पार्थीव नाम संवछरे पर्यंत————

५ सुभे अंगार नामजाद हवालदार इस्तकबील सन सबा

(पृष्ठ ६)

आर्बैन अलफ शके १५६८ व्यय नाम संवछरे तागायत सन इसने खमसेन अलफ शके १५७३ खर नाम संवछरे———

११

——तेरीज बादशाई अमल विज्यापूर कारकीर्द ——वर्षे——

४६ आलि दलशा

४० इभ्रम इद्लशा

३२ सुलतान महमद

२० अलि इद्लशा

११ सुलतान महमुदीन

१४९

सदरहूप्रमाणे पादशाई अमल दाभोल सुभा जाहाला ते काळी गावगंनाची जमा बंदी हरयेकयेका नीमोन्याने जमा येत नवती जशी लागवड होत गेली त्या
१०] अन्वये जमा साधणुक होत आली येकुण कारकीर्द पादशाई——

सिवाजी भोसले हे चदीचंदावराकडे राहात असत भोसले व जाधवराव यांची सोयरगतीवरून कटकट आपसात होउन भोसले बाप ठून पुंडावे केले शके १५७४ पासून शके १५९६ पर्यंत वर्षे २२ यानंतर शके १५९६ शकांत सिवाजी माहाराज छत्रपती यासी रायगड किला येथे राज्याभिशेक जाहाल्यावर माहाराज याजकडून कोकणात फौजा सरदार मुलुख सर करावयासी आले सिवाजी माहाराज याची कारकीर्द——

२२ राज्याभिषेकाचे पूर्वी वर्षे बेवीस

६ राज्यांभिषेक शके १५९६ सन समस सबैन अलफ ता सन समानीन अलफ शके १६०१ पर्यंत—— [२०

२८

(पृष्ठ ७)

सदरहू सालात अमलदार आले त्याची नावे व साले तपशील वर्षे——

३ राघोबा बलाल अत्रे प्रथम

४ आबाजी माहादेव दुसरे

५ माहादाजी अनंत तिसरे

१२

५ राघो वासुदेव चवथे

७ अताजी रगंनाथ केलकर पाचेवे

४ बाहिरो त्र्यंबक साहावे

१६

वर्षे २८

येकूण साहा अमलदार जाहाले त्या पौ राघो बलाल अत्रे प्रथम आले त्याणी बादशाई अमल दाभोळचा उठउन महाराज छत्रपती याजकडे मुलुक सर जाहाला तेव्हां मुलुख धामधुमी राज्यक्रांतीमुळे वैराण पडोन (पुढें अडीच बंद गैरा जाहाले आहेत ते लिहावयाचे आहेत)——जाहाला

१ बिघ्यावर जमाबंदी जिराइत शेत जमीन काटी मोजणी काठी हात पांच व पांच मुठीची येकूण तसू ८४ चौऱ्याशी तसूची करून त्या काठीने शेताची मेजणी करिते समई चालत्या काठ्या लांबी चोवीस व रुंदी चोवीस या प्रमाणे मोजून त्या काठ्या पाडून टाकिल्या असता लांबीच्या चोवीस व रुंदीच्या चोवीस या प्रमाणे करून त्याचे बिघे आकारणी बदल वजाबांद सिरस्ते प्रा देउन दर बिघा दस्त——

१ ऐन जिनसी व पावसाळी कीर्दीचा सिरस्ता दर बिघा सिरस्ते प्रमाणे वजा द्यावयाचा तो देऊन दर बिघा दस्त

१ भात जमीन प्रतवार दर बिघा दस्त भात केली

·॥=॥ अवल——

·॥· दुम——

·।= सीम——

·।–१। च्यार सीम——

·।–१। बावील——

·।=॥ खारवट——

·।· रहू——

·।–१। खारी——

१ कुड्याट प्रतवार

·।–१।· प्रत——

·।· प्रत——

(पृष्ठ ८)

·।३ राजपाळ

·। तुरवटे

——सदरहू दर बिघ्यास तीन पांड वजा करून बाकी बिघे यास सदरहू लिहिल्या प्रो दर

१ सरस जमीन पाहून तिजाई चौथाई बाद देउन बाकी दर बिघा दस्त

०१॥= उडीद
०१॥= मुगर
०१॥= पावट
०१॥= चवली
०१॥= तीळ साले
०१॥= तुरी
०१॥= कडवे
०१॥= कुळीथ
०१॥= हरभरे
००=॥ जागली वाटगणे

०॥।२०२

---

√उन्हाळी जमीनीचे कीर्दीचा सिरस्ता

१ वजनी वजन दर बिघा दस्त

१ हळद दर बिघा तिजाई वजा करून बाकी +
बिघा वजन ०।०

१ ताग दर बिघा चौथाई वजा करून बाकी दर बिघा ०।०

१ गुळ

०।–१। प्रा भाटीचा
०२॥। प्रा सींपण्याचा
०३०५ प्रा खडवा

सदरहू जमिनीस दोन पडणे बाद देउन सिरस्ते प्रो दस्त
वजनी जिनसास दस्ताचा दर बिघा सिरस्ता
जिराईत जमिनीस दर बिघा सदरहू प्रो दस्ताचा सिरस्ता——

१ बागाईताचा सिरस्ता——

१ नारळ माड पेढे जे असतील ते त्यात गैरबारदार व स । शीटे व उमेदवार व रोपे वजा देउन बाकी बारदार लागते माड असतील त्या माडावरील नार [ळ] मोजून पाचा

( पृष्ठ ९ )

नारळांपासून पंच्यानव पर्यंत येका माडाचे नारळ धरावे आणि त्यापों निमे प्रज्याभाग बाकी राज्यभाग——

१ सुपारी काडे मोजणी करून पौ वजा गैरा मयत वगैरे बाद देऊन बाकी बारदार काडास सुपारी वजन येक सर पासून पाच सर पर्यंत उभी रास करून पौ निमे प्रज्याभाग व निमे राज्यभाग.

बागाइताचा सिरस्ता

१ झाड दस्त गैर बारदार व लागत नाही ती व रोप वजा देऊन बाकी लागते झाडास दस्त———— ———— ——नख्ती

१ भडार माड दर झाडास
१॥१८॥ उतम प्रत
१ मध्यम

१ उतुणी दर झाडास ।। च्यार आणे
१ भरेली माड दर झाडास माडास ।५० साहा आणे फणस झाडे ज्या झाडावर चाळीस पासून शंभर पावेतो फणस लागले असतील आणि झाड इरसा असेल त्या दर झाडास ।

४

झाड दस्ताचा नख्ती सिरस्ता पाते चाल रुपये ५०

सदरहू प्रमाणे जमाबंदीचे धारे बसऊन बान्या अनवय वसूल बाकी करू लागले ते कोली पटी बाब सरकारचे दस्ता खेरीज नवती किलेहायच खर्चाकडे दाभोल सुभ्याचे माहाल यकूण देहे
५७ ता सावर्डे

२ दरोबस्त अजणवली कडे
३४ चौथाई विशालगड चौथाई बहिरव गड निमे अजणवेल
१८ दरोबस्त किले बहिरगड
३ निमे अजणवेल चौथाई रत्नागिरी चौथाई बहिरव गड

५७

( पृष्ठ १० )

२३ तर्फ गुहागर
५ दरोबस्त किले अजणवेल
१ किले जयगड
१७ निमे अजणवेल निमे सुवर्णदुर्ग

२३

२० ता। हवेली हमजाबाद निमे अजणवेल निमे सुवर्णदुर्ग

७६ ता। वालबे

६१ निमे अजणवेल चौथाई बहिरवगड चाथाई रत्नागिरी

१५ निमे अजणवेल निमे जयगड तालुके रत्नागिरी

७६

५७ तो चिपळूण

९ पेशजी अजणवेली कडे

२ निमे अजणवेल चौथाई रत्नागिरी चौथाई सुमारे गडे

१ निमे अजणवेल निमे सुवर्णदुर्ग

११ निमे अजणवेल चौथाई रत्नागिरी चौथाई बहिरवगड

१ निमे अजणवेल चौथाई सुवर्णदुर्ग चौथाई व्याघ्रगड

१३ निमे अजणवेल चौथाई रत्नागिरी निमे चौथाई बहिरवगड निमे चौथाई निा प्रतिनिधीकडील किले हायकडे देहे.

३ किले व्याघ्रगढ

७ किले ज्यगड कुभारक

३ शाहुगड

१३

२० निमे अजणवेल चौथाई रत्नागिरी चौथाई प्रतिनिधी निा मुकासे गाव बादरे मुकास गाव १५ बाकी पाच गाव किले व्याघ्रगड

५७

२३३

माहाल साडेच्यार खेरीज वर घाट पो सिर्के याजकडे

( पृष्ठ ११ )

३ ता। परली पो

१ हेळवाकपो

४

तपसील

४ कसबे

२०९ मोजे

२३ मजरे

१ पेट

२३७

सदरहू प्रमाणे कारकीर्द सिवाजी महाराज पुढे कारकीर्द संभाजी महाराज इस्तकं बिल सन इहिदे समानीन शके १६०२ रौद्र नाम संवत्छरे तागाइत सन तिसा समानीन अलफ शके १६१० विभव नाम संवत्छरे साले ९ या सालात कारभारी तालुके मजकुरी आले ते

१ यहिरो त्र्यींबक माजी कारकीर्दीचे अमलदार

१ विठल गोपाल शके बेवीस तेविसी

२ गगाधर दादाजी

३ रादाजी अनंत

१॥ येन वर्ष     १॥ भालेराई

---

२

---

कारकीर्द राजाराम छत्रपती ह्या सन तिसैन अलफ शके १६११ तागायत सन समान तिसैन अलफ शके १६१९ ईश्वर नाम संवत्छरे येकूण साले नऊ या सालांत अमलदार जहाले ते

| | |
|---|---|
| २ माहादाजी बलाल | १ कासी रंगनाथ |
| १ सिवाजी त्र्यींबक | २ बापूजी आपाजी |
| १ कृष्णाजी परशराम | १ माहादाजी राम |
| १ गंगाजी क्षीरसागर | ४ |
| ५ | |

---

९ वर्षे

येकूण माहाराज याची कारकीर्द वर्षे

२८ सिवाजी माहाराज

९ संभाजी माहाराज

९ राजाराम छत्रपती

४६

( पृष्ठ १२ )

कारकीर्द हबसी खान साहेब जजिरे राजपुरीकर याणी किले अजणवेल व गोवल कोट घेतला ह्या सन तिसा तिसैन अलफ शके १६२० बहुधान्य नाम संवत्छरे तागाइत सन आर्बा सबैन मिया व अलफ शके १६६५ रुधिरोधगारी नाम संवत्छरे पर्यंत ४६ साले या सालांत किले वगैरे बदिस्त केली त्याचा तपसील

१ कसबे चिपळूण येथे गढी बाधून नंतर गोवलकोट पेशजी माहाराज याणी काही बाधिला होता त्याची बंदिस्त पुरी करून तेथे चिपळुणाहून काम करीत

१ किले विजयगड समुद्रकाठी जयगड किला रत्नागिरी तालुकेयास आहे त्याचे निमोन्या बदलं बाधिला त्यास वर्षे १२५ सवासें आजपावेतो जाहाली

१ जुनी अजणवेळ हाली म्हणतात ती पडकाटचे लगत आहे ती व पाताळ बुरुज याची बंदिस्त केली

---

३

सदरहु किल्याची बंदिस्त करून पेशजीचे सिरस्ते प्रो जिराईत व बागाईत जमा बंदी चालविली आणि नवी बाब जाजती बसविली त्याचा तपसील

१ तसर म्हणोन बाब केली ती माहाराजयाचे अमलात रयतेकडे जुनवी गला बाकी राहिल्यास बाजारी दराने पैका घेत तो हबसीयाचे कारकीर्दीस जमा-बंदी चढली किलेहायचे खर्च भागोन जाजती जमा गला होऊ लागला सबब येक खंडी दस्तास तीन मण प्रो तसर म्हणोन् ऐन जिनसा बाबत घेऊ लागला त्याचा दर ठराविला तो

१ भात नागली दर खंडीस रुो २२॥ प्रमाणे
१ वरिया दर खंडीस रुां १७॥ प्रमाणे
१ हरीक दरोबस्त दरखंडीस रुपये ७ प्रो
१ तील गोडे दर खंडीस रुपये ७५ प्रो
१ तील काले व उडीद व तुरी व तील साले व मूग

( पृष्ठ १३ )

येकूण पांच जिनसास दर ६० रुपये प्रमाणे खडीस
१ पावटे दर खडीस रुपये ५०
१ कडवे चवली व कुलिथ दर खडीस रुपये ४०
१ मीठ दर खडीस रुपये ७ प्रमाणे

---

१ बैल दाम म्हणजे पाटीचे बैल उदिमाकरिता व्यापारी लोक आपले घरी बैल बालगितात आणि त्याजवर वोझी घालून उदीम करितात सबब दर बैली रुपया १॥ प्रमाणे

१ मोहतर्फा उदिमी लोक याजपासून येक रुो पासोन पाच रुपये पर्यंत उदीम पाहून घ्यावयाचा सिरस्ता केला

नफा प्रज्याभागावर बाब बसविली ती

०॥५० नारळ दरशेकडा
०॥।० सुपार वजन दर मणी

---

१ हकदारी सरदेश कुलकर्णी याचे वतन कज्यामुळे जप्तीस ठेविले त्यास कुलकर्णी
ह + गावगन्नाकडून घेत असे ते जमा धरिले त्याचा सिरस्ता

१ येन जिंनस गल्याचे दुस्तावर दर खडीस ४॥॰ अदमण प्रो आकार होईल तो ऐन जिनस घ्यावयाचा तो घेत असत

१ नख्त बाब जमाबंदी प्रो फणस उतुणी मोहतर्फा व बैल दाम याचे दुस्ताचे आकारावर दर रुपयास ०१२॥ अर्ध आणा प्रो घत असत

१ वजनी जिनसावर

१ गुळ हळद दुस्तावर दर मणी ०३७॥ दीढ आणा प्रमाणे

१ ताग दर मणी दुस्तावर ०२५ येक आणा प्रमाणे

१० | १ सुपरी नारळावर दर हजारी ०६२॥ आडीच आणे प्रो

हकदारी

१ सरदेशमुखीचे वतन दरोबस्त सरकारात होते पु—

( पृष्ठ १४ )

— ढे तीन माहालचे वतन मोकले करुन सरदेसाई याचे हवाली करून बाकी दोन माहाल तर्फ गुहागर व तर्फ हवेली हमजाबाद हे सरकारात ठेवून वसूल घेत आले त्याचा सिरस्ता

१ येन दुस्त गल्यावर दर खडीस ।॰च्यार आणे

१ नख्त बाब जमाबंदीवर दर रुपयास ०१२॥

१ वजनी जिनसावर दुस्तावर दरमणी

२०] १ गुळ हळद सुपारी दरमणी ०३७।

१ ताग दरमणी ०२५ येक आणाप्रमाणे

१ सुपारी नारळावर बाजारी ।॰आणे च्यार प्रमाणे

सरदेशमुखी

सदरहू प्रमाणे हवसीयाचे कारकीर्दीत वेहिवाट चालली सरीज गावगना हबसी आगरे याचे दुतर्फा गावी हबसी याजकडून पटी म्हणोन गाव पाहोन घेत

कारकीर्द तुलाजी आगर सरखेल सन खमस आबैन मया व अलफ शके १६६६ रक्ताक्षी नाम संवत्छरे माघ वद्ये २ तागायत सन खमै सन मया व अलफ शके १६७६ भावा नाम संवत्छरे पर्यंत वर्षे ११ या सालात मामलदार

६ मुबजी नाईक कदम

५ मात्योजीराव विचारे

११

येकूण अकरा वर्षांत नव्या कानू जाहाल्या त्या पेशजी हबसी पटी म्हणोन दुतर्फा गावी घेत असत त्या इसमा बाबत जमाबंदीवर पटी बाब म्हणोन बाब बसविली ती बितपसील

१ नख्त बाब पाौ कलमावर जसे तपसील

(पृष्ठ १५)

१ बैल पाटीचे

१ मोहतर्फा

१ भाडार माड

३

१ भरेलीमाड

१

[१९

बाकी फणस उतुर्णीचे आकार होईल त्याजवर रुपयास ०५१० दोन आणे प्रमाणे

१ गला येन दस्तावर दर खंडीस

३ गला हरजिनस दर खंडीस रुपये ३ प्रो

२ हरीक दर खडीस रुपये दोन

वजनी ऐन दस्तावर

[२०

०।५१० गुळ हलद दरमणी

०।० ताग दरमणी

पटी बाब

१ घर पटी सात पाटील वगैरे भले माणूस याची घरे वजा देऊं बाकी द घरास

१ मर्द घरास

०॥० रांडक घरास

[२१

१ वणम्हैसी सरपोवजा जरंड वाझ नागरी व खोत पाटील व जमीदार व ब्राह्मण वगैरे बाद देऊन बाकी वसुली दर म्हसासि सिरस्ता

१ उमेदवार

॥॰ जरंड माहातारी

---

१ शेल्या व बकरे बुध वीस बकरी असली म्हणजे येक माच त्या दर माचास किंण्याचे सर्वांकडे येक बकरे यैन जिनस घ्यावयाचा सिरस्ता केला

१ गौली व धनगर व खारवी व दालदी याजवर सिरस्ते बसविले

१ गौली याचे म्हशीपो माहाताऱ्या व वाझ+म्ह++व कारभारी व चौगुल याच्या पालक

१०] (पृष्ठ १६)

खावयाच्या त्या वजा देऊन बाकी दर म्हैसीस दस्त तुपाचा बसविला व ज्या गौलियाच्या म्हैसी नाही त्यास आगावर घरपटीचे ऐवजी दस्त बसविला तो

१ म्हैसीदर दस्त

८॥।- तान उमेदवार

८।५ पुरवटे तान

८।॰ पाडस

८।॰ परवार पाडस

२०] १ आगावर ज्याच्या म्हैसी नाही त्यास तूप वजन चबदसणी

८।॰ मर्द घरास

८।५ राडक घरास

सदरहु प्रो गौलियाचे म्हसीचा व आगावर दस्ताचा सिरस्ता

१ धनगर याचे वाडे व घरे पाल देऊन धनगर याचा गावडा व चौगुला याच्या म्हैसी बार्दीच्या असतील त्या वजा देऊन बाकी म्हैसी असतील त्याजवर दस्त

१ उमदवार म्हशीस

॥॰ जरड माहातारे म्हैसीस

१ खारवी व दालदी मच्छीमारी लोक याची सीरगणंतीची मोजणी करुन त्यात पंधरा वर्षांचे खाली पोरगे व साठ वर्षाचा म्हातारा वजा देऊन बाकी राहील त्यात होडेकर व पाटील व त्यास पोर्गा १ याप्रो वजा देऊन बाकी निमे आसामी राहातील त्यास दस्त तेलसीपा दर असामीस होड्यावर दस्त

१ आगावर दस्त

॰१ यैन आसामसि

( पृष्ठ १७ )

॰॥० प्रत

१ दर होड्यावर होड्यास येक होडकर व येक पोर्गा वजा देऊन दर होड्यास दीढ मण प्रमाणे [१०

दालदी खारवी याचा सिरस्त

सदरहू तीन कलमाचा सिरस्त

१ माप वर्तांळां ऐन जिनस गला कोटीस वसूल येई त्याचे माप फऱ्याने तीन्ही पट्या फऱ्याच्या साफ कापून घ्याव्या ते मापारी लोक तीन पट्यावर कसर ठेऊन माप घेऊ लागले यामुळे रयतेचा गिला सरकारात गेला तेव्हा तीन्ही पट्या साफ कापून फऱ्याने माप घ्यावे ते पायली मापे मोजले असता सवा चौदा व पाऊण मण सवा दोन पायली भरावे आणि पायली मापाचे कसरे मापाचे कसरे बाबद माप वाो ह्मणोन दर मणी ॰॰१ येक पायलीप्रमाणे+-+

१ सेर वर्तांळा ह्मणजे कोटी तूट उदीरखाज ह्मणोन दर मणां तेसराची बाब दर खंडीस तीन मण प्राो दस्तात वजा करून बाकी वसुली गल्यास दर मणी [२० यक सेर प्राो कलम

१ खरेदी म्हणोन हिशेबी जमा येत्ये त्याची अगर अरमारचे रवानगी समई भाताचा व तुपाचा व काथ्याचा तोटा अगर गावगंनांपासून खरेदी म्हणोन जिनस घेत त्याचा तपसील

१ ऐन जिनस गल्यावर दरोबस्त गल्याप्रो हरीक व मीठ व इनाम मुकासे गाव खरीज करून बाकी जिनसाचे दस्तवार दर खंडीस भात कैली ॰१ प्रमाणे सरकारात घेऊन त्या भाताचे किमती बंदल दर मणी रुपया॰॥॰ अर्ध रुपया प्रमाणे गावाकडे

( पृष्ठ १८ )

मजुरा दुस्ताचे आकारांत देत गेले

१ तूप चैन दुस्त समेत हरीक सुधा पौ वजा इनामत व मुकासे व मिठागर वजा करून बाकी हर जिनस मिळोन दरखडीस येक सेर प्रमाणे सरकारांत घेउन त्याचे किमती ऐवजी दर मणी रुपये ३ तीन प्रो रयतेस मजुरा देत गेलें

१ काथा नारळाच्या जमाबंदी पौ गुहागर माहालाचे सात गावी दर हजारी नारळास काथा वजन ॰२॰२॥ दोन मण अडीच शेर प्रमाणे सरकारात घेऊन त्याची किंमत दर मणी रुपया १ येक प्रो रयतेस मजुरा देत गेले——

१०] ३

१ प्रा दोन मण ह्मणोन रयतेकडील गला ऐन जिनस वसूल न येई सबब पेशजी तसर तीन मण होते त्या खेरीज दर खडीस दोन मण प्रो प्रा रयतेस द्यावयाचा करार करून दर ठराविले ते

२० भात दरखंडीस
१३।३३।वरीया दरखंडीस
३० चवली व कडवे व
कुलीथ दर खंडीस

१६ नागली दरखडीस
५० तील गोड दर खडीस
४० तील काले व
उडीद व तुरी व
पावटे व तील
साले व मुग
या सहा जिनसास
दर चालिस प्रो

२०]

१ सुभ्रात तेलतली खुटकरी याचपासून आरमाराचे खर्चाबद्दल दर खुटास तेल गोडे वजन ॰१० दहा सेर

१ सुतार व लोहार यास येक माही पाटास अडसरी देऊन आरमाराकडे खपावयासी आणावयाचा सीरस्ता

( पृष्ठ १९ )

१ पोतदारीचे वतन तालुके मारचे चीतपावन ब्राह्मण याचे होते ते कारकीर्द मजकुरी कज्यामुळे जप्त होऊन हक सरकारात जमा केले त्याचा सीरस्ता दरोबस्त आकार पो पोतदारीस वजा कलमे—

१ सरिस्ता फ्रो २

१ वसूल गल्याचे प्रा चा आकार

१ शिर्के देशमुख

१ शिवाय जमा

—

बाकी आकारावर दर रुा रेस०६। पाव आणा

१ पट्टी पेढे तालुके मजकुरी येथील अमल हबशी याजकडे होता तालुके रत्नागिरी येथील अमल आगरे याजकडे होता ते समई आगरे याणी तालुके अजणवेल येथे पट्टी बसवुन वसूल घेऊ लागले तो भाताचे दस्ता प्रौ चौथाई दस्तावर दरखडीस रुा १ प्रो रुपये घेत आले———

१ चौथाई रत्नागिरी म्हणोन नख्तबाब जमाबंदी प्रौ काही गावी घरपट्टी वण [१० याची जमाबंदी असेल त्याचे चौथाई वर रुा रेस ०२५ येक आणा प्रमाणे बसऊन वसूल घेत आले

१ पाक फोक मुशीचे पाख व घोलीचे पाख खारवी व दालदी याज पासून खरेदी घेऊन विकरी जो करील त्याज पासून कसरे बाबते———

१ कारसाई गवत वगैरे किल्याचे शाकरणी वगैरे वोगमीस व सीबंदीचे लोकास वाटावयासी कुलबी रयताकडून घ्यावयाचा ठराव करून ऐन जिनस सरकारात वसूल घेत असत ती कलमे

१ शाकर वर्तु दर कुळास सुमार

१० किल्याचे शाकरणीस

१ चुडी दरकुळास ६ प्रो किल्याचे घसतीस [२०

( पृष्ठ २० )

१ दोर गुडे दर कुळास ६ प्रमाणे बुरुजाचे दागदोजीस वगैरे

१ ओंडे दरकुलास १० प्रो पाहरेबंदीचे लोकास आगटी पेटवावयाबदल

१ मेलणी दर कुळास दर २० वीस प्रौ किल्याचे शागारणीचे चेपणास

१ किता कलमे

१ फर्मास म्हणजे तट्ये पाट्या व केरसुण्या गल्याचे दास्तानीकडे दरकुळास

१ तध्या दाहा कुळापासून पधरा कुळे पर्यंत असल्यास येक पधरा कुळावर जाजती कुळे ज्या गावी असतील त्याजपासून दोन तध्ये घ्यावयाचा सिरस्त

१ पाट्या दर कुळास येक प्रो

१ सुपे व केरसुण्या गावचा राबता माहार असेल त्याजपासून सुप व केरसुण्या येक प्रो घ्यावयाचे

---

३

१ तवसी भोपले जी करसाईची कुळे असतील त्यास दर कुळास तवसे १ व भोपला १ येक प्रो ऐन जिनस सरकारात घेऊन सिबंदीचे लोकास देत

१ ईरली पर्ज्यन काली दर कुळास येक प्रो घेऊन सिबंदीचे लोकास देत

१ कोयडी दर कुलास येक प्रो सदर खर्चा बदल ऐन जिनस सरकारात घेत

१ चाभार काम ज्या गावी चाम्हाराचे दुकान असेल त्यास दर दुकानास येक आधवड व येक बालदी प्रो अरमाराकडे घेत असत

१ दही घागर दुभत्याचा गाव

( पृष्ठ २१ )

पाहून दर गावास घागर १ प्रो ऐन जिनस गोकुलाष्टमीचे उछाहास घेत

---

६

१ रावते म्हार व रावते गुरव याची राबणुक घ्यावयाची त्याचा ठराव करून दिल्हा ते

१ रावते माहार याणी किल्या कोटाचे बोर्णीस येक महिना सरकारात खपावे आणि पाटास सरकारातून अड शेरी घ्यावी

१ रावते गुरव याणी दर आठवडे यास पान भारा येक प्रो सुभास आणून घ्यावा आणि पोटास सरकारातून घ्यावे

---

१ पावणे दर्यावर्दी खारवी व दालदी यास आठ आसामीस येक पावणा या प्रमाणे आरमाराकडे आठमाही खपावयास आठ आसामीचे ऐवजी आणावयाचे त्यास दरमाहा अडशेरी दीडमण ०१॥ प्रमाणे व मीठ मिर्च्या बदल च्यार आणे प्रमाणे घ्यावयाचा सिरस्ता होता

१ वणचराई म्हणजे घाटीचे वरघाटी बैल गावगंना पर्जनकाली चारणीस येतात त्याजपासून बैलाची पाहाणी करून दर बैलास रु ॥ अर्ध रुपया प्रो सिरस्ता

१ भेरली माड जंगलात असतात ते बाधून त्याची माडी माहार लोक काढीतात त्यास दस्त दर माडास ।५० च्यार आणे चवल प्रो———

१ कातकरी गावडे गावगना ज्या गावी खेराचे रान असेल त्या गावचे खोतास रानाचे येवजी काही पैका द्यावयास करून खैर तोडून कात पिकवावा त्य बदल गावगना दुकाने घालितात ते येका च गावी राहात नाही सबब त्यास घरपट्टी पाल देऊन दुकानावर जसे चुलणास केटे असतील त्याप्रो दर केट्या अर्ध रुाप्रो आकार होईल तो घ्यावयाचा सिरस्ता

( पृष्ठ २२ )

चंद बेवीस

कारकीर्द पेशव्ये बालाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब व सदासिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब पेशव्ये याणी पुणियाहून रामाजी माहादेव बिवलकर यास पाठउन अजणवेल आगरे याजपासून घेतली ते सन सीत खमसेन मया अलफ शके १६७७ युव नाम संवत्छरे तागाईत सन समान अशर मया तेन व अलफ १७३९ इश्वर नाम संवत्छरे पर्यंत साले ६३ या साल'त तालुके मजकुरी सुभे जाहाले ते

१ काण्होजी गिजे सन सीत खमसेन शके १६७७

४ चिमाजी माणकर सत संबा खमसेन तागायत सन सितैन शके १६८१ येकूण साले च्यार

१ गणेश कृष्ण कोलटकर सन इहिदे सितेन शके १६८२

२ चिमाजी माणकर सन ईसने सलास तिसेन शके १६८३ व शके १६८४ येकूण साले दोन

१६ कृष्णाजी विश्वनाथ बर्वे ईा सन आर्बा सितेन शके १६८५ ताा सन तिसा सबेन शके १७००

१३ त्रिबक कृष्ण बर्वे कृष्णाजी विश्वनाथ बर्वे याचे पुत्र इाा सन समानीन शके १७०१ ताो सन ईसने तिसैन शके १७१३ येाा साले तेरा

५ रघुनाथ त्र्यंबक बर्वे त्रिबक कृष्ण याचे पुत्र इाा सन सलास तिसेन शके १७१४ ताो सन सबा तिसेन शके १७१८ येकूण साले प.च

१ बालकृष्णा बापूजी लेले सन समान तिसैन शके १७१९

१ रघुनाथ त्रिबक बर्वे सन तिसा तिसैन शके १७२०

१ बालकृष्ण बापुजी लेले सन मया तेन शके १७२१

३ रघुनाथ त्रिबक बर्वे ईस्तकबील सन इहिदे मया तेन ताा सन सलास मया तेन व अलफ शके १७२४

( पृष्ठ २३ )

१ हरी रघुनाथ भागवत सन आर्बा मया तेन व परशराम रामचद्र घोटगे याजकडे किले बहिरवगड व सावर्डे माहाल पो गाव ४५ पच्चेचालिस होते शके १७२५ विठोजी गायकवाड सन खमस मया तेन कारभारी भिकाजी बलाल भावे

२ विठल विश्वनाथ पटवर्धन सन सीत व सन सबा शके १७२८

१ परशराम केशव वोक सन समान मया तेन व अलफ शके १७२९

२ नारो गोविंद आवटी सन तिसा मया तेन व सन अशर मया तेन व अलफ शके १७३१ साले दोन कारभारी दिनकर सखाराम गोडबोले व माहादाजीपंत कानडे

१ गगाधर बालकृष्ण मराठे कारभारी खडो रघुनाथ पटवेकर सन ईहिदे अशर मया तेन शके १७३२

२ येसाजी पवार सन ईसने अशर मया तेन व सन सलास अशर मया तेन कारभारी लक्ष्मण बलाल करंदीकर व केसो कृष्ण टिलक योा साले दोन शके १७३४

१ जनार्दन नारायण देशपाडे सन अर्बा अशर कारभारी विष्णु आपाजी टिलक शके १७३५ साले १

४ रामचद्र माहादेव नगरकर ईा सन खमस अशर शके १७३६ तागाईत सन समान अशर शके १७३९ येकूण साले च्यार या सालात मशारनिल्हे नगरकर याचे तर्फेने कारभारी

१ पाडुरग लक्ष्मण केलकर
२ बलवंतराव दात्ये याजकडून सदाशिव शंकर अभयंकर
१ पाडुरंगपंत लिमये व त्रिबकपंत उद्गर
—
४
—

६३ ( पृ. २४ )

सदरहू पेशव्ये कारकीर्दीत मामलेदार जाहाले त्याणी नवीन कानु केल्या त्या बितपसील————————

१ कृष्णाजी विश्वनाथ बर्वे मामलेदार याचे कारभारी आबाजी बलाल याणी कानू केल्या त्या

१ जिराइती वरकस जमिनीस काटीची मोजणी नवती आनाजी दत्तो याणी पेशजी माहाराज याचे कारकीर्दीत जमाबंदी केली त्या वेळेस मजर-

मान्याने बिघ्याचा अजमास पाहून धारा बसविला होता त्याच सिरस्त्याप्रो दर बिघा धारा देऊन जमिनीस काटी टाकिली ते पच्चवीस काठ्या लांबी व पच्चवीस काट्या रुंदी येकूण बिघा येक प्रो वजा जमिनीतील जी दगडधोडा व झाडझाडोरा व खडकील खराब कातळवट वजा देऊन बाकी जमीन राहील त्यात सवाई सूट देऊन बाकी जमिनीस अनाजी दत्तो याचे सिरस्त्याप्रो धारा ठराविला

१ ऐन जिनस गला व वजन सुपारी जिनस याचा वसूल सिरस्ता आगरे याचे कारकीर्दीत ऐन जिनस सरकारात वसूल घेत असत पुढे ऐन जिनसाचा खर्च सरकारात कमी जाहाल्यामुळे रयतेस दर ठराऊन देऊन नख्ताचा वसूल घेऊ लागले

१ गला ऐन दस्त जमाबंदीपैकी दरखंडीस ।० पाच मण प्रो मुाची किमत घेऊ लागले त्यास हाली सिरस्ता मुाप्रो पाच मण म्हणोन हिशेबी लागते त्यास

दर खंडीस रुपये
१७ भात
१५ नागली
१२ वरिया

( पृ. २५ गहाळ )

( पृ. २६ )

रचार खर्चाची वाटणी बसविली त्याप्रो काही नख्त कमी करून त्याचे ऐवजी दर गावास दररुा भात केली ०२ दोन मण प्रा भाताचे गाव पाहून ठराविले त्या गावापासून ऐन जिनस भात वसूल घेत

१ मीठ पटी म्हणोन शेरी मिठागर कसबे चिपळूण येथे आहे त्यातील उत्पनाचे मीठ पैदा होईल ते पेशजी किल्याचे खर्चाकडे खर्च होत असे ते मना करून ते मीठ गावगना रयतास दर रुपया केली ०३ तीन मण प्रो घ्यावयाचा सिरस्ता ठराऊन पटी बसविली

१ वसूल गला ऐन जिनस पेशजापासून कोटीस वसूल घ्यावयाचा सिरस्ता होता तो मुाा होत नसे परंतु फड के बर्वे याचे कारभारी याणी सरकारातून बेहेडा ठराविला त्यास ऐन जिनस गला वसूल होऊन काही गावगना गेल्याची बाकी राहिल्यास बेहेड्याचे दराप्रो नख्त घेत ते दर ख-

डोंस रुपये

| | |
|---|---|
| २० भात | १६ नागली |
| १३।३२ वरिया | ४० तील काले |
| ५० तील गोड | ४० उडीद |
| ४० तुरी व मुग | ४० तील साले |
| ३० कुलिथ व कडवे | ४० पावटे |
| | ३० चवली |

१ नख्त कौलि म्हणोन नारळ व सुपारी याचा पेशजी पासून ऐन जिनसी दस्त आहे परतू उत्पन थोड आणि दस्त फार याजकरिता हुजूर बर्वे मा

( पृष्ठ २७ )

१८] मलेदार याणी विनंती करून जो कीर्द बागाईत जमावणी करील त्यास निख्ती सिरस्त्याचा कौल देऊन जमोवणी करावी आणि दर झाडास बाचती सुधा दर ।• च्यार आणे व झाप १ येक व सुपारी काडास नख्त बाचती सुधा येक आणा प्रमाणे ठराऊन कौल दऊ लागले कौल भरल्यानंतर सदरहू सिरस्त्या प्रो कलम जमेस धरिले

१ झाड दस्त पेठ अजणवेल व गोवलकोट येथे फणसाची झाडे आहेत त्याची दरसाल पाहाणी करून ज्याचे निसबतीस झाड असेल त्याजपासून झाडावरील उत्पना पाहून दर झाडास येक आणा पासून च्यार आणे प्रो घ्यावे दस्तास जमा धरावी तर झाडे

२०] यकाचेच निसबतीस असत नाही सबब दस्तास जमा धरीत नाही

१ किरिस्ताव लोक हे ज्याज्या गावी दगडाचे इमारतीचे काम कोणी कारखाना करवील तेथे येऊन काम करू व या बदल कावणे घालून राहतात त्याजवर दर कावणास बाद सरदार येक व मस्ते येक व भात करणारा पोर्गा यक येकूण तीन असामी बाद दर कावणास देऊन बाकी कामकरी आसामी असतील ते मोजून दर डोईस रुपया येक प्रमाणे सरकात घेत होते हाली कुपिनी सरकारचे अमलात सन ईशरीनचे सालापासून माफ जाहाला आहे

१ कारकीर्द त्रिबक रुष्ण बर्वे——

कोरसाई पेशजी येन जिनस पेशजी पासोन कुळा जव——

( पृष्ठ २८ )

३०] —ळून वसूल सरकारात घेत असत त्याचे नख्त. बर्वे मामलदार याचे कारभारी व्यंकाजी राम देवधर याणी दर कळास ठराव करून दिल्हा ती ईसमे

| शाकरवडी | चुडी | दोरगुडे | वाडे | पोलणा |
|---|---|---|---|---|
| १० | ६ | ६ | १० | २० |

सदरहू सूरकारसाईची किंमत दर कुळास रुा २ दोन प्रो वसूल घेत पुढे सन खमस अशरात श्रीमंत बाजीराव साहेब पेशव्ये याची स्वारी गुहागरचे मुकामी आली ते समई गावगनाची कुलबी रयत उभे राहून अर्ज केला की सदरहू कारसाईची किंमत रुा दोन द्याव- यासी जबर पडते सबब पेशजी प्रो कारसाइचा वसूल ऐन जिनस सरकारात घ्यावा म्हणोन त्याजवरून रामचंद्र माहादेव मामलेदार याचे कारभारी पाडुरंग लक्ष्मण केलकर यास ताकीद करून सदरहू कारसाईचा ऐवजी दर कुळास रुा १॥ दीढ प्रो घ्यावा म्हणोन चितो वामन देशमुख याणी ठराव करून दिल्हा त्याप्रमाणे हाली वसूल चालत आहे

१ कारकीर्द रघुनाथ त्रिबक बर्वे मामलेदार

१ वेढे दाम म्हणजे पार्टीचे बैल सरकार दरतास लागतात त्यास बैल- दार म्हणतात ते वजा करून जाजती बैल छपउन ठेवितात त्याची दर साल पाहाणी करून जे बैल सांपडतील त्यास दर बैलास येक रुपया व अर्ध रुपया प्रमाणे बैल पाहून सरकारात वसूल घेत येकाद्दे साली मक्ता हरकोण्यास ठराउन देत

१ वेडे हडे व धावटीची फुले बदरानिहाय रयत लोक आणोन विकतात त्याजवर हासील जो विकत घेईल त्याजपासून दर हजारी वेड्यास ।- च्यार आणे बसविले

(पृष्ठ २९)

१ तकवियत कौली गावगना भात जमीन जो बारत्तीचे कौल खोतानी घेतले परतु तकवियत कौलास सालाबादी लावावयाचा सिरस्ता नाही कौलाअनुवर्ये जमीन तयार जाहाली म्हणजे सरकारात येऊन समजून माफी ईस्तावयाचा कौल घ्यावा ते कोणी घेतला नाही सबब तकवियत कौलीचा सोलाचा अजमास पाहून मोघम वसूल नख्त घेऊ लागले

१ सीमेची राने हरदुगावच्ये कजियामुळे अमानत पडतात त्यात सरकारातून लागवड करऊन त्यातील उत्पना पो राजभाग गावचे दस्ताखेरीज घेऊ लागले

१ चड तालुके मजकूरचे जमाबंदी वरचड साधावा म्हणोन हुजूरची आज्ञा घेऊन गावगंनाची जमाबंदी करावी तर भारी पडते सबब खोत समजूतीने गावगंना नख्तीची वाटणी केली ते मामलेदार दाजी विश्वनाथ व त्रिबक कृष्ण व रघुनाथ त्रिबक बर्वे यकूण तीन मालेदार याणी आपआपलाले वहिवा टीन तीन वेळा चडाची वाटणी बसविली

१ कारकीर्द नारो गोविंद आवटी कारभारी दिनकर सखाराम गोडबोले

१ कोनकरादेव आबोसी कारसाईचे कुळावर नवीन बसऊन दर कुळास अर्ध आणा प्रो बसविला———

१ दरकदार कारकुनी म्हणजे फडणीस व जमिनीस यास कामकाजा

१०] निमित्य खोत गावगनाचे गाव पाहून अर्ध रुपया पासून येंक हा पर्यंत देत असत ते सरकारात जमेस धरून गावाकडून मनश्वी जसा वसूल पडेल तसा घेऊ लागले

१ किता श्रीधर्मादाय हे कलम मशारनिल्हे आवटी ++ सालांत हनुमंताचे देवाल्य बा + + + + + + + + + + + + + + + +

* * * * *

॥ श्री ॥

१ अजनवेल तालुक्याच्या वहिवाटीची वर जोडलेली महत्वाची हकीकत रा. गोपाळराव जोगळेकर ( कृष्णछाप कृष्णंभट्टी तपकीरीचें दुकान–पुणें ) यांजकडून मिळाली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

२ सदर कागदांतील विविधप्रकारची माहिती जरी बऱ्याच जुन्या काळापासूनची आहे, तरी ती अलीकडे म्हणजे १८२४ इ. स, नांत नक्कलली गेली असून त्याच सुमारास लिहिली गेली आहे हें आंतील मजकुरावरून ध्यानांत येईला

३ हकीगतीचे बंद ३० असावयास पाहिजेत परंतु २५ व ३० हे दोन बंद गहाळ झाले आहेत बाकीचे क्वचित् कोठें फाटले आहेत. हे हकीगतीचे बंद राजश्री चिंतो गोविंद वैशंपायन रा।। पालसेत यांजकडे मिळाले.

४ भाषा अर्वाचीन आहे.

फाल्गुन व० ३०।१८३५ दत्तो वामन पोतदार

## ८६ आंगरे यांचे महजर व इतर कागदपत्र

**लेखांक १** श्री नकल

### फारसी मजकूर

२०]शके १२५५ श्रीमुखनाम सवछरे कार्तिक सुध्ध १ प्रतीपदा ते दिवसी हजर मज्यालस बैसोन महजर केला तेथे मज्यालसवार मोखतेरवर चि हुजुर बि तपसील:–

खान आजम एकलासखान बिनी



खान आजम दिलावरखान बिनी हुजराती



खान आजम बिजली सर्जाखान



खान आजम मुस्तबाखान वजिरानी नांवर्चा मोहर आसे

खान आजम दिलावरखान वजि-

खान आजम फरादखान वजिराची मोहर आसे

खान आजम फरादखान वजिरानी मोहर आसे

खान आजम आमीनखान वजि· रानी मोहर


खान आजम महमदखान वजिरानी नांवची मोहर

खान आजम सेरखान वजिरानी नांवची मोहर


खान आजम कैकखान सिलेदार



खान आजम आलावलखान सिलेदार



खान आजम सरकसखान सिलेदार



खान आजम आहमहमदखान सिले- दार



खान आजम आसनखान सिलेदार



रानी नांवची मोहर आसे

खान आजम सेदखान वजिरानी नांवची मोहर

खान आजम सुज्यायेतखान वजि- रानी नांवची मोहर


खान आजम जमालखान वजिरानी मोहर नावची आसे

खान आजम आभराखान वजिरानी नांवची मोहर

खान आजम सैद महमंद सिलेदार [१०



खान आजम जाहागीरखान सिलेदार




खान आजम ताजखान सिलेदार



खान आजम नासरखान सिलेदार




खान आजम हैबासखान सिलेदार




खान आजम मसुदखान सिलेदार



खान आजम सिताबखान सिलेदार



रेऊजी नाईकवाडी हावाला कोठी




दादु नाईकवाडी हवाला जामदारखाना



बाळोजी नाईकवाडी हवाला म्यान-बाक



गोमाजी नाईकवाडी हवाला आफदागर



नाग राऊत कनोजा नाईकवाडी हवाला आहीर



उडाण सिदनाईकवाडी तुलवे

जानोजी नाईकवाडी हवाला बाक




सिवजी नाईकवाडी हवाला दफ्तरदार




कालोजी नाईकवाडी हवाला आफराद




जाखोजी नाईकवाडी हवाला पावेगा



भाई आहमद मोकदम सुरस नाबद



बान राऊत नाईकवाडी हवाल लष्करी



दादजी नाईकवाडी हवाला पीलखाना

१०]हे समस्त मुख्य करून सद्रहु मज्यालस हाजूर चिमाजी बिन गोमाजी कडु यासी महजर करून दिधला ऐसा जे तुझे बाबे दादजी बिन रेवजी हांडे सरदेश-मुख प्रां जुंनर येही आर्ज केला की आपण नानदार दरवेसी चाकर कदीम आहो

ऐसीयांसी सांयाजी मजकुराची देशमुखी चाकणची आहे तरफ प्रा मजकुराखाले वोढत आहे नफर मजकूर आपलिया कबिलियांतील आहे म्हणऊन यांचे साभाळी आपले देशमुखीपैकी यांसी दिल्ही आहे तरी हाजुरून ही सनद नफर मजकुरास सादर जालिया सरफराज होऊन म्हणून आर्ज केला बराए आर्ज खातरेस आणून तुझे कदिमीवर नजर देऊन आणि हुजूर मेहनत केली त्याजवरून प्रो चाकण देहा ८४ एथील दरोबस्त देशमुखी दिधली आसे खुसे लेकराचे लेकरी आवलादी व अफलादी पिढी दरपिढी मिरास खाणे तुम्हास हकआदा व काळी पांढरी स्थावर जंगम विन मख्ता होन ५०१ पाचसे एक करून दिधले आहेत रकमा मवामोजीब दामाशाई प्रो गावगंना सालिना घेत जाणे व तूप दर गावास मापी सेर ८८७ सात सेर घेत जाणे यासिवाय बिज वानवळा व वरोवा दसरीयाचा बकरा शेल बैल वगैरे कितीक हक जो महदम चालत आला आहे त्याप्रमाणे घेत जाणे या खेरीज प्रगणे मजकुरी हेहीनामगी सरायनी चावर २५ पंचवीस नालतनामी याजसी दिधला आहे कीर्द करून लेकराचे लेकरी खात जाणे इनाम सलामी तुम्हांस माफ केली आसे सरदहू इनामास सरकारचा तालुका नाही प्रगणे मजकुरी गोत पत निःपुत्रीक वगैरे महसुल फर फुरोई सायेर जे बेरीज जमा होईल त्यास हंक सदपच घेत जाणे व जे प्रगणे मजकुरी उभे मारगे येतील त्यास दर नगी रुके ८२ प्रो घेऊन मार्गाची रखवाली करीत जाणे व जे गावी घोडीयाच्या पसा आसतील तेथे सालिना एक सिंगरू घेत जाणे व हराकरापासून त्यांचे वोहदीयामाफीक कामकाज घेत जाणे हाजूर याल तेव्हा जो खर्च लागेल विलातीमध्य पट्टी करून घेणे एणेप्रमाणे प्रो मजकुरी हक करून दिधला आसे तो घेऊन प्रा मारची आबादानी करून वतन पुस्त दरपुस्त आजांनी करणे मानपान टिळा विडा नांव नांगर सेव सवाजी मिरासीची सेते मळे विहिरी व प्रगणे मजकुरी मोकदमीचे गाव असतील ते वगैरे हक जो महमद चालत आला आहे तो घेऊन सरकारच्या कामांत माकऐद राबणे किफायेक सरकार व टफायेत रेया ऐसे वर्तत जाणे हा महजर लिहिला सही बिा रामाजी जेनार्दन सबनीस हुजराती बादनी छ २९ जमादिलाखर मोर्तब आसे

---

## लेखांक २

शके १६४६, चैत्र वद्य ८.

महजरनामा शके १६४६ क्रोधीनाम सवछरे चैत्र वद्य ८ आष्टमी वार आदितवार व तारीख छ २१ माहे रजब बहुजूर हाजर मजलिस हाकीम शेरा व तोरा व देशमुख व देशपांडिये व गोत मोकदमानी देहाये प्रगणे चाकण व बाजे प्रगणात सरकार जुनर वगैरे सुभे खुजस्तेबुनियाद उरुफ दक्षण सुहूर सन आर्बा आशेन्हीन

मया व अलफ सर्न हजार ११३३ सबब आकि तायाजी बिन खंडोजी व कृष्णाजी बिन गोदजी व सुलतानजी बिन नागोजी व भानजी बिन मालजी कडू चव्हान मोकदम कसबे चाकण व देशमुख प्रगणे मजकूर यांसी महजर करून दिधला ऐसा जे तुम्हामधून तायाजी बिन खंडोजी व कृष्णाजी बिन गोदजी कडू मोकदम कसबे मजकूर व देशमुख प्रगणे मजकूर यानी कसबे खेड सरकार जुनर येथील मुकामी व मज्यालसीस येऊन आपली हाकीकती जाहीर केली की कसबे चाकण येथील मोकदमी व प्रगणे मजकुरची देशमुखी हे दोन्ही वतने पुरातन आपली वडील वडीली आनुभवीत असता पूर्वी चाकणेच्या कोटात हाकीम होता त्यांत व आपल्या वडिलांत बरकशी पडोन बेबनाव होऊन बाहेर पडिले मागे येसाजी वलद संताजी व सिवजी वलद विठोजी कडू यांचे वडील गुमास्ते होते ते वतनाचा कारभारी करीत असता बहुता दिवसा आपले वडील वतनावरी आले तो येसाजी व सिवजी कडू कदम यांचे वडील रुजू न होता जोरावरीने वतनाचा उपभोग करू लागले तधीपासून आपले वडील कलह करीत असता हाजरत बादशांहा यांचा मुकाम कसबे खेड सरकार जुनर या जागा होता तेथे हाजरतीने गोतमुखे निवाडा करावयाबदल खान आजम अमानुलाखान किलेदार किले मोमिनाबाद उर्फ चाकण व फौजदार प्रगणे मजकूर यांसी हुकूम फर्माविला त्यावरून खान आजम अमानुलाखान याही कसबे मजकुरी गोतमुखे बरहाक इनसाफ करिता आपले वडील खरे जाले येसाजी वलद संताजी व सिवजी वलद विठोजी कडू कदम मुदई खोटे जाले ते रद करून आपल्या वडिलास महजर करून देऊन आमल दुमाले केला त्यावरी आपले वडील खंडोजी कडू व भानजी कडू फरमानाबदल बादशाही लस्करास जाऊन आदालतीस उभे राहिले हाजरत बादशाहाजीने हाकीकत खातरेस आणून फरमानाच्या हुकूम केला तो बादशाहा यांची मोहीम वागनगिरीयावरी जाली आपले वडील लस्करात होते दिवाण आसदखान यांसी आपली हकीकत जाहीर करून दिवाणी परवानिग्राचा हुकूम घेतला फरमान व परवाना तयार होऊन हातास यावें त्यांसी दरबार खर्चास पैके पाहिजेत याकरिता खंडोजी कडू व भानजी कडू बादशाही लस्करामधून येऊन कान्होजी बिन तुकोजी आंगरे यांजकडे जाऊन त्यांसी दोन्ही वतनाची तिसरी तकसीम रुपये १७५०० साडे सतरा हजार रुपयासी विकत देऊन पैके घेऊन बादशाही लस्करास गेले दिवाण आसतखान यांचा परवाना हातास आला फरमान तयार जाला मोहोर होऊन हातास यावा तो हजरत बादशाहा हक जाले त्यावरी खंडोजी कडू वतनावरी येऊन कितेका दिवसा मरोन गेले मागे त्यांचे वडील पुत्र मज तायाजीचा वडील भाऊ गोमाजी बिन खंडोजी कडू व त्यांचे पुतने मजकृष्णाजीचा बाप गोदजी कडू वतन अनुभवीत असता आजम आलीखान अवरंगाबादेस होते त्यांचा परवाना आणिला

मुदई यांसी हाती धरून गोतामध्य उभे राहा ह्मणत असता गोतामध्य उभे न राहिले मध्य कितेक दिवस गेले नातवानीच्या प्रसंगाकरिता आपले वडील गोमाजी व गोंदजी कडू यानी खर्चवेचाबद्दल यांजजवळुनी नियेताहुनी ज्याजती रुपये ४२५०० ' मोकरा साडे बेतालीस हजार रुपये घेऊन खर्च केला वतनी आमल चालवीत असता आजम आलीखान व नबाब किलिचखान निजाममनमुलुक बहादूर यांचा जंग होऊन आवरंगाबादेस निजाममनमुलुक यांचा आंमल जाला त्यापासून शहामंत अवाली पुन्हा अबदूल रसूलखान यांसी किलेदारी व फौजदारी मोकरार होऊन प्रगणे मजकुरास आले सैद माखनखान किलेदार व फौजदार होते तगीर जाले यांची तगिरी व त्यांची बाहाली मध्य मुदियानी कजिया केला याकरिता सुबे औरंगाबादेस जाऊन हकीकत जाहीर करून दिवाणी परवाना' आणावयाबदल आपले वडील गोमाजी व गोंदजी कडू टका पैका व वतनी कागद घेऊन स्वार होऊन येऊन कसबे खेड सरकार जुनंर या गावी देऊ पाटील यांच्या वाडियात राहिले पुढे जावे तो मुदई रामाजी कडू व शिवजी कडू बादा बिरादरी व खुद जामियेतिनसी छ ५ माहे जमादिलावल सु ॥ इहिदे आशेरीण मया व आलफ या तारिखेस रात्री येऊन डांक घालून दोघा जणास जिवे मारिले कितेक टका पैका व अमानुलाखान यांचे कारकीर्दीस गोतमुखे निवाडा होऊन महजर जाला होता तो व दिवाण असदखान यांचा परवाना व आणखी कितेक वतनी कागदपत्र होते ते मुदई यांचे हाती लागले यांचे व मुदई यानी मारे केले त्याचे सुरतनामे आहेत व खान अजम अबदूल रसूल खान किलेदार किले चाकण यांही दोन्ही खुन मुदयांवरी शाबूद करून त्यांचे सिरी गुण्हेगारी ठेऊन त्यांची कबुलियेत लेहोन घेतली तोही कागद आहे ऐवजने आपली खराबी जाली हे हकीकत आपले वतनभाऊ कान्होजी आंगरे यांसी सांगोन पुढे दिवाणात हयाल व्हाव याचा विचार करावा व या बदल आपले वडील शहाजी कडू व सुलतानजी कडू व भामजी कडू कुलाबियास जाऊन कान्होजी आंगरे यांसी वर्तमान सांगितले ते समई त्यानी मजकूर केला की तुमच्या दोन्ही वतनाची तिजाई तक्षीम तुमच्या वडिलानी आपणास रुपये १७५०० साडे सत्रा हजारास देऊन पैके नेले त्या आलीकडेही गोमाजी कडू व गोंदजी कडू यानी रुपये ४२५०० साडे बेतालीस हजार नेले या उपरी पुढे ही खर्चवेच लागेल मयलग टका होतो याची वाट काय तेव्हा आपले वडील शहाजी कडू व सुलतानजी कडू व भानजी कडू यानी आतमसंतोषे कान्होजी आंगरे यांसी पत्र लेहोन दिधले की या मा तुमचा टका साडे सत्रा हजार रुपये या खेरीज नेऊन खर्च केला व पुढे काये होईल तो खर्च करून वतनाचे कागदपत्र करून घ्यावें दोन्ही वतने तुह्मास दिधली तुह्मी होऊंन येकापासून

पांच दाहा गाव जे द्याल तितकियाचा उपभोग करून म्हणवून पत्र लेहोन दिधले त्यावरी आपले[illegible]ील शाहाजी कडू मृत्य पावले सुलतानजी कडू व भानजी कडू यानी कान्होजी आंगरे यांची निशा केली आनी हे व ते बरबरी किले सातारियाचे मुकामी माहाराज राजश्री स्वामी यांसनीध जाऊन हायाल जाले यावरी खासा महाराज मज्यालसीस बसोन सरकारकून व पंडित व सरदार व भले लोक वतनदार यांसमक्ष हाकीकती मनास आणून धर्मता इनसाफ केला की मुदईयानी मारे केले ते खोटे गुण्हेगार आहेत सुलतानजी बिन नागोजी व भानजी बिन मालजी कडू हे वतनंदार खरे यांसी वतनाचे कागदपत्र करून द्यावें परंतु यांही आपली दोन्ही वतनें कान्होजी आंगरें यांसी लेहून दिधली आहेत याचा विचार त्यांचे समाधानें करावा लागतो तेव्हा येविषयीची पृछ्या कान्होजी आंगरे यांसी केली तिही आर्ज केला की आपला टकापैका या वतनप्रसंगास मबलग खर्च जाला पुढेही खर्च होईल दोन्ही वतने आपणास लेहून दिधली आहेत तथापि आपण माहाराजाचा हुकूम बारदार जो हुकूम होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून म्हणवून त्यावरून माहाराज राजश्री श्वामी धर्मपरायेण कृपाळु होऊन समस्त मज्यालसीचे विचारे करून कसबे मजकूरची मोकदमी व प्रगणे मजकूरची देशमुखी या दोन्ही वतनाचे दोन विभाग बराबरी करून येक विभाग आपणास व येक विभाग कान्होजी आंगरे यांसी देऊन पत्रे करून दिधली ते पत्रे आपण व कान्होजी आंगरे यांनी खुशरजांवदीनें घेऊन त्याप्रमाणे हरदोजण निमे निम वतनाचा उपभोग करीत आंहो ऐसीयासी तुम्ही हाकीम व गोत गंगाधर्मपरायेण आंह्मा आपली जाली हाकीकती जाहीर करावयाकरिता आपण व कान्होजी आंगरे मोकदम कसबे मजकूर व देशमुख प्रगणे मजकूर यांचे पुत्र सेखोजी आंगरे व संभाजी आंगरे आलो आंहो आपणाजवळी कागदपत्र आहेत ते मनास आणून भोगवटी यांसी महजर करून दिधला पाहिजे म्हणवून वर्तमान सांगितले आणि तुम्ही व सेखोजी आंगरे व संभाजी आंगरे मोकदम कसबे चाकण व देशमुख प्रा मजकूर यांनीं कागद पत्र आणवून पुढें ठेविले बि॥ल

तुम्हाजवळील कागदपत्र

| | |
|---|---|
| बेदरीच्या पातशाहा चा परवाना येक | कसबे चाकण व प्रगणे मजकूरच्या वतनदारांचे समापत्र |
| १ | १ |
| आलम आलीखान याचा परवाना येक | मुदई यानी खुनाची गुण्हेगारी ह॥१२००० बारा हजार कबूल करून आजम आबदूल रसूलखान किलेदार व फोजदार |
| १ | |

मुदई यानी मारे केले
त्याचे सुरतनामे ३

१ का। खेडचा
१ जुनरचा
१ का। चाकणचा
—
३

माहाराज राजश्री
स्वामीचे आज्ञापत्र
१

कसबे चाकण यांसी खत लेहून दिधले
आहे ते पत्र
१

लंग
०

सेखोजी आंगरे व संभाजी आंगरे यांजवळील पत्रें

कसबे चाकण प्रा। मजकूरच्या
वतनदाराचे शाहिदीपत्र
१

देशपांडिये व सेटे वगैरे
वतनदार कसबे चाकण
प्रगणे मजकूर ईहीं पत्र
लेहून दिधले आहे ते पत्र
१

माहाराज राजश्री स्वामीचे
आज्ञापत्र

दोन्ही वतनाचे तिसरे तक्षि-
मेचे विकरीतपत्र
१

शाहाजी कडू वलद खंडोजी
कडू व सुलतानजी कडू व भा-
नजी कडू यानी दोन्ही वतने
लेहून दिधली आहेत ते पत्र
१

लंग
०

येणेप्रमाणें पत्रे मनास आणिता बेदरीच्या पातशाहाचा फरमान कसबे चाकणची मोकदमी व प्रगणे मजकरची देशमुखी या दोन्ही वतनाचा तुम्हाजवळी आहे त्यावरून तुम्ही चव्हाण कडू वतनदार पुरातन खरे आहा कदम कडू मुदईगिरी करितात ते खोटे आहेत समापत्र कसबे मजकरची रयती व प्रगणे मजकूरचे मोकदम यांचे आहेत ते पाहाता तुम्ही कसबे चाकणचे मोकदम व प्रगणे मजकूरचे देशमुख पुरातन आहां तुम्ही दिवाणात इनसाफ करून घ्यावयासी उभे राहाणे आपण तुमची शाही देऊ म्हणवून शफतपूर्वक लेहून दिधले आहे त्यावरून तुम्ही खरे मुदई खोटे तुमचे मारे मुदईयानी केले त्याचे सुरतनामे शरियेतपन्हा काजी व हकीम याचे मोहरनसी व देशमुख व देशपांडिये व मोकदम व हामेशाही वतनदाराचे शाहीदिणसी ३ तीन किते आहेत ते पाहाता सैद माखन किलेदार किले चाकण

व फौजदार प्रगणे मजकूर माजूल त्याच्या आमंलात मुदई यानी कजिया केला याकरिता गोमाजी वलद खंडोजी व गोंदजी वलद नागोजी कडू मोकदम कसबे चाकण व देशमुख प्रगणे मजकूर दिवाणी परवानियाबदल आवरंगाबादेस जावयासाठीं टका पैसा व वतनीं कागद घेऊन स्वार होऊन कसबे खेड सरकार जुंनर या गावी येऊन देव पाटील कसबे मजकूर याचे वाडियात राहिले असता छ ५ माहे जमादिलावल सुहूर सन इहिदे आशेरीण मया व आलफ या दिवसी रामाजी व सिवजी कडू कदम मुदई यांनी बिरादरी व खुद जमियेतीनसी दोनप्रहर रात्रीच्या आमलात येऊन देव पाटील याच्या वाडियात सिरोन गोमाजी व गोदजी कडू निजेले आसता तरवारेचे वार केले गोमाजीवरी आकरा जखमा जाल्या याचे चाकर ३ तिथे जखमी जाले वतनीकागदपत्र व टका पैका बिशादी होती ती लुटून गोदजीस दस्त करून मौजे चांडोली ता। खेड या गावीच्या सिवारात नेऊन जिवे मारून मुदई मुर्दा टाकून गेले गोमाजी जखमी होता त्यासी दुसरे दिवसी खेडच्या लोकानीं उचलून चाकणेस खान आजम आबदूल रसूलखान किलेदार किले चाकण व फौजदार प्रगणे मजकूर याजवळ नेले जेर होता चौथे दिवसी गोमाजी मयेत जाला हे हाकीकत बयाजवार सुरत नामियात लिहिली आहे व आम्हास हे वर्तमान बिलकुल दखल आहे तुमचे मारे मुदई यानी केले हे खरे दुसरीयाचा दाखला खान आजम अबदुल रसूलखान किलेदार किले चाकण व फौजदार प्रगणे मजकूर यांही मुदई यांच्या माथा मारीयाचा गुन्हा शाबूत करून गुण्हेगारी रुपये १२००० बारा हजार रुपये ठेऊन कबुलीयेत लेहून घेतले ते पाहाता रामाजी व लिंबाजी कडू मुदई यानी लेहोन दिधले की गोमाजी व गोंदजी कडू यांसी आपण मारिले खरे गुण्हेगारी बारा हजार रुपये कबूल केले ऐसे लेहून वसुलास मुदती लिहिल्या आहेत ते खरे व आमानुलाखान यानी पेशजी गोतमुखे निवाडा करून महजर दिधला होता तो व दिवाणी आसदखान यांचा परवाना होता तो व आनीक तीन कागदपत्र व टका पसा बिशाती गोमाजी व गोदजी कडू मारिले गेले ते वख्ती मुदई यानी लुटून नेली म्हणवून तुम्ही जाहीर केले याची तहकिकात करून मनास आणिता आमानुलाखान याचे कारकीर्दीचे दाखले कागदीपत्री आहेत व ते मज्यालसीस कसबे चाकण प्रगणे मजकूरचे व बाजे हामेशाही वंतदार होते त्यापैकी हाली हजीर मज्यालसीस कितेक आहेत त्यांही यांची शाहीदी दिधली महजर होता तो गेला हे खरे दिवान असदखान याच्या परवानीयाचा दाखला तरी त्या परवानीयाप्रमाणे कसबे चाकणची मोकदमी व प्रगणे मजकुरची देशमुखी तुमची कदीम वतने आहेत पुस्त दर पुस्त खात जाणे म्हणऊन आजम आलीखान याचा परवाना तुह्मांजवळी आहे यावरून आसदखान दिवाण याचा परवाना कितेकास दखल होता त्यानी हजीर मज्यालसीस

जाहीर केले यावरून दिवाण आसदखान याचा परवाना होता तो गेला हे खरे व बिशाती व कागदपत्र मुदई यानी मारे केले ते समयी त्यांहीं लुटून नेले ह्मणऊन सुरतनामियांत लिहिले आहे यावरून तुह्मी जबानी हाकीकत जाहीर केली से सरी जाली व आपले वडील मुदईयांसी गोतात यां ह्मणऊन ह्मणत असता ते गोतात न आले ह्मणऊन तुह्मी जबानी सांगितले आहे याची गोष्ठी हजर मज्यालसीस गुजरली वरकड सेखोजी आंगरे यांजवळील पत्रे कसबे चाकण व प्रगणे मजकूरच्या वतनदारानी शाहिदीपत्रे लेहोन दिधले ते व विकरीत व देशपांडिये व सेटीये वगैरे वतनदार कसबे मजकूर यानी पत्रे लेहून दिधले आहेत व वरकड पत्रे पाहाता तुमच्या वतनाचा निर्णये लिहिला आहे की तुह्मी कडू चव्हाण वतनदार पुरातन खरे पूर्वी तुमचा वडील भोजजी वलद जैतजी कडू चव्हाण मोकदम कसबे[१०
चाकण व देशमुख प्रगणे मजकूर यांत व चाकणच्या किलियांत हाकीम होता त्यांत बरकसा लागली त्यामुळे भोजजी कडू बाहेर पडिला मागे येसाजी वलद संताजी व सिवजी वलद विठोजी कडू कदम मुदई यांचे वडील हाउजी होनजी कडू गुमास्ते होते ते व हकीम एकामते राहोन वतनी कारभार करू लागले कितीका दिवशी तुमचे वडील वतनावरी आले त्यासी कदम कडू रुजू न जाहाले त्या दिवसापासून तुमचे वडील भांडत आले आमानुलाखान याचे कारकीर्दीस गोतमुखे निवाडा जाला तेव्हा मुदई खोटे जाले तुमचे वडील खरे जाले त्यासी महजर कडून दिधला हाही दाखला लिहिला आहे यावरून ही तुह्मी चव्हान कडू वतनदार खरे मुदई लायान गळा पडोन कजिया करिताती ऐसे कळो आले एवं प्रकारे निश्चये जाला पुढे तुमचा व कान्होजी आंगरे यांचा प्रसंग मनास[२०
आणिता रुपये साडेसत्राहजार यांसी तुमच्या वडिलानी दोन्ही वतनाची तिसरी तक्षीम पेशजी विकत दिधली व मध्य रुपये ४२५०० साडे बेतालीस हजार त्यांपासून खचाबदल आणिले त्यावरी दोन्ही वतने त्यांसी लेहून दिधली हे खरे परंतु महाराज राजश्री स्वामींनी तुमचे व कान्होजी आंगरे यांचे उतरोतर सुरळीत चालावे करिता दोन्ही वतनाच्या दोन तक्षिमा बरोबरी करून तुह्मी व त्यांही निमेनिमप्रमाणे वतने आनुभवावी ऐसा निर्व्हहा करून पत्रे दिधली आहेत ते पाहाता निर्णये लिहिला आहे की तुह्मी कडू चव्हान वतनदार पुरातन जमीन जुमलियाने खरे आहा यावरी तुमचे मुदई आणून इनसाफ करावा तरी त्यांही तुमचे मारे केले तेव्हा ते दिवाणचे गुण्हेगार व गोताचे खोटे आहेत त्यांसी या वतनासी आर्थाआर्थी समंध नाही याकरिता त्यांसी व यांजवळील कागदपत्र कुल रद[३०
केले असेत दोन्ही वतनापैकी निमे वतन तुह्मी खाणे व निमे वतन कान्होजी आंगरे यासी दिधले आहे ते खातील यांसी हिला हरकती कोन्ही करू नये ऐसी पत्रे दिधली आहेत त्याप्रमाणे तुह्मी व कान्होजी आंगरे निमेनिमप्रमाणे वतने खाम

आह्मी पुढे भोगवटियांसी महजर पाहिजे ह्मणऊन तुह्मी येऊन जाहीर केले तरी तुह्मासी करून द्यावा हे धर्नता तथापि तुह्मी हकीमात व गोतात उभे राहिलेत हे ऐकोन तुमचे मुदई येऊन उभे राहातील या आदेशाबदल काही दिवस त्यांची वाट पाहिली परंतु न आले तेव्हा येसाजी वलद संताजी कडू मुदई मौजे वाकी प्रो चाकण येथें होता त्यासी बोलाऊ पाठविले तो न येता तेथून कबिलेसमवेत पळोन गेला मनुष्य बोलांऊ गेली होती ते फिरोन आली यावरी मोकदम मौजे वांकी यांसी आणऊन तहकिकात करिता तुम्ही या जागा आलेत हे ऐकोन येसाजी कडू निघोन गेला म्हणवून जाहीर केले ऐसीयासी बेदरीच्या पातशाहाचा फरमान तुम्हाजवळी आहे व आमानुलाखान यांचे कारकिर्दी निवाडा होऊन तुम्ही खरे मुदई खोटे जाले व हजरत बादशाहा यांचा हुकूम फरमान द्यावयाचा जाला होता व दिवाण आसदखान यांचा परवाना तुम्हाजवळी होता व आलम आलीखान यांचा परवाना तुम्हाजवळी आहे व पेशजी मुदई यांस गोतात बोलाविले आसता गोतात न आले व त्यानी तुमचे मारे केले त्यावरी तुम्ही सातारियांसी गेलेत माहाराज यानी मुदई यांसी रद करून तुम्हास व कान्होजी आंगरे यांसी वतनी कागद करून दिधले तेव्हां तेथे ही उभे न राहिले व हाली पळोन गेले यावरून मुदई-येसाजी वलद संताजी व सिवजी वलद विठोजी वगैरे मुदई कदम कडू खोटे आसत त्यांसी या वतनासी काही अर्थाआर्थी समंध नाही तुम्ही चव्हान कडू जमीनजुमल्यावरून व गोही साक्ष भोगवटियांवरून पुरातन वतनदार खरे जाणऊन तुम्हास महजर करून दिधला आसे तरी तुम्ही मोकदमी कसबे चाकण व देशमुखी प्रगणे मजकूर हे वतने आपली मिरासी मुस्तकीम जाणोन हरदो वतनात निमे कान्होजी आंगरे यांसी विकत दिधली आहेत ते होऊन पुस्त दर पुस्त खात जातील निमे कसबे मजकूरची मोकदमी व निमे देशमुखी प्रगणे मजकूर तुम्ही उभयेता कारभार खिदमत सरबराह करून किर्द आबादानी व मालगुजारी करणे आणि मोकदमीचा हक लाजिमा व इनाम पासोडी व सेवसबजी कानू कवयेद जमीन जुमला मिरासी जिराती व बागाईती जल स्थळ घरवाडा देखील निमे निम व देशमुखीचा हाक रुसुम बरोब इनाम गाव मौजे गोनवडी व लवाजिमात कानू कवयेद व दिवाणचे सिरपाव व पान मान बाजे उत्पन्न निमेनिम माफिक सुदा मत बफरजेंदानी लेकराचे लेकरी कायीज मुतसरफ होऊन खात जाणे सानीऐन हाल यासी कोन्ही दिला हरकती करील तो दिवाणचा गुन्हेगार व गोताचा खोटा हा महजरनामा लिहिला सही ——————

## लेखांक ३ श्री शके १६४९ वैशाख शु. २

खरीदीखत शके १६४९ प्लवंग नाम संवछरे वैशाख सुा २ वार बुधवार ते दिवसीं राजश्री कान्होजी बिन तुकोजी आंगरे मो का चाकण देशमुख प्रा मजकूर यास हरजी बिन रामजी ठाकूर मोकदम मौजे पिंपरी बुा प्रा मजकूर सुा सन हजार ११३६ कारणे खरीदीखत लेहून दिल्हे ऐसे जे मौजे मजकुरची निमे मोकदमीचे वतन आपले आपल्या आत्मसंतोषें सालगुदस्ता तुम्हास विकत दिल्हे त्याचे खरीदीखत लेहून दिल्हे ते समई प्रा. मजकूरचे पाटील जे हजर होते त्याच्या शाहिदिया त्या खतावरी जाल्या बाकी गावगनाचे पाटील व मौजे मजकूराचा कुलकर्णी व बलुते हजीर नवते त्याच्या साक्षी जाल्या नाहींत त्यास हली प्रा मजकुरचे पाटील व बलुते आले आहेत त्याच्या साक्षीनी पत्र करून देणे म्हणून तुम्ही सांगितले त्यावरून आपण प्रा मजकूरचे पाटीळ वगैरे आले होते त्यास हें वर्तमान सांगितले त्यांनी तेविशई आपणास नसीहत केली कीं हरजी पाटिला वतन विकू नको देशमुखापासून तुवा रुपये घेतले आसतील ते आम्ही अवघे मिळून देतो आणि खरीदखत सालगुदस्ता लेहून दिल्हे आहे ते हि मागून घेतो म्हणऊन बहुता प्रकारे सांगितले याच प्रकारे आपले गावीचा माहादाजी मोरेस्वर जोसी व कुलकर्णी त्यांनी आपणास मर्सायेत केले परंतु आपल्या चितांत पहिले च घेऊन सालगुदस्ता आपण वतन मौजे मजकूरचे निमे मोकदमी मानपान वडीलपण होळीची पोळी सिरालसेट आदिकरून दिल्ही त्यासी कांहीं नौदिगार होत नाहीं आपण पेशजी खत करून दिल्हे आहे हली तुमच्या साक्षीनी खरीदखत करून देतो म्हणून प्रा मजकूरच्या मोकदमास व मौजे मजकूरच्या कुलकर्णी यासी जाब दिल्हा त्यावरून त्याची निशा होऊन हली हे खरीदखत लेहून दिल्हे आसे मौजे मजकूरची निमे मोकदमी आपली होती ते तुम्हास दिल्ही आसे तुम्ही आपल्या लेकराचे लेकरीं निमे मोकदमी मानपान वडीलपण होळीची पोळी सिरालसेट वडिलपणाचे मान समवेत वतनाचा उपभोग करणे आपणास व आपले तर्केचा कोणी आसल त्यास आर्थी आर्थी संमध नाही आपली निमे मोकदमीचे वतन तुम्हास दिल्याची किंमत रुपये ७०० सातसे करार केले ते वारले आपले रजानंदाने करार होऊन आपण वतन तुम्हास दिल्हे आसे आपला वक्षीमदार दताजी ठाकूर बिन आमाजी ठाकूर निमेचा आहे त्याचा तो आनभवील निमे मोकदमी आपली ते आत्मसंतोष तुम्हास दिल्ही आसे आपली काळी व पांढरी तुम्ही आनभवणे आपले निमे मोकदमीचा इनाम तुमचे स्वाधीन केला आसे व तुम्ही आपला भोगवटा खाणे आपला घरठाणा मोकदमीचा आहे तो आनभवणे व सेनेहि आनभावणे हे खरीदीखत लेहून दिल्हे सही

निा नांगर

चिा माहादजी मोरेश्वर जोसी व
कुलकर्णी मौजे मजकूर

साक्ष मौजे मजकूर

म्हावजी बिन गणोजी
वाळीज चौगुले
रतनमाहाला बिन
आनमाहाला आरसा

राहूजी बिन बावाजी
सुतार किकरे
संकरोजी बिन
बापोजी चांभार

संताजी वा कान्होजी
परीट मोगरी
आबा नाक बिन नाव
नाक एकनाक बिन खंड
नाक एस नाक बिन नाव-
नाक महार

साक्ष प्रा मजकूर

का मजकुर
१०] आवजी बिन भानजी कडू
मोकदम का मजकूर.
संभाजी बिन जावजी नाईक
भोसले नाईक वाडी
१
आवजी नाईक बिन बगोजी
नाईक भोसले नाईक वाडी
१
थलकरी माळी व कुणबी
१ येसोजी बिन रायजी पठारे
२०]१ खंडोजी बिन संताजी नाणेकर
१ कान्होजी बिन बोलाजी खरावे
१ आबाजी बिन रखमाजी मेदिनकर
१ विठोजी बिन मोत्याजी बोकील
१ मावजी बिन खावजी खेडकर
१ बाळोजी बिन मालजी भुजबळ
१ रतन माळी बिन भिममाळी मेहतरे
१ पद् माळी बित नागनमाळी सेवकरी
१७
१ राणोजी बिन सेत्याजी धाडगा
३०]१ खंडमाळी बिन हरमाळी कातगा
१ बाप माळी बिन जान माळी
खेडकर
१ राण माळी बिन मोनवाडी बिर-

देवजी बिन रखमाजी पा मो
नि॥ नागर

व जानो सिवदेव जोसी कुलकर्णी
व गोमाजी बिन संताजी आरगडे
चौगुले मौजे काळोस थलकरी
मौजे मजकूर
१ येसाजी खेरा
१ सावजी पोटवडा
१ रघोजी वाटेकर
१ सयाजी भाडले
४
मौजे निघोजे सुभानची बिन
मालजी एलवढे मोकदम
१
मौजे माहळुंगे
१ सिदोजी बिन तिमाजी पा
माहाळुंगेकर मोकदम
१ बिा सखो माणकेश्वर कुलकर्णी
जोसी
२
मौजे आंबेठाण
१ रायाजी बिन जावजी पा माडे-
कर मोकदम
१ बिा कुसाजी गोविद जोसी कुल-

तवडा
१ सूर्याजी बिन मोर माळी
१ कान्होजी गाडपिळा
बलुते
१ सखजोसी वलद कमल जोसी का।
मजकूर
१ तान्हाजी वलद दसमासी सुतार
१ पाळाजी बिन लखूजी कुंभार
२ परीट
१ देवजी बिन रामजी परीट
१ सिवजी बिन जयेतजी परीट
—
२
१ बावजी बिन रायाजी लोहार
१ संत माहाला बिन जान माहाला
१ राणोजी बिन सटवाजी चांभार
१ माहाद नाक माहार
१ भिकाराम
मौजे पिपले
१ त्रिंबकजी बिन माहादजी
पा। वळेकर उमाजी जगताप
१ आवजी पा। बिन आपाजी
बेंडभर
१ त्रिंबकजी व लको चौगुले

कर्णी
मौजे बिरदवाडी
१ बहिरजी बिन मावजी कालडोके
मोकदम
१ बि॥ सखो माणकेस्वर जोसी
कुलकर्णी
—
३
मौजे कुरकुंडी दवजी बिन कान्होजी
भोकसे मो (क) दम
१ [१०
मौजे करंदी
१ मल्हारजी पा। ठोकले
१ भिकाजी बिन एसाजी जखाते
चौगुले
—
२
मौजे मलवर नामाजी वरपा चौगुले
१
मौजे कोयेली
२ बावजी पा। कास्तर व सेकोजी
कोलेकर [२०
१ बि॥ गोविंद त्रिंबक कुलकर्णी
व जोसी
—
मौजे वडगाव घेनंद रामजी वा। सुना-
नजी पा। घेनंद
१
मौजे सेलगाव
१ चादजी बिन आमाजी पा। आवटी
मौज कुरली गूणाजी बिन बागडा
१

---

## लेखांक ४

शके १६५५ ज्येष्ठ वा. १४. [३०

तहनामा राजश्री लाडकोजी बाबा आजहाद आंगेर सरखेल मोकदम कसबे चाकण व देशमूख प्रगणे मजकूर यांसी. तायाजी व कृष्णाजी व जानोजी व सुलतानजी

घन्हान कडू मोकदम कसबे मजकूर व देशमुख प्रा मजकूर सन हजार ११४३ कारणे लेहून दिल्हे ऐसे जे पूर्वी राजश्री सरखेल साहेबापासून १७५०० साडे सत्रा हजार रुपये घेऊन त्यांस दोही वतनाची तिजाई वतन दिल्हे यासिवाय साहेबा-पासून आणखी ४२५०० साडे बेचाळीस हजार रुपये घेऊन त्यास कसबे मजकूर-ची मोकदमी व प्रा मजकूरची देशमुखी दोन्ही वतनें दरोबस्त दिल्ही फिरून राजश्री सरखेल साहेब कृपाळु होऊन आपले तर्फेनें दोन्ही वतनांपैकी निमे आपण घेतले व निमे आम्हास दिल्हे पेशजी दरोबस्त दोन्ही वतनाचे खरीदखत आम्ही लेहून दिल्हे होते ते आमचे आह्मास परतून दिल्हे मग आह्मापासून कसबे मजकू-रची निमे मोकदमी व प्रा मजकूरची निमे देशमुखी या दोन्ही वतनाचे निमेचे खरीदखत व महजर लेहोन घेतले आम्ही मोघम लेहून दिल्हे तपसीलवार मानपान लेहोन दिल्हे नव्हते ह्मणोन तुमचा आमचा किंतु पडोन तुम्ही कुलाबियांस घालिला तरी तुम्ही कुलाबियास न जाणे वतन दरोबस्त तुमचे आह्मी तुमचे कोण्हाचे सांगितल्यावर चितांत दुसरा विच्यार न धरावा मानपान सिक्का नाव नांगर सिरपाव होळीची पोळी गौरी गणेश व दोन्ही वतनाचा कारभार सदरहू कलमे तुह्माकडे या खेरीज पासोडी इनाम इकराम हकदक कानू कायेदे तुम्ही निमे आह्मास घरांत द्यावें बाहेर बोलावयासी आम्हास संमध नाहीं आह्मी तुमचे घरभाऊ आह्मास घरांत निमे द्यावे व निमे तुम्ही अनभवावे घरवाडा उजवीकडे तुमचा व डावीकडे आमचा आघाड तुमची व माघाड आमची हा तहनामा आपले खुशरजांवदीने लेहून दिल्हा सही छ २७ माहे जिल्हेज

गोही

१ संभाजी नाईकवाडी का मार
प्रा मार

१ जावनजी नाणेकर थळकरी का
मजकूर

१ गंगाधर बिन मंग जोशी पुरोहित
कसबे मजकूर.

निशा नांगर



बिशा भास्कर आनाजी देशपांडे कुलकर्णी
कसबे मजकूर प्रगणे मजकूर.

लेखांक ५

श्री १६६९ पौष वद्य ५

नकल

(शिक्का.)

करारनामा राजश्री मानाजी आंगरे वजारत माहा यासी दमाजी गाईकवाड समसेर बाहदर यानी लेहोन दिल्हा सन ११५७ मुा आश्वीनांकुमार

आम्ही आपले शेरीकर मोकद्म आपण आमचे धणी हकम आपले हकमीची केद कानू हुकमत चालत आली आहे त्याप्रमाणे आपल्या हुकमात राहून वर्तणूक करीत जाऊं आंतर करणार नाहीं कलम १

आपल्याकडेस स्वराज्याचा आमल सुभा मोकासा व सरदेशमुखी ( व )गैरे बाबती आहे त्याचे खंडणी खेरीज दोन मण ०।।।० पंधरा व कडबा व फार फर्मास वेठ बिगार सालाबाद चालत आले आहे त्याजप्रो समाकुल पांढरी मिळोन चालवीत जाऊं हिला, हरकत होऊ पावणार नाहीं. कलम १

आपले तर्फेस संगमसेत सेट्या खेरीज खंडणी चालत आले आहेत त्याप्रमाणें सालदरसाल बेदिकत समाकुल पांढरी मिळून चालवीत जाऊ यास आंतर करणार नाही कलम १

आह्माकडेस निमे मोकद्मी करार जाल्यावरून समाकुल पांढरीच्या व पोवल्याचे विद्यमाने वडीलपणाचा मान आम्हाकडेस या अन्वयावरून खरीद खताबरहुकूम आम्हा व पोवली यानी पुस्त दरपुस्त वर्तणूक करीत जावी म्हणोन आमचा त्याचा करारनामा अलाहिदा जाला आहे तो आपणास कळावा म्हणोन कलमबंदी सुभानजी मोरे व विसाजी लखाजी व काजी याज बार पाठविली आहे त्याजवरून कलेल मारनिलेनी विदित केले की सेवली याजकडेस पाटीलकी गेली असता आपण राजद्वारी विनंती केली म्हणोन मोखतेस्वर समाकुल पांढरी मौजे कामर्स ता चाकण प्रां जुनर येथील मोकदमी पोवलियाची त्यास कासाराची कजिया निमित्य राजद्वारी खर्च पडला त्याचा तपसील खरीदखतात आलाहिदा आसे म्हणौन पोवलियानी जानोजी सेवले यास निमे मोकदमी देऊन पैका घेऊन खर्च केला त्याजवर सेवलियाचा गुमास्ता मौजे मजकुरी येऊन पाटिलकीची गुमास्तगिरी करू लागला तो येथारीत सोडून मनमानेती आपणासी वर्तू लागला त्याज वरून आपण माहाराजास पत्र लेहून सेवली याकडील पाटीलकी दूर करविली आणि पोवालियानी सेवलियाचे रुपये घेतले होते मात्रारे देविले तेव्हां पोवले पाटील समाकुल पांढरी कुलाबा येऊन जालें की निमे मोकदमी आपण घेऊन सेवालियाचे देणे वारावयास ऐवज द्यावा तेव्हा आपण आमची ममता धरून आपल्याकडील गुमास्ते व पोवले पाटील व समाकुळ पांढरी मौजे दावडीस पाठऊन ऐवज नेऊन सेवलियाचे लचांड वारिले त्याजवर व्याज मुद्दल पैका मुचलग पोवलियाकडे जाला त्याचे ऐवजी निमे मोकदमी सेवलियाचे सिरस्ते प्रमाणे आपण करार करून खरीदखत करून देविले बाकी पैके पोवल्याकडे राहिला तो द्यावयास ताकद नाहीं म्हणौन सरकार महसली सान्याची जमीन पोवलियाचे थलपो समाकुल पाढरीने व पोवालियाने आपले खुश रजाबंदीने सवा दोन खंडी इनाम करून दिल्हे आण कर्ज फारखत करून दिल्हे

महाराज कृपाळु होऊन सोडऊन दिल्ही तर्‍हां आपण आमची ममता धरून स्नेहममतापूर्वक घरोब्याचा विचार चित्तांत आणून अगत्य जाणोन आह्मा-कडेस पाटीलकी पोवल्यांकडून निमे करार करून देविल्यामुळें आम्ही मौजे मजकुरी वाडा बांधणार तैसा तुमचा सरकारचा वाडा जीर्ण जाला आहे तो नूतन विस्तीर्ण बांधोन द्यावा म्हणोन त्रिवर्गानी विदित केले तरी आपले कृपेममतेपेक्षां आधिकोत्तर काये आहे निमे मोकदमी आम्हाकडेस करार करून देविली हे साहित्य आपणाकडून जालें ते आमचे अंतरांत येऊन गेलेच आहे आम्ही आपला वाडा बांधो लागलो म्हणजे आपला वाडा दुमजला पुढें सोपे साधे व कोठी व जामदारखाना याप्रमाणें बांधोन दिला जाईल येविशई अंतर सहसा होणार नाही कलम १

जमिनीचा उपयोग आम्ही पुस्त दर पुस्त करीत जावा जमिनीचा सारा समाकुल पांढरी सरकारांत देत जावा ऐसा करार ठरला आहे तरी आपण कृपा करून करार ठरल्याप्रो बेदिकत चालविले पाहिजे कमल १

आपले तर्फेने हाकिमीचे व देशमुखीचे कारभारास गुमास्ते मौजे काळोसच्या ठाण्यात राहतच आहेत आमचे तर्फे मोकदमीचे वतनी कारभारावर गुमास्ते ठेऊ त्याजपासून वर्तणूक येथारीतीने न जाली तरी मातुश्री सखुबाई दावडीस आहेत त्यास कळवावे गुमास्तेयापासून अंतर पडिले ऐसे जाले तरी तो गुमास्ता काढून आपले मर्जीप्रमाणें दुसरा ठेवितील हाकिमीचे रीतीने कृपा करून गुमास्तयाचे हातून सेवा घेत जावी कलम १

एकूण कलमे सा करार मदार शरयेत पन्हा काजी व राजश्री सुभानजी मोरे व विसाजी लखाजी याचे विद्यमाने आपल्या पत्रावरून जाले असे त्याप्रमाणे आम्हाकडून चालत जाईल आपण हि चालवीत जावे छ १९ माहे मोहरम मजकूर सन मोतंब सुद

**लेखांक ६** श्री शके १६७५

श्रीमंत महाराज राजश्री बाबा फडनवीस

साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक सभा कुल पांढरी कसबे चाकण नावानीसि बिा

उमा जोशी
मल्हारशेट व मोरशेट शेटे
बाबा माळी मेहत्रे
आवजी कोतवाल
चापाजी भुजबल

काजी आकिनुला
खेवजी मेदिनकर
वाल्होजी मेदिनकर
राणोजी नाणेकर
विठ माळी सेवकरी

गाजी सुतार
गगू परीट
मांया गुरव चेक्या
कलू मुलाणा
राया चांभार
सुभाना चांभार
कृष्णा मांग
फकीर महमद मुजावर
रामा परीट
माणकु लोहार
भिकू कुंभार
तुलनाक महार
धोंड नाक महार
भिका मांग

समस्त समाकुल पांढरी साहेबाचे सेवेसी अर्जदास्त लेहोन दिल्ही ऐसीजे सन हजार ११६३ कारणे साहेबी राजश्री गोपाळपंत फौजदार यांसी पत्र पाठविले की तुलसाजी कडू याचे घर ठिकाणा आहे तेथे गुदस्ता तुलसाजी मजकूर याचा बाप नारायेणजी कडू आपल्या घरावरी घर बांधीत होता त्यासी त्याचे भाऊबंद बांधो न देत त्यावरून साहेबापासी फिर्याद जाला त्यासी साहेबी राजश्री गोपाळपंतास आज्ञा केली की तुलसाजी वलद नारायेणजी कडू याचे घर खरे किल टिके पांढरी गोळा करून तहकिकात करून लेहून पाठविणे त्यावरून राजश्री गोपाळपंती आम्हास गढीत बोलावून आणिले आणि नारायेणजी कडू याचे घर कोठे आहे ते सांगणे म्हणून पुरसीस केली त्यासी पूर्वी वतनदाराची घरे किलियाखाले होती ती किलीयाखाले दडपोन गेली यावरी किलियाभोवती आचदल तचदल राहिले त्याजवरी किला माहाराजाही घेतला त्यावर वस्ती बाहेर घातली तेव्हा देशपांडिये व देशमुख यांची घरे दक्षणेस देशमुखाची त्याचे उतरेस जोशी यांची त्याचे उतरेस देशपांडिये त्याचे उतरेस ब्रम्हे कचेस्वर बावा त्याचे उतरेस नगरालेतळे येणेप्रमाणे वस्ती जाली त्याच्या आलीकडे दक्षणेकडे माली याची आळी त्याचे आलीकडे काजीचा वाडा त्याचे आलीकडे श्रीभैरीचे देवालय त्याच्या आलीकडे मुजावर मुलाणी यांची घरे त्याच्या आलीकडे गैरी मुसलमानाची घरे त्याच्या आलीकडे नाईकवाडी याची घरे त्याच्या आलीकडे ब्राह्मण आळी येणेप्रमाणे दोन आळ्या त्यास धामधुमेत दुकाला आलीकडे धामधूम जाली तेव्हां खंडोजी कडू यानी पागी व घर मुजावर मुलाणा याच्या घरी मागे जागा बखल होती तेथे पागा बांधोन राहिला मुलाणी याचे सेजारी बाहाहत झोपडी बांधोन भावजी कडू राहत होता तेथें कोन्हाची मिरास देशमुखाची घरे नाही मिरासीची घरे वस्ती आहेत तेथे बांधावी भानजी कडू व समुदे कडू मसिदीमागें राहिले मुसलमानाची घरे तेथे काही वतनी जागा नाही वतनी जागा म्हणून बांधणार तरी वस्ती जागा आहे तेथे बांधणे येणेप्रमाणें हकीकत आहे सेवेसी कळावे म्हणोन लिहिले हे विज्ञापना.

सवादपत्र शके १६९६ जयनाम संवछरे आषाढ वद्य १ ते दिवसी सिवजी वलद गोमाजी कडू मोकदम कसबे चाकण देशमुख प्रा मार यांसी गोमाजी वलद रूष्णाजी व शाहाजी वा जानोजी व चिमाजी वा सुलतानजी कडू बार मोकदम का मार देशमुख प्रा मार सुा समस सबाई मयां व आलफ सन हजार ११८४ कारणे सवादपत्र लेहून दिल्हें ऐसे जे तुमचा व आमचा मूळ पुरुष एक तुम्ही वडील निमेचे व आम्ही तुमचे धाकटे भाऊ निमेचे तुम्ही वडीलपण करावें आणि वतन येथाविभागें चालवावें ते न चालविलें ह्मणोन तुमचा व आमचा कजिया लागून फडशा घरांत न होय ह्मणौन तुह्मी व आह्मी उभयेता पांगा हुजूर श्रीमंत पंतप्रधान व पंचाईत माहास्थल का मार यांजपासी जाऊन मिनतमानत करून तुह्मी व आह्मी रजावंत होऊन विनंती केली की आमचा तह भाऊपण्यांत उभयेतांचा करून घ्यावा त्यावरून पंचाईतांनी तुह्मापासी व आह्मापासी राजीनामे व जामीनकतबे व तकरीरा मागितल्या त्यावरून तुम्ही व आम्ही रजावंत होऊन राजीनामे व जामीनकतबे व तकरीरा दिल्या तुम्ही तकरीर लेहून दिल्या त्यांतील सारांश वितपशील

तुमचा व आमचा मूळ पुरुष गोमाजी कडू मो व देशमुख यांसी पुत्र ३

१ वडील पुत्र खंडोजी कडू

१ मधवा रूष्णाजी कडू

१ धाकटा नागोजी कडू

---

३

तपसील

१ वडील खंडोजी कडू यासी पुत्र ३

१ वडील गोमाजी कडू

१ मधवा शहाजी कडू

१ धाकटा तायाजी कडू

---

३

तपसील

१ वडील गोमाजी यासी पुत्र २

१ वडील आनदराव

१ धाकटे सिवजी कडू

---

२

पैकी अनंदराव याचे नकल बाकी सिवजी कडू हाली आहेत

१ खंडोजीचा मधवा पुत्र शाहाजी व धाकटा तायाजी पैकी तायाजींचें नकल०
बाकी शाहाजीचा खंडोजी व त्याचा सुजणाजी व शहाजी हालीं आहेत
१ मधवा पुत्र कृष्णाजी याचा पुत्र भोजजी याचा पुत्र राघोजी यांचे
नकल जाहाले
१ धाकटा पुत्र नागोजी यासी पुत्र
२

१ वडील गोविंदराव कडू
१ धाकटे सुलतानजी कडू
—
२

तपसील
१ वडील गोविंदराव यासी पुत्र ३
१ वडील कृष्णाजी
१ मधवा जानोजी
१ धाकटा भवानजी
—
३

पैकीं कृष्णाजीचे नकल ० व भवानजीचे नकल ०
बाकी जानोजी यासी पुत्र ३
१ वडील गोमाजी हाली आहेत
१ मधवा शाहाजी हाली आहेत
१ धाकटा राणोजी हाली आहेत
—
३

१ सुलतानजी कडू यांचे पुत्र ४
१ वडील खंडोजी कडू
१ धाकटे चिमाजी कडू
१ धाकटे गोविंदराव कडू
१ धाकटे जैसिगराव कडू
—
४

येणे प्रो हाली आहेत खंडोजीस पुत्र ३ हाली आहेत व चिमाजी व गोविंद-
राव व जैसिगराव कडू हाली आहेत.
—
येणे प्रो वंशावळ आहे,

तुम्हांकडील कागदपत्र व तकरीरा त्यांतील वितपसील

१ राजीनामा कीं आपण पाच परमेश्वर आहेत जेणेप्रो आज्ञा कराल त्यास आपण राजी आसो यासी नादिगर करूं तरी गुन्हेगार म्हणौन

१ वर्तणुकेस जामीन माहदर्जी वा त्रिंबकर्जी नाणेकर थलकरी कारभारी आपण पाच परमेश्वर आहेत जेणे प्रो निवाडा करितील त्याप्रो मारविलेस वर्तउ म्हणौन.

१ तकरीर पंचाइतांचे सेवेसी सन हजार ११८३ तकरीर लेहून दिल्ही ऐसी जे आमची हकीकत तरी आमचें वतन पूर्वापासून चालत आले आहे त्याजवर मारे जाले तेव्हां आम्ही दिढा वरसाचे होतो व आमचे वडील भाऊ आनंदराव कैलासवासी पाचा वरसांचे होते ते समई मारे जाले आमचे चुलते ते समयी तायाजी बावा उमर वरसें पंधरा सोळा वरसात होते व सुलतानजी बावा तिसा पस्तिसा वरसांचे होते या दोघानी ते वेळेस राजपत्रें आणिलीं त्यावर कसबे मजकुरी तायाजी बावा व कृष्णाजी बावा कामकाज वतंदारांचें मोठेस चालवीत आले आणि आम्ही तों आपले आजुलीं वाढलों इस्ताव्याचे सालीं कारभारी आलों तो हे उभयेता कामाकाज करीत होते त्याजवर तायाजी बावा मयेत जाहाले त्याच्यामागे कृष्णाजी बावा हि मयत जाहाले तेव्हां आम्ही कारभारी कामकाज करूं लागलों त्यावर कृष्णाजी कडूची भावजई भांडू लागली कीं वडीलपणाचा आधिकार निमे मजला द्या ऐसा वाद सांगू लागली तेव्हां आम्ही ते बाईस बोलिलो की वतन मोठेस आहे आमच्याने धारा करून देववत नाही तेव्हां बाई उठोन श्रीमंत सुभेदार यांजवळ फिर्याद गेली तेथून मसाला करून आम्हास पुणियासी नेले आणि राजश्री धोंडोपंत जोगलेकर यांचे वाडियांत तीन दिवस उपासी बैसविलें आणि ब्यादे लाऊन आम्हापासून मनमाने तैसा कागद बाबजी पाा ढमाले कडुसकर व जोगलेकर यानी घेऊन सबदराबाईस दिल्हा त्यावर आम्ही सुभेदार यांच्या वाडियांत फिर्याद गेलों तेव्हां अजाहत राजश्री मल्हार संभाजी अजहत आंगरे देशमुख यानी आम्हास हातीं धरून कारभारी आणिलें तुम्ही फिरियाद करू नका तुम्हा उभयेतांची समजूत आम्ही कारभारी करितों कागद घेतला तो फाडून टाकू म्हणून घेऊन आले ते समई गाव राजश्री नरसिंगराव उधव यांजकडे होता त्यांचे तरफेन आमलदार कासी साबाजी होते त्यांस मल्हार संभाजी यानी सोपिले की याचे मना आणावे त्याजवरून पंत मारनिले यानी हिसेबाचा मात्र लढा चुकविलेला पुढें वडीलपणाचा न्याय निवडा म्हणौन बोलिलो तेव्हां आमलदार यानी आज्ञा केली कीं राजश्री राघोजी बावा अंगरे देशमुख निवडतील पुण्याच्या

मुक्कामीचा कागद होता तो आम्ही घेऊन फाडला तेव्हां बाई फार गडबड करूं लागली मग आम्ही कागद टाकून दिल्हा त्याजवर सवदराबाईचा व आमचा लढा तैसाच राहिला त्यावर सवदराबाईस देवआज्ञा जाला पुढें करंड्याचा दंगा जाला तेव्हां कसबा व किला श्रीमत पारसनिर्वास यांजकडे जाला त्यावर काही एक दिवसानी गोमाजी कडू व चिमाजी कडू हे किले मजकुरी फिरयाद जाले मग हकमानी राजीनामे व जामीन आम्हास व त्यांस फर्माविले त्यावरून आम्ही व त्यानी जामीन व राजीनामे दिल्हे त्यावर कलमाची याद लेहून दिल्ही आणि आम्हास हकीम म्हणो लागलें की या यादीवर रुजू देणे त्यावर आम्ही रुजू करून देऊनासे जालों तेव्हां हकीम यानी उत्तर केलें की हे तुम्ही काही करा मग आम्ही किल्यांतून बाहेर आलो तों आम्हावर दाहा बाराजण काठ्या घेऊन कडू मजकूर प्रहेर रात्रीचे आमलांत भातखल्याचे दरवाज्यापुढें आम्हाभोवता दंगा केला तेव्हां आम्ही रात्री माघारे फिरून भातखल्याचे चौकीस सिपाई लोकांत येऊन बसलों तों तेथे हि कडू मजकूर यानी आम्हास घेरून बसले आणि आद्वा तद्वा बोलत ऐसी त्यांची जबरदस्ती पाहून आम्ही त रात्री भातखल्यांत चौकीस राहिलों मग चिरंजीव अनंदाराव यास घरास बिछाना आणावयासी पाठविलें तों त्यास श्रीपिराजवळ दोघे चौघे आडवे जाले तेथे हि मुलाभोंवता दंगा केला तेव्हां चिरंजीव पळून माघारा चौकीस आला हे वर्तमान ते च वेळेस किलेदार यांच्या कानावर घातलें परंतु ते काही मनास आणीनात त्यावर दिवस उगवला तेव्हां कलमे रुजू केल्यासिवाये सुटेनासे दिसोन आलें तेव्हां कलमे रुजू करून दिल्ही व मोकदमीचे कलम त्यानीच घ्यावें ऐसे रुजू करून दिल्हें व फारखती हि त्यांचे मनोगतानरूप दिल्ही तेव्हां सुटका जाली त्यावर आम्ही पुणियास गेलों तेथे राजश्री वजारत म्हा सरखेल यांच्या कानावर हें वर्तमान घातलें तेथे चिमाजी कडू वगैरे आले तेव्हां आम्हास व चिमाजीस वडील धाकुटपणाची पुरसीस करूं लागले ते समई गोमाजीने व चिमाजीने कागद लिहून दिल्हा जे राजपत्रीं ज्याचे नांव आगोधर आसेल त्याने वडीलपणाचा आधिकार घ्यावा ऐसा कागद लेहून दिल्हा व आम्ही कागद लेहून दिल्हा जे सर्वत्रांच्या चालीप्रो वर्तणूक करूं म्हणोन कागद लेहून दिल्हा त्याजवर राजश्री सरखेल कुलाबियास गेले आम्ही परागंदा होऊन मौजे धामारोस तो पावल येथें जाऊन तीन वर्से राहिलों मग सालगा गावकर्यानी का मारी घेऊन आले तेव्हां आम्ही घरास जागा मागुन राहिलों आहो त्यास हाली यानी कजिया आरंभिला आहे आमचे घरीं शाहाजी कडू व गोमाजी कडू धरणें घेऊन बैसले मग चिरंजीव अनंदराव व शाहाजी कडू हे उभयेतां तुम्हाकडे येऊन वर्तमान सांगितलें त्याजवरून राजीनामे फरमाविले तर वडील धाकुटपण पूर्वीपासोन वतन आसेल

ते व मारियाची साधणूक हें सर्व मनास आणून जे आज्ञा कराल त्याप्रो वर्तणूक करूं यास अंतर करणार नाहीं शके १६९५ विजयेनाम संवछरे पौश शुद्ध १३ सोमवार छ ११ माहे शौवल सुा आर्बा सैबैन मयां व अलफ म्हणौन

१ पंचाईतांचे सेवेसी सिवजी कडू देशमुख यांचा कतबा सन हजार ११८३ कारणे कीं राजपत्री माहाराजानी नाव आगोधर लिहिले आसेल त्याने वडिलपणाचा आधिकार घ्यावा माहाराजानी वडिलपणाचा शोध करून वडील नाव आगोधर लिहिले आसेल त्याप्रो वडीलपण अनभवावे म्हणौन.

१ पंचाईतांचे सेवेसी रा बो सिवजी देशमुख का मार सुा सन ११८३ कारणे कतबा लेहून दिल्हा ऐसाजे थलपत्र खेडचे मारियांचे व आबदुल रसूलखान याचे पत्र ऐसी दोन पत्रे गोमाजीपासी आहेत त्याप्रो आबदुल रसूलखानाचे पत्राची नकल मात्र येक आम्हापासीं आहे खेडचा जो करीणा जाला त्याची आसलपत्रे त्याजपासी च आहेत राजद्वारचा कागदपत्र रेजा पुर्जा आम्हापासी होता तो सेवेसी आणून दिल्हा याशिवाय आमचे आंगी लागले तरी वतनावेगळे व मखलासीचे बंद व आष्ट प्रधानाचे चिन्हाचें पत्र व त्यांची आगाऊ आसिल्यास आम्ही त्याचा लोप करूं तरी वतनावेगळे या सिवाय भावानी लेहून दिल्हे कीं साताारियाचे मुकामी पंचाईत जाली त्या पंचाइतांचे पत्र व मखलासीचे बंद व निर्णयपत्र व डौलपत्र राजद्वारी जाले तें व मारेपत्र ऐसी आम्हापाशीं आहेत म्हणौन आम्हावर तुफान घेतले आहे तरी यांतून एक पूर्जा आमचे आंगी लागलः तर वतनावेगळे ताजाकलम साताारियाचे मुकामी पंचाईतांचे मखलासीचे बंद आहेत म्हणौन गोमाजी व चिमाजी कडू म्हणतात त्यास आपणापासीं ते पत्रें आसून आछादून ठेविले आसतील ते कालकाला निघालीं तरी वडीलपणासी व वतनासी समंध नाही म्हणौन

१ बेदरचे पत्र बुन्हाणुलमुलुक व दिवाण रखतखान व हाजीर मजालस बसून सके १२५५ श्रीमुखनाम संवत्सरे कार्तिक सुध १ ते दिवसी सांयाजी बिन गोमाजी कडू यांसी कसबे मारची मोकदमी व प्रा मारची देशमुखी देह ८४ रेऊजी हांडे सरदेशमुख यानी आर्जे केला तो बराये अर्ज खातरेस आणून दोही वतनाचा हकऊाजिमा वगैरे जमीन जुमला बाजे कानू मारनिलेने आवलाद आफलाद पुस्त दर पुस्त अनभवावे म्हणौन

१ श्रीमंत राजश्री बालाजी विश्वनाथ पंतप्रधान यांची पत्रें

१ देशाधिकारी लेखक वर्तमान भावी यांसी पत्र छ १३ मोहरम

१ गोमाजी वा खंडोजी व गोदजी वा नागोजी कडू देशमुख प्रा चाकण मोकदम का मार सुा आशरीन मयां आलफ छ ६ मोहरम दोन्ही पत-

याचे हक वंशपरंपरेने खाणे म्हणोन

---

२

१ सुरतमहजर आबदुल रसूलखान याचे शिक्यानशी व काजीचे मोहरनसी चिमाजी कडू यांजपासी आसलपत्र आहे त्याची नकल काजीचे मोहेरनसी हालीं हजीर गोमाजी कडू यासी अकरा जखमाकारी केल्या व तिचे चाकर जखमी केले व गोविंदराव यांसी दूर जंगल मौजे चांडोली येथील राणात नेऊन जिवे मारिले बताारीख छ ५ माहे जमादिलावल सन ३ जलूसवाला रोो मंगळवार ते दिवसी कदम कडूनी मारिले म्हणोन

३ श्रीमंत माहाराज राजश्री शाहू छत्रपती स्वामीची राजपत्रे

१ श्रीमंत राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी पत्र शके ४८

१ देशपांडिये प्राा मार मोकदमानी प्राा मार यांसी पत्र शके ४८ शुभकृत

१ खासगत नांवें राजपत्र सदरहू या तिही पत्रांतील अन्वयें की गोमाजी व गोंदजी कडू यांसी कदम कडूनी जिवे मारिले ते माहाराजांनी खातरेस आणून बेदरचे पातशाही पत्र व बाळाजी पंडितांची पत्रे व मारियाचा सुरतनामे व पुर्वील अर्थांतर दोहीं वतनाचा मनास आणून अनंदराव वाा गोमाजी व तायाजी वाा खंडोजी व कृष्णाजी वाा गोंदजी व सुलतानजी पाा नागोजी चव्हाण कडू यांचे नावे वतन बाहाल केले कदम कडूनी यांचे मारे केले साा त्यांस हुजूर न आणितां रद करून काा मारची मोकदमी व प्राा मारची देशमुखी हे दोन्ही वतने आजरामऱ्हामत देऊन लेंकराचे लेकरीं खाणे म्हणोन

---

३

१ श्रीमंत माहाराजाचे पत्र श्रीमंत राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांचे नावे आगिले त्याणी देहाये प्राा मारास पत्र दिल्हें की तायाजी बिन खंडोजी व सुलतानजी बिन नागोजी कडू याचे नावे सुाा इसने आशरीन मधे पत्र कीं काा मारची मोकदमी व प्राा मारची देशमुखी हे दोन्ही वतने याची चालवावी म्हणोन

५ श्रीमंत राजश्री माधवराव बलाळ पंतप्रधान यांची पत्रे पांच चि ताा

१ राजश्री रघुनाथ हरी सुभेदार

१ राजश्री गंगाधर रघुनाथ हवालदार

१ किले मारी राजश्री नारायेणराव कृष्ण पारसनिवीस

१ देशपांडिये प्राा मार

१ कुलकर्णी व सेटे व माहाजन व समस्त दाहीजण काा चाकण ताा मार

---

५

सदरहू पांच पत्रे सुा इहिदे सबन मध्य छ ५ जमादिलावलचा त्यांत आन्वये की सिवजी कडू देशमूख प्रा चाकण मोकदम का मार हे वडील मानपान व सिका याचा सुदामत व पासोडी व इसाफत सुरळीत चालत आल्याप्रो चालवण गोमाजी व चिमाजी कडू वडीलपणासी नवीन कजिया करीत आसतील तर त्यास ताकीद करणे पेशजीच्या सनदांत आगोधर नाव सिवजीचे व मागाहून नाव गोमाजी व चिमाजीचे वडिलांचे आहे सुदामत चालत आल्या प्रो चालवणें म्हणोन

१ सुभांचे पत्र देहाये मारास कीं सिवजी कडू देशमूख प्रा मार यांनीं भावबंदास नेमणूक करून चिटी देतील त्या प्रो देणे चिटी सिवाय भावबंदाकडे दिल्यास दुचार पडेल सुा इहिदे सबेन छ १६ माहे राखर मधे पत्र म्हणोन

१ राजश्री गंगाधर रघुनाथ हवालदार यांचे देहाये प्रा मारास पत्र की सिवजी चव्हाण कडू देशमुख ता मारी देशमुखीचा हक व फरफर्मास सालाबाद प्रो आपण वसूल घेऊन आपले चिटीने भावबंदास वांटणीप्रो ऐवज नेमून देत आसतात मध्ये भावाबंदानी परभारे गावगना तगादे करून हकाचा ऐवज वसूल घेऊ लागले त्यावरून हकरुसुमाचा ऐवज व फरफर्मास सिवजी देशमुख यांजकडे देणे याचे भावबंदाकडे दिल्हियां दुचार पडेल मारनिले ज्यास ऐवज देविनील त्यास देणे म्हणोन पेशजी माहालीहून पत्र सादर जाले आसतां फिरोन भावाबंदानी द्वाही दिल्ही आहे म्हणोन तुम्ही दिकत घेतां त्यावरून देहाये मारास हे पत्र सादर केले तरी देशमुख मारनिलेकडे हकरुसुमाचा ऐवज व फरफर्मास वसूल देणे भाऊबंद द्रोही दुगाही करितील तर मान्य न करणे येविसी सरकारची आज्ञा असे फिरोन बोभाट आलियां परिछिन्न कामास येणार नाहीं जाणिजे छ १३ माहे रजब सुा इहिदे सबेन मया व अलफ म्हणोन

१ पुणियांचे मुकामी राजश्री धोंडोपंत जोगलेकर याचे वाडियांत कागद लेहून घेतला सा की दोन वरसाचा हिसेब राहिला होता म्हणोन घेतला त्याचा फडशा का मारी राजश्री नरसिंगराव उधव यांचे आमलात जाला फारसती परस्परें जाला तुम्हास फारसती दिल्ही सिवजी कडू देशमुख यांसी गोमाजी कडू देशमुख सुा सन ११६९ शके १६८१ प्रमाथी नाम संवछरे आशाढ वद्य ७ कारणे सन ११६७ व सन ११६८ या दो सालांचा हिसेब तुम्हाकडे राहिला होता तो पंचाइतांचे गुजारतीन हिसेबसुधां झाडियानसीं भरून पावलों पुणियाचे मुकामी कागद लेहून दिल्हा तो रद आसे छ २० जिलकाद

साक्षीनसी फारखती दिल्ही आसे म्हणौन

आम्हाकडील कागदपत्र व तकरीरा यांतील सारांश बितपसील

१ राजीनामा कीं आपण पांच परमेश्वर आहां म्हणोन मिनतमानत करून राजीनामा लेहून दिल्हा जे राजपत्रांत अन्वये आसेल त्याप्रो तह करून घ्याल त्यास आपण राजी आसों यासी नौदिगर करूं तरी गुन्हेगार म्हणौन शके १६९५ विजयनाम संवछरे पौश शुध १२

१ आम्हास जामीन कासी सेट वा दादसेट सेटे का मार सके १६९५ विजयेनाम संवछरे पौश वद्य १ सन ११८३ गोमाजी वा कृष्णाजी कडू यासी जामीन आसों राजपत्रांत जो आन्वये आसेल त्याप्रो गोमाजी वर्तणूक करितील न वर्ततील तरी आपण वर्तऊ म्हणौन

१ तकरीर पंचाईतांचे सेवेसी सन हजार ११८३ कारणे लेहून दिल्हे ऐसे जे सिवजी कडू चव्हाण मोकदम का मार देशमुख प्रा मार याचा व आमचा का मारी पासोडी वे इसाफत मौजे गोनवडी येथील वाटणीसमधें लढा पडिला आहे त्याजवरून तुम्ही आम्हास पुरसीस केली कीं तुम्हाजवल कागदपत्र जे आसतील ते दाखवणे त्यास पूर्वीचे कागद मारा जाला ते समई आमच्या वडिलांपासून मुदई कदम कडू यानी नेले बाकी जे राहिले ते व नवीन जाले ते राजपत्रें देखील राजश्री तायाजीबावाजवली होती ते मृत्य पावले यावर सिवजी देशमुख याणी ते कागद व राजपत्रें आदिकरून आपल्या जवळी ठेऊन घेतलीं आहेत ते त्यांजपासीच आहेत आपण हजरत आहेत ते कागद त्यांजपासून आणवावें त्यांत जो मुजनया आसेल त्याप्रो वर्तूं आमचे मातुश्रीने पुणियाचे मुकामी श्रीमंत राजश्री सुभेदार कैलासवासी यांजकडे फिर्याद गेली तेथे सिवजी कडू यांसी बोलाऊन आणून ते वेलेस देशमुख मार याणी आमचे मातुश्रीचा हात धरून समाधान करून जोगलेकर यांच्या घरीं बसोन आपले स्वदस्तूरचा कागद लेहून दिल्हा आणि समजूत केली आणि का मारास आली त्याप्रो पुढें वर्तावें तों आमची मातुश्री मृत्य पावली आम्हांस वेड लागून फिरत होतों हे सर्वांस ठावकें आहे त्याजवर आम्ही व राजश्री चिमाजी कडू ऐसे मिळोन कसबे मारी आलों आणि घरगतीचे विचारें सिवजी कडू यांसी विचारिलें की आम्हास कोणे रीतीनें वर्तवितां आणि तुम्ही कैसे राहतां तें सांगणे त्याजवरून त्याणी आम्हांसी जाबसाल केला कीं अतां तुम्हास मोठ्या धोंडयासी बिलगवितों त्याजवरून आम्हास किल्यांत नेऊन हकमासीं गांठ घातली मग त्यांनीं पांढरी मेळऊन इनसाफ करून फारखती त्यांची आम्हास व आमची त्यास दिल्ही आणि लढा सोडिला हे वर्तमान पांढरीस तुम्हास ठावकें

आहे ऐसे आसोन दिकत करितात तरी तुम्ही शरा आहा न्यायेवाज्यवी करून आम्हास आज्ञा कराल त्याप्रो वर्तू म्हणोन

१ पंचाईतानी तकरीरेती सारांश निवडून कितेक कलमे आम्हास पुसिलीं त्यापैकी एका कलमाची पुरसीस की मुलकाची चाल कीं हाडामासाचा वडील तोच मानावा तुम्ही धाकटे आसोन वडीलपणाची वांटणी मागतां यांचे साधन काये याचे उत्तर आम्ही दिल्हे की हाडामासाचा वडील मानावा म्हणोन पुसिलें तर सिवजी हाडामासाचा वडिलास वडील होते परंतु वतन चालत नवतें मूळ पाया मारियापासून वतन त्यास मारे जालियावर वतन चालिलें चालतें सुलतानजी बावानी राजपत्र आणून वतणू चालतें केलें ते वेलेस खर्चवेचास हि कोण्हे

१०]दिल्हें नाहीं व कष्टमेहनत हि कोणे केली नाहीं राजपत्रें आम्ही च आणून वतन चालतें केलें आमचा गोविंद्राव आगाडीस मारिला म्हणून गोविंद्राव वडील म्हणोन

१ मारियाचा सुरतनामा महजर सन हजार ११३३ हिजरी छ ५ माहे जमादिलावल रोो मंगलवार ते दिवशीं दोन प्रहर रात्री कदम कडू यानी सेडचे मुकामी देव पाटील यांचे घरीं गोमाजी व गोदजी कडू या दोघांस जिवें मारून टाकले तेव्हा ते दोन्ही मुर्दे व मुदई कडू यांसी आणून आबदुल रसूलखान यांजपासीं आणिले त्यानी मनास आणून हाली मेलवून पारसी सुरत महजर करून दिल्हा त्यांतील आन्वये म्हणोन.

१ पुणियांचे मुकामी राजश्री धोंडोपंत जेगलेकर यांचे वाडियांत कागद लेहून

२०]दिल्हा आहे त्याचा चिरंजीव गोमाजी कृष्णाजी कडू देशमुख काा चाकण ताा मार यासी (सि) वजी कडू देशमुख काा मार ताा मार आसीर्वाद उपरी काा मार पाटिलकीचा व ताा मार देशमुखीचे हक मानपान व हर एक उत्पन्न पुरवापार वडिलांचे वडिली वंशपरंपरेने उभयेतां निमेनिमी चालत होतें त्यास हाली दरम्याने आपण दोन वरसे आम्ही कारभार केला हक उत्पण आम्हीच घेतलें तुम्हास दिल्हें नाहीं त्यावरून तुम्ही पुनियाचे मुकामी येऊन राजश्री सुभेदार यांजपाशीं आम्हांस बोलाउन आनलें त्यास आपण उभयेतां मणास आनितां आपल्या उभयेताचे आणुमते सुदामत वडिलां वाडिलांपासून निमेनिमी चालत आले आहे त्या प्रो चालावें दरमेज दोन वरसें आम्ही काम कारभार केला हक उतपण जे आसल ते गावी गेलियावर हिसेब कितेब पाहून जो

३०]तुमचा इभाग निमेनिमी होयेल तो तुम्हास देऊ येथून पुढे सुदामत प्रो चालऊ अंतर करनार नाहीं पुढें जो काम कारभार उभयेता मिलोन करूं यासी अंतर करूं तर आपल्या कुलस्वामी व पुरजांची सफत आसे हे लिहिले सही म्हणोन

१ फारखती राजश्री नरसिंगराव उधव यांचे आमलची तिचा आसवा म्हणौन नकल आणून दिल्ही त्यातील सारांश शके १६८१ प्रमाथी नाम संवछरे आशाढ वद्य ७ वे दिवसी गोमाजी कडू यांसी सिवजी कडू सुा सन ११६९ ची दिल्ही की तुम्हाकडे हिसेब दुसाला सन ११६७ व सन ११६८ या दोन्ही सालाचा हिसेब होता तो भरून पावलो छ २० जिलकाद म्हणौन

१ राजश्री पारसनिवीस यांचे आमलांत शके १६९१ विरोधी नाम संवछरे श्रावण वद्य ७ सुा सबैन मयां व अलफ सन हजार ११७९ या सालांत पत्रे कलमाची यादी व फारखती जाली या परस्परे त्यांतील सारांश यादींत कलमे लिहिलीं आहेत दोन्ही वतनाचें उत्पन्न कितेक कलमे निमे घ्यावी व कितीक कलमे चवकसी करून देऊ व एक कलम दुरोबस्त आम्हाकडे टाकिले आहे येणे प्रो याद व फारखतीचा गोमाजी व चिमाजी कडू देसेमुख यांसी सिवजी कडू देसमुख यानी लेहून दिल्हे कीं तुमचा व आमचा भाऊपणियाचा वांटणीचा कजिया होता सबब उभयेता तुम्ही आम्ही किले मजकुरी आलों वर्तमान निवेदन केले जामीन व राजीनामे मागितले त्या प्रो राजीनामे व जामीन कतबे दिल्हे व तुमचा आमचा समाईक हिसेब देहाये प्रा मार व इसाफत मौजे गोनवडी व जकात राहादारी व का मारीं इनाम व पासोडी याचा हिसेब इा सन ११७१ ता सन ११७७ यो साले सात साता सालाचा हिसेब पंचाईतांचे विद्यमाने विल्हेस लागला तुमचा आम्हाकडे व आमचा तुम्हाकडे राहिला नाही सद्रहू यादीच्या आन्वये लिहिला आहे त्या प्रो चालावे म्हणौन

१ सन हजार ११८३ कारणे गोमाजी कडू देशमुख यानी पंचाईतांचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा जे राजपत्रांत ज्याचे नाव आगोधर आसेल त्याने वडील पण त्याचे यासी अंतर करील त्यास पिरांची शफत आसे म्हणौन

१ सन ११८३ कारणे गोमाजी व चिमाजी कडू यानी पंचाईतांचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा जे पेशजी आपण राजपत्राविसी आपणास कतबा लेहून दिल्हा त्याप्रो राजपत्र आलें परंतु निवाडपत्र मारा जाल्यावर दुसरे राजपत्र माहाराजानी निवाडा जाला आहे ते मान्याविसी आमचे तीर्थरूपानी आणिली आहेत तें दुसरें पत्र आणिल्यावर त्यांत जो वडील धाकुटपणाचा मार आसेल तेणेप्रो वर्तणूक करूं यासिवाये पुढें दिकत करणार नाहीं म्हणौन

१ सन ११८३ गोमाजी व चिमाजी कडू यानी मागतीं कतबा लेहून दिल्हा पंचाईतांचे सेवेसी आमचे तीर्थरूप सुलतानजी बावा सातान्यास राजदरबारी गेले मान्याची व वतनाची फिर्याद केली त्यावरून माहाराजानी हुजुर पंचाईतानी मनास आणून निवाडपत्र करून दिल्हे व मसलसीचे चंद ऐसे माहाराजास नेऊन



[ ३६९

समजाविले मग त्याजवरून राजपत्र जालें त्याप्रो राजपत्र आले बाकी पंचाईतांचा महज़र व मखलसीचे बंद हे दोन राहिले आहेत ते आणून यावे त्यामध्यें जसे आसेल त्याप्रो वर्तणूक करूं याखेरीज आणखी काही कागदपत्र राजद्वारचा राहिला नाही यासिवाये दिकत घेऊ तरी पांचाचे गुन्हेगार म्हणौन

सुा आर्बा सबैन सन ११८३ तिसरे पत्र गोमाजी व चिमाजी व गोदजी वा सुलतानजी कडू देसमुख काा मार पंचाइतांचे सेवेसी लेहून दिल्हे ऐसे जे आम्ही एक आशंका घेतली होती कीं राजदरबारी निर्णयेपत्र व मखलसीचे बंद ऐसे जाले आहेत ते आणविले म्हणजे त्यांप्रो आपण वर्तूं तेव्हां आपण पुरसीस केली कीं हे पत्रें कोणापासी आहेत ते सांगणे त्याजपासून आणवू त्यावरून आम्ही सिवजी कडूचे नाव घेतलें की आवघे कागदपत्र सिवजी कडूचे घरीं आहेत त्यावरून राजपत्रें वगैरे पत्रें ऐाा साहा आणून दिल्हीं निर्णयेपत्र व मखलसीचे बंद ठिकाणी लागले नाहीत म्हणौन सिवजी कडूस सिलकावण लाऊन किले मारी बसविलें त्यास बारा रोज जाले आट जाच केला ठिकाण नाही मग त्याचे जामिनासहित तसदी व सिलकावण लाविला व सिलकावण लाविली तऱ्हीं त्या कागदाचा ठिकाण लागला नाही मग सेवटीं आम्हास पुरसीस केली कीं या उपरी तुम्ही ठिकाण लाऊन देणें किंवा पुरवणी करून देणे तरी निर्णयेपत्र व मखलासीचे बंद आम्हास ठिकाणी लागत नाही व त्याची पुरवणी या उपरी नाही होत तुम्ही पांच परमेश्वर आहां जेणेप्रो आम्हास आज्ञा आपण तेणेप्रो कराल वर्तणूक करूं यासी करूं तरी शराचे झुटे दिवाणचे गुन्हेगार आपले कागद हा रजावंदीने लेहून दिल्हा सही म्हणौन

येणेप्रो कागदपत्र पंचाईतांपासीं आणून दिल्हे त्याचा सिधांत पंचाईतानी केला कीं सिवजी कडू वंशावळीनें वडील गोमाजी व चिमाजी कडू वंशावळीने धाकटे हे उभयेता निमे निम वांटणीकरितां भांडत आले ज्यास जैसें फावलें तैसें खादलें परंतु वांटणी होऊन सुरळीत चालिलें नाही कलहच करीत आले सांप्रत वडिल धाकुटपणाचें भांडण लागलें ऐविसीं पाहातां गोमाजी व चिमाजी म्हणतात कीं सिवजी कडू हाडामासाचा वडील व जबानी मारनिलेनी आशंका घेतली कीं निश्चये कडू मारेपत्र जाहाले आहे त्यांत आमचे वडील गोविंदराव अगोधर नेलें हे सर्वांस दखल व राजपत्रीं लिहिले आहे याचा निर्णये करून शोध पाहावा ऐसें वारंवार बोलिले त्याजवरून कायदापत्राचा करितां व अर्थांतर मनास आणितां व उभयेतांसहि तसदी लाऊन पुसतां मारेपत्राचें ठिकाण न लागे मारेपत्र निघालियास त्यांत अगोधर नाव असेल तो वडील करावा तें पत्र पंचाईतींत न आलें पुढें मारेपत्र असलियास होईल ऐसा सिध्धांस करून वडिलपणाचा विभाग वडिलास द्यावा तो विभागा खेरीज जाजती नेहमीच नेमून द्यावा त्यावरून तुम्ही व आम्ही राजी रजाबंद होऊन कबूल जालों यावरून पंचाईतानी ठराव करून दिल्हा बितपसील

मोकदमीचे मानपान व कलमे

१ पटी व पासोटी जमीन व नाव नांगर व सिरपाव

१ मानपान टिला विडा व न्हावी व माहार व सेव सबाजी व गुऱ्हालाचें मान व दसऱ्याचा मान व संक्रांत व सणाऱ्या मोल्या व लग्नसंमधें सोयऱ्याच्या वाट्या

१ चांभाराकडील जोडा व दसऱ्याचे तेलियाकडील तेल व कोलीयाची घागर यावयाची व तांबोलियाकडील पाने व गावात लग्न प्रयोजन जाले तरी गण सवासीण व मानाचा विडा व होलीची पोली व पोल्याचा बैल व गवर गणेश व सिराल सेट

१ मोकदमीचा कारभार कामकाज व पानमान व सिरपाव खंडणीचा वगैरे

४

देशमुखीसमंधे वडीलपणाचे मानपाने कलमे

१ इसाफत मौजे गोनवडी प्रा मार येथील रुा ७५ पौ वजा वडीलाकडे जाजती विभागाखेरीज रुा २५ बाकी रुपये ५० पनास येथा विभागें वाटून द्यावे

१ सिक्याचा सिरपाव व किरकोल जागा सिका होईल ते व प्रा मारी मनसबी [१० व गोतपत वडीलपणाची भेट आदा मसाला खंडनीचा सिरपाव वगैरे

१ का मारी देशमुखीचा जोडा व सेवसबजी व मानपान टिला विडा व कारभार

३

येणे प्रो मोकदमीची व देशमुखीची कलमे आलाहिदा करून बाकी राहिली ती वडील धाकटियानी येथविभागे खावी बितपसील

१ राहादारी जकात येथाविभागे

१ मिरासीचा सेतें व मोईनी टिकी येथा विभागें

१ मिरासीचा वाडा घरें का मारचा येथाविभागें

१ आंबा आंबराई निमेनिम प्रा

१ गतकुल जालें त्याचें घर सेत येथाविभागे

१ सिका वडीलाचा प्रा मारी थोर-

१ इनासेते निमेनिम प्रो

१ प्रा मारी गावगना हक — व [२० — फर्मास निमेनिम प्रो

१ प्रा मारी गावगना जोडा राबता तूप बकरे व भेट व संक्रांतीचे तिलगुल येथाविभागे

१ इसाफत मौजे गोनवडी रुा ७५ पौ वजा वडिलपणा रु २५ बाकी रुा ५० पनास येथाविभागे

मेहजर पाटिलकीचा होईल त्याचें उत्पन्न येईल त्या प्रो खर्च व सिरपाव वजा करून बाकी ऐवज राहील तो निमेनिम प्रो

—

१ वतन समंधे खर्च वेच पडेल तो वडील धाकट्यानी येथाविभागें द्यावा कलम

—

५

—

६

येणेप्रमाणे तह करून दिल्हा आहे त्याप्रो तुम्ही व तुमचे भाऊ व आम्ही व आमचे भाऊ वंशपरंपरेने वर्तणूक करूं सद्रहू वडिलाकडे वडिलपणास जी कलमे लिहिली आहेत ती वडिलानेच वंशपरंपरेने अनभवावी बाकी जी कलमे येथाविभागाची राहिली आहेत ती भाऊपणाचे वाटणीप्रो येथाविभागे घ्यावीं धाकटे घरभाऊ वगैरे असतील त्यास वडीलपणाच्या कलमासी समंध नाहीं हे सवादपत्र आपले स्वसंतोशें तुम्हास लेहून दिल्हें यात जो कोण्ही हिला हरकत करील त्यास कुलस्वामीची व पूर्वजांची शफत आसे व दिवाणचा गुन्हेगार व गोताचा अन्याई हे सवादपत्र लेहून दिल्हे सही

निा नांगर



बिा बाजी गोपाल देशपांडिये कुलकर्णी काा मजकूर प्राा मार

तेरीख छ १४ माहे जमा दिलावल

साक्ष हर्जोशि बिन उमाकांत जोशि कसबे मजकुर

गोही काा मार

१ कासीगीर बीा रुद्रगीर गोद्र मठ काा मार

१ सिवराम हजारी काा मार

१ सटवाजी वलद मल्हारसेट सेट काा मार

१ विठल सेट वाा मोरसेट व कासीसेट वाा दादसेट सेटे काा मार

१ बाजी देवराव ब्रम्हे उपाध्ये माहाजन

१ आर्जुनगीर बिन सिद्गीर मठ काा मजकुर

१ खंडोजी वाा संभाजी नाइकवाडी काा मार

१ भवानजी वाा येसाजी पठारे काा मार

१ सोनजी वाा राणोजी नाणेकर काा मार

का मार
१ गोपाल सेट सेटे कासार का मार
१ सकोजी वा देवजी तांबोली सेटे का मार
१ हरि तांबोली दावडकर का मार
१ बालोजी वा त्रिबकजी सेटे सोनार पोतदार का मार
१ सोन माली वा राग माली मेयेचे का मार
१ माहादू वा सिवजी धाडगा का मार
१ धोंडी वा आबाजी सेटकरी का मार
१ मल्हारी वा सोन माली आगरकर का मार
१ रघोजी वा बाल माली कांटगा का मार
१ देवजी वा संभाजी लेडधर का मार
१ तुलाजी वा सुभानजी कर्पे का मार
१ कावजी वा आबाजी कर्पे का मार
१ राणू वा मला माळी बिरदवडा का मार
१ पदाजी वा निबाजी खेडकर का मार
१ वाल्होजी वा माल माली गोरे का मार
१ येसू वा बालामाली गांडाविला
१ येसाजी वा पुंजाजी खराबी का मार
१ गंगाजी वा सकोजी नाणेकर का मार
१ भवानी वा सेवजी मेदिनकर का मार
१ बावाजी कडू का मार
१ रायाजी बारवाटे चौधरी मौजे खरपुडी ता खेड हाली का मार
१ निबाजी जाधव माळी चासनारो- [१०
डकर का मार
१ रामजी वा सिदोजी पानसरे का मार
१ मल्हारी वा माणकोजी सांडेभारड का मार

बलुते का मार

१ मायाजी वा संयाजी सुतार कडू का मार
१ सोनू वा सयाजी सुतार केदारी का मार
१ रायाजी वा माणकोजी लोहार का मार
१ माहादू वा सिदमाहाला राऊत का मार [२०

१ रामा वा बांवजी परीट कडू का मार
१ गुणाजी वा गंगाजी परीट सुखसी का मार
१ लाल महंमद वा सेख महंमद मुलाणे का मार
१ बाबू वा फकीर महंमद मुजावर का मार
१ कुसाजी वा सुभानजी बुरुड
१ गोविंदा वा संगू चांभार का मार
१ सटवा वा माणकू चांभार का कार

१ बहिरु वा संतमाहालक राऊत का मार
१ जावजी वा गोमाजी माहाकसेक का मार
१ कासी वा भिवा न्हावी सकरे का मार
३ माहार का मार
  १ राणा वा कुलनाक गोतरणा का मार
  १ गिरजु वा घोंडनाक गेतरणा कार मार
  १ भिवा वा कमलनाक घोगरा का मार
  ——
  ३

२ मांग का मार
  १ झिमा वा देव राऊत
  १ राणा वा खंड राऊत

---

**लेखांक ८** श्री शके १७०५ माघ शु. १२

० श्री ०
राजा शाहु नर
पती हर्षनीधा-
न माधवराव ना
रायणराव मुख्य
प्रधान

मा अजाम देशपांडे ता चाकण प्रांत जुंनर सुा आर्बा समानीन मया व अलफ राजश्री राघोजी आंगरे वजारत माहा सरखेल याणी हुजूर विदित केले की ता मजकूर येथील देशमुखी निमे आमची व निमे चव्हाण कडू याची त्यास प्रांत मजकुरी न्यायेमनसुबीस आम्ही जावे त्यास कदम कडूने बखेडा केला सा मनसुबी आह्माकडून व्हावी कदम कडू याणी न जावे देशपांडे व गोत मिलोन न्यायेमनसुबी करीत जावी म्हणोन सरकारची पत्रे सादर जाली असता दरम्या-

नेच कदम कडू न्यायेमनसुबीस जातात ते जाऊं नयेत यविसी ताकीद जाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी न्यायेमनसुबी प्रा मजकुरी होणे तेथे कदम कडू याणी जाऊ नये येविसी सरकारची पत्रे सादर जाली असता धटाई करितात यास ताकीद करून सुरळीत वर्तवणे जाणीजे छ ११ रबिलावल आज्ञाप्रमाण (लेखन सीमा)

लेखांक १ ते ८ हे कागद श्रीमंत दादासाहेब ओंकार, पुणें यांचे संग्रहांतील आहेत. ह्यांवरून चाकणचे मोकदमीचा व परगणे मजकूरचे देशमुखीचा शके १२५५ ते १७०५ पर्यंतचा साडेचारशें वर्षांचा वृत्तांत ठोकळ मानानें समजून येईल.

मोकदमीचे व देशमुखीचे तत्कालीन हक्क व न्यायाची पद्धत ह्या महत्वाच्या गोष्टींना हि महजरांवरून बोध होण्यासारखा आहे. [१०

आंग्रे यांचा ह्या वतनाशीं संबंध कसा जडला हें हि पहाण्यासारखें आहे.

ह्या कागदांतून 'चाकण चौऱ्याशी'चा अनेक वेळा उल्लेख आला आहे. हीं ८४ गावें कोणतीं याचा उलगडा झाला पाहिजे.

पां. न. पटवर्धन

## ८७ धडफळे यादी

श्री

हाकीकत रंगो बापूजी धडफले पुणा आले काजकीर्द निजामशा पातशा दौलताबादचा आंमल मलिक आंबर पातशाही दिवाण याचे तर्फेने सिदी याकूब व रंजितराये पुणे ठाणेदार होते शके १५०२ ताा शके १५५१ मलिकंबर याणी मुलूख वैराण वोस पडिला झाडी होवोन जनावर बहुत जाले दुर्गादेवीचा काळ तीन वर्षे पडिला थोर जागा वस्ती राहिली पुढे दाहा बारा वरषे मुलकात वसती नाही मार्ग चालेना तेव्हा मलकांबर याणी रयेतीस आणून वसती केली काटवण[२० तोडिले गावच्या सिवा करून तनखा करून जमाबंदी जाबता केला सिवेचे नेम वही दाणे जमीन जुमले कानगोहोच्या दप्तरी असे मलिकांबर याणी खडकी पेठ वसाहत करून कोट दिल्हा सशाने लांडगा मारिला म्हणौन वसती केली हैबतखान व चिंगसखान मनसबदार होते हरहक इनसाफ करीत होते मलकापुर पेठ केदार-वेसीसनिध केली.

श्री

यादी राजे भोसले यांचे राज्य इस्तकबील तागाईत कारकिर्दी आजता शके १७२९ प्रभवसंवछरे सन १२१७ पावेतो.

१ शाहाजी राजे भोसले हे मालोजी राजे भोसले यांचे पुत्र वडील यांची स्त्री लुखजी जाधवराव देशमुख सरकार दौलताबाद यांची कन्या जिजाऊ निजामशापातशा दौलताबादचे याणी देऊन लग्न केले नंतर शाहजी राजे पातशा मयेत जाल्यावर वजीरी पातशाहचे मुलाची करीत होते काही एक दिवस वजीर होते नंतर विजापूरचे पातशाहकडे गेले ते समई कर्नाटकात होते व मुरार जगदेवराव दिवाण प्रतिनिधी. हे मलिक आंबर यांचे पाठी लागले ते वेळेस शाहजी राजे यांस मेहरबान होऊन पुणें देश व जुन्नर व वाई सिरवळ सुपे इंदापूर वगैरे जाहागीर व चाकण किल्ला दिल्हा ते स(म)ई शाहाजी राजे याणी आपले एख्त्यारी दादाजी कोडदेऊ कारभारी यांचे स्वाधीन सदरहू मुलुक करून पुणें येथे ठाणे घालावयास सांगितले आणि आपण विजापुराकडे व कर्नाटक प्रांती गेले तिकडे चंदी चंदावर वगैरे राज्य मिळवून तिकडे होते आजमासे पंचवीस तीस वर्षे होते नंतर तिकडे च मृत्य पावले कनकगिरीस मेले त्यास त्यांची काजकिर्दी आजमासे

१ शके १५४९ प्रभवसंवछरी दौलताबादेची वजिरी सोडून विजापुराकडे गेले व कर्नाटकांत होते ता। शके १५५५ श्रीमुखसंवछरे या साली मुरार जगदेवराव याजबरोबर पुण्यास आले ते समई पुणे व जुन्नर इंदापूर वगैरे प्रांत जाहगीर जाली तेवेळेस दादाजी कोंडदेव याचे स्वाधीन मुलुक करून आपण विजापुराकडे कर्नाटकात गेले तिकडेच पंचवीस वर्षे अथवा वीस वर्षे होते तिकडेच मेले इकडे दादाजी कोडदेव याणी पुण्यात कारभार केला ते पुण्यात मृत्य पावले शके १५६५ सुभानु नाम सवछरे नंतर सिवाजी राजे याणी दादाजी कोंडदेव मरताच कारभार आपण आटोपिला व राज्य मिळविले

---

सदरहूप्रो कारकीर्द जाली शाहाजी राजे याणी कोणा एकास वतनपत्रे करून दिल्ही त्या पत्रावर सुर सन आरबी साल आथवा शालिवाहन शक यांची दिल्ही राज्याभिषक ते समई नाही.

---

☞ या यादी कसब्यांतील धडफळे यांच्या संग्रहापैकीं होत.

१ शके १५६९ आश्विन वा। १३ पाहिजे.

१ सिवाजी माहाराज राजे शाहाजी राजे याचे पुत्र जिजाऊचे पोटी दुसऱ्यानें जाले सिवनेरीस किल्यावर जन्मले शके १५४९ प्रभव संवछर वैशाख सु (शु)[२] ध्यांत

नंतर पाच साह वर्षे तेथे होते मग दादो कोंडदेव कारभारी याणी शाहजी राजे याचे आज्ञेवर जिजाऊ व सिवाजी राज्यास पुण्यास आणले लालमहाल बांधून तेथे ठेविले ते दादो कोंडदेव मरे तोवर स्वसतेत नव्हते सत्रा वर्षांचे जाले ते समई दादो कोंडदेऊ मेले तेव्हां पासून स्वपराक्रमेकरून किले कोट व मुलुख बहुत काबीज केला पराक्रम बहुत येशस्वी होते यांची कारकीर्द

१ स्वपराक्रमे राज्य मिळविले इा शके १५६५ सुभानु संवछरे ता शके १५९५ प्रमादी संवछर पावेतो राज्य मेळविले यांत कोणा एकास वतनसमधे वगैरे पत्रे सिवाजी राजे याणी दिल्ही ती सुर सन आरबी साल[१० आथवा शालीवाहन शकाची एा काजकिर्दी वर्षे ३१

१ सिव्हासन करून आरूढ जाले छत्रपती शके १५९६ आनंद नाम संवछरे ता शके १६०२ रौद्रनाम सवछरे पावेतो नंतर चैत्रमासी रौद्र संवछरी मृत्य पावले एा काजाकिर्द वर्षे ६ या काराकिर्दीत कोणा वतनदारास वगैरे पत्र दिल्ही त्या पत्रावर स्वस्ति श्री राज्याभिषक शक याची दिल्ही राज्याभिषक शकाचे मूळ शके १५९६ आनंद संवछरापासून चालिला सिवशक

२

—सदरहूप्रमाणे सिवाजी माहाराजाची कारकीर्द वर्षे ३७ जाली यांत राज्याभिषक शक ६ जाले

१ संभाजी राजे सिवाजी महाराजाचे पुत्र वडील याणी राज्य केले इा शके [२० १६०२ रौद्र संवछर ता शके १६०८ क्षय नाम पावेतों नंतर आवरंगशाह पातशा याणी संभाजी राजे व पुत्र शाहूराजे यांस धरून नेऊन तुळापुरीं संभाजी राजे यांस मारिले जीवे मारले शाहू राज्यास दिलीस पाठवून आटक केली ते दिलीकडे वीस वर्ष होते एा संभाजी राज्याची कारकीर्दी जाली वर्षे ७ राज्याभिषक शक १३ या कारकीर्दीत पत्रे जाली ती राज्याभिषक शकाची जाली आहेत .

---

२ वैशाख शु. ५, २ व १ अशा तीन निरनिराळ्या तारखा शिवाजीचे जन्मासंबंधानें दिलेल्या आढळतात.

३ चैत्र शु. १५ शके १६०२

४ शके १५१० अखेर पावेतों असें पाहिजे.

४८

१ राजाराम सिवाजी माहाराजाचे कनिष्ट पुत्र याणी संभाजी राजे मारल्यावर[१० कांहीं एक दिवस देशी व काही एक दिवस कर्नाटकात राहून राज्य केले इा शके १६०९ प्रभव नाम ता सके १६२१ प्रमाथी नामसंवछर पावेतो कारकीर्द जाली राज्याभिषक शके २६ नंतर मृत्य पावले याचे काजकिर्दीत पत्रे जाली ती राज्याभिषक शकाची जाली आहेत एा कारकीर्दी वर्षे १३

१ सिवाजी राजे धाकटे राजारामाचे व ताराबाईचे पुत्र याणी राजाराम वारल्यावर राज्य केले कारभार कुळ ताराईमाहाराजानी केला इा शके १६२२ विक्रम नाम सवछर ता शके १६२८ व्यय नाम संवछर राज्याभिषक शके ३३ पावेतो कारकिर्दी जाली नंतर हे वर्तमान असता शाहूराजे दिलीहून आले याजमुळे
१०]यांची मुद्रा राहिली एा कारकिर्दी वर्षे ७

१ राजा शाहू माहाराज संभाजी राजे याचे पुत्र दिलीहून स्वराज्यास आले शके १६२९ सर्वजित नाम संवछेरी राज्याभिषक शके ३३ पासून कारकीर्द चालिली ता शके १६७१ शुक्लनामसवछरे राज्याभिषक ७६ एा वर्षे ४२॥ राज्य केले नंतर मार्गसीर्ष मासीं शुक्ल संवछरी साताराचे मुक्कामी मृत्य पावले पुत्र संतान नाही या कारकिर्दीत राज्याभिषक शकाची पत्रें जाली.

१ रामराजे शाहू माहाराज मेलियावर बारसी पानगावीहून आणून श्रीमंत बाळाजी बाजीराव नानासाहेब प्रधान व सदाशिव चिमणाजी भाऊसाहेब याणी ताराई माहाराजाचे विचारे राज्यासनी बसविले दत्तपुत्र करून राज्य चालविले इा शके १६७१ शुक्लसंवछर पौषमास ता शके १६९९ हेमलंबी नाम सवछरे राज-
२०]शक शके १०४ नंतर मेले मार्गेश्वर मासी एा कारकिर्दी वर्षे २८ पुत्रसंतान नाही या कारकिर्दीत राजपत्रें जाली ती राज्याभिषकशकाची जाली.

१ शाहूराजे हली सातारा आहेत हे रामराज्यास पुत्र जाला नाही सबब राजे भोसले याचे वंशातील दत्त पुत्र घेऊन राज्यासनी बसविले विा सखाराम भगवंत बोकील ( बापू ) व बाळाजी जनार्दन भानू ( नाना फडणिस ) पंत प्रधान याजकडील कारभारी याणी राज्यपदी स्थापून राज्य चालविले शके १६९९ हेमलंबी संवछरे राज्याभिषक शके १०४ ते हली वर्तमान आहेत यांचे कारकिर्दीत राजपत्रें होत नाहीत पंत प्रधान याणी मना केली आहेत राजशक १३४ सदरहू शाहू राजे यास मृत्य जाला शके १७३० विभव संवछर वैशाख शुा ९ मुा सातारा येथें देव आज्ञा जाली पुढे राज्यासनी त्याचे पुत्र यास बाजीराव रघुनाथ प्रधान
१०]याणी स्थापून शाहूचे नावच चालविले सिका पंत प्रधान शाहूचे नावचाच चालवीत आहेत नव सिका केला नाही बाजीराव याचे काजकिर्दीत याप्रों जाले

१ शके १५७६ जय नाम संवछरे दिलीहून मिर्जाराजा दक्षणेस सुभा होऊन आले व शास्ताखान सिवाजी राजे यांचे पारपत्यास आले पुण्यांत राजवाड्यात येऊन राहिले तीन चार वर्षे शास्ताखान या प्रांती होते सिवाजीराजे याणी खानाचा आंगठा तोडिला व पुत्र मारिला

१ शके १५८५ शोभकृत संवछरे माघ शुा ६ शाहाजी राजे भोसले कर्नाटक प्रांती कनकगिरीजवळ होते घोड्याखाली आले घोड्याचा पाय पोटावर पडून परलोकास गेले[५]

१ शके १५८६ क्रोधी नाम संवछरे मिर्जा राजा यांचा व सिवाजी राजे भोसले यांचा सला जाला मुा आजमगड ऊर्फ पुरंदर नजीक नारायणे पेठ सला जालियावर सिवाजी राजे याणी दिलीस आवरंगजेब पातशाहा यांचे भेटीस[६] [१० जावे ऐसे ठरले सबब सिवाजी राजे व संभाजी पुत्र पांच हजार लोक घेऊन रामसिंग मिर्जा राजाचे पुत्र याजबरोबर दिलीस जाऊन पातशा यांस भेटले पातशाहाचे हुकुमात वर्तनात सबब सिवाजी राजे व संभाजी राजे यांस कैदेत ठेविले होते तेथून पळाले ते काशी क्षेत्रास जाऊन गुप्त राहिले मग आडिचा वर्षानी देसी स्वराज्यास आले जिजाऊ साहेबांस भेटले

१ शके १५९६ आनंद नाम संवछरे चैत्र मासी सिवाजी राजे याणी कासिहून गागाभट आणिले होते त्याणी सिवाजी राजे यांस राज्याभिषक करून छत्रपती राजे म्हणून सिव्हासनारूढ केले[७] मा रायेगड ते समयी दानधर्म बहुत केला सिवाजी राजे याजवल सेनाबळ लक्ष होते व द्रव्य दाल (?) बहुत दौलत होती स्वपराक्रमे राज्य मेलवून छत्रपती जाले राजपत्रावर राज्य शक चालू केला [२०

१ शके १६०२ रौद्र नाम संवछरे चैत्र मास सिवाजीराजे माहाराज छत्रपती यांस कैलासवास जाला पौर्णिमेस.

१ शके १६०२ रौद्र नाम संवछरे वैशाख मास संभाजी राजे सिवाजी राजे सिवाजी माहाराजाचे पुत्र यांस राज्याभिषक छत्रपती जाले त्याणी कबजी जवल ठेवून त्याचे मसलतीने वर्तू लागले

---

५ काव्येतिहाससंग्रह यादी ४१० व मल्हार रामराव कृत सप्त प्रकरणात्मक चरित्र पृष्ठ ८० यांत शहाजी शके १५८३ प्लवनाम संवत्सरे माघ शु. ५ (ता. १५।१।१६६२) रोजीं वारल्याचें सांगतात. डफ इ. स. १६६४ देतो.

६ ही भेट आग्र्यास झाली. राजवाडेकृत म. इ. सा. खंड ८, लेखांक २३, व मॉडर्न रिव्ह्यू, कलकत्ता जुलै सन १९०९ प्रो. जदुनाथ यांचा औरंगजेब

७ राज्याभिषेक ज्येष्ठ शु. १३, शके १५९६

१ शके १६०६ रक्ताक्षी नाम सवछरे फालगुन मासी आवरंगजेब पातशा दिलीहून दक्षणेस आले त्याणी विज्यापूर सर करून घेतले इदलशाही बुडविली.

१ शके १६०७ ता शके १६०८ क्षयेनाम संवछरे हैद्राबाद भागानगर व बेदर सर करून आवरंगशाहा तुळापुरास आले भीमातिरीं मुकाम जाला चैत्र मास शके १६१० विभवनाम संवछरे तुळापुरचे मुकामी हजरत आवरंगजब याणी कबजीचे हतून संभाजी राजे छत्रपती व पुत्र शाहू राजे यांस भेटीस नेऊन संभाजी राजे यांस जिवे मारिले बेगम पातशाची होती तिने शाहूराजे यांस चिरंजीव म्हणून आपले^८ कैदेत ठेवून दिलीस पाठऊन दिल्हे

१ शके १६११ शुक्लनाम संवछरे राजाराम व ताराबाईसाहेब व समस्त राजमंडल स्वरा-
१०ज्याहून तांबाचे भये कर्नाटकात चंदीचंदावराकडे गेले

१ शके १६१२ प्रमोद नाम संवछरे किले कोंढाणा सिव्हगड फते करून आवरंगशा याणी पुणियात बोरबनांत छावणी केली सातारा व तमाम किले सर केले मुलुकाची आबादानी करून बिघावणी केली मोहियाबाद पेठ बसविली उर्फ बुधवार

१ शके १६१९ ईश्वरनाम संवछर वैशाखमासी राजारामछत्रपती राजमंडलसुधा चंदी चंदावराहून देसीं स्वराज्यास आले तांबासी सख्य जाले शके १६२२ विक्रम नाम संवछरे

१ शके १६२१ प्रमाथी संवछरे फाल्गुन मासी राजाराम छत्रपती परलोकास गेले मुा सिव्हगड

२०]१ शके १६२२ विक्रम नामसंवछरे चैत्र मासी राजाराम यांचे पुत्र सिवाजी राजे यांस राज्याभिषक जाला

१ आवरंगजेब पातशा दिलीपती हे दक्षणप्रांत सर करावयास दुसऱ्यानें आले ते दक्षणेत आजमासे चोवीस वर्षे होते नंतर आमदानगर येथें छ २८ जिल्कादी

---

८ संभाजीचा वध शके १६१० फाल्गुन वा। ३० रोजीं झाला.

९ हें बोरवन देशमुखाचें. ज्या बोरबनांत अवरंगजेब उतरला होता तेथें हलीं भवानी पेठ आहे.

माघ वा ३० शके[१] १६२८ च्यार घटका दिवस राहता पातशा अवरंगजेब शांत जाले नंतर रोज्यास नेऊन कबर करून ठेविले

१ शके १६२८ व्ययेनाम संवछरे मार्गेस्वर मासी राजा शाहू दिलीस आठरा वर्षे कैदेदाखल होते ते पातशाही हुकुमाने स्वदेशास यावयास दिलीहून निघाले सरदेशमुखी पातशानी शाहूराजे यांस दिल्ही

१ शके १६२९ सर्वजित नाम संवछरे राजा शाहू दिलीहून स्वदेशास आले ते समई ताराऊ साहेब यांचे चितात विषम आले त्याणी धनाजी जाधवराव सेनापती व हुजरात राजमंडल चाळीस हजार फौज जमा करून बोलणे घातले की शाहू नव्हे तोतिया आला आहे यास लुटून घ्यावे तेव्हां शाहूराजे याणी राजमंडलचे लोक व बाळाजी विश्वनाथ व अंबाजीपंत पुरंदरे यास फोडून धनाजी जाधवराव यास फजित केले जाधवराव हात बांधून शाहू माहाराजास शरण आले आणि निरोप घेऊन मोगलाईत गेले इकडे शाहू माहाराज यास राज्याभिषक होऊन संपूर्ण राजमंडळ आष्ट प्रधान येऊन भेटले मग किले कोट मुलुकाचा बंदोबस्त माहाराजानी केला नंतर ताराऊ साहेब यांस भेटले

१ शके १६२९ सर्वजित नाम सवछरे आवरंगजेब हाक जाल्यावर दक्षणेत पातशाही फौज व सलतनत होती ते बाहादुरशाहा पातशा याणी आपले जवळ बोलाऊन घेतली आणि निजामनमुलुक आसबज्या यांस सहा सुभे दक्षणचा सुभा देऊन दक्षणेस पाठविले ते आवरंगाबादेस येऊन दक्षणचा बंदोबस्त केला

१ शके १६२९ सर्वजित संवछरे वैशाखमास बाजी कदम फौजदार व गुंडाबा नाईक सेखदार हे रंभाजी निंबालकर नबाव आसबज्याकडील सरदार यांजकडून आले त्याणी पुण्यात आमल बसऊन ठाणे घातले आठ वर्षे आमल पुण्यात होता

१ शके १६३५ विजय नाम संवछरे आस्विन मासी राजा शाहू याणी बाळाजी विश्वनाथ यांस मेहरबान होऊन पंतप्रधान केले वस्त्रे दिल्ही बहिरोपंत पिंगळे प्रधान होते ते दूर केले आंबाजीपंत पुरंदरे यास बाळाजी विश्वनाथ पंतप्रधान यांची दिवाणगिरी देऊन वस्त्रे दिल्ही

---

१० अवरंगजेबाच्या मृत्यूची तीथ ही च खरी आहे. रा. राजवाडे आपल्या 'शकावली'च्या ५ व्या पृष्ठावरील एका टीपेंत शके १६२८, जुलुसी सन ५० जिल्काद २८, फाल्गुन वा १४ ही देतात ती त्यांची नजरचूक असावी. त्या वेळेस जुलुसी सन ५१ च असून महिना माघ होता.

१ शके १६३७ मनमथनाम संवछरे कार्तिक मासी बाळाजी विश्वनाथ पंत प्रधानं याजकडील वाकोजी ढमेरेढे[११] फौजेनसी येऊन रंभाजी निंबालकर याजकडील ठाणेदार पुण्यात होते ते उठऊन दिल्हे आणि प्रधानपंताचे ठाणे बसले

१ शके १६४० विलंबी नाम संवछरे बाळाजी विश्वनाथ पंतप्रधान व आंबाजी पंत पुरंधरे यांस दमाजी थोरात रुस्तुमराव[१२] याणी धरून नेले हिंगणगावी[१३] गढीमधे ठेविले खंडणी कबूल करून वोलीस आपाजी माणकेश्वर आंधीकर घेतले व सातरजमेविसी जामीन मोरो विश्वनाथ व गणेश नारायेण धडफळे यांस रुस्तुमराव याणी घेऊन पंतप्रधान सोडले सुटून आल्यावर पंतप्रधान याणी बारा हजार फौजेनसी नबाब आसबज्या यांजसमागमे दिलीस गेले

१ शके १६४२ शार्वरी नाम संवछरे बालाजी विश्वनाथ प्रधान यांची स्वारी दिलीहून देसी आली राजेश्रीची भेट साताराचे मुकामी जाली नंतर तेच साली पंतप्रधान यांस देवआज्ञा जाली चैत्र शुा[१४] ७ शके मजकूर

१ शके १६४२ शार्वरी संवछरे बाजीराव बलाळ यांस प्रधानपंताची वस्त्रे राजश्री छत्रपती शाहू याणी दिल्ही वैशाखमासीं मुा सातारा वस्त्रे जाली

१ शके १६४० विलंबी संवछरी बालाजी विश्वनाथ प्रधान याणी मोगलाईकडील सैदाची कुमक आणून दमाजी थोरात रुस्तुमराव यांस धरून कैद केले पुरंदरास ठेविले हिंगणगावची गढी पाडून मुळा नदीत टाकली पांढरीवर गाढवाचा [१०
नागर फिरविला.

१ शके १६४३ पुवनाम सवछरे बापूजी श्रीपत सुभेदार पुणे प्रांत श्रीमंत बाजीराव बलाळ प्रधान यांचे तर्फेने होते खासा पंतप्रधान पुणियास आले मोरो विश्वनाथ व गणेश नारायेण धडफळे यांचे वाड्यात येऊन राहिले दोन तीन वर्षे येत जात होते नंतर पंतप्रधान याणी पुणियात वाडा बांधावयाची योजना केली

१ शके १६५० किलक नाम संवछरे कसबे पुणे येथे पुरातन नदीकिनारा कोट किले हिसार मोगलाई ठाणे होते तो कोट श्रीमंत बाजीराव बलाळ प्रधान यांणी पाडून मैदान केले मग मुछदी यांस वगैरे लोकास घरे बांधावयास जागा दिल्ही पौषमासी कोट पाडला कसबे पुणा येथे श्रीनारायणेश्वर व पुणेश्वर नदीकिनारा होते पीर आवलिया आले त्यांत सैद हिसामदीन सतःळ व सैद सलाऊद्दीन

---

११ हा तळेगांव-ढमढेरे, ता० शिरूर, जि० पुणें येथील मराठा शिलेदार.

१२ हा किताब आहे

१३ हें लहानसें खेडेगांव तळेगांव-ढमढेऱ्यापासून ३ कोसांवर आहे.

१४ अन्यत्र शु. ६ शनवार ही तीथ आढळते.

आवलीया याणी नारायणेश्वर व पुणेश्वर करामतीने किले पुरंदरचे माचीस पुणेश्वर ठेविला व तळी गडाखाली नारायणेश्वर ठेविला त्यांची स्थळे पुण्यांतील आपण घेऊन राहिले सन ६५६ फसली सन होता कासारी व कुंभारी दोन गाव पूर्व आंगे होते ते मोडून कसबा केला त्याचा दाखला आद्यापि सिवेचा गधा गाढव कोटाचे पूर्वेस बाजारचे रस्त्यास आहे कसबे पुणे यास पेठा जुन्य काजकिर्दी मोगलाई

१ निजामशाही मलिकांबर याणी मलकापूर पेठ केली ऊर्फ रविवार

१ मुर्तजाबाद शनवार

१ मोहियाबाद ऊर्फ बुधवार

१ इदलशाही शाहाजी राजे याणी शाहपूर ऊर्फ सोमवार पेठ केली [१०

२/५ आस्तापूर मंगलवार

१ शके १६५१ सौम्य नाम संवछरे फाल्गुण[15] शुा कसबे पुणे येथे मावळ वेसी जवळ जागा वाडा बांधावयास श्रीमंत बाजीराव पंडित प्रधान याणी घेऊन वाडा बांधावयास मुहूर्त केला नव बुरजी कुसू वाड्यास घालून आंत इमारत केली उतरेस दरवाजा थोर करीत होते त्यास राजश्री छत्रपती याणी मनाई केली सबब दरवाराजाचे सिंडार राहिले पुणे कसबा आहे तो शहर करावे म्हणौन आज्ञा केली

१ शके १६५९ पिंगल नाम सवछरे श्रीमंत बाजीराव बलाळ प्रधान याणी सरदार व फौजेनसी हिंदुस्थानची स्वारी करून दिलीस जाऊन माघारे देसी येताना मार्गात ताल भूपाल नजीक नवाब निजामन यांची लढाई होऊन [२० निजामनास जेर केले मग तह जाला माळवा प्रांत पंत प्रधान याणी घेऊन उजनी इंदूर वगैरे जागा ठाणी बसविली नंतर पुण्यास आले

१ शके १६६१ सिध्धार्थी संवछरी चिमणाजी बलाळ आपासाहेब याणी वसई घेऊन ठाणे बसविले वैशाख वा २ सोमवारी

१ शके १६६२ रौद्र नाम संवछरे बाजीराव बलाळ प्रधान यांची स्वारी माळव प्रांती जाताना नर्मदा तीरी[16] पंतप्रधान यास कैलासवास जाला फौज व

---

१५ माघ शुा ३ मंदवार पाहिजे.

१६ रावेर आणि कांकरिया या दोन्ही गांवांशीं श्रीमंताचे निधनाचा संबंध आहे. रावेर खड्यानजीक प्राणोत्क्रमण झाले त्या ठिकाणीं श्रीमंताचें स्मारक म्हणून एक छत्री असून, तिच्या समोंवती वोवऱ्या आहेत. श्रीमंतांच्या देहाला अग्नी दिला तें ठिकाण कांकरियाजवळ नर्मदेच्या प्रवाहाच्या मध्यभागीं आहे.

( पृष्ठ ३८४ पहा )

सरदार व मुछद्दी पुणियास आले चिमाजी आपा व बाळाजी बाजीराव यसां भेटले नंतर उभयेता सातान्यास राजश्रीकडे पंतप्रधानकीची वस्त्रे घ्यावयास गेले तेथे रघोजी भोसले नागपूरकर व बाबूजी नाईक बारामतकर व ताराऊ साहेब याणी माहाराज शाहू यांस नजर कबूल केली की बाबूजी नाईक यास पंतप्रधानची वस्त्रे यावी त्यामुळे घोळ पडला एक वर्ष वस्त्रे जाली नाहीत नंतर राजेश्री महाराज कृपाळू होऊन कोणाचे न ऐकता बाळाजी बाजीराव पेशवे यांस पंत प्रधानची वस्त्रे देऊन रवाना केले शके १६६३ दुर्मती संवछरी फाल्गुण मासी पुणियास आले बाबूजी नाईक यांची मुले माणसे दरोबस्त पुण्याहून काढून दिल्ही

१०]१ शके १६६४ दुंदुभीनाम संवछरे बाळाजी बाजीराव पंतप्रधान याणी फौजेचा जमाव करून वराडप्रांती जाऊन गढे मंडळ वगैरे जागा घेऊन ठाणी बसाविली व रघोजी भोसले यांस फौजेनसी लुटून घेतले भोसले पळाले पंतप्रधान पाठी लागले गोंडवणाहून गयाक्षेत्रापावतर गेले क्षेत्रविधी करून माघारे देशास आले पुण्यास शके १६६७ क्रोधन संवछरी

१ शके १६६९ प्रभव नाम संवछरे नासरजंग नवाब हैदराबादेहून पुण्यास आले पळण जाली नंतर पंतप्रधान यांचा व नवाबाचा मुकाबला होऊन सला जाला नवाब माघारे गेले

---

( पृष्ठ ३८३ वरून )

या ठिकाणीं एक चबुतरा असून, त्यावर तुळशीवृंदावन आहे. हें ठिकाण पवित्र मानिलें जाण्यास एक कारण आहे. तें हें कीं, नर्मदेच्या पात्राच्या मध्यभागीं बेटासारखी थोडी जमीन असून पावसाळ्याच्या दिवसांत सेरांज करून बाकीच्या ऋतूंत त्या बेटाला पाणी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतांना अडकून वळतें. बाजीरावसाहेबांनीं कैलासवास केला त्या स्थलीं इमारतीचें काम श्री. थोरले नानासाहेब पेशवे यांनीं रा. राणोजी शिंदे याचे विद्यमानें करून, रावेर गांव वृंदावनाचे बेगमीस करून दिला होता. ( पहा बाळाजीबाजीराव पेशवे यांची रोजनिशी, भाग १ ला, पृ. ९९ व १०१ ) पुण्यशील अहिल्याबाईच्या वेळे पासून होळकर सरकारकडून पुजाऱ्यास १०८ रुपयांचें वर्षासन चालू आहे. रावेर गांव पेशव्यांच्या राजवटींत परगणे कान्हापूर समत विज्यागड सालीं मोडत असे; आतां इंग्रेजींत तो नेमाड जिल्ह्यांत आहे. खांडव्याहून इंदूरकडे जातांना दरम्यान धनावद म्हणून स्टेशन आहे तेथें उतरून ५।७ कोस बैलगाडीनें जावें लागतें,

१ शके १६७१ शुक्ल नाम संवछरे मार्गेश्वर मासी राजा शाहु छत्रपति मरणासंघ जाले ते समई बाळाजी बाजीराव पंतप्रधान यांस स्वराज्याचा बंदोबस्त करणे म्हणून आज्ञा करून माहाराज छत्रपती कैलासवासी जाले सखवरबाई राणी याणी सहागमन केले माहुली संगमी

१ शके १६७१ शुक्ल नाम संवछरे पौषमासी बारसी पानगावीहून राजाराम यास आणून साताराचे मुकामी राज्यासनी बसविले राज्याभिषक करून राजाराम यांची द्वाही फिरविली आष्ट प्रधान यांस व राजमंडळचे लोकास वस्त्रे देऊन नवीन मुद्रा केली नंतर पुणियास आले

१ शके १६७२ प्रमोद नाम संवछरे श्रीमंत बाळाजी बाजीराव नानासाहेब पंत प्रधान फौजेनसी भागानगर प्रांती स्वारीस गेले विजयादशमीचे मुहुर्तावर गेले नंतर पुणियावर दमाजी गायेकवाड समशेरी बाहदर फौजेनसी गुजराथ प्रांतीहुन आले धामधूम केली पुणे पळाले समशेर बाहदर सातारियास जाऊन ताराऊ साहेबास भेटले हे वर्तमान श्रीमंत नानासाहेब यांस समजले ते भागानगर प्रांतीहून तावडतोब सातारियास आले श्रीमंताची व दमाजी बावाची लढाई जाली दमाजी बावा यांस धरून नजर बंद केले नंतर पुण्यास आले मग गुजराथचा तह करून दमाजी बावास वस्त्रे दिल्ही रवाना केले

१ शके १६७३ प्रजापती नाम संवछरे आषाढ मासी किल्ले कोंढणा ऊर्फ सिव्हगड चिमणाजी नारायेण सचीवपंत यांजकडे होता तो नानासाहेब यांणी घेऊन जिवाजी गणेश खासगीवाले यांजकडे बंदोबस्त करणे म्हणून आज्ञा केली

१ शके १६७३ प्रजापती नाम संवछरे पौषमासी नवाब निजामन आलीखान बाहदर फौजेनसी रामदासपंत दिवाण बरोबर घेऊन श्रीमंतासी लढाईस आले कोरेगाव भीमातीरी आले पुणे पळाले नंतर श्रीमंताचा व नवाबाचा मोकबला होऊन सला जाहला नवाब हैदराबादेस गेले श्रीमंत पुण्यास आले

१ शके १६७४ आंगिरानाम संवछरे श्रीमंत नानासाहेब याणी दिल्ली दरवाजा वाड्याचे उत्तरेस भिंतीत खिंडार फाटक होते तेथे दरवाजा बांधावयास काम लाविले व विश्वासराव याचे लग्न जाले

१ शके १६७५ श्रीमुखनाम संवछरे श्रीमंतानी माहादाजी आंबाजी पुरंदरे यांस घरी बसवून सदाशिव रामचंद्र यास दिवाणगिरीचे काम सांगितले भाऊसाहेब यांचे हस्तगत होऊन दिवाणगिरीचे काम करू लागले

---

१७ शाहुमहाराज शके १६७१ मार्गशीर्ष शु. २ शुक्रवारीं वारले.

१८ लग्न हरि बाळकृष्ण दीक्षित पटवर्धन यांचे कन्येशीं झालें.

१ शके १६७६ भावनाम सवछरे कार्तिकमासी सिंव्हस्तामुळे श्रीमंत नानासाहेब भाऊसाहेब यांची स्वारी नासिक प्रांती गेली त्रिंबक किला मोगलाकडे होता तो घेऊन ठाणे बसविले श्री त्रिंबकेश्वरावर मसीद होती ती काढून श्रीचे देवालय बांधावयास काम चालविले व कुशावर्त बांधिले

१ शके १६७७ ता। शके १६७८ धाता नाम संवछरे दोन वर्षांत श्रीमंतानी कर्नाटक प्रांती स्वारी करून ठाणी बसविली व नवाबासी लढाई करून साठी लक्षाची जाहगीर दौलताबाद घेऊन ठाणी बसविली

१ शके १६७९ ईश्वर नाम संवछरे चैत्रमासी रघुनाथ बाजीराव दादासाहेब हिंदुस्थानची स्वारी करून लाहूरास जाऊस देसी पुण्यास आले सखाराम बापू बरोबर होते

१ शके १६८१ प्रमाथी नाम संवछरे विजयादशमीस सदाशिव चिमणाजी भाऊसाहेब व विस्वासराव बलाळ हिंदुस्थानचे स्वारीस निघोन गौरपिराजवळ डेऱ्यास गेले इभ्रामखान व हुजुरात पागा वगैरेचा भरणा मोठा करून स्वारीस गेले

१ शके १६८१ प्रमाथी नाम संवछरे कार्तिक शुा ९ मुजफरजंग व त्याचा भाचा हैदरखान या उभयेतांस सदाशिव चिमणाजी भाऊसाहेब याणी गारपीरचे मुकामी आणून डोकी मारली उभयेतांची

१ शके १६८२ विक्रम नाम संवछरे नानासाहेब यांची स्वारी हिंदुस्थानप्रांती भाऊसाहेब यांचे कुमकेस गेली आहीरवाड्यापावेतर जाऊन स्वारी माघारी आली

१ शके १६८२ विक्रम नाम संवछरे पौश शुा८ हिंदुस्थानात भाऊसाहेब व विश्वासराव व जनकोजी सिंदे व मल्हारजी होळकर व गोविंद बल्हाळ बुधेले व ईभ्रामखान वगैरे सरदार फौजेनसी जाऊन तमाम ठाणी बसविली कुंजपुरा घेऊन कुतुबशाहा मारिला सुरजमल जाट भरतपूरकर यासी बिघाड होऊन जाट भरतपुरास गेला दिलीचे ठाणे नारो शंकर याजकडे सांगोन भाऊसाहेब पाणीपतास गेले नजीबखान व सुजातदौले याणी आबदुल्ऴभाली आटके पलीकडून कुमकेस आणून पानपतावर आले दोन्ही फौजा मातबर दोन तीन महिने लढाई होत होती सेवटी पौश शुा८ शके १६८२ विक्रम संवछरे लढाई मातबर जाली बहुत रण पडिले विस्वासराव यांस गोळी लागून पडले भाऊसाहेब व जनकोजी सिंदे व इभ्रामखान गर्दीत गलत जाले

---

१९ गारपीर हें ठिकाण पुणें कलेक्टरकचेरीनजीक आहे.

१ शके १६८३ वृषा नाम संवछरे जेष्ट वा।६ मंगळवारी मु।। पर्वती येथे नानासाहेब पंत प्रधान यांस देव आज्ञा जाली आवसीचे प्रहर रात्री

१ शके १६८३ वृषा नाम संवछरे आषाढ मासी वा।३ माधवराव बलाळ प्रधान यांस साताराचे मुकामी वस्रे मुद्रा राजश्री छत्रपती व ताराऊसाहेब याणी दिल्ही पंतप्रधान जाले नंतर पुणियास आले

१ शके १६८४ चित्रभानु नाम संवछरे रघुनाथ बाजीराव दादासाहेब याणी मिरजेस जाऊन लढाई करून मिरज घेतली गोपाळराव गोविंद मिरजकर आवघे मोगलाईत गेले

१ शके १६८५ सुभाँ नाम संवछरे जेष्ट शु।। ९ नवाब निजामन आलीखा बहादर व जानोजी भोसले व विठल सुंदर राजे प्रतापपंत मोठे फौजेनसी पुणियावर चालून आले पुणियास आग्नी देऊन जाळले मुलुक लुटून जाळला दादासाहेब व माधवराव रावसाहेब भागानगर प्रांती गेले

श्री

स्मरणार्थ दिनचर्या

१ शके १६८४ चित्रभानु संवछरे रघुनाथ बाजीराव दादासाहेब हे माधवराव बलाळ प्रधान याजवर रुसून एका घोड्यानसी वाड्यातून गेले दोन महिन्यात वीस हजार फौज जमा करून माधवरायावर चालून आले कार्तिक वा।११ मु।। न्हावरे ता।। कर्डे भीमेपलीकडे लढाई जाली दादासाहेबाची फते जाली त्रिंबकराव मामा व बाबूराव फडणीस व गोपाळराव मिरजकर पंतप्रधानाकडील पळून गेले माधवराव बलाळ पंतप्रधान एकटे जाऊन दादासाहेबास भेटले नीळकंठ माहादेव पुरंदरे व सखाराम बापू कारभार करू लागले नंतर नवाब निजामन आली मोगल यांच्या भेटी मु।। पारगाव मालोचे येथे जाल्या पासष्ट लक्षाची जाहगीर भाऊसाहेब याणी घेतली ती मोगलास माघारी दिल्ही मोगल भागानगरास गेले नंतर दादासाहेब मिरजेस जाऊन मोर्चे लावून मिरज घेतली मोगलाचा व पंतप्रधानाचा सला जाला तदनंतर श्रीमंत साताराचे मुकामी येऊन मार्गेस्वर वा।१३ रामराजे यास बाहेर काढून आधिकार दिल्हे

१ रामचंद्र जाधवराव यांस सेनापती

१ नारो शंकर यांस प्रतिनिधी

१ विठल सिवदेव यास राजाआज्ञा

१ कान्होजी मोहिते यास सरलष्कर

४

च्यार पदे जुनी काढून नवीन केले वरकड जुनीच राखली आणि मिरजेस जाऊन मिरज घेतली प्रतिनिधीचे पद नारो शंकर यांस दिल्हे यास्तव दमाजी व येमाजी प्रतिनिधी जुने यांचे कारभारी होते ते जानोजी भोसले नागपूरकर यांजकडे जाऊन भोसल्यास मोगलाकडे घेऊन आले आणि मोगलांचा व पंतप्रधानाचा सला बिघडविला मोगल पंतप्रधानावर चालून आले तेव्हां पंतप्रधान याणी मिरजेहून कूच करून औरंगाबादस जाऊन खंडणी घेतली आणि वराडप्रांतीं गेले मोगलही मागे वराडात गेले पंतप्रधान वराडातून भागानगर प्रातो गेले मागे नबाब निजामन आली व जानोजी भोसले वगैरे मोठे फौजेनसी वराडातुन पुणियास चालून आले जेष्ट मासी शके १६८५ मधे पुणियास आग देऊन जाळले मग मोगल माघारा गेला तो श्रीमंतानी हि निकड करून मोगलासी गाठ घालावयास गेले राक्षसभुवनावर श्रीमंताची व नवाबाची गाठ पडून लढाई जाली श्रावण शुा १ शके १६८५ विठल सुंदर व इस्माल खादनी वगैरे सरदार मोगलाकडील यास लढाईत ठार करून दाहा हजार फोज लुटून घेतली खासा नवाब निजामली पळून शहरास गेले त्यांस शहरात कोंडून नव लक्षाची जाहगीर घेतली श्रीमंताची फते जाली मग आश्वीन आखेरीस पुण्यास आले गाव जळाला सबब पुण्याची आबादी करून पौषमासी कर्नाटक प्रांती हैदर नाईक याजवर स्वारी करून गेले

१ शके १६८६ तारण संवछरे वैशाख शुा २ श्रीमंताशी व हैदरनाईक यासी लढाई लागली सबब श्रीमंतानी छावणी करून भाद्रपद मासी येऊन धारवाड घेतले दादासाहेब नासिकाजवळ आनंदवलीस आले श्रीमंतानी धारवाड घेऊन मागती हैदरासी गाठ घालून पळविला तो झाडीत चिदनुराकडे गेला दादासाहेब देशीहून जाऊन आनंतपुरावर दादासाहेब व रावसाहेब याच्या भेटी होऊन सख्य जाले

१ शके १६८७ पार्थिव संवछरे श्रीमंत रावसाहेब व दादासाहेब वराडात जाऊन भोसल्यावर शह देऊन दादासाहेब हिंदुस्थानात फौजेनसी स्वारीस गेले

१ शके १६८८ व्यये संवछरे माधवराव बलाळ प्रधान रावसाहेब यांची स्वारी कर्नाटकात जाऊन सिरे मेदगिरीहूनं कोटे हैदराकडील घेऊन पुण्यास आले

१ शके १६८९ आषाढ मासी दादासाहेब हिंदुस्थानातून देसी आले श्रीमंत रावसाहेब जाऊन भेटले पुढे कलह वाढला दादासाहेब आनंदवलीहून धोडपेस आले

१ शके १६९० सर्वधारी संवछरे जेष्ट मासी श्रीमंत माधवराव बलाळ प्रधान फौजेनसीःधोडप किल्यानजीक जाऊन दादासाहेब यासी लढाई करून मोरो विठल व चिंतो विठल पाडाव करून दादासाहेबाची फौज लुटली दादासाहेबं किल्याखाली येऊन श्रीमंतास भेटले नंतर आषाढ मासी पुण्यास आले

१ शके १६९० मार्गस्वर मासी श्रीमंत पंतप्रधान स्वारीस निघाले ते तुळजापुरा- [१०
वरून निजामनआली याचा दिवाण रुकमतदौला यास फौजसुधा घेऊन वराडात जानोजी भोसले याजवर चालून गेले भोसले पळाले श्रीमंत मागे लागले नागपूरसुधा वराडप्रांत लुटला गाठ पडली नाही भोसले निर्मळचे रोखे आले श्रीमंत पाठीवर आले मग चैत्रमासी भेटून सला जाला नंतर रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण बिनिवाले हिंदुस्थानात पंचवीस हजार फौजेनसी रवाना केले

× × ×

१ शके १६९२ विकृत नाम संवछर कार्तिक मासी श्रीमंत रावसाहेब कर्नाटकात जावयास निघाले कृष्णातीर पार्वेतो गेले शरीरप्रकृति ठीक नाही सबब त्रिंबकराव मामाचे कुमकेसं फौज रवाना करून खासा पुण्यास आले फालगुण मासी [२०

१ शके १६९९ हेमलंबी संवछरे मार्गेश्वर शुा १० भोमवासी रामराजे छत्रपती शाहु राजे यांचे दत्तपुत्र यांस देवआज्ञा जाली

१ शके १७०० विलंबी सवछरे मार्गेश्वर वद्य ७ रामराजे छत्रपती यांस पुत्र नाही सबब दत पुत्र जितीहून आणून नांव शाहूराजे ठेऊनं सिव्हासनी सातान्यास बसविले ते समई माधवराव नारायण पंतप्रधान याजकडील कारभारी याणी माधवराव नीळकंठ पुरंदरे व आमृतराव पेठे यांस पाठवून तख्ती राज्यास बसविले पुढे चैत्र शुा १ शके १७०१ नवी मुद्रा राजमुद्रा केली व पंतप्रधान याची मुद्रा करून दिल्ही

१ शके १७१३ विरोधीकृत सवछरे माघमासी टिपू बाहादर हैदर नाईक याचा पुत्र याजवर हरी बलाळ फडके व मोगल व इंग्रज ऐसे तिघेजण दोन वर्षे पटणावर कर्नाटकात मोहीम करून होते लढाई होऊन टिपूने सला केला तीन कोटी रुपये खंडणी तिघास दिल्ही व मुलुख दिल्हा मग हरिपंत फडके जेष्टमासी पुण्यास आले

श्री

स्मरणार्थ दिनचर्या

१ शके १६९१ विरोधी नाम सवछरे विसाजी कृष्ण बिनीवाले व रामचंद्र गणेश व तुकोजी होळकर व महादजी शिंदे ऐसे पन्नास हजार फोजे सुधा हिंदुस्थान प्रांती जाऊन जेष्ट आषाढ मासी खेचीवाडा एथे छावणी करून जयेनगरकर याजपासोन खंडणी दाहा लक्ष रुपये घेतली मग जयेनगरवाले यांची फौज बरोबर घेऊन सुरजमल जाठ यांचे प्रांती भरतपुर व कुंभेरी × ×इकडे गेले जाटाशी लढाई जाली जाट पळून भरतपुरास गेला तीस हजार फौज लुटून घेतली दाहा हती व दोन हजार घोडे व तोफा ऐशे गाडाव करून आणिले जाटापासून पासष्ठ लक्ष रुपये खंडणी करार केली मग नजीबखान राहिले याजकडील राजकारण होळकर याणी करून नजीबखानाच्या भेटी जाल्या जाटाकडील खंडणी पैकी दाहा लक्ष रुपये आले बाकी वसूल न घेता नजीबखानाचे सुभे आंतरवेदीत रामचंद्र गणेश विसाजीपंत बिनीवाले ऐसे फौजसुधा छावणीस राहिले तेव्हा नजीबखान आपमरणे मृत्य पावले त्याचा पुत्र नाहाबतखान फौजेसुधा आंतरवेदीत राहिला

१ शके १६९२ विकृति सवछरी विसाजी कृष्ण बिनीवाले व रामचंद्र गणेश याचा व जबतखानाचा बिघाड झाला. जाबतखानास होळकरानी शुकतालास नेऊन पोहचाविला विसाजी-पंत बिनीवाले व सिंदे होळकर सुधा दिलीस जाऊन राहिले दिलीस ठाणी आपली बसविली रामचंद्र गणेश याचे व बिनीवाले यांचे कारभारामुळे बनेना कज्या जाला सबब रामचंद्र गणेशास श्रीमंत माधवराव बलाळ प्रधान याणी देसी बोलाऊन आणिले बिनीवाले दिलीस फोजसुधा छावणी करून राहिले

१ शके १६९२ विकृति सवछरे श्रीमंत माधवराव साहेब कर्नाटक प्रांती स्वारीस निघाले कृष्णातीर पावेतो गेले शरीरी × × × नाही याजकरितां त्रिंबकराव मामा पेठे साल गुा तुंगभद्रेपलीकडे छावणीस ठेविले होते त्याचे कुमकेस आपा बळवंत वगैरे फौजा पाठवून फालगुण मासी पुण्यास आले तिकडे त्रिंबकराव

मामा यांची व हैदर नाईक यांची लढाई नाईकाचा मोड जाला जातीने पुत्री सुधा पळून पटणात गेला दाहा हजार फौज पंचवीस हजार प्यादा मारला गेला येश मोठे आले मामा छावणीस राहिले ते समई सला जाला नाहीं

१ शके १७१४ परिधावी संवछरे माघ वाा ४ श्रीमंत माधवराव नारायेण पंत प्रधान यांची स्त्री रखमाबाई[१] थथे याची कन्या यास देवआज्ञा जाली मग फाल्गुन मासी दुसरे लग्न केले यशोदाबाई[२] नाव ठेविले

१ शके १७१५ प्रमादी संवछरे फाल्गुन वाा एकादशीस मातुश्री आनंदीबाई दादा-साहेब याची स्त्री यास देवआज्ञा जाली

१ शके १७१६ आनंद नाम संवछरे जेष्ट ६ री बलाळ फडके श्रीमंताचे मुछदी मनस-बदार यांस सिध्धटेकास देवआज्ञा जाली [१०

१ शके १७१३ जेष्ट शुाा ५ श्रीमंताचे वाड्यांत कलसी बंगला सात मजला होता त्यास आग लागून जळाला व कोठी जळाली

१ शके १७१० किलक नाम संवछर कार्तिक मासी पुण्यात श्रीमंताचे वाडयातील फडाचा चौक जुना जाला सबब तो पाडून नवा बांधावयास कामा लाविले विाा बालाजी जनार्दन नाना फडणीस दोन वर्षे काम चालत होते मग वास्तु-शांत केली

१ शके १७११ कार्तिक शुाा ३ रामशास्त्री न्यायाधीश श्रीमंताकडील मृत्य पावले

१ शके १७१३ विरोधीकृत संवछरे

१ पर्वतीस श्री कार्तिकस्वामीचे देवळावर वीज पडली देऊळ छिन्नभिन्न जाले देवास धका लागला नाहीं वैशाख वाा १ [२०

१ जेष्ट शुाा ५ नाना फडणीस श्रीमंताचे याणी नळ नवा बांधुन नऱ्हे येथून आणिला तो नळ सदाशिव पेठेंत हौद करून त्यात सोडिला

१ भाद्रपद शुाा २ घासीराम कोतवाल शहर पुणे याणे ब्राह्मणाचा नाश केला सबब श्रीमंतानी उंटावर बसऊन शहरात फिरऊन गारपिरावर तमासगिरा (!) नी जिवे मारिला

१ शके १७१४ आस्विनापासून पायेलीची धारण जाली एक वर्ष होती

---

१ रमाबाई असें पाहिजे. ही केशव नाईक थत्ते यांची कन्या; लग्नमिती माघ शु. ९, शके १७०४. पुणें येथें देवधर ढमढेरे यांचे बोळांतील थत्त्यांचा राम प्रसिद्ध आहे. थत्ते हे मूळचे औरंगाबाद येथील राहणारे.

२ यशोदाबाई ही गणेशपंत गोखले यांची कन्या. गोखले हे रत्नागिरी जिल्ह्यांतील होळी गांवचे राहणारे.

१ शके १७२१ सिध्धार्थी सवछरे चैत्र मासी कर्नाटकांत श्रीरंगपट्टण येथे टिपू बहादूर यांची व इंग्रज बाहदूर यांची लढाई होऊन टिपू ठार पडिला इंग्रजाची फते होऊन श्रीरंगपटण घेतले टिपूचे राज्य बुडाले इंग्रजानी राज्य घेतले

१ शके १७२६ चैत्र मासी पायेली तीन सेर दाणे जाले पुढे आषाढ श्रावणात एक सेराची धारण जाली आस्वीनपासून तीन सेराची जाली ऐसी माहागाई एक वर्षे होती दुसरे साली दीड पायेलीची जाली मग संवगाई तिसरे साली जाली माणसे फार मेली काळ पडिला होता

१ शके १७२८ कृष्णाजी भवानी सदाशिव माणकेश्वर याचा दिवाण मृत्य पावला कार्तिक वा ४.

१ शके १७३० विभवसवछरे दसन्याचे दीवसी बलवंतराव नागनाथ मृत्य पावला

१ शके १७३८ वैशाख शुा ९ शाहू राजे छत्रपती सातान्यास होते ते कैलास वासी जाले मग त्याचे पुत्रास राज्यासनी बसऊन आभिषक केला नाव शाहूच ठेविले विा बाजीराव रघुनाथ प्रधान

१ शके १७३२ वैषाख शुा ७ खंडेराव रास्ते यास देवआज्ञा जाली

शके १७३३ प्रजापती सवछरे

१ फाल्गुन वा १४ मनोहर गिर गोसावी सिंव्हगडचे सुभेदार यास देवआज्ञा जाली

१ कार्तिक शुा १३ येशवंतराव होळकर यास हिंदुस्थानात देवआज्ञा जाली ही खबर आली

१ शके १७३३ प्रजापती सवछरे फाल्गुन शुा १३ श्रीमंताचे वाड्यात बाजीरावासाहिब याणी नवा आसमानी महाल बांधला होता तो आग लागून जळाला संरांबी फार जाली शके १७३७ युवा संवछरे गंगाधर शास्त्री गायेकवाडाकडील यांस श्रीपंढरपुरास आशाढीचे यात्रेत श्रीमंत बाजीराव साहेब आसता वोटने रस्त्यात रात्री मारेकरी याणी तरवारीनें ठार मारिले त्यांचे चौकसीकरिता पुण्यास आल्यावर श्रीमंतापासोन त्रिंबकजी डेंगला हुजुन्या यांस इंग्रजानी घेऊन साष्टीस कैदेत ठेविले

१ शके १७३८ धाता संवछरे फालगुन शुा १४ चिंतो वामन देशमुख श्रीमंतांचा यांस देवआज्ञा जाली

---

३ श्रीरंगपट्टण येथील ही शेवटची लढाई शके १७२१ चैत्र वा ३०, शनवार, ता ४ मे सन १७९९ रोजीं झाली.

श्री

स्मरणार्थ दिनचर्या

१ शके १७३९ ईश्वर नाम संवछरे आषाढ मासी श्रीमंत बाजीराव रघुनाथ पंत प्रधान पुण्याहून श्रीपंढरीचे यात्रेस गेले यात्रा करून पुण्यास न येतां माहुलीस कृष्णातीरी गेले तेथे श्रावण मासी मालकण साहेब इंग्रजबाहादर जाऊन श्रीमंतास भेटले तीन किले पुरंदर सिव्हगड रायेगड घेतले होते ते श्रीमंतास माघारे दिल्हे श्रीमंतानी पुण्यास यावे ऐसे करून मालकण साहेब गेले नंतर श्रीमंत भाद्रपद मासी पुण्यास आले कलम १

१ शके १७३९ ईश्वर नाम संवछरे भाद्रपद वद्य एकादशी द्वादशीस सदाशिव माणकेश्वर श्रीमंताचे कारभारी यास देवआज्ञा जाली मुा पुणे कलम

१ शके १७३९ ईश्वर नाम संवछरे आस्वीन वद्य एकादशी तिसरा प्रहरा श्रीमंत बाजीराव साहेब पर्वतीस देवदर्शनास स्वारी गेली पर्वतीस पोहचल्यावर मागे बापू गोखले सरदार व विंचुरकर व आबा पुरंदरे व रास्ते वगैरे लोक फौजेनसी तोफा घेऊन भांबोड्यावर आलपिष्ट साहेब इंग्रजबहदर होते त्याजवर चालून गेले ते समई आलपिष्ट साहेब निघोन खडकीस गेले खडकीचे व भांबोड्याचे सिवेवर श्रीमंताकडील फौजेची व इंग्रज बाहादर याची लढाई जाली मोर दीक्षीत ठार पडले आस्तमान जाला श्रीमंताकडील सरदार व फौज × × भांबोड्याचे रानात राहिल्या × × इंग्रजाचे बेट संगमावर होते ते वस्ती जाळून लुटली [आलिपष्टसाहेब व कोटसाहेब इंग्रज बाहादर फलटणानसी खडकीस जाऊन राहिले ते आठ दाहा दिवस होते नंतर जरणेल साहेब इंग्रज बाहदर फलटणानसी येऊन आलपिष्ट साहेब यास भेटले त्याणी यरवड्याचे रानात मुकाम केला कलम

१ शके १७३९ ईश्वर नाम संवछरे कार्तिक शुा ८ रविवारी श्रीमंत बाजीराव साहेब फौजेनसी गारपीरचे पलीकडे जाऊन राहिले होते तेथून तोफा लाऊन इंग्रजाचे लस्करावर गोळे टाकिले महांकाली तोफ मोठी टेऊन गोळे टाकिले व यरवड्याचे टेकडावर आरब वगैरे लोक पाठऊन जरणेल साहेबाचे फलटणासी लढाई केली एक दिवस व रात्री मिळोन गोळागोळीची लढाई जाली नंतर रात्री बाजीरावसाहेब फौजेनसी सडे होऊन पळून गेले उजेडल्यावर कार्तिक शुा९ सोमवारी इंग्रजानी पुण्यात येऊन श्रीमंताचे जुन्या वाड्यावर झेंडा लाविला शहरात रयतेस आभये देऊन कुंपणी सरकार इंग्रजबाहादर याची द्वाही शहरात फिरली शहरास उपद्रव कांही एक लाविला नाही आमल बसविला बाजीराव साहेब यांची द्वाही व कुंपणी

५०

इंग्रज बाहादर यांचा हुकूम म्हणोन शहरात द्वाही फिरविली वाड्यांत राबीसन साहेब इंग्रज येऊन राहिले

श्री

स्मरणार्थ दिनचर्या

१ शके १७३९ ईश्वर नाम संवछरे माघ शुा १५ श्रीमंत राजश्री बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांचा मुकाम फौजेनसी पंढरपुरानजीक येथे होता भोवताली वीस पंचवीस कोसाचे आंतराने इंग्रजाकडील फलटणे होती त्यास पोर्णिमेचे दिवशीं इंग्रजाकडील जरणेल साहेब याणी फलटणानसी चालून जाऊन श्रीमंताचे लस्करावर छापा घातला बाजीराव साहेब व चिमाजी आपा उभयेतां त्रिंबकजी डिंगल्यासुधा पळून गेले बापूजी गणेश गोखले लढाईस उभे राहिले ते लढाईत ठार पडले लस्कर पळून गेले माहाराज छत्रपती शाहूराजे व मातुश्री यांस इंग्रजानी घेऊन सातारा आणून ठेविले बाजीराव साहेब लस्कर सुधा पळाले ते खड्यावरून गंगातीरास येऊन गंगा उतरून सप्तशृंगानजीक साहासात कोसावर मुकाम सातआठ दिवस करून होते तेथे रामदीन होळकराकडील येऊन भेटला मग तेथून निघाले ते फौजेसुधा माहुरावरून वराडप्रांतीं चंद्रपुराकडे गेले तेथे दाहाबारा दिवस मुकाम करून होते तों चैत्र शुा ११ शके १७४० ते दिवशी इंग्रजाकडील पलटणे व सरदार साहेब जाऊन छापा घातला लस्कर पळाले बाजीराव साहेब पळाले ते नर्मदा तीरानजीक बोरी धूळकोटाकडे गेले चिमाजी आपा व माधवराव रास्ते व निपाणकर व आंवतर लोक सरदार व फौज पुण्याकडे देशी आले आल्पिष्ठ साहेबास भेटले कलम

१ शके १७४० बहुधान्य नाम सवछरे वैशाख आखेरीस पुण्यात वर्तमान आले की बाजीरावसाहेब नर्मदातिरी धुळकोटाजवळ होते ते मालकम साहेब इंग्रज बाहादर यांस जाऊन भेटले मालकमसाहेबानी बाजीराव यास घेऊन हिंदुस्थान प्रांतीं पुष्कराकडून मथुरावृंदावनाकडून भागिरथीतीरी ब्रह्मवर्तास नेऊन ठेविले ते तेथे आहेत व त्रिंबकजी डिंगळ्या याजला धरून इंग्रजानीं कैद करून नेला.

१ शके १७४० बहुधान्य संवछरी जेष्ट आखेरीस चिमाजी आपासाहेब फुलगावी आले होते ते कोकणात वसईस च्यार महिने राहवयास गेले

---

४ बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त हें कानपुरापासून सहा कोसांवरभागिरथीचे तीरीं आहे. येथेंच बाजीरावसाहेबांस छावणीसाठीं सहा मैल परिघाची जागा नेमून देण्यांत आली असून तिच्या चोहों बाजूंस हद्दीचे खुणांसाठीं सोळा दगडी खांब रोविले होते. बाजीराव साहेबांच्या छावणीस 'अरजी लष्कर' म्हणत.

१ शके १७४० बहुधान्य संवछरे मार्गसीर्षमासी चिमाजी आपासाहेब वसईहून फुलगावास आले आलिपष्ट साहेबास भेटून कासीस पौषमासी निघोन गेले

१ शके १७४२ विक्रम संवछरे फाल्गुन वाा ३० ते दिवसी सप्तग्रहीचा योग जाला सात ग्रह मुख्य एका ठिकाणी जाले

यादी स्मरणार्थ

१ शके १७४२ विक्रम संवछरे सन १२३० श्रावण वाा ३ सह चेतुर्थी दोन प्रहरा पुण्याचे मुकामी बाबूराव बिन त्रिबकराव ऊर्फ तात्या सितोळे देशमुख यास देवआज्ञा जाली परलोकास गेले त्याचे मधले चिरंजीव बजाबा बाबा याणी उत्तर कार्य केले

१ शके १७४५ सुभानु सवछरे सन १२३३ आषाढ शुाा९ गालेरीचे मुकामी नरसिंगराव नाईक सितोळे देशमुख प्राा पुणे सिकेकरी यांस देवआज्ञा जाली त्याचे चिरंजीव जेष्ट पुत्र त्र्यंबकराव आबा त्याजजवळ गालेरीस होते त्याणी उत्तरकार्ये तेथे केले

१ शके १७४५ सुभानु नाम संवछरे भाद्रपद वाा ८ कोंकणस्त ब्राह्मण यांची स्त्री राधाबाई इचा भ्रतार मृत्य पावला म्हणून त्याबरोबर सहगमन करून सती निघाली ती वोंकारेश्वराजवळ नदींत सरणावर बसली आग्नि लाविला नंतर सरणातून बाहेर आली आंग भाजले प्राण गेला नाहीं जिवंत होती मग सरकारांतून इंग्रजानी तिला गांवात आणून वाचवावया करिता औषध उपाय केले तीन दिवस होती मग मृत्य पावली दुष्ट चिन्ह जाले

१ शके १७४६ तारण सवछरे भाद्रपद शु. १३ कासी क्षेत्री आमृतराव रघुनाथ पेशवे होते ते तेथे मृत्य पावले

१ शके १७४८ व्ययनाम सवछरे भाद्रपद वद्य ४ प्रतापसिंह छत्रपती व प्रतिनिधि व सचीव व राजमंडळचे लोक सुधा राज्याची स्वारी पुण्यास सातारी(या)-हून आली पुणे मुकामी आल्पींष्ट बडेसाहेब इंग्रज बाहदूर यास गारपिराजवळ भेटले राज्याचा मुकाम पर्वतीजवळ दहा बारा दिवस होता परस्पर मेजवानी होऊन नंतर छत्रपतीची स्वारी सातारीयास गेली.

१ शके १७४८ व्यय सवछरे आस्विन वाा ४ राजा छत्रपती पनाळेकर कोल्हापुराहून आपले राजमंडळसाहित पुणे मुकामी स्वारी आली येऊन आलिपष्ट बडेसाहेब इंग्रज बहादर यांस भेटले परस्परें मेजवानी जाली एक महिना पर्वतीजवळ मुकाम होता मग कोल्हापुरास गेले.

१ शके १७४८ व्ययनाम संवछरे फाल्गुन वद्य ९ गा(ग्वा)लेरीचे मुकाम दौलतराव सिंदे आलिज्याबाहादर सरदार यांचे शरीरी व्यथा होऊन देवआज्ञा जाली म्हणून खबर आली दौलतराव यांस पुत्रसंतान नाहीं दोघी स्त्रिया बायजाबाई व रखमाबाई व बहीण बाळाबाई बाईसाहेबाजवळ होती.

१ शके १७४९ सर्वजितनाम सवछरे जेष्ठ वा ९ गालेरीचे मुकामी दौलतराव सिंदे यांस दत्त पुत्र त्यांचे स्त्रियांचे मांडीवर दिल्हा कन्हेरखेडास सिंदे याचे भाऊबंद होते त्यांचा पुत्र दाहा बारा वर्षांचा होता तो पुत्रत्वास दिल्हा नाव जनकोजी सिंदे ठेविले लग्न करून घेतला गालेरीस लग्न केले मग दत्तविधान केले.

१ शके १७४९ सर्वजित संवछरे श्रावण वा ६ बज्याबा बिन बाबूराव सितोळे देशमुख यांस पुणे मुकामी प्राथःकाळी देवआज्ञा जाली

१ शके १७४९ सर्वजित संवछरे कार्तिक वद्य १२ द्वादशी मुंबैचे मुकामीहून आल्पिष्ट साहेब बडेसाहेब इंग्रज बहादर विलायतेस गेले नंतर मलकणसाहेब इंग्रज बाहदर मुंबैचे मुकामीहून पुण्यास आले मार्गेश्वर वा ८ दापोडीचे मुकामी व पुणे मुकामी पंधरांआठरा दिवस मलकणसाहेब होते मग माघती मुंबैस गेले.

१ शके १७४९ सर्वजितनाम संवछरे फाल्गुन शुा ६ गुरुवार दीडप्रहर दिवसानंतर पुण्यातील श्रीमंत पेशवे याचा वाडा जुना कसब्यातील थोरला वाडा यांतील इमारती यांस आग लागली आवघ्या इमारती व चापेखणाचा चौक व गोकाक दिवाणखाने व गणपतीचा रंगमहाल वगैरे बहुतेक वाडा जळून खाक जाहला विझवावयास प्रयेत्न सरकारांतून इंग्रज बाहादर याणी फार केला परंतु आग आटोपेना एक दिवाणखाना आरसेमाहाल नानासाहेबाचा राहिला व किरकोळी इमारत राहिली.

१ शके १७४९ सर्वजित संवछरे माघ वा ४ छ १७ रजबी राबिसनसाहेब इंग्रज बहादर कलकटर हे कुंपणी सरकारातून पुणे मुकामी दाहा वर्षे कारभार करीत होते ते मलकणसाहेब पुण्यास येऊन ममईस गेल्यावर राबिसनसाहेब पुण्याहून गेले कलकटरीचे कामावर मीजसाहेब आले.

१ शके १७५० सर्वधारी सवछरे श्रावण आखेरीस कुपणीसरकारातून छ्यापी कागद लोकानी घेऊन खतपत्र वगैरे कामी कागद ल्याहावयास छ्यापी कागद घेऊन ल्याहावे ऐसी चाल घातली आसे.

१ शके १७५१ विरोधी संवछरे वैशाखमास राबिसनसाहेब हावा खावयास गेले होते ते पुण्यास कलकटरीचे कामावर आले

श्री

यादी स्मरणार्थ दिनचर्या

१ शके १७४१ प्रमाथी नाम संवछरे सन १२२९ कार्तिकमासी आलपिष्ट-साहेब इंग्रज बाहादर याणी श्रीमंत पंतप्रधान यांचे राज्य सर करून राज्याचा बंदोबस्त केला श्रीमंताकडील लोक मुछदी व सरदार व कारकून वगैरे तमाम लाहाण मोठे लोक यांस सरंजाम वगैरे कुटुंबाचे बेगमीस नेमून दिल्हे आणि आपण खासा आलिपिष्टसाहेब पुण्याहून मुंबईस गेले पुण्याचे मुकामी चापणसाहेब व राबीसन-साहेब यांस ठेविले

१ शके १७४२ विक्रमनाम सवछरे फाल्गुनमासी वद्य आमावशेस सप्तग्रही मीन-रासीस जाली ती दोन दिवस सप्तग्रही एके रासीस होती सप्तग्रहाची नावे [१०

१ सूर्य १ बुध १ शनी
१ चंद्र १ गुरु
१ मंगळ १ शुक्र १
३ ३
७

राहू व केतू मीनरासीस नवते

१ शके १७४३ वृषानाम संवछरे सन १२३१ श्रावणमासी मालकमसाहेब इंग्रज बाहदर हे पुण्यास आले चापणसाहेबास व राबीसनसाहेबास भेटले आठ च्यार दिवस होते मग पुणे मुकामाहून गेले

१ शके १७४३ वृषानाम संवछरे

श्रीमंत पंतप्रधान पेशवे यांचा वाडा नऊ बुरुजी जुना कसबे पुणे येथील आहे त्या वाड्यात राबीसनसाहेब इंग्रज बाहादर दरबार करून कारभार करीत होते [३०
व राहतही होते ते वाडा रिकामा करून वाड्यात बंदीवान लोक ठेविले आणि राबीसनसाहेब गारपीरावर बंगले बांधुन तेथे राहवयास गेले पुण्यात नवा वाडा बुधवार पेठेत बाजीराव रघुनाथ पेशवे याणी बांधिला आहे त्या वाड्यात राबीसनसाहेब दरबार करून कारभार करूं लागले व आदालत हि त्या च वाड्यात होती त्यास आदलातीचा कारभार बारणेलसाहेब करीत आहेत

श्री

यादी स्मरणार्थ दीनचर्या

१ शके १७७४ चित्रभानु संवछरे सन १२३२ भाद्रपद शुा २ छ ३० जिल्काद तिसरा प्रहरी आलपिष्टसाहेब इंग्रज बाहादर हे मुंबेहून पुण्यास आले पुण्याचे मुकामी चापणसाहेब व राबीणसाहेब होते त्याच्या व आलपिष्टसाहेबाच्या भेटी जाल्या.

१ शके १७७४ चित्रभानु संवछरे या वर्षी आधिक मास व क्षयमास पडले.

१ आस्वीनमास आधिक पडला सर्वपित्री आमावशा रविवारी जाली नंतर दुसरे दिवसी सोमवारी आधिक आस्वीन मास लागला आधिक आस्वीन शुा १ सोमवार १०]ता आधिक आस्विन वद्य ३० सोमवारी जाली तों पावेतों धोडा महिना जाला यांत माहा नवरात्र घटस्थापना व विजयादशमी केली नाही नंतर शुध्ध आस्वीन मास मंगळवारी निघाला मग आस्वीन शुा १ मंगळवारी नवरात्राची घटस्थापना संपूर्ण लोकानी केली दाहा दिवस नवरात्र जाले आकरावे दिवसी शुक्रवारी विजयादशमी केली.

१ क्षयमास पडला तो मार्गेश्वर मास पडला त्यास क्षयमास पडावयास कारण की दोन संक्रांती एकया मार्गेश्वराच्या महिन्यांत निघाल्या त्या संक्रांतीची नावे.

१ कार्तिक वद्य आमावशा आठावीस घटका होती नंतर प्रतीपदा लागली त्यास सोळा घटिका प्रतीपदा गेल्यावर रात्री धनसंक्रांत निघाली ती मार्गेश्वरमासी निघाली मार्गेश्वर शुा १ शनवार.

२०] १ मार्गेश्वर वद्य ३० रविवारी आठरा घटका आमावशा होती त्यास आमावशेस प्रातःकाली तीन घटका दिवस आलियावर मकरसंक्रांत निघाली

२

येणेप्रों मार्गस्वरमासी धनसंक्रांत व मकरसंक्रांत ऐशा दोन्ही संक्रांती एका महिन्यात निघाल्या म्हणून मार्गेश्वरमासाचा क्षय जाला मार्गेश्वर व पौष दोन्ही महिने मिळोन एक महिना केला प्रतीपदा शनवारापासोन आमावाशा रविवारपावेतो तीन दिवस सुध्ध पक्ष वद्य पक्ष मिळोन तीस तिथींची × × × वाटणी करून दोन महिन्यावर तिथिचे विभाग नेमून दिल्हे पूर्वभाग तीस घटका तिथि मार्गेश्वर मासाकडे व उतरभाग तीस घटिका तिथि पौषमासाकडे

स्मरणार्थ

३०]१ शके १७५२ विरुती संवछरे जेष्ट वद्य १३ शुक्रवार मलकणसाहेब गौरनेल इंग्रज बहादर याणी पुण्याजवल मुठा नदीस संगमाजवळ पूल नवा बांधिला

पुलाचे काम दीड वर्षास चालत होते तयार जाला नंतर पुलावरून वागावयास मुहूर्त प्रातःकाली खासा मलकमसाहेब येऊन तमाम लोक जमा करून पुलावरून चालले ब्राह्मणास दक्षणा वाटली याप्रों वर्तमान जाले

१ कार्तिक वा १० शके १७५२ मलकमसाहेब गौरनेल इंग्रज बाहदर गौरनेलचे अधिकारावर पुण्याचे मुकामी दापोडीवर होते ते गौरनेलीचे काम सोडून मुंबईस गेले पुढें दुसरा गौरनेल येणार म्हणोन ऐकतो

१ जेष्ट शुा ९ शके १७५३ खर संवछरे सन १२४१ दुसरा गौरनेल येणार तो आला गारपिरावर येऊन कचेरी करून बडे लोकास भेटला भेटी जाल्या गौरनेल याचे नाव हजरत बंदगान आली नबाब मुस्ततावमौला आलका बेरेट हनराबल गौरनेल बाहदूर गारपिरावर भेटी जालियावर दापोडीस जाऊन राहिले

१ शके १७५४ नंदन सवछरे माघमासी राबीसनसाहेब कलकटरीचे कामावर दुसऱ्यानें पुण्यास आला नंतर पैमासीची चौकसी करून सिध्धेश्वर शास्त्री पैमासीकडील पिंगलसाहेबांचे मुखत्यार यास ठेप सात वर्षांची मालिटसाहेब याणी दिल्ही परजात ठेवले

१ शके १७५५ विजय संवछरे माघमासी राबसिनसाहेब कलकटर पुण्यास होते त्यास शरीरी समाधान नाही म्हणून मुंबैस गेले

१ कसब्यात आपले घरासमोर पेठे याचे वाड्यात केळकर राहात होते त्या वाड्यास केळकर याचा वाडा म्हणत असत त्यांत रा। पांडोबा भाऊ केळकर राहत होते ते शके १७७६ पौषमासी मयत जाले नंतर वाड्याचे मालक रा। चिंतामणराव माधव पेठे ऊर्फ आबासाहेब पेठे हे नासिकास राहातात त्याणी पुण्यात येऊन वाडा विकला नंतर तो वाडा साडे आकराशे रुपयास खिसोबा आणा बेपारी याणी विकत घेऊन मोडून टाकिला माहे जेष्ठ मास शके १७७७

पां. न. पटवर्धन

## ८८ श्री. दादासाहेब पेशवे यांचें एक पद

श्रीमंत पेशवे यांचे घराण्यांत कोणी कविता वगैरे रचिल्याचें ऐकिवांत नव्हतें. परंतु नुकतें च निमगांव येथें रा. भिकाजी हरी फाटक यांचे वाडांत एक पद उपलब्ध झालें आहे. हें पद श्री. रघुनाथ ऊर्फ दादासाहेब पेशवे यांनीं केलेलें असल्याचें सदरहू बाडांत च म्हटलें आहे.

॥ दादासाहेब ॥ राग जगला ॥

मन शिवपद्‌कमळींचें भृंग ॥
यज्ञयागतपध्यानधारणा भस्मोद्धूलित अंग ॥ १ ॥
नमक चमक मुखिं गाति वाजति
करिं शिवपार्थिवलिंग ॥ २ ॥
सा रि ग म प ध नि सा गंधर्व गायन
वाजे टाळ मृदंग ॥ ३ ॥
भृंगी नाचे थय् थय् थय् थय्
चरणकमलमनभृंग ॥ ४ ॥
चरणशरण **रघुनाथ** निरंतर
मागे हा चि अभंग ॥ ५ ॥ मन शिव० ॥

गं. ना. मुजुमदार

## ८९ तुकारामाचें आडनांव

१ तुकारामबोआ देहूकर ( १४९०–१५७० ) ह्याचें आयुर्वृत्त ठोकळ मानानें आबालवृद्धांच्या परिचयाचें आहे. परंतु त्याचे चरित्रांतील ज्या कांहीं बाबी अद्याप अनिश्चित अशा समजल्या जात आहेत, त्यांत च त्याचे आडनांवासंबंधाच्या प्रश्नाची गणना करण्यास प्रत्यवाय नाहीं. हनुमंतस्वामीकृत ‘ रामदासांच्या बखरीं ’त ह्या कवीचें आडनांव **‘मोरे’** असें आढळतें; तर संतचरित्रकार महिपती (१६३७–१७१२ ) आपल्या ‘ भक्तविजया’चे ४८ वे अध्यायाचे २३ वे ओंवींत ‘ **आंबळे** उपनांव त्यालागोनि ’ असा स्पष्ट उल्लेख करितो. रा. केळूसकरादि आधुनिक चरित्रकार, कीं ज्यांनीं आपलीं चरित्रें सर्वस्वीं महिपतीकृत चरित्र ग्रंथांवरून सजविलीं, ते काय कारणामुळें असेल तें असो, ह्या बाबतींत मात्र महिपतीला प्रमाणभूत न मानितां, तुकारामाचें आडनांव मोरे असें ठासून सांगतात व इतर ह्या दोनहि आडनांवांचा नाममात्र उल्लेख करून पुढें गेलेले दिसतात. अशा संदेहस्थितींत हें ‘कोडें’ कसें उलगडावयाचें ?

२ एकाद्या व्यक्तीचें आडनांव कोणतें असा प्रश्न उपस्थित जाहल्यास ती व्यक्ति आपलें आडनांव ज्या तऱ्हेनें लिहीत असेल किंवा त्या व्यक्तीचे वंशज ज्या पद्ध-

तीनें तें लिहीत आले असतील तें च त्या व्यक्तीचें आडनांव होय, हें उघड आहे. अशा दृष्टीनें वरील प्रश्नाचा विचार करितां, तुकाराम व त्याचे वंशज आपलें आडनांव कसकसें लिहीत होते हें पाहिलें पाहिजे. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील आपल्या तीर्थोपाध्यांच्या वहींत आपल्या पूर्ण नांवासह तुकारामानें मारिलेला स्वदस्तुरचा शेरा बऱ्याच वर्षांपूर्वी येथील ह. भ. प. विष्णुबावा जोग ह्यांचे पहाण्यांत आला होता म्हणतात. परंतु त्या वेळीं ह्या बहुमोल लेखाची प्रतिकृति अथवा नक्कल त्यांनीं न घेतल्यामुळें, व आतां तर तो सदरील तीर्थोपाध्यांच्या वंशजांजवळ शिल्लक न राहिल्यामुळें नष्ट, लुप्त व अतएव दुष्प्राप्य जाहला आहे. ह्या लेखाच्या उपलब्धी-मुळें तुकारामाचें हस्ताक्षर जनतेस पहावयास मिळालें असतें; किंबहुना महिपती-बोवानें नळकंड्यांत घालून आपल्या पूजेंत तुकारामाचें हस्ताक्षर म्हणून जो अभं-गाचा कागद जपून ठेविला होता, व ज्याची ठाण्याचे रा. विनायकराव भावे ह्यांनीं घेतलेली प्रतिकृति आमचे 'मंडळा'चे संग्रहीं आहे, तो कागद तुकारामाच्या हातचा च कीं काय ह्या प्रश्नाचा निकाल लागला असता. परंतु अशा कौतुकजनक योगास महाराष्ट्र तूर्त तरी आचवला आहे!

३ ऐतिहासिक दृष्टीच्या अभावामुळें, केवळ 'संप्रदायां'तील आख्यायिक वर विश्वसण्यांत आधुनिक ग्रंथकारांपैकीं बरेचजण कसे चुकतात ह्याचा प्रत्यय वेळो-वेळीं येत आहे, त्यांतला च प्रस्तुत प्रसंग होय. अत्यंत शोधपूर्वक लिहिलेल्या आपल्या गुरूच्या चरित्रांत महिपतीनें तुकारामाचें आडनांव 'आंबळे, असें दिलें असतांना, व तुकारामाच्या चरित्रकारांत महिपतीसच अग्रस्थान दिलें गेलें असतां, त्यास ह्या बाबतींत प्रमाण कां मानूं नये हा मोठा अचंबा नव्हे काय? असो. शोधा अंतीं तुकारामाचे नाशीक येथील तीर्थोपाध्ये गायधनी ह्यांचे विद्यमान वंशज वे. शा. सं. शंकर गोविंद गायधनी, नाशीक, ह्यांचे वहींत (वही नं. ५, पान २८) तुकयाकुमर नारायणबुवा (१५७१–१६४५) ह्यानें केलेल्या नोंदीची उपलब्धी होऊन ह्या प्रश्नाचा कायमचा निकाल लागत आहे. सदरील नोंद अशीः—

" लिखित नारायणबुवा पिते तुकारामबुवा आजे बोल्होबा भाऊ विठोबा व महादजी विठोबाचे पुत्र उद्धव रामजी व गणेश गोसावी व गोविंद गोसावी व महा-द्बाचे अंबाजी चुलते कान्होबाचे गंगाजी व खंडोजी माता आवंतीबाई आडनांव आंबिले गांव देहु प्रगणे पुणें कुळी मोरे."

वरील नोंदींत नारायणबोवा गोसाव्यानें मोरे ही आपली कुळी असून, आपलें आडनांव आंबिले–आंबळे–हें च होय असें स्पष्ट लिहिलें आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं, तुकारामाचे वंशज आपलें आडनांव 'मोरे' असें तोंडानें सांगत असून, क्षेत्रस्थ उपाध्यांच्या वह्यांत 'आंबिले' असें च लिहीत आले आहेत. असो; तुका-

रामाच्या मुलाची वरील नोंद इतिहासाच्या पूर्ण कसोटीस उतरणारी, निःसंदेह प्रमाणभूत व विश्वासार्ह अशीच आहे. महिपतीनें तुकारामाच्या आडनांवासंबंधानें केलेल्या स्पष्ट उल्लेखाशीं तंतोतंत जम बसविणारें असें हें स्वतंत्र, बलवत्तर व निरुत्तर प्रमाण मिळत असल्यामुळें तुकारामाच्या आडनांवासंबंधाच्या शंकेस आतां वावच उरत नाहीं.

पां. न. पटवर्धन.

श्री.

## १० एक ऐतिहासिक ध्रुपद

अचल राज राहो । सवाई माधो महाराज राजनके राज ॥ ध्रु. ॥
तेरी सरोबार को करिये जगमे तेरो हरत दुःख दरबार आऽऽऽऽऽऽज ॥
अष्ट दिसा सप्त द्वीप नवखंडको मुलुख । तुमपर अतही साऽऽऽजे ॥१॥
देव गजाननकी कृपा तुमपर मंगल अपनी मनकी काऽऽऽऽज ॥ २ ॥

चिंतामण मिसर (मिश्र) ह्या नांवाचा एक ध्रुपद्या सवाई माधवराव यांचे कारकीर्दीत होऊन गेला. त्यानें वरील ध्रुपद रचिलेलें आहे. माधवरावसाहेब यांचे नांवाचा शिक्का सुरू झाला त्या वेळीं जो दरबार झाला तेथें सदरील ध्रुपद गायिलें गेलें. हें ध्रुपद रा. ब. रू. ब. देवल यांचेकडून आम्हांस कळलें. मिरजकर कृष्णा बोवा गोखले गवई यांच्या द्वारें हें रावबहादूर देवल यांस मिळालें. दर-
२०]बारांत ब्राह्मणादि मंडळी आशीर्वाद देत, त्याप्रों चिंतामण मिसर यानें ध्रुपदरूपानें आशीर्वाद दिला आहे.

पां. न. पटवर्धन.

## ११ शनवारवाड्यावरील शिलालेख

पुराणवस्तुसंशोधनखात्यातर्फे पुणें येथील शनवारवाड्याचे दिल्लीदरवाजाचे डावे अंगास एक संगमरवरी दगड बसविण्यांत येऊन, त्यावर पुढील मजकूर खोदविला आहेः—

## SHANWAR PALACE

Bajirao Peshwa laid the foundation Stone of a palac on this site on the 10th January 1729 A. D. The building was completed in 1736 and was the chief residence of the Peshwas until 1818. It was destroyed by fire in 1827.

2. The treaty between the East India Company and Peshwa aginst Tipu Sultan was concluded here in 1790.

## शनवारवाडा.

[१] " श्रीमंत बाजीराव पेशवे ह्यांनीं ह्या जागेवर इसवी सन १७२९ च्या
[२] जानेवारी महिन्याच्या १० वे तारखेस राजवाड्याच्या पायाचा दगड बस-
[३] वून त्याचें बांधकाम इसवी सन १७३६ सालीं पुरें झालें. हा राजवाडा इसवी
[४] सन १८१८ पर्यंत श्रीमंत पेशवे यांची रहाण्याची मुख्य जागा होती. तो राज-
[५] वाडा सन १८२७ सालीं आग लागून जळाला.
[६] २. या जागीं इसवी सन १७९० सालीं सरकार कंपनी इंग्रजबहादर व
[७] श्रीमंत पेशवे यांचे दरम्यान टिपू सुलतान याचेविरुद्ध तहनामा झाला."

हा तो शिलालेख होय. प्रस्तुतच्या इंग्रजी व मराठी अशा ह्या दोन भागांपैकीं मराठी लेखांतील पहिलें वाक्य कर्णकटु असून त्याची रचना हि व्याकरणदुष्ट आहे. वाडा बांधावयास मुहूर्त नक्की कोणत्या तिथीस झाला ह्यासंबंधानें, पेशव्यांची शकावली ( रा. राजवाडेकृत म. इ. सा. खंड २, पान ५८ ), भारतवर्षांतील पंतप्रधान यांची दुसरी शकावली ( पान ८ ), काव्येतिहाससंग्रहकार रा. ब. साने यांनीं दिलेली हस्तलिखित शकावली व खुद्द माझे संग्रहीं असलेलीं अनेक अप्रकाशित टिपणें इत्यादि ठिकाणीं स्पष्ट उल्लेख असून, त्या सर्वांचा निष्कर्ष हा कीं, श्री. पहिले बाजीरावसाहेब यांनीं सदरील जागेवर शके १६५१ माघ शु० ३ शनवार, सुा सलासीन मया व अलफ, फसली ११३९, छ. १ रजब तारीख १० जानेवारी सन १७३० रोजीं वाडा बांधावयास मुहूर्त केला. वस्तुस्थिति अशी असतां, वाद-

विषयक शीळेवर 'पायाचा दगड *बसविल्याची जी ता. १० जानेवारी १७२९ दिली आहे ती आली कोठून ! ग्याझिटिअरकारांनीं आपले पुणें–वर्णनांत ह्या वाड्या-संबंधानें शोधपूर्वक मिळविलेली माहिती एकत्रित केली आहे. तींत ह्या प्रसंगासंबंधानें " The foundation-stone was laid by Peshwa Bajirao on the new moon of the Musalman month of Rajab in 1729 " असा उल्लेख केला आहे. (Bombay Gazetteer Poona Vol. XVIII, Part III Page 345). ग्याझिटिअरकारांनीं ही तारीख सरकारी कागदपत्रांवरून व तदितर विश्वास्य पुराव्यावरून घेतली असली पाहिजे. एरव्ही 'छ. १ रजब' (on the new moon of the Musalman month of Rajab) ही तारीख तंतोतंत जमती ना ! ग्याझिटिअरकारांची मुसुलमानी तारीख बरोबर असून सन १७२९ हा सपशेल चुकीचा आहे. काय कारणामुळें असेल तें असो, ग्याझिटिअरकारांचा चुकीचा सन प्रस्तुत शिलालेखांत हि खुशाल दडपून देण्यांत आला आहे. वाडा बांधावयास मुहूर्त केल्याची खरी इंग्रजी तारीख १० जानेवारी सन १७३० ही होय.

पां. न. पटवर्धन

## ९२ मोंगलाची तळेगांवाकडील धामधूम

लेखांक १ श्रीभवानी शंकर प्रा

तीर्थस्वरूप मातुश्री बाई

वडिलांचे सेवेसी

अपत्यें राजजीने चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत विनंती ता छ १० सवाल पो का तळेगांव येथास्थीत असों विशेष. आमचें वर्तमान तरी विनायेकदास यांची फौज रामकृष्णदासपंत याजबरोबर दोनतीन हजार फौज कांठापुराकडून इकडे आली त्याणी आमचे गांवचे गुढें † द्रावडीस जात होते त्याणी पिंपळ्याजवळ लुटून पस्त केलें से पंनास माणुस नागवले माल्याचे बैल गुरें नेलीं व सेटी सोडका याची घोडी व वित–विशय नेला व कासोबा गंधरा व विश्वनाथ झांबरा हे वगैरे आणखी सर्वस्वापासून नागवले संध्याकाळी रडत गांवांस आले तेच घटकेस गांवांत

* ही चाल इकडील रिवाजास अनुरूप नाहीं.

† गांव सोडून परगांवीं पोट भरण्यास जाणाऱ्या लोकांस गुढें अगर गुढेकरी म्हणतात.

हूल पडिली कीं वरचे दरवाजियानी राऊत गावात सिरोन गांव लुटिला म्हणौन वाये हूल पडिली रा। भुलोजी पा। व समस्त गावकरी पाटील मंडली गांवातून बाहेर पळून गेले होते त्यांस सिकरापुरचें गुडें जात होते त्याची हूल पडिली ऐसें ठिकाणी लागले तेव्हा गांवांत आलों च्यार प्रहर रात्र गांवात धीर न धरवे मग शनवारी एकादसीस प्रायकाली भुलोजी पा। व गोविंदराव व फौजदार व आम्ही गांवातून निघालो तों फौज सिकरापुरावर आली फौजेमध्यें रा। बाबाजी पा। खोकरकर (!) हे होते त्याणी सांगोन पाठविले की तुम्ही गांव न फोडणे त्यास धीर पुरेनासा जाहाला मग विठलवाडीस गेलों तेथे राहावयासी दम न धरवे तेथून सांगवीस गेलों तेथून ना(नां)दुरात संध्याकाली गेलों मागें रा। पांडुरंगपंत गांवात पाटिलानी ठेविले होते त्याणी रा। बाबाजी पा। याची भेटी घेतली त्यास त्याणी आपले स्वार सात आठ गांवात रखवालीस दिल्हे सिकरापूरचे वर्तमान तरी तेथे कोणी माणूस नाही याकरितां खणती लाविली रा। घनसेटीचे घर खंटलें वगैरे घरें फार खांटलीं तसनस केली आमचे गांवचे खंडणीचा मार एक लक्ष रुपये म्हणत होते त्यास बहुत रद• बदली रा। पांडुरंगपंती करून बारा हजार रुपये खर्चवेचदेखील करून नादुरासँ लेहून पाठविलें मग रा। भुलोजी पा। याणी पत्रें वाचून पाहिलीं त्यास गोविंदराव पा। याणी राग भरून जिवाजी पा, वांकोजी पा। यांसी घेऊन आंबल्याकडे गेले पांडुरंगपंत तुमचा च व खोकरकर त्याही तुमचा च तुम्ही च खंडण्याकरितां गांव बुडविता ऐसीं चोरटी कर्मे करितां यांत आम्ही नाही ऐसे म्हणोन त्रिवर्ग गेले मग पाटिलानी फौजदारांस व आम्हांस गांवास पाठविलें ते सोमवारीं गांवास उभयेता आलों केल्या करारापा। ऐवजाची निशा मागूं लागले त्यास पांडुरंगपंत यांसी रामकृष्णपंत बोलिलें कीं रुपये आतां च द्याल तरी बरें नाहीं तरी गांव जालितो ऐसे म्हणोन फौज तयार करून आग द्यावयासी गावकुसासी येऊन उभे राहिले तेव्हां माहा संकट मांडिले मग वडिलांच्या लिहिल्याच्या आश्रयावरून ऐवजाचा आया घेऊन रा। पांडुरंगपंतांस सांगितले कीं ऐवज करून देऊं परंतु घरें वाचवावी मग रामकृष्णदासास बहुत खोंकरकरानी रदबदली करून एका रोजाची फुरसत मागितली आणि घनशाम गो। यांस चाकणेस गुढयांत पाठविले तेथे लोकाजवळ से दोनसे हजार पाचसे ऐसा आंगावर कर्ज घेतलें ते उदेक बुधवारीं त्याचे पदरीं(!) घालावा म्हणजे बाणदार व कौल गांवास येईल बोलीस आकोबा माहाजन व विटोबा सद्रीस्तप आहेत ते येतील याप्रा। वर्तमान जाहाले पुढें निर्गम करणे तो वडिलांस करावा लागेल घरें व वडिलांचा लौकीक हा काल पावेतों वांचला ईश्वरें अरिष्ट टाळिलें आहे फौज कूच होऊन दावडी निंबगांवावर गेली मुसईच्या खंडणीस कोणीच न ये याकरितां जाळून राख केली जातेगांव जाळिलें निंबगांव

म्हणून लुटून जाळून पस्त केलें वाफगावाजवळ खंडणी घेतली गांव फार जाळिले मुलुक बहुत नाश जाहाला घाटमाथा बोरघाट पावेतों लुटारी राऊत जाऊन गांव जाळून राख करून टाकिले सिक्रापुरचे खंडणीचा मार रा पांडुरंगपंतानी रा बाबजी पाटील यांच्या च हातें सा हजार व खर्चवेंच सिवाय व नाश गांवचा व सिवार बहुत जाहाला जरी तळेगांवावरी मोकाम घेता तरी गांवची खराबी फार च होती परंतु रा बाबाजी पा याणी मोकाम टाळिला गांवचा बच्याव केला फार खस्त खादली आणि मर्दामर्दी गांव जगविला मोठे येहसान केले सिक्रापूरचे खंडणीचे ऐवजाबा कृष्णाजी रुद्र व लुमाजी मावळे कासार यांसी बोलीस नेले आहे त्याची बेअबरू फार करितात ते लिहितां पुरवत नाही आम्हांस ऐवज जमा न होता तरी आमचे बोलीस आहेत त्याचेही हाल याप्रमाच होते परंतु पांढरीचे व वडिलांचा पुण्यप्रताप यामुळे सर्व गोष्टी अनकूल होऊन आल्या याउपरी भीमसेन आइप्पा लस्करांत नगरास पाठविला होता त्याणी तिकडील पत्रोत्तरें आणिली आहेत त्यावरून कळेल. मोंगल नगरीहून कूच करून सिनेच्या पाण्यास गेला आमचे गांवावर फौज आली होती ते घाटमाथ्यापावेतो जाऊन फिरोन आंबळ्याचे घाटे सासवडाकडे जाणार श्रीमंत रा दादासाहेब याजकडील वर्तमान कांहींच येत नाही कोठे आहेत काही कळत नाही ऐसे वर्तमान सेवेसी कळावें म्हणून लिा आहे याउपरी ज्याचा ऐवज घेतला त्यांचा त्यास लौकर पावता जाहाला तरी उत्तम नाही तरी मजवर षब्द येईल तो षब्द वडिली न ये ऐसे केले पाहिजे *बहुत काय लिहिणे कृपा केली पा हे विनंती.

## लेखांक २

श्री

असल बमोजीब नकल

सिका आहे फारसी

खरेदीखत श्रीसके १६७४ आंगिरानाम सवछरे सिमगा शुध १० दसमी बुधवार ते दिवसी राजश्री जानोजी पाटील व खंडोजी पा व मंडोजी पा बिन मकाजी पा ढमढेरे कसबे तळेगांव यासी सूर्याजी बिन मका( जी मु )ळे मिरासदार थलकरी का मार ता. × × × × × कार जुनर सुरु सलास खमसैन मया व आलफ सन ११६२ कारणे आत्मसंतोशे तु ( म्ह )हास खरेदखत लेहून दिल्हे ऐसीजे साल गुद्स्ता कसबे मार मोगलाने लुटले जाळले गावाचा सत्यानास केला त्याबरोबर आपणही लुटले गेलो कांहीं × × × येके दिवसीचे समयास × × नाहीं आसा आपला हाल बहुत ने जाहाला त्यावर श्रीमंत महाराज राजेश्री पंत प्रधान साहेब यांनी गांवास कौल दिल्हा लोक परागंदा होऊन गेले होते ते गावास आले गांवाची

---

*ही अक्षरें खुद्द राजजीच्या हातचीं.

वस्ती जाहाली आपणही गावास आलो परंतु आपणापासी कीर्द करावयासी बैलढोर नाहीं आणि तूर्त पोटासही नाहींसे जाले माणसे जगविली पाहिजेत त्याहीमधे कर्जदारानी मागणे लाविलें घरी कर्जदाराची धरणी बसो लागली आपणापासी तो द्यावयासी ऐवज कांहीं नाहीं नाइलाज जाहाला मग नतर जाणोन आपली मिरासीचे सेत मुळेथलपैकी होते ते आपण विकरा घातले ते ही या समयांत कोण्ही घेइनासे जाले तेव्हां तुम्हांस जालो कीं आपण आपले सेत मिरासीचे देणा (ण्या !) मुळें विकीत बहु आहो तुमचे सोयीस आहे तुम्हीं घेणे आणि आम्हांस रिणापासोन मुक्त करणे ऐसी (ता) प्रकारे तुमची मिनतमाना केलीयावर × × ह्मी आमची करुणा आली त्या × × × बाप मकाजी मुळें लेक चौघेजण वडील आपण आपणा धाकटा राणोजी त्याज धाकटा रत्नोजी त्याज धाकटा सुलतानजी ऐसे चौघेजण भाऊ आम्हीं त्यासी चौघेही वेगळे निघालो तेव्हां तिघा भा × × × सोइंस सेत होते ते तिघास दिल्हे × × × सगत वाटणीस न्हावीर मार्गा × गे टुकडे आले ते पाच सात वरसे वेगळे निघालियावर आपण ते टुकडे वाहिले त्यासी आपल्या सेताचा सेजार पश्चमेस × × त्रिंबकजी पा याचा व तुमचा पूर्वेस राहुजी मुळे व दक्षणेस हानगोजी मुले उत्तरेस न्हावीर मार्ग याच्या दरम्यान आपले टुकडे तेथे आपण कीर्द करून उगवणी करीत होतो त्यासी आपला हल ऐसा जाला तेव्हां निदान जाणून ते टुकडे तुम्हास विकत देऊन मिरास करून दिल्ही आसे आर्जे ४ च्यार चिघे एक १८ टुकडे ४ एकून चिघे २२ मोकरा चिघे २२ बावीस तुम्हास मिरास करून दिल्ही असे तेथे तुम्ही विहीर खणोन बागाईत करून सुखरूप मिरास आर्जानी करणे××× जमिनीचे मोकरा किंमत रुा १०० बैल १ एक एणेप्रमाणें करार केले ते आपण शंभर रुा व बैल भरून पावलो याउपर सद्रहू जमिनीसी आपणांस आर्थी × × समध नाहीं आपण आपल खुशा × × ने तुमची मिनतमाना करून सद्रहू जमीन तुम्हास करून दिधली आसे त्याउपर त्यासती विशई आपण तुम्हास मुजाहीम होऊ तर दिवाणचे गुन्हेगार व गोताचे खोटे सानीन हाल आपला भाऊ × × इर कोणी तुम्हासी कजिया कराव × × आर्थीअर्थी समध नाहीं सद्रहू मिरास तुम्हीं वोपपरंपरा आर्जानी करणे हे खत लिहिले सही छ ९ माहे जमादिलावल सद्रहू चिघे बावीस आसे छ मार लिा सही

निशाणी नागर

गोही

मोकदम कसबे मजकूर
बिा विठल निंबाजी जोशी

नाइकजी बिन राजजी सुपेकर
चौगुले कसबे मार

कुलकर्णी कसबे मार

चिमाजी बिन तिमाजी सेटे

कसबे मार

अंबाजी गोपाल उपाध्ये नि

जोसी कलकर्णी कसबे मार

आवजी बिन धोंडजी मेटे

माधोजी पोटफाडे कसबे मार

× ×' बिन सुत्काजी

लखमाजी का मार

× × बिन फिरंगोजी सुतार

कहर कसबे मार

१ बापोजी बिन बाकाजी सुतार

कहर कसबे मार

× चांभार कसबे मार

× × चाभार कसबे मार

१ रासनाक वा गोमनाक मेहेतर

त्रिंबक गोविंद माहाजन एडके कसबे मार

ऐकाजी बिन बावाजी ढमढेरे कसबे मार

गोमाजी माळी भुजबल कसबे मार

धिराजी बिन नाईकजी सुपेकर कसबे मार

राहुजी बिन माहादजी मुळे कामार

बाबुराव बिन धर्मोजी मुळे का मार

राणोजी बिन मकाजी मुळे का मार

रत्नाजी बिन मकाजी मुळे का मार

१ जान महमद

मुलाणे × ×

१ राघ नाक × ×

मेहेत्रे × × × सबे

मजकूर

माहार कसबे मार

वर दाखल करण्यांत आलेले दोन्ही कागद श्री. मंडोजीराव नारायणराव ऊर्फ पाटिलसाहेब ढमढेरे, तळेगांव–ढमढेरे यांचे दफ्तरांतील असून, त्यांवरून मोगलानें तळेगांवाकडे शके १६७३ मध्यें जी धुमश्चक्री माजविली होती त्यावर चांगलाच प्रकाश पडत आहे. तळेगांव येथें तर जुनाट व उजाड झालेलीं घरें खणलीं असतां, आंतून जळलेला कोळसा बाहेर येतो, असा अनुभव आहे! मित्ती माघ वद्य ६, शनवार, शके १६७३, ता० २५ जानेवारी सन १७५२ रोजीं पेशव्यांनीं सदर प्रसंगानंतर गांवास कौल दिला त्यांतहि “ मोगलाचा मुकाम कसबे मजकुरीं जाला त्यामुळें शिवार गेला; गांवचीं घरें दारें जाळून फस्त केलीं; रयत परागंदा जाहली ” वगैरे मजकूर आहे. ( श्री. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, भाग १ ला, पृ० २४३ पहा ) तळेगांव व तळेगांवाप्रमाणें च मोगलाच्या जाळपोळीस बळी पडलेलीं जवळपासचीं बहुतेक गांवें त्यांस सदरच्या आपत्तींतून अद्याप हि आपला डोकीं वर काढितां आलीं नाहींत—सर्व प्रदेश लिहिल्याप्रमाणें उजाड व भयानक दिसत आहे—हें लक्षांत आणिलें म्हणजे त्या वेळच्या प्रसंगांची थोडीबहुत कल्पना करितां येण्यासारखी आहे.

पां. न. पटवर्धन.

# १३ महाराष्ट्रांतील जुनी गीतें

भा० इ० सं० मंडळाच्या शके १८३४ च्या अहवालाच्या पूर्वार्धांत मीं कांहीं जुनी गीतें प्रसिद्ध केलीं होतीं; तीं पाहून इतिहास-संशोधकांचे अध्वर्यु रा० वि० का० राजवाडे यांनीं मला तशा च प्रकारचीं आणखीं कांहीं गीतें पैदा करण्याची सूचना केली. त्यावरून मी फिरून हीं गीतें जमा करण्याच्या उद्योगास लागलीं, इतक्यांत, गीतें जसजशीं जमतील तसतशीं पाठविण्याबद्दल मंडळाचे सन्मान्य चिटणीस रा. मेहेंदळे यांची सूचना आली. त्यावरून गीतांचा हा पहिला हप्ता मंडळास सादर करण्यांत येत आहे. ह्या हप्त्यांत प्रारंभीं, महाराष्ट्रांतील खेडवळ मुसलमान स्त्रियांच्या तोंडीं असणारीं कांहीं गीतें मुद्दाम दिलीं आहेत. महाराष्ट्र–खेड्यांतील मुसलमान व मराठा कुणबी यांची रहाणी व विचारसरणी अनादिकालापासून [१० जवळजवळ सारखी च आहे. तसें च उभयतांच्या रीतीभातींत व वागणुकींत हि बरें च साधर्म्य आहे. यामुळें तेथील मुसलमान लोकांच्या तोंडांतून निघणाऱ्या मुसलमानी भाषेंत अनेक मराठी शब्द स्पष्ट, अस्पष्ट, शुद्ध व भ्रष्ट स्वरूपांत घुसलेले दिसून येतात. म्हणून ह्या भाषेंतील हि कांहीं गीतें मीं पैदा केलीं आहेत, व ऐतिहासिकदृष्ट्या मराठी भाषेचा अभ्यास करणारास त्यांचा बरा च उपयोग होण्याचा संभव असल्यामुळें तीं येथें देण्यांत येत आहेत.

१ ( गीतें सांगणारी स्त्री—हालीम )

घडी, बडी चक्की गेंद नको मारुजी । सोती सैनिंद मी ॥ १ ॥
घडी मेरी चक्की छातिका छतइरु । घडानवाला कोरुन कारी डोंगरका फतइरु ॥ २॥
दस्तगीरकु जाना कटोरिवर उंदु । भाई करूंगी मेरा चांदु मेगी पावंका मरीइयु॥ ३॥ [२०
जुम्माची जुम्मी रात मजी नतिसु येती यांदु । पिराकी दरगाम नगरांकी नांदु ॥ ४ ॥
जिम्मिजिमिरातु मजि नतिसमालुम । महंमद मेरा चांदु बाळ रस्लाद जालीमु ॥५॥
जिमिजिमिरातु मेने पकइति शक्करभांतु । मल्लीग साहेब सचजा बिछाइति बांटु, बांटु॥६॥
अल्ला अल्ला ककु अल्लासे कुइ नइ बड । बिनखांमसी बादल खडा ॥ ७ ॥
अल्ला ककु अल्लासे कुइ नइ सचा । बिनखामसी बादल उंचा ॥ ८ ॥
अंधारकोटरीम जान मेरी डरति । खुदाक बुलाइना नई इलाजं चलइता ॥ ९ ॥

---

१ सैनिध. २ उद. ३ याद–आठवण. ४ नगाऱ्याची. ५ नाद. ६ जालीम. ७ साकरभात. ८ वांटेंत. ९ खांबाशिवाय. १० आकाश. टळक अक्षरांत दिलेल्या शब्दांचीं रूपें मराठी भाषेच्या मोडणीवर बनलेलीं आहेत. तुलनेकरितां मराठी गीतें पहावीं.

भाई लेता सांडी[1] ओक्या साडिकु मेरा मोती[2] । भाई मेरेकु दुवा[3] देति[4] ॥ १० ॥

अल्लावि अल्ला ककु मैन पुकारी दसबारु । दुबलीके[6] सत्तवकु[7] देना जबाब[8] एकबारू[9] ॥११॥

सामानें[10] सोपमेंन[11] चिराक जलति[12] उच्चा । भाई कऊंगी मैरा चांदु कुरान पढतय मेरा बच्चा । जबाब देइंगा उसका चिच्या ॥ १२ ॥

सबाईनेकीपारें[13] बारी[14] छुटयाता थंडा बारी[15] । बाट[16] चलतयतो जिवका प्यारा । सिद्दु[17] बाजुकुं[18] खुतुबतारी[19] । देखता आलमसारा[20] ॥१३॥

भावजी मेरी गंगा मोति[21] सटकु देखी । समिंदरका पौणी[22] डोंगा

भावजी मेरी गंगा ॥ १४ ॥

बडीबडी चक्की संगिनें[23] गयिसुं[24] भला । मेरी नादानं देइंगी गल्ला ॥ १५ ॥

३०]पिंजारु लेतियुं जोडी । तेरा रावसे[25] मेरी मैंनां[26] बडी ॥ १६ ॥

भाई लेता चोळी[27] । भावजी आंडी आली । भाई मेरा बोलता भाई मेराका दिल तोडी[28] ॥ १७ ॥

धुळं धुळ रणमे जातेते । हातकी अंगुंठी[30] धुंडते[31] ते । आगे आम्मा बच्चेके हाल । चिपनी कपनी गले मे डाल ॥ १८ ॥

आलेवेके किनारेकु उठाता झाड अन्नारकों[33] । आया एक छोकरा मन्यारकों[33] ॥ १९ ॥

आलवेके किनारेकु उठाता झाड आंचलीका । आया एक छोकरा तंबुलिका । लिजाया झाड आंभलीका ॥ २० ॥

आलवेके किनारेकु झाड उठाता नैंयननका[34] । फूंल[34] खिलाता जायफलका । फुंल[34] उमल्याता चमलीका ॥ २१ ॥

२०]चांद पुनिवेंका[35] निकल्या चाला । अभसोस उठाव मंडवों[36] । पाणी पौंणी[37] म्हणुनी धंड[38] गेला सोकोनीं[39] । काटासुमार निघौंला[40] बस देकयीं चलो करबला ॥ २२ ॥

पहाडके निचे झिरामिरी बावडया च्यार । वज्युं[41] करलेव हातोहात ॥ २३ ॥

---

१ सांडी—मराठी शब्द. २ मराठी शब्द. ३ मराठींतील प्रचलित शब्द. ४ मराठीप्रमाणें रूप. ५ बोलावतो. ६ दुबली—दुर्बल. ७ सत्व. ८ उत्तर. ९ एकवेळ. १० समोर. ११ सोप्यावर. १२ जळतो. १३ सकाळच्या प्रहरीं. १४ वारा. १५ वारा. १६ वाट. १७ सरळ, उजवा. १८ बाजूस. १९ चांदणी. २० जग—दुनिया. २१ मराठी शब्द. २२ मराठी शब्द. २३ जोडीनं. २४ गाऊया. २५ रावसे=राघूपेक्षां. २६ मराठी प्रचलित शब्द. २७ मराठी शब्द. २८ आडवी. २९ तोडतो—मोडतो. ३० मराठीसादृश्य शब्द. ३१ डाळिंब. ३२ कासार. ३३ झाडाचें नांव. ३४ मराठींतील प्रचलित शब्द. ३५ पौर्णिमेचा. ३६ मांडव. ३७ मराठी शब्द. ३८ धड. ३९ वाळून. ४० चालला—मराठी शब्द. ४१ शुचि=हातपाय धुणें वगैरे.

देखो मेरेवलीका पाड । हत्तीपेहौदापर बिछाऊंगी पान । हिरव्या मेरा नाम, मैं तैं[1] तंबुलिन तडाकिती ॥ २४ ॥
नदी चली बारा-बांरा कोसु । आम्माकिजी याद होइतु जिव मेरा उदासु ।
क्योंजी रोतें बाळवनी, हमी तुमारे पासु[3] ॥ २५ ॥
नऊ तोल्या सकल्या मेऱ्याजी । उसे फासे जडायेतो मै पेनुंगी । लाल मनाय तो मै मनुंगी । चांद समजाय तो समजुंगी ॥ २६ ॥
अल्ला मंडवा मे भाई । नारेलाति छायी । पंचु[4] बुलई मंडईमें । मंडवा छायुं अंगनमें[5] ॥ २७ ॥
मिरव्या गुंदन, देगे फुंदन । अल्ला तुजे जोडी[6] दिंगा बहुंता जलैंमकागे बेटी ॥ २८ ॥
सर्कल्या लायु तबकी[8] भन्युं । रसमींना कर लेवो । मेरी अरूस[11] आयी निंदुमे[12] निवशी[13] आईचमनमें ॥२९ ॥
मै बेटीवी लिजाऊंगी । लस्करवि लिजाऊंगी । घोडावि लिजाऊंगी । मै बेटी लिजाऊंगी अपने घर । मंगनी डालुंगी चावाचावा ॥ ३० ॥
लस्करबी देऊंगा । घोडावि देऊंगा । बटीना देऊंगा तेरे घर ॥ ३१ ॥
दुले[14] तेरे शहरोमें अत्तर हे क्या नहीं । मिशी पिनाव इस घडी । मेरी अरुस आइ निंदमें ॥ ३२ ॥
समदिन चलति नंगी । पाव चिपते कंकर । गोरी तेरे नाकपर नजर । तुजे देखताथ गुजर ॥ ३३ ॥
हंडेपर[15] हंडी देव मेरे बापु । मै कुचना मंगुंगी । थाले पर थाला देव मेरे बापु । मै कुचना मंगुंगी । लोटेपर लोटा देव मेरे बापु । मै कुचना मंगुंगी । घडापर घडा[16] देव मेरे बापु । मै कुचना मंगुंगी ॥ ३४ ॥
दुलौंजी[17] आया क्या क्याजी लाया । सकल्याके दो जोड लाया । बनाबागमें आया । आंगाशी[18] तारा उडाया । बाजा बजाता आया ॥ ३५ ॥
शिवकी[19] दुलाजी आया । सकला पिनाकु गया । सकल्याकी महिमीं[20] बडी । गुलमेंदी रंग चढी ॥ ३६ ॥
शिवका दुलाजी आया । वाळ पिनाकु गया । वाळेकी महिमीं बडी । गुलमेंदी रंग चढी ॥ ३७ ॥
सकल्या मैं पेनी हिऱ्याकी जोत चढी । मोकु देकर बने । तेरे नामपर सुआगीन[21] बनी ॥ ३८ ॥

---

१ मराठी प्रचालित शब्द. २ मराठी रूप. ३ जवळ. ४ पंच. ५ अंगणांत. ६ जोड; मराठी प्र० श०. ७ म० प्र० शब्द. ८ साखळ्या. ९ तबकें. १० जलदी-लवकर. ११ नवरी. १२ झोपेला. १३ नवरा. १४ नवरा. १५ मराठी प्र. श. १६ म. प्र. श. १७ नवरा. १८ आकाशांत. १९ शिवेवरून येणारा. २० मराठी शब्द. २१ सवाशीण-सौभाग्यवती.

# मराठी गीतें

( गीतें सांगणारी स्त्री–कोंडूबाई धुमाळीण.* )

## २ रामकथा

राम राम म्हणु राम आम्हाला काय देतो । भलेपणा संग येतो ॥ १ ॥
दैवामंदी देव मारुति धाकला । लंका जाळितु एकला ॥ २ ॥
शिंदेशाइ तोड सिताबाईला कवा केलं । रामचंद्र महाराज पंचवटीचं धनी झाल ॥३॥
वन्न परापत सिताबाईला झाल कवा । राम जानीत व्हता तवा ॥ ४ ॥
वन परापत सिताबाईला कसं झाल । दान गोसाव्याला केलं ॥ ५ ॥
बाणामाग बाण येत्याती झणा झणा । राम म्हाणितु बाळं कुणाची लक्षिमणा ॥ ६ ॥
बाणामाग बाण येत्याति उन्हाच । राम म्हाणितु बाल सेतरी[1] कुणाच ॥ ७ ॥ [१०
रातिच सपान[2] सिताबाइला पडल । रायाच्या बागमंदि लहु अंकुश येडिले[3] ॥ ८ ॥
लहु अंकुश सिताबाईच कैवारी । सोडिल्याति बाण रामचंद्र पित्यावरी ॥ ९ ॥
सिताबाइ म्हणिति दुनया रामाचा उग येडी । वनी वाळत्याती सिताबाईची लुगयेडी ॥ १० ॥
शिनगारीला रतु[4] रता जुपित्याति वारू । सिता वनाला झाली स्वारू ॥ ११ ॥
शिनगारिला रतु चालला घडा घडा । सिता रडति धडा धडा ॥ १२ ॥
राम म्हणितु केगाइ[5] माझी आई । बारा वर्स झाली सिता सेजला माझ्या नाही ॥१३॥
राम म्हाणितु केगाइ माझी भणी । बारा वर्स झाली शेज पडली माझी सुनी ॥१४॥

---

* ही वृद्ध बाई माघ शुा ११ स प्लेगनें वारली. हिच्या मुखांत जुन्या मराठी गीतांचा अतिशय मोठा संग्रह होता. येत्या चैत्रांत सुमारें दोन हजार गीतें मला सांगण्याचा तिनें संकल्प केला होता. कारण, त्या वेळीं सुगी वगैरे उलगते व अशा बाया मोकळ्या होतात. परंतु तिच्या आकस्मिक मृत्यूमुळें तिचा संकल्प सफळ होण्याची आतां आशा नाहीं. कामाची आंच संभाळून हि तिनें जीं कांहीं गीतें सांगितलीं तीं सर्व या हप्त्यांत दिलीं आहेत. पुढील हप्त्यांत दुसऱ्या स्त्रियांचीं गीतें येतील; पण धुमाळणीच्या इतक्या तोलाचीं व विविध प्रकारचीं गीतें इतरत्र फार च थोडीं सांपडतील. अर्थात् ह्या बाईच्या मृत्यूमुळें प्रस्तुत विषयाची बरी च मोठी हानी झाली आहे असें मानण्यास सध्यां तरी कांहीं हरकत दिसत नाहीं.–वा. दा. मुंडले.

१ क्षत्रिय. २ स्वप्न. ३ वेढिले. ४ रथ. ५ कैकयी.

सिताबाई म्हणी दलभार कुणायेच । पिवळं निशाण रामायेच ॥ १५ ॥
राम म्हणितु लक्ष्मणा तु माझा भाई । सिता वधिलि कुण्या ठायी ॥ १६ ॥
सिता वनवासी बोरी बाबळ सांग गोष्टी । पाच महिन्याचा गर्भ पोटीं ॥ १७ ॥
शिनगारिला रतु रता जुपिलि वासर । वन सितच सासर ॥ १८ ॥
सासऱ्याएवढा वैसु सिता सारख्या सईला । बार वरसानं जटा धुतल्या न्हायिला॥१९॥
सिता बाळतिणु वनांत तिचि न्हाणी । दोनी नेत्र झाकुनि तातुंबा वाली पाणी ॥२०॥
सिता वनवासी तातुबांच्या मठी । कडव्या लिंबाच्या वाट्या घोटी ॥ २१ ॥
सिता बाळातिणु तिनं तणांची केली शाजुं । वर अंकुशा बाळा निजु ॥ २२ ॥
संक्राति सणु सिताबाईला झाला वनीं । तिनं ववशिल्यां बोरि बाबळी माया
१०] मणी ॥ २३ ॥

## ३ विठ्ठल-रुक्मिणी-गीत

तुळस म्हणति काग रुक्मिणी तुझा तोरा । तिच्या मंजुळाचा देवा इटलाला तुरा ॥ १ ॥
इठल रकमाबाई गुज बोल इनंदांनं । धाकली जनाबाई वाडा लुटिति कुरूंदांनं ॥ २ ॥
इटल देव म्हणे सोड रक्मिणी माझा शेला । दिस इनंदाखाली गेला ॥ ३ ॥
इटल देव म्हणि सोड रक्मिणी माझा हातु । झाली कतलां रातु ॥ ४ ॥
इटल देव म्हणि सोड रक्मिणी धोतार । झाली कतलां दुपार ॥५॥ सोनियाचं चुड
रकमाबाइच्या हातामंदि । उजेड पडला
पांडुरंगाच्या रतांमंदि ॥ ६ ॥
सोळा सहस्र नारी घालिति धिंगाना । रक्मिणीवाचूनी इडा देवाचा रंगना ॥ ७ ॥
२०]दुरून ओळकिती पंढरीची रानमाती । रक्मिणी सारविती रंगमाहालाच्या आडभिती॥
शिरियां सोन्याचं रकमाबाइचं मुंदु गोंड । देवा इटलाला पंढरीराजुदंड ॥ ९ ॥
शिरियां सोन्याचं रकमाबाइचं अेगि ईरू । देवा इटलाची सारी पंढरी जागिरू॥१०॥
सादु मंडळींत देव इटल देखणा । रेसमाचं गोंड तेच्या टाळाच्या टोपणा ॥ ११ ॥
वाजत गाजत दिंडी येतिया माझ्या वाड्या । घाला साधुला पायघड्या ॥ १२ ॥
पंढरीचा बुका घेति पैशाचा पैशाभारू । सादु मंडळी आली फारू ॥ १३ ॥

---

१ रामाचें निशाग पिवळें होतें काय ? २ गोष्टी. ३ सासुरवास-जाच. ४ वाल्मिकी (पितृसम असा) ५ गवताची. ६ बिछाना-शेज. ७ संक्रांतीचा ववशा देतात त्यास अनुसरून हा उल्लेख आहे. ८ आनंदानें. ९ क्रोधानें. १० आनंदांत. ११ कथेला. १२ रथांत. १३ शेरभर. १४ मूद. १५ सडे. १६ जाहागीर.

तुळशिची रोप पंडरिच्या वर्तायेनं[1] । लावण केली रकमिणीच्या अंतायानं[2] ॥ १४ ॥
राहिरकमिणु गुज बोलति खिडक्यादारी । धाकल्या तुळसिनं प्रीत नेली सारी ॥ १५ ॥
रुसली रकमिण जेविना दूद् पेड । इट्टल देव म्हणि तुला जनीचा भिंद्[3] पड ॥ १६ ॥
सुरतिच मोती रकमाबाईच्या नतिमंदि । इटल देव उभा जवारी[4] पेठमंदि ॥ १७ ॥
शिरिया सोनियाचं रकमाबाइच कांकण । देवा इट्टलानं बडवे ठेविल राकाण ॥ १८ ॥
शिरिया सोनियाचं रकमाबाईचं कापझुच । इटल मोति भेजी सार जवारी[5] झाल उभ ॥ १९ ॥
साकरच लाडु रुप्याच्या परातितु । ध्यानुबा तुकारामु सादु भुक्याल किर्तनातु ॥ २० ॥
नवास करिति पुण्याच्या पार्वतीला । ध्यानुबा तुकारामु सादु थोराच्या संगतीला ॥ २१ ॥
देव इटल कथा करी गाव सोडून एकीकड । खिरापतीला दुद्-पेड ॥ २२ ॥

## ४ आठवडा ( गीत )

आइतवारु गेला सोमवारु आला । बेलदवना महादेवाला ॥ १ ॥
सोमवारु गेला मंगळवारु आला । आंबा कवडयाची माळ तुला ॥ २ ॥
मंगळवारु गेला बुधवारु आला । किस्ण गोकुळीं जलमला ॥ ३ ॥
बुधवारु गेला बेस्तरवारु आला । बाटी साकार गइबीला ॥ ४ ॥
बेस्तरवारु गेला सुक्रिरवारु आला । चोळी पाताळ लक्षीमीला ॥ ५ ॥
सुक्रिरवारु गेला सनवारु आला । देवा मारुतीला रुइणीची माळ घाला ॥ ६ ॥
सनवारु गेला आईतवारु आला । देवा जोतिबाला नवरत्नाची माळ घाला ॥ ७ ॥
आईतवारु गेला आटवडा गाईला । इट्टू पंढरी राहिला ॥ ८ ॥

## ५ नारायणरावाचा मृत्यु

नारायण मारियिला ढासळल्या माळ्या । रोज(द)ना करित्यात्या पागच्या निळया घोड्या ॥ १ ॥
नारायण मारियिला ढासळल्या भिंती । रोज( द )ना करित्याति तेच्या अंबारीच हत्ती ॥ २ ॥
नारायण मारियिला पुण्या शेराच्या सावलीला । जासुदाच्या जोड्या गेल्या पुण्याच्या चावडीला ॥ ३ ॥
नारायण मारियिला टाकिला खंदकातु । चुलती जेविती दुदभातु ॥ ४ ॥
नारायण मारियिला गेल्या दिल्लीला बातम्या । सखा मारिला पुतण्या ॥ ५ ॥

---

१ ओघानें=रवाह. २ नवऱ्यानें. ३ भेदभाव; भीति. ४ जवाहिराच्या. ५ जवाहिरे.

नारायण मारियिला हंबारत्या गाई । चुलत्या राजसाला कणाव आली नाहीं ॥६॥
नारायण मारियिला पुण्या शेराच्या कोटामंदी । चुलत्या राजसाच्या डोई घालितु पोटामंदि ॥ ७ ॥
गोपिकाबाई म्हणी पुण्या शेराला काय करु । फौजा राहिल्या दिल्लीवरु ॥ ८ ॥
गोपिकाबाई म्हणी पुण्या शेराची झाली माती । नारायण बाळ दिल गारड्याच्या हातीं ॥ ९ ॥
नारायण मारिला दुइ दरवजाच्या मदि । वैऱ्या मनसुचा केला कदी ॥ १० ॥
नारायण मारिला पुण्या शेराचं झालं जोतं । गोपिकाबाई म्हणी बाळ वाणीचं[1] माझं होतं ॥ ११ ॥
नारायण मारिला पुण्या शेराची गेली कळा । वाण्या उदम्यानं दुकानं केली गोळा ॥ १२ ॥
पुण्या शेरामंदि फुलं सांडिली जाइचीं । सती मिरावली सून गोपिकाबाईची ॥ १३ ॥

~~~~~~~~~~~~

## ६ कोल्हापुरच्या चिमाजीमहाराजांविषयीं गीत*

चंदनाचा पाटु[2] किकऱ्यानं कोरिला । राजा मोहित्यानी मारिला ॥ १ ॥
कोलापूर शार चौक्या बैसल्या ठायी ठायीं । चिमाजी महाराजाच्या कोण आडव झालं नाहीं ॥ २ ॥
कोलापूर शारु रकाळ्या बारा येशी । चिमाजी महाराजाचा मेणा न्हेला इसवासी ॥ ३ ॥
रकाळ्या तळ्यामंदि मासा करितु पाणी पाणी । बावाजी महाराजानं भाचा राजाला केला धनी ॥ ४ ॥
माळ्याच्या मळ्यामंदि मेतिबाईला तिन पान । चिमाजी महाराजानं कस कटिल हिंदुस्तान ॥ ५ ॥
जिरसाळीच्या तांदुळाला लिंब नारळिच रसु । चिमाजी महाराजाला कसा घडला परदेसु ॥ ६ ॥
कोलापूर शारु टाकी[3] झडाति हजाइरु । झाला मंडई बाजाइरु ॥ ७ ॥
बावड गाविच्या माळावरी वाज बिगुल नवानवा । चिमाजी महाराजाला फसगमतीन न्हेला कवा ॥ ८ ॥
कोलापूर शारामंदि गस्त फिरती आरबाची । नगरी शिवाजी महाराजाची ॥ ९ ॥
कोलापूर शारामंदि वाज लोबंदं[4] खुळखुळ्याची । हवा बघावी रकाळ्याची ॥ १० ॥
सुरतिच मोती राजाच्या तुरयाला[5] । हुजरी पारियाला[6] ॥ ११ ॥

---

१ नवसाचं. * हा चिमाजी कोणता ? २ दगड घडण्याचें हत्यार. ३ हजारों. ४ घंटा. ५ तुऱ्याला. ६ पहारा करण्यास.
~~~~~~~~~~~~

राजाच्या दरबारीं कोण घसाच्या[१] बंदुकीचा । नवा हुजऱ्या माहाराजाचा ॥ १२ ॥
राजाच्या दरबारीं कोणी वाकुनि मुजरा केला । भिकबाळीचा तोल गेला ॥ १३ ॥
राजाच्या दरबारी हुजरी नटल्याती । गेंद झुलपाची सुटल्याती ॥ १४ ॥
कोलापूर शारु भोतन झाडझुड । मदि नळाचं पाणी उड ॥ १५ ॥
कोलापूर शारु कुणी बांदिलं सरजानं । अंबारीचा हत्ती गेला गंगच्या दरवाजानं ॥ १६ ॥
कोलापूर शारु दुरत दिसतु फोंडा माळु । आंबाबाईच्या देवळाला दैताची बांदवळु ॥ १७ ॥
इसतीस पाइरी आंबाबाईच्या नळाइला । सोनिगाची कंठी दिली गवंड्याच्या बाळाइला ॥ १८ ॥
कोलापूर शारु गलोगलीनं सरजातट । रकाळ तळ्यामदिं सोन्याचा संध्यामट ॥ १९ ॥
१०] चिमा महाराज शांव झाल भणे रडती आइबाई । राजा गेलेला आला नाहीं ॥ २० ॥
बावा महाराज शावें झाला अंपटोपच्या माळावरी । आगीन तेला दिली पंचगंगच्या तासावरी ॥ २१ ॥
बावा महाराज शांव झाल येवती गावाच्या वनामंदि । सैनं सोडिल वनामदिं ॥ २२ ॥

## ७ कृष्णाचें गाणें

चंद्रावळीसाठी किस्ण मतुरी झाला चाटो । परोपरीची दिंडलुटी मतुरेच्या बाजारातु
किस्ण देवाच शेटेपण । पिवळ्या झेंड्याखालीं चंद्रावळीच दुकायीन ॥ २ ॥
मतुरेच्या बाजारातु लोणी इकत शाजुइकु । साती गवळणी तु चंद्रावळी माजुइकु ॥ ३ ॥
चंद्रावळीसाठीं किस्ण झाला डोंबारी । येलु रवुनि खेळ दिलाया मेदुरी ॥ ४ ॥
२०] हिरवा पेरवाचा पिवळा तेचा वाणु । चंद्रावळीसाठीं किस्ण झालाया बागवानु ॥ ५ ॥
करनाटक्या गोविंदु रासबिदीला उबा रहातु । चंद्रावळीचा भेद घेतु ॥ ६ ॥
,, ,, ,, उबा राही । चंद्रावळीचा भेदु पाही ॥ ७ ॥
करनाटक्या गोविंदु राईच्या पड पाया । चंद्रावळीच्या महाला जाया सर्व शिनगार मागी लियीं ॥ ८ ॥

## मल्हारी देवाचें गाणें.

काकला कोकरु बाणु जातिया नटइतु । देवा मल्हारिनं झेंडा लाविला पेटतुइ ॥ १ ॥
देव मल्हारी म्हणइतु काग म्हाळसा राग राग । गेलो व्हतो शिकारीला बाणु लागुनि आली माग ॥ २ ॥

---

१ घसाच्या (?) २ शव-प्रेत. ३ बहिण. ४ अग्नि. ५ पात्रावर. ६ सैन्य. ७ मथुरेंत. ८ दुकान. ९ मथुरेंत. १० लेण्यास-लेण्याकरितां.

देवं मल्हारी म्हणइतु काग म्हाळसा रागामंदि । गेलो व्हतो शिकारीला. बाणु धावली बागमंदि ॥ ३ ॥
काकला कोकरी बाणु जाती मेंडेवाडया । देव मल्हारी गावईडया ॥ ४ ॥
बाणाई धनगरणीच्या ताकामंदि लेंडया । मल्हारी देव तिच्या राकितो शेळ्या मेंड्या ॥५॥
तारव्यांबाईला देव मल्हारी मासें मारी । म्हाळसाबाई म्हणी लिंगायताची आम्ही नारी ॥ ६ ॥
बाणु म्हाळसाच्या दोघींच्या जाती । मल्हारी देवासाठी बसल्या एका ताटी ॥ ७ ॥
धनगराची बाणुबाई वाण्याची दोन म्हाळइसा । घास गिळितु तिला कसा ॥ ८ ॥

## ९ संकीर्ण गीतें

तांबडया मंदिलाची बांदणी बेताची । बाळराजाची माज्या दिष्ट काढिती हाताची ॥ १ ॥
आवयेळीचा[5] पावणा न्हव वराणभाकरीचा । पाइ पुसिती साकरचा ॥ २ ॥
पातस[6]तावणा आलाया माज्या गावा । तांबुळ्याची पेट दावा ॥ ३ ॥
पेठ गाव सारिख नाहीं येवढ्या जवारींत । पाणी खेळतु शिवारातु ॥ ४ ॥
पेट गावीला भोवतनं मळदळ । पंचक्रोशींत पाणी शिवारात खेळ* ॥ ५ ॥
काय करावा मयावाचूनि भैतरपणा । ईना रुचु मिठावाचुनि पकवान्ना ॥ ६ ॥
परसुदींच्या येळा नारु म्हणति देवा देवा । नाडयंध्या गेला गांवा ॥ ७ ॥
" " नारु झालीया घाबरी । नाडयंध्याची नगरी ॥ ८ ॥
बाळातिणीबाई तुझी पिवळी झाली गातें । सायास केल मींनं ॥ ९ ॥
" तुझी येळालवंगाची शेगयेडी । आत दरवाळती तुज्या कंतांची शाल-जोडी ॥ १० ॥
बाळातिणीबाई वाऱ्याउमट तुजा वाडा । आत दरवाळतो येळालवंगाचा खुटवडा ॥ ११ ॥
बाळातिण झाली मावलीच्या घरी । एक महिना झाला यखु दिना परवेरी[11] ॥ १२ ॥
बाळातिणीबाई पिवळ्या तुज्या टाचा । दिष्ट होईल न्हाणी जाता ॥ १३ ॥
हाती दवत लेकणी जातो वाटनं लिवितु । खुबदाराला बोवितु ॥ १४ ॥

---

१ मेंढवाडा, २ धनगर. ३ नदीचें नांव. ४ मासे ५ अवेळींचा. ६ खाणारा
* पेठ गांवच्या गतकालीन स्थितीचा हा उल्लेख अक्षरशः खरा आहे; सध्यां मात्र त्याची स्मृति करून देण्याइतकी च स्थिति आहे. पाणी कमी होत गेल्यामुळें मळेदळे हि कमी होत आले आहेत व चालले आहेत. ७ प्रसूतीच्या. ८ प्रसूति कष्टमय झाल्यास ब्रह्मचाऱ्याच्या पायाचें तीर्थ दिलें म्हणजे सुलभप्रसूति होते अशी समजूत आहे. त्यास अनुसरून हा उल्लेख आहे. ९ गात्र. ६ आईनें. १० नवऱ्याची. ११ सोप्यावर.

५३

अष्टीच्या[1] धोतराची घालितु कानपटी । सुबदाराच्या जातो भेटी ॥ १५ ॥
जुंदळ्याच्या गाड्या बैल मदन म्होर लावा । तेला पेवाचा जागा ठावा ॥ १६ ॥
जुंदळ्याचा गाडा रुतला माळाला । धुरी रेटना बाळयाला ॥ १७ ॥
जुंदळ्याचा गाडा येतो माळानं घुमइतु । धनी बैलाची उमईतु[2] ॥ १८ ॥
माझ्या परवेरी[3] रास पडिथली दाणियाची । दिष्ट काढिति बैलासंगट धनियाची ॥१९॥
जुंदळ जोगदारू माजा पसर गादायिलो[4] । धनी बैल रांबईला[5] ॥ २० ॥
शेति झाली रासु खंडीच्या गोण्या किती । मावळ भाच शेनीं ॥ २१ ॥
,, ,, ,, तिवड्या[6] बसविली । पासोडी नेसविली ॥ २२ ॥
,, ,, ,, तिवड्याला बोणं[7] । राशीच झाल सोनं ॥ २३ ॥
,, ,, ,, तिवडा चिरामण । रास मेजीत सरावण ॥ २४ ॥
हरिचंदरवारा मर्दनीं घेतो घेरा । उभा वावडीवरी[9] हिरा ॥ २५ ॥
शेती झाली रासु चला आली कसुं[10] । पाट शेलियानं पसु ॥ २६ ॥
काय मी सांगूं सई माझ्या बाळाजीचं गुणु । शेल्याच्या पदरानं लोटी बैलाची गवाणुं[11] ॥ २७ ॥
बैलामदि बैलु मदन समरतु[12] । येतो वाड्याला हंबरतु ॥२८॥
बैलाच नाव गरडपकइशॉ[13] । धनी बैलाचा हवइशॉ[14] ॥
दुरून वळकिती तुज्या चइलाची जोडी । तट्या गाडीला नागमोडी ॥३०॥
चैलाची नाव चेंडु चिंतामणी हाई नटवा तेचा धनी ॥३१॥
दुरून वळकिती गुल टोपाच्या माज्या चाली । येतु काच्याच्या झोकाखालीं ॥३२॥
शेरभर सोन तालेवाराच्या सोप्या लोळ । बाळ चिंदल्याच खेळ ॥३३॥
तुझामाझा भाऊपणा भाऊपण्याची प्रीत मोठी । इडी सोकली डाव्या मुठी ॥३४॥
नारीनं केला संगु रावा कचेरिचा खासा । गोविंदइड्याला लवंगाबाईचा पडाला फासा ॥३५॥
चकुट चंदनु साणॅबाईला[15] झटतु[16] । गोऱ्यापणाला नटईतु[17] ॥३६॥

---

१ रेशीमकाठीं. २ उमेदवार. ३ पडवीवर-सोप्यांत. ४ गच्च भरला. ५ राबला. ६ खळ्याच्या मध्यभागीं रोंवलेला खांब. ७ नैवेद्य. ८ मळलेला पण वाढविण्यापूर्वीचे खळ्याभोंवतीं पडलेला धान्यसंग्रह. ९ वाढविण्याचें यंत्र. १० कणसाची कूस. ११ गवाण. १२ समर्थ. १३ गरूपक्ष्या. १४ हौशा. १५ सहाणेला. १६ घासतो. १७ चंदन घासला म्हणजे पांढरा-गोरा-होतो त्यास अनुलक्षून हा उल्लेख आहे.

चंदन म्हणितु साग तुझ म्या काय केल । तुज्या संगतीनं माझ अरद अंग गेल ॥३७॥
चंदन म्हणितु साणबाई उर्ण्या जातीं । तिच्या संगतीनं देहाची झाली माती ॥३८॥
चकुट चंदनाच डोंगरी तेच गोतु । साणकारण गावा येतु ॥३९॥
चकुट चंदन साणबाइनं सारिला । शाणा शबद हेरिला ॥४०॥
पहाटच्या पान्यामदि दळिति रागराग । सासु जळति धरामाग ॥४१॥
भणीभावंडाची पोटामंदि माया । पिकल सिताफळु आत साकरेचि छाया ॥४२॥
लेकुरवाळीची बुटी उघडी भाकरीची । वांझ नारीच्या परवरी गोणी पडली साकरेची ॥४३॥
हरी दोपारीची आऊत सुटली माळाइची । सुरत कोमेली बाळाइची ॥४४॥
वळवाचा पाऊस आला शिवार झोडियितु । बाळ कुळव सोडियितु ॥४५॥ [२०
भरल्या बाजारातु वळकिती गोतावळा । बयासारखा तोंडावळा ॥४६॥
भरल्या बाजारातु सोड गोविंदा माझा हातु । माज्या माहेरिच गवळी आल्याति बाजारातु ॥४७॥
बंधुजी लावी चुडा भावज गुजर गेली आतु । सोड मैराळा माझा हातु होइल दोघाची कलागतु ॥४८॥
बयाच्या घरा गेली बया नाहीं घराइतु । भावज गुजर म्हणिइति कोण पावणी दाराइतु ॥४९॥
मायबापाच्या माघारी भाऊ नव्हत बहिणीच । भावज गुजर म्हणियिती कोण गाव त्या पावणीच ॥५०॥

वा. दा. मुंडले. [२०

## ९४ बाजीरावसाहेब पेशवे यांच्या कुटुंबाची शेवटची हकाकत

१. बाळाजी विश्वनाथापासून बाजीराव रघुनाथापर्यंतचा म्हणजे शक १६०० पासून शक १७३९ पर्यंतचा पेशव्यांच्या कुटुंबाचा इतिहास बराच त्रोटक महशूर आहे. परंतु शक १७३९ पासुन शक १८३५ पर्यंतची त्या घराण्याची हकीकत अद्यापपर्यंत कोणीं लिहिलेली नाहीं. सबब शक १७३९ त बिठूरला बाजीरावसाहेबांनीं वास्तव्य केल्यापासून शक १८३५ पर्यंतच्या ९६ वर्षांतील त्या घराण्याची अगदीं संक्षिप्त हकीकत येथें देतों.

---

१ हलक्या. २ गोत. ३ कासार.

२. बाजीरावसाहेब बिठूरला निघाले त्या वेळीं त्यांची एक बायको–वाई येथील फाटक रास्त्यांची मुलगी–रायगडास होती. शक १७४० त इंग्रजांनीं त्या किल्ल्यास मोर्चे लावून त्या बाईस खालीं उतरविलें, व तिची रवानगी ब्रह्मावर्तास तिच्या नवऱ्याकडे करून दिली. जवळच्याच एका टेंकडीवरून रायगडावर तोफांची मारगिरी करितांना, शिवाजीमहाराजांचा राजवाडा व आंतील दफ्तरखाना खाक जळून गेला. त्यांत शिवकालीन सर्व कागदपत्र 'अग्नये स्वाहा' झाले; त्यामुळें शिवकालीन इतिहासाची फार हानि झालेली आहे.

३. ब्रह्मावर्तास जाण्यापूर्वीं बाजीरावसाहेबांस वाराणसीबाईच्या पोटीं वामनराव नांवाचा मुलगा झाला होता; परंतु तो महिना पंधरा दिवसांतच निवर्तला. दुसरी बायको सरस्वतीबाई इला हि एक मुलगी झाली होती, ती हि अशी च वारली.

४. बिठूरला गेल्यावर अभ्यंकर यांच्या घराण्यांतील सत्यभामाबाई, दणदणे चितळे यांच्या घराण्यांतील एक ( नांव माहीत नाहीं ), पाडळी येथील आठवल्यांच्या घराण्यांतील गंगाबाई, गोखल्यांच्या घराण्यांतील मैनासाहेब व रिसबुडांच्या घराण्यांतील सईबाई अशा पांच बायका बाजीरावानें केल्या. पैकीं, आठवल्यांच्या गंगाबाईला तीन मुली जाहल्या. त्यांतील एक जन्मल्यानंतर सहा दिवसांनीं च निवर्तल्यामुळें बाकीच्या दोन मुलींविषयीं च सांप्रत आपणांस लिहावयाचें आहे. ह्या दोघींचीं माहेरचीं नांवें अनुक्रमें योगाबाईसाहेब व कुसुमाबाईसाहेब हीं होत. या उभयतांपैकीं वडील मुलीचें–योगाबाईसाहेबांचें–जन्म सुमारें शक १७६५ त झालें, व धाकट्या मुलीचें–कुसुमाबाईसाहेबांचें–शक १७६८ च्या पौष शुद्ध १५ स झालें. कुसुमाबाईसाहेबांस बयाबाईसाहेब म्हणतात. ह्यांपैकीं योगाबाईसाहेबांचें लग्न श्री. बापूसाहेब कुरुंदवाडकर यांशीं श्री. नानासाहेब पेशवे यांनीं शके १७७७।१७७८ चे सुमारास लावून दिल्यानंतर, वर्ष दीड वर्षांचे आंत श्री. सौ. योगाबाईसाहेब ऊर्फ सरस्वतीबाईसाहेब पटवर्धन ह्या ब्रह्मावर्तासच निवर्तल्या. त्या दक्षिणेंत आल्याच नाहींत. श्री. कुसुमाबाईसाहेब ऊर्फ बयाबाईसाहेब, लष्करचे बाबासाहेब आपटे यांचे चिरंजीव रावसाहेब यांस दिल्या. यांचें सासरचें नांव सरस्वतीबाईसाहेब हेंच होय. ह्या सध्यां काशीस आपल्या स्वतःच्या वाड्यांत राहतात, व ह्यांना इंदूर व ग्वाल्हेर येथील संस्थानिकांकडून अल्पशी तैनात चालू आहे. इंग्रजांकडून मात्र अद्याप एक कपर्दिक हि मिळत नाहीं. ह्या बाईचें वय आजमितीस ६६ वर्षांचें आहे. आज पेशव्यांच्या कुळांतली औरस संतति म्हटली म्हणजे ह्या एकट्या होत. ह्यांच्यापुढें पेशव्यांचें कोणी औरस राहिलें नाहीं. या बाईंचे दर्शनाचा यंदां च आम्हांस योग आला. बाई निस्पृह, धैर्यशाली व अभिजात असून, भटांच्या घराण्यांतील मुत्सद्दयाची ठेवण त्यांच्या चेहऱ्यांत दिसते,

५. ब्रह्मावर्तास असतांना, पुत्रसंतति होण्याची निराशा वाटून, बाजीरावसाहेबांनीं धोंडोपंत नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब असे तीन मुलगे एकामागून एक दत्तक घेतले. हेतु हा कीं, एक दत्तक वारल्यास पूर्वजांस पाणी देण्यास कोणी तरी रहावा. पुण्याजवळील बोरघाटाखालीं थोरलें वेणगाव म्हणून एक खेडें आहे, तेथें भट या उपनांवाचें कुटुंब रहात असे. तें पेशव्यांचें सगोत्र होतें, दशांतलें देखील नव्हतें. त्या घराण्यांतील हे त्रिवर्ग होत. नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब यांचीं पूर्वींचीं नांवें अनुक्रमें धोंडोपंत, सदाशिवराव व गंगाधरराव अशीं होतीं. श्री. धोंडोपंतनाना यांचीं एकंदर तीन लग्नें जाहलीं. पहिली मुलगी करमरकरांची, दुसरी पाटणकरांची, व तिसरी सांगली येथील गोंजूमामा करमरकरांची. अशीं हीं श्रीमंत नानासाहेबांचीं तीन कुटुंबें असून पहिल्या दोघींचें नांव सारजाबाई असें होतें, व तिसरीचें नांव कृष्णाबाई असें होतें. दादासाहेबांस काशीच्या कालेंकर घराण्यांतील मुलगी केली. हिचें नांव रोहिणीबाईसाहेब. बापू गोडबोले यांची मुलगी काशीबाई बाळासाहेबांस केली

६. वरील त्रिवर्गापैकीं मधील दादासाहेब हे लवकरच मरण पावले. नंतर त्यांची बायको रोहिणीबाईसाहेब यांनीं रावसाहेब नांवाचा मुलगा दत्तक घेतला. ह्यांचें पूर्वीचें नांव पांडुरंगपंत असून, त्यांचा जन्म हि वेणगांवच्या भट घराण्यांत च झाला. अर्थात् श्री. रावसाहेब हे बाजीरावसाहेबांचे नातू होत. रावसाहेब यांचें लग्न ओकांच्या घराण्यांतील रमाबाईसाहेब नांवाच्या मुलीशीं झालें. मागें सांगितल्याप्रमाणें नानासाहेब, दादासाहेब, बाळासाहेब व रावसाहेब हे भट घराण्यांतील होते इतकें च नव्हे, तर ह्या चवघांपैकीं नानासाहेब व बाळासाहेब हे सख्खे बंधू असून, त्यांचे वडिलांचें नांव माधवराव असें होतें. दादासाहेब व रावसाहेब हे चुलत बंधू असून, ह्या उभयतांचें नानासाहेब व बाळासाहेब यांशीं तें च नातें होतें. हे चवघे हि जवळजवळ समवयस्क असून, त्यांचा काळ घोड्यावर रपेट करणें, दांडपट्टा खेळणें इत्यादि मर्दुमकीच्या खेळांत जात असे. प्रसिद्ध सेनानी तात्या टोपे हे ह्यांचे सवंगडी होत. श्री. नानासाहेब तर घोड्यावर बसण्यांत तरबेज असून, तत्कालीन अश्व परीक्षकांमध्यें व त्याचप्रमाणें घोड्यावर बसणारांमध्यें अग्रेसरत्वाचा मान त्यांजकडेसच येतो. रावसाहेब हि कांहीं कमी नव्हते.

७. असो. बाजीरावसाहेब शक १७७२ पौष शु. १२ स वारले. त्या वर्षाच्या ज्ञानप्रकाशच्या अंकांत ह्या निधनाची हकीगत तीनचार ओळींत दिली आहे !

८. ब्रह्मावर्तास बाजीरावसाहेबांच्या आश्रयास रामचंद्र नारायण भिडे, तात्या टोपे, पुण्यांतील कवठीच्या अड्ड्याजवळील पटवर्धन, मोरो बाबूराव फडणीस, रिसबूड, आठवले वगैरे बरी च मंडळी होती. शिवाय तांबे, देवधर, पराडकर, देव वगैरे

आश्रित, कारकून व वैदिक हि बरे च होते. ब्रह्मावर्त एकाद्या लहानशा संस्थानिकाच्या राजधानीसारखें भासे, व स्वतः बाजीरावसाहेब राजैश्वर्यानें रहात. स्नान-संध्या, जेवणखाण, यज्ञयाग, व्रतें-उद्यापनें, मंत्र-घोष व जुजबी ऐषआराम, अशा सुखवस्तु स्थितींत बाजीरावानें ब्रह्मावर्तास तेहतीस वर्षे काळ लोटला. बाजीराव शरीरानें धष्टपुष्ट, काठीनें उंच व चेहऱ्यानें उमदा दिसे. ७५ वर्षांचें वय असल्यावेळची बाजीरावसाहेबांची तसबीर आमचे संग्रहीं आहे. तींत वयाच्या मानानें चेहऱ्यावर उमदेपणा जास्त दिसतो. ह्या गृहस्थाचा चेहरा उतार वयापर्यंत बाळसेदार व तरुण दिसे, असें लोक सांगतात. एकंदरींत पुरुष निष्काळजी व बालिश खरा. स्वशरीरसंरक्षण एवढीच ह्या गृहस्थाची काळजी. ह्यापलीकडे दुसरी जबाब-
१०] दारी ह्यानें ओळखिली नाहीं व ओळखण्याचें ह्याच्या अंगांत सामर्थ्य हि नव्हतें. साम्राज्य, तत्संबंधक राष्ट्राच्या पुढाऱ्यावरील जबाबदारी, प्रजेचें ऋण, वगैरेंची जाणीव या पुरुषाला भासली च नाहीं.

९. बाजीरावसाहेबांच्या निधनोत्तर त्यांचें आठ लाखांचें पेन्शन आपल्याला मिळावें, म्हणून धोंडोपंत नानासाहेब यांनीं फार खटखट केली. परंतु ती कारकीर्द डलहौसीची असल्यामुळें नानासाहेबांना वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. ह्या अन्यायाचा संताप येऊन, दिल्लीचे पातशाहा, अयोध्येंतील तालुकदार, लक्ष्मीबाईसाहेब झांशीवाल्या, बरेलीचा नबाब व हिंदुमुसलमान पलटणी यांच्या साहाय्यानें नानासाहेबांनीं पेन्शन नाहीं तर राज्य मिळविण्याचा प्रयत्न केला, तो सर्वविश्रुत च आहे. ह्या प्रयत्नाला उत्तर हिंदुस्थानांत "नाना-गर्दी" म्हणून म्हणतात. ती शक १७७९
२०] च्या चैत्रांत सुरू झाली. पुढील चार महिन्यांत मिरत, दिल्ली, कानपूर, बरेली व लखनौ या प्रांतांत अतिशय गर्दी उसळली. सर्वत्र झोटिंगपातशाही सुरू झाली. नानासाहेबांच्या हातून सर्व सूत्रें गेलीं, व बाजारबुणग्यांचा सर्वत्र सुळसुळाट माजला. तेव्हां, आषाढांत कानपूर सोडून नाना परिवारासह अयोध्याप्रांतांत गेले. ह्या च वेळीं नानांची व तात्या टोपे यांची शेवटची भेट झाली. नाना उत्तरेकडे गेले व तात्या टोपे पश्चिमेकडे गेले. तात्या टोपे हे नाशिकाजवळील येवल्याचे मूळचे रहाणारे. तात्या *टोप्यांचा अंत शक १७८१ च्या चैत्र वद्य १ स झाला.

---

* तात्या टोपेसंबंधानें ता० १७।३।९९ चे 'टाईम्स'मध्यें कांहीं माहिती प्रसिद्ध झाली आहे. मध्यहिंदुस्थानांत पढूण नांवाचें संस्थान आहे. त्या संस्थानच्या नुकत्या च राज्य करूं लागलेल्या तरुण राजाच्या पणजोबाजवळ तात्या टोपे राहिले. लगेच सर रिचर्ड मीड यांजकडे त्यानें वर्दी दिली; व अशा रीतीनें तात्या टोपे पकडले गेले. ह्याबद्दल पढूणचे राजांना १००० रुपयांचें वर्षासन इंग्रजांनीं करून दिलें, व तें अद्याप चालू आहे.

१०. नाना सपरिवार उत्तरेस जे गेले ते अनेक अडचणी व हालअपेष्टा खात कसेबसे नेपाळांत शिरले. त्या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांच्या मातुःश्री सईबाई-साहेब व मैनाबाईसाहेब, त्यांचें स्वतःचें कुटुंब, बाळासाहेब व त्यांचें कुटुंब आणि रावसाहेब वगैरे मंडळी होती. ही सर्व मंडळी एक वर्षपर्यंत कधीं नेपाळहद्दींत तर कधीं इंग्रजहद्दींत लपत छपत होती. त्या काळीं नेपाळांत जंगबहादुराचा अंमल होता. नेपाळच्या हद्दींत शिरलें व जंगबहादुराला ती बातमी लागली कीं त्याच्या प्रांतांतून बाहेर जावें लागे. बाहेर जावयाचें म्हणजे इंग्रजहद्दींत. तेथें निभाव लागे-नासा झाला – व तो आठपंधरा दिवसांतच लागेनासा होई– म्हणजे पुनः नेपाळे-श्वराच्या हद्दींत शिरणें कपाळीं येई. असे गोते खात खात शक १७८० चा भाद्रपद मास आला; म्हणजे १७७९ च्या आषाढापासून १७८० च्या भाद्रपदापर्यंत चौदा महिने ही मंडळी वनवास करीत होती. त्यांचा मुक्काम नेपाळ–हद्दींत पांचसात कोसांच्या आंतबाहेर होई व तो हि जंगलांत किंवा जंगली खेड्यांत होई. शेवटीं शक १७८० च्या भाद्रपदांत नेपाळहद्दींत ठाडा म्हणून एक गांव आहे, त्याच्या-पासून सात कोसांवर देवखरी या स्थलीं स्वारीचा मुक्काम पडला. तेथें दगदगीनें हलक होऊन नानासाहेब यांस दोषी ज्वर लागला व त्यांत च त्यांचा अंत भाद्रपद वद्य १४ बुधवारीं झाला. नानासाहेब अत्यवस्थ पडले तेव्हां त्यांच्यानें हालचाल होईना आणि नेपाळकरांच्या प्रांतिक व ग्रामिक अधिकाऱ्यांचें तर आपल्या प्रांतांतून निघून जाण्याचें टुमणें लागलें. तेव्हां, मंडळीनें स्वारीच्या दोन तुकड्या केल्या. स्त्रियादि परिवाराची एक तुकडी करून ती ठाडा येथें पाठविली व स्वतः नानासाहेब पांचचार शेलक्या लोकांसह देवखरीच्या रानांत एका ओढ्याच्या लगत्यास राहिले. तेथें त्यांचा अंत व दहनविधि झाला. नंतर अस्थि गोळा करून त्या च दिवशीं बरो-बरची मंडळी ठाड्यास येऊन परिवारास मिळाली. ठाडा येथें बारावा व तेरावा करून, नंतर हा स्त्रियादि परिवार तेथें च कांहीं दिवस राहिला. ह्या स्वारींत श्रीमंत गंगा-भागीरथी मातुःश्री बयाबाईसाहेब आपटे ह्या होत्या. नानासाहेबांची उत्तरक्रिया त्यांच्या देखत ठाड्यास झाली, हें सांगावयास नको च. त्या काळीं कुसुमाबाईसाहेब आपटे ह्यांचें वय १२ वर्षांचें होतें. त्यांना सर्व गोष्टी यथास्थित कळत होत्या, व त्यांनीं च मेहेरनजर करून आम्हांस ही हृदयद्रावक हकीकत इत्थंभूत मित्तीसुद्धां निवेदन केली.

११. तात्पर्य, नानासाहेब यांचा अंत दोषी ज्वरानें नेपाळहद्दींत देवखरी येथें शक १७८० भाद्रपद वद्य १४ बुधवारीं म्हणजे इ. स. १८५८ च्या ६ आक्टो-बरास झाला हें निश्चित आहे. नानासाहेब काश्मिरांत गेले, रशियांत गेले, त्यांना इंग्लंडांत पिंजऱ्यांत घालून कोंडून ठेविलें, वगैरे हकीकती ज्या अधूनमधून अद्याप हि स्वसंतोषार्थ कित्येक उपद्व्यापी लोक नाताळच्या सुमारास प्रसिद्ध करीत अस-

तात त्यांत कांहीं तथ्य नाहीं, हें उघड आहे. तसें च, नानासाहेब म्हणून कित्येक निरपराधी लोकांस जो भूदंड १७७९ नंतर वीस पंचवीस वर्षे पडला तो हि नाहक्क होय ह्यांत संशय नाहीं. तत्कालीन इतर एकदोन गृहस्थांनीं हि ही च हकीकत अनुवादिली.

१२. नानासाहेब भाद्रपदांत देवखरी येथें वारले. त्यापूर्वीं तीन महिने ज्येष्ठ वद्य अमावास्येस बाळासाहेब दोषी ज्वरानें च नेपाळांत डांग येथें निधान पावले.

१३. ह्या चौदा महिन्यांच्या पळाला प्रारंभ होऊन दोनचार महिने होत आहेत नाहींत तों रावसाहेब पेशवे यांच्या डोक्यांत काय कल्पि आली न कळे, ते स्वारीला सोडून इंग्रजी हद्दींत ग्वालेरीकडे गेले. त्यांचें कुटुंब रमाबाईसाहेब इंग्रजी हद्दींत होत्या. रावसाहेब सियालकोटनजीक असतांना, त्यांच्या मुक्कामाची बातमी जवळच्या इंग्रजी ठाण्यास त्यांच्या एका मराठे जातीच्या आश्रितानें फितुरी करून दिल्यामुळें, ते थोड्या च दिवसांत धरले गेले, व त्यांना देहान्त-दंड *झाला. त्यांच्या स्त्रीचा हि भयंकर अंत झाला, असें ऐकिवांत आहे ! कोणत्या प्रकारें झाला तें माहीत नाहीं.

१४. बाळासाहेब, नानासाहेब, रावसाहेब व त्यांच्या पत्नी हीं चार माणसें निवर्तल्यावर, बाकी बाजीरावसाहेबांच्या स्त्रिया मैनाबाईसाहेब व सईबाईसाहेब; बाळासाहेबांची स्त्री काशीबाई, नानासाहेबांची स्त्री रुष्णाबाई, व बाजीरावसाहेबांची मुलगी कुसुमाबाई ह्या साशा स्त्रिया मात्र राहिल्या. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर, त्यांना नेपाळसरकारापासून फारसा त्रास पोहोंचला नाहीं इतकें च नव्हे, तर नेपाळांत राहण्याला हि त्या सरकारानें ह्या थोर व कुलीन स्त्रियांना आडकाठी केली नाहीं. ह्या बायांच्या बरोबर तात्या टोपे यांचा मुलगा पांडुरंगराव याचे चार मुलगे होते. शिवाय तांबे वगैरे कारकून व आश्रित असून राव राजेसर दिनकरराव राजवाडे यांचे साडू दामोदरपंत पटवर्धन हे हि होते. बळवंतराव टोपे हे ह्या पांच हि बायांना मातृवत् मानीत व यावज्जन्म त्यांच्या सेवेंत यांनीं आपला देह खर्चिला. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर कांहीं कालानें ही सर्व मंडळी खाटमांडूस गेली. तेथें बायांच्या जवळ जें जडजवाहीर होतें तें मोडून त्यांनीं तेथें थापोथळींत एक जागा विकत घेतली व त्यावर रहाण्यास वाडा बांधिला. योगक्षेमार्थ तीनचार लक्ष रुपये खर्चून तीनचार जहागिरी गांव खरेदी केले, आणि त्यांच्यांतून येणाऱ्या पांचसात हजार रुपयांच्या उत्पन्नावर गुजराण चालविली. ब्रिटिश हद्दीपासून पांचचार मैलांच्या आंत 'राणीगंज' म्हणून एक नेपाळांत आपल्या जहागिरींत नवें गांव वसवून, या बायांनीं एक रामाचें व एक लक्ष्मीनारायणाचें अशीं दोन देवस्थानें सोत्पन्न

* ह्यांस ब्रह्मावर्त येथें राजवाडे यांच्या घरासमोर मिती श्रावण वा. १० शक १७८४ रोजीं फांशीं देण्यांत आलें।

स्थापिली ! ह्या लक्ष्मीनारायणाच्या देवळांत मराठ्यांचा भगवा झेंडा व पेशव्यांची गादी हीं ह्या थोर बायांनीं त्या च वेळीं स्थापिलीं व तीं अद्याप तेथें आहेत ! सइ-बाईसाहेब नुकत्याच संवत् १९५३ त म्हणजे शक १८१८ त वारल्या. मैनाबाई-साहेब आणि काशीबाई व कृष्णाबाई अशा त्यांच्या दोन्ही सुना त्यांच्या अगोदर कांहीं वर्षे वारल्या. ह्या चौघा बायांनीं कालक्रमणा अत्यंत साधुरीतीनें केली, असें तत्रस्थ लोक सांगतात. कित्येक क्षुद्र लोकांनीं जंगबहादराचा व ह्या बायांचा निंद्य संबंध होता, वगैरे भिकार भारुडें रचिलीं; परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं. नेपोलियन बोना-पार्ट याला व याच्या संबंध्यांना शिव्या देण्यांत भूषण मानणारे कित्येक राष्ट्रांत जसे कित्येक लोक आढळतात, तसेच नानासाहेब व त्यांचें गणगोत यांची निंदा कर-णारे कित्येक अल्पात्मे सांपडतात इतकें च. ह्यापलीकडे त्या प्रलापांत कांहीं अर्थ नाहीं. Curse a dog and then hang him ह्या तत्त्वज्ञानांत आपल-पोटेपणा तरी आहे; परंतु To curse a man's relatives after his death, ह्यांत कोणता मतलब आहे तें एक सैतान जाणें.

१५. श्रीमंत नानासाहेब वगैरेंचा स्वभाव उमदा असून, त्यांची वृत्ति सत्त्व-गुणप्रधान अशी होती. शक १७७९ च्या 'नाना-गर्दी'चे पुढारी म्हणून त्यांच्यावर आग पाखडून कानपूर येथील कत्तलीशीं ह्यांचा संबंध जोडण्याचा कांहीं इंग्रज लेखकांनीं क्षुद्र प्रयत्न केला आहे. परंतु कानपूरच्या कत्तलीपासून शिपायांना परा-वृत्त करण्याचा नानासाहेबांनीं पुष्कळ प्रयत्न केला; कत्तलीशीं नानासाहेबांचा मुळींच संबंध नव्हता, असें स्वतः श्री. बयाबाईसाहेब सांगत आहेत.

१६. बाजीरावसाहेबांची मुलगी श्री. कुसुमाबाईसाहेब यांना गर्दीनंतर स्थिर-स्थावर झाल्यावर त्यांचे श्वशुर बाबासाहेब आपटे यांनीं रेसिडेंटाच्या परवानगीनें खाट-मांडूहून ग्वाल्हेरीस आणिलें. त्या सध्यां काशी येथें दुर्गाघाटीं हरिहरि म्हणत स्वस्थ आहेत. रघुनाथरावांचे दत्तक पुत्र अमृतरावसाहेब चित्रकूटवाले यांचा वंश सध्यां रायबरेलीस आहे. हा वंश रावबाजीच्या वंशजांच्या पंक्तींत नसल्यामुळें, त्यांच्यासंबं-धानें ह्याहून जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

१७. येणेंप्रमाणें बाजीरावसाहेब पेशव्यांच्या कुटुंबाची हकीकत आहे. पेश-व्यांची औरस पुत्रसंतति बाजीरावसाहेबांनंतर राहिली नाहीं. पेशव्यांची पुत्री-संतति मात्र महाराष्ट्रांत पांचपंचवीस घराण्यांत आहे.

१८. सईबाईसाहेब यांच्या मृत्यूनंतर, नेपाळसरकारानें त्यांची जहागीर बिन-वारशी म्हणून जप्त केली. सध्यां भगवा झेंडा व पेशव्यांची गादी असलेलें देव-स्थान मात्र चालू आहे. तेथें तांबे उपनामक एक कऱ्हाडे कुटुंब पूजा करून असतें. उपरिनिर्दिष्ट चार सासा बाया जोंपर्यंत होत्या तोंपर्यंत सांगली, पुणें, इंदूर, ब्रह्मा-

वर्ते व काशी येथून त्यांचे स्नेहसंबंधी अधूनमधून जातात. आतां यापुढें पेशव्यांच्या इतिहासाच्या संशोधकांखेरीज दुसरे कोणी तेथें जाईल, असा संभव दिसत नाहीं.

वि. का. राजवाडे,
पां. न. पटवर्धन.

## ९५ कूपखननलक्षण–मराठी गद्य

पानें १–५

शेवटीं विक्रम संवत् १६८२ म्हणजे इ. स. १६२५ हा काल दिला आहे. ग्रंथ ज्योतिषाचे आधारानें लिहिला आहे. भाषा फार च आधुनिक केली आहे. वराहमिहिराच्या नुकत्या च उपलब्ध झालेल्या 'दृगार्गलशास्त्र' या ग्रन्थांत जे नियम आढळतात त्यांतील कांहींचा यांत संग्रह केला आहे. यांतील गोष्टींचें अनुभव पाहण्यासारखे आहेत. 'दृगार्गलशास्त्राचे' भाषांतरकर्ते रा. गोरे हे याप्रमाणें त्यांस अनुभव आल्याचें लिहितात. यांत आरंभीं दिलेले श्लोक 'दृगार्गलशास्त्रां'त आढळत नाहींत; परंतु प्रथम 'दृगार्गलशास्त्र' म्हणून 'वराहसंहिते'च्या ५३ व्या अध्यायांत आपण ज्योतिषदृष्ट्या या बाबींचा विचार केला आहे असें वराहमिहिर म्हणतो. तेव्हां त्यांत हे श्लोक असल्यास न कळे.

श्रीगणेशायनमः । अथ वापिचक्रं ॥ वापीचक्रं प्रवक्ष्यामि विज्ञेयं सर्वदा बुधैः । रोहिण्या गणयेदृक्षं यावत्तिष्ठति चंद्रमाः । मध्ये चत्वारि धिष्ण्यानि पूर्वादौ च क्रयं क्रमात् ॥ मध्ये शीघ्रजलं स्वादु पूर्वस्यां खंडितं जलं ॥ २ ॥ आग्नेय्यां सुजला वापी याम्यां वै निर्जला भवेत् ॥ नैर्ऋत्यामुदकं क्षारं पश्चिमे चोत्तमं जलं ॥ ३ ॥ वायव्यां वायुभूतं च उत्तरे बहुधा जलं ॥ ईशान्यां स्वल्पकं तोयं वापीचक्रे नियोजयेत् ॥ ४ ॥ इति कूपचक्रं ॥ दिशाजलसमायुक्त संवत्सरगजान्वितं ॥ अष्टभिस्तु हरेद्भागं शेषं दिवसाच उच्यते ॥ ५ ॥ सजलं निर्जलं पीठं पाषाणं च पुनः पुनः ॥ ध्रुवकंपं पंचभिर्गुण्यं चतुर्विंशाति भाजितं ॥ ६ ॥

[ पृष्ठ १ पाठ.
पोट मलपृष्ठ

लब्धंचैवभवेद्धंडं शेषमंगुलमुच्यते ॥ वैशाख शुक्रे इति माघ फाल्गुने पौषे तथा श्रावणमास कार्तिके ॥ एभिः प्रशस्तं ३ खलु वापि खातं वित्तं च सौख्यं च यशो नराणां ॥ सूर्ये लग्नगते यदा भवति वै वाप्यां जलं नास्तिचे चंद्रे वापि जलाश्रयो बहुवसा पाषाणमंगारके ॥ सौम्ये शुक्रगुरौ जला

बहुवसा पाषाणमंगारकः पापाणं कुटिले तमस्य द्विग्रहा राहोः फलं केतुवत् ॥ यद्व्रिंध्य भागे खलु चंद्रमा स्यात्तद्विग्विभागे लज (जल ?) निर्झराःस्युः ॥ तदाधिपे क्रूरशुभान्विते स्यात्क्षारं च गौल्यं मुनयो वदंति ॥ मीने कुलीं रेमकरे बहूदकं कुंभे वृषे चापि तथैव चार्धं ॥ अलिं च तौलिं जलसंज्ञमाहुः शेषास्त्वनुका अजलाः प्रकीर्तिताः ॥ आतां पाणि जाणायाचा प्रकार सांगें ॥ वापी कूप तडागादि मूहूर्त

[ पृष्ठ २ पोट,

वेळा पाहाव्या ॥ त्या वेळेचे लग्न पाहावें । मग विचारावे । लग्न जळचर होय । चंद्र जळराशिस होय । लग्न स्वामी जळराशिस होय । अथवा चंद्र वा सूर्य लग्नीं होय । अथवा चंद्र वा शुक्र ४ असे तरि बहुत पाणि लागेल । यांमध्यें कांहि योग मिळति कांहि न मिळतिं तर थोडे पाणीं लागेल । असे जाणावे । जरि जळयोग मिळति पापग्रह लग्नीं । ४ । होतील तर पाणि न लागे जर जळचर लग्न होय आणि पापग्रह होती तरी मध्ये खडक लागेल जरी तयां पापग्रहां ते शुक्र चंद्र देखेत तरि तो खडक फुटे खालि पाणि लागेल असे जाणावे । जर चवथ्या स्थानी शुभग्रह देखत आणि

| | | |
|---|---|---|
| वृ<br>उ<br>उ | च<br>चि<br>मृ | श<br>स्वा<br>अ |
| पू<br>पू<br>भ | री<br>ह अ<br>श्र | फ<br>वि<br>पू |
| म<br>पू<br>अ | आ<br>ज्ये<br>रे | पु<br>अ<br>उ |

[ पृष्ठ २ पा० २

पापग्रह होय तरि जितुके शुभग्रह देखतील तरि तितुक्या गजा अथवा तितुकियां पुरुषां खडक लागेल । पापग्रहाचा भागा ३ तीनी भाग दीजे जितुक्या वेळा तीन तीन फिटतील तितुक्या गजां खडक लागेल असे बोलावे । आतां पाणीं कसे कसें लागेलऐसे बोलावे । लग्नीं १ अथवा ४ शुभग्रह होतील तरिपाणि मिष्ट लागेल । जरि पापग्रह असतील तरि पाणि खारट लागेल । मेष ८ वृष ७ मिथु(न!) ५ कर्क ४ सिंह ५ कंन्या ५ तु(ळ!) ६ वृश्चि(क!) ७ धन १० मकर ५ कुंभ ५ मीन ४ हे अंक राशिचे । जरि लग्नीं चंद्रशुक्र असतो अथवा ४ असनि तरि (ति!)तुक्या गजा पाणि लागे ऐसे जाणावें । चंद्रशुक्र नसती तरि तितुक्या पुरुषा पाणि लागेल । आतां आणिक प्रकार सांगेन । आदित्य १६ चंद्र ४

[ पृष्ठ ३ पोट

मंगल १० बुध २१ गुरु ७ शुक्र ५ शनि २१ हे ग्रह लग्नीं रा ४ पडतां जलज २ लग्न होय इतुक्या गजा पाणि लागेल ऐसे जाणावें जरी जलचर लग्न न होय तरि तितुक्या पुरुष पाणि लागेल असें जाणावे जरि ग्रह नसेल तरि राशीच्या अंकापासून बोलावें । आता आणिक प्रकार सांगेन जेथे कूप विहीर तळे घर करणें

असेल त्या भूमीची परिक्षा सागेन भूमीमध्ये अवरस चौरस हात येक भूमि खणावी ते मृत्तिका संपुर्ण भरावीं जरि उणि होय तरि बरि नव्हे असे जाणावें जरि सम होय तरि शुभ कदापि निषेध नाहिं जरि माति वाढेल तरी त्या स्छानीं सुख परम होय तेच माति रांत्री तुलिजे जरि उणि होय तरि निकें परंतु अशुभ नाहि जरी तलना

[ पृष्ठ ३ पाठ

करितां वाढे तरि बरे सुख भोग यश होय आता पा (?) पाण्याचे भूमीचि परिक्षा सागेन जैशा मनुष्याचे आगि शिरा असती सातशें चौविस ७२४ तैशा भूमीमध्ये आहेत एक पाणि यां ॥ चा एक अग्निची एक वायुचा रसायणाचा बहुता परिचा शिरा असती त्या मध्ये पाण्याचा शिरा जाणाव्या शास्त्रीं लक्षणे बोलिलि असति । ज्या स्छलि पाणि नाहिं तेथें वेताचें झाड ।निळे साक्ष नीले जरि असे तरि यां वेताचें झाडा पासुन पश्चिमेकडे गज ३ खणिजे दीड पुरुष खणिजे मिष्ट पाणि लागेल पश्चिमे शीर लागेल कांहि आटेना । जे ठाई जांबूलिचा वृक्ष बरवा साक्षिला असें तये जाबुलि खालि पूर्व दीशेस वारुळ होय तरिं जाबुळिचे पाला वं दक्षिणेकडे खणिजे २ दोहो पुरुषां २ व्रत पाणि मिष्ट लागे तें पाणि कदापि खंडेना । तेथे दक्षिणेचा झरा लागे खण

[ पृष्ठ ४ पोट

र्म्मं दक्षिणेचा झरा लागे । खणता अर्ध पुरुषा मत्स्य लागे आणि कणकनचे या रंगा सारिखा पाषाण लागेल । त्या खालि निळि माति लागे तरि बहुत पाणि आहे ऐसे जाणावे भूमि खणता शुभ्र मंडकू निघे तया खालि पिवळि माति लागे पुढे चिंचोळा पाषाण लागे तर त्या ठाई बहुत पाणि असे असे जाणावे ज्या स्छळिं औदुंबराचे झाड बरे सांग होय त्यापासून पश्चिमेकडे तीन गज ३ खणिजे ते पुरुषां १ पाढरा सर्प निघे काळा पाषाण लागेल कोळा तेथे अडचा पुरुषां २॥ पाणि लागे खालि पानाळिची शिर लागेल कुडके पाषाणा चे निघति ६ जेथें निरंजनाचा ठाई अंजनाचा वृक्ष निला सोपाला होय त त्या वृक्षापासुन उत्तरेकडे ३ तिहिं हा आ वारुळ जरि होय तरि पश्चिमेकडे ३ हाता खणिजे तेथें ३।॥

[ पृष्ठ ४ पाठ

पुरुषा बहुत पाणिं लागे ७ जे ठाई वारुळावरि निर्गुडीचें झाड असे तरि त्यापासुन दक्षिणेकडे गज ३। खणिजे तेथें २। पुरुषा पाणि लागे मिष्ट तें कांहीं आटेना तेथें दक्षिणेचा झरा लागेल ॥ ८ भूमी खणतां गजा २ राताळ मासळि निघे उजली माती होय तया उवती माति लागे ४ खालें वाळु निघे तया खालें मुरुंब निघे।

तया खालें बहूत पाणि लागे चहूकडे झरे सुटती ९ कोणेके स्थानि बोरिचे झाड पालेले सांग एकले बरवे असे त्यापासुन हात २।३। वाहळ जरि असे तरि त्या वृक्षापासुन पश्चिमेकडे खणिजे तेथें पुरुषां ३ पाणि बहुत लागे खणतां हाता २।३। पांढरि दुरोळि निघे दुरोजि म्हणजे पालि १० जवे सर्वे उंबर एक वाट निघालि तेथें पाणि लागले असे जाणावे त्यापासून दक्षिणेकडे ३ हातावर खणिजे २।३। मडूक निघे तेथें पुरुषा तीही पाणि लागेल दक्षिणेचा झ-

[ पृष्ठ ५ पोट

रा लागेल ११ काळ्या उंबराच्या झाडा खालि वारुळ होय तरि त्या झाडा खालि खणिजे २।३ पुरुषा पाणि लागेल तेथें पश्चिमेच्या झरा लागेल १२ निरंजने ठाइ बहाव्याचे झड सोपाले सांग जरि होय त्या खाल्या जवळिं वारुळ होय त्यापासून [१० पुरुषां १॥ पाणि लागे तेथे प्राक् झरा असें १३ जे ठाई सांत्वानाचा वृक्ष असे त्याजवळ वारुळ असे होय तरि त्या वृक्षा आणि वारुळा माझारि खणिजे खणिजे पुरुषा ९ का सर्प कपिला निघे त्या खालि रातळिं माति निघे त्या खालिं कुरुंदासा- रिखा पाषाण लागे तेथें मिष्ट पाणि लागे ॥ १४ ॥ इति कूपादिखननलक्षणं समाप्तं ॥ छ ॥ ॥ शके १६८२ विक्रमसंवत् ॥ छ ॥ ॥ छ ॥ छ ॥

[ पृष्ठ ५ पाठ

दत्तो वामन पोतदार.

## ९६ मल्हारीसुत

या च वरील बाडांत एक २१ श्लोकांचें गणेशस्तोत्र आहे. त्याचा कर्ता 'मल्हारी-सुत'. त्यांतील निम्मे श्लोक पान फाटून गेल्यामुळें गहाळ झाले आहेत. शेवटचा [२० २२ वा श्लोक असाः—

मल्हारीसुत दास जनार्दन रे ।  
म्हणे × री मुक्तिपंथासि ने रे ।  
नको द्वैत ठेऊं × ळी माजि जाण ।  
भजे मोरया मोरया देव जाण ॥ २२ ॥

दत्तो वामन पोतदार.

# १७ चिकोडी येथील शक ९१० तील एक ताम्रपट

१. हा ताम्रपट चिकोडी येथील रा. आदप्पा काळप्पा उपाध्ये यांजकडून पहाण्यास मिळाला. तीन पत्रे आहेत व ते कडींत अडकविलेले आहेत. कडीवरील मुद्रेवर वराहलांछन आहे. उत्तरचालुक्य जो तैलप त्याच्या साम्राज्यांत ताम्रपट कोरविल्यामुळें चालुक्यांचें लांछन मुद्रेवर कोरविलें असावें. दर पत्र्याची लांबी १' ३", रुंदी ७", जाडी $\frac{१}{८}$" आहे व कडीसुद्धां तिन्ही पत्र्यांचें वजन सुमार २॥ शेर (पक्के) आहे. पत्रे तांब्याचे आहेत.

२. अक्षर शकशतक १००१ तील महाराष्ट्रांतील आहे.

३. भाषा संस्कृत आहे.

४. प्रथम श्लोकांत सर्वज्ञ म्हणून जिनाचें नांव व सद्धर्म म्हणून जैनधर्माचें नांव घेतलें आहे. त्यावरून दिसतें कीं, ताम्रपट कोण्या तरी जैनानें कोरविला आहे. दुसऱ्या श्लोकापासून पांचव्या श्लोकासुद्धां राष्ट्रकूटांच्या वंशांतील कांहीं नांवें दिलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें:—

१ शुभतुंग
२ तत्सुत जगत्तुंग
३ तत्सुत इंद्रराज
४ तदनुज अमोघवर्ष वनगजमल्ल
५ तत्सुत यद्बनामा कृष्णराज
६ तद्भ्रातृ खोट्टिग
७ वद्दिग

वद्दिगानंतर राष्ट्रकूटांचें राज्य वृद्धि पावण्याचें तैलप चालुक्याच्या दडपणामुळें थांबलें असे कष्टोद्गार पांचव्या श्लोकांत काढले आहेत. शुभतुंग म्हणजे दुसरा अकालवर्ष–शुभतुंग–कृष्ण. ह्या दुसऱ्या कृष्णापासून खोट्टिगापर्यंत इतरत्र राष्ट्रकूट ताम्रपटांप्रमाणें च ह्या हि ताम्रपटांत नांवें दिलीं आहेत. परंतु, खोट्टिगानंतर वद्दिग राजा झाला, असें म्हटलें आहे. इतर ताम्रपट कक्कल असें नांव देतात. ह्या वद्दिगानंतर राष्ट्रकूटांचें राज्य संपून तैलप चालुक्याचें राज्य सुरू झालें. इतकें कथन केल्यानंतर, ताम्रपटांत दक्षिण कोंकणच्या सिलारांची वंशावळ येणेंप्रमाणें दिली आहे:—

धम्मियर

|

तत्सुत चामल्ल किंवा अम्मल्ल

|

तत्सुत ऐयप

|

तत्सुत आदित्यवर्मा

|

तत्सुत अवसर

|

तत्सुत इंद्र

|

तत्सुत भीम

|

तत्सुत अवसर ( शक ९१० )

इतर ताम्रपटांत धम्मियराचा पुत्र ऐयप सांगितलेला आढळतो. ह्या ताम्रपटांत धम्मियराचा पुत्र चाम्मल्ल किंवा अम्मल दिला असून, त्याचा पुत्र ऐयप दिला आहे. इतरांत ताम्रपटांत ऐयपाचा मुलगा अवसर दिलेला आहे. ह्या ताम्रपटांत ऐयपाचा मुलगा आदित्यवर्मा दिला आहे. बहुशः अवसराचें च दुसरें नांव आदित्यवर्मा असावें. यानंतरची वंशावळ इतरत्रप्रमाणें च आहे.

शक ९१० त राज्य करणाऱ्या ह्या अवसर सिलाराच्या अमलांत, वृद्ध नगरांतील मठ मठिका यांस कांहीं भाग दिलेला आहे. दानपत्राचे शेवटीं नेहमींच्या पद्धतीस अनुसरून ठरलेले तीन श्लोक आहेत. त्यांचा अर्थ दिलेला नाहीं.

## पत्रा पहिला दुसरी बाजू

१ ॐ जयतुतरां सर्व्वज्ञो नन्दन्तु जनाश्च राजगोविप्राः । सद्धर्म्मो
२ वर्द्धन्तामविनाशि च शासनं भवतु ॥ य इह परमपृथ्वीवल्ल
३ भो वल्लभो ऽ भू दिन इव शुंभतुङ्ग[1] स्तेजसा सुप्रसिद्धः । समभव

सर्वज्ञाचा विशेष जय असो, लोक आनंदित होवोत, राजा गाई व ब्राह्मण हे प्रमुदित होवोत । सद्धर्माची वृद्धि होवो व (हें) शासन चिरकालिक होवो ॥ आपल्या तेजानें सुप्रसिद्ध जणुं सूर्य च व पृथ्वीचा शास्ता असा शुभतुङ्ग वल्लभ (राजा) झाला । त्याचा पुत्र प्रतापी, परमशूर, व ज्यानें सर्व शत्रूंस जिंकिलें असा श्री

१ शुभतुङ्ग

४ दतिशूरस्तस्य पुत्रः प्रतापी विजितसकलशत्रुः श्रीजगत्तुङ्ग
५ देवः॥ सकलविबुधबन्धु स्तत्सुतो नित्यवर्षो ऽभवदिव दिवजन्द्रःश्री
६ न्द्रराजो जितात्मा । त तु तदनुजोऽभूद्भूप्रियोऽमोघवर्षो नृपगुण
७ रमणीयः सर्व्वसामन्तनाथः ॥ अथ वनगजमल्लायह्वना
८ मप्रसिद्धः समभवदवनीशस्तत्सुतः कृष्णराजः । निहतनिखि
९ लशत्रो स्तस्य धर्मैकबन्धो स्तदनु विधिवशेन भ्रातरि प्राप्तरा
१० ज्ये ॥ लोकप्रसिद्धसत्यागभोगादिगुणशालिनि । श्रीमत्खो
११ ट्टिगदेवे तु परं लोकं गते सति ॥ श्रीराष्ट्रकूटान्वयकल्पवृक्षो
१२ त्तुङ्गाङ्कुरे वड्डिगदेवनाम्नि । श्रीतैलपानल्पनगातिभारादप्रा

१०] **पत्रा दुसरा बाजू पहिली**

१३ प्रवृद्धौ सति दैवयोगात् ॥ ५ इतः सिलारवर्ण्णनम् ॥ श्रीमान्वि
१४ याधरेन्द्रोऽभूत्परार्थनिरतः सदा । जीमूतकेतोः सत्पुत्रो नाम्ना
१५ जीमूतवाहनः ॥ मत्वा तृणवदात्मानं धीरः प्रादाद्गरुत्मते ।
१६ यो नागरक्षणे वंशः सिलाराख्य स्ततोऽभवत् ॥आसीत्तत्रान्वये श्रीमा
१७ न्राजा धम्मियरः परः । अधिवेलाकुलं रम्यं योऽकरोद्बलिपत्तनम् ॥
१८ तत्र चाम्मल्लनामाभूत्तत्सुतो निर्ज्जिताहितः । प्रचण्डदण्ड स्तत्पुत्रस्स
१९ मभूदियपो नृपः ॥ आदित्यवर्म्मा पुत्रोऽभूत्तस्मादादित्य

---

जगत्तुङ्ग देव नांवाचा होता ॥ त्याचा मुलगा, सर्व विद्वानांचा पोषक, दुसरा इन्द्र च असा नित्यवर्ष इन्द्रराज म्हणून होता । त्याचे मागून त्याचा भाऊ पृथ्वीस प्रिय असलेला, नृपगुणांनीं सालंकृत, सर्व्वसामन्तांचा (ता?) श्रेष्ठ असा अमोघवर्ष नांवाचा होता ॥ नंतर त्याचा पुत्र कृष्णराज हा अवनीश झाला, तो वनगजमल्लायह्व या नांवानें प्रसिद्धीस आला । धर्माचा एक बंधु व सर्व शत्रूंचा नाश करणारा तो त्याच्या मागून दैववशात् त्याचा भाऊ, जगीं प्रथित अशा त्यागभोगादि गुणांनीं युक्त, जो खोट्टिगदेव तो राजा झाला ॥ तो स्वर्गी गेल्यावर, राष्ट्रकूटांच्या वंशरूपी कल्पवृक्षाचा अंकुररूपी जो वड्डिगदेव तो श्रीतैलप हाच कोणी महानग त्याच्या भारानें वृद्धि पावला नाहीं हें दुर्दैव च होय ॥

५ येथपासून सिलारकुळाचें वर्णन । जीमूतकेतूचा सत्पुत्र, विद्याधरांचा श्रेष्ठ, परोपकारीं तत्पर, जीमूतवाहन नांवाचा होता ॥ आपल्या स्वतःस तृणवत् मानून त्या धीरानें नागरक्षणाकरितां गरुडास आपला बळी दिला; त्या दिवसापासून त्या वंशास ' सिलार ' म्हणून नांव पडलें ॥ त्या कुळांत वैभवशाली असा ' धम्मियर ' नांवाचा राजा झाला । त्यानें ' बलिपूर ' ज्याची सीमा समुद्रापावेतों गेली आहे, असें विस्तृत व रम्य केलें. त्याचा पुत्र शत्रूंस ज्यानें जिंकिलें आहे असा 'आमल्ल'

२० वत्त्रयम् । प्रतापापास्तवैरीन्द्रतमराशिः प्रजाप्रियः ॥
२१ अवसर इति पुत्र स्तस्य जातो जितारिः प्रथितपरमकीर्तिर्द्ध
२२ र्म्मकर्म्माभिरामः । समभवदथ : शक्रवद्विक्रमाढ्यः सकलगु
२३ णगरीयानिन्द्रराज स्तु तस्मात् ॥ समभवत्तनयो नयवां स्ततो ज
२४ गति भीम उदारतमोऽभयः । य इह भीम इव प्रथितोऽखिलै
२५ र्नृपगुणै र्गुणवद्भि रुपासितः ॥ सैहिकेय इव योऽतिदुर्ज्ज

## पत्रा दुसरा बाजू दुसरी

२६ यो ग्रस्तकान्ततरचन्द्रमण्डलः । यश्च काम इव मानिनीमन
२७ स्त्यक्तदर्प्पमकरोन्मनोरमः ॥ तत्पुत्रस्यावसरनृपतेर्द्धर्म्मपु
२८ त्रोपमस्य सत्यत्यागाद्यनुपमगुणालंकृतेरस्तशत्रोः । कन्दर्प्प [१०
२९ स्य परिमितमहारूपसौभाग्यलक्ष्म्या पूज्ये राज्येऽत्र व
३० लिनगरे वर्द्धमानेऽसमाने ॥ ९शकनृपकालव्यपगत
३१ शतेषु नवसूत्तरेषु दशवर्षैः । श्रीसर्व्वधारिवर्षे कार्त्ति
३२ कशित–सोमवारपश्चम्याम् ॥ श्रीमदवसरराजाय ।
३३ सिद्धैश्रेष्ठिपुत्रो रेउमश्रेष्ठी तत्सुतो नागैश्रेष्ठी
३४ तथा छद्दमैश्रेष्ठितनयो रेवणश्रेष्ठी तत्पुत्रो लोक्कि


---

नांवाचा होता । ज्याचें शासन अत्यंत कठिण असा त्याचा पुत्र 'ऐयप' म्हणून झाला ॥ दुसरा आदित्य च काय असा त्याचा आदित्यवर्मा नांवाचा पुत्र होता । त्यानें आपल्या प्रतापानें स्वतःच्या श्रेष्ठवैऱ्यांचा (अंधकार) नाश केला व तो प्रजेस अत्यंत प्रिय होता ॥ धर्मकर्मांनीं अभिराम व जित आहेत शत्रू ज्यानें असा त्याचा पुत्र अवसर नांवाचा होता । त्याचा पुत्र इंद्राप्रमाणें पराक्रमी, व सर्वश्रेष्ठ-गुणांनीं युक्त असा इन्द्रराज नांवाचा होता ॥ नंतर गुणिजनांनीं उपासित, नृप-गुणांनीं विश्रुत, अपरभीम च जणूं, अत्यंत उदार, व नीतिमान् असा त्याचा पुत्र भीम म्हणून झाला ॥ सुंदर अशा चन्द्रमण्डलाचा (चंद्रवंशाचा !) ज्यानें ग्रास केला आहे असा दुसरा दुर्जय राहू च काय, अशा त्यानें आपल्या रूपानें मदनाप्रमाणें मानिनींच्या मनांतील गर्वाचें हरण केलें ॥ त्याचा पुत्र अवसर. ज्यानें शत्रूंचा नाश केला आहे, जो सत्य, त्याग इत्यादि गुणांनीं अलंकृत, जो दुसरा धर्मपुत्र च, व ज्याचे रूपसौंदर्यानें सौभाग्यलक्ष्मी परिमित झाली आहे असा दुसरा कंदर्पच तो होता. त्याच्या पूज्य राजवटींत बलिनगराची असमान भरभराट झाली ॥. शक ९१० संवत्सर सर्वधारि या वर्षीं कार्तिक शुद्ध ५ सोमवारीं या श्री अवसर राजास सिद्धैश्रेष्ठीचा पुत्र रेउमश्रेष्ठी व त्याचा पुत्र नागैश्रेष्ठी, तसेच

३५ श्रेष्ठी तथा महाडैश्रेष्ठिपुत्रः खैत्रैय * इति त्रयोऽपि क्रमागतकिं
३६ जलपुलीसे जीवलोकद्वयस्थिरीकरणार्थं चत्वारिंशद्दीनारजानि
३७ तां पादपूजां प्रादुः । अर्हणमस्य हडपव्ययार्थं पूगफललक्षद्व
३८ य प्रतिवर्षं त्रिभिरव दातव्यम् । × किञ्च । श्रीरेवणार्यमन्त्यु

## पत्रा तिसरा बाजू पहिली

३९ क्रैश्रेष्ठिनागपालामात्यपुलेन हडपादिप्रधान राजपुरुष
४० सकलवृद्धनगरहञ्जमानपञ्चमठस्थानमाठिकात्रयीविदितं
४१ श्रीमदवसरराजपुत्रपौत्रादिभिस्तत्पुत्रपौत्रेषु पालनी
१०]४२ यमेतदाचन्द्रार्कामिति ॥ बहुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिः सगरा
४३ दिभिः । यस्य यस्य यदा भूमि स्तस्य तस्य तदा फलम्॥ स्वदत्तां
४४ परदत्तां वा यो हरेत वसुंधराम् । षष्टिवर्ष्षसहस्राणि वि
४५ ष्टायां जायते कृमिः ॥ सामान्यो ऽ यं धर्म्मसेतुर्नृपा
४६ णां काले काले पालनीयो भवद्भिः । सर्व्वानेतान्भाविनः
४७ पार्थिवेन्द्रान्भूयो भूयो याचते रामभद्रः॥



छड्डैश्रेष्ठीचा मुलगा रेवणश्रेष्ठी व त्याचा पुत्र लोक्के श्रेष्ठी, व तिसरा महडैश्रेष्ठीचा पुत्र खेत्रैटा, त्याचा आदित्यवर्मा या तिघांनीं पूर्वपरंपरागत चालत आलेली किंजल व पुलीस, या दोन गांवांच्या सुखाकरितां चाळीस दिनार पाद्यपूजा म्हणून दिले ॥ याची पूजा म्हणून व जें पूजाद्रव्य हडप याच्या खर्चाकडे द्यावयाचे तें तिघांनीं दरवर्षी २ लक्ष सुपारीच्या स्वरूपांत द्यावयाचें। नागैश्रेष्ठीचा भाग मी परिपालन करावयाचा नाहीं, परंतु

( यापुढील अर्थ बरोबर लागत नाहीं. साधारण समजतो तो असाः—हडपादि प्रधान राजपुरुषांनीं वृद्धनगरांत चालविलेले पांच मठ व तीन माठिका यांस श्रीरेवण आर्य मनुकश्रेष्ठि व अमात्यपुत्र (?) नागपाल यांनीं दिलेला भाग मात्र श्रीमद् अवसर राजाच्या पुत्रपौत्रांनीं त्यांच्या पुत्र पौत्राकडे आचन्द्रार्क चालवावा ॥ × ×

* +++ श्रेष्ठिपुत्र आदित्यवर्म्मा +‿+नागैश्रेष्ठिनो भागो न मयाः पालनीयः
१ क्षत्रिय शब्दापभ्रंशः नाम वा ग्राह्यम् । २ ग्रामद्वयनाम । अथवा असंस्कृतम् । ३ प्रधानराजपुरुषाचें नांव । पुढील उताऱ्यावरून । ४ असंस्कृतम्–पुल=पुळा–प्रकृतेऽनुपयुक्तम् ।

४८ श्रीमन्नागरसान्धिविग्रहवता स्वस्वामिनोऽनुज्ञया श्रीम
४९ द्वामनसूनुना च कविना श्रीदेवपालेन हि । विस्पष्टं लिखि
५० तं स्वविस्तरसमुत्कीर्ण्णं तथा वज्जडे नाकल्पावधि साधु तिष्ठतुत
५१ रां सर्वैः समं शासनम् ॥ इति मङ्गलमहाश्रीः ॥ ७ ॥

## ९८ कल्यारंभ व भारतीय युद्ध

१ भारतीय युद्ध कधीं झालें, ह्या बाबीचा शोध व निर्णय युरोपीयन लोक गेलीं शंभर वर्षे करीत आहेत. इतकीं वर्षे घालवून त्यांनीं शेवटीं असा निर्बंध करून घेतला आहे कीं, भारतीय युद्ध इसवीसनापूर्वी फार तर पंधराशें वर्षांपलीकडे झालें नसावें. ह्या निर्बंधाला ते विष्णुपुराणाचा आधार देतात.

यावत्परीक्षितो जन्म यावन्नंदाभिषेचनं ।
एतद्वर्षसहं तु ज्ञेयं पंचदशोत्तरं ॥

पंचदशोत्तरं किंवा पंचाशदुत्तरं अशा अर्थाचे पाठ इतर दोनचार पुराणांत आढळतात. त्यांच्यावर भिस्त ठेवून, व नंद इसवी सनापूर्वी ४०० वर्षें होते असें ठरवून, युरोपीयन शोधक म्हणतात कीं, भारतीय युद्ध इसवीसनापूर्वी १५०० वर्षें झालें असावें. हें युरोपीयनांचें म्हणणें आपल्या इकडील विद्वानांस मान्य नाहीं. का कीं, कलियुगाला प्रारंभ शकापूर्वी ३१७९ व्या वर्षी व संवतापूर्वी ३०४४ व्या वर्षी झाला व त्या च वेळीं भारतीय युद्ध झालें, अशा अर्थाचीं वचनें पुराणांतून, शिलालेखांतून, व ज्योतिषग्रंथांतून अनेक आहेत. त्यांचा आधार सोडून, युरोपीयनांचें म्हणणें ग्राह्य करण्यास विशेष कारण दिसत नाहीं. ह्यावर प्रतिप्रश्न असा उद्भवतो कीं, परीक्षितीच्या जन्मापासून नंदांच्या अभिषेकापर्यंत १०५०, १०१५, ९५०, वगैरे जीं कांहीं वर्षे गेलीं म्हणून पुराणांत सांगितलें आहे त्याचा अर्थ काय ? युरोपीयन संस्कृतज्ञांच्या पद्धतीप्रमाणें ज्या विधानाची उपपत्ति व संगति आपल्या म्हणण्याला जुळत नाहीं तें विधान बेधडक क्षेपकांत उडवून देण्याचा उपटसुंभ व्यवहार स्वीकारावयाचा कीं काय ? तर असा प्रकार नाहीं. युरोपीयनांची उपटसुंभ पद्धती न स्वीकारतां, आपल्या इकडील शोधकांचें असें म्हणणें आहे कीं, पुराणांतील वचनांचा अर्थ युरोपीयन लोक सरुद्दर्शनीं करतात तसा नाहीं. यावत्परीक्षितो जन्म

---

× ॥ श्री वामनाचा मुलगा कवि देवपाल जो सन्धिविग्रहाचा अधिकारी त्यानें आपल्या स्वामीचे अनुज्ञेनें स्पष्ट असें लिहिलें व वज्जडानें तें खोदलें. सर्वांसह तें हें शासन कल्याचे अवधिपावेतों चिरकालिक होवो ॥। इति मङ्गलम ॥ ठू ॥

इत्यादि वचनांचा अर्थ युरोपीयन लोकांस करतां आला नाहीं, अर्थात् त्यांच्या चुकीच्या विधानांनीं आपल्या मतांत फेरबदल करून घेण्याची आवश्यकता भासत नाहीं. ह्यावर कोणी प्रतिपक्ष असा करतात कीं, युरोपियन लोकांचें म्हणणें एकीकडे राहों. तुमच्यांतील च रा. त्र्यंबकराव काळे "यावत्परीक्षितो जन्म" इत्यादि वचनांचा आधार घेऊन भारतीय युद्ध इसवीसनापूर्वी १२०० वर्षांच्या सुमारास झालें म्हणून म्हणतात त्याची वाट काय ? तर ह्या प्रतिपक्षावर आमचें हें च म्हणणें आहे कीं, रा. काळ्यांना हि "यावत्परीक्षितो जन्म" इत्यादि वचनांचा अर्थ युरोपीयनांच्या इतका च कळला आहे. सबब, काळ्यांचें म्हणणें हि आम्हीं कबूल करीत नाहीं. येथें रा. काळे विचारतील कीं, "यावत्परीक्षितो जन्म" इत्यादि वचनांचा खरा अर्थ जर मला कळला नसेल, तर तो मला कळविण्याची मेहेरबानी करा. काळ्यांची ही विनंति रास्त आहे. तिचा बहुमान करणें अत्यन्त अगत्याचें आहे.

२. वायुपुराणांत खालील श्लोक आहेतः—

महादेवाभिषेकात्तु यावत्परीक्षितः ।
एकवर्षसहस्रं तु ज्ञेयं पंचाशदुत्तरं ॥ १ ॥
प्रमाणं वै तथा चोक्तं महापद्मांतरं च यत् ।
अंतरं तच्छतान्यष्टौ षट्त्रिंशच्च समाः स्मृताः ॥ २ ॥
एतत्कालान्तरं भाव्या आंध्रान्ता ये प्रकीर्तिताः ।
भविष्यज्ञै श्च संख्याताः पुराणज्ञैः श्रुतर्षिभिः ॥ ३ ॥
सप्तर्षयस्तदा प्राहुः प्रतीपे राज्ञि वै शतं ।
सप्तविंशैः शतै र्भाव्या आंध्रान्ता तदा पुनः ॥ ४ ॥
सप्तर्षयो मघायुक्ताः काले पारिक्षिते शतं ।
आंध्रान्ते सचतुर्विंशे भविष्यंति मते मम ॥ ५ ॥

मुख्य मुद्द्याचे श्लोक ते हे च. ह्यांचा अर्थ करावयाचा आहे. पैकीं, पहिला च तेवढा श्लोक आधाराला घेऊन युरोपियन लोकांनीं समाधान मानिलेलें आहे. बाकीच्या चार श्लोकांकडे त्यांनीं लक्ष सुद्धां दिलेलें नाहीं. अर्थात्, अर्धवट पुरावा जमेस धरून निर्णय करूं पहाणाऱ्या पंडितंमन्यांच्या दृप्त वाचाटतेची उपेक्षा केल्यास तें न्याय्य च होईल. तशी उपेक्षा रा. काळे यांची करतां येत नाहीं. कारण, त्यांनीं पांच हि श्लोक जमेस धरले आहेत व त्यांची संगति लावण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या तीन श्लोकांचा अर्थ काळे येणेप्रमाणें करतातः--

"(१) महादेवाच्या अभिषेकापासून परीक्षितीच्या जन्मापर्यंत १०५० वर्षें झालीं. (२) यास प्रमाण, परीक्षितीच्या अभिषेकापासून महापद्मापर्यंत ८३६ वर्षें झालीं, असें मानतात. (३) इतका च काळ महापद्मापासून आंध्रांच्या अंतापर्यंत झाला.

(४) प्रतीपाच्या वेळीं सप्तर्षि जे होते तेव्हांपासून आंध्रांच्या अंतापर्यंत २७००, व वर्षांत येतील. (५) परीक्षितीच्या काळीं सप्तर्षि मघांत होते. आंध्रांच्या अखेरीस २४ व्या नक्षत्रीं येतील."

असा एकंदर पंचविधानात्मक अर्थ काळे करतात. त्यांच्या मतें पहिल्या विधानाला प्रमाण दुसरें विधान आहे. परंतु हें मत रास्त नाहीं. अशाकरितां कीं, ह्या च अर्थांचे जे श्लोक मत्स्यपुराणांत आहेत त्यांचा मतलब काळ्यांच्या विधानाला पोषक नाहीं. मत्स्यपुराणांतील श्लोक असेः—

> महापद्माभिषेकात्तु यावज्जन्म परीक्षितः ।
> एतद्वर्षसहस्रं तु ज्ञेयं पंचाशदुत्तरं ॥
> पौलोम्न स्तु तथांध्रात्तु महापद्मांतरं पुनः ।
> अनंतरं शतान्यष्टौ षट्त्रिंशत्तु समास्तथा ॥
> तावत्कालान्तरं भाव्यं आंध्रांतादापरीक्षितः ।
> भविष्ये ते प्रसंख्याताः पुराणज्ञैः श्रुतर्षिभिः ॥
> सप्तर्षयो मघायुक्ताः काले पारीक्षिते शतं ।
> ब्राह्मणास्तु चतुर्विंशा भविष्यंति शतं समाः ॥

ह्या श्लोकांचा अर्थ असाः—महापद्माच्या अभिषेकापासून परीक्षितीच्या जन्मापर्यंत १०५० किंवा ९५० ( जसा अर्थ घ्यावा तसा ) वर्षें गेलीं. त्यानंतर लागलीच महापद्मापासून पुलोमन् आंध्र याच्यापर्यंत ८३६ वर्षें गेलीं. हे दोन काळ मिळून जेवढा काळ तेवढा परीक्षितीपासून आंध्रान्तापर्यंत गेला. आतां, ह्या मत्स्योक्तींत काळ्यांचें दुसरें विधान (परीक्षितीच्या अभिषेकापासून महापद्मापर्यंत ८३६ वर्षें झालीं) बिलकुल नाहीं. उलट वायु ज्याला महादेव म्हणतो त्याला च मत्स्य महापद्म म्हणतो. अर्थात् वायुपुराणांतलि पहिल्या तीन श्लोकांचा खरा अर्थ खालीलप्रमाणें आहेः— महादेव ऊर्फ महापद्म याच्या अभिषेकापासून परीक्षितीच्या जन्मापर्यंत १०५० किंवा ९५० वर्षें गेलीं. महापद्मापासून आंध्रान्तापर्यंत अंतर ८३६ वर्षांचें होतें. मत्स्यपुराणांतील श्लोकांचें भाषान्तर करितांना, ( आंध्रान्तापासून परीक्षितीपर्यंत आणखी तितकीं च वर्षें गेलीं ) हें वाक्य, मूळांत तसे शब्द नसतांना, काळ्यांनीं पदरचें घुसडलें आहे. काळ्यांचें हें कृत्य अशास्त्र आहे, अर्थात् अविश्वास्य आहे, व त्याच्यावर उभारलेली सर्व इमारत डळमळीत आहे. मूळांत 'आणखी' असा शब्द नाहीं. "आंध्रान्तापासून परीक्षितीपर्यंत इतकें कालान्तर समजावें " असा " तावत्कालान्तरं भाव्यं आंध्रान्तादापरीक्षितः" ह्या ओळीचा अर्थ आहे. "इतकें कालान्तर" म्हणजे ९५१ + ८३६ मिळून १७८७ इतकें अंतर. म्हणजे परीक्षितीपासून आंध्रान्तापर्यंत १७८७ वर्षें झालीं असा सरळ अर्थ निघतो. इ. स. ३०० च्या सुमारास आंध्रांचा

अंत झाला असें समजल्यास, परीक्षितीचा काल इसवीपूर्वी १४८७ येतो. तो काळ्यांना नको आहे. त्यांना इसवीपूर्वी १२६३ हा काल हवा आहे. इसवीसन २५० त आंध्रांचा अंत झाला असें समजल्यास, परीक्षितीचा काल इसवीपूर्वी १५३७ येतो. तो तर काळ्यांना मुळीं च नको. कां नको त्याचें कारण येणेप्रमाणें. परीक्षितीच्या जन्मापासून ९५१ वर्षांचा हिशेब काळ्यांनीं केला, तों ९५१ व्या वर्षाला चंद्रगुप्त मौर्यांचा काळ येऊं लागला; तेव्हां काळ्यांनीं असें ठरविलें कीं, वायुपुराणोक्त जो महादेव तो चंद्रगुप्त होय, नंद नव्हे. हा शोध केल्यावर आंध्रान्तापर्यंतच्या ८३६ वर्षांचा हिशेब पहातां काळ्यांना असें दिसून आलें कीं, चंद्रगुप्तापासून आंध्रान्तापर्यंत ८३६ वर्षें होत नाहींत, फक्त ३२५ + २५० म्हणजे ५७५ वर्षें होतात. तेव्हां काळ्यांनीं दुसरा असा शोध लाविला कीं, ८३६ हीं पुराणोक्त वर्षें शातवाहनांच्या कारकीर्दीचा व इतर आणीक कारकीर्दीचा घोटाळा करून चुकीचीं दिलीं आहेत. तात्पर्य, शोध व छाटाछाट करतां करतां काळ्यांना असें आढळून आलें कीं, वायुपुराणोक्त जीं वाक्यें आपण आधाराला घेतलीं तीं सर्व चुकीचीं आहेत. राजांचीं नांवें चुकीचीं आहेत, वर्षांची संख्या चुकीची आहे, शब्दरचना चुकीची आहे; तात्पर्य, येथून तेथून पुराणांतील वचनें कवडीमोल आहेत, असा निर्णय काळ्याच्या शोधांपासून फलित झालेला आहे. वायुपुराणोक्त वचनांचा काळे जो अर्थ करतात तसा अर्थ करूं गेल्यास असा च निर्णय प्राप्त होईल, यांत संशय नाहीं. तेव्हां, असें समजावयाचें कीं काय कीं, वायुपुराणांतील हीं वचनें निव्वळ बाष्कळ आहेत व त्यांचा विचार करणें केवळ कालहरण आहे? तर असा प्रकार नाहीं. सरळ अर्थ केला असतां उत्तम संगति लाभते. कशी लाभते तें सांगतों.

आपल्या एकोनएक सर्व ज्योतिष्यांच्या मतें शककालापूर्वी ३१७९ वर्षें कलियुगारंभ झाला. तसें च द्वापर आणि कलि यांच्या संधीस भारतीय युद्ध झालें, असें हि एकोनएक सर्व ज्योतिष्यांचें मत आहे. भारतीय युद्ध द्वापराच्या अंतीं व कलीच्या प्रारंभीं झालें, असें मत आर्यभटापासून आजपर्यंत जेवढे म्हणून पौरुष ज्योतिषी झाले तेवढ्या सर्वांचें आहे. म्हणजे शक ३९८ पासून हें मत प्रचलित आहे व तत्पूर्वी हि हें च मत प्रचलित होतें असें दिसतें. कारण, यद्यपि आर्यभट, शक ४२१ पर्यंत कलीचीं ३६०० वर्षें गेलीं आणि कल्पाचीं ६ मन्वन्तरें व २७¾ युगें गेल्यानंतर भारतीय युद्ध झालें असें मानतो, तत्रापि एका मन्वन्तरांत ७२ युगें असतात, असें तो म्हणतो. आणि या शेवटल्या विधानाकरितां, ब्रह्मगुप्त त्याला 'श्रुतिस्मृतिविरोध करणारा' म्हणून दूषण देतो. याचा अर्थ इतका च कीं, शककालापूर्वी ३१७९ वर्षें कलियुगारंभ व भारतीयसंग्राम झाला, असें मत आर्यभटापूर्वी फार प्राचीनकालापासून प्रचलित होतें. तात्पर्य, भारतीय युद्ध व पांडव शका-

पूर्वी ३१७९ वर्षे झालें, हें मत भारतवर्षांत सार्वत्रिक आहे. ह्या मताला अपवादक म्हणून वृद्धगर्गांचा वराहमिहिरोद्धृत श्लोक देत असतात; तो श्लोक असाः-

आसन्मघासु मुनयः शासति पृथ्वीं युधिष्ठिरे नृपतौ ॥
षड्द्विकपंचाद्वि ( २५२६ ) युतः शककाल स्तस्य राज्ञ श्च ॥

–बृहत्संहिता, सप्तर्षि चार.

ह्या श्लोकाचें भाषान्तर सामान्यतः असें करतातः–युधिष्ठिर म्हणजे पंडुपुत्र धर्मराजा पृथ्वीचें राज्य करीत असतां, मुनि (सप्तर्षि) मघानक्षत्रीं होत. शककालांत २५२६ मिळविले म्हणजे त्या राजाचा ( युधिष्ठिराचा ) हि ( काल येतो ). या श्लोकाच्या ह्या अर्थावरून अशी निष्पत्ति निघते कीं, शककालापूर्वीं २५२६ वर्षे म्हणजे कालियुगाचीं ६५३ वर्षे (३१७९—२५२६) गेलीं तेव्हां पांडव व भारतीय युद्ध झालें इतर सर्व ज्योतिषी भारतीय युद्ध शकापूर्वीं ३१७९ वर्षे झालें असें मानतात व गर्गवचनाप्रमाणें वराहमिहिर तें युद्ध शकापूर्वीं २५२६ वर्षे झालें असें मानतो, असें सकृद्दर्शनीं दिसतें. दोहों मतांत ६५३ वर्षांचें अंतर पडतें. अर्थात् ३१७९ हा आंकडा भारती युद्धाचा खरा मानावा कीं २५२६ हा आंकडा खरा मानावा, असा द्वैधीभाव उत्पन्न होतो. आणि या द्वैधीभावामुळें ह्या दोन्ही आंकड्यांवरचा विश्वास उडून जातो. वराहमिहीर म्हणजे कांहीं लहानसहान व्यक्ति नव्हे, बडें धेंड आहे. तो भारतीय युद्ध शकापूर्वीं २५२६ वर्षे झालें, असें ज्याअर्थीं गर्गवचन देऊन सांगतो, त्याअर्थीं शक ४२७ त भारतीय युद्धाच्या कालासंबंधानें दोन मतें होतीं 'असें सकृद्दर्शनीं म्हणावें लागतें. परंतु हें केवळ सकृद्दर्शन झालें. वराहमिहिर कलियुग शकापूर्वीं ३१७९ वें वर्षी सुरू झालें हें मानतो यांत तर बिलकुल संशय नाहीं. म्हणजे वराहमिहिराला कलियुगाचा ३१७९ हा शकपूर्वकाल इतर ज्योतिष्यांप्रमाणें च मान्य आहे. इतर ज्योतिष्यांप्रमाणें च वराहमिहिरापुढें श्रुतिस्मृतिपुराणग्रंथ होते. ह्या पुराणग्रंथांत पांडव व भारतीय युद्ध कलियुगारंभीं झालें असें स्पष्ट व एककंठरवानें सांगितलें आहे. अर्थात्, हें पुराणवचन वराहमिहिराला माहीत होतें, ह्यांत संशय नाहीं. वराहाच्या पूर्वीं नुकता च झालेला जो आर्यभट तो भारतीय युद्ध शकापूर्वीं ३१७९ वर्षे झालें असें मानतो. आणि वराहमिहिराला च तें न मानण्याला कारण काय! वस्तुतः कारण तर कांहींएक दिसत नाहीं. ह्यावर कोणी अशी क्लृप्ति काढतात कीं, वराहमिहिराच्या वेळीं व वृद्धगर्गाच्या वेळीं भारती युद्धाच्या कालासंबंधानें दोन परंपरा असाव्या किंवा असल्या पाहिजेत. परंतु गर्ग आणि वराहमिहिर ह्यांच्या पूर्वीं अशी एखादी परंपरा होती, असें म्हणण्याला गर्गवराहांखेरीज दुसऱ्या कोणाचें प्रमाण नाहीं. तेव्हां, अशी द्विविध परंपरा होती, असें निःशंक विधान करण्यास मन धजत नाहीं. तेव्हां गर्गवराहोक्त भारतीय युद्धाचा २५२६ हा शकपूर्व काल संशयित आहे असें

म्हणण्याकडे प्रवृत्ति होते. आणि ही प्रवृत्ति साधार आहे, हें हि दाखवून देतां येतें. वराहोद्धृत वृद्धगर्गाचा श्लोक जो आहे त्यांत **युधिष्ठिरे नृपतौ** ह्या पदांचा अर्थ आजपर्यंत कांहीं लोक जसा करीत आले आहेत तसा नाहीं. **युधिष्ठिरे नृपतौ** म्हणजे पंडुपुत्र धर्मराजा असा अर्थ कित्येक लोक करतात. परंतु, असा अर्थ करण्यांत ते सपशेल चुकत आहेत, असें साधार दाखवून देतां येतें. **बह्वच इञः प्राच्यभरतेषु** ( २–४–६६ ) असें पाणिनीय सूत्र आहे. ह्या सूत्रांत युधिष्ठिराच्या गोत्रापत्यास युधिष्ठिर म्हणावें, यौधिष्ठिरि म्हणूं नये, असा उपदेश केलेला आहे. युधिष्ठिराचे जे वंशज किंवा वंश्य त्यांना युधिष्ठिर म्हणत. असा पाणिनिप्रोक्त 'युधिष्ठिर' शब्दाचा अर्थ आहे. **गवियुधिभ्यां स्थिरः** ( ८–३–९५ ) या सूत्रावरून दिसतें कीं, पाणिनीला 'युधिष्ठिर' हा शब्द संज्ञार्थक म्हणून माहीत होता व **बह्वच** इत्यादि सूत्रावरून असें दिसतें कीं, भरतकुलांत कोणी युधिष्ठिर झाला हें हि पाणिनीला माहीत होतें इतकें च नव्हे, तर लौकिक गोत्र उत्पन्न करण्यासारखा कोणी युधिष्ठिर नांवाचा भरतकुलोत्पन्न प्रसिद्ध पुरुष होता, हें हि पाणिनि दर्शवितो. असो. प्रस्तुत एवढें च आहे कीं, युधिष्ठिराच्या गोत्रापत्याला कांहींएक प्रत्यय न लावतां युधिष्ठिर ह्या संज्ञेनें च ओळखीत. तात्पर्य, गर्गवराहोक्त श्लोकांत **युधिष्ठिरे नृपतौ** या पदांचा अर्थ **युधिष्ठिर राजाचा वंशज राजा, युधिष्ठिरगोत्रांतील राजा, युधिष्ठिराचा वंशज,** असा वस्तुतः आहे. ह्या पदांचा हा वास्तविक अर्थ घेतला असतां, गर्गवराहोक्त उपरिनिर्दिष्ट श्लोकाचा अर्थ येणेप्रमाणें होतोः—शककालांत २५२६ वर्षे मिळविलीं असतां, युधिष्ठिराच्या कुलांत उत्पन्न झालेल्या राजाचा काल येतो. अर्थात्, युधिष्ठिराच्या वंशांत झालेला शेवटला राजा या श्लोकांत लक्ष्य आहे. शकापूर्वी २५२६ व्या वर्षी युधिष्ठिरकुलोत्पन्न शेवटल्या राजाचें राज्य संपलें. म्हणजे ह्या वर्षी युधिष्ठिरवंश साम्राज्यापासून भ्रष्ट झाला, असा ह्या श्लोकाचा अर्थ आहे. पंडुपुत्र जो पहिला युधिष्ठिर राजा तो या श्लोकांत लक्ष्य नाहीं. ह्याचा अर्थ असा कीं, कलिकालानंतर ६५३ वर्षे युधिष्ठिरकुलोत्पन्न राजे भारतवर्षांत साम्राज्य करीत होते, व त्यापुढें दुसऱ्या कुलांत साम्राज्य गेलें. ह्या महत्त्वाच्या बाबीला अनुलक्षून हा गर्गवराहोक्त श्लोक आहे. तात्पर्य, हा गर्गवराहोक्त श्लोक इतर पौरुष किंवा पौराणिक मतांच्या विरुद्ध नसून, त्यांना अनुसंवादी आहे. त्यांत एवढी च महत्त्वाची बाब सांगितली आहे कीं, शकापूर्वी २५२६ वर्षे युधिष्ठिर राजे म्हणजे युधिष्ठिरकुलोत्पन्न राजे झाले. आजपर्यंत गर्गवराहोक्त श्लोकांतील युधिष्ठिर नृपति म्हणजे पंडुपुत्र पहिला धर्मराजा असा अर्थ करून सर्व संशोधक पराकाष्ठेच्या घुचकळ्यांत पडले. आतां तो घुचकळा राहिला नाहीं गर्गवराह श्रुतिस्मृतिपुराणज्योतिष्युक्त च गोष्ट अनुसंवादीत आहेत. एवंच, शकापूर्वी ३१७९ वे

वर्षीं भारती युद्ध व पांडव झाले, ही बाब भारतवर्षांतील गर्गवराहासुद्धां, अर्थात् राजतरंगिणीकार कल्हणासुद्धां, सर्व प्रतिष्ठित कालगणकांना बहुमान्य आहे, ह्या-विषयीं काडीचा हि संशय घेण्याला कारण नाहीं.

३ आतां पूर्वोक्त वायुमत्स्यादि पुराणांतील श्लोकांचा अर्थ, भारतीय युद्ध शका-पूर्वीं ३१७९ वे वर्षीं झालें ही श्रुतिस्मृतिपुराणोक्त गोष्ट लक्ष्यांत ठेवून, काय होतो तें पाहूं. वायु व मत्स्य ह्या दोन पुराणांतील श्लोकांत तीन बाबी सांगितल्या आहेत: (१) परीक्षिताच्या जन्मापासून महादेव ऊर्फ महापद्म ऊर्फ प्रथम नंद याच्या अभिषेकापर्यंतचा काल; (२) महापद्मापासून पौलोमा आंध्र याच्यापर्यंतचा काल; व (३) प्रतीपापासून किंवा परीक्षितापासून आंध्रान्तापर्यंतचा काल. अर्थात्, पहिल्या दोन कालांची किंवा कालान्तरांची बेरीज तिसऱ्या कालान्तराबरोबर असली पाहिजे. पहिलें परीक्षितापासून महापद्मपर्यंतचें कालान्तर, जसा अर्थ करावा किंवा पाठ घ्यावा तसें, ९५१, किंवा १०१५ किंवा १०५० किंवा १११५ वर्षांचें आहे. दुसरें कालान्तर म्हणजे महापद्मापासून आंध्रान्तापर्यंतचें कालान्तर ८३६ वर्षांचें आहे, आणि हीं दोन कालान्तरें मिळून जी बेरीज होईल ती तिसऱ्या कालान्तराबरोबर म्हणजे परीक्षितापासून आंध्रान्तापर्यंतच्या कालान्तराबरोबर असली पाहिजे. पहिलीं दोन कालान्तरें किती वर्षांचीं समजावयाचीं तें पुराणांनीं साक्षात् आंकडे देऊन च स्पष्ट सांगितलें आहे. तिसरें कालान्तर स्पष्ट आंकडे देऊन सांगितलेलें नाहीं, मोघम सप्तर्षिकालांत शतकांनीं सांगितलें आहे. कालान्तर किती शतकाचें आहे, तें श्लोकांचा सरळ व व्याकरणशुद्ध अन्वय घेऊन ठरविणें रास्त होईल. मत्स्यपुराणांतील श्लोक प्रथम घेऊं.

सप्तर्षयो मघायुक्ताः काले पारीक्षिते शतं ।
ब्राह्मणास्तु चतुर्विंशा भविष्यंति शतं समाः ॥ ४३ ॥

असा श्लोक आहे. त्याचा अन्वयः—पारीक्षिते काले शतं ब्राह्मणाः सप्तर्षयः मघायुक्ताः चतुर्विंशाः शतं समाः भविष्यंति. अर्थः—परीक्षितीच्या कालीं सप्तर्षींचें एक शतक चाललें होतें. आंध्रान्तीं सप्तर्षि मघायुक्त चोवीस शत वर्षें होतील. नुसतीं चोवीस शत वर्षें होतील असें म्हटलेलें नाहीं; मघायुक्त चोवीस शत वर्षें असें म्हटलेलें आहे. मघायुक्त चोवीस म्हणजे चौतीस. 'मघा' हा शब्द दहा या अर्थी येथें योजिलेला आहे. मघा हें दहावें नक्षत्र असल्यामुळें, दहा या अर्थी तो शब्द योजलेला आहे. वस्तु जितक्या संख्येची असेल त्या वस्तूचा वाचक शब्द तितकी संख्या दर्शविण्यास संस्कृतांत योजतात. म्हणजे या श्लोकाचा अर्थ असा होतो:—परीक्षितीपासून आंध्रान्तापर्यंत एकंदर सुमारें चौतीसशें ३४०० वर्षें गेलीं.

आतां वायुपुराणांतील वचन घेऊं.

सप्तर्षयो मघायुक्ताः काले पारीक्षिते शतं ।
आंध्रान्तो सचतुर्विंशे भविष्यंति मते मम ॥

अन्वयः—मम मतेः पारीक्षिते काले शतं; आंध्रान्ते सप्तर्षयः मघायुक्ताः सचतुर्विंशे भविष्यंति.

अर्थः––माझ्या मतें परीक्षिताच्या कालीं सप्तर्षींचे पहिलें शतक चाललें होतें; चोवीस शतकांनीं युक्त जो आंध्रान्त त्याचे ठाई दहांनीं युक्त सप्तर्षि होतील. म्हणजे चोवीस आणि दहा मिळून चौतीस शतकें परीक्षितापासून आंध्रान्तापर्यंत सप्तर्षींचीं होतील.

वायुपुराणांतील दुसरें वचन प्रतीपापासून आंध्रान्तापर्यंतच्या कालाचें आहे तें असें:—

सप्तर्षय स्तदा प्राहुः प्रतीपे राज्ञि वै शतं ।
सप्तविंशैः शतै र्भाव्या आंध्रान्ता स्ते तदा पुनः ॥

अन्वयः––प्रतीपे राज्ञि ( शासति ) सति तदा सप्तर्षयः शतं प्राहुः । तदा आंध्रान्ताः ते ( सप्तर्षयः ) पुनः सप्तविंशैः शतैः भाव्याः

अर्थः—प्रतीप राजाच्या वेळीं सप्तर्षि पहिल्या शतकांत होते असें पुराणज्ञ श्रुतर्षि लोक म्हणतात. तसेंच, आंध्राच्या अंतीं ते सप्तर्षि फिरून पुनः सत्तावीसशेनीं गणावें, म्हणजे मघांनीं ऊर्फ दहा शतकांनीं गणून पुनः म्हणजे वर, शिवाय सत्तावीस शतकांनीं आणखी गणावें; म्हणजे सदतीसशे वर्षांनीं गणावें–सांगण्याचा मुद्दा काय कीं प्रतीप राजापासून आंध्रान्तापर्यंत सदतीसशें वर्षें लोटलीं होतीं ।

असा ह्या तीन श्लोकांचा व्याकरणशुद्ध व संदर्भशुद्ध अर्थ आहे. हा अर्थ सोडून देऊन, काळ्यांनीं अगदीं विपरीत व मुळास सोडून अर्थ केलेला आहे. आंध्राच्या अंतीं २४ वें नक्षत्र असेल, असें काळे म्हणतात. ह्या तीन श्लोकांत 'नक्षत्र' हा शब्द बिलकूल नाहीं, सर्वत्र 'शत' हा शब्द आहे ( काळे, पृष्ठ १९८, दुसरा प्यारा ). तसें च 'मघा' या शब्दाचा अर्थ हि काळ्यांच्या ध्यानांत आलेला नाहीं. 'मघायुक्ताः' मघायुक्ताः अशी पुनरुक्ति ह्या पौराणिक श्लोकांत वारंवार केलेली आहे. सप्तर्षि जर मघांत सदा च आहेत, तर त्यांची तद्युक्त स्थिति वारंवार सांगण्यांत मतलब काय ? बरें, तें सापेक्षतः स्थिर नसून चल आहेत असें मानिलें, तर 'मघायुक्त' या विशेषणांत कांहीं च अर्थ रहात नाहीं. युधिष्ठिर राजाच्या कालीं म्हणजे धर्म राजाच्या कालीं सप्तर्षि मघांत होते म्हणून गर्गवराह सांगतात (लौकिक

चुकीचा अर्थ ). परीक्षिताच्या वेळीं सप्तर्षि मघांत होते म्हणून वायु व मत्स्य सांगतात. आणि प्रतीपाच्या वेळीं हि सप्तर्षि मघांत म्हणजे पहिल्या शतकांत होते असें वायु सांगतो. शेवटला युधिष्ठिरवंशांतला राजा असा अर्थ युधिष्ठिरनृपति या शब्दाचा केला, तरी सप्तर्षि पुनः मघांत आहेत च. तसें च शंकर बाळकृष्ण दीक्षित (भारतीयज्योतिषेतिहास, पृष्ठें ११८।११९) सांगतात कीं, गर्गाला सप्तर्षि मघांत दिसले म्हणून त्यानें शकारंभीं युधिष्ठिरास २५२६ वर्षें झालीं असें ठरविलें. तात्पर्य, मघायुक्ताः, आसन् मघासु, वगैरे शब्दप्रयोगांचे योग्य अर्थ पाहिले पाहिजेत, आणि नंतर पौराणिक व इतर श्लोकांचा अर्थ करावयास गेलें पाहिजे. उदाहरणार्थ, आसन मघासु इत्यादि श्लोक च घ्या. ह्या श्लोकाचा-खरा अर्थ असाः—युधिष्टिर-वंशांतील शेवटल्या राजाच्या कालीं सप्तर्षि दहाव्याशतकांत होते. दहावें शतक कोणापासून ? तर वायुपुराणोक्त प्रतीप राजापासून. युधिष्ठिरवंश कलिकाल ६५३ त संपला व धर्मराजापूर्वी प्रतीप तिसऱ्या शतकांत होता. म्हणजे ६५३+३००=९५३ शेवटला युधिष्ठिरवंशीय राजा प्रतीपापासून दहाव्या शतकांत होता, असा खरा अर्थ मला दिसतो. प्रतीप हा कोणी तरी प्रख्यात राजा आहे; नाहीं तर त्याच्यापासून आंध्रांचें अंतर सांगण्यांत वायूचा कांहींएक मतलब दिसत नाहीं. परीक्षितापासून आध्रान्ताचें अंतर वायु सांगतो तें ठीकच आहे. परीक्षित हि प्रसिद्ध होता व आंध्रान्त ही गोष्ट हि प्रसिद्ध व चित्ताकर्षक होती; असो. तेव्हां, श्लोकांचा सरळ अर्थ केला असतां निष्पत्ति येणेप्रमाणें होतेः—प्रतीपापासून आंध्रान्तापर्यंत कालान्तर ३७०० (सदतीसशें) वर्षांचें आहे व परीक्षितापासून आंध्रान्तापर्यंतचें अंतर ३४०० (चौतीस-शें) वर्षांचें आहे.

४ पुराणोक्त तिसरें कालान्तर एणेप्रमाणें ३४०० (चौतीसशें) वर्षांचें आहे. तेव्हां पुराणोक्त पहिल्या कालान्तराची व दुसऱ्या कालान्तराची बेरीज ३४०० आली पाहिजे. पैकीं दुसरें कालान्तर महापद्मापासून आंध्रान्तापर्यंतचें ८३६ वर्षांचें आहे. ३४०० त ८३६ वजा करितां बाकी २५६४ रहातात. म्हणजे परीक्षिताच्या जन्मा-पासून नंदाभिषेकापर्यंत २५६४ वर्षें सुमारें एवढ्या च करितां म्हटलें आहे कीं, पुराणांत मोघम सप्तर्षिकालशतकांनीं गणना केली आहे, नक्की वर्षें सांगितलेलीं नाहींत. आतां पुराणोक्त पहिलें कालान्तर ९५१ किंवा १०१५ किंवा १०५० किंवा १११५ वर्षांचें आहे, २५६४ वर्षांचें नाहीं. तेव्हां, हें कूट कसें उकलावयाचें ? हें तर उघड आहे कीं, एकमेकांच्या पडताळ्याकरितां तीन निरनिराळीं कालान्तरें ह्या पुराणोक्त श्लोकांत दाखल केलेलीं आहेत. ह्या तीन निरनिराळ्या कालान्तरांपैकीं तिसरें कालान्तर सप्तर्षिकालगणनेनें सांगितलें आहे; व दुसरें कालान्तर सामान्य प्रचलित ३६५ दिवसांच्या वर्षांनीं सांगितलें आहे. पहिलें कालान्तर मात्र साप्तर्षिक

हि नाहीं व सामान्यवार्षिक हि असलेलें दिसत नाहीं. तें सामान्य-वार्षिक असतें तर तें + ८३६ = ३४०० असें समीकरण सुटसुटीत बसलें असतें. परंतु, तसें तें बसत नाहीं. १०५० + ८३६ म्हणजे ३४०० वर्षें कांहीं होत नाहींत. त्या अर्थी ह्या पहिल्या कालान्तरांत कांहीं तरी गूढ आहे व हें कालान्तर दुसऱ्या दोन कालान्तरांहून निराळ्या च एखाद्या कालगणनेनें सांगितलेलें आहे, असा तर्क करावा लागतो. ही कालगणना कोणत्या स्वरूपाची असेल, तें पाहिलें पाहिजे. ३४०० त ८३६ वजा जातां २५६४ उरतात. श्लोकांत, समजा, १०१५ वर्षांचें परीक्षिताच्या जन्मापासून नंदाभिषेकापर्यंतचें कालान्तर सांगितलें आहे. तर १०१५=२५६४ ( सुमारें ) कोणत्या कालगणनेनें होतील हें शोधावयाचें आहे. श्लोकांत असें एक ज्ञापक आहे कीं, हें कालगणन पुराणज्ञ व श्रुतर्षि अशा पुरुषांच्या तोंडून ऐकिलेलें नमूद करून ठेविलें आहे. पुराणज्ञ म्हणजे पुराणेतिहासज्ञ व श्रुतर्षि म्हणजे ऋषींच्या तोंडून ज्यांनीं माहिती मिळविली ते. अशा पुरुषांनीं जें कालगणन सांगितलें तें येथें आपण नमूद करतों, म्हणून वायू सांगतो. हें ऋषींच्या कालचें जुनेंपुराणें अथवा प्राचीन कालगणन कोणतें ? वेदांग ज्योतिषकालीं एक पंचसंवत्सरात्मक कालगणन असे, त्याला युग म्हणत. त्या युगांतील प्रत्येक संवत्सराचे दिवस पांच-पंचवीस दिवसांच्या तफावतीनें बहुतेक सारखे असत. ह्या पंचसंवत्सरात्मक युगांतील संवत्सरांनीं प्रस्तुत मुद्दयांतील कालगणन केलेलें असण्याचा संभव नाहीं. कां कीं, पंचसंवत्सरात्मक युगांतील संवत्सरांनीं १०१५ संवत्सर मोजले, तत्रापि फार तर सामान्य दोनचार वर्षें कमीअधिक होतील, २५६४ सामान्य वर्षें होणार नाहींत. काळ्यांनीं चार वर्षांचें एक युग वैदिक कालीं असे व त्यांतील वर्षें ३६५$\frac{1}{4}$ दिवसांची असत, अशी एक कल्पना काढिली आहे. ही कल्पना खरी धरून चाललें, तत्रापि तिनें १०१५ वर्षांचीं २५६४ वर्षें होऊं शकत नाहींत. तेव्हां भारतयुद्धकालीं किंवा युधिष्ठिरवंशकालीं किंवा वेदकालीं दुसरें एखादें कालगणन असावें, अशी कल्पना करणें भाग पडतें. ती कल्पना आपल्या पुढें मांडण्याचें धाष्टर्य मी करीत आहें. आपल्या चिकित्सक नजरेला ती कितपत पसंत पडते, तें पहावें.

प्राचीन कालीं म्हणजे वेदकालीं ऊर्फ भारतयुद्धकालीं युगांनीं गणना करीत, हें प्रसिद्ध आहे. गर्गपराशरादि ज्योतिषी व वेदांगज्योतिषकार पंचसंवत्सरात्मक युग धरीत. कित्येक वैदिक ज्योतिषी चार संवत्सरांचें युग मानीत व इतर कित्येक वैदिक-कालीन लोक ह्याहून हि जास्त संवत्सरांचें युग मानीत असें दिसतें. ऋग्वेदांत ( १-१५८-६ )

दीर्घतमा मामतेयो जुजुर्वान् दशमे युगे

असें वाक्य आलेलें आहे. दीर्घतमा मामतेय दहाव्या युगांत म्हातारा झाला, असा ह्या वाक्याचा अर्थ आहे. ह्यावर शंकर बाळकृष्ण दीक्षित म्हणतात कीं, पांच

वर्षांचें युग घेतलें, तर ५० व्या वर्षी दीर्घतमा मामतेय म्हातारा झाला असें होईल तें तर कमीपणा दाखविणारें आहे. ऋचेचा कांहीं तरी वैशिष्ट्य ऊर्फ स्तुति दर्शविण्याचा हेतु आहे. सबब ह्या मंत्रांत युग म्हणजे १० वर्षांचें मानणें अपरिहार्य आहे ( भारतीयज्योतिषाचा इतिहास, पृष्ठ २४ ). हा अभिप्राय इ. स. १८९६ सालीं दीक्षितांनीं दिलेला आहे. १९१२ सालीं Macdonell व Keith आपल्या Vedic Index नांवाच्या सूचींत ( Vol II, P. 192 ) म्हणतातः- The expression दशमे युगे applied To दीर्घतमस्, in this passage *must* mean ' tenth decade ' of life युग म्हणजे दहा वर्षें ह्याखेरीज दुसरा अर्थ ह्या स्थलीं संभवत नाहीं व शक्य नाहीं. अर्थात् वैदिकसमाजांत एके कालीं दहा वर्षांचें युग मानीत, असें विधान करण्याला शक्तिमान् आधार आहे. पांच वर्षांचें व चार वर्षांचें व कदाचित् सहासात वर्षांचें जसें निरनिराळ्या कालीं युग मानीत त्याप्रमाणें च एके कालीं दहा वर्षांचें युग मानीत, हें निःसंशय आहे. सामान्य दहा वर्षांच्या ह्या युगाचे चार भाग करीत. पहिल्या भागाला कृत म्हणत, दुसऱ्याला त्रेता म्हणत, तिसऱ्याला द्वापर म्हणत व चौथ्याला कलि म्हणत. कलि म्हणजे आपलें सामान्य एक वर्ष; द्वापर म्हणजे दोन वर्षें, त्रेता म्हणजे तीन वर्षें, व कृत म्हणजे चार वर्षें, मिळून दहा सामान्य वर्षांचा जो कालसमूह त्याला युग म्हणत. ह्या दहा वर्षांच्या युगांत चार पोटयुगें असत. आणि त्या प्रत्येक पोटयुगाला युग किंवा वर्ष ही संज्ञा असे.

| | | |
|---|---|---|
| कृतयुग किंवा कृतवर्ष = पहिलें वर्ष | = | ४ सामान्य वर्षें |
| त्रेतायुग किंवा त्रेतावर्ष = दुसरें वर्ष | = | ३ सामान्य वर्षें |
| द्वापरयुग किंवा द्वापरवर्ष = तिसरें वर्ष | = | २ सामान्य वर्षें |
| कलियुग किंवा कलिवर्ष = चौथें वर्ष | = | १ सामान्य वर्ष |
| चतुर्युग ऊर्फ युग | = | १० सामान्य वर्षें |

ह्या एकेक सामान्य वर्षानें वाढत जाणाऱ्या वर्षांनीं कालगणना करीत. गणितश्रेढीनें वाढत जाणाऱ्या ह्या वर्षांनीं कालगणना येणेंप्रमाणें करीत. ह्या गणनेचीं चार वर्षें म्हणजे सामान्य दहा वर्षें; चाळीस वर्षें म्हणजे सामान्य शंभर वर्षें; पन्नास वर्षें म्हणजे सामान्य सवाशें वर्षें. तात्पर्य, ह्या कालगणनेचें एक वर्ष म्हणजे आपलीं सामान्य अडीच वर्षें. हीं श्रेढ वर्षें घेतलीं असतां, महाभारतांतील कांहीं वचनांचा मेळ मोठा समर्पक बसतो. अज्ञातवासासुद्धां पांडवांचा राज्यभ्रंश एकंदर तेरा वर्षांचा. तेराव्या वर्षाच्यानंतर चौदाव्या वर्षी द्वापराच्या अमदानींत भारतीय युद्ध झालें व युद्ध संपल्यावर कलिवर्ष आलें.

कलिवर्ष = धर्म राजाच्या राज्याचें पहिलें वर्ष
द्वापरान्त = युद्ध
द्वापराचें पहिलें अर्ध म्हणजे एक वर्ष = अज्ञातवास

त्रेता ३
कृत ४
कलि १ } १२ वर्षे वनवास
द्वापर २
त्रेताचीं २

त्रेतांत वनवास सुरू झाला. म्हणजे वनवासांत त्रेता, द्वापर व कलि येतात, युद्धांत द्वापर येतो व नंतर अचिरात् कलि येतो. तीर्थयात्रेंत असतां दोन स्थळीं त्रेता व द्वापरांचा संधि येतो (काळे– पृष्ठ २५९). परंतु, हा कांहीं अव्वल मुद्द्याचा प्रश्न नाहीं. भारतग्रंथांत नानाप्रकारचीं वचनें नाना काळीं लिहिलीं असण्याचा संभव आहे. तेव्हां, एखाद्‌दोन स्थळीं कोणत्या हि एखाद्या कालगणनेनें समर्पक मेळ बसला असें जरी प्रत्ययास आलें तत्रापि त्याचें मोठेंसें महत्त्व आहे, अशांतला भाग नाहीं. मुख्य मुद्दा एवढा च कीं, भारतयुद्धकालीं एक कालगणना अशी होती कीं, तिचें सरासरीच्या मानानें एक वर्ष म्हणजे आपलीं अडीच वर्षे. ह्या हिशेबानें पहातां, वायुपुराणांतील १०१५ वर्षे म्हणजे सामान्य २५३७½ वर्षे होतात. म्हणजे परीक्षिताच्या जन्मापासून नन्दाभिषेकापर्यंत २५३७½ वर्षे सुमारें गेलीं असा वायुपुराणांतील पूर्वोक्त प्रथम श्लोकाचा अर्थ होतो. हीं वर्षे निव्वळ सुमाराचीं आहेत, नक्की नव्हत. कां कीं, साप्तर्षिक ३४०० वर्षे हि सुमाराचीं च आहेत नक्की नव्हत. परीक्षितापासून आंध्रान्तापर्यंत ३३०० पासून ३४०० पर्यंत काळ गेलेला आहे. निव्वळ ३४०० हि नाहींत व निव्वळ ३३०० हि नक्की नाहींत. ह्या दोन अंतरांमध्यें कोणती तरी संख्या आहे. ती संख्या कोणती तिचा छडा पडताळ्यानें लावूं. चंद्रगुप्त मौर्य सुमारें इसवी सनापूर्वी ३२१ व्या वर्षी राज्याभिषिक्त झाला. पुराणांप्रमाणें तत्पूर्वी १०० वर्षांनीं महापद्म नंदाचा अभिषेक झाला. म्हणजे शकापूर्वी (३२१+७८+१००) ५०० व्या वर्षी नंदाभिषेक झाला. भारतीययुद्धकाळ ३१७९ तून नंदाभिषेककाळ ५०० वजा करितां २६७९ रहातात. हें अंतर सुमारानें च धरावयाचें आहे. १०१५ युगवर्षे म्हणजे २५३७½ सामान्य वर्षे होतात. तेव्हां १०५० युगवर्षे जर धरिलीं तर २६२५ सामान्य वर्षे येतील. ३१७९ तून २६२५ वर्षे वजा करतां शकपूर्व ५५४ वर्षे नंदाभिषेकाचीं येतात. हीं पूर्वोक्त ५०० च्या जवळजवळ च आहेत. तेव्हां वायुपुराणांत १०५० किंवा १०५१ हा आंकडा उक्त असावा असा अंदाज होतो. आंध्रान्तापर्यंत (परीक्षितजन्मापासून) ३४०० वर्षे धरिलीं व त्यांतून ८३६ वर्षे नंदाभिषेकापर्यंतचीं (आंध्रान्तापासून) वजा केलीं,

तर २५६४ रहातात व हीं बाकी पूर्वोक्त युगवर्षे १०१५ पासून निघालेल्या २५३७½ वर्षांच्या जवळजवळ येतात. युरोपीयन शोधाच्या साहाय्यानें पहातां परीक्षितापासून नंदाभिषेकापर्यंत २६२५ सामान्य वर्षे गेलेलीं दिसतात; व पुराणवचनाप्रमाणें पहातां २५६४ वर्षें गेलेली दिसतात. दोन्ही मेजांत सुमारें ६० वर्षांचें अंतर पडतें. परंतु, सर्व च बोलणें–युरोपीयन व पौराणिक–जेथें केवळ अंदाजाचें च आहे, तेथें इतकें, किंवा याहून हि जास्त अंतर पडल्यास आश्चर्य मानावयास नको. तात्पर्य, वायुपुराणांतील पहिल्या श्लोकांतील कालगणना दशसंवत्सरात्मक युगगणनेची आहे. परीक्षिताच्या जन्मापासून आंध्रान्तापर्यंत जें कालान्तर गेलें तें पडताळ्याकरितां तीन निरनिराळ्या कालगणनांनीं पुराणकारांनीं सांगितलेलें आहे. ( १ ) दशसंवत्सरात्मक युगगणना, ( २ ) सामान्य वर्षांची कालगणना, व ( ३ ) सासवार्षिक कालगणना. एवंच, सिद्ध काय झालें, तर पुराणांच्या व ज्योतिषांच्या सार्वत्रिक मतानें (१) कलि व भारतीय युद्ध शकापूर्वी ३१७९ वें वर्षी सुरू झालें, (२) तेथपासून ६५३ वर्षांनीं युधिष्ठिरवंश समाप्त झाला, (३) तेथून म्हणजे युद्धापासून सुमारें २६०० वर्षांनीं नंदाभिषेक झाला, (४) नंदाभिषेकापासून ८३६ वर्षांनीं आंध्रान्त झाला, व (५) युधिष्ठिरवंश समाप्तीपासून २५२६ वर्षांनीं शातवाहनशक सुरू झाला. इतक्या पांच बाबी पुराणें सांगत आहेत.

५. आतां किंचित् राजतरंगिणीकडे वळूं. तींत कल्हणानें खालील श्लोक दिले आहेतः—

> अष्टषष्ट्यधिकामब्दशतद्वाविंशतिं नृपाः ।
> अपीपलन्स्ते काश्मीरान् गोनर्दाद्याः कलौ नृपाः ॥
> प्राय स्तृतीयगोनर्दादारभ्य शरदां तदा ।
> द्वे सहस्रे गते त्रिंशदधिकं च शतत्रयं ॥

ह्या श्लोकांचा अर्थ करतांना रा. काळे २२६८ बद्दल १२६८ ज्ञानतः किंवा अज्ञानतः लिहून ( काळे–पृष्ठ २४३ ) मोठी चूक करून बसले आहेत. ह्या श्लोकांचा अर्थ असाः— काश्मीरांत गोनर्दादि राजांनीं २२६८ वर्षे राज्य केलें आणि तृतीय गोनर्दापासून शक १०७० पर्यंत २३३० वर्षे गेलीं. गर्गवराहोक्त २५२६ शकपूर्ववर्षी युधिष्ठिरवंशीय पांडव राजा असतां गोनर्दादि राजे काश्मीरांत राज्य करूं लागले. त्यांनीं २२६८ वर्षे राज्य केलें. म्हणजे शकपूर्वक ( २५२६ -- २२६८ ) २५८ वर्षांपर्यंत राज्य केलें. नंतर यवन, बाल्हीक, शक, वगैरे म्लेछांचें व इतरांचें राज्य त्या देशांत झालें. तिसऱ्या गोनर्दापासून शक १०७० पर्यंत २३३० वर्षे गेलीं.

म्हणजे तिसरा गोनर्द शकपूर्व १२६० त राज्य करता झाला. असा सरळ अर्थ या श्लोकांचा आहे.

वि. का. राजवाडे

## ९९ निंबगांव येथील श्रीखंडोबा


मौजे निंबगांव पुण्यापासून सुमारें बारा कोस असून खेडाहून तीन कोसांवर आग्नेय्यां दिशेस भीमा नदीचें कांठीं आहे. हा गांव श्रीमंत चंद्रचूडांकडे इनाम असून तेथें त्यांचा चिरेबंदी तटबंदीचा जंगी वाडा व त्यांतील काम पाहण्यालायक आहे. गांवाचे उत्तरेस सुमारें अर्ध मैलावर टेकडीवर श्रीखंडोबाचें देवालय आहे. मुख्य देवालयास लागून च शेजघर व सभामंडप असून मागें पाठभिंतीस म्हाळसाबाईचें लहान देवालय आहे. शेजघर व सभामंडप यांचें दगडी घडींव काम फार प्रेक्षणीय आहे. भोंवतालीं चिरेबंदी कोट असून पूर्वपश्चिम १९५ फूट, दक्षिणोत्तर ११८ फूट व उंची २४ फूट याप्रमाणें अनुक्रमें त्याची लांबी, रुंदी व उंची आहे. तटाचे आंतून ओवऱ्या आहेत व पूर्वदरवाजावर नगारखाना आहे. नगारखाना रोज चालू असून त्याबद्दल त्यांस बडोदे संस्थानकडून इनाम जमीन आहे. देवाकडे सुमारें पसतीस एकर जमीन इनाम चालत आहे. तटाबरोबर पूर्वदरवाजाजवळ च म्हाळसाबाईचा भाऊ हेगडे प्रधान याचें देऊळ आहे. येथें गळेकाटूचे नैवेद्य दाखवितात. कारण, असे नैवेद्य तटाचे आंतील देवालयांत होण्याची मनाई आहे. या प्रधानाचे देवळांत असलेली मूर्ति ज्यानें तट बांधला तो मेल्यावर त्याचे बायकोनें त्याची प्रतिमा बसविली अशी दंतकथा वृद्ध लोक सांगतात. महार, मांग, चांभार, वगैरे जातीचे लोक देवालयांत जात नाहींत. त्यांचेकरितां " पाउदका " ( पादुका ) बाहेर आहेत. येथून खालीं उतरण्यास पायऱ्या आहेत. परंतु त्या चालू नाहींत. कोटाचे बाहेर गुरव व भगत यांची वसति आहे. तटाबाहेर वायव्य कोंपऱ्यास जुनी विहीर आहे; परंतु ती हल्लीं उपयोगांत नाहीं. मुख्य देवालय प्रसिद्ध गंगोबा तात्या चंद्रचूड यांनीं शक १६६१ मध्यें बांधलें व भोंवतालीं फरस शक १६६२ मध्यें बांधला ( लेखांक ५, ६ व ७ ). नगारखाना, कोट वगैरे फत्तेसिंगराव गायकवाड यांनीं बांधलें ( लेखांक ८ ). दीपमाळा तीन आहेत ( भा० इ० सं० मंडळाचा अहवाल शक १८३२ पान ३८ व लेखांक १० पहा ). चौकांत चांदणी देण्याकरितां दगडी खांबाचे दोन चबुत्रे आहेत. तळघरे चार आहेत. थडगीं दोन आहेत. देवाची निस्सीम भक्त एक मुरळी होती तिचें थडगें दक्षिणेस आहे. व वायव्य

कोपऱ्यांतील बहुधा गायकवाडांपैकीं कोणाचें तरी असावें असें वाटतें (लेखांक ९). सभामंडपाचे बाहेर एक " फिरंगाण " घंटा आहे.

तीवर
आहे.
लुटी-



अशी आकृति असून 8691 (८६९१) असा इंग्रजींत आंकडा घंटेची आकृति खालीलप्रमाणें आहे. ही घंटा वसईच्या किल्ल्यांतील पैकीं असल्याचें तेथील माणसें सांगतात. याच सुमारास देवालय बांधलें असल्यामुळें कदाचित् ही घंटा " फिरंगाण " असण्याचा पुष्कळ संभव आहे.




देवाचे उत्पन्नाबद्दल गुरव व भगत यांचा तंटा पडल्यावरून देवाळयाचे मालक यशवंतराव गंगाधर ऊर्फ दादाजी गंगाधर चंद्रचूड यांनीं देवालयांतील उत्पन्नावर जप्ती केली व गुरव-भगतांकडून देवळांतील सामान आपल्या ताब्यांत घेतलें. त्या सामानाचे यादींत " ६ घंटा सहा पो एक फिरंगाण, व बाकी साध्या पांच५ येकूण " असा उल्लेख आहे; त्यावरून ही घंटा फिरंगाण असावी याबद्दल शंका उरत नाहीं. हल्लीं असलेल्या ठिकाणीं देव येण्यापूर्वीं जवळ च दावडी या गावीं अरुडमल डोंगरावर आले. तेथून धामणटेकचे टेकडीवर आले. नंतर देवालयाच्या पाठीमागच्या कडेपठारावर येऊन नंतर हल्लींच्या ठिकाणीं आले, अशी वृद्ध माणसें परंपरागत आलेली दंतकथा सांगतात. हल्लींचें देवालय बांधण्यापूर्वीं हेमाडपंती लहान देवालय असून जवळ च पडशाळा होती. सदर देवालयावर वरचेवर विजा पडतात असें दिसतें. शक १६८७ मध्यें गंगोबा तात्या चंद्रचूड यांनीं " श्रीमार्तंडाच्या देवळाचा कळस विजेनें पडिला होता तो नवा केला " (लेखांक ११). सुमारें ७०।७५ वर्षांपूर्वीं पश्चिमदरवाजावर[२० व सुमारें २५।३० वर्षांपूर्वीं देवाचे शेजमंदिरावर वीज पडली असें वृद्ध माणसें सांगतात. गेल्या सालीं पूर्वदरवाजावरील नगारखान्यावर पडली. देवळावरच विशेषें-करून वीज कां पडावी ह्याचें कारण समजत नाहीं. प्रत्येक सोमवती अमावास्येस देव भीमेवर स्नानास येतात. दसऱ्याचे दिवशीं मोठ्या समारंभानें देवाची पालखी गांवांत येऊन जाते. गायकवाडांकडून देवाप्रीत्यर्थ कांहीं नेमणुकी खर्च चालू आहे. तेथें गायकवाडांची टांकी सतत चालत असे. तिसरी दीपमाळ बांधणारा निंबगांवचा रहिवासी रा० देवबा शिंदे यास कायम टांकीबद्दल अगदीं अलीकडे सुद्धां गायकवाडांकडून वर्षासन मिळत असे. एखादा मनुष्य एकसारखा बोलूं लागला तर त्यास " तुझी गायकवाडाची टांकी पुरें कर बोवा ! " असें म्हणतात. हल्लीं ही टांकी बंद आहे. येथें माघी व चैत्री पौर्णिमांनिमित्त मोठी यात्रा भरते[३०

त्या वेळीं तीनचार महिन्यांपासून खाऊं घालून पुष्ट बनवून तयार केलेले बैल गाड्यास जुंपून गाड्यांत गच्च माणसें बसवून टेंकडीवर सडकाळ वाटेंतून एकमेकांच्या चढाओढीनें भरधांव घोड्याप्रमाणें नेतांना पाहून फार मजा वाटते. कांहीं गाड्यांवर नवसाचे बगाड व गळ असतात. पूर्वी नवस म्हणून या बगाडावरील गळ पाठीस टोंचून घेऊन तसेंच लटकत जाऊन देवाचें दर्शन घेत असत. दर्शनानंतर जेथें गळ टोंचला असेल तेथें देवाचा भंडार टाकीत असत, त्यामुळें जखम होती किंवा नव्हती असें वाटत असे. इंग्रज सरकाराचे अमलांत ही गळ टोंचून घेण्याची चाल बंद पडली. यात्रेनिमित्त सर्व प्रकारच्या मालाचीं दुकानें येतात. प्रत्येक दुकानदारापासून त्याच्या मालाबद्दल शेव सरकार (इनामदार) पाटील–कुळकर्णी, सुतार, बलुते वगैरे यांस मिळत असे ( लेखांक २ )

## लेखांबद्दल विशेष खुलासा

**लेखांक १** – यांत मौजे निंबगांव येथें श्रीखंडेराव देव मित्ती शक १३४७ मार्गशीर्ष शुद्ध पंचमी शनिवार रोजीं कशा रीतीनें प्रकट झाले याबद्दल उल्लेख आहे. कागद व लिपी शिवकालीन आहे.

**लेखांक २** – यांत गुरव व भगत यांचें भांडण होऊन देवाचें उत्पन्न विजापूरचा सरदार दिलावरखान ( शक १५०५–१५१२ ) याचे कारकीर्दीत सरकारजमा झालें. त्याचा नोकर पंताजीपंत यानें कदीमचा कर दरमाणशीं दीड रुका होता तो तीन रुके केला. पुढें दिलावरखान याची कारकीर्द सात वर्षें झाल्यानंतर हामीदखान ( शक १५१३) या सुभ्याची व्यवस्था पाहूं लागला. तेव्हां त्याचा कारकून रामाजी बल्लाळ यानें कदीमप्रो दरमाणशीं दीड रुक्याप्रमाणें कर ठरवून त्याप्रमाणें यात्रेची कमावीस केली. मूळ कागद व लिखाई शिवकालीन आहे. यांत देवास येणाऱ्या हरएक वस्तूवर कोणाचा कितपत हक्क असे व दुकानदारापासून घेतलेली शेव व रोकड यांवर दिवाण, मोकदम, कुलकर्णी, शेटे, बलुते वगैरे यांचा हक्कवाटा कसा असे हें स्पष्ट आहे.

**लेखांक ३** – धामणटेकची टेंकडी निंबगांवापासून ईशान्येस सुमारें दोन मैलांवर आहे. तेथें पादुका असून त्यावर लहान देऊळ आहे. व दीपमाळ हि आहे. खंडोबा देव पूर्वी येथें होते या समजुतीनें च गोसावीकर महारानें येथें पादुकांची स्थापना केली असावी.

**लेखांक ४**–शक १६२४ पौष शुद्ध १४ मंगळवारीं औरंगजेब बादशहाचे शिपाई यांनीं देवाचा मंडप व कळस पाडला. नंदी फोडला. देवाचा लेप फोडला. स्वयंभू लिंगास मात्र धक्का लावला नाहीं.

**लेखांक ५** – यांत देवालयाचे कामास प्रारंभ केल्याचा मुहूर्त फाल्गुन शु।। १२ शक १६६० दिला आहे.

**लेखांक ६** – शिलालेख – मुख्य देवळाचे मागें पाठभिंतीस म्हाळसाबाईचे देवालयावर दोन बाजूंस दोन श्लोक दगडावर कोरलेले आहेत. सदर शिलालेख रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं लावण्याचा प्रयत्न केला व लागलेल्या भागावरून हें देऊळ थोरले मल्हारराव गायकवाड यांनीं बांधलें असें अनुमानानें लिहिलें ( भा. इ. सं. मंडळाचा शक १८३२ चा अहवाल पृष्ठ ३८ पहा ); परंतु तें चुकीचें आहे, हें या संबंध शिलालेखावरून सहज सिद्ध होतें. माझे इतिहाससंशोधक मित्र रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन हे निंबगांवीं मजकडे आले. त्या वेळीं त्यांनीं सदर शिलालेखाचा भाग म्हाळसाबाईचे देवळाचे गर्भांत गेलेला उकरून काढून दोन तीन दिवस अत्यंत परिश्रम घेऊन सर्व लेख लावला. गंगोबा तात्या चंद्रचूड यांनीं खंडोबाचें शिखराचें देवालय शक १६६१ मध्यें बांधलें, गॅझेटीयरकार (मुंबई गॅझेटीयर व्हॉ. १८ भाग ३ पान २६२ वर) सदर देवालय गोविंदराव गायकवाड यांनीं बांधलें असें म्हणतो तें हि अर्थात् चुकीचें ठरतें.

**लेखांक ७** – देवालयाभोंवतीं फरशी करण्याचा मुहूर्त दिला आहे. तो शक १६६२ मधील आहे.

**लेखांक ८** – हें पत्र फत्तेसिंगराव गायकवाड यांनीं आपल्या मातुश्रीस पाठविलेलें आहे. यांत नगारखाना वगैरे कारखाना चालू असल्याबद्दल उल्लेख आहे. पत्रावर तारीख मित्ती वगैरे कांहीं च नाहीं. तथापि ज्या अर्थीं फत्तेसिंगराव तारीख २१ डिसेंबर सन १७८९ इ. रोजीं वारला त्या अर्थीं त्यापूर्वीचें हें पत्र होय.

**लेखांक ९** – दादाजी गंगाधर चंद्रचूड यांस त्यांच्या कारकुनानें पाठविलेल्या एका पत्रांपैकीं मजकूर घेतला आहे. गायकवाड मार्तंडापाशीं थडगें बांधतात वगैरे लिहिलें आहे. कोणाचें थडगें याबद्दल स्पष्ट उल्लेख नाहीं.

**लेखांक १०** – जायाजी पाथरवट चासकर याचें हें पत्र आहे. यानें पहिली दीपमाळ बांधली. हा उत्तम कारागीर होता.

**लेखांक ११** – श्रीमार्तंडांच्या देवळाच्या कळसावर शक १६८७ मध्यें वीज पडली म्हणून गंगोबा तात्या चंद्रचूड यांनीं नवा कळस केला. त्या कामाचा हिशेब ( अपूर्ण ) आहे.

वरील लेखांपैकीं ५, ७, ९ व ११ हे कागद श्री० चंद्रचूडांच्या दप्तरापैकीं

आहेत; व १, २, ३, ४, ८ आणि १० हे अत्यंत महत्त्वाचे कागद निंबगांव येथील कुलकर्णी रा. सावळाराम भिकाजी टल्लू यांनीं आपलीं सर्व जुनीं दप्तरें विशेष आस्थेनें दाखविलीं त्यांतून निवडलेल्या कागदांपैकीं आहेत. या त्यांच्या आस्थेबद्दल व वर दिलेली माहिती त्यांनीं परिश्रमानें मिळवून दिल्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें.

ग. ना. मुजुमदार

## श्रीमार्तंड

**लेखांक १** शके १३४७ क्रुधन नांव संवत्सरे मार्गेस्वर शुध ५ शनवार ते दिवसी मोजे मजकुरास श्रीदेव आला टिकान वरसाचे झाड त्याज खाले सील होती ते सिलेखाले श्रीदेवाची लिंगे निघाली ते दिवसी गावात कुललोकास स्वप्नें जाली की आपण त्या टिकाणास आलो आहो म्हणउनु गावातिल्या लोकानी स्वप्नें देखिली दिवस उगवोन गावांचे लोक एके टायी गोला जाले येरुणयेरास स्वप्नें सागितली मग वाजातरे लाऊन डोंगरावर वरसाच्या झाडाखाले गेले सील उचलून पाहिली तो सीलेखाले स्वयंभ लिंगे आहेती व भंडार पडिले आहे व तेथे भगताचे खोड पालोन पडिले आहे जीव नाही मग गावकरीयानी त्यास श्रीदेवाचे भंडार लाविले मग सावध जाला मग त्यास पुसिले की तू कोण कोणाचा आहेसी हे सागणे × × तो बोलिला की आपणास काही टावके नाही व सुचत नाही उत्तर नवा दहा वरसाचा होता.

**लेखांक २**

तालीक [१]

शके १३४७ क्रोध नाव सवत्छरे मार्गेस्वर शुा ५ पचमी शनवार त दिवसी खडेराऊ मौजे निंबगाऊ नागणास अला प्रगट जाला

| | |
|---|---|
| कदीम जात्रा २<br>चांपसेस्टी [२] बागरे [२] शस्टी<br>१ १ | मांही पुनेव पुसी [३]<br>भगत गुरव भाडना दिवाणात जमा जाली काजकीर्दी<br>खान दिलावरखांन याचे<br>निगेवान पंताजी<br>पत ते वख्ती जमा<br>जाली |

१ चंपाषष्टी, मार्गशीर्ष शु० ६. २ बांगर–सट, पौष शु० ६. ३ माघी पौर्णिमा.

यासि कमावीस

किा डेंबी कर व गळेकाटु व मुंढी
व सेंडी व जावळ व भीकयाळी
व कान टोचणें व नाक टोचणें
बेडी व खोडा व भुतंफरोसी
येकूण डबी. — १

यासी मान

सेटीया रुके   कुळकर्णी रुके
·।·   ·॥·
बाकी उरेल तें दिवाणचें [१०

कर दर माणसास रुके कदीम ॥ ७१॥ जे रोजी काटकर येतील ते रोजी धुळदरशण देणे कार्टकर व हुदेवाईक बिता काटकर वाजांत्री पालखीचे छडीदार भोई सिंहासनी नेजदार दुमामी रुमालदार जे दिवसी जात्रा करितील ते रोजी नवसाचे बकरे पडतील यास रुके

| रुके | मुढी |
|---|---|
| ७१॥ | १ |

काटकर व बाजे मानकरी याचे बकरे व गलेकाटू व मुढिया पाच व कर माणसे पाच पाटउन उलफ • •

ज्याजती कर काजकीर्दी दिलावरखान याचे निगेवान पंताजी पंत ते वख्ती दर माणसास रुके ७३ तीन रुके घेतला साले ७ कमावीस जाली त्यावर काजकीर्दी हमदीखान याचे कारकून रामाजी बळाल कौल देऊन कानु दर माणसास रुके ७१॥ प्रमाणे कौल दिधला तेणेप्रमाणे कमावीस जाली सेडी व जावळ भीकयाळी व कानटोचणे रुके ७१०

| दिवाण रुके | लाजिमा [२० |
|---|---|
| ७४ | ७२ मोकदम |
| | ७४ न्हावी |
| | ७६ |

१ देवापुढील उत्पन्नाची पेटी. २ हिंसा बकरी वगैरेची. ३ डोकें. ४ शेंडी= चौलकर्म. ५ जावळ. ६ पायांत लांकडी खोडा= बेडी घालून देवदर्शनास जाण्याचा नवस करतात. ७ देवास मुखवटा करून वाहणें ? मूर्ति विकून आलेला पैका. ८ जरीपटक्यानें वेष्टित अशी देवाची काठी धरणारे. ९ नेजादार= भालदार. १० चौघडेवाला. ११ इतर, किरकोळ.

प्रो:—

जमा खासा काटकर व वाजात्री व छडीदार व रुमालदार यासि दररोज धुपारतीस दर्शन देत जाणे

भोई गैल व बगाडाचे गल व बेडी व झाडा रुके ०११

भुत फरोसी भोग
रुके ०॥। ६
दिवाण रुके लाजीमा
०६ मोकदम
०॥ कुभार
॥६

दिवाण रुके लाजीमा
०४ ०२ मोकदम ०१ कुलकर्णी.
०४ सुतार
०७

[ पृष्ठ २ पोट ]

मोजे निबगाऊ
ता खेड सा जुनर
जात्रा खडेराऊ
क्रिा १ डबी भीतरील
डबी यो डबी १ यासि
लाजीमा

कानू कदीम कमावीस

नख्त उभे रासीस
पासोडी मो सेटीया रुके
कदम टके ।०
५
कुळकर्णी बलुते
टके २॥
खैराती
देव ब्राह्मण
बाकी उरे ते निमे दिवाण निमे पुजारी
लुगडी येतील
चांदिवा पडदा
मडप सगे

ऐन जिनस येईल
नारेले केले
खारीक खोबरे
उस सुपारी
पाने तूप
यासि लाजीमा नजर
लाजीमा पाहोन
देणे
मोकदम सेटीया
कुळकर्णी
बाकी उरेल ते निमे
दिवाण निमे पुजारी

---

१ दगडी चबुतऱ्यावर लाकडी खांबावर आडवा खांब असून त्यास दोन्ही बाजूंनीं दोरीस गळ लावून ठेवितात. २ गाड्यावरील गळ. ३ आंतील (देवळांतील). ४ चांदवा, चांदणी.

मुंढासा साडी चोळी
सदरहू देवास देणे
दिवाणास नाही बाकी
पाघुरणे निमे दिवान
निमे पुजारी
नवेद् अंन येईल
उभे रासीस खैराती
लाजीमा

मोकदम सेटीया
बलुते कुलकर्णी
देउनु बाकी उरेल ते निमे
दिवाण निमे देउळकरी

भांडी
एकारती पंचारती
नैवेद्याचे गाड
ताट
धुपारती उदबती
झारी वाजत्रे व
निशाण

सदरहु देवास देणे
दिवाणास नाही
या सेरीज भाडे
येईल ते निमे दि-
वाण निमे पुजारी

[ पृष्ठ २ पाठ ]

यात्रेस येईल गाये म्हेस येईल ते निमे दि-
वाण निमे पुजारी
अडवारी पुजारियाने. घेणे दिवा( णा )
स नाही
डोंगा[1] येईल तो घडसीयाने घेणे पुजा-
रियास व दिवानास नाही

कटोला[2] येईल तो वाघीयाचा पुजारियास
व दिवाणास नाही

किा १ डबी पाउदका[3]पासील
डबी येक वजा लाजीमा
सेटीया रुके ·।·
बाकी बेरीज उरेल ते
निमे दिवाण निमे
घडसी
किा १ डबी बाजार वजा लाजीमा
सेटीया रुके ·।· बाकी
उरेल ते दिवाण

---

१ टोणगा. २ कंठाळी ( घोड्याची ). ३ देवळाबाहेरील अन्य जातीकरिता असलेल्या पादुका.

कमावीश

वाणी पसारे दर दुकानास दररोज

दिवाण हकदार

हासक २ मोकदम

रुके सुपारी सुपारी

०३ ४ २ सेटीया

सुपारी

१ कुलकर्णी

तेली हासक दररोज घाणरी

दिवाण हकदार

रुके ०४ तेल ००। मोकदम

००। ००। सेटीया

०००९ कुलकर्णी

कदीम खडगी रोज दोनी

हाली रोज च्यारी

दररोज घेणे

१०] [पृष्ठ ३ पोट]

कानू कदीम कमावीस

मौजे निघगाऊ

ता। खेड सा। जुनर

जात्रा खडेराऊ

कमावीस बाजार

बकाल

कदीम खड-

णी रोज २

हाली रोज ४

२०] खादाडी

हासक हकदार

रुके सुपारी २ मोकदम

०१॥ २ २ सेटीया

१ कुलकर्णी

५

कदीम खड-

णी रोज दोनी दररोज देणे

हाली कमावीस

रोज ४

३०]चोळ सिपी दर

तेली

बुधला येईल त्यास

हासक हकदार

रुके तेल ००॥ मोकदम

।। ००॥ ००। सेटीया

००। कुलकर्णी

००१

दररोज घेणे

बागवान हासक दर

रोज रुके ४

दिवाण ०४ सेव न

नख्त सेव जर लाजमा

०३ ०१ मोकदम

कदीम रोज सेटीया

दोनी हाली कुलकर्णी

---

१ हांशील.

दुकानास दररोज
खडणी रुके ॰२
कदीम राजे हाली कमा-
२ वीस रोज
४

चौटे दर दुकानास
दररोज रुके ॰३
सराफ दररोज रुके
॰३
माले व भारा येईल
त्यास
दिवाण हकदार
रुके ४ नजर...
नख्त सेव पाहोन घेणे
॰३ ॰१ १ मोकदम
१ सेटीया
१ कुलकर्णी
उसाचा गा-
डा येईल त्यास

दिवाण हकदार
मोकदम
सेटीया
कुळकर्णी
नजर माजना पाहोन घेणें
खाटीक किर्दी करील त्यास दर रुके
॰१
बकरे उभे विकील
त्यास दर रुके ॰२
पाटी दही व दूध व तूप व भाकरी दर

रोज च्यारी
सेरणीकर
दिवाण हकदार
रुके सेरणी ॰॰। मोकदम
॰६ ॰॰। ॰॰। सेटीया
॰॰९ कुलकर्णी
॰॰॥९
कदीम रोज दोनी
हाली रोज चार
केलाचे माकणीस केले ५ व रुके
लाजीमा मोकदम व सेटीया व कुलकर्णी
नजर लाजमा पाहोन घेणें

[पृष्ठ ३ पाठ]

केलाचे पाटीस नजर माजना पाहो-
न सेव घेणे
सिद्दी पखाली यास रुके ॰१३
फुटाणकर दर दु-
कानास जोडा १
... ठाणकर दर दुकानास
दिवाण हकदार
रुके ... ॰०॥ मोकदम
॰४ ॰॰। ॰॰। सेटीया
॰॰। कुलकर्णी
॰१

१ कापड विकणारे किंवा लोहार.

५८

पाटील रुके
८१
एकदार नजर...
पाहोन घेणे मोक-
दम सेटीया कुलकर्णी
लोणीयासी गो-
णी येईल यास

| दिवाण | हकदार |
|---|---|
| रुके | नजर माज- |
| १०]।०।० | ना पाहोन |
| | घेणे मो- |
| | कदम सेटी- |
| | या कुलकर्णी |

तांबोळी हासक
दिवाण

| रुके | विडे | मोकदम |
|---|---|---|
| ८४ | २ | सेटीया |
| | | कुलकर्णी |

दुकान पाहोन घेणे

भारा पानाचा येईल त्यास

| दिवाण | | हकदार |
|---|---|---|
| रुके | पाने | मोकदम |
| ०।० | १०० | सेटिया |
| | | कुलकर्णी |
| | | भारा पाहोन |
| | | घेणे |

पेढारी दररोज रुके ८६ गाडगा रुके ८२ यो रुके ८८

कडबा दर भारियास पुला——१
गोणी गलियाची येईल त्यास——
रुके ८३ गला ८८॥० मोट गलियाची
२०] त्यास पैसमई नजर माजना दिवाण
येईल व हकदार

बुकेफरास——

| दिवाण | | हकदार |
|---|---|---|
| गोली | पुडी | मोकदम |
| १ | १ | सेटीया |
| | | कुलकर्णी |
| | | नजर माजना |
| | | पाहोन घेणे |

किंा डबी वाणी

दिवाणास दर बैलास रुके ८१ यो डबी येक पैकी वजा हकदार टके

०॥० मोकदम
०।- सेटिया
०।० कुलकर्णी
——
०१८०
बाकी उरेल ते दिवाणचे

हकदार दरबैली रुके ८१
ता
८॥ मोकदम
८।० कुलकर्णी
८। रखवालिया माहार
——
८१

३०]आस्वीने आईतवार ——

१ (१)

तीन वार देउलकरी यानी घेणे पैकी हकदार

१ मोकदम
१ सेटिया
१ कुलकर्णी

नजर लाजमा तूप व प्रसाद

जात्रेस दावणीचे बकरे पाच मारतील त्यापैकीं येक बकरा घेणे निमे दिवाण निमे देउळकरी बाकी उरेल त्याची गले काटु घेणे.

चौथावार नख्त व लुगडीं खेरीज करून येन

जिनस

| | |
|---|---|
| खारीक | खोवरे |
| केले | ऊस |
| तूप | नवेद्य आन |

जमा करून उभे रासीस देव ब्राह्मण देऊन बाकी उरेल त्यास हकदार मोकदम कुलकर्णी बलुते यांसी नजरलाजमा देऊन बाकी उरेल ते जमा जालिया [१०
सारीखे गाव लोकास नजरलाजमा पाहोन देणे

[ पृष्ठ ६ पोट ]

कानू कदीम
कमावीस

मौजे निबगाऊ
ता खेड सा। जुनर
जात्रा खडे राऊ

हमेशाई गावगणादो गारवावी मोकदम व त्या बराबरी लोक असतील ऐसे जत्रा पाहण्यास येतील त्यास कर नाहीं बाजे लोक जात्रा करावयास येतील त्यास कर व बाजे हासील घेणे मोकदम व वांगे पालणे

सीव खडे

| | |
|---|---|
| मौजे मार | रेटवडी |
| खरपुडी | दाविडी |
| कालोस | गोसासी |

यांच्या माणसास कर नाही बाजे हासील घेणे खेरीज मौजे मजकूर

| | |
|---|---|
| गलसेटी | गलेकाटु |
| जावल भी | व मुढी |
| कयाली | भुतफरोसी |
| कान टोचणे | |

जात्रेस नवसाचे बकर पडतील गेले काटु जमा मुढीया जमा होईल त्यास लाजीमा मुढीया [२०

६० मौजे मजकूर
५ का। खेड मोकदम
५ सेटीया
५ रेटवडी मोकदम
५ खरपुडी मोकदम
५ गोसासी मोकदम [३०
५ कालोस मोकदम
५ का। कडुस

१ समाईक २ वांचे (?)

नाक टोचणे

मोकद्म
५ मौजे पाबल
मोकद्म
५ काा केंदूर
मोकद्म
२ वाचे जात्रा
१ मेहतरी
या तेली
१ मेहतरी
या माली
१ मेहत्रा ता-
बोली
५ म्हागिरा
५ पुजारि या
देऊलकी

[ पृष्ठ ६ पाठ ]

सीव झडे मोकदम वागीयास नाही मौजे मनकूर लोकास कुल हासील नाही निऱ्हाले येतील ईही देऊल व दीपमाल व पडसालकेली व पेस्तर|मोडली असेल ते ही करितील सबब निऱ्हालीयाच्या तुरवमाचा आसेल त्याच्या माणसास कर नाही व बाजे हासील नाही उलफ घेणे नाहीं

बाकी उरेल ते मोकदम घेणे

**लेखांक ३***

शके १६२३ वृशानाव संवत्सरे पुस शुध १५ ते दिवसी धामणपैकीं हरनाक माहार मौजे गोसावी याणे पाउतकाची थापना केली सदरहू थानक मोजे निमगाऊ नागणा ताा खेड सु ॥ सन ११११.

**लेखांक ४***

शके १६२४ चित्रभान संवत्सरे पूस शुध १४ मंगलवार ते दिवसी अवरंगशाह

---

* हे दोन्ही लेख एकाच कागदावर लिहीलेले आहेत. शक १६२४ चे सुमारासच लिहिलेले असावेत.

पातशाह मोजे कोरेगाऊ ता पाबल येथें तलेगावाहून आला तेथून अहादी ( ? ) कनेरसरावरून आले आणि श्रीदेवाचा मंडप व पडशाल पाडिली व कलसही धोंडासा वरून पाडिला व देवाचे लेप फोडिले व बैल येक मारिला परतु स्वयंभ लिंगे वाचली आहेती त्यांस ढका लावला नाहीं थानक मोजे निमगाव नागणा† ता खेड सु ॥ सन ११९२ . १२ साबान

### लेखांक ५

श्री

॥ शके १६६० काळयुक्त नाम संवत्छरे
॥ फालगुण श्रुध द्वादसि सोमवार
॥ पुष्ये नक्षत्र त दिनि श्रीमार्तंड
॥ जीच्या सिखरास प्रारंभ सका-
॥ ळचे प्रहरिं पांचा घटीका दक्ष-
॥ णेकडील चिरा मांडला कर्त्ता
॥ राजेश्री गंगाधर येशवंत सो ( जो ? ) सि कु-
॥ ळकर्णी मोजे मजकूर शुभं भवतु ॥ १ ॥

....................

### लेखांक ६

## निंबगांव येथील खंडोबाचे देवालयावरील शिलालेख

१ उत्तर बाजू

१ श्रीगणेशायनमः ॥ सोळाशे व
२ रि येकसाष्टि वरषे सिद्धार्थि संवत्सरी ॥ शा
३ ळी वीन शकीं सुबुद्धि उपजे त्या बाजि गंगा
४ धरीं ॥ द्रव्याची ममता ति ही न धरितां अर्पूनि
५ या शीखरीं ॥ जोडूनि कर आणि शीर
६ कमळें भावार्थं या ईश्वरीं ॥ १ ॥

---

† निंबगांवाजवळ नागणा या गांवाचें लहान खेडेगांव भीमेचे कांठीं दक्षिणेस होतें; त्यावरून 'निंमगाव-नागणा' असें जोडनांव आहे. सदरहू गांव हल्लीं उध्वस्त असून पूर्वीचा अवशेष एक मारुतीचें देवालय आहे. हल्लीं दावडी गांव जवळ असल्यामुळें निंबगांव-दावडी असें म्हणतात.

२ दक्षिण बाजू

१ ॥ श्रीगणेशायनमः श्रीमार्तंड भैरवाय न
२ ॥ मः शके १६६१ सिद्धार्थिनामसंवत्सरे ॥
३ ॥ ये ...... पंत बरवे निंग्राम भीमातीरीं ॥
४ ॥ कुलकर्णी उपनाम चंद्रचुड ते ज्योतीष त्याचे घरीं ॥
५ ॥ विष्णूवर्धन गोत्र ........ र अभ्यंतरी ॥
६ ॥ तुष्टोनी मग म्हाळसा वर हि दे ...... गंगाधरीं ॥
॥ २ ॥

**लेखांक ७**

श्री

श्रीगजानन प्रसंन

फर्सास मुहुर्त

*माघ शुध्ध दशमीस गुरुवारीं अठरा १८ घटकानंतर चार घटा (= घटका) पुढें मुहूर्त

*माघ वद्य द्वितिया गुरुवारीं १७ सत्रा घटकानंतर पुढें ४ घटकापर्यंत स्वस्त्य-यनास प्रारंभ

**लेखांक ८**

श्री

गंगाभागीर्थी मातुश्री बया
वडिलाचे सेवेसी

अपत्य बालके फतेसिग याने चरनावर मस्तक टेऊन सिरसाष्टांग दंडवत विनंति विज्ञापना यैसीजे श्रीचा कारखाना चालतोये हे तो वडिलास माहीत आहे यात कुटुंबदार आसामी दोन तीन आहेत त्याजपाशी खर्च पडलाये तो मागता म्हणून यैसे परभार कळले त्यास नगारखानचे घडसी यास व पाथरट कबीलदार आसामी आहेत याजपासी मागू नये याजपासी दोन चार रुपये घेतल्यानें काही परिनाम लागनार नाही तरी एखाद्याचे सागितल्यावर मागु नये देवली गुरव भगत घडसी नगारखान्याचे व पाथरट यासी बेगार आगार दाखवितात तरी त्यास वडिलाची ताकीद आसावी की घडशास व पाथरट महिनदार यासी तडा करू आसी ताकीद आसावी कारखानदार व नगारखानेयाचे घडसी यास रोजमुरा दाहा बारा महिने मिलाला नाही तरी त्यानी खावे कोठून यास्तव यास उपद्रव वडिलाकडील न लागावा सर्व कामे होतात ही वडिलाची आहेत तेव्हे मजकडेस काये जे करणे ते वडिलास कलेल तैसे करावे बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

---

*शक १६६२

**लेखांक ९**

आस्वीन शु० १४ सन १२०३

" श्रीमार्तंडापासीं थडगे गायकवाड बांधितात त्याचें बोलणें जालें आहे आणखी येक वेल बोलणें होऊन खचीत लिहून पाठऊ "

**लेखांक १०** श्री

खडेराऊ
राजश्री रामजी सिंदे पा
टील मौजे निबगांव
गोसावी यांसी

॥छ

आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो जायाजी पाथरुट वा। मौजे चास राम राम विनंति येथील कुशेल स्वकीये कुशल लेखन करणे यानतर श्रीयाचे दीपमाल आम्ही बाधली त्यास दाहा वरसे झाली त्याचे रुपये ४५ पचेताळीस राहिले ते आम्हास तुम्ही दिल्हे नाहींत आम्ही तो काम केले ते तुम्हास विदित आहे तरी आमचे रुपये कामाचे तुम्ही ठेवावे हे गोस्ट उत्तम नाही हाली आमचे रुपये तुम्ही देणे रुपये तुम्हापासी आहेत तेवडे रुपये आमचे तुम्ही देणे याबदल गंगाजी भालेराउ पाठविले आहेत तरी आमचे कामाचे रुपये सद्रहू तुम्हापासी आहेत ते देणें मेहरबानी करून रुपये गगाजी भालेराऊ यापासी पाटवणे आम्ही चासेमधे सरकारचे कामावरी गुतलो आहो तरी रुपये देणे रुपयास तुम्ही भोटाई करून ठेवाल तरी सरकारचा वरातदार येईल मसाला घेईल आणि रुपये द्यावे लागतील यैसे पस्ट समजोन तुम्ही चासपावेतो येणे न या तरी आम्हास बोल नाहीं बहुत काय लिहिणे कृपा असो देणे हे विनंति गंगाजी भालेराऊ जबानी सांगता कळो येईल हे विनंति.

**लेखांक ११** श्री

११७५

ताळेबंद श्री मार्तंडाच्या देवळाचा कलस विजेने पडिला होता तो नवा केला सु॥ सीत सीतैन मया व अलफ सन ११७५ खर्च ———— रुा

६५॥– बदल मुशाहिरा ————

———————— रु.

६।– आबाजी

१४ पौश रोज

२९ माघ रोज

७ फालगुण रोज

५०

दरमहा रु ४ प्रो—

४ लक्षमण

११ माहे पौश

२३ माघ

३४

दरमहा रु. ४ प्रो

३।।। धोंडि

२६ माघ मास

७ फालगुण

३३

दर रु. प्रों

चिमा

१४ पौश

२९ माघ

८ फालगुण

५१

यो आदा

३ सगुणा

१५ फालगुण

२३ चैत्र

३८

यो आदा

१। मैना रोज चैत्र १५

२ जानकी

१॥ पौश

२१॥ माघ

२३

३५॥ मल्हारि गवंड

१४ पौश

३० माघ मास

१५ फालगुण

२३ चैत्र

---

८२

यो आदा दरमाहा १४ रु. भो

२। राही गंगाई

१॥ पौश

१८ माघ

६॥ फालगुण

---

२६

१॥ बिंबाजी रोजे पौश मास १३

२ यसांऊ

११ पौश

२१ माघमास

---

३२

---

६५॥-

लागवड ---------- [१०

---------- रु. [२०

१४ चुना खंडि २ गुा बेल्होजी आरगडे, दर खंडी रु. ७ माा

१ वाकु चुनियांत घालावयासी ताा बेल्होजी

१ मेहनत चुना वाहून देवलास नेला ताा बेल्होजी आरगडा.

गं. ना. मुजूमदार

## १०० शिर्के यांस सनद

इतिहास-संग्रह वर्ष ३ अंक २ पान ५८ यांत पुढील हकीकत दिली आहे. चंद्रसेन जाधव याची बाळाजी विश्वनाथ याशीं चुरस लागून बाळाजीस चंद्रसेनानें पांडवगड किल्ल्याजवळ आपले स्वारांनिशीं अडवून धरिलें. या संकटाचे प्रसंगीं पिलाजी जाधव व यमाजी धुमाळ या दोघा शिलेदारांनीं हरेस चढून बाळाजी

५९

व त्याचीं मुलेंमाणसें यांस किल्ल्याचे माचींत नेऊन सुरक्षित घातलें; व जवामर्दीची शर्थ करून त्यांस वांचविलें.

बडोद्यास १८९७ त रा. ताराजीराव जाधव यांणीं वाडीकर जाधव यांचा वृत्तान्त छापला आहे. त्यांत पृ. ५ येथें वरील इमानी शिलेदारांचे जोडींपैकीं धुमाळ यांचें नांव नाथाजीराव असें दिलें आहे.

या स्वारींत बाळाजीस म्हणजे परंपरेनें शाहूमहाराजांचे पक्षास ज्यांनीं मदत केली त्या असामींत कान्होजीराजे शिर्के होते ही माहिती नवीन च उपलब्ध होत आहे. या कान्होजींचे बापाचें नांव तानाजी असें होतें. हा कान्होजी शिरक्यांच्या कुळांतील कुटरे येथील शाखेंतला होता

१०] पुढें दिलेली अस्सल सनद मला शिरके यांच्या एका वंशजाकडून मिळाली.

श्री

वर्धिष्णुर्विक्रमै
विष्णोः सा मूर्तिरिव
वामनी शंभुसूनो
रसौ मुद्रा शिवरा
जस्य राजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३९ नंदन संवत्सरे चैत्र बहुल चतुर्थी गुरुवासरे

श्री
शिवनरपति ह
र्षनिधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

श्री आई
आदिपुरुष श्री
राजा शाहु छत्रपति
स्वामि कृपानिधि त
स्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी याणीं देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी ता। जिजापुर प्रांत राजपुरी देहे

१ मौजे साजे
१ मौजे दुरठोली
१ मौजे कुडली
१ मौजे विघाट
१ मौजे जामगाव

५

यासी आज्ञा केली ऐसी जे राजश्री कान्होजी राजे सिर्के हे पांडवगडचे स्वारीस राजश्री बाळाजी विश्वनाथ सेनाकर्ते यासमागमे युद्धप्रसंगे बहुत केला हे जाणोन कुटुंबसंरक्षणाणार्थ देहेमजकुरचा निमे आकार मोकासा मारनिल्हेकडे करार करून दिल्हे असे तरी सदरहूप्रमाणे मारनिल्हेकडे चालवीत जाणे

लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजु सुरु सुद बार

23 *rd*. October 1839

No 15.

Collector
of Thana

ठाणाचे
कलेकटर

[१०

म मो फडणीस

## १०१ काहीं शब्दांची व्युत्पत्ति

(१) अजेसेन

अजितसेन=अजियसेण=अजेसेन

(२) अट्टलचोर

हट्टचौरक=अट्टचोर=(स्वार्थक ल लागून) अट्टलचोर; हट्टचौरक म्हणजे बाजारांतला देखत चोरी करणारा.

(३) अडविणें

अंतरायनं=अँडअवणें=अडावणें=अडविणें. अडावणें असा हि उच्चार फार ऐकूं येतो. अंतरि म्हणजे मध्य येणें, प्रतिबंध करणें.

(४) अवाच्यासवा

अमात्यसमं=अवाच्चसवं=अवाच्यासवा. हें क्रियाविशेषण आहे.

स क्षुद्रः अमात्यसमं ब्रूते=तो क्षुद्र अवाच्यासवा बोलतो. अवाच्यासवा म्हणजे थोर प्रधानासारखें, आपल्या तोलाहून जास्त. स अमात्यसमं मूल्यं ब्रूते=तो अवाच्यासवा किंमत सांगतो; जशी थोर अमात्य मोठी किंमत सांगेल तशी तो सांगतो.

(५) आशर

राक्षसः कौणपः क्रव्यात्क्रव्यादोऽस्रप आशरः ॥ ६३ ॥

अमर-प्रथमकांड-स्वर्गवर्ग

ह्या श्लोकांत आशर शब्द आला आहे. आसुर्यांतील इष्टिकालेखांत असुरांच्या राजधानीला व प्रांताला Asshur आशर म्हटलेलें आहे.

(६) उचकणें, हुचकणें

उत्खननं=उचखणें=उचकणें=हुचकणें, हुचकून मारणें.

(७) उतरणें (पलीकडे जाणें)

नदीं उत्तरति=नदी उतरणें.

उतरणें (खालीं)

अवतरणं=उतरणें; जिना उतरणें=सोपानं अवतरति.

(८) उवाइला (ज्ञानेश्वर)

उपाहित (संयोजित) = उवाइअ+ल=उवाइल (ला-ली-लें).

(९) ऊर

उदर=उयर=ऊर. ऊर म्हणजे पोट. देवकीच्या उरीं कृष्ण झाला.

ऊर

उरस्=ऊर; ऊर म्हणजे छाती; ऊर च विणें.

(१०) कचरा

कच्चरं=कचरा (पु.).

(११) कट्टी

कृष्टिः=कट्टि, कट्टी हें कानडा देशांत आडनांव आहे. कृष्टि म्हणजे विद्वान् माणूस.

(१२) (नखें) करणें

अयं नापिकः नखानि करोति = हा न्हावी चांगलीं नखें करतो, म्हणजे नखें

काढतो. हा प्रकार मराठीनें संस्कृतांतून परंपरेनें घेतला आहे.

( १३ ) कुचका

कुशिकः = कुचिका, कुचगा. मुली द्वाड मुलांना कुचका वगैरे शब्द लावतात. येथें कुचका म्हणजे चक्र असा अर्थ असतो.

( १४ ) कुरकुर

कुर ( आवाज करणें ) ( पुनरुक्त ) = कुरकुर. कुर म्हणजे शोकाचा, तक्रारीचा आवाज करणें. कुर शब्दे असा पाणिनि सामान्य अर्थ देईल. परंतु, मराठी अर्थावरून दिसतें कीं, मूळ संस्कृत अर्थ शोकस्वर असा होता.

( १५ ) कुरकुरणें

कुर शब्दे. कुरकुर ( द्वित्व ) ' कुर शब्दे' असा सामान्य अर्थ धातुपाठांत दिलेला आहे. परंतु मराठींत कुरकुरणें म्हणजे तक्रारीचा किंवा नापसंतीचा शब्द काढणें असा ज्या अर्थी अर्थ प्रचलित आहे, त्या अर्थी संस्कृतांत कुर म्हणजे तक्रारीचा शब्द करणें, असा अर्थ असावा, नव्हे होता, असें म्हणावें लागतें. कुररी हा शब्द कुर या धातूपासून संस्कृतांत निघाला आहे. कुररीप्रमाणें शब्द करणें म्हणजे दुःखाचा, नापसंतीचा शब्द करणें.

( १६ ) कुरळ ( केंस )

कुरल किंवा कुरुल (Curly hair) = कुरळ ( ळा, ळी, ळें ) किंवा कुरळ ( ळा, ळी, ळें, ).

( १७ ) कुलुली ( स्त्रीभोगेच्छा )

( नपुं ) कुरीरं ( स्त्रीभोग )=कुलील =कुलुली ( स्त्री. ) संस्कृतांत कुरीरी किंवा कुररी असा शब्द असावा.

( १८ ) कुलुंगा ( कुत्रा )

कुलुंग (एक प्रकारचा हरिण)=कुलुंग ( गा, गी, गें ). कुलुंग हरणासारखें बारीक आकाराचें कुत्र.

( १९ ) कुला

कोल=कोला=कुला (अवयवविशेष).

( २० ) केरसुणी

कर्शणी=करसणी=केरसुणी. कर्शणी= वाईट चालीची स्त्री. झाडणीशीं कांहींएक संबंध नाहीं.

( २१ ) कोड

कौतुक=कोडुअ=कोड. कोड पुरविणें म्हणजे कौतुक पुरविणें. कोडकौतुक असा जोड शब्द हि आहे. फारसी व मराठी असे जोड शब्द मराठींत पुष्कळ आहेत. परंतु प्राकृत व संस्कृत असे जोड शब्द मराठींत विरळा सांपडतात. पैकीं हा एक आहे.

( २२ ) कोंडी

कुंडिका=कोंडी.

(२३) कोळी ( समुद्रतीरचा )

कूलिन्=कोळी

कोळी म्हणजे समुद्रतीरचा माणूस.

कोल या शब्दापासून निघालेला कोळ शब्द व लोक या समुद्रतीरच्या कोळ्यांहून निराळे.

(२४) खिचडी

कृशरः=किचडा=खिचडा

(स्त्री.) खिचडी

तांदूळ व डाळ यांचें अन्न म्हणजे कृशर.

(२५) खितपणें

क्षि+तप्=खितप+णें=खितपणें

क्षि ( क्षय पावणें, खंगणें ) व तप् (तापणें) या दोन संस्कृत धातूंच्या जोडापासून हा मराठी खितप धातू निघाला आहे.

(२६) खोट ( टा–टी–टें)

(कूट) कोट=खोट (टा–टी–टें).

(२७) खोडसाळ

कूटशालः=खोडसाळ.

(२८) खंगणें, खचणें

क्षंजनं=खँगणें

क्षंजनं=खँचणें

ज=ग

ज=च

( २९ ) चरक

स्रक=चरक्=चरक. स्रक ( वैदिक ) म्हणजे जाभाड तोंडांचा चरक या वाक्यखंडांत स्रक शब्दापासून निघालेला चरक शब्द येतो. वैदिक स्रकपासून संस्कृत स्रक्किणी ( द्विवचन ). स्रक्किणी म्हणजे खालच्या व वरच्या दांताच्या कवळ्या.

( ३० ) चाटणें ( स्पर्श करणें )

चंटनं=चाटणें

अत्र पूर्णिमादिने समुद्रवेला चटति ।

पंचतत्र–प्रथमतंत्र–कथा१२.

( ३१ ) चावळणें

श्वलनं=सवळणँ=चवळणँ=चावळणें,

झोंपेंत चलन करणें

स्वप्+चल्=श्वल् हा धातू झाला आहे.

( ३२ ) चिरडणें

स्निध्=चिरड+णें=चिरडणें

स्निध् ( वैदिक ) ठार मारणें.

( ३३ ) चुकणें

स्कु=चुक+णें=चुकणें

स्कु म्हणजे उडी मारणें, गति करणें. करून चुकणें म्हणजे करून पुढें जाणें, करून दुसरें कांहीं जलदीनें काम करणें.

( ३४ ) छानदार–शानदार

सान्द्रं=छानदार=छानदार, शानदार.

सांद्र म्हणजे नीट, सुंदर, दाट विणलेलें; त्यावरून नीट, सुंदर, सुरेख.

( ३५ )छांडणें

स्यन्द्=छंड=छांड+णें=छांडणें

पाणी छांडणें म्हणजे पाणी वर काढून वाहतें करणें.

( ३६ ) जमविणें

समवे=जमवि ( णें ).

( ३७ ) जमाव

समवाय=जमआय=जमाय=जमाव.

( ३८ ) जंबाड

जंबाल=जंबाड

जंबाड म्हणजे शेवाळाची जूड, चोथा.

( ३९ ) झांप

झंप ( jump ) = झांप.

( ४० ) झालँ !

जाल्म = झालँ

झालं ! येथें काय करावें ! =जाल्म ! किमत्र कार्यं !

( ४१ ) टक्कर

( स्त्री ) टक्करा ( blow on the head ) = टक्कर ( स्त्री ).

( ४२ ) टिकाउ

तितिक्षु = टिखाउ = टिकाउ

टिकाउ म्हणजे दमदार

नाम टिकाव.

( ४३ ) टुण ( कन्. )

त्वड्गु ( gallop ) = टुण

( ४४ ) टोकडा

तोक ( पोर ) = टोक, टोकडा (लघुत्व-दर्शक ); टोकडा म्हणजे पोरगा.

( ४५ ) ठेवणें

स्तेपनं = ठेवणें

स्तेप= फेंकणें

त्यानें एक ऐसा चेंडू ठेऊन दिलान् म्हणजे फेंकलान्.

( ४६ ) ठोंब्या, ठोंब

स्तुंभ = ठुंब = ठोंब, ठोंब्या

ठोंब म्हणजे बुद्धीनें थाबलेल्या, स्तब्ध, मूर्ख.

( ४७ ) तवँ

त्मन् ( वैदिक even &c. ) = तवँ

( ४८ ) तवान ( तांजा )

तवीयान् = तवान ( ना–नी–नें ).

( ४९ ) तऱ्हा

त्र्यहः = तऱ्हा

त्याची तऱ्हा झाली. म्हणजे तो तीन दिवस कंठत बसला.

( ५० ) ताण

तान ( thread ) = ताण

(५१) त्रा

कित्येक जुन्या लेखांत गुर्जरत्रा असा शब्द येतो. ह्याचा अर्थ कित्येकांनीं गुर्जर लोकांनीं जिंकलेला किंवा वसाहत केलेला प्रांत असा केला आहे. त्याला सबळ आधार ते म्हणण्यासारखा कांहीं च देत नाहींत. माझ्या मतें गुर्जरत्रा या शब्दाचा अर्थ गुर्जर लोकांतून किंवा गुर्जर लोकांत. गुर्जरत्रा हें नाम नाहीं, अव्यय आहे किंवा क्रियाविशेषण आहे. अर्थात्, गुर्जरत्रा ह्या अव्ययापासून गुजराथ, गुजरात, हें नाम निघणें अशक्य आहे. शिवाय या व्युत्पत्तीला दुसरी एक अडचण आहे. त्रा चें प्राकृत त्ता, ता होईल; त, थ, होणार नाहीं. गुर्जरत्रा-सारखा च कुरुपंचालत्रा असा वेदभाषेंत एक प्रयोग आढळतो; त्याचा अर्थ कुरू व पंचलांतून किंवा कुरू व पंचाळांत असा होतो तो च प्रकार गुर्जरत्रा या अव्ययाचा आहे.

( ५२) तिरमिर

तैमिर्य=तिरमिर (darkening

पहिला र आगंतुक

( ५३ ) तिरळ ( ळा–ळी–ळें )

टेर+ल ( स्वार्थे ) = तेरळ = तिरळ (ळा–ळी–ळें) टेर म्हणजे चकणा.

( ५४ ) तिवँधा

त्रिपंथा=तिवँधा

तीन रस्ते मिळण्याची जागा.

( ५५ ) त्रेधा

त्रेधा=त्रेधा

त्याची त्रेधा उडाली म्हणजे त्याला हें करूं कां तें करूं कां असें करूं, असें तीन प्रकार झाले.

( ५६ ) थापटणें

हस्तस्फटनं=हत्थ्यापटणँ=अत्थ्या-पटणँ=थापटणें ( अ लोप )

( ५७ ) थोपटणें

अत्यास्फोटनं=थोपटणें ( अलोप ).

( ५८ ) थोपणें

स्तुभ=थोघ=थोप+णें=थोपणें

स्तुभ थांबणें.

( ५९ ) दड्ड

हें नांव गुर्जरराजांच्या वंशावळींत शक ४०० पासून सुमारें शक ७०० पर्यंत येतें. हा शब्द प्राकृत आहे. ह्याचें मूळ संस्कृत दध्र. हा दध्र शब्द बाणान योजिला आहे:—

" मातृशयनीयतूलिकातलनिषण्णः च तनयोन्यं तनयं अभिषेकुकामस्य दध्रस्य करूषाधिपतेः अभवत् मृत्यवे । "

बाणः—हर्षचरितं—षष्ठः उच्छ्वासः

दध्र=दड्ड

दड्ड–दध्र हें व्यक्तिनाम त्या कालीं इतर वंशांत हि प्रचलित होतें, असें हर्षचरितावरून दिसतें.

( ६० ) दहा पांच वर्षें

दहा पांच वर्षें हे शब्द कालासंबंधानें योजतात. ही योजना मराठीनें संस्कृतांतून घेतली आहे व ती पंचतंत्राच्या काला इतकी जुनी आहे:—

शिथिलौ च सुबद्धौ च पततः पततो न वा ।
निरीक्षितौ मया भद्रे दश वर्षाणि पंच च ॥१४६॥

पंचतंत्र – द्वितीय तंत्र – कथा ६.

( ६१ ) धडपडणें

अधउत्पतनं = धउडपडणं = धोडपडणें = धडपडणें.

धडपडणें म्हणजे वर खालीं हालचाल करणें.

( ६२ ) धस्स

साध्वसं = धस्स ( सालोप )

माझ्या हृदयांत धस्स झालें = मे हृदि साध्वसं समभवत्.

( ६३ ) धुणावळ

धावनमूल्यं = धौणोळ = धुणोळ = धुणावळ

हा वळ प्रत्यय मूल्य या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. आवली–लि या ओळ-वाचक संस्कृत शब्दापासून हा शब्द व्युत्पादणें अनुचित होय.

जेवणावळ म्हणजे जेवणाचें मूल्य
खाणावळ म्हणजे खाण्याचें मूल्य
लिहिणावळ म्हणजे लिहिण्याचें मूल्य
घडणावळ म्हणजे घडण्याचें मूल्य
खोदणावळ म्हणजे खोदण्याचें मूल्य.

जेव्हां जेवणावळ व खाणावळ या शब्दांचा अर्थ जेवण्याच्या व खाण्याच्या पंक्ति असा असतो, तेव्हां आवलि शब्दापासून निघालेला आवळ प्रत्यय आहे, असें समजणें रास्त आहे.

( ६४ ) ( नास ) धूस

ध्वंस = धूंस = धूस

( ६५ ) धोपट

अधःपद = धोपड = धोपट

धोपट मार्ग म्हणजे पायाखालचा मार्ग

( ६६ ) धोपटणें

अधःस्फोटनं = धोफोटणं = धोपटणें

( ६७ ) धोबी

धौतिक = धोविअ = धोबीअ = धोबी

( ६८ ) निपक

निष्पकं = निपक

निपक म्हणजे फाजील पिकलेलें.

( ६९ ) निरवणें

निवर्हणं = निरवणें

( ७० ) निर्वानिरव

निर्वाहअनिर्वाह = निर्वाअअनिर्वा
= निर्वानिरव

( ७१ ) पचणें

प्रत्ययनं = पच्चअणं = पचणें
यत्प्रत्येष्यते तद्ब्रूहि=जें पचेल तें बोल.

पचेल म्हणजे प्रत्ययास येईल.

पच जिरणें या धातूहून हा पच प्रत्ययास येणें हा धातू निराळा.

( ७२ ) पटणें

प्रतिभानं = पडिहाणँ = पडणँ = पटणें

यत्ते प्रतिभाति तत्कुरुष्व = जें तुला पटेल तें कर.

( ७३ ) परटी

परिमृष्टि=परिटी=परटी ( परिटाचें कर्म )

( ७४ ) परीट

( परिमृज् ) परिमृट् = परिइट् = परीट

( ७५ ) परतणें ( अकर्मक )

प्रति + ई=परत + णें= परतणें.

परतणें म्हणजे उलट निघून जाणें.

तो परतला म्हणजे उलट फिरला.

( ७६ ) परतणें ( सकर्मक )

प्रति + आयय् = परतणें

परतणें म्हणजे उलट फिरविणें.

भाकरी परतणें, भाजी परतणें म्हणजे भाकरी किंवा भाजी तव्यावर उलट सुलट फिरविणें.

( ७७ ) परसूं

(पुं.) परिसर = परिस = परसू ( नपुं. )

मला परसा कडेस जावयाचें आहे म्हणजे घराच्या परिसरा कडे शौचार्थ जावयाचें आहे.

परसाकडे हा शब्द मराठींत एकारान्त स्त्रीलिंगी नाम आहे.

( ७८ ) पसरणें

प्रसरण = पसरणें

अंथरूण पसरणें = आस्तरणप्रसरणं

( ७९ ) पसार होणें

अपसारं भू = पसार होणें

पसार होणें म्हणजे निघून जाणें

( ८० ) पठ्ठ्या

पष्टवाह् = पठ्ठ्या = पठ्ठ्या

षष्टवाह् ( वैदिक ) म्हणजे चार वर्षांचा बैल.

पष्टवाह् म्हणजे ओझें वाहून नेण्याला किंवा नांगर ओढण्याला योग्य असा चार वर्षांचा बैल. त्यावरून कामकर्त्या तरुण माणसाला लक्षणेनें पठ्ठ्या म्हणतात.

( ८१ ) पर्या

परीवाह = परीआअ = पर्या

परीवाह म्हणजे ओहोळ किंवा वहाळ. हा शब्द रत्नागिरीच्या बाजूस आढळतो;

( ८२ ) पल्ला

पल्यः = पल्ला

पल्य a sack for corn (probably containing a certain measure, Vedic.)

पल्य हें वैदिक काळीं माप होतें व सध्यां हि महाराष्ट्रांत माप च आहे. महाराष्ट्रांतील पल्ल्यावरून वैदिक पल्ल्याचें मान कळून येण्यासारखें आहे.

( ८३ ) पाटा

पाटक=पाटा

पाटक म्हणजे वांटावयाचा दगड.

( ८४ ) पाडा

पाटक=पाडअ=पाडा

पाटक म्हणजे गांवाचा एक लहान भाग.

कोणत्या हि गांवा खालचा किंचित् दूर असलेला जो लहानगा पांच दहा घराचा समूह त्याला पाडा म्हणतात.

( ८५ ) पातळ

प्रतल=पातळ

पातळी

प्रतालिम = पातळी (superfecies )

( ८६ ) पातेली

पातिली=पातेली

हा शब्द Monier Williams देतो. परंतु प्राकृत दिसतो. Williams यानें तें नीट संस्कृत आहे किंवा नाहीं तें तपासलेलें नाहीं.

( ८७ ) पासोडी

पांसुकूल=पांसुऊड=पांसूड=पांसोडी

पांसुकूल म्हणजे चिंध्यांचा ढीग. ह्या चिंध्या एकत्र शिवून बुद्ध भिक्षु पांघरण्यास गोधडी करीत.

( ८८ ) पुरेपूर

पुरुहं+पुरु=पुरोपुर=पुरेपूर

पुरुहं व पुरु या दोनी शब्दांचा अर्थ पुष्कळ असा आहे

एकार्थक दोन शब्द जोडून अतिशय द्दाखविलेला आहे.

( ८९ ) पुळुका

पुलकः=पुळका, पुळुका

पुळका म्हणजे रोमांच अळुके-पुळुके या संयुक्त जोडे शब्दांत हा शब्द येतो.

( ९० ) पुंजा

पुंजराज=पुंजा ( एक देश )

हें विशेषनाम खानदेशांत बरेंच आढळतें.

( ९१ ) पो ( शेणाचा )

पव=पो

पव म्हणजे शेण.

( ९२ ) पंजी

पांचि=पंजी

( ९३ ) फरडा

स्पर्धः=फरडा

फरडा लेखक म्हणजे ईर्षावान् लेखक.

( ९४ ) फुट ( स्पष्टार्थक )

स्फुट=फुट

फुटकळ

स्फुटकळ=फुटकळ

( ९५ ) फुसफुसणें

पुस्फूर्जिषु=फुसफुस+णें=फुसफुसणें

फुसफुसणें म्हणजे एक प्रकारचा भयप्रद आवाज करणें.

( ९६ ) फोड ( स्त्री )

स्फुटिका=फुडिआ=फोड

( ९७ ) फोड ( पुं· )

स्फोट=फोड

( ९८ ) फंद

स्पंद ( घालमेल )=फंद

( ९९ ) बसवणें

प्रमाणें बसवणें, उदाहरणें बसवणें, ताळा बसवणें, वगैरे प्रयोगांत बसवणें हा शब्द उपवेशन या शब्दापासून निघालेला समजणें असमंजस आहे. येथें

बसवर्णे हा शब्द संस्कृत अवसेय, अवसान या शब्दापासून निघालेला स्पष्ट दिसतो.

उदाहरणानि अवसेयानि = उदाहरणें बसवावीं

प्रमाणं अवसेयं=प्रमाण बसवावें

अवसेयं=बसवावें म्हणजे जाणावें

बसवर्णे म्हणजे जाणणें असा मराठी धातू आहे.

( १०० ) बढ्ठा

अवष्टंभः = बट्टंहा = बढ्ठा

त्यानें बढ्ठा दाखविला म्हणजे अवष्टंभ ऊर्फ दर्प ऊर्फ उरमटपणा दाखविला.

( १०१ ) –बा

पाद् = पाअ = वाअ = बा

देवपादाः = देवपाआ=देववाआ =देवबा

गणपादाः = गणबा

गोविंदपादाः = गोंद्बा

हरिपादाः = हरबा

नारायणपादाः = नारबा

महादेवपादाः = म्हाद्बा

बल्लालपादाः = बाळोबा

इ. इ. इ.

( १०२ ) बात्या

वातिकः = बात्या

वातिक म्हणजे धूर्त

गीतनृत्यहसितैः उन्मत्ततां आवहंति वातिकाः ।

बाण –हर्षचरित –चतुर्थोश्वास, पृष्ठ १३८, निर्णयसागर.

बात्या, बाताड्या, बातल, हीं ह्या शब्दाचीं रूपें आहेत.

( १०३ ) बावळ ( ळा–ळी–ळें )

व्याकुल = बाउळ=बावळ (ळा–ळी–ळें)

भयव्याकुलः = भयानें बावळा

( १०४ ) बिजेसिंग

विजितसिंह = बिजेसिंग

( १०५ ) बिळगणें

विलगनं = बिळगणें

( १०६ ) बंड–बंडू

भंड = बंड, बंडू ( ममत्वदर्शक )

बंडोपंत हें नांव मराठींत सामान्य आहे.

( १०७ ) लिमये

ह्या आडनांवाचा निमये असा पाठ कोंकणांत देवाच्या गोठण्यास गोडबोले यांच्या येथें सांपडला. गोत्रांत निमिः, निमयः असें नाम आहे.

निमयः = लिमये

( १०८) लिवलिवणें

लिप् ( लिप्त = भक्षित ) = लिव

( द्विरुक्त ) लिवलिवणें

जीभ फार लिवलिवते आहे, म्हणजे फार खाण्यास इच्छिते आहे.

( १०९ ) व

उत ( आणि ) = उअ = व

ओ, व, हें अव्यय फारशींत संस्कृतसदृश प्राकृतांतून गेलेलें आहे; व मराठींत महाराष्ट्रीद्वारा उतरलेलें आहे. व हें अव्यय फारसींतून मराठींत आलें, असें म्हणण्याचें कारण नाहीं.

( ११० ) वडा

वटक = वडा ( भक्ष्यविशेष )

(१११) वरकड

प्राकृत = पराकड = वराकड वरकड

( बाण–हर्षचरित ) प्राकृतप्रमदेव प्रारोदीत्=वरकड स्त्रियांप्रमाणें फार रडली.

प्र = फार

(११२) विजेसेन

विजितसेन = विजियसेन = विज सेन, विजेसेन.

(११३) विडी

विष्टि = विड्ढि = विडी

मुसळ वगैरेंना जें लोखंडाचें वलय किंवा वळें घालतात त्याला विडी म्हणतात.

(११४) वेड ( डा–डी–डें )

वैधेय ( मूर्ख ) = वेढे अ = वेढ = ( डा–डी–डें ) वेढव्रवा असा शब्द कवितेंत येतो.

(११५) वेडें ( आसक्त )

विधेय=विडेअ=वेड ( डा–डी-डें )

भक्तजनानुरोधविधेयानि तु भवंति देवतानां मनांसि ।

बाण–हर्षचरित–चतुर्थोच्छ्वास

–पृष्ठ १२३–निर्णयसागरप्रत

देवतांचीं मनें भक्तजनांवर वेडीं होतात.

तो तिच्यावर वेडा झाला=स तद्विधेयो बभूव ।

(११६) शेळी

छेलिका=शेळी

छगली=शअळी=शेळी

छेलिका हा शेळी ह्या मराठी प्राकृत शब्दावरून बनविलेला संस्कृत शब्द आहे; मूळ शब्द छागः

(११७) शुक्, पुक्

पुक्=शुक्

पुक् जाणें असा संस्कृत धातु आहे. मांजराला शुक् किंवा पुक् म्हणून महाराष्ट्रांत हांकलतात: ज्या वेळेस संस्कृत भाषा बोलण्यांत होती म्हणजे पाणनीच्या वेळेस मांजराला जा, नीघ, असें सांगावयाचें झालें म्हणजे पुक्स्व असें रूप योजीत. त्यावरून मराठींत आज्ञार्थीचें द्वितीयेचें एकवचन पुक् असें परंपरेनें आलें आहे. ह्या मराठींत पुक् रूपावरून पाणिनीय पुक्, ष्वक्, ष्वस्क्, स्वस्क् हे धातू रोजच्या बोलण्यांतले होते, केवळ पाणिनिकल्पित नव्हते, हें उघड होतें इतकेंच नव्हे, तर सिद्ध होतें. मराठी व्युत्पत्तीवरून पाणिनीय धातुपाठावर प्रकाश हा असा पडतो.

(११८) सलग

संलग्न=संलग्ग=सलग

(११९) सरकणें

स्रेकनं=स्‍रेकणं=सरकणें

स्रेकृ गतिकर्मा

(१२०) सवरतो

स्वरयति=सवरतो

स्वर म्हणजे दोष काढणें

बोलतो सवरतो म्हणजे बोलतो आणि दोष काढतो.

(१२१) सांदणें

संदा ( संदित )=सांदणें ( ग्रंथणें )

सांधणें धातू निराळा.

वि. का. राजवाडे

समाप्त.

# सूची


**श्री**

श्रीअवधूत १३१
श्रीआत्माराम महाराज ३९
श्रीकृष्णदर्शनीवलास (गुरुदासकृत) २६
श्रीकृष्णपंचरत्न [ माधवनंदनकृत ] ३३
श्रीकृष्णलीलामृत ५०
श्रीखंडोबा ४४८
श्रीखंडोबाचे निमगांवास आगमन ४५२
श्रीखंडोबाच्या पाउतकांची स्थापना ४६०
श्रीगहिनीनाथ २४०।२४१
श्रीगैबीपीर २४०
श्रीगंडरादित्यः २२३
श्रीचिंतामणि २२९
श्रीजगद्गुरु ४३२
श्रीनागनाथ १६९
श्रीनागनाथदेव १७२।१७३।१७४
श्रीनाथ द्वादश महावाक्याविवरण [ गुरु-दासकृत ] २८
श्रीनारायणलक्ष्मीहृदय ५
श्रीनारायणेश्वर ३८२
श्रीनिरंजन २२९
श्रीबल्लाळदेव २२९
श्रीभक्तमालिका [ उद्धवचिद्घनकृत ] ३३
श्रीभक्तमालिका [ बाळकृत ] ३१
श्रीमत् भगवद्गीतेवर टीका ( मेरुकृत ) ४
श्रीमत् भगवद्गीतेवर टीका [ चिदानंदानु-कृत ] ३
श्रीमहालक्ष्मी २२५
श्रीमार्तंडाच्या देवळाचा कळस विजेनें पडिला ४६३
श्रीमारसिंहः २२३
श्रीमहालक्ष्मीदेवी १७२
श्रीमुकुंदाचा काल १५९
श्रीमंतांच्या राज्यासी व सिंद्यांच्या दौल-तीची वहिवाट करावी म्हणोन कलमे २१९
श्रीमंतांचे जुन्या वाड्यावर झेंडा लाविला ( इंग्रेजांनी ) ३९३
श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी २५३
श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी २३४
श्रीरामदासतुकारामसंवाद १६८
श्रीरामपंचरत्न ( मेरुकृत ) ३४
श्रीरामपंचरत्न [ माधवसुतकृत ] ३३
श्रीरेवणआर्य ४३४
श्रीरंगशास्त्री २९५
श्रीलक्ष्मीनृसिंहकल्पलता [ रामकृत ] ३०
श्रीवाग्भटकृतअष्टांगसंहिता २९०
श्रीवेंकटेश सहस्रनामस्तोत्र ३३
श्रीशक १०३ मधील ताम्रपटांतील मन्हाट कुळी १९३
श्रीशक १०३ मधील ताम्रपटांतील राजांचीं नातीं १९४
श्रीशक १०३ मधील ताम्रपटांतील गांवें. १९६
श्रीशक १०३ मधील मराठी ताम्रपट १९२

श्रीशकाबद्दल अनुमानें १९६
श्रीशिवरायाची शिस्त दासविणारीं पत्रें ४१
श्रीसमर्थ ३८
श्रीसमर्थावर अष्टक [ मेरुकृत ] २९
श्रीसुंदर नारायणाचें देवालय ३१६
श्रीसुंदर नारायण देव ३१८
श्रीसरस्वतीमहाल, तंजावर १
श्रीसरस्वती मंदीर २४१
श्रीसुषेणकृत आयुर्वेद महोदधि १४७
श्रीज्ञानेश्वर महाराजांचा काळ १५९
श्रीज्ञानेश्वर महाराजांचें मूळ नांव कोणतें ? १५७

अ

अकालवर्ष शुभतुंगकृष्ण ४३०
अकोलें-संमेलन २४१
अच्युताश्रमांचा वैरागर ग्रन्थ १६५
अच्युताश्रमबोधिया किंवा ब्रह्मकथा-ग्रन्थ २८
अच्युताश्रमांचा काल १६६
अजपा गायत्री ३६
अजी-अजे २८१
अट्टविरे २२५
अट्टवेर २२१
अतीत २४७
अद्वैतनिरूपण ३७
अद्वैतकाश [ मृत्युंजयकृत ] २८
अद्वैतप्रकाश [ ब्रह्माणिमंतोजीकृत ] १७
अद्वैतमकरंद १९
अद्वैतसार [ श्रीसमर्थकृत ] १८
अन्नपूर्णा स्तोत्र ३०
' अनिर्वचनीय पुस्कक '।५९
अनुभवामृत ३
अनुभवसार [ मेरुकृत ] } २७
,,[ मृत्युंजयकृत ] }
अनुभवसार [ केशीराजदास किंवा दासानुदासकृत ] २७
अनुभवामृत २२
अनंतमौनी ३८
अनंतसुत संत पुरोहित तुकदेव १६१
अन्वय व्यतिरेक २१।३९
अपरोक्षानुभूति [ वामनकृत ] ४।२०
अपरोक्षानुभूति ( अपूर्ण ) २०
अमृतानुभव [ मृत्युंजयकृत ] ३७
अनुभवसार ( मेरुकृत ) ६
अनुभवामृत ( कानडी भाषा ) ३७
अनुभवामृतांतील जास्त ओवी ९५
अनुभवामृताच्या पोथ्या ९४
अनुभवामृतांतील ओवी ९३
अनुभवामृताची टीका [वीरेश्वरकृत]५
अनंतउर्ज २१२
अनंतभट ३१८
अनंतोपाध्याय २९५
अनंदगिरीचा मठ २४७
अपत्यप्रभृतिगोत्र २७८
अप्सरस् २३५
अपरोक्षानुभूति [ वामनकृत ] ४
अफजलखान ३२१
अबदुल रसूलखान ३४७।३६५
अबाजी ४०१
अमरकोश २३५।२१८।४६८
अमानुलाखाज ३४६।३४७
अमृतरावसाहेब २१४
अमृतरावसाहेब चित्रकूटवाले ४२५
अमृतनंद ३८

आमृतराव रघुनाथ पेशवे मृत्यू पावले ३९५
अमोघवर्ष ४३२
अमोघवर्ष वनगजमल्ल ४३०
अरुडमल डोंगर ४४९
अयाचित महादेव २९५
अर्जुननीति ३७
अलका २३६।२३८
अलि इदलशा ३२०।३२३
अलि दलशा ३२३
अलि नामजाद नियामयबती ३२१
अवधूतगीता १३१
अवधूतगीता [ मेरुकृत ] ४
अवधूतगीतेवरील टीका १२८
अवरंगाबाद २४०।३४६।३८८
अवरंगशहा ४६०
अवरंगजेब पातशा दिलीहून दक्षिणेंत आले ३८०
अवरंगजेब शांत झाले ३८१
अवरंगजेब खंडोबाचे देऊळ पाडतो ४६१
अवसर ४३१।४३३।४३४
अष्टांग-संग्रह-संहिता २७४
अष्टावक्रटीका सिद्धांत चिदंबरी ३६
अष्टावक्री सूक्तटीका सिद्धांत चिदंबरी ( वैद्यनाथकृत ) २५
अष्टावक्रटीका ८
असदखान ३४७
असरीचा किल्ला २१८
अहमदनगर २४०
अहिल्याबाई होळकर ३८४
अळजपुर ६१
अज्ञानसिद्ध नागेश ३८

आ

आठवले ४२१
आगुदाना ६४
आंगारक ३०९
आंब्यांच्या संबंधीं कांहीं टांचणें १६४
आंगरे सरखेल ३५५
आंगरे यांचे महजर व इतर कागद पत्र ३४२
आंगरे ३३०।३३७
आनंदीबाई पेशवीण इच्या पुराणिकास पत्रें १९०
आत्माराम [ श्रीसमर्थकृत ] ८
आत्माराम २०
आत्मबोधावर टीका अपूर्ण [ कोणकृत न कळे ] १३
आत्मबोधावर टीका ( पूर्णानंदानुचर शिवरामकृत ) १३
आत्मबोधावर टीका [जगन्नाथकृत] १२
आत्मबोधावर टीका ९
आत्मबोध [ जगन्नाथकृत] २५
आंतरवेदी ३९०
आदित्यवर्मा ४३१।४३३
आदि ( नामदेवकृत ) ३७
आदि २४२
आदालत ३९७
आंताजी मल्हार वाकेनीस ३०९
आत्मसुख २१
आत्माराम [ श्रीसमर्थकृत ] ३
आत्मसाक्षात्कार ( मेरुकृत ) २
आत्माराम स्वामी १५०
आनघट फकीर २२८
आंध्रांचा अंत ४३८

आंध्रांत ४३७।४४१।४४२।४४३।४४५ ४४७
आंध्रदेश ६१
आनंदीबाईस देवाज्ञा झाली ३९१
आफळे २३३
आपाजीसोपुवर्सीसखपुर २६६
आप्पाजी माणकेश्वर आंचेकर ३८२
आपाजी गुळव्या २२८
आपरोक्षानुभव ३
आपदिन बाहाराने खानी व मनसुफ १७६
आनंदराव ३६२
आनंदराव ३६०
आनंदगिरीचा मठ २५४
आबासाहेब पुरंदरे ३९३
आबाजी माहादेव ३२३
आबाजी बलाल ३३८
आंबाजीपंत पुरंधरे ३८१।३८२
आंबळे ४००।४०१
आबदुल रसूलखान ३५०।३६८
आपा बळवंत ३९०
आरसेमहाल ३९६
आर्यलिपी २८७
आर्यभट ४३८।४३९
अमृतराव पेठे ३८९
आमानुलाखान ३५०।३५२
आमल्ल ४३२
अलीखान ३४६।३५०।३५२
आल्पिष्ठसाहेब विलायतेस गेले ३९६
आलपिष्टसाहेब व बापू गोखले ३९३
आलापिष्टसाहेब पुण्याहून मुंबईस गेले ३९७
आलिष्ठसाहेब ३९३।३९४।३९८
आवरंगशाहा तुळापुरास आले ३८५
आवरंगशाह पातशा ३७७।३७९।३८७ ३७७।३८१
आवरंगाबाद ३४६।३८१
आलीखान ३४७
आसू ६४
आसमानी महाल जळाला ३९२
आसन्मघासु मुनयः इत्यादि श्लोकांचे भाषांतर ४३८
आसदखान ३४६।३५०।३५१।३५२
अस्तापूर मंगळवार ३८३
आश्वीनीकुमार ३५६
आवलीकाई २२७

## इ

इजारपट्टा २५७
इतिहास संग्रह २४०।२४१।४६५
इदलशाजी पादशाहा ३२२
इदलशहा २३३
इदलशाही बुडविली ३८०
इंद्र ४३१
इन्द्रराज ४३२।४३३
इभम इदलशा ३२१।३२३
इभ्रामखान ३८६
इस्मालखादुनी ३८८
इंदूर ३८३
इंदापुर ३७६
इंगरेज २७२

## उ

उज्जनी ३८३
उडाण सिद्नाईकवाडी ३४४
उतउभाएजे १७२
उत्तर पंचविशी किंवा उत्तर पत्रिका ६
उत्तर पंचविसी ९।१०
उपदेश रत्नाकर २१

उपनिषत्तात्पर्य ९
उपनिषत्सार १७
उद्धवचिद्धन ३८
उद्धव रामजी ४०१
उद्बोधनाथ १५७
उरुस २७३
उर्वशी २३६
उषाहरण १००
उंबरज २५३

ऋ

ऋद्धपुर ६१

ए-ऐ

एकनाथ ३८
एसाजी बिन आबाजी २५८
एळापूर ६१
ऐतरेयोपनिषदांतील कथा १०९
ऐयप ४३१।४३३

अं

अंताजी रंगनाथ केळकर ३२३
अंताजी मल्हार ३१०।३११
अंताजी मल्हार वाकेनीस यांची कारकीर्द ३०६
अंतर्भाव (समर्थकृत) ३।८।२०
अंजणवेल ३२७।३२६।३२८।३३९। ३३५।३३७
अंजनवेल तालुक्याची वहिवाट ३११
आंगिरसाः व अंगारक १०३
अंगार नामजाद हवालदार ३२२
अंबेवेरिक ऊर्फ अंबेवेर २२९
अंबेवेरिक २२५
अंबेरुख २२१
अंबाजीपंत पुरंधरे ३८१
अंबाजीचे घर २७४
अंबाजीपंत लोहगांवकर २४३
अंबरखाना २३०
अंबरखाना शब्दाचा अर्थ २३१

क

कक्कुल ४३०
कचेश्वर २४६
कचेश्वरकृत आत्मचरित्र २४१
कचेश्वर व तुकाराम २५५
कचेश्वराच्या तुकारामावर आरत्या २५५
कचेश्वरानें पाडलेला पाउस २४७
कचेश्वरभट बिन सिधेश्वर भट चहें २४७।२५३
कटुचाण १७२
कडू चव्हाण ३५१
कथासारामृत (कृष्णदास पंडित-कृत) २७
कदमकडू ३४९।३५१
कनकगिरी ३७६।३७९
कनकादित्याचें देऊळ २२०
कपिलानिर्णय २८५।२८७
कबजी ३७९।३८०
कमला १६१
कमलाई १९४
कमळोजी कदम २६६
करवीरकर महाराज यांचा व परशुरामपंत भाऊचा तह २१९
कर्डे ३८७
कर्णेश्वराचे देवळांतील शिलालेख २१०
कर्नाटक २०५।३७६।३७४
करवीर २१५
कऱ्हाड २३६
करुणामृतरस (देवदासकृत) ४५
कशेळी २७४

कशेळी गांवांतील शूद्रांचीं आडनांवें २२२
कशेळीचा ताम्रपट मराठी मजकूर २२२
कशेळी ताम्रपटाचें वर्णन २२१
कशेळी येथील शक १११३ तील शिलाहारांचा ताम्रपट २२०
कलसी बंगला जळाला ३९१
कल्यारंभ व भारतीय युद्ध ४३५
कल्हण ४४१
कलि ४३८।४४५
कलियुगारंभ ४३८
कसतल्यान २७२
कसेलिग्राम २२५
कसेळी २२१
काकंभट २७६।२७७।२७८
काटे २८६
कानगो ३७५
कानपूर ४२२
कानपूरची कत्तल ४२५
कान्हापूर ३८४
कान्होजी आंगरे ३४७।३४८।३५१।३५२
कान्होजी बिन तुकोजी आंगरे ३४६।३५३
कान्होजी मोहिते ३८८
कान्होजी राजे सिर्के ४६६।४६७
काबुल ४३८
कामनाक १९७
कायाजीवाचें-लग्न, काळऐक्यतिनीशीं ऐक्य भाव [ श्रीदासानुकृत ] २०
कारंजे व शिवपादस्पर्श ११
कार्तिकस्वामीचे देवळावर वीज पडली ३९१
कार्लेकर ४२१
कालज्ञान [ अज्ञानसिद्धनागेशकृत ] १३
कालोजी नाईकवाडी ३४४
काश्मीर २३६
काशीबाई ४२१।४२४
काशीनाथ २२९
कासारदुर्ग ३१९
कासि २२८
कासिबाई २२७
कासी रंगनाथ ३२८
कालभट्ट १९७
कांकरिया ३८३
किता ( पहिला अध्याय ) ४
किन्नर २३५।२३६।२३८
किंपुरुष २३८
किंपुरुषवर्ष २३८
किलीचखान निजाम बहादुर नमुलुक ३४७
किष्किंधाकाण्ड ३९
किंजल ४३४
किर्तिराज २२३
कुकळीग्राम १७१
कुटरे ४६६
कुडेचि २१३
कुतुबशाहा मारिला ३८६
कुबेर २३६।२३८
कुन्हा १९४
कुरुल नदी २१५
कुलनाम २७८
कुसुमाबाईसाहेब ४२०।४२४।४२५
कुळकर्णी २००
कुंजपुरा घेतला ३८६

कुंडली ४६६
कुंपणी सरकार इंग्रज बहाद्दर याची द्वाही शहरांत फिरली ३९३
कुंभेरी ३९०
कुटस्थ दीप १२
कूपखननलक्षण ४२६
कृष्णदास पण्डित ३८
कृष्णभट २४३
कृष्णभट्ट व देवकी १५१।५२
कृष्णराज ४३०।४३२
कृष्णाचें गाणें ४१६
कृष्णाजी २६६।३५५।३६१
कृष्णाजी कडू ३६०
कृष्णाजी दादाजी ३०६।३०९।३१०
कृष्णाजी दादाजी ठोसर ३०६
कृष्णाजी परशराम ३२८
कृष्णाजी बिन गोदजी ३४६
कृष्णाजी भवानी मृत्यु पावले ३९२
कृष्णाजी विश्वनाथ बर्वे ३३७।३३८
कृष्णाबाई ४२१।४२४
कृष्णाप्पा मंगलमूर्ती २२९
केखंडिका २२५
केज येथील विवेकसिंधूची प्रत ११३
केशव २२९
केश गुरु निरंजन २२९
केशव नाईक थत्ते ३९१
केशवसुत २२९
केसरीनाथ १५७
केसो कृष्ण टिळक ३३८
केळूसकर ४००
कैलासपर्वत २३६
कोंकण २३६।२३९
कोटसाहेब ३९३
कोडभट २२८
कोडीत १७५
कोनकरादेव आबोसी ३४२
कोरेगांव २१४।२६६।३८५
कोल्हापूरकर व आंग्लिपष्ट ३९५
कोंडूबाई धुमाळीण मेली ४१२
कोंढणा ३८५
कोंतापुरी २२६
कंपण २२५

## ख

खडकी पेट ३७५
खडकी शब्दाची व्युत्पत्ति ६४
खरपुडी येथील श्रीरामेश्वराच्या देवालयावरील शिलालेख १६०
खरपुडी गावाची वासलात १६१
खरपुडी १६०
खाटमांडू ४२४
खान आजम आभराखान ३४३
खान आजम आमीनखान ३४३
खान आजम आलावलखान सिलेदार ३४३
खान आजम आसतखान ३४३
खान आजम आहमह्मदखान सिलेदार ३४३
खान आजम एकलासखान बिनी ३४२
खान आजम कैकखान ३४३
खान आजम जमालखान ३४३
खान आजम जाहागीरखान ३४३
खान आजम ताजखान ३४३
खान आजम दिलावरखान बिनी ३४२
खान आजम नासरखान ३४३

खान आजम दिलावरखान वजिरानी ३४२
खान आजम फरादखान ३४३
खान आजम बिजली सर्जाखान ३४३
खान आजम महमदखान ३४३
खान आजम सरकसखान ३४३
खान आजम सिताबखान ३४४
खान आजम सुज्यायेतखान ३४३
खान आजम मसुदखान ३४३
खान आजम सेदखान ३४३
खान आजम सेरखान ३४३
खान आजम सैद महमदसिलेदार ३४३
खान आजम हैब्रासखान ३४३
खेड ४४८।२४१।२४२।२४३।३४७।३५०
खुरासन खान ३२१
खुरासानखान नियाचत गैबती ३२१
खुळे २५६।२५७।२५८
खुजस्ते बुनियाद ३४५
खेचीवाडा ३९०
खेत्रैट ४३४
खेत्रैय ४३३
खेळकग्राम २४४
खोट्टिग ४३०
खोट्टिगदेव ४३२
खेड सरकार ३५०
खंडोजी ४०१
खंडोबाची यात्रा ४५२
खंडेराव रास्ते यास देवाज्ञा झाली. ३९२
खंडोजी अण्णा गिरवीकर २७०
खंडोजी कडू ३४६।३४९।३५९।३६०
३६१
खंडो कडू ३६०
खंडो बल्लाळ चिटणीस २७५
खंडोबाच्या व म्हाळसेच्या पितळेच्या मूर्तीवर असलेला श्लोक २६९
खंडोबाचें देऊळ २६५
खंडेराव दाभाडे ३०६।३०९

## ग

गजेन्द्रमोक्ष [ देवदासकृत], ३४
„ [एकनाथकृत ] ३४
[ वामनकृत ] ३६
गडे ३२७
गडे मंगळ ३८४
गणपतीचा रंगमहाल ३९६
गणपतराव जगन्नाथ उर्फ आबासाहेब राजगुरु २४७
गणेश कृष्ण कोलटकर ३३७
गणेश गोसावी ४०१
गणेशखिंड २१४
गणेशनाथ ९९
गणेश नारायेण धडकळे ३८२
गणेशपंत गोखले ३९१
गणेशपंत बेहरे ३०५।३०६।३०९
गणेशयोगी २३९
गद्याण २१०
गद्यान ६४
गर्गवराह ४४७
गलंड ७३
गवाशेठ २२८
गळटोची ४५०
गळेकाटूचे नैवेद्य ४४८
गागाभट्ट २९५
गाढवदरा २५६।२५७
गाढवे २१६
गाणपत्यांची एक यादी २२९
गायकवाडाची टाकी ४४९
गायधर्ना ४०१
गारवीर ३८६

गालेरी ३९५
गीता २४४
गीताचंद्रिका १३२
ग्रीकलोक २८०
गुप्तनाथ १५७
गुढे ३१९।३२०।४०४
गुणाकर पंडित २८६
गुर्जर २९५
गुहागर ३२६।३३४
ग्रेंग २७३
गुजराथ ६१।२३५।२३७
गुरुदास ३८
गुरुबोध (गुरुदासकृत) २
गुरुशतक [ नारोजी पंडितकृत ] ३६
गुरुशिष्यसंवाद [ वरदनागेशकृत] १६
गुर्जर २३६
गुह्यक २३५।२३६
गुह्यकेश्वर २३६
गुह्यराष्ट्र २३७
गूवल २२३
गूवलेशः २२३
गोकाक दिवाणखाना ३९६
गोडवण ३८४
गोदूबाई देशमुखीण ३९०
गोनर्द ४४७
गोपाई १९४
गोपाळराव चिटणीस २१६
गोपाळराव गोविंद ३८७
गोपाळराव २२०
गोपाळभट १७२।१७३
गोपाळराव मिरजकर ३८७
गोपीनाथ दीक्षित ओक यांचें पत्र १०२
गोपिकाबाई ४१५
गोबजी पा वाघाडीकर १७६
गोबजी १७६
गोमाजी वलद कृष्णाजी ३६०
गोमाजी कडू ३४६।३४७।३५०।३६०।
३६१।३६९।३७०
गोमाजी नाईक वाडी हवाला ३४४
गोलिवाडे १७४
गोवलकोट ३२८
गोवा २२४
गोविंद ३८
गोविंद गणेश २६६
गोविंद गोसावी ४०१
गोविंद गणेश कुळकर्णी श्रीगोंदेकर
२६७
गोविंद बल्हाळ बुधेले ३८६
गोविंदभट २२५
गोविंदराव ३६१
गोविंदराव काळे २१५
गोविंदपंत ठोसर ३०७
गोविंदराव पिंगळे २१५
गोपीनाथ दीक्षित ओक यांचे पत्रांवरून
सुचणारीं अनुमानें १०२।१०३
गोरखबोध १३
गोरा कुंभारानें केलेली परीक्षा ५१
गोविंदराव ३७०
गोविंदरावकडू ३४६।३४७।३६१
गोसांवीनंदन २२९
गोसावीसुत (वासुदेव) २२९
गोळे २२९
गोंदजी वलद नागोजी ३५०
गोंकल्ल २२३
गंगाजी मवाळ २२८
गंगाजी क्षीरसागर ३२८

गंगाजी ४०१
गंगाबाई २२८
गंगाबाई ४२०
गंगाधर बाबाजी कारकून ३१०
गंगाधर बालकृष्ण मराठे ३३८
गंगाधर यशवंत चंद्रचूड ३१६ । ३१७ ३१८ । ४४८ । ४६१ । ४६२
गंगाधर रघुनाथ हवालदार ३६५।३६६
गंगाधरराव ४२१
गंगाधर शास्त्री यास तरवारीनें मारिलें ३९२
गंधर्व २६५।२३६।३९२
गंधार २३६
गंभीरानंद १३१
ग्रंथ लेखणी ३


## घ


घाटगे २१६
घाटदरणा १९४
घासीराम कोतवाल ३९१
घृताची २३६


## च


चक्रधर ३१६
चक्रधरांची यात्रा ६५
चतुष्टयोग [ श्रीसमर्थकृत ] २२
चतुसमासी ( समर्थकृत ) ७
चतुर साबा २२९
चमत्कारांची परंपरा ९७
चऱ्होली २४५
चव्हाणकडू ३४९।३५१।३५२ । ३५६
चाकण २४२।२५३।३४५।३४४ । ३४७ ३४८।३४६ ।३४९ ।३५० । ३५१। ३५३।३५५।३५७।३६०
चाकणकिल्ला ३७६
चाकण चौऱ्याशी ३७५
चाकण परगण्यांतील गांवें २४७
चाकण परगण्यांतील देशमुख २४८
चाकण ब्रह्मे २४२
चापण साहेब ३९७।३९८
चापेखणाचा चौक ३९६
चामल किंवा अम्मल ४३१
चांडोळी ३५०
चांदोरकर २४२
चांभारगोंदे २१६
चि कोडी येथील ताम्रपट ४३०
चिकोडीच्या ताम्रपटाचें वर्णन ४३०
चिगसखान ३७५
चित्रदीप (राघवकृत) ५
चिदानंद १३०
चिदानंदानुचर ३८
चिदंबरजयंतीस्तोत्र [ वैद्यनाथकृत] ३७
चिपळूण ३२८
चिमणाजी नारायेण सचीव पंत ३८५
चिमणा वैद्य २२९
चिमणाजी बलाळ ३८३
चिमनीकाव्य ११५
चिमाजी ३६१।३९४
चिमाजी आपा ३९४
चिमाजी आप्पासाहेब कासीस निघोन गेलें. ३९५
चिमाजी कडू ३६१।३६९।३७०
चिमाजी बिन गोमाजी कडु ३४४
चिमाजी महाराजांविषयीं गीत ४१५
चिमाजी माणकर ३३७
चिमाजी वा। सुलतानजी ३६०
चिरंजीव पद [ एकनाथकृत ] ३
चिंचणेर ४६
चिंचोली २४०

चिंचोली येथील गहिनीनाथाचे देवालयावरील शिलालेख २४०
चिंतामण मिसर ४०२
चिंतामणराव माधव पेठे ३९९
चिंतामणि २२९
चिंतामणि धरणीधर २२९
चिंतो वामन देशमूख यास देवाज्ञा झाली ३९२
चंद्रचूड यांचा संग्रह २८६
चंद्रराट् २२३
चंद्रसेन जाधव ४६५
चंद्रगुप्त मौर्य ४४६
चंद्रादित्य २२३
चंदीचंदावर २३३।३७६
चंदीचंदावराहून देसीं स्वराज्यास(राजाराममहाराज) आले ३८०
चिंतो विठल ३८९
चिंतो विश्वनाथ ३११।३१२
चुडा १५३
चोंभाकवीचें नांव १०१
चौधरी ७२
चंगीरखान ३२१
चंडीपति २८०
चंद्रगुप्त ४३८
चंद्रचूड ४४८

### छ

छद्दुमैश्रेष्ठी ४३४
छत्रपती राजे (राजा शिवाजी) म्हणून सिंहासना रुढ केले ३७९
छयापी कागद सुरू झाले ३९६

### ज

जगत्तुंग ४३०।४३२
जगन्नाथः ३८।२९५
जगन्नाथ रामचंद्र २१८
जतपाल राठोड १९४
जतिग २२२।२२३
जनकोजी सिंदे ३८६।३९६
जनार्दन नारायण देशपांडे ३३८
जनार्दनराम ३०७
जबतखान ३९०
जयगड ३२६।३२७।३२९
जयराम ३८
जयाद्रिमाहात्म्य २७१
जयनगरे ३९०
जयेनगरवाले ३९०
ज्यार्ज जिंबर्न साहेब २५९
ज्योतिपंत महाभागवताचें उपनांव, ४६
" गोत्र ४६
ज्योतिपंताच्या पोथीचें वर्णन ४७
ज्योतिपंताचा काल निर्णय ५०
ज्योतिपंताचा पूर्वज ४६
ज्योतिपंताचा बाप ४६
ज्योतिपंताचा संकल्प ४७
ज्योतिपंताची आई ४९
ज्योतिपंताची आख्यायिका ४७
ज्योतिपंताची आराधना ४७
ज्योतिपंताची गुरुपरंपरा ४८
ज्योतिपंताची नोकरी ४७
ज्योतिपंताची वंशावळ ४८
ज्योतिपंताचें अक्षर ४७
ज्योतिपंताचें गायत्री पुरश्चरण ४७
ज्योतिपंताचें चरित्र [ सखारामकृत ] ४९
ज्योतिपंतानें दिलेलें भागवत ४७

ज्योतिर्वंतानें देह ठेविला ४८
जाकमाद् ३२२
जाखोजी नाईकवाडी ३४४
जाचकाचे वंशज २६५
जाट भरतपुरास गेला ३८६
जाधवराव ३२३।३८१
जानोजी ३५५।३६१
जानोजी नाईकवाडी ३४४
जानोजी भोसले ३८७।३८८।३८९
जानोजी सेपले ३५७
जामखेड २४०
जामगांव २१६।४६६
जावजी पाा वाघाडीकर १७६
जिजाऊ २२७।२२८।३७६।३७७।३७९
जिजापूर ४६६
जिवाजी गणेश खासगीवाले ३८५
जिंती ३८९
जिकर कवसदर पसानराय सांके करा-
सिया १७५
जीमूतवाहन २२२।२३६।४३२
जीर्णपुर २४३
जीवन्मुक्त ३८
जुन्नर ३५७।३४४।३४५।३४७।३७६
३५०।२४३।२४२
जुनाट पुरुष [ श्रीसमर्थकृत ] ८।२०
जेजूरीचे पेशवे २७१
जेजूरी येथील शिलालेख २६५
जेनी २२८
जैतपाळ १९३
जैथासगराव ३६१
जयसिंगराव कडू ३६१
जंगबहादूर ४२३।४२५
जंजिऱ्याचा शिद्दी २७५
जंजिऱ्याचा हजरतखान २७४
जंबुद्वीप २३८

ट

टिपु ठार पडिला ३९२
टिपु बहादर ३९०।३९२
टिपूवर स्वारी ३९०
टोपकर २७२
टोपणसिद्धनिरुपण [ श्रीसमर्थकृत ] ८

ठ

ठाडा ४२३

ड

डांग ४२३
डोमग्राम १५२
डोंबेतीर्थ १५४

ढ

ढुंढिराज महाराज २२९

त

तत्वपट [ मेरुकृत ] १९
तत्वविवेक १२
तलियान २७३
तळेगांव ३०६
तळेगांव ढमढेरे येथील श्रीसंभूनाथचावा
१७८
तसर ३२९
तात्या टोपे ४२१।४२४
तात्यां टोप्यांचा अंत ४२२
तानाजी ४६६
तांबे ४२१।४२५
तायाजी ३४६।३५५।३६१
तायाजी बिन संडोजी ३४६
तायाजी कडू ३६०
तारक ब्रह्म ६।१७
तारकबोध [ गुरुदासकृत ] ६

ताराऊ ३८१।३८४।३८७
ताराबाई ३७८
ताल ३८३
तिमनायक २१२
तिसरा गोनर्द ४४८
तीर्थावळी [बहुधा विष्णुदासनामाकृत] ३०
तीर्थावली २४२
तुकदेवाची कुलपरंपरा १६२
तुकदेव व शंकराचार्य १६२
तुकयाकुमर नारायणबुवा ४०१
तुकाराम २२८।४०१
,, तुकारामांचें प्रयाण ९८
साधकबाधकप्रमाणें ९८
तुकारामाचें हस्ताक्षर ४०१
तुकारामानें मारिलेला स्वदस्तुरचा शेरा ४०१
तुकाराम बोआ देहूकर ४००
तुकारामाचें आडनांव ४००
तुकारामाचानिर्याण शक २२७
तुकाराम समकालीन व्यक्ती २२७
तुकारामाचे सदेहप्रयाण २५५
तुकारामाच्या देहयष्टीचें वर्णन २५५
तुकोबाचीं पदें २४४
तुकोबाच्या वह्या २४५
तुकोजी होळकर २६७।२७१।३९०
तुलसाजी कडू ३५९
तुलाजी आंगरे सरखेल ३३०
तुरंगवदन २३८
तुषार २३७।२३९
तुळजापूर ३८९
तुळापुर ३७७
तैळप ४३२
तैलप चालुक्य ४३०
त्र्यंबकराव आबा ३९५
त्रिंबक किल्ला घेतला ३८६
त्रिंबकपंत उद्गर ३३८
त्रिंबक कृष्ण बर्वे ३३७
त्रिंबक कृष्ण ३४१
त्रिंबकजी डेंगला यास साष्टीस कैदेंत ठेविलें ३९२
त्रिंबकजी डेंगळा इंग्रजांनी कैद करून नेला ३९४
त्रिंबक विश्वनाथ ३१०
त्रिंबक चौंडे ३४
त्रिंमळळ ३८
त्र्यंबकपंत आकोलकर २६७
त्रिंबकराव मामा पेठे ३८७।३८९।३९०
त्रिंबकगांव सांवदेव २६८
त्रेता ४४५

## थ

थापेथली ४२४
थाळनेर १७५

## द

दणदणे चितळे ४२०
दत्ताजी ठाकूर बिन आमाजी ठाकूर ३५३
दमाजी गायकवाड ३५६।३८५
दमाजी थोरात ३८२
दमाजी येसाजी ३८८
दत्तात्रय ३८
दवाजी चवधरी २७०
दशमदरणा १९४
दशसंवत्सरात्मक युगगणना ४४७
दशावतार श्लोक ३६
दहावर्षाचे युग ४४५

दक्षिणामूर्तिस्तोत्रटीका [ माधवतनयकृत ] ३०
द्रविडदेश ६१
दाजी विश्वनाथ २४१
दाद नाईकवाडी ३४४
दादजी बिन खेर्जी हांडे ३४४
दादासाहेब ४२१
दादासाहेब पेशवे यांचें एक पद ३९९
दादासाहेब व रावसाहेब यांचें सख्य झालें ३८८
दादासाहेब आनंदवल्लीहून घोडपेस आले ३८९
दादासाहेब व माधवराव रावसाहेब भागानगर प्रांतीं गेले ३८७
दादासाहेब यांणीं मिरत घेतली ३८७
दादासाहेब रुसून गेले ३८७
दादासाहेब हिंदुस्थानांत फौजेनसी स्वारीस गेले ३८८
दादासाहेबांची हिंदुस्थानची स्वारी ३८३
दादो कोंडदेव ३७६।३७७
दादाजी कोंडदेऊ मृत्यु पावले ३७६। २२७
दादो कान्हो ३०६।३०९
दादोपंत ३०९
दाभेमेची वसाहत ३२०
दाभेमसुभा ३२०
दाभोल सुभा ३२३
दाम २१०
दामाशाई ३४५
दामोदरपंत पटवर्धन ४२४
दासविश्रामधाम ३९
दासानुदास ३८
द्वापर ४३०।४४५
दिनकर सखाराम गोडबोले ३३८।३४२
दिनकरराव राजवाडे ४२४
दिनमार्क २७३
दिनार ४३४
दिवटा [ श्रीसमर्थकृत ] २३
दिवाकर ३८
दिल्ली ३७८।४२२
दिल्ली दरवाजा ( शनवार वाड्यास ) बांधला ३८५
दिलाच ठाणे नारोशंकर याजकडे सांगितलें ३८६
दीर्घतमा मामतेयोजुनुर्वानदशमे युगे ४४४
दानि दत्तपदांकित मुकुंद २४२
दीपरत्नाकर ९
दुर्गाघाट ४२५
दुर्गादेवीचा काळ ३७५
दुरठोली ४६६
दृगार्गलशास्त्र ४२६
दगांव ६१
देवगिरी ६१
देवदास ३८।२७२
देवनागरी २८७।२८८
देव ४२१
देवखरी ४२३
देवधर ४२१
देवपाटील ३५०
देवपालराज १५१
देवया शिंदे ४४९
देवयोनि २३५
देवभक्तानुवाद ( मुकुंदकृत ) २
देवराव हिंगण्याचा समाधिकाल १८७

देवराय १७१
देवरूख येथील शके १५७५ मधील शि-
लालेख २०९
देवाचें गोठणें २७६
देवलिपी २८७
देशमुखीचे हक्क ३७१
देशमुख मामले दंडाराजपुरी २५६।२५७
द्वैतविवेक ९
दोदु कोडदेव मोकासि २२८
दौलतखान दिवाण ३२१
दौलतराव २१४।२१६
दौलतराव बाबा २१९
दौलतराव सिंदे ३९६
दौलताबाद ३७३

## ध

धडफळे यादी ३७५
धनाजी जाधराव ३८१
धरणीधर ग्राम १५७
धर्मराजा ४३९
धर्माजी नागनाथ २१२
धर्माधर्मलक्षण [ कोणकृत न कळे ]
३८
धंम्मियर ४३१।४३२
धामणटेकची टेकडी ४४९
धारवाड घेतलें ३८८
धालवली २७६
धोंडपं ३८९
धोंडोपंत ४२१
धोंडोपंत जोगळेकर ३६२।३६६।३६८
धोंडोपंत नानासाहेब ४२१।४२२
धोंडोबा ३२०
नजीबखान ३९०
नबाब निजामन आलीखा ३८७
नबाब निजामन ३८७।३८८
नबाब असबजा ३८१
नमन २६।६
नवते ३१९
नवनाथचरित्र १३१
नरसिंगसव उधव ३३६।३६९
नरसिंगराव नाईक सितोळे देशमुख
प्रां। पुणे सिकेकरी यास देवाज्ञा
झाली. ३९५
नंजंणगोसांवी १७१
नंद ४३५।४३८
नंदाभिषेक ४४३।४४६। ४४७
नागझरी १७३
नागणनायकु १७१
नागणा ४६१
नागपाल ४३४
नागराऊत कनोजा ३४४
नागांच्या वंशावळी २४०
नागेश ३८
नागेश्रेष्ठी ४३३।४३४
नागोजी ३६१
नागोजी कडू ३६०
नाथांचें देवालय १७८
नाथाजीराव ४६६
नानासाहेब ४२१
नानासाहेब २२९
नानासाहेब ३१८
नानासाहेब पेशवे ३१६
नानांची शिस्त ३०९

नानासाहेबांच्या प्राणोत्क्रमणाचें स्थान ३८३
नानासाहेबांच्या देहाला अग्नी दिला ३८३
नानासाहेब यांची स्वारी हिंदुस्थान प्रांती भाऊसाहेब यांचे कुमकेस गेली ३८६
नानासाहेबांची कर्नाटक प्रांतीं स्वारी ३८६
नानासाहेब व दमाजी ३८५
नानासाहेब भागानगर प्रांतीं स्वारीस गेले ३८५
नानासाहेब यांस देव-आज्ञा झाली ३८७
नानासाहेब (धोंडोपंत) यांचा अंत ४२३
नानांची व तात्याटोपे यांची शेवटची भेट ४२२
नानागर्दी ४२२
नानासाहेब यांच्या हकीगती ४२३
नाना खाजगीची दक्षणा वाटीत होते २१६
नामजाद हवालदार ३२२
नामदेवराय २४२
नामदेव दाद मागतात ५२
नामदेवांची गुरुपरंपरा ५२
नामरत्नमाळा [ पाठकनामाकृत]३०।३१
नामविज्ञापनाशतक [ नारोजी पंडित-कृत ] ३०
नायिम्म २२३
नावजी माली २२८
नारायण २२९।२४४।२४५
नारायेणजी कडू ४५९
नारायणराव बल्लाळ ३१०
नारायेणराव कृष्ण पारसनीस ३६५
नारायणेश्वर ३८
नारायण मयूरेश्वर २२९
नारायणांकित माधवदास ३८
नारायणहृदय ३६
नारायणराव २१४
नारायणरावाचा मृत्यु ४१४
नारायणबुवा ४०१
नारायणबुवाचा लेख ४०१
नारो गोविंद आवटी ३४२।३३८
नारो शंकर ३८७।३८८
नारोपंत चक्रदेव २१५
नारोजी चंद्रस २४७।२५४
नासरजंग नबाब पुण्यास आले ३८४
नाहाबतखान ३९०
न्हावरे ३८७
निगमसार [ वामनकृत ] ४
निर्गुणध्यान [ श्रीसमर्थकृत ] ३
निजसुख २१
निजानंद १५७
निजामनमुलक ३४७।३८१
निजामशापातशा ३७६
निजामन ३८३
निजामन आलीखान बहादूर ३८५
निजाम अल्ली ३८८।३८९
निविशयान २७२
निर्वाण ९
निवृत्ति अवधूत ३८
निर्विकल्प [ श्रीसमर्थकृत ] १८
निरंजन २२९
निरंजनात्मजसुत २२९
निरंजनमाधव २४२
निशानी सही २७६
निशानी (शब्दाचा अर्थ) २७६
निळकंठ महादेव पुरंधरे ३८७
निंबगांव ४४८
नीरानदी २१६

नृसिंहशास्त्री २९५
नेपाळांत भगवा झेंडा व पेशव्यांची गादी ४२५

## प

पदार्थद्योतिनी २७८
पद्मनालदुर्ग २२५
पद्मपुराण २८८
पद्मावती १९७
परमप्रकाश [ निवृत्तीअवधूतकृत ] ८
परमप्रकाश ३।१७
परमप्रकाश किंवा परमहंस १९
परमार्थतत्वप्रबोध ११२
परमानंदचैतन्य अवधूत ३८
परमानंद २१५
परळी ३२७
परशराम केशव वोक ३३८
परशराम रामचंद्र घोटगे ३३८
परशुराम त्रिंबक प्रतीनिधीचा शिक्का ४६६
पराडकर ४२१
परीक्षिती ४३७।४४१।४४३।४४६।४४७
परीक्षितीचा काल ४३८
परीक्षितीचा जन्म ४३८
परूण ४२२
पवनविजय [ माळाहरदासकृत ] १९
पवार ३१९।३२०
पाटण येथील शिलालेख ६४
पाणिनी २८७।४४०
पाताळ बुरुज ३२९
पादशाही अंमल ३२०
पानिपतची लढाई ३८६
पामरसाहेब २१९
पारगांव ३८७
पारन गवि २१३
पारसनीस ( रा.ब. ) २४२
पारसनिवीस ३६९
पिंगल साहेब ३९९
पांडवांचा अज्ञात वास ४४५
पांडवगड ४६५।४६७
पांडुरंग लक्ष्मण केळकर ३३८
पांडुरंगपंत ४२१
पाडुरंगपंत लिमये ३३८
पांडुरंग २९५
पिशाच २३५।२३६
पांडोबा भाऊ केळकर ३९९
पिलाजी जाधव ४६५
पुत्रलक्षण ३८
पुणे २५७।३७६
पुणें वर्णनपर पुस्तक २३२
पुणेश्वर ३८२।३८३
पुण्याचा देशपांड्यांचा संग्रह २२७
पुरंधर ३८२।३८३
पुलीस ४३४
पुलोमन् आंध्र ४३७
पूर्णानंद १३१
पुर्णानंदांची परंपरा १३०
पूर्णामृतकरषोडशकळा ( मेरुकृत ) २१
पूर्वारंभ ( श्रीसमर्थकृत ) ३।८।२१
पृच्छाविवरण २८
पेडाराची आडनांवें १४६
पेशव्यांचा गोखाना ३१५
पेशव्यांची बखर २५७
पैठण ६१
पैमासीची चौकशी ३९९
पौलोमांध्र ४४१
पौरुष ज्योतिषी ४३८

पंचतंत्र २७९।४७०।४७२
पंचमान [ श्रीसमर्थकृत ] २२
पंचयोग [ श्रीसमर्थकृत ] ८
पंचलिंगांचे देऊळ २६९
पंचसमासी [ श्रीसमर्थकृत ] ३।८
पंचसंवत्सरात्मक कालगणन ४४४
पंचीकरण ( मुकुंदराजकृत ) ३
पंचीकरण [ श्रीसमर्थकृत ] ८।१९
पंचीकरणयोग [ श्रीसमर्थकृत ] ८
पंचीकरण [ ज्ञानेश्वरकृत ] ३
पंचीकरण ९
पंचभूतविवेक १२
पंचमुद्रा [ ज्ञानदेवकृत ] १८
पंजाब २३७।२३८।२८०
पंढरपुर २१५
प्रकाशदीप ५
प्रकाशदीप [ब्राह्मणमोनोजीकृत] ३।१२
प्रणवविवरण १९।१६७
प्रतापसिंव्ह छत्रपती, व आल्पिष्ठसाहेब ३९५
प्रतिनिधी ३२७
प्रतीप ४४१।४४२।४४३
प्रथमनंद ४४१
प्रबोधचन्द्रोदय ५०
प्रबोधसुधाकर ३७
प्रभाकर २९५
प्रभू-प्रकरणीं निवाडपत्रें २८६
प्रवृत्तिनिवृत्तिएक्यता-रत्नावली ५१
प्रवृत्तिनिवृत्तिग्रंथ अथवा मनचरित्र ५।२८
प्राच्य भरतेषु ४४०
प्रातः स्मरामि नामावळी [ त्रिंबक चौंडे कृत ] ३६
प्रास्ताविकपद्यानि ११५
प्रेमरयान २७३

फ

फकीरजी गाढवे २१५
फतेसिंग गाइकवाड ४४८।४६२
फत्तेजंग बाहद्दर मोकदम २४१
फत्यापूर २८७
फडाचा चौक दुरुस्ती ३९१
फरासीस २७२
फाल्के १५३
फिरंगी २७२
फुलगांव २५६।२५७।२५९।३९४
फुलगांवांत ब्राह्मणांस जमिनी दिल्या त्यांचीं नांवें २६२
फुलशहर २५६

ब

बजाबा बाबा ३९५
बजाबा बिन बाबूराव सितोळे यास देवाज्ञा झाली ३९६
बडे खान दिवाण ३२२
बयाबाईसाहेब आपटे ४२०।४२३।४२५
बरेट गौरगेल ३९९
बरेली ४२२
बरेलीचा नवाब ४२२
बलवंतराव नागनाथ मृत्यु पावले. ३९२
बलवंतराव दात्ये ३३८
बळवंतराव टोपे ४२४
बलिनगर ४३३
बळीयेपु १९७

बहिरगड ३२६।३२७।३३८
बहिरी निज्यामशा ३२०
बहिरोपंत पिंगळे दूर केले ३८१
बहिरो त्रिंबक ३२४।३२८
बहुधा गोसावी [ श्रीसमर्थकृत ] १८
बहुर ( भोर ) ३०९
बव्हृच इत्र ४४०
बळियेप्पा १९४
बाग २५७
बागपूर २१८
बाजी कदम ३८१
बाजी गोपाळ देशपांडिये ३७२
बाजी देवराव ब्रह्मे ३७२
बाजी मोधी २२०
बाजीराव पंडित प्रधान याणी वाडा बांधावयास मुहूर्त केला ३८३
बाजीराव बल्लाळ यास प्रधानपंताची वस्त्रें दिलीं ३८२
बाजीराव बलाळ प्रधान याची हिंदुस्तानची स्वारी ३८३
बाजीराव बल्लाळ यास कैलासवास जाला ३८३
बाजीराव रघुनाथ ३९७।४१९।३९४।३९२।३७८
बाजीराव रघुनाथ पुण्यास आले ३५३
बाजीरावसाहेब पेशवे याच्या कुटुंबाची शेवटची हकीगत ४१९
बाजीरावसाहेब ३९४।४२१।२१४।२५७
बाजीरावसाहेब बिठूरला निघाले ४२०
बाजीरावास ब्रह्मावर्तास नेऊन ठेविले ३९४
बाजीरावसाहेब यांचें वर्णन ४२२
बाण २८१।२८०।२८२
बानराऊत नाईकवाडी ३४४
बापू गोखले ३९३
बापूजी गणेश गोखले ठार पडले ३९४
बापू गोडबोले ४२१
बापूजी आपाजी ३२८
बापूजी श्रीपत ३८२
बापूजी नारायण जोसी ३११
बापूसाहेब कुरुंदवाडकर ४२०
बाबाजी धर्माजी काटे २७०
बाबा फडनवीस ३५८
बाबा वाकेर्नीस ३०६
बाबासाहेब आपटे ४२०
बाबूजी नाईक बारामतकर ३८४
बाबुराव आंगरे २१६
बाबूराव फडणीस ३८७
बाबूराव बिन त्रिंबकराव ऊर्फ तात्या सितोळे देशमुख ३९५
बायजाबाई ३९६
बायाचे बोलण्याचीं कलमें त्याजवर सिंदे यांचीं उत्तरें २१७
बारशी पानगांव ३८५।३७८
बालकाण्ड [ एकनाथकृत ] २२
बाळ ३८
बालकृष्ण बापजी लेले ३३७
बाळाजी कृष्ण ३०९
बाळाजी कृष्णाजी ३०६
बाळाजी जनार्दन नाना फडणीस ३९१
बाळाजी जनार्दन भानू ३७८
बाळोजी नाईकवाडी ३४४
बाळाजी बाजीराव ३८४।३३७
बाळाजी बाजीराव नानासाहेब ३७८।३३७

बाळाजी बापूजी देशपांडिये २४७
बाळाजी बापोजी २५४
बाळोबा तात्या २१६
बाळाजी विश्वनाथ सेनाकर्ते ४६७
बाळाजी विश्वनाथ ३८१।४६५।४१९
बाळाजी विश्वनाथ भट २००।२७५। ३०५।३०९।३६४।३८२
बाळाजी विश्वनाथ घाटावर कधीं गेला? २०१
बाळाजी विश्वनाथ यास पंतप्रधान केलें. ३८१
बाळाजी विश्वनाथ यास देव-आज्ञा झाली ३८२
बाळोबा पागनीस २२०
बाळासाहेब ४२१
बाळासाहेब निधन पावले ४२४
बाळाबाई ३९६
बाळभट ३१८
बाळाजी शंकर ३१०
बिराइमखान दिवाण ३२२
बिठूर ४१९
बिज्यागड ३८४
बिज्जण २२४
बांदीवडें १६९
बांदिवडे शिलालेखाचा कालनिर्णय १७०
बांदीवडे येथील एक मराठी शिलालेख १६९
बेगम ३८०
बृहत्संहिता ४३९
बुऱ्हाणुलमुलुक ३६४
बुधवार ३८०
बिंमयरायेदेव २२६
बिल्वपूर ३०४
ब्रह्मे २४८
ब्रह्मेकचेश्वर बाबा ३५९
बोल्होबा भाऊ ४०१
बोरघन ३८०
बोधिसत्व २७३
बेहरानखा १७६
बेदर ३४९।३८०
ब्रह्मानंद ३८।१३१।१५७
ब्रह्मांडाचें विवरण २१
ब्राह्मणत्वाचा अधिकार २४२
ब्रह्मगप्त ४३८
ब्राह्मी २८७

## भ

भक्तमंजरीमाला २४१
भक्तराज १९।२२८
भक्तविजय ४००
भक्ति(क्त)राज हा ग्रन्थ कोणाचा? ५५
भगवंत ३८।२२९
भट ४२१
भट विश्वंभर २९५
भट्ट विष्णु २९५
भटमार्ग केव्हां झाला? १५१
भटोबाईचे पांच पुत्र (दत्ता, चांगा, कृष्ण, गुंडा, परसा) १५२
भरतपूर ३९०
भवानजी ३६१
भाई आहमद मोकदम ३४४
भाऊसाहेब ३८६
भाखजजीन २६८
भागवतावर ओवीबद्ध प्राकृत टीका ४७
भागिरथी २२८।२२९

भागीर्थि बाईची नेमणुक २१६
भागानगर ३८०
भांडकुदळ शब्दाची व्युत्पत्ति १२१
भांडारकर ( डॉ० )२४२
भाणस्तरि २१३
भांडारी २३९
भानजी कडू ३४६।३४८।३४९
भामजी कडू ३४६।३४७
भावजी कडू ३५९
भारतीय युद्ध शकापूर्वी ३१७९ वे वर्षी सुरू झालें ४४७
भारतीय युद्ध केव्हां झालें ? ४३८
भारतीय युद्ध–वराहमिहिराचें मत ४३९
भिकाजी बलाल भावे ३३८
भिकं भट मनोहर याची स्मरण वही–तिचें वर्णन, तींतील नोंदी ४३,४४,४५,४६
भिकंभट बाळंभट नारायणभट २२९
भिडे २५७
भीम ४३१।४३३
भिमथडी २५९
भीमरूपीस्तोत्र [ श्रीसमर्थकृत ] ८।३०
भीमानदी २५९
भीमोपदेश ३८
भीमोपदेश ( मेरूकृत ) २।२२
भिलम १९४
भीष्मस्तवराज [ माधवकृत ] ३०
भुगोपाल २९५
भूत २३५।२३६
भूतान २३६
भूपाल ३८३
भेद ७३
भोजदेवः २२४
भोजजी ३६१
भोजजी वलद जैतजी कडू चव्हाण ३५१
भोजराज २२३
भोसले २१४।३२३
भोसले यांचें राज्य३७६
भैरव मोरेश्वराचा शिक्का ४६६

## म

मणीदेव २२८
मत्स्य ४४१
मतिरत्नाकर [ दिवाकरकृत ] ३७
मनाजीपंत खडोजीपंत २६७
मनीषापंचक [ शिवरामकृत ] १३
मनुफश्रेष्ठी ४३४
मनोबोध १२८
मनोहर गिर गोसावी यास देवाज्ञा ३९२
मयु २३६।२३७।२३८
मयुरेश्वर २२९
मराठी भाषेंतील स्थित्यंतरें १७०
मराठ्यांच्या इतिहासांतील परीक्षेची वेळ १६४
मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें २४२ २४३
महाराष्ट्रांतील जुनी गीतें ४०९
मलकण साहेब ३१६
मल्हारी २२९
महांकाली तोफ ३९३
महादजी २१४
महालिंगदास १४४
महालिंगदासाची ३२ शीं १४२
महात्मालिपी १५३
महावाक्यविवरण २८

महावाक्यविवेक [ राघवकृत ] २८
महात्मावेष १५३
महादजी बिन बाबूजी २५६।२५७
महादजी विश्वनाथ उर्फ बाळासाहेब राजगुरु २४२
महादजी ४०१
महादजी शिंदे ३९०
महादेव२९५।४३७।४३८।४४१
महापद्म ४३७।४४३।४४६
मल्हार अनंत ३९६
मल्हारजी तावरा ३११
मल्हारजी होळकर २६८।२६९।३१८ ३८६
मल्हार विश्वनाथ ३०५।३०६।३०९
मल्हार देवाचें गाणें ४१६
मल्हारीसुत ४२९
मलकापूर ३८३
मलकापुरपेठ ३७५
मलिकआंबर ३७५।३७६
मलिखयाकुद खान ३२१
महमदखान दिवाण ३२२
महाभाष्य ११२
महाभिल्लभ १९४
महार नवर २४१
महाराज छत्रपती ३२४
महाराष्ट्र-साहित्य-संमेलन १४१।२४२
महाज्ञान [ बलिरामकायस्थ श्रीबासा-वषराकृत ] २८
महिपती ४००।४०१
महिपती बावा २२८
महदेश्रेष्ठी ४३४
म्हाळसाबाई ४४८
म्हाळसाबाईचा भाऊ हेगडे प्रधान ४४८
मॅंगेप्रभु १७१
मांडकी ३१९
मॉड-गोल्फिए २८१
मार्णाकदुर्ग ३१९
माखनखान ३४७
मातापुर ६१
मांदुस २१३
माधव ३८
माधवनंदन ३८
माधवराव बल्लाळ ३१० । ३१४:३८७ ३८९
माधवराव नारायण प्रधान ३१८।३८९
माधवराव निळकंठ पुरंदरे ३८९
माधवराय २२९
माधवराव बल्लाळ ३१४।३१०।३८७। ३८९
माधवराव बल्लाळ प्रधान यास वस्त्रें दिलीं ३८७
माधवरावसाहेब थोरले २५७
माधवरावसाहेब कर्नाटक प्रांतीं स्वारीस निघाले ३९०
माधवराव रास्ते ३९४
मानपान ( पाटीलकीचे व मोकदमीचे ) ३७१
मानभवोत्पत्ति कथा १५०
मानभावांच्या ग्रंन्थांचा शोध ६६
मानभावांचा व्याप ६६
मानभावी मन्त्र १५६
मानभावी लिपी ६७
मानपंचक [ श्रीसमर्थकृत ] १८
मानसपूजा [ मेरुकृत ] ५
मानसोल्लास २८

मानाजी आंगरे ३५६
मायनाक २३९
मात्योजीराव विचारे ३३१
मालजी गाज्या, २२८
मालकणसाहेब गौरनेल मुंबईस गेले ३९९
मालकण साहेब पुण्यास आले ३९७
मालिटसाहेब ३९९
मालोजी राजे भोसले ३७६
महादजी आंबाजी पुरंधरे ३८५
महादाजीपंत २२७
माहादाजीपंत कानडे ३३८
महादजी बिन बापुजी २५८
माहादाजी अनंत ३२३
माहादाजी बलाल ३२८
माहादाजी मोरेस्वर जोसी ३५३
माहादाजीराम ३०७।३२८
माहादेव २२८
माहुली २३२
मीजसाहेब ३९६
मीपणाचा समास ( श्रीसमर्थकृत ) ८
मिरजप्रांत २९५
मिर्जाराजा दक्षणेस मुभा होऊन आले ३७९
मिर्जाराजा यांचा व सिवाजीराजे भोसले यांचा सला जाला ३७९
मिरत ४२२
मुक्ताबाईचा जन्मशक व उपदेशकाल ९३१
मुकुंद ३८२
मुकुंदराज ३८।२८२।१९१
मुकुंदराजाचें समाधिस्थान ११४
मुकुंद व ज्ञानेश्वर ११४
मुकुंदांची गुरुपरंपरा ११३
मुकुंद व ज्ञानेश्वर यांचें गुरुशिष्यांचें नातें १५९
मुजफरखान २१४
मुजफरजंग ३८६
मुजावर २४१
मुग्दल २७६
मुग्दल रामायण २७७
मुंडाः २३७।२३९
मुनि महर्षि ४३९
मुबजी नाईक ३३१
मुद्राविलास [ एकनाथकृत ] ५।२५
मुर्तजाबाद शनवार ३८३
मुरादखान ३२०
मुरार जगदेवराव ३७६
मुस्तफाखान ३२०
मूळस्तंभ १९
मृत्युंजय ३८
मेंगनाथ बिन शंकरभट २४२
मेनका २३६
मेरु ३८
मेरुबोध [ मेरुस्वामीकृत ] ७
मैनाबाईसाहेब ४२०।४२३।४२४
मोकदमीचे मानपान व कलमे ३७१
मोंगलाची तळेगांवाकडील धामधूम ४०४
मोडी २८७
मोमिनाबाद ऊर्फ चाकण ३४६
मोर दीक्षीत टार पडले ३९३
मोरया गोसावी २२९
मोरे ४००
मोरेश्वर गोसांवी २२९

मोरो जनार्दन ३०
मोरेश्वरदेव २२९
मोरो बाबूराव फडणीस ४२१
मोरो विठल ३८९
मोरो विश्वनाथ ३८२
मोहियाबाद ३८०
मोहियाबाद ऊर्फ बुधवार ३८३
मोक्षधर्म [ केशवकृत ] १५
मौनाः २३७।२३९
मौर्य २३८
मौर्यी २८७
यग्रदोर २७३
यमाजी धुमाळ ४६५
यमुनाबाई २१४
यवनाः २३७।२३९
यशोदाबाई ३९१
यहूदीन २७३
यक्ष २३५।२३६
यावत्परीक्षितो जन्म वगैरेचा अर्थ } ४३६
युग ४४४
युधिष्ठिर ४३९
युधिष्ठिर वंश ४४७
येक्केहाळी ३९
येशवंतराव सिवाजी २१९
येशवंतराव होळकर यास देवाज्ञा झाली ३९२
येसाजी बिन आबाजी २५६।२५७
येसाजी वलद संताजी २४७।२५४ ३५१
येसाजी वलद संताजी ३४६।३५२
योगराज [ अमृतनंदकृत ] २१
योगवासिष्ट ( माध ) २।९।२१
योगवासिष्ठसार १३६
योगाबाईसाहेब ४२०

र

रखतखान ३६४
रखतार २७३
रखमाजी जाचक २६९
रखमाबाई ३९६
रमाबाईसाहेब ४२१
रखुमाई २२७
रंगनाथस्वामींची संतमालिक १००
रघूजी कदम २६६
रघुनाथ २९५
रघुनाथ त्र्यंबक बर्वे ३३७।३४१
रघुनाथ देशपांडे १७६
रघुनाथ बाजीराव २८६
रघुनाथ हरी सुभेदार ३६५
रेघाजी भोसले ३८४
रजतपुर २९४
रजपुताना २३७
रत्नाकर ३८
रत्नाकर देव २२९
रत्नागिरी ३२६।३२७।३३५
रत्नागिरी जिल्हा २७४
रमाबाई ३९१
रविवार ३८३
रसाळगड ३०६।३०९
रक्षस् २३५।२३६
राघव ३८
राघोजी ३६१।३७४
राघोजी भोसले नागपूरकर ३८४

राघोबा बल्लाळ अत्रे ३२३।३२४
राघो वासुदेव ३२३
राजगुरु २४१
राजतरंगीणी ४४७
राजधर्म क्षेत्रधर्म बुद्धिवाद ७
राजधर्म [ श्रीसमर्थकृत ] ८
राजमहाल २२१
राज्याभिषेक शक ३७७
राजयोग ( वामनकृत ) ४
राजवाडे यांची ज्ञानेश्वरी १५८
राजवाडे २४१।२४२।२४३।२४७।२७३।
२९०।३१६।२९०।४०९
राजापूर २७४
राजपुरी ४६६
राजाराम २३४।३७८
राजाराम छत्रपती २३२।३२८।३८०
राजाराम छत्रपती परलोकास गेले ३८०
राजाराममहाराजाचा कारकीर्द ३७८
राजाराम महाराज यांची द्वाही फिरविली ३८५
राजाराम प्रासादी २४१
राजाराम व ताराबाईसाहेब व समस्त राजमंडळ चंदीचंदावराकडे गेले ३८०
राजा शाहू महाराज यांची कारकीर्द ३७८
राजा शाहू स्वदेशास यावयासनिघाले ३८१
राजे शाहू छत्रपती कैलासवासी झाले ३९२
राणीगंज ४२४
राणोजी ३६१
राद्राजी अनंत ३२८
राधागो १९४
राधाबाईचें सहगमन ३९५
राबीणसाहेब ३९८
राबीनसन कलकटरीचे कामावर पुण्यास आला ३९९
राबिनूसनू साहेब २१५।२१६। ३९४
३९६।३९७
रामकृष्णदासपंत ४०४
रामचंद्र अण्णा २१६।२२०
रामचंद्र गणेश ३१४।३८९।३९०
रामचंद्र गणेश विसाजी पंत चिनीवाले ३९०
रामचंद्र जाधवराव ३८७
रामचंद्र नारायण भिडे ४२१
रामचंद्र महादेव नगरकर ३३८
रामजी सिंदे ४६३
रामदास पंत दिवाण ३८५
ामदासांची बखर ४००
रामदीन ३९४
रामदेव रावो १५१
रामदेवराय व लीळाकार ६४
रामनामतरंग [ माधवनंदनकृत ] २५
रामनायकु १७१
रामनाक २३९
रामप्रभु १७१
रामराजा छत्रपती ३१९
रामराजे छत्रपति यास देवआज्ञा झाली ३८९
रामराजे यांची कारकीर्द ३७८
रामशास्त्री मृत्यु पावले ३९१
रामस्तोत्र [ कोणकृत न कळे ] ३६
रामसिंग ३७९
रामसोहळा [ मेरुकृत ] २२

रामाई १९४
रामामृत तरंग [ माधवसुतकृत ] ५
रामाचें मिशाण ४१३
रामाजी कडू ३४७।३५०
रामाजी काशी ठोसर ३०६।३११।३१४ ३१५
रामाजी काशी वाकेनीस यांची कारकीर्द ३०६
रामाजी जेनार्दन सबनीस ३४५
रामाजी महादेव चिवलकर ३३७
रामजी व लिंबाजी ३५०
रामानंद १३१
रामानंद गोसावी ५५
रामामृत तरंग [ माधवकुमारकृत ] ३
रामार्या २७६
रामेश्वरभट २२८
रायबरेली ४२५
रायगड ३७९
रावथाजी २५६
रावसाहेब २१४
रावसाहेब ३८९।४२१।४२४।४२०
रावसाहेब यांस देहान्तदंड ४२४
रावेर ३८३
राष्ट्रकूटांच्या वंशांतील कांहीं नांवें ४३०
राक्षसभुवनची लढाई ३८८
रिसबूड ४२१
रुकमदौला ३८९
रुद्राजी हरिदेव शेणवी २७४
रस्तुमराव ३८२
रेऊजी नाईकवाडी ३४४
रेऊमश्रेष्ठी ४३३
रेवणश्रेष्ठी ४३४
रोहिणीबाईसाहेब ४२१
रंगनाथस्वामी १०७
रंगो बापूजी धडफळे ३७५
रंजितराय ३७५
रंभा २३६
रंभाजी निंबाळकर ३८१।३८२

## ल

लखनौ ४२२
लखुजी जाधवराव देशमुख ३७६
लघुयोगवाशिष्ठ [ नारायणाचा माधवदासकृत ] २२
लतियान २७३
लमानराव २४०।२४१
लवथलेश्वर २६६।२७१
लक्ष्मण अनंत २१८
लक्ष्मण गोविंद मनोहर १६४
लक्ष्मण बलाल करंदीकर ३३८
लक्ष्मीबाई २१४
लक्ष्मीबाई आंग्रे इनें बांधलेली दीपमाळ ५४
लालमहाल ३७७
लिखित पासष्टी ३।२१।२८
लीळासंवाद ३१६
लीळासंवाद ग्रंथांतील शब्दसंकेत ६३
लीळासंवादांतील अक्षर संकेत ६०
लीळासंवादांतील मजकूर ६१।६२।६३
लीळासंवाद पोथीचें वर्णन ५९
लीळासंवाद व लीळाचरित्र ६६
लोकेश्रेष्ठी ४३४
लंबोदर २२९

## व

वज्जन २२६
वड्डिग ४३०
वड्डिगदेव ४३२
वडगांव २१४।२६६

वडनेर ६१
वडवाळ सिद्धनागनाथ यांचे ग्रंथाचा शोध ४०
वनगजमल्ला ४३२
वरदनागेश ३८
वराहमिहिर ४२६
वल्लाळदेव २२३
वलंदेज २७२
वलेंचे ३१९
वसईचा किल्ला ४४९
वसिष्ठ २००
वृद्धगर्ग ४३९।४४०
वृंद ७३
व्याघ्रगड ३२७
व्याडिसंग्रह १११
व्याजन १५३
वाई २१५।२७६
वाकेनीस ( ठोसर ) ३०५
वाकेनिसांचा वाडा ३०८
वाकेनिसांचा वंशवेल ३०७
वाकेनिसांचें उत्पन्न ३०७
वाकेनिसांचें काम ३०७
वाकोजी ढमढेरे ३८२
वाफगांवचे रान २४३
वामन ३९
वामनगिरी ३४६
वामनराव ४३०
वायुपुराण ४४१
वारतिथिमासनामादिवर्णन [ रत्नाकरकृत ] २५
वाराणसीबाई ४२०
वाळवे ३२७
वा ( व ) लिमक नगर कोणतें ? १८६
वाल्हाजी २७०
वासना १५३
वासुदेव हरि जोशी १६१
विजयगड ३२९
विजयादित्य २२४
विजयानगर १७१
विजयार्कदेव २२३
विज्यापुर २४४।३७६
विठल कान्हो ३०९
विठल कान्हो ठोसर ३०५
विटलपंत ३०९
विठोजी वलद बाबाजी देशमुख २४७
विठल विश्वनाथ पटवर्धन ३३९
विठ्ठल सिवदेव ३८८
विठल सुंदर ३८८
विठ्ठल कान्हो ३०६।३१०
विठ्ठल गोपाळ ३२८
विठ्ठलनाथ कालनिर्णय ९६
विठ्ठलनाथांचें पद १००
विठ्ठल नारायण २१८
विठ्ठल राम ३०७
विठ्ठल सुंदर ३८७
विठोजी गायकवाड ३३८
विठोजी वलद बाबाजी २५४
विठोबा ४०११२२८
विद्याधरः ( ज्ञानेश्वर ) १५९
विद्याधरः २२२।२२५।२३६
विद्यानंद [ राघवकृत ] १८
विधाट ४६६
विनायक २९५
विनायक भट बिन नारायण भट्ट अफळे २३३।२३६
विनायकदास ४०४

विनायेकभट चिन येकनाथभट २३३
विनेज २७२
विमाने २७९
वि [ यी ! ] लाईत ३१९
विवेक उत्पत्ति [ मृत्युंजयकृत ] १९
विवेकसिंधू ५।८।२२।२९।३७
विवेकासिंधू (शके १७४४ तील प्रत) ३
विवेकसिंधु व गुरुचरित्र २८२
विवेकसिंधु व गुरुचरित्र यांमधील साम्य २८३
विश्वनाथ २२९
विश्वरूपनमन [ रत्नाकरविरचित ] २९
विश्वासराव ३८६
विश्वासराव गोळी लागून पडले ३८६
विश्वासराव यांचे लग्न झाले ३८५
विशालगड ३२६
विष्णु आपाजी टिळक ३३८
विष्णुदासनामा ३८।२४२
विष्णुपुराण २३७।२३८।२३९।४३५
विष्णु रामचंद्र भागवत २२०
विसा खेचराची मूळ पीठिका ५३
विसाजी कृष्ण बिनीवाले ३१४।३८९ ३९०
विसाजी लखाजी ३५७।३५८
विसोबा खेचर ५१
वीठल शीवदेव सासवडकर २६९
वीरेश्वर ३८
वेणगांव थोरले ४२१
वेताळपंचविशी १४३
वेदसंहिका १७२
वेदवेदांतसार तत्वमसिविवरण २८
वेदांतसूर्य [ श्रीधरकृत ] ३
वेंकटेशस्तोत्र ३६
वैद्यनाथ ३८
वैरागर ग्रंथांचें स्वरूप १६६
वोरंगळ ६१
वोंदेधावा १७२

## श

शकदेश २३९
शनवार वाडयाची आग ३९६
शनवार वाड्यावरील शिलालेख ४०२
शनवार वाड्यास मुहूर्त ४०३
शहाण्णव कुळी १४६
श्येनवी २९५
श्येनवी जातिधर्म निर्णयः २९३
शातवाहन ४३८
शातवाहनशक ४४७
शाबुदीन खान ३२२
शामजी नारायेण राजापूरकर २६७
शामळाचा दंगा २०८
शास्ताखान सिवाजी राजे यांचे पारपत्यास आले ३७९
शाहाजी कडू ३४७।३४८।३४९।३६०
शाहाजी २९४।३६१।२४२।३७६।३७७
शाहाजींची कारकीर्द ३७६
शहाजीची जाहागीर ३७६
शहाजी राजे भोसले घोड्याखाली आले ३७९
शाहाजी बा। जानोजी ३६०
शाहुगड ३२७
शाहूचा शिक्का ४६६
शाहु छत्रपती २८७।३०५।३०६।३०९ ३६५।३७७।३८९।४६६
शाहु छत्रपति मरणासंध जाले १८५
शाहू महाराज वारले ३८५

शाहूराजे दिल्लीहून आले ३७८
शाहूराजे दुसरे यांची कारकीर्द ३७८
शितिकण्ठः २९५
शिरके ४६६
शिर्के यांस सनद ४६५
शिलाहार २२२
शिलाहार राजे २३६
शिवकल्याण ३८
शिवकल्याणांचा काल ९७
शिवकल्याणांची टीका ९६
शिवकालीन शास्त्री व पंडीत २९३
शिवकालीन कागदपत्र ४२०
शिवदिन १५७
शिवबोध [ दत्तात्रय अवधूतकृत ] १९
शिवराज्याभिषेक ३७७
शिवराम ३८
शिवराम ते च सदानंद १३३
शिवराय २४२
शिवरायाची एक सनद ५४
शिवाजी २९५
शिवाजीचा जन्म ३७७
शिवाजींच्या वाड्याची जागा २३१।२३०
शिवाजी वाडा गॅझेटिअरची हकीगत २३०
शिवाजींची कारकीर्द ३७७
शिवाजी व मानासाहेब २३०
शिवाजीराजे दुसरे यांस राज्याभिषेक ३८०
शिवापुर ३०९
शुकाष्टक [ एकनाथकृत ] ३
शुभतुंग ४३०।४३१
शेष २९५
शेंडे चितळे २७७
शेंडे सोमण २७७
शंकर ३८।२७८
शंभरखणी २५७

ष

षड्रिपु ( श्रीसमर्थकृत ) ८।२१
षाहिस्तेखानाच्या शिक्षेची जागा २३१

स

सईबाई ४२०
सईबाईसाहेब ४२३।४२४
सईबाईसाहेब वारल्या ४२५
सकपाळ २३१
सकु रुद्राजी २४१
सकोजी आंगरे यांस देवाज्ञा १६५
सखवारबाईचें सहगमन ३९५
सखाराम कासीनाथ होनप २५८
सखाराम बापू ३७८।३८६।३८७
सगुणध्यान [ श्रीसमर्थकृत ] ३।२५
सजणाजी ३६१
सच्चिदानंदविलास [ भगवंतकृत ] १६
सद्धर्म ४३०
सत्यभामाबाई ४२०
सताजीसुत येसोजी देशमुख २४८
सदानंद १३१।१५०
सदानंदकालनिर्णय १३४
सदानंदपरंपरा १३३।१३५
सदार्थयोमचायुक्तः इ० श्लोकांचा अन्वयार्थ ४४१
सदाशिव गणेश भटजी २२९
सदासिव चिमाणाजी ३।४।३३७।३७८ ३८६
सदाशिव चिमणाजी भाऊसाहेब, व विश्वासराव बलाळ हिंदुस्थानचे स्वारीस गेले ३८६

सदाशिव दादाजी मावळंगकर ३३१
सदाशिव माणकेश्वर ३९२
सदाशिव माणकेश्वर यास देवआज्ञा ३९३
सदाशिव रामचंद्र यास दिवाणगिरी ३८५
सदाशिवराव ४२१
सदाशिव शंकर अभ्यंकर ३३८
सदाशिव पेठेंत हौद ३९१
सदासीव दीक्षित कर्वे उपाध्ये ३११
सप्तग्रही ३९५।३९७
समर्थशिष्य तंजावर प्रांतीं १
समसेर बहादुर ३१४
सरकारी बाग २५७
सरकारी वाड्याचें वर्णन २५९
सरदेशमुखी पातशानीं शाहू राजे यास दिल्ली ३८१
सरस्वती गंगाधर २८२
सरस्वतीबाई ४२०
सरस्वतीबाईसाहेब पटवर्धन ४२०
सरस्वती मंदिर २४२।२४७
सरस्वती महालाची पुढील व्यवस्था १
सरस्वती महालाचें वर्णन १
सरस्वती महालांतील ग्रंथ २
सर्जेराव २१४।२१५।२१६
सर्वज्ञ ४३०।४३१
सवाई माधो ४०२
सशानें लांडगा मारिला ३७५
सहजानंद १३१।१३६
सहजानंद परंपरा १३५
सहजानंद व ब्रह्मानंद १६७
सहजानंद व ज्ञानेश्वर १४०
स्थानकमंडल २२४
स्फुट [ कोणकृत न कळे ] ३६
स्फुट श्लोक ३६
स्वात्मसुख [ एकनाथकृत ] १२
स्वात्मसुख २१
स्वात्मानुभव ९
स्वात्मानुभव [ ज्ञानेश्वरकृत ] ३।१२
स्वात्मानुभवतरंगिणी कोणी करविली ? कोठें ? केव्हां केली ? १६२।१६३
स्वानंदलहरी ( मेरुकृत ) ४।१९
साजे ४६६
सातारा ३१५।३७८।३८०
साम्नायान्वय म्हणजे साने यांचा वंश २०९
साने ( का. ना. ) २५७
साप्तवार्षिक कालगणना ४४७
सामनायक २१२
सारजाबाई ४२१
सावर्डे ३१९।३३८
सांडस २५७।२५९।२६६
सिद्ध २३५।२३६
सिद्धगुणाकरपंडित २८५।२८६।२८७
सिद्धनागार्जुन ९
सिद्धसंकेत ( मृत्युंजयकृत ) ३।२२।३७
सिद्धानुभव [ शांतानुदासकृत ] १३
सिद्धार्थ १०७
सिद्धेश्वर २४२
सिद्धेश्वरशास्त्री ३९९
सिद्धेश्रेष्ठी ४३३
सिदी याकूब ३७५
सिरवळ ३७६
सिराळशेट ३५३।३७१
सिरेमेदगिरी ३८९
सिलार ४३२
सिलारांची वंशावळ ४३०

सिवजी २२८
सिवजी कडू ३५०।३६०।३७०
सिवजी नाईकवाडी ३४४
सिवजी वलद गोमाजी कडू ३६०
सिवजी वलद विठाजी कडू ३४६।३५१।
३५२
सिवनेरी ३७७
सिवरामपंत थत्ते २१५
सिवाजी त्र्यंबक ३२८
सिवाजी भोसले ३२३
सिवाजी महाराज २२८।३२८।३७७
३७८।३७९
सिवाजी महाराज छत्रपत्री यांसी राज्याभिषेक ३२३
सिवाजी माहाराज कारकीर्द ३२३
सिवाजी राजे याणी खानाचा आंगठा तोडिला ३७९
सिवाजी राजे याणी गागाभट आणिले ३७९
सिवाजी राजे महाराज यांस कैलासवास झाला ३७९
सिवाजी राजे यास राज्याभिषेक झाला ३८०
सिवाजी राजे (धाकटे) कारकीर्द ३७८
सिंद्याचे घरचा फितूर २०६
सिंदे ३९०
सिंहगड ३८०।३८५
सिताराम बावा ३९
सीर ३१९
सुपे ३७६
सीरसट १९७
सुभानजी मोरे ३५७।३५८
सुभाषिणी ४९
सुरजमल जाट ३९०
सुलतानजी कडू ३४७।३५५।३५९
३४८।३६१
सुलतानजी घाधा ३६९
सुलतानजी बिन नागोजी ३४६।३४७
सुलतान महमद ३२१।३२३
सुलतान महमुदीन ३२२।३२३
सुवर्णदुर्ग ३२६।३२७
सुवेज २७२
सुश्रुत ७३
सुंदरनारायण ३१६
सुंदरनारायणाचे देवळांतील शिलालेख
३१९
सुंदराचें देऊळ ३१६
सेखोजी आंगरे ३४९।३४५।३५१
सेणवे २२६
सैदसलाऊद्दीन ३८२
सोमनाथः २९५
सोमसुंदरस्तोत्र [ कोपाकृत न कळे ]
३०
संकटहरणी शिवग्रन्थ ४०
संगमाजवळ पूल नवा बांधला, ३९८
संतसिद्ध २७
संताजी २२८
संतोबा २२७
संभाजी ३७९
संभाजी आंगरे ३४६।३४९
संभाजीचा वधकाल १७७
संभाजीची कारकीर्द ३७७
संभाजी राजे ३२८।३७७।३७८।३८०
संभाजी राजे यास जिवे मारिले ३८९
संभाजी राजे यास राज्याभिषेक ३७९
संभाजी व सवाई माधवराव ३३१
संभूनाथांचें आडनांव १७९

ह

हडप ४३४
हडपण्य ४३४
हमजाबाद ३२७
हबशी ३३५
हबसी आंबे ३३०
हाबसीखान ३२८
हरजी पाटील ३५३
हरजी बिन रामजी ठाकूर ३५३
हत्तीखाना २५७
हरभट २२९
हरभट बिन जनार्दनभट २३३।२३४
हरिदासानें ग्रंथ कां रचिला ? १८१
हरिदासांचें गोत्र १८१
हरिदासानें ग्रंथ कोठें रचिला ? १८१
हरिदासांच्या ग्रंथाचें स्वरूप १८०
हरिदासांचे गुरु १८२
हरिदासांची गुरुपरंपरा १८२
हरिभट विश्वनाथभट पटवर्धन यांस सनद १७७
हरिपंत फडके २५७।३९०
हरिपाठ ५६
हरिपाळ पोळ १९४
हरिपाल देव २२६
हरि बलाळ फडके यास देवाज्ञा झाली ३९१
हरि बाळकृष्ण दीक्षित पटवर्धन ३८५
हरिभजन [गोविंदकृत] २२
हरिमेखल ७३
हरि रघुनाथ देव २२९
हरि रघुनाथ भागवत ३३८
हरिराज शेंडे २७६
हरिराज २७८
हर्षचरित १११।२७८।४७२
हर्षचरितांतील दासींचीं नांवें. २७९
हस्तामलक [एकनाथकृत] ३।१७।१९
हातगा शब्दाची व्युत्पत्ति ८१
हातग्याची गाणीं ८१
हारीत ७३
हारीबा बीन जानजी २७०
हालीम ४०९
हिंगणगांव ३८२
हिंगणगांवची गढी ३८२
हितोपदेश २७९
हिमालय २३६
हिसाम दीन खताल. ३८२
हुसेन यागे खानी १७६
हेगडे प्रधान २६६
हेगोजी काट २७०
हैदर नाइक ३८९।३९०।३९१
हैदरनाईक याजवर स्वारी ३८८
हैदरखान ३८६
हैद्राबाद ३८०
हैबतखाम ३७५
हेमकल्प ३४
हेमाडपंत २२९
हेळवाक ३२७
होळकर ३९०
होनजी कडू शुमाखे ३५१

क्ष

क्षयमास पडला ३९८
क्षेत्रधर्म [श्रीसमर्थकृत] ८

ज्ञ

ज्ञानेश्वर ३८

ज्ञानसंन्यास टीका [ दासानुदासकृत ] १४
ज्ञानप्रदीप अथवा ज्ञानदीपिका १३७
ज्ञानदेवकृत पत्र २८
ज्ञानसार २०
ज्ञातामृत २६।२०
ज्ञानाज्ञानविवरण १३
ज्ञानेश्वरांचें ' योगवाशिष्ठ, प्रकरणें, ओवीं १३९
ज्ञानेश्वर महाराजांचे योगवासिष्ठ १३८

English words

Abdagases २३८
Arsakes २३८
Asii २३९
Azes २३८
Azes II २३८
Azitises २३८
Bactria २३९
Early History of India १०८
Gazetteer २६५।२६६
Gondophares or Guduphara २३८
Greeks २३९
Historian's History of the World २३९
Indo-Parthian Kings २३७
Taxartes २३९
Kabul valley २३७
Maues २३७।२३८
Onoues २३८
Orthagnes २३८
Pakores २३८
Panjab २३७
Pasiani २३९
Sacae २३९
Sacaraucae २३९
Sanabares २३८
Sogdiaus २२९
Strabo २३९
Tochari २३९
Vedic Index ४४५
Vincent Smith २३७।२३८

☞ खालील निबंध यावर्षी वाचले गेले असून इतिवृत्तांत छापले नाहींत. ते शके १८३६ च्या इतिवृत्तांत उपमंडळानें पसंत केल्यास छापले जातील:—

१ शक १४४६ तील बनावट ताम्रपट २ कांहीं आख्यायिका ३ प्रवृत्ति-निवृत्ति-ऐक्यतारत्नावली ४ सन १८३६ तील पुण्यांतील ठळक गृहस्थांची यादी ५ एक मानभावी बाड ६ श्रीधराबद्दल आणखी कांहीं माहिती ७ आटपाट-नगर ८ रघुनाथपंत हणमंते ९ नारायणांकित माधवदास १० शिवाजीराजे छत्रपति केव्हां झाले ? ११ कांहीं मराठी आडनांवें १२ योगवासिष्ठाचे अवतार १३ दशावतार श्लोक १४ तुकारामाचे टाळकरी १५ संत बहिणाबाई १६ देहूच्या सनदा १७ देवस्की १८ मेदिनीकोशाचा काळ १९ श्रीखंड्या आख्यान २० अवरंगजेबाचा जुलुस २१ सडकलाट येथील तीन मराठी ताम्रपट

## मंडळाचे उद्देश व नियम

( १ ) संशोधनाचें काम वर्षानुवर्ष सारखें व्हावें म्हणून तीन चार संशोधकांची या च कामीं नेमणूक करून त्यांचा योगक्षेम चालविणें.

( २ ) आपल्या महाराष्ट्रांत च अजून कित्येक ऐतिहासिक घराणीं अशीं आहेत कीं त्यांच्याकडील कागदपत्रांचा आपल्यास कांहींच शोध नाहीं. तो शोध लावून ते कागदपत्र मिळविणें.

( ३ ) मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून तों शके १७४० पर्यंत मराठींत जें अनेकविध सारस्वत निर्माण झालें त्यापैकीं सहस्रांशाची फार तर आपल्यास माहिती झाली आहे. बाकीचें जें सारस्वत अज्ञातवासांत पडलें आहे तें प्रकाशांत आणणें.

( ४ ) एतद्विषयक सर्व संदर्भग्रंथांचा संग्रह करणें.

( ५ ) इतिहासाच्या साधनांचे खंड व काव्यग्रंथ प्रकाशित करणें.

( ६ ) व्यक्तिशः सभासदांकडे जो संग्रह झाला आहे व यापुढें मंडळाचा प्रयत्नानें जो होणार आहे तो अग्नीपासून सुरक्षित ठेवण्यासाठीं सरस्वतीमंदिर बांधणें.

( ७ ) संशोधनात्मक निबंध व टांचणें त्रैमासिक, षाण्मासिक अगर वार्षिक वृत्तरूपानें प्रकाशित करणें.

हीं व या च धोरणाचीं इतर कामें विस्तृत प्रमाणावर व्हावींत असा मंडळाचा हेतु आहे.

मंडळाचे सभासद होण्याविषयीं नियम पुढीलप्रमाणें आहेत.

( अ ) मंडळास दरसाल ३०० किंवा अधिक रुपये देणारे " आश्रयदाते " होत.

( आ ) दरसाल १२५ अथवा अधिक रुपये देणारे " हितकर्ते " होत.

( इ ) दरसाल २५ अगर अधिक रुपये देणारे " सभासद " होत.

( वरील तिन्ही वर्गांच्या हातीं मंडळाची व्यवस्था राहील. )

( ई ) दरसाल किमान १२ रुपये देणारे " साधारण सभासद " होत.

( उ ) दरसाल किमान ६ रुपये देणारे " सहानुभविक सभासद " होत.

( ऊ ) दरसाल किमान ३ रुपये देणारे " चहाते " होत.

पहिल्या चार वर्गांच्या सभासदांना मंडळाकडून प्रकाशित होणाऱ्या ग्रन्थांची निराळी किंमत पडणार नाहीं. सहानुभविक सभासदांस ते ग्रंथ निम्या किंमतीस मिळतील.

☞ **मंडळाचें वर्ष चैत्र ते फाल्गुन.**